
# माणूस

प्रजासत्ताक दि
विशेषांक १९
• दहा रुपये

## तिबेटच्या स्वातंत्र्येच्छेचे प्रतीक – दलाई लामा




विशेष तिबेट पुरवणी




## मातंगी

दलितांच्या वस्त्यावस्त्यांतून विधायक कार्यक्रमांची उभारणी करणारी **विश्व हिंदू परिषद** व तिचे असंख्य कार्यकर्ते व काही विद्रोहवादी शक्ती-गट यांच्यातील आचार-विचार संघर्ष चित्रित करणारी, सत्य घटनेवर आधारित कादंबरी...

## 'एका पूर्वकथित मृत्यूचा वृत्तांत...'

नोबेल पारितोषिक विजेत्या **गॅब्रिएल मार्खेज** या लेखकाच्या एक थोर कलाकृतीचा वसंत आबाजी डहाके यांनी करून दिलेला परिचय...

## वैदिक सरस्वती नदी खरोखरच भारतात होती काय?




# आता कमी खर्चाची बीमा संदेश योजना आणखी कमी खर्चात!

# १० % – २७ % सूट!

**कमी, अगदी कमी हप्ते**

बीमा संदेशचे मुख्य आकर्षण होते तिचे कमी हप्ते.

आता हप्त्यांचे दर वय आणि मुदत यांनुसार १० % ते २७ % पर्यंत कमी करण्यात आले आहेत.

आता या दर कपातीमुळे बीमा संदेशचे आयुर्विमा संरक्षण मिळविणे अधिक परवडण्याजोगे झाले आहे– विशेषतः कमी उत्पन्न गटातील लोकांना आणि ज्यांना कमी खर्चात अधिक संरक्षणाची विशेष गरज आहे त्यांना

**चालू बीमा संदेश पॉलीसीधारकानाही लाभ मिळेल**

बीमा संदेशच्या चालू पॉलिसीधारकांनाही त्यांच्या विमा संरक्षणाची रक्कम नवीन हप्त्याच्या दरांच्या प्रमाणात वाढवून दिली जाईल. त्यासंबंधीची सूचना प्रत्येक बीमा संदेश पॉलिसीधारकाला व्यक्तिशः देण्यात येईल.

**हानि-रहित योजना**

बीमा संदेश योजनेनुसार भरलेले सर्व हप्ते विम्याची मुदत संपल्यावर पॉलिसीधारकाला परत केले जातात. तथापी, मुदत पूर्ण होण्याआधी मृत्यू आल्यास, संपूर्ण विमा रक्कम पॉलिसीधारकाने नामनिर्देशित व्यक्तीला अदा केली जाते.

*आजच तुमच्या विमा एजंटला भेटा किंवा नजिकच्या आयुर्विमा कार्यालयाशी संपर्क साधा.*

योगक्षेमं वहाम्यहम्

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

**एलआयसी – जनतेच्या सुरक्षिततेचे विश्वस्त**

RADEUS LIC 5.87

# माणूस

## प्रजासत्ताक दिन विशेषांक २६ जानेवारी १९८८

अनुक्रम :


**कादंबरी**

डॉ. अनिल सहस्रबुद्धे–मातंगी / ५४

गॅब्रिअेल गार्सिआ मार्खेज–' क्रॉनिकल ऑफ अ डेथ फोरटोल्ड '
परिचय : वसंत आबाजी डहाके / ८८

**लेख**

अविनाश कोल्हे : थोडे मागचे, थोडे पुढचे / ६

अनिल शिंदे : शंकरराव स्थिरावले, पुढे काय ? / ९

पुरुषोत्तम शेठ : सतीचे उदात्तीकरण थांबवायचे असेल तर... / १३

विवेकानंद गोडबोले : वैदिक सरस्वतीचा शोध आणि बोध / १८

**तिबेट पुरवणी**

फिरोझ रानडे / २६

लेफ्ट. कर्नल श्याम चव्हाण / ३१

दि. वि. गोखले / ३५

विनय सहस्रबुद्धे / ४१

गो. पु. देशपांडे / ४५

अशोक मोडक / ४८

नर्गिस दलाल / ५१





प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे नियतकालिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

वर्ष : सत्ताविसावे

अंक : तिसरा

किंमत : दहा रुपये

वार्षिक वर्गणी : साठ रुपये

पत्ता : १०२५ सदाशिव पेठ
पुणे, ४११ ०३०
फोन : ४४३४५९

व्यंगचित्रे
**प्रशांत कुलकर्णी, अभिमन्यू कुलकर्णी**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
या अंकाचे संपादन सहाय्य
**अविनाश कोल्हे**
मुखपृष्ठ
**बाबू उडपी**
आतील चित्रे
**श्याम देशपांडे, प्रभाकर भाटलेकर**

# दोन मेळावे, एक अरण्यरुदन

**श्री. ग. मा.**

गेल्या महिन्यात श्रीक्षेत्र आळंदी येथे विश्व हिंदू परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या संमेलनाला लाखोंचा जनसमुदाय उपस्थित होता. असाच विशाल जनसमुदाय या महिन्यात सांगली येथे पार पडलेल्या शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेने योजलेल्या मेळाव्यालाही लोटलेला होता. आळंदी संमेलन धर्मप्रेरणा जागवणारे होते, तर सांगली मेळावा हा अर्थप्रेरणेवर भर देणारा होता. हे दोन्ही मेळावे केवळ भव्य प्रमाणावर साजरे झाले म्हणून महत्त्वाचे आहेत असे नाही. या मेळाव्यात झालेल्या भाषणांना कृतीची जोड होती म्हणून त्यांचे विशेष महत्त्व आहे. आळंदीचा मेळावा योजणाऱ्या विश्व हिंदू परिषदेतर्फे, महाराष्ट्रात केवळ नव्हे तर भारतभर शेकडो वसतिगृहे चालवली जात आहेत. या वसतिगृहातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार उमटत आहेत व ज्या ठिकाणी अन्य कोणी सहसा पोचत नाही अशा दूरदूरच्या, दुर्गम भागात ही वसतिगृहे असल्याने शिक्षणप्रसाराचे उद्दिष्टही साध्य व्हायला मदत होते आहे. अयोध्येची रामजन्मभूमी हिंदूना परत मिळावी म्हणून देशभर सुरू असलेल्या आंदोलनाचे नेतृत्व जवळपास विश्व हिंदू परिषदेकडे आहे. विधायक कार्य व प्रत्यक्ष आंदोलन अशी ही जोड जमली आहे व यामुळेच 'हिंदू तेतुका मेळवावा' हा परिषदेचा मंत्र खेडोपाडी वेगाने पसरत चाललेला आहे. शेतकरी संघटनेचा वसतिगृहे वगैरे स्वरूपाच्या विधायक कार्यावर फारसा भर नाही. तरी पण संघटनेने समाजाचा महत्त्वाचा घटक असलेल्या शेतकऱ्याचा प्रश्न उचलला असल्याने अल्पावधीतच या संघटनेचा प्रभाव वाढला व महाराष्ट्राबाहेर इतर राज्यातूनही अशाच स्वरूपाची शेतकरी आंदोलने आकार घेत आहेत. या दोन्ही चळवळी वर्धिष्णु आहेत व अधिकाधिक संख्येने जनसमूह या दोन्हीकडे आकर्षित होत आहेत. यातील एक चळवळ पुरोगामी व एक चळवळ प्रतिगामी समजण्याची आपल्याकडे चाल आहे. आता आळंदीच्या विश्व हिंदू मेळाव्यात काय प्रतिगामी होते? ज्यांना धर्म या प्रेरणेचेच वावडे आहे अशांची गोष्ट वेगळी. कुणाला संगीत कळत नाही, कुणाला चित्रकलेचा आस्वाद घेता येत नाही, तसेच काहींना धर्माचे अंग नसते असे समजून, अशा मुठभरांच्या निधर्मशीलतेकडे दुर्लक्ष करणेच श्रेयस्कर. वनवासी जीवनापासून ते थेट अत्याधुनिक विज्ञानसंपन्न संस्कृतीपर्यंत आजवरच्या जागतिक इतिहासात अशी एकही संस्कृती नांदलेली नाही, की जिच्यात धर्मभावना नव्हती. काही काळ पगडा अधिक, काही काळ कमी अशी फार तर स्थिती आढळते. हे धर्मभावनेचे सनातन अस्तित्व एकदा मान्य केले की धार्मिक तेतुके प्रतिगामी ही समजूतही बालिश ठरते व प्रश्न विवेकाचा, प्रमाणाचा, आशयाचा उरतो. अमुक एका कार्यक्रमात धार्मिक भावनेचे केवळ पुनरुज्जीवन आहे, नुसतेच अवडंबर आहे, जुन्याचाच फक्त आग्रह आहे की पुनर्घटनावाद आहे, जुन्याला नवे रूप-आशय देण्याचाही प्रयत्न आहे, हे पाहवे लागते व पुनर्घटनावादी कार्यक्रम असेल तर आधळा विरोध न करता, विशिष्ट मर्यादेत या पुनर्घटना प्रयत्नाचे स्वागतही करावे लागते. ज्यांना समाजात बदल घडायला हवे आहेत, परिवर्तनाची भाषा जे बोलतात अशांनी, सर्वच धार्मिक संमेलनांवर प्रतिगामित्वाचा शिक्का न उठवता त्यात निवडपाखड केली पाहिजे; नाहीतर परिवर्तनवाद हा केवळ एक अरण्यरुदन ठरण्याचा धोका आहे. यापूर्वी आपल्याकडील चिल्लर समाजसुधारकांनी व उत्साही नवमतवादी मंडळींनी असा सारासार विचार न करता धर्माला नावे ठेवली, धर्मनिंदा हा जणू त्यांचा एक धंदाच होऊन बसला म्हणून जनतेपासून ही मंडळी अलग पडली व जनताही पुनर्घटनावादी धर्मसमूहात जाण्याऐवजी पुनरुज्जीवनवादी घटकांकडे अधिकाधिक लोटली गेली. धर्म ही माणसाची सनातन गरज आहे व चांगला पर्याय उपलब्ध नसल्यास वाईट पर्यायाचा स्वीकार लोक केल्यावाचून राहणार नाहीत, हे उघड आहे.

धर्माप्रमाणेच अर्थ हीही एक माणसाची प्राथमिक गरज आहे; त्यामुळे आळंदीप्रमाणेच सांगलीच्या शेतकरी मेळाव्यालाही प्रचंड संख्येने लोक जमले व शक्यता आहे की, या दोन प्रेरणांचा जर नीट मेळ घातला गेला नाही तर त्या एकमेकींवर आदळल्याशिवाय राहणार नाहीत; जशी धर्मांधता असते तशी अर्थांधताही असू शकते. भांडवलशाही किंवा समाजवाद यापैकी कोणतीही विचारप्रणाली स्वीकारली तरी या दोन्ही प्रणालीत अर्थातिरेकवादाचा

धोका दडलेला आहेच. हा धोका पत्करून प्रगती साधायची की या माणसाच्या मुलभूत गरजांचा परस्पराशी काही मेळ साधून संतुलित विकासाचा मार्ग अनुसरायचा, हा आपल्यासमोरील प्रश्न आहे व पूर्वसूरीनी यापैकी दुसऱ्या पर्यायाचा स्वीकार करावा असे निःसंधिग्धपणे सांगितलेले आहे. मग हे पूर्वसूरी गेल्या शतकातले न्या. रानडे असोत की गेल्या दशकातले जयप्रकाश नारायण असोत. रानडयाचा सर्वांगिण प्रगतीवाद आणि जयप्रकाशाचा संपूर्ण क्रांतीवाद यात तपशीलात किंवा अग्रक्रमात जरूर फरक आहेत; कालमानाप्रमाणे मांडणी, शब्दयोजना वेगळी आहे. पण समग्रतेचे भान दोन्हीकडे पक्के आहे. आणि नेमके हेच आजकाल विसरले जात आहे. हे असेच यापुढे अधिकाधिक प्रमाणात विसरले जाणार असेल व धर्म किंवा अर्थ यापैकी एकाचीच निवड करा, असे धर्मवादी किंवा अर्थवादी गटाकडून हट्टाग्रहाने सांगितले जाणार असेल तर अर्थवादी प्रेरणा-गटाचा अंतिम पराभव अटळ आहे. अगदी साम्यवादी देशातही पुन्हा धर्मभावनेनै उचल घेतलेली आहे. आपल्याकडील डावी मंडळी ही वस्तुस्थिती लक्षात घेणार नसतील तर खोमेनीचे निरनिराळे अवतार आपल्याला ठिकठिकाणी दिसतील आणि विवेकप्रधान समाज व्यवस्थेचे आपल्या पूर्वसूरीचे स्वप्न कधीच वास्तवात उतरणार नाही. अर्थ आणि धर्म या दोन्ही जबरदस्त, खंडव्यापी प्रेरणा आहेत आणि कोणतीही सुधारणेची-प्रगतीची चळवळ या नैसर्गिक मानव प्रवृत्तीशी जोडली गेल्याशिवाय गतिमान होणे शक्य नसते. आपला ब्रिटिशांविरूद्धचा स्वातंत्र्यलढा धर्माशी प्रथमपासून जोडला गेला होता. गीताप्रणीत कर्मयोग हा त्याचा तात्विक पाया होता. मध्ययुगातील शिवाजीचा उदय धर्मप्रेरणेतून झाला, हे सर्वमान्य सत्य आहे. धर्म किंवा अर्थ या मूलभूत प्रेरणेशी असे आंतरिक नाते न जोडले गेल्यामुळे आपल्याकडील ब्रिटिश काळातील समाजसुधारणेची चळवळ पगू राहिली-रखडली; राजकारण-अर्थकारण मात्र पुढे झेप घेत राहिले. विवेकानंद किंवा दयानंद याना यश लाभते आणि रानडयाचा दृष्टिकोन सर्वांगीण व समग्रतेचा असतानाही त्यांनी प्रर्वतित केलेली सामाजिक सुधारणा परिषद मुठभराच्या वर्तुळातच अडकून राहते, रानडे गेल्यावर तर ती मृतवत होते, याचे दुसरे काय कारण असू शकते? धर्म आणि अर्थ (किंवा सत्ता-राज्य) या मूलप्रेरणांशी ती जोडली गेली नाही म्हणून तिला स्वतःची अशी स्वयगती प्राप्त झाली नाही. समग्रता हवी; पण यश यायला एकाग्रताही हवी. अनेक आघाडया उघडून एकही निकराने न लढविल्यावर यश कसे प्राप्त होणार? एक साधे, सब साधे अशी व्यवहारातील म्हण इथे लागू पडते. विश्व हिंदू परिषदेने किंवा तत्सम इतर हिंदुत्ववादी चळवळीने गेली ५०/६० वर्षे एकाच प्रेरणेवर लक्ष केंद्रित करून कार्य उभे केले; गेली ८/१० वर्षे शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनाही फक्त अर्थवादी प्रेरणाना सातत्याने आवाहन करीत आहे- म्हणून आळंदीला किंवा सांगलीला लक्षावधीचे जनसमुदाय लोटतात- उसळतात, चळवळ प्रतिदिन प्रतिमास वाढत-चढत जाते, आणि याच सुमारास साजऱ्या झालेल्या रानडे-प्रणीत सामाजिक परिषदेच्या शताब्दी सोहोळ्यात मात्र फक्त प्रसिद्धीचे खुळखुळे वाजावेत, असे का? रानडयांनी काँग्रेस आणि सामाजिक सुधारणा परिषद याना बहिणी-बहिणी म्हटले आहे. पण एक वहीण अगदीच गरिबाघरी गेली, जिथे तिचे फारच हाल झाले- आबाळ झाली. दुसरी मात्र राजाची राणी झाली- दिल्लीच्या गादीवर बसली. हा केवळ नशिबाचा भाग नाही. मूलभूत मानवी प्रवृत्तीशी या तफावतीचा संबंध आहे. माणसे उगाच जीवावर उदार होऊन लढायला, प्राणार्पण करायला तयार होत नाहीत. सावरकर-भगतसिंग यांच्यासारखा पराकोटीचा त्याग किंवा विवेकानंदासारखे प्रखर वैराग्य सामाजिक सुधारणा चळवळीत गेल्या शंभर वर्षाच्या इतिहासात कितीसे प्रकट झालेले दिसते? शेवटी नवशिक्षिताची सद्भावनाप्रेरित पण फावल्या वेळची चळवळ, हे तिचे त्या काळातले स्वरूप होते व आता पुनरुज्जीवन झाले तरी एवढया वरवरच्या अल्पयशावरच तिला समाधान मानावे लागणार आहे. आळंदी आणि सागली मेळाव्यांची उपस्थिती मात्र वाढतच राहील. कारण माणसाच्या मूलभूत गरजावर त्याची उभारणी होत आहे- आजवर झालेली आहे.

□

# पूर्णत्वाचे प्रवासी

## लेखक : प्रा. शरद कुलकर्णी


### मूल्य : पन्नास रुपये

महाराष्ट्रीयांच्या व प्रत्येक भारतीयाच्या घरी या पुस्तकाची चिकित्सकबुद्धीने व भावनेने पारायणे व्हावीत अशी त्याची योग्यता आहे.

**– आनंद यादव**

आपण अनेकवेळा भारतीय संस्कृती, भारतीय तत्त्वज्ञान यांचे मोठेपण सांगत असतो; पण हे मोठेपण नेमके कशात आहे याची आपणास नीटशी जाणीव नसते. डॉ. कुलकर्णी यांनी हे तत्त्वज्ञान श्रीकृष्ण, श्रीराम, श्रीदत्त अशा दैवताच्या शिकवणुकीच्या स्वरूपात या ग्रंथात मांडले आहे.

**– म. श. आजगावकर**
**प्राचार्य, राहेजा कॉलेज, मुंबई**



# थोडे मागचे, थोडे पुढचे

● अविनाश कोल्हे ●

जून १९८५ मध्ये 'माणूस'ला पंचवीस वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने माणूस मित्र परिवाराचा एक मेळावा २५ ऑगस्ट १९८५ ला जमला होता. अनौपचारिक चर्चा, गायन, 'माणूस'चे भावी स्वरूप (कारण श्री. ग. माजगावकर यांनी जून १९८५ च्या अंकात 'माणूस'चे प्रकाशन थांबवावे का ? वगैरे लिहिले होते) याविषयी चर्चा असा भरगच्च कार्यक्रम होता. वक्त्यांपैकी उपस्थितांपैकी जवळजवळ सर्वांची इच्छा दिसली की, 'माणूस' या नाही त्या स्वरूपात चालू राहिला पाहिजे. कारण समाजाला अशा वैचारिक नियतकालिकांची गरज आहे. माजगावकरांना निवृत्ती हवी तसेल तर ठीक आहे पण दुसऱ्या कोणी तो चालू ठेवावा, अशी आग्रहाची सूचना करण्यात आली. सत्काराला उत्तर देताना माजगावकर म्हणाले होते की, एखाद्या क्षेत्रात एखाद्या व्यक्तीने २०, फार तर २५ वर्षे काम करावे नंतर निवृत्त व्हावे. कारण नंतरही समजा ती व्यक्ती ते काम करत राहिली तर तोच तोचपणा येतो. नियतकालिक म्हणा, संस्था म्हणा काळाबरोवर रहावी असं वाटत असल्यास संस्थेत नवीन रक्त आलं पाहिजे. तरुणानी पुढे येऊन जबाबदाऱ्या स्वीकारल्या पाहिजेत. मुख्य म्हणजे तोटा असह्य होतो आहे, म्हणून मी 'माणूस' बंद करण्याच्या विचारात आहे, असे मात्र मुळीच नाही.

त्यानंतरही माजगावकर अनौपचारिक पातळीवर वेगवेगळ्या तरुण मंडळींशी बोलत असत, चर्चा करत असत. माझी व कै. स. शि. भावे यांची मैत्री होती. मुंबईला ते व्याख्यानाकरिता आले असता भेट झाली. गप्पांच्या ओघात 'माणूस'चा विषय निघाला. तेव्हा ते म्हणाले की 'तू का हे काम स्वीकारत नाहीस ? मी तुझी आणि माजगावकरांची गाठ घालून देतो. तुम्ही दोघे चर्चा करून काय ते ठरवा.' त्याआधी माझी माजगावकरांशी ओळख नव्हती. 'माणूस' मी वाचत असे. पण त्यांचेशी ओळख होण्याचा किंवा माणूसमध्ये लिखाण करण्याचा योग आला नव्हता. त्यानंतर मी एकदा पुण्याला गेलो असता भावे मला माजगावकर यांचेकडे घेऊन गेले. बऱ्याचवेळ गप्पा झाल्या. नंतर मी माणूसमध्ये काही लिखाण केले. त्यानंतर वारंवार भेटी होत होत्या. पत्रं जात–येत होती. परत एकदा दीर्घ चर्चा झाली. त्यात 'नवजागर' अंक काढण्याचा विचार ठरला. आम्ही सर्व उत्साहात कामाला लागलो. पण या ना त्या कारणाने 'नवजागर' मध्ये मी सहभागी होऊ शकलो नाही. नवजागरच्या दुसऱ्या अंकात माजगावकरांचे निवेदन प्रसिद्ध झाले की पुढचा विचार नक्की होईपर्यंत अनियतकालिकाचा पर्याय स्वीकारत आहे. त्यावर्षी (१९८६) दिवाळी अंकसुद्धा काढला नाही.

दिवाळीनंतर परत एकदा भेट झाली. माणूसचे भवितव्य हाच चर्चेचा केंद्रबिंदू होता. इतर विषय जवळजवळ वर्ज्य असत. याच भेटीत १९८७ मध्ये प्रयोग म्हणून वेगवेगळे विशेषांक काढावेत आणि त्यांची जबाबदारी मी घ्यावी, असे ठरले. माजगावकरांचे मार्गदर्शन असणार होतेच.

त्याप्रमाणे प्रजासत्ताक दिन विशेषांक (१९८७) काढण्याचे ठरले. 'राजीव गांधी यांची दोन वर्षे' ही खास पुरवणी होती. शिवाय 'टॉफलर विचार दर्शन' हा पुस्तक विभाग. त्यामुळे अंकाचे स्वागत चांगले झाले. टॉफलर पुरवणी वाचकाना आवडली. मधल्या काळातील अनिश्चित वातावरणामुळे अंक निघत नव्हते. त्यामुळे कित्येक वाचक / लेखकांना प्रजासत्ताक दिन विशेषांक निघाल्याचे कळलेच नाही. प्रत्येक अंकाच्या संपादकीयात आगामी विशेषांकाचा विषय आणि प्रसिद्धीचा काळ नमूद करत असू.

प्रजासत्ताक दिन अंकात पुढचा अंक म्हणून एप्रिल महिन्यात 'प्रवास–पर्यटन विशेषांक' जाहीर केला. मनात धाकधूक होती. चावून चोथा झालेला विषय. आपण काही नवीन करू शकू की नाही ? अन्यथा माणूसच्या दर्जाविषयी काटेकोर असलेले माजगावकर, 'माणूस'चे वाचक, लेखक, हितचिंतक काय म्हणतील ? तेव्हा खरं तर पहिल्यांदाच माणूसच्या परंपरेचे भान तीव्रपणे झाले. (थोडासा त्रासही झाला, हो, प्रामाणिकपणे सांगतो) त्यामुळे दुप्पट जोराने कामाला लागलो. हायकिंग–एक विधायक चळवळ, सफर सम्राट राजा पाटील यांच्या आत्मचरित्रातील काही भाग, जोनाथन सिगलची 'इल्यूजन्स' कादंबरी या सर्वांमुळे हा अंकही वाचकांना आवडला. चांगला प्रतिसाद मिळाला. फार बरं वाटलं. प्रजासत्ताक दिन अंकाच्या कौतुकापेक्षा या अंकाचे कौतुक जास्त सुखावून गेले. प्रजासत्ताक अंकात ताऱ्याला राजीव गांधी आणि टॉफलर होते. पण 'प्रवास–पर्यटन अंक' असे शब्द उच्चारताच चेहरा टाकणारे वाचक/लेखक वेळोवेळी भेटले. पण अंक प्रसिद्ध झाल्यावर सर्वांची मनमोकळी दाद मिळाली. त्यात माणूसचे ज्येष्ठ लेखक श्री. वि. ग. कानिटकर यांनी केलेले कौतुक लक्षात राहिले.

त्यानंतर वर्षारंभ अंक. आता विश्वास वाढलेला होता. भराभर अंकाच्या योजनेला सुरुवात केली. मागच्याच वर्षी मी ली अयाकोका यांचे आत्मचरित्र वाचले होते. व्यवस्थापन/जाहिरात क्षेत्रात हे पुस्तक फारच गाजत होते. हे पुस्तक मराठी वाचकांसमोर आणावे, असे वाटले मनात बारकासा किंतू होता–अमेरिकेतील एका कंपनीच्या (तेसुद्धा एका मोटार उद्योगातील) प्रेसिडेंटचे आत्मचरित्र, असे पुस्तक मराठी वाचकाना कितपत आवडेल ? पण धोका पत्करण्याचे ठरवले. माणूस परिवारातील वसईकर लेखक चारू देशपांडे आणि वीणा गवाणकर यांना भेटलो. त्यांनाही हे पुस्तक आवडले होते. ती मंडळी लगेच कामाला लागली. सौ. गवाणकर तर हॉस्पिटलमध्ये असलेल्या भावाच्या कॉटशेजारी बसून अयाकोकाच्या

आत्मचरित्रावर काम करत होत्या !

याच दरम्यान पतप्रधान राजीव गाधी आणि तत्कालीन राष्ट्रपती झैलसिंग याचे संबंध अतिशय ताणलेल्या अवस्थेत होते. त्यानिमित्ताने घटना तज्ज्ञाकडून राष्ट्रपती–पंतप्रधान सबधावर निरनिराळ्या दृष्टिकोणातून लिहिलेले लेख मिळवले. शिवाय तेव्हा सपलेल्या 'बुनियाद' या टीव्ही मालिकेवर opinion poll तयार केले. अकाची भट्टी जमत आली होती. माजगावकर अयाकोकाच्या आत्मचरित्राबद्दल जरासे साशक होते. एकदा 'माणूस'चे एक ज्येष्ठ लेखक माजगावकराना पुण्यात भेटले. (मी तेव्हा मुंबईत होतो) आणि माजगावकरांना सांगायला लागले की, 'श्रीभाऊ, अयाकोका नावाच्या अमेरिकन माणसाचे आत्मचरित्र वाचले. छान आहे. अशी पुस्तकं मराठी वाचकासमोर यायला हवीत.' माजगावकरांनी शातपणे ड्रॉवरमधून अयाकोकाच्या पुस्तकाच्या कपोज झालेल्या गॅल्या काढून दाखविल्या. अयाकोकाचे प्रेरणादायी आत्मचरित्र आणि ठाण्याचे डॉ. विजय बेडेकर याचा चीनबद्दलचा 'आँखो देखा हाल' यामुळे हा अक खूपच नावाजला गेला.

मग आला दिवाळी अंक ! एखादा अंक ऑगस्ट महिन्यात काढावा असा विचार मनात चमकून गेला. पण तो मोह बाजूला सारून दिवाळी अकावर लक्ष केंद्रित केले. १९८९ साली नेहरूचे जन्मशताब्दी वर्ष, तेव्हा शासकीय पातळीवर सभा–समारंभ होतीलच. त्या गदारोळाआधीच नेहरूंच्या कार्याचे विविध राजकीय दृष्टिकोणातून मूल्यमापन व्हावे, असे वाटले. अति डावी विचारसरणी, अति उजवी, समाजवादी, लोहियावादी, नेहरूवादी, हिंदुत्ववादी, गांधीवादी वगैरे शक्य तितक्या दृष्टिकोणातून नेहरूचे मूल्यमापन व्हावे, असा मानस होता. पण प्रत्यक्षात यापैकी काहीच विचारसरणी परिसंवादात उमटू शकल्या. अति उजव्या विचारसरणीचे प्रभावी प्रवक्ते श्री. मिनू मसानी याचे नाव डोळ्यापुढे होते. पण त्यांचे विचार मिळविणे जमले नाही. खरतर तेव्हा आपल्या मराठीमध्ये विद्वत्ता किती कमी आहे, याची जाणीव झाली आणि इग्रजी पत्रकाराचा हेवा वाटला. या स्वरूपाचा परिसवाद इंग्रजीत आयोजित करणे किती सोपे आहे– 'मेनस्ट्रीम' चे सपादक निखिल चक्रवर्ती, ई. एम. एस. नबुद्रीपाद, डॉ. एस. गोपाल, बी. आर. नंदा, डॉ. रफिक झकेरिया, डॉ. मोहित सेन, डॉ. अशोक मिश्रा इत्यादी कितीतरी मंडळीना लिहिण्याची विनंती करता आली असती. तरीपण, परिसवाद दिवाळी अकात प्रसिद्ध झाला– तितकासा परिपूर्ण नसला तरी.

याच दरम्यान अजित कानिटकरचा ('जैसी दीप कळिका...') लेख आला. श्रीमती अबिका सरकार याची कादंबरी, दुर्गाबाई भागवत याचा लेख, लैला महाजन याचा 'सावधान'वरील लेख...अंक भराभर उभा राहिला. दिवाळी अक वाचकाना आवडला. जाहिरातीची बाजू जरा लगडी पडली. पण अकाच्या कौतुकात ही टोचणी विसरायला होत होती. लैला महाजन एकदा सागत होत्या की, त्याचा लेख महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमत्री यानी वाचला आणि त्याना भेटायला बोलाविले. शासकीय पातळीहून वेश्यामुक्ती कार्याला कशी गती देता येईल, याचा विचार आता सुरू आहे.

¤

आणि आता हा प्रजासत्ताक दिन विशेषाक (१९८८) ! दिवाळीनतर एकदा श्री. वसंत आबाजी डहाके याच्याकडे गप्पा मारत असताना विषय निघाला की मराठी वाचक इग्लिश, अमेरिकन साहित्याशी परिचित असतो. पण जागतिक वाङ्मयात जे इतर प्रवाह आहेत, जे उद्याची दिशा सुचवितात, जास्त सकस लिहितात, अशा साहित्याशी आपला वाचक फारसा परिचित नाही. उदा. मिलान कुडेरा किंवा गॅब्रिएल मार्खेज. अशी कितीतरी नावे देता येतील. अशा लेखकाच्या निदान एखाद्या तरी साहित्यकृतीचा परिचय करून द्यावा या हेतूने गॅब्रिएल मार्खेज याच्या 'एका पूर्वकथित मृत्यूचा वृत्तात' (chronicle of a death foretold) कादबरीचा परिचय या अंकात दिला आहे. लॅटिन अमेरिकेची पार्श्वभूमी, पूर्ण वेगळ्या तन्हेचे निवेदन, या गोष्टी वाचकाना जाणवतील.

दिवाळी अंकाचे काम सुरू असताना वर्तमानपत्रातून तिबेटमधील निदर्शने, जनतेचा असंतोष, यांच्या बातम्या येत होत्या. तेव्हाच आगामी प्रजासत्ताक दिन विशेषांकात 'तिबेट–पुरवणी' देण्याचे ठरले. तिबेटमधील परिस्थिती अस्वस्थ करणारी आहे. माओच्या काळात दडपशाही करून तिबेटी जनतेची स्वातत्र्येच्छा मारण्याचा प्रयत्न झाला. आता डेंगच्या काळात जरा वेगळे पण तितकेच धोकादायक प्रयत्न करण्यात येत आहेत. दलाई लामाची मागणी आहे की, तिबेटमध्ये 'चीनमध्ये सामील व्हायचे की नाही' यावर सार्वमत घ्या. आज तिबेटमध्ये ६० लाख तिबेटी आहेत तर ७५ लाख चिनी आहेत. (परदेशी पत्रकार या प्रकाराला Demographic Invasion म्हणतात) अशा परिस्थितीत सार्वमत हास्यास्पद ठरेल. तिबेटच्या स्वातत्र्याचा प्रश्न आपल्या देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहेच. अशा तिबेट प्रश्नाचे विविध पैलू पुरवणीद्वारे वाचकासमोर या अकात मांडले आहेत.

¤

तिबेट आज गुलामगिरीत आहे. आपण तर स्वतत्र होऊन ४० वर्षे झाली आहेत. आपली स्थिती कशी आहे ? आपण का प्रगती करू शकलो नाही, याचाही विचार व्हायला हवा. एवढ्या पंचवार्षिक योजना आणल्या, मोठमोठी धरणं बाधली तरी आपल्याला साधा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवता आला नाही. अन्नधान्य उत्पादनामध्ये बरीच प्रगती करून काय साधले ? तर हे अन्नधान्य सरकारी गोदामात पडून आहे. कारण लोकांजवळ ते विकत घ्यायला पैसा नाही, लोकसख्येचा भस्मासूर वाढत आहे. इ. स. २००० साली भारताची लोकसख्या जवळजवळ १०० कोटी होईल. त्या वर्षी अन्नधान्य उत्पादनाचे लक्ष्य २३०० लाख टन आहे, (आज हे उत्पादन १४५० लाख टन आहे) हरित क्रांतीचा घोडा मदावला, अशी साधार भीती आहे· कोणता मार्ग स्वीकारून आपण हे लक्ष्य गाठणार आहोत?

आर्थिक आघाडीवर ही दैना तर राजकीय आघाडीवर अंदाधुदीचे वातावरण आहे. सत्ताधारी कॉंग्रेस पक्षात सुदोपसुदी आहे. राज्यकर्त्यांची जनतेसमोर जाण्याची हिंमत नाही. म्हणूनच दिल्ली पालिकेच्या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. शासनकर्त्यांच्या देशप्रेमाविषयी लोकाच्या मनात शका आहे. शस्त्रास्त्रखरेदीतील लाच कोणाला मिळाली,

हे अजून गुलदस्तात आहे. विरोधी पक्षां-विषयीसुद्धा फारसे आशादायी उद्गार काढता येत नाहीत. सर्वांची तोंडे वेगवेगळ्या दिशांना. जाहीर सभेत विरोधी पक्षांच्या एकीचे महत्त्व सांगायचे आणि दुसऱ्या दिवशी पत्र-कार परिषदेत अमूक पक्ष असल्यास आम्ही येणार नाही, वगैरे विधान करायची. आधीच कमी असलेली विश्वासार्हता आणखी कमी होत आहे. विरोधी पक्ष जेथे राज्यावर आहेत तेथेसुद्धा कारभार चांगला आहे, असं नाही. त्यामुळे फक्त कॉंग्रेस पक्षाविष-यीच जनतेच्या मनात उदासीनतेची भावना नसून सर्वच राजकीय पक्षांविषयी अपेक्षा-भंगाची भावना आहे. लोकांच्या प्रश्नांमध्ये, रचनात्मक कार्यामध्ये राजकीय पक्षांना फारसा रस उरला नाही. सत्तेचे राजकारण करण्यात सगळे गर्क आहेत. ही स्थिती चांगली नाही. लोकशाहीमध्ये पक्ष–पद्धती, निवडणुका, लोकनियुक्त प्रतिनिधी, पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य वगैरे जर लुप्त झाले तर मग राहिले काय ?

◻

स्वयंसेवी संस्थाविषयी मात्र लोकांना थोडी आस्था आहे, त्यांच्या कामाविषयी थोडा आदरभाव दाखवला जातो. कदाचित त्या अ–राजकीय ( Apolitical ) असतात, म्हणूनही त्यांच्याविषयी ही भावना असावी. समाजात आज या संस्था, त्यांचे कार्य याविषयी कुतूहल आहे. अनेक तरुण, तरुणी लौकिक यश, पैसा वगैरेकडे पाठ फिरवून या unglamorous कामात स्वतःला झोकून देत आहेत. परवाच एका मित्राचा फोन आला होता. त्याने एका मोठ्या कंपनीतील चांगल्या पगाराची नोकरी सोडून दिली आणि आता अशाच एका संस्थेत पूर्णवेळ काम करणार असल्याचे तो सांगत होता. ही प्रवृत्ती वाढत आहे.

अशा सेवाभावी, निःस्वार्थी कार्यकर्त्यांनी देशभर आपापल्या संस्था उभारल्या. आज भारतात सुमारे ३००० ते ५००० संस्था कार्यरत आहेत अशी आकडेवारी सांगते. जिथे सरकारी योजना, यंत्रणा पुरेसे यश मिळवू शकत नाही, तिथे या संस्थांनी नेत्र-दीपक यश मिळवले आहे. विकास–प्रक्रिये-मध्ये जनतेचा सहभाग मिळवला. तळा-गाळाच्या समाजामध्ये परिवर्तनाची ज्योत पेटवली. आता या कार्याला, संस्थांना सर-कार दरबारीसुद्धा मान मिळू लागला आहे. राजकीय पक्षाचे कार्यकर्ते इतर उलाढालीत गुंग असताना अत्यंत निःस्वार्थी वृत्तीने काम करणारे हे तरुण कार्यकर्ते म्हणजे खरोखरच एक आशेचं स्थान आहे.

या कार्यकर्त्यांमध्येसुद्धा वेगळ्या जाणिवा प्रकट होऊ लागल्या आहेत. असं एकेकट सुटंसुटं काम करण्यापेक्षा आपण एकत्र यावं, एकमेकांचे प्रश्न समजून घ्यावेत, मदत करावी असं यापैकी बऱ्याच जणांना वाटू लागलं आहे. या स्वयंसेवी चळवळीचे रूपांतर एका मोठ्या प्रवाहात होऊ शकते का, विकासाचे हे विश्वासू साधन बनू शकते का या दिशेने चिंतन, विचार–विनिमय सुरू आहे. स्वयंसेवी चळवळ आज या टप्प्यावर उभी आहे.

या चळवळीचे, कार्याचे कौतुक करत असतानाच या कार्याचे वस्तुनिष्ठ मूल्य-मापन व्हावे असेही वाटते. या कार्याद्वारे देश-विकासाच्या काही वेगळ्या वाटा सापड-तात का ? या संस्था सरकारी कार्यक्रमापेक्षा वेगळे कार्यक्रम आखतात, राबवितात का ? सरकारशी सहकार्याचे धोरण ठेवतात की संघर्षाचे ? या दोन्ही पर्यायांचे त्यांच्या कार्यावर काय परिणाम होतात ? सरकारी कार्यक्रमच, पण जास्त कार्यक्षमतेने राब-विणारी यंत्रणा असे त्यांचे स्वरूप होत आहे का ? अशा सुधारणावादी कार्यामुळे मूलभूत पातळीवर संघर्ष करण्याची प्रेरणा बळावते की क्षीण होते ? मुख्य म्हणजे विकासाच्या प्रगतीच्या संकल्पनेविषयी प्रस्थापित लोक-प्रिय संकल्पनेपेक्षा काही निराळी संकल्पना ही चळवळ मांडू पाहात आहे का ?

या व अशा अनेक प्रश्नांची तपशिलवार चर्चा करण्याचा विचार आहे. 'माणूस'ने वेळोवेळी अशा चळवळींची, कामांची आजवर भरपूर दखल घेतली आहे. किंबहुना माणूस हे अशा उपक्रमांचं एक व्यासपीठ, एक केंद्रच मानले जाते. या चळवळींचा वाढता प्रभाव व महत्त्व लक्षात घेता ( एका अंदाजा-नुसार मागच्या वर्षी या क्षेत्रात सुमारे रु. ५००/– कोटींची उलाढाल झाली. ) या वर्षी म्हणूनच या विषयावर दोन विशेषांक काढण्याचे ठरवले आहे. 'स्वयंसेवी चळवळ' या विषयावर दोन विशेषांक ( एप्रिल महिन्यात एक आणि मे महिन्यात दुसरा ), शक्य झाल्यास आणखी एखादा विशेषांक आणि / अथवा एकदम दिवाळी अंक, अशी या वर्षीची योजना आहे. विशेषांक प्रसिद्धीची जाहिरात वेळोवेळी वृत्तपत्रांतून केली जाईलच.

मागच्या वर्षीची विशेषांक योजना 'माणूस' मित्र परिवाराच्या सहकार्याशिवाय पार पडली नसती. गेल्या वर्षीची विशेषांक योजना वाचकांना आवडली होती. वेळोवेळी पत्र लिहून, प्रत्यक्ष भेटीत अंकाविषयी प्रतिक्रिया कळविल्या जात असत. अगदी अलीकडे 'माणूस'चे एक जुने वाचक, परळचे श्री. मंगेश नाबर यांनी कळवले आहे– '१९८७ वर्षभरात चार विशेषांकांतून आपली भेट झाली. हे चारही अंक खरोखरीच विशेषांक होते. त्यातील साहित्याचा दर्जा फार वरचा होता. तरी जाहिरातीची बाजू दुबळी असल्याचे आपण नमूद करता. आणि १९८८ बाबत कोणतीही योजना मांडत नाही, हे जाणवले.'

अशाच स्वरूपाची विचारणा इतरही वाचकांकडून, हितचिंतकांकडून अधूनमधून होत असते. म्हणून या वर्षीची विशेषांक योजना, जी सध्या डोळ्यांसमोर आहे ती वर दिली आहे– त्यामागील वर्ष–दीड वर्षाच्या एकूण आढाव्यासह. सर्वांचे सहकार्य लाभेल असा विश्वास आहेच. ◻




पाहिलंस, पुन्हा तुझा क्रम चुकला. अरे, देवाने माणसाला तयार केले आणि मग माणसाने टी. व्ही. तयार केला.

# शंकरराव स्थिरावले... पुढे काय..?

● अनिल शिंदे ●

**श्री**. शंकरराव चव्हाण आता अखेरीस महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर तिसऱ्या व कदाचित चौथ्याही वर्षी स्थिरावणार असा रंग सध्या दिसत आहे. दोन माजी मुख्यमंत्री, वसंतरावदादा पाटील व शरद पवार यांनी अनेक प्रयत्न केले, अनेक डावपेच लढविले, अनेक युक्त्या योजल्या पण ते सर्व प्रयत्न व त्या सर्व युक्त्या निष्फळ व निष्प्रभ ठरल्याचे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे.

लोकसंग्रह करण्यात असमर्थ ठरलेले शंकरराव, 'तुसडा' स्वभाव अशी प्रसिद्धी लाभलेले शंकरराव, कोणतीही जबरदस्त अशी लॉबी हाताशी न धरलेले शंकरराव हे मुख्यमंत्रिपदावर स्थिरावले तरी कसे? या प्रश्नाचं उत्तर शोधायचे तर आपल्याला लॉबीबहाद्दर वसंतरावदादा पाटील व लोकसंग्रहकर्ते शरद पवार कोठे कमी पडले ते पहावे लागेल.

दादांपासून या चर्चेची सुरुवात करणे योग्य. शिवाजीराव निलंगेकर पाटील यांना मुलीच्या डॉक्टर-पदवी प्रकरणात आपले मुख्यमंत्रीपद गमवावे लागले. पुढे या प्रकरणाचा निकाल न्यायालयात काय लागला ते अलहिदा! पण त्यांचे मुख्यमंत्रीपद याच प्रकरणाच्या चक्रात गेले एवढे मात्र खरे. त्यांनी राजीनामा दिला आणि मुख्यमंत्रीपदासाठी राज्यात एकच स्पर्धा सुरू झाली. वसंतरावदादा, सुशीलकुमार शिंदे, वसंत साठे यांची नावे चर्चिली जात होती. खुद्द दादांच्या पत्नी शालिनीताई यादेखील इतर कोणी न विचारताच स्पर्धेत उतरल्या होत्या.

शंकरराव चव्हाण त्यावेळी दिल्लीत स्थिरावले होते. गृहमंत्रीपद उत्तम रीतीने सांभाळण्याची कसरत ते बऱ्याच प्रमाणात यशस्वीपणे अवगत करीत होते. पंजाब संदर्भात नेमण्यात आलेल्या मंत्रीपातळीवरील उपसमितीवर त्यांनी चांगले कार्य केले. आसाम प्रश्नावर तोडगा काढण्यासाठीही त्यांनी विशेष परिश्रम घेतले होते. पण एक दिवस अचानक (११ मार्च १९८६ रोजी पहाटे) त्यांची नियुक्ती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून करण्यात आल्याची घोषणा झाली आणि पाटील, शिंदे, साठे इ. नावे या स्पर्धेतून गळून पडली. पण पाटील वगळता इतरांनी ते फारसे मनावर घेतले नाही.

सुशीलकुमारजी हे तसे सर्वच मुख्यमंत्र्यांना जवळचेच वाटत आलेले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघात त्यांनी केलेल्या भाषणाने त्यांचे महत्त्व थोडे वाढले होते. त्यानिमित्ताने पंतप्रधानांशीच जवळीक दाखविण्याची संधी त्यांना लाभली होती. पण त्यांना स्वतःला मुख्यमंत्रीपदाची लालसा आहेही आणि नाहीही. श्रेष्ठींनी त्यांना ते पद घ्या म्हटले तर त्याचा ते अव्हेर करणार नाहीत पण ते त्यांना मिळाले नाही तर ते रागावतही नाहीत. त्यामुळेच मग शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांच्याशी स्पर्धा करण्याचा विचारही त्यांच्या मनाला (!) शिवला नसणार असे वाटण्यास बराच वाव आहे.

मुख्यमंत्रीपदासाठी साठे यांच्या नावाची केवळ चर्चाच झाली. ते मुख्यमंत्री व्हावेत हे श्रेष्ठींनाही वाटत नसावे व त्यांना स्वतःलाही ही गोष्ट प्रत्यक्षात येणे अशक्यच वाटत असावे. त्यामुळेच त्यांनाही शंकररावांशी स्पर्धा करण्याचे कारणच नव्हते.

वसंतरावदादांना मात्र या पदाची स्वतःलाच जबरदस्त लालसा होती. तसं ते पद त्यांनी यापूर्वी उपभोगलेलं होतं. गेल्यावेळी त्यांना 'धारावीच्या' वादाच्यावेळी, प्रकृती ढासळल्याने 'अचानक' ते पद सोडावं लागलं होतं. त्यामुळं निलंगेकरांनी हे पद सोडताच दादांनी या पदाची इच्छा करणं स्वाभाविक होतं. त्यांनी ती महत्त्वाकांक्षा मग या ना त्या प्रकारे व्यक्त केली. किमान हे पद आपल्या गटातील व्यक्तीला तरी मिळावं यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. पण ते पद मिळालं शंकररावांना आणि मग राज्यात एक नवी सत्तास्पर्धा सुरू झाली. अधिक योग्य शब्दात म्हणावयाचे तर जुनी सत्तास्पर्धा नव्याने सुरू झाली.

शंकररावांच्या योजनांना शह देण्यासाठी मग दादांनी आपली शुगर लॉबी गदगदा हलवून भक्कम केली. त्यात दादांच्या एका पुतण्यास विधान परिषदेच्या जागेसाठी तिकिट नाकारण्यात आले, शंकररावांच्या मंत्रिमंडळात दादांच्या समर्थकांना स्थान मिळाले नाही; यामुळेच स्पर्धेला रंग भरला.

शंकररावांनी आठमाही पाण्याचे धोरण आणले. वसंतरावदादांनी या धोरणाचे वादळ केले. धोरण बदलावे यासाठी जणु विडाच उचलला. शंकररावांनी केंद्राला चाचपले, ऊस उत्पादकांच्या गाठीभेटी घेतल्या, दुष्काळाची स्थिती समजावून दिली. या धोरणाने ऊस उत्पादकांना कोणतीही हानी सहन करावी लागणार नाही हे पटवून दिले. त्यामुळे दादांच्या बंडातली हवाच संपली आणि नंतर नंतर ते स्वतःच म्हणू लागले '(शंकररावांच्या) या धोरणात नवे काय आहे? हे धोरण तर मी मागेच पुरस्कारिले होते.' दादांनी अशी चर्चा सुरू करताच शंकररावांच्या महत्त्वाच्या विजयाची नोंद झाली.

## राष्ट्रपतींचा कानाडोळा

यानंतर दादांनी मग शंकररावांविरुद्ध अगदी उघड उघड दंड ठोकले. दादा राजस्थानचे राज्यपाल होते. पण त्यांच्या काठीचा आवाज महाराष्ट्रातच अधिकतर



श्री. शरद पवार  ना. शंकररावजी चव्हाण  श्री. वसंतदादा पाटील

घुमत होता, खणखणत होता. अनेकांनी या गोष्टीला आक्षेप घेतला. पण ज्या व्यक्तीने तो मुख्यत्वे घ्यायला हवा होता तिने मात्र तो घेतला नाही. ती व्यक्ती म्हणजे राष्ट्रपती. याच काळात राष्ट्रपती झैलसिंगजी यांनी आंध्रप्रदेशच्या राज्यपाल कुमुदबेन जोशी यांना राजकारणात रस घेतल्याबद्दल तंबी दिली होती. पण राजस्थानचे राज्यपाल असताना महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय सहभाग घेणाऱ्या दादांकडे मात्र त्यांनी दुर्लक्ष केले याची नोंद घ्यावीच लागेल. दादांनी याचा लाभ उठवीत मग मधून मधून दिल्लीच्या वाऱ्या करीत नि मध्येच महाराष्ट्रात उगवत 'आता शंकररावांचे पद गेले', 'या महिना अखेरीपर्यंत मुख्यमंत्री बदलणार' असे उघडपणे व प्रसंगी श्रेष्ठींचे नाव घेत जाहीर करण्यास सुरुवात केली. नवीन आलेल्या राष्ट्रपतींनीही या प्रकाराकडे दुर्लक्षच केले.

सर्वात शेवटी दादांनी राज्यपालपदाच्या राजीनाम्याची खेळी देखील खेळली. अगदी तो पाठविण्यापासून स्वीकारला जाईपर्यंत त्याला सणसणीत प्रसिद्धी मिळेल याची त्यांनी पुरेशी काळजी घेतली. राजीनामा स्वीकारला गेला. त्यालाच जोडून दादांनी आपल्या सत्तरीचा बार उडविला. पण हा बारही शंकररावांच्या पक्षादेशाच्या चालीने व केंद्राच्या दबावाने फारसा आवाज न करता पण प्रचंड देखावा करीत उडाला... यामुळेच शंकररावांनी आणखी एक मात नोंदविली.

सत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने दादांनी शेतकरी मेळावा बोलावला होता. यावेळी किमान दीडशे आमदार, जे चव्हाणांवर नाराज आहेत, ते उपस्थित राहण्याची शक्यता होती. दादांना तर ती खात्री होती. आणि त्या अर्थाने हे शक्तिप्रदर्शनच होते. 'हेडमास्तर' म्हणून गणल्या गेलेल्या शंकररावांनी लगेच पक्षादेशाची भाषा वापरली. मग दादांचा वाढदिवस आला. मेळावा आला. १५० हून अधिक आमदारांनी प्रत्यक्ष उपस्थिती न लावता दादांना शुभेच्छा संदेश पाठविला. यावेळी मग जय कोणाचा हे ठरणे कठीण होते. चव्हाणांविरुद्धची नाराजी दिमत होती. पण तरीही सत्ताधीशांपुढं या नाराजांचं काही चालत नव्हतं. आणि तिकडे सांगलीत प्रत्यक्ष उपस्थिती न लागताही शक्तिप्रदर्शन झालं होतं. पण तरीही याही वेळी अखेरी दादांना पडती भूमिका घ्यावीच लागली. मेळाव्याच्या निमित्ताने दादांनी आपली वेगळी शेतकरी संघटना स्थापन केली व प्रसंगी सत्तेशी टक्कर घेऊ असा इशारा दिला. पण पक्षश्रेष्ठींशी भेट होताच ही संघटना इंदिरा कॉंग्रेसचाच एक भाग म्हणून कार्य करील असे स्वतः दादांनीच जाहीर केले. श्रेष्ठींनी हा बार फुसका ठरविला नि पुढे या संघटनेला इ. कॉं. त नेमके काय स्थान हे मात्र अंधारातच ठेवले.

एरवी दादांनी असे प्रयत्न केले असते तर त्यांना एवढे अपयश आले नसते. मात्र गेल्या दोन वर्षांत त्यांच्या या प्रयत्नांना यश यायचे नव्हते. याचे कारण महाराष्ट्रात स्थिर सरकार द्यावे यासाठीच श्रेष्ठींनी शंकररावांना केंद्रातून राज्याकडे धाडले होते. त्यामुळेच शंकररावांचे मुख्यमंत्रीपद संपविण्याच्या दादांच्या युक्त्यांहून शंकररावांना तारणारे श्रेष्ठीच श्रेष्ठ ठरले होते. दादांबरोबरच्या या लढाईत श्रेष्ठींनी शंकररावांनाच साथ दिली. परिणाम दादांची प्रत्येक चाल प्रभावहीन होत होती.

शंकररावांच्या मते दादांनी जी भूमिका स्वीकारली होती ती मुळी त्यांची नव्हतीच! ते आजकाल आपल्या तक्रारींमुळे त्रस्त असतात. त्याचा लाभ उठवीत दुसरीच कोणी व्यक्ती दादांचा हवा तसा उपयोग करीत आहे अशी शंकररावांची खात्रीच झाली होती. त्यामुळेच मग जी व्यक्ती दुसऱ्यांकडून उपयोगात आणली जात आहे तिच्याविषयी संताप व्यक्त करण्यात अर्थ नाही. शिवाय दादांविषयी आपण श्रेष्ठींकडे कधीच तक्रार केली नाही. श्रेष्ठी सर्व पहातातच व प्रत्येक वेळी त्यांनी कोणाशी तरी 'हो–नाही'च्या मुद्द्यावर वाद घालावा असं नाही, असेही शंकररावांचे मत बनले होते. यामुळेच मग दादांना थोपविणे शंकररावांना फारसे जड गेले नाही.

## पवारांचे राजकारण !

दादांच्या मागे उभी असणारी ती व्यक्ती शंकररावांना चांगलीच ठाऊक होती. दादांना स्वतःला आता राजकीय महत्त्वाकांक्षा उरलीच नव्हती हे म्हणणं चुकीचंच ठरेल. पण प्रत्येक संधीचा उपयोग आपली महत्ता वाढविण्यासाठी करणाऱ्या शरदरावांनी दादांचा उपयोग केलाच नाही हे म्हणणं म्हणजे वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केल्यासारखे होईल.

महाराष्ट्रातून खऱ्या अर्थाने राष्ट्रीय स्तरावर पोहोचलेले सत्तारूढ पक्षातले एकमेव राजकारणी म्हणजे यशवंतराव चव्हाण. आणीबाणीनंतर जनता राजवटीच्या काळात साहेबांबरोबरच पवार यांनी इंदिरा कॉंग्रेस सोडली. साहेब सत्तेपासून दूर राहिले; पण पवार मुख्यमंत्री झाले. जनता पक्ष कोलमडला. पवारांचे मुख्यमंत्रीपद गेले. दरम्यान साहेबांनी पुन्हा स्वगृहप्रवेश करण्याचे ठरविले. पवारांनी साथ द्यायचे कबूल केले व ऐनवेळी माघार घेतली. साहेब एकटेच इं. कॉं.त प्रवेश करते झाले. प्रारंभी खूप मानहानी सहन करीत साहेबांना अगदीच मंत्रीपद नाही तरी आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्षपद मिळाले. त्यामुळेच १९८४ ला देह ठेवण्यापूर्वी ते खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहाला मिळाले व त्यांचे वेरजेचे राजकारणच

यशस्वी होते याची झलक त्यानी दाखवून दिली.

पवारांनी विरोधकाशी हात मिळवणी करीत पुलोदचे मुख्यमंत्रीपद मिळविले. पण मग तेही गेल्यावर पवारानी समाजवादी कॉंग्रेस भक्कम करण्यास सुरुवात केली. १९८४ ला सार्वत्रिक निवडणुका झाल्या. इंदिरा-राजीव याच्या 'सहानुभूती लाटेनं' सर्वांचं पानिपत केलं. समाजवादी कॉंग्रेसनच थोडासा तग धरला. (आंध्रात तेलगू देसमचा अपवाद) स्वतः शरद पवारानी शंकरराव पाटील याचा पराभव केला, दणदणीत पराभव केला नि ते दिल्लीत खासदार म्हणून गेले.

पण पवाराना दिल्लीत राजकारण करायचेच नव्हते. साहेबासारखी त्यांना हिमालयाची काळजी नव्हती. त्याना चिंता होती ती फक्त सह्याद्रीची. त्यामुळच १९८५ च्या विधानसभा निवडणुकीसाठी पवार महाराष्ट्रात परतले. येथेही त्यांनी चागले यश मिळविले. सत्ता त्याच्या हाती लागली नाही. पण सत्तारूढ पक्षाला वचक दाखवू शकेल असा एक गट त्याच्या हाताशी आला होता. तशात विरोधकाचे ऐक्याचे प्रयत्न चालू होते. मग पवार हे एन. टी. रामाराव, रामकृष्ण हेगडे, मेनका गाधी, अटलबिहारी वाजपेयी, फारुक अब्दुल्ला याच्या कळपात दिसू लागले. राजीव सरकारवर घणाघाती टीका करू लागले. ती टीका पाहून वाटायच, पवार यांना देशाची खूपच काळजी वाटत आहे.

याच सुमाराला ज्येष्ठ समाजवादी नेते याचे सीमा आदोलन पुन्हा एकदा आकार घेत होते. पवारानी याही सधीचा लाभ उठविला. या सीमा समितीत ते सामील झाले. समितीचे अध्यक्षपद वगैरे न घेता त्यानी प्रकाश-झोतात राहण्यास योग्य असलेले, पत्रकार परिषदांतून झळकत येणारे असे सरचिटणीसपद अगदी विनम्रपणे स्वीकारले.

सीमा समितीच्या काही आदोलनात त्यांनी भागही घेतला. भूमिगत होणे, बेळगाव भागात प्रकट होणे अशा किमया त्यानी करून दाखविल्या. पवाराची एक जबर शक्ती महाराष्ट्रात निर्माण होत आहे असच त्यावेळी वाटलं.

## मुपनारांचे आवाहन !

विरोधकांचे ऐक्य, सीमा सघर्ष या गोष्टीत पवार समरसून जात होते. पण त्याचवेळी नेमके इं. कॉं. सरचिटणीस जी. के. मुपनार यानी समान विचाराच्या कॉंग्रेस जनानी (आजी व माजी) एकत्र यावे असे आवाहन केले. शरद पवार या आवाहनाने विरघळले. त्याचे असख्य अनुयायी मुख्य प्रवाहापासून दूर राहण्यास, सत्तेपासून दूर राहण्यास अगदी कटाळले होते. पवार याचीही अनयायासारखीच अवस्था होती. त्यामुळे मुपनार याच्या आवाहनाने ते पार विरघळले आपली चूक त्यांना उमगली. ज्या विरोधकाबरोबर एकाच व्यासपीठावर समान विचार माडले, समानपणे राजीव सरकारवर हल्ला चढविला होता, ते चूक होते हे त्याना जाणवले. समान विचारी कॉंग्रेसजनांना आलेली हाक पवाराच्या कानी पडली नि ते कळवळले त्यानी लगेच मग स्वगृह प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आमची साहेबाची याद ताजी झाली. साहेब जेव्हा स्वगृही गेले तेव्हा पवारानी ऐनवेळी माघार घेतली होती नि आता विरोधी गट जोर धरू पाहात होता तेव्हा तेथूनही ऐनवेळी माघार घेऊन, पवारानी, आपला स्वभाव बदललेला नाही याची खात्री लोकाना दिली. कोण काय म्हणतंय याचा विचार न करता स्वतंत्र बाण्याचे पवार स्वगृही परतले.

समाजवादी कॉंग्रेस सपली असेच भासवत औरंगाबादच्या एका शानदार सोहळयात पवार इ. कॉं. त प्रवेश करते झाले. लाखभर लोक या सोहोळयास उपस्थित होते. खुद्द राजीवजी हजर होते. महाराष्ट्राचा 'हा' मानाचा फेटा या निमित्ताने राजीवजीच्या शिरावर झळकला

स्वगृही प्रवेश करताच पवारानी दिल्लीशी संपर्क ठेवत, दादांशी विचारपूर्वक व आवश्यक तेवढे संधान साधत, शकररावाना शह देण्यास सुरुवात केली. पण इ. कॉं. श्रेष्ठी त्याचं पूर्वीपासूनच निरीक्षण करीत होते. शकररावाचं मुख्यमत्रीपद गेलं असं तीन तीनदा सांगूनही दादाचे हे बोल खरे ठरले नव्हते. त्यामुळच दादाचं श्रेष्ठीच्या दरबारातल वजन पवारानी जोखल होतं. त्यामुळच ते दादाशी तशी सावधपणेच हात-मिळवणी करीत होते.

शंकररावाचा तुसडा स्वभाव हा पवाराच्या लोकसग्रहापेक्षा अगदीच वेगळा होता. प्रारंभी शरदरावाना इ. कॉं. 'पक्षी' यानी चोची मारीत विरोध केला पण जसजसा वेळ जाऊ लागला तसतसा पवार गटाचा प्रभाव मदगतीने का होईना वाढू लागला. मग दादाच्या जोडीने शकररावाना शह देण्याचा ते स्वतत्रपणेही प्रयत्न करू लागले. याचे अगदी अलीकडचेच उदाहरण द्यायचे तर राज्यात नुकत्याच गाजलेल्या जिचकार प्रकरणाचे देता येईल. शिंदे-देशमुख यांना अटक होताच पवार स्वतः जाऊन त्याना कारागृहात भेटले. जिचकार यांच्या गाडीवर हल्ला करण्यावरून या दोन आमदाराना, जे इ. कॉं. चेच होते त्याना, अटक झाली. दोघानी जामीन देणे नाकारून अटक पुढे चालू ठेवली. जिचकार हे चव्हाणाचे समर्थक. चव्हाणानी या प्रकरणी मौन पाळले. प्रकरण श्रेष्ठीपर्यंत गेले. दोघानी, शिंदे-देशमुखानी-बेमुदत उपोषण सुरू केले नि आरोप मागे घेण्यात आले. कितीही नाही म्हटले तरी हा चव्हाणाचा पराभव होता नि या निमित्ताने पवाराचा लोकसग्रह वाढला होता.

नवं वर्ष सुरू झाल. चव्हाण याचं मुख्यमत्रीपद कायम राहिल. पवार यांनी पूर्वी केलेली इं. कॉं. प्रतारणा त्याच्या मुख्यमत्री पदावर आरूढ होण्याच्या आड येत होती. त्यामुळच 'खाईन तर तुपाशी' म्हणण्याची वेळ त्याच्यावर आली. झालोच तर मुख्यमत्रीच होईन, अन्य मंत्रीपद स्वीकारणार नाही अस त्यानी जाहीर केलं. श्रेष्ठींनीही स्वतःचं गणित माडलं होतं. प्रथम शंकररावाऐवजी, दादा-पवार यांच्या व्यतिरिक्त दुसरा मोहरा शोधायचा; पवाराना पुरेसा धडा मिळेल तेव्हाच व अगदीच अपरिहार्य ठरेल तेव्हा त्याना सत्ता द्यायची अस हे गणित असावं. परिणामी शकरराव स्थिरावले. चौथ्या वर्षाअखेरपर्यंत तेच हे पद भूषविणार हे स्पष्ट झाले.

## आसन स्थिरावले, आता पुढे ?

आसन स्थिरावले नि चव्हाण आता अधिक मोकळेपणे बोलू लागले. 'आतापर्यंत काही लोक मला बी. एड., रिडल्स, आठमाही सारख्या वादात गुतवून ठेवत होते. त्यामुळे मला माझ्या मुख्य कामाऐवजी वेगळयाच

कामात गुतून पडावे लागत होते. माझ्या कामाच्या एकूण वेळापैकी बराचसा वेळ या कारणासाठी खर्ची पडत होता.' इति शकरराव.

मुख्यमत्रीपदी आल्यापासूनच शकररावानी आपले स्वत चे सघर्ष लढविताना साखर सम्राट, शिवसेना या घटकाना चागलेच धारेवर धरले. शिवसेनेच्या रूपान जातीय घटक अधिक आक्रमक होऊ पहात आहे हे पहाताच 'शिवसेनेच्या पैशाच्या मूळ स्रोताचा शोध घेऊ!', 'ठाकरेंवर खटले भरू.' इ. अर्थपूर्ण इशारे देत त्यानी या प्रतिस्पर्ध्याला अगदी अलीकडेच झालेल्या विले-पार्ले निवडणुकीपर्यंत थोपवून धरले होते.

'या निवडणुकीत आपण एवढी महत्त्वाची भूमिका का घेतली, ही निवडणूक आपण प्रतिष्ठेची का मानली?' याबाबत बोलताना शकरराव म्हणाले की, 'या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा जातीय घटक डोके वर काढतोय असे दिसले, म्हणून ही निवडणूक मी प्रतिष्ठेची केली. नाहीतर सध्या मला विधानसभेत पुरेसे मताधिक्य आहेच. एक जागा गमावण्यान त्याच्यावर फारसा परिणाम व्हायचा नव्हता.' शकररावाच्या या विधानात पूर्णतः सत्याश नसला तरी ते विधान सपूर्ण असत्यही नाही हे दिसून येईल.

मराठवाडा-विदर्भ इ. प्रदेशातील विकासात जी पोकळी निर्माण झाली ती भरून काढण्यासाठी वैधानिक मडळे स्थापन करावीत या मागणीनेही शंकररावाना बराच त्रास दिला. पण प्रथमपासूनच त्यानी या कल्पनेस, केंद्राने त्यास मजुरीचा झेंडा दर्शविला असला तरीही, विरोध दर्शविला. यामुळे लोकनियुक्त सरकारच्या अधिकारावर गदा येईल व सबधित भागात राष्ट्रपती राजवटीसारखी थोडीफार स्थिती येईल. प्रशासकाकडे अधिक सत्ता जाईल, या कारणामुळे शकररावानी आपला या वैधानिक मडळांना असलेला विरोध कायम ठेवला

'साखर सम्राट हे ऊस उत्पादकाच्या जिवावर चैन करतात' असही शकररावाना वाटत. 'ऊस उत्पादकाची न्याय्य देणीही चुकती न करता हे सम्राट वेगवेगळे निधी उभारण्यासाठी त्या पैशाचा वापर करतात. काहीना आजीव सदस्यत्व बहाल केले जाते. त्यामुळे तर निवडणुकी व्हायला हव्यात हे सहकार घटनेतल तत्त्वच वारगळलं जात. या सर्व गोष्टीवर शकररावाचा रोष पूर्वी होता व आजही आहे. त्यामुळेच त्यानी साखर सम्राटाना चागलेच धारेवर धरले आहे आता आसन स्थिरावताच ते याबाबत कोणते नवे पाऊल उचलतात ते पहावे लागेल. केवळ एक खास अस्त्र म्हणून त्यानी त्यास जवळ बाळगलेले नाही ना, हे तपासावे लागेल.

३१ मे १९८८ पर्यंतच जकात राहणार आहे. त्यानतर तो कर रद्द करण्याचे आश्वासन शकररावानी गेल्या मे महिन्यात दिले आहे. त्याबाबत कसबेकर समितीचा अहवाल आला आहे. प्रवेश कर पर्याय म्हणून पुरस्कारीला गेला आहे आणि शकररावाना निर्णय घ्यायचा आहे. जकात रद्द करण्याचा निर्णय सरकारने राबविलाच तर शकररावाची ती फार मोठी व महत्त्वाची कामगिरी ठरणार आहे.

## केंद्र आणि शंकरराव

काँग्रेसी मुख्यमंत्र्याना केंद्रात त्याचेच सरकार असताना नेहमीच कोडीत सापडल्यासारखे होत असते, राज्यहिताच्या गोष्टीसाठी सतत केंद्रावर अवलबून रहावे लागते. काँग्रेसेतर मुख्यमत्री आपल्या राज्याच्या मागण्यासाठी, राज्याच्या हक्कासाठी केंद्राला धारेवर धरू शकतात हे अलीकडे चागलेच स्पष्ट झाले आहे; पण काँग्रेसी मुख्यमंत्र्याचे अनेकदा 'सँडविच' होताना दिसते.

शकररावाचाही याला अपवाद नाही. सीमा प्रश्नाच, तसेच जिल्हा परिषद निवडणुका याचं उदाहरण यासाठी देता येईल

सीमा प्रश्नाबाबत शकररावानी कोणतीही ठाम भूमिका कधीही घेतलेली दिसत नाही. किंवा या प्रश्नाविषयी त्याना पोटतिडीक आहे असेही दिसलेल नाही. त्याबाबत केंद्राने त्याना रोखलेल आहे. केंद्राला कर्नाटकात सत्ता मिळवायची आहे व महाराष्ट्रात सध्या तरी तिला धोका नाही. त्यामुळे महाराष्ट्राला बोटचेपे धोरण स्वीकारावयास लावण्यात आलेले आहे त्यामुळेच शकररावही हा प्रश्न श्रेष्ठीवरच सोपवून निर्धास्त झालेले आहेत. बुटासिग जेव्हा चर्चेला बोलावतात तेव्हा ते जातात, चर्चा करतात (!) नि परततात. अशा अनेक चर्चा झाल्या आहेत.

आता तर केंद्राने व विशेषत पतप्रधानानी हेगडे-दडवते वादासाठी सुरुवात करून ठेवली आहे सीमा प्रश्न सोडविण्याबाबत या दोन जनता नेत्यानी आपल्याकडे एकाचवेळी चर्चेला यावे अस त्यानी ससदेत जाहीर केल नि सीमा प्रश्न हा 'जनता' प्रश्न आहे असं भासवून टाकल. परिणामी तो प्रश्न पुन्हा भिजत पडला. शकररावजी त्याकडे फक्त बघत राहिले आहेत

जिल्हा परिषदा निवडणुका! शकररावानी जाहीर केल्या; पण नतर केंद्राचा आदेश 'पोहोचला' नाही त्यामुळे पुन्हा एकदा बोटचेपे धोरण स्वीकारण्यात आले निवडणुका पुढे ढकलाव्यात यासाठी केंद्राचा आदेश वगैरे आलेला नाही असे शकरराव म्हणत असले तरी ते फारसे खरे वाटण्यासारखे नाही त्यामुळे शकररावाचे केंद्रावरचे अतिरिक्त अवलबित्वच स्पष्ट होते.

शिवाय शकररावाच्या पाठीशी केंद्राशिवाय दुसरी शक्ती उभी नाही. यामुळे शंकररावाना केंद्रावर अधिकाधिक अवलबून राहण्याशिवाय पर्यायच नाही.

नवव्या वित्त आयोगाच्या विषय व्याप्तीसदर्भात बसू, हेगडे, रामाराव, महत, देवीलाल आदी काँग्रेसेतर मुख्यमत्र्यानी जोरदार आवाज उठविला आहे.

'अधिकर्ष' कर्ज फेडीस मुदतवाढ मिळावी, केंद्रीय वाढत्या हस्तक्षेपाला खीळ घालावी इ स्वरूपाचा आवाज हे मुख्यमंत्री उठवीत आहेत.

खरतर हा आवाज प्रत्येक राज्यान उठविला पाहिजे; पण काँग्रेसी व विशेषतः काँग्रेसचा 'बालेकिल्ला' ठरलेल्या महाराष्ट्राच्या मुख्यमत्र्याला ते शक्यच नसते. कारण या अशा राज्यात दिल्लीची वारी व केंद्राचा वरदहस्त याच बाबीना महत्त्व असते. शंकरराव याला अपवाद नाहीत. जिचकार प्रकरणी दोन्ही आमदारावरील आरोप मागे घ्यावे लागले. अशासारख्या प्रकरणातून ते स्पष्ट होत असते.

पण मग यामुळेच स्थिर (!) मुख्यमत्री असला तरी राज्याचा विकास किती व कसा साधला जाणार याबाबत प्रश्नच निर्माण होतो. मुख्यमत्र्यावर प्रत्येकवेळी केंद्राची टागती तलवार रहाते. ती तलवार कोणत्या क्षणी आपली खुर्ची दुभगून टाकील याबाबत अनिश्चितता असल्याने या प्रश्नाचे उत्तरही असेच टागते राहणार एवढे मात्र निश्चित □

# सती प्रथेचे उदात्तीकरण थांबवायचे असेल तर...

● प्रा. पुरुषोत्तम शेठ ●

राजस्थान या नावाला आणि प्रांताला भारताच्या ब्रिटिशपूर्व काळातील इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. मध्ययुगात काही शतके राजस्थान भारतीय संस्कृती, शौर्य, पराक्रम आणि कला यांचे केंद्र राहिला. एकीकडे जीवनाबद्दल अनासक्ती बाळगणाऱ्या भगवान महावीराच्या जैन तीर्थकरांच्या वास्तव्याने पुनीत होऊन दिलवाड्यासारखी अमर संगमरवरी शिल्पे आपल्या पाठीवर अभिमानाने वागवीत आहे. तर दुसरीकडे आपला देश, धर्म, स्वाभिमान यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या अनेक वीरांची मालिका आपल्या डोळ्यांसमोर उभी रहाते. उदयपूर, चित्तोड, जोधपूर, बिकानेर, नाभा अशी संस्थाने येथे नांदत होती. राजस्थानचा इतिहास लिहिणारा कर्नल टॉड म्हणतो, 'राजस्थानात एकसुद्धा असे छोटे राज्य नाही की, ज्या ठिकाणी थर्मापिलीसारखी लढाई लढली गेली नाही आणि लिओनिडाससारखा पुरुष प्रत्येक गावात उत्पन्न झाला नाही.' याचे खरे कारण राजस्थानच्या जीवन जगण्याच्या भूमिकेत आहे.

'बरस बारह जियैं कूकर,
बरस तेरह जियैं सूकर,
बरस अठारह जियैं क्षत्रिय,
आगे जीवनको धिक्कार।'

(बारा वर्षापर्यंत कुत्रे जिवंत रहाते, डुकराला तेराच वर्षे जगायचे असते. परंतु क्षत्रियांनी अठरा वर्षापेक्षा जास्त जगणे म्हणजे जीवनाचा धिक्कार. याचा मतितार्थ-क्षत्रियांनी तारुण्यात येताच रणांगणावर पुरुषार्थ केला पाहिजे.) यावरून लक्षात येईल की राजस्थानात वीरत्व आणि रणांगणातील हौतात्म्य हे त्यांच्या जीवनाचे मूल्य होते.

राजस्थानची ही पुरुषविषयक मनोभूमिका स्त्रीबाबतही तितकीच प्रखर होती. राजस्थानी कवींनी शौर्यावर, पराक्रमावर प्रेम करणाऱ्या स्त्रीमानसाचे प्रभावी चित्रण केले आहे. संयोगिता, पद्मिनी, कर्णावती, जवाहरबाई, कृष्णाकुमारी, आदी क्षत्राणी त्यांच्या डोळ्यांसमोर असताना ते स्त्रीच्या धैर्याची-शौर्याची उपेक्षा कशी करतील? राजस्थानी काव्यात अनेक शतके स्त्रीच्या सतीत्वाचा गौरव केला आहे. राजस्थानी जनमानसात सतत चारण कवींच्या काव्याने स्त्रीच्या सतीत्वाची प्रतिमा उभी केली आहे. महाराष्ट्रात रमाबाई पेशवे सती गेल्या, परंतु काव्यात त्याचे उदात्तीकरण झालेले नाही. उलट राजस्थानी काव्यात सतीत्वाबद्दल जबरदस्त आकर्षण निर्माण होईल अशा तऱ्हेची काव्यरचना केलेली आहे. त्यांनीच राजस्थानमध्ये स्त्री, पुरुषांच्या सामूहिक मानसिकतेचा पिंड पोसला गेला आहे.

राजस्थानी स्त्रिया सतीचे वाण घेऊन आपल्या आदर्श वीर पुरुषाच्या पाठीशी निधड्या निश्चयाने उभ्या राहिल्या. कवी बाकीदास सूर्यमल्ल म्हणतो,

'सूरातन सूराँ चढै,
सत सतियाँ सम दोय।
आडी धारा ऊतरैं,
गणे अनल नूं तोय॥'

(शूर–वीरात वीरत्व चढत असते, सतीमध्ये सतीत्व, दोन्ही समान आहेत. एक तलवारीने धारातीर्थवासी होतात तर दुसरीकडे स्त्रिया सतीत्वासाठी अग्नीला पाण्यासारखे मानतात) यावरून लक्षात येईल की, राजस्थानी जनमानसात सती हे एक मूल्य मानले गेले.

रजपूत स्त्री वीर पुरुषाला जन्म देण्यातच आपली कूस धन्य झाली असे मानते. यातच तिला अभिमान वाटतो. कविराजा बाकीदासने म्हटले आहे,

जाया रजपूतणियाँ,
वीरत दीघी वेह।
प्राण दियैं पाणी फणग,
जावा न दिये जेह॥

रजपूत स्त्री आपल्या विवाहाच्या वेळेस ज्या पुरुषाचे पाणिग्रहण करते आणि पतीचा हात हातात घेते आणि पहिल्या स्पर्शाने ती त्याच्या हातावरील घट्ट्याने मोहरून जाते आणि ती नायिका आपल्या सखीला सांगते, 'माझा पती माझ्या बांगड्यांना लाजविणार नाही. तलवार पकडल्याने त्याच्या हातावर आलेले घट्टे हेच दाखवितात की– मला पराक्रमी पुरुष मिळाला. माझ्या बांगड्या धन्य झाल्या!'

हथलेवे मही मूठ किण,
हाथ विळगा माय।
लाखां बातां हेकलो,
चूडी मोन लजाय॥

विवाह झाला आणि पहिल्या मधुचंद्राच्या दिवशी प्रथम समागमाच्या वेळेस पत्नीने

आपल्या पतीच्या हावभावाचे निरीक्षण केले, रात्री शय्यागृहात डोक्यावरचा साफा खाली उतरवून ठेवताना नायिकेला पतीच्या डोक्यावरील घाव दिसतात. रात्रीच्या गप्पात त्याने ताठ मानेने पहाणे आणि योग्य शत्रूची स्तुती करणे हे पाहून नायिका आपल्या सखीला प्रसन्न होऊन सागते, 'माझा पती थोडयाच दिवसाचा सोबती आहे, कोठे ना, कोठेतरी युद्धात तो मारला जाणार आहे.' विवाह मडपातील ढोल वाजताच त्याच्या फुरफुरणाऱ्या भिवयाना भिडणाऱ्या मिशा पाहून ती समजते की– माझ्या पतीला हौतात्म्याची ओढ आहे, रक्ताची तहान आहे, मरणाची जवळीक आहे.

पेटी मौड छिपावियां,
जाणूं घाव न जीव।
हेली दिवसां पाहुणै,
पडनै दिठौ पीव ॥
ढोल सुणतां मंगली,
मूंछाँ भूह चढेत।
चँवरी ही पहचाणियौ,
कंबरी मरणौ कत ॥

या स्त्रीचा पती युद्धभूमीवर जायला निघतो. पतीला युद्धभूमीवर जातानाच ती बजावते–युद्धातून पळून आलास तर, डोक्याखाली उशी मिळेल. परंतु पत्नीच्या बाहूचा आसरा केव्हाही तुला मिळणार नाही. असा निरोप दिलेला पती पराक्रम करूनच घरी परत येतो. तिच्या भावनाचे सार्थक होते. पतीच्या पराक्रमाला ती मुजरा करते.

कर पुचकोर धण कहै,
जाण धणी री जैत।
नीराजण बाघावियौ,
हूँ बलिहार कुमैत ॥

दुसरीकडे आपला रणागणावरून पळून आलेला पती पाहून पत्नी त्याला अपमानित करत सागते, 'हे प्रियकरा, अशा पद्धतीने जगून तू तुझा जन्म मातीत घालविलास. कचुकी पाहिल्यावर मला ती नेसावीसी पण वाटत नाही. माझी ही वेषभूषा व अलकार तूच गळयात घाल, तुझा बागडयांचा खर्च वाचला, मी जोगीण बनते.'

धव जीवे भवरवोवियो,
मो मन मारियो आज।
मैनूं ओछे कँचुवै,
हाथ दिखातां लाज ॥
यो गहणों यो वेस,
अब की जै धारण केत।
हूँ जोगण किण कामरी,
चूडाखरच मिटेत ॥

(कविराजा सूर्यमल)

दुसरी पत्नी आपल्या पतिराजाचे स्वागत करताना दरवाज्यातच आपली वस्त्रे त्याला देऊन सागते, 'माझ्या बागडयाना लाजविणाऱ्या पतिदेवा, तुझी माझी भेट दुसऱ्या जन्मात.'

राजस्थानात सौभाग्यवती स्त्रिया हाताच्या कोपरापर्यंतची चोळी नेसतात आणि विधवा हातभर लाबीची चोळी नेसतात. आपला पती परत आलेला पाहून पत्नी सांगते, 'शिंपीदादा, मी सौभाग्यवती असले तरी माझा पती पळून आल्यामुळे मी विधवा आहे. माझ्यासाठी विधवाना असलेली लांब कचुकी शिव मी यापुढे शिलाई दुप्पट देईन.' रागात शृंगार करावयास येणाऱ्या आपल्या सखीला सागते, 'उद्यापासून तू माझ्या हवेलीवर येऊ नकोस, माझा पती पळून आलेला आहे, विधवाना शृंगार कसला?'

मणिहारी जारी सखी,
अब न हवेली आव।
पीव मुआ घर आविया,
विधवां किसा बणाव ॥

ती आपल्या पतीला सांगते, 'ठाकूरा! माझ्या सती होण्याच्या आणि लाल रगाच्या वस्त्रे नेसण्याच्या इच्छेवर पाणी फिरवलेस, सती जाताना मला लावण्यासाठी आणलेले अत्तर आता कोण खरेदी करील?' यावरून लक्षात येईल की राजस्थानी स्त्रीत सतीत्वाचे आकर्षण आहे

प्रत्येक स्त्रीला माहेरचे निमंत्रण म्हणजे अपूर्वाई असते आणि माहेरून भाऊ बोलवायला येतो तेव्हा ती आपल्या भावाला सांगते–

वीरा लेवण आवियौ,
पिऊ रण हुआ वहीर।
अब तो बळवां जावस्यां,
अब नहूँ आवां पीर ॥
सुरपुर तक निभ जावसी,
या जोडी या प्रीत।
सखी पिऊ रै देसडै,
सँग बळवा री रीत ॥

(मी माहेरी येणार नाही. माझे पती रणागणाकडे गेले आहेत. मी सती होणार, सखी, माझे आणि माझ्या प्रियकराचे प्रेम स्वर्गापर्यंत सोबत करणारे आहे, कारण. माझ्या पतीच्या देशात पतीबरोबर सती जाण्याची प्रथा आहे. तिने माहेरी जाण्यापेक्षा सतीत्वातच आनद मानला आहे.)

रणागणावर रणभेरी वाजू लागताच क्षणापूर्वी पत्नीने बाहुपाशात घेतलेल्या पतीचे स्नायू रणागणावरील नगाऱ्याचे आवाज ऐकताच फुरफुरून येतात. तिच्या बाहूत तो सामावत नाही, रणागणाकडे त्याने कूच करताच सारे अलकार तिला निष्फळ वाटतात. बाधलेले केस ती मोकळे करते. तिला सती जायचे असते. ती आपल्या सखीला सागते, 'लग्नात सप्तपदीच्या वेळेस माझा पती माझ्या पुढे होता, त्याच्या पदराला गाठ मारून त्याच्या मागून मी घरात आले होते. जर माझा पती या युद्धात मारला गेला तर मी पुढे राहीन, त्याचे प्रेत मागे राहील. (पूर्वी सती जाताना प्रेतयात्रेच्या पुढे सती जाणारी स्त्री असे.)

हूँ पाळें आगै हुवे,
आपि नाह धरेह।
जे बाल्ही घण जीव हूँ,
आगे मूझ करेह ॥

साधारणतः नणंद–भावजयीत भाडण असते. आपल्या नणदेच्या सौभाग्यालकारात सतीचा नारळ पाहून भावजय सुखावून जाते, आणि नणंदेची चुबनावर–चुबने घेऊ लागते.

सासू–सुनात भाडण असते, परंतु येथे सासूला आपल्या सुनेच्या सती जाण्याच्या सौभाग्याचा हेवा वाटतो.

सूत धारां रज–रज थियौ,
बहू बळेवा जाय।
लखिया डूंगर लाज रा,
सासू उर ना समाय ॥

मुलगा 'तलवारीने' काटून–काटून रणमृत्यूला सामोरा गेला, सून सती व्हायला निघाली आहे, सासूवर लाजेचा डोगर कोसळला आहे. तिला याची शरम वाटते की, तिचा मुलगा आणि सून वीरगतीला प्राप्त झाली आणि ती तर बसून राहिली आहे. सुनेच्या सती सौभाग्यापुढे तिला आपले जिणे लाजिरवाणे वाटते. दुसरीकडे सती जाणारी


स्त्री आपल्या माहेरी निरोप पाठविते की– मी जन्माला आले तेव्हा तुम्ही थाळी नाही वाजवली. परंतु मी सती जाताना मात्र माझ्यासमोर ढोल वाजविले जातात. माझ्या जन्माने झालेले दु:ख सती जाण्याने आनंदात साजरे केले जाते.

पंथी हेक संदेसडी,
बाबल नै कहियाह।
जायाँ थाळ न वज्जिया,
टामक टहटहियाह ॥

बापालाही आपल्या मुलाच्या वीरमृत्यू-बद्दल आणि सुनेच्या सती जाण्याबद्दल अभिमान वाटतो. बाप बऱ्याच वर्षांनंतर घरी येतो आणि ४०–५० फुटांवरून त्याला दिसते, आपल्या घराच्या दरवाज्यावर स्त्रीचे कुंकवाचे हात. त्याने ताडले त्याचा मुलगा युद्धात मारला गेला आणि सून त्याच्या-बरोबर सती गेली. ती हाताची कुंकुम चिन्हे पाहून तो आनंदित होतो, सुनेला आणि मुलाला धन्यवाद देतो, पुत्रशोक त्याला होत नाही.

तात विदेसाँ आवियौं,
कौंळे दिठा हाथ।
रण बधाई हूलसै,
सूत–बू बळिया साथ।

राजस्थानच्या वरील सर्व काव्यांच्या उदाहरणावरून लक्षात येईल की, राजस्थानी जनमानसात सतीप्रथेचे आकर्षण आहे. 'देवराला' येथील रूपकुँवरच्या सतीत्वाचे समर्थन करण्याचा हेतू नाही. आजही सती प्रथा निषेधार्हच आहे. परंतु राजस्थानात सती प्रथेविरुद्ध वातावरण निर्माण करावयाचे असेल तर तेथील समूहमानसातील सतीत्वाबद्दलचे परंपरेने आलेले आकर्षण एका क्षणात दूर करता येणार नाही. आधुनिक काळात ब्रिटिशांच्या सत्तेमुळे जेथे ब्रिटिशांनी स्वत: राज्य केले तेथे उदारमतवाद आला, सामाजिक सुधारणेचे वारे निर्माण झाले. उलट राजस्थानात संस्थानिकांचेच राज्य होते. जयपूर, मेवाड, उदयपूर बूंदी, कोटा ही संस्थानेच होती. येथे कोठेही ब्रिटिश राजवट नव्हती. त्यामुळे विचार-स्वातंत्र्याचा वारा फटीतूनही आला नाही. भाट आणि चारणांनी परंपरेने दिलेल्या मूल्यांनाच राजस्थानी जीवनात महत्त्वाचे



स्थान होते. स्वातंत्र्यानंतर संस्थाने विलीन झाली; परंतु लोकसभेच्या आणि विधानसभेच्या १९७१ पर्यंतच्या निवडणुका पहाता लक्षात येईल की– संस्थानिकांचाच वरचष्मा होता. म्हणजे सरंजामदारी जीवनातील वरील मूल्ये त्यांनी जोपासली, व त्यामुळे राजस्थानात कोणत्याही तऱ्हेच्या समाज सुधारणेच्या विचारांना पारंपरिक विचार मूल्यांपुढे थारा नव्हता. स्वामी दयानंदांचे कार्य उत्तरेत फोफावले. परंतु राजस्थानात ते स्थिरावू शकले नाही. १९७१ नंतर भारतातील अनेक प्रांतांप्रमाणे राजस्थानातही धार्मिक पुनरुज्जीवनवादाला गती मिळाली. राजस्थानी हिंदू समाजात कित्येक शतके परंपरेने वसलेले स्त्रीच्या सतित्वाचे मूल्य पुन्हा चितेतून उठून राजस्थानी समाजात मूळ धरू लागले आहे. जेव्हा पधिनीच्या जोहाराचे आपण कौतुक करतो तेव्हा नकळत सतित्वाचा सन्मान करतो. राजस्थान हा सतत परकीय आक्रमणाचे लक्ष ठरलेला प्रांत आहे.

ज्या काळात स्त्रीलाही भौतिक संपत्ती-

प्रमाणे एक शोभेचे मूल्य दिले गेले तेव्हा आपल्या मागे पत्नी दुसऱ्याच्या हाती लागू नये म्हणन तिला स्वनाशासाठी स्वत: होऊन तयार करणारी मनोभूमिका भाटाच्या, चारणाच्या काव्यातून सुरक्षित राखली गेली. परिणामी सती प्रथेचे आकर्षण कायम राहिले. हे काव्य हरळीच्या मुळीसारखे आजही राजस्थानी जनमानसात मूळ धरून राहिले आहे. भारतातील कोणत्याही प्राताच्या मध्ययुगीन अगर अर्वाचीन साहित्यात सती प्रथेचे उदात्तीकरण केलेले काव्य नाही. परतु राजस्थानी साहित्यात सतित्वाच्या गौरवासाठी अनेक चारणाच्या प्रतिभा खर्ची पडल्या आहेत. दंतकथा, लोककथा, लोकभ्रम, जुने भग्नावशेष आजही राजस्थानी मानसाला धार्मिक पुनरुज्जीवनाच्या प्रेरणा देतात. तसे पाहिले तर चितोड गडावरील पद्मिनीच्या जोहाराची जागा एक गॅस चेंबर आहे. स्त्रियाना भुयारात उभे करत, भुयाराच्या तोडाशी प्रचड जाळ केला जाई, परिणामी गुदमरून व पेटून स्त्रिया भस्मीभूत होत. आणि या सर्वांचा गौरव काव्यातून होत राहिला. रास्थानी वातावरणामुळे जुन्या स्तुतिपाठकाच्या द्वारे परंपरेचा विळखा राजस्थानी समूहमानसाला वेढा घालून बसला आहे लेखाच्या माध्यमापर्यंत मुद्दाम विस्तृत उदाहरणे मी दिली आहेत. यावरून आपल्या लक्षात येईल की, राजस्थानी जनमानस सतीच्या उदात्तीकरणातून मुक्त करणे अवघड आहे.

कोणत्याही समाजामध्ये परिवर्तन हे 'तूप खाऊन रूप येण्यासारखे' होत नसते. राजस्थानी सती प्रथेचा निषेध करताना समूह मानसही समजावून घेतले पाहिजे. आपणाकडे एखाद्या समाजाला धोपटून काढण्याची प्रवृत्ती अधिक आहे. 'दिवराला' येथील सतीची घटना एक क्षणिक आहे. परतु त्या मागे शतकानुशतकाच्या परपरेने जड झालेले जनमानस आहे. समाजाच्या समूह मानस शास्त्राचा विचार करूनच राजस्थानात पावले टाकावी लागतील देवराला येथेच काय राजस्थानातील खेड्यापाड्यात, हॉटेल दुकानात, रिक्षा, टाग्यात रूपकुँवरबद्दल सहानभूतीचा सुस्कारा असला तरी परपरेच्या अभिमानाचा गौरवही असतो व त्यामुळे सती प्रथेविरुद्ध येणाऱ्या विधेयकामुळे कदाचित चारणानी गायिलेल्या परपराना अधिकच उजाळा मिळेल. तेव्हा सती प्रथेचे उदात्तीकरण थाबवावयाचे असेल तर राजस्थानचा इतिहास, या समाजाची जीवनमूल्ये आणि त्याचे काव्य हे सर्व लक्षात घेऊन हळूवारपणे उपाययोजना करावी लागेल. आज राजस्थानी युवक शीख युवकासारखाच केवळ सती विधेयकाच्या विरोधात प्राणाची कुरबानी करण्यास तयार झाला आहे. हे सर्व लक्षात घेऊनच उपाययोजना कराव्या लागतील. नव्या परपरा व नवे आदर्श त्याना समजावून द्यावे लागतील. जोहाराचा गौरव करीतच सती प्रथा अमानुष आहे, 'प्रॉपर्टी राईट'शी त्याचा संबध आहे हे समजावून द्यावे लागेल त्याचे माध्यम कथा व काव्य, चित्रपट हेच ठेवून प्रबोधन करावे लागेल. 'लिगल लिटरसी' राजस्थानात आज महत्त्वाची आहे. आणि म्हणूनच परपराप्रिय राजस्थानी जनमानसाला सर्वांनीच वळण देण्याची गरज आहे. अन्यथा पंजाबसारखाच राजस्थानही सती प्रथेच्या वादामुळे धार्मिक पुनरुज्जीवनवादाचा बळी ठरेल. □

---

## अशगर अली इंजिनियर लिहितात...

महाराष्ट्रातील व देशातीलही बुद्धिप्रामाण्यवादी वर्तुळात बोहरा समाजसुधारक अशगर अली इजिनियर यांचे नाव बरेच वरच्या क्रमाकावर घेतले जाते. अलीकडेच लिहिलेल्या Ideology and the oppressed या लेखात त्यानी या विषयाची थोडी चिकित्सा केली आहे. ते म्हणतात— 'Western oriented marxism, with all its paraphernalia, will not cut much ice. It will also not do to ignore religion, let alone oppose it. It is imperative to do some hard thinking on this subject. It is a very short sighted approach indeed to show religion as 'opium' for the people and discard it. Religion, it must be remembered, is a power ful instrument and could be used either way, as opium or as a revolutionary ideology.' (ocaasional papers, No. 11, November 1987. From–Institute of Islamik Studies, Bombay) मतीतार्थ असा : 'पाश्चिमात्य धाटणीचा मार्क्सवाद (तिसऱ्या जगतातील देशात) रूजणार नाही. धर्माला विरोध तर राहोच, त्याची उपेक्षा करणेसुद्धा चूक ठरेल. धर्माला अफूची गोळी ठरवून जनतेला त्याचा त्याग करायला सागणे हा अगदी अदूरदर्शीपणा ठरेल. धर्म हे एक फार प्रभावी साधन आहे. अफूची गोळी किंवा क्रातिकारक तत्त्वज्ञान या दोन्ही प्रकारे त्याचा वापर होऊ शकतो.'

इराणमधील खोमेनीच्या उदयाचा अन्वयार्थही वेगळ्या प्रकारे लावला पाहिजे, बहुसंख्य डावे समजतात तशी ही केवळ एक धर्मांधतेची लाट म्हणून निकालात काढणे उचित नाही, असेही या लेखात अशगर अलीनी स्पष्टपणे सूचित केलेले आहे. □


आगळं अन् मस्त मजेदार
श्रीखंड आणि
चॉकलेट यांचा मधुर संगम
तोंडात टाकताच विरघळणारं पौष्टिक चॉकलेट अन् आंबट गोड मस्त चवीचं श्रीखंड यांचा मिलाप झाला तर किती मज्जा, नाही? अंऽऽऽ तुम्हाला मिळते एक आगळी चीज— मॅफकोचं चॉकोखंड!
विशेष प्रकारच्या १०० ग्रॅम व ५०० ग्रॅम पुन: वापरता येणाऱ्या सुरेख पॅकमध्ये सर्व मॅफको फार्म फेअर्स आणि प्रमुख स्टोअर्समध्ये उपलब्ध.
Mafco's
CHOCOKHAND
Interpub/Mafco/1/88 M
मॅफको
चॉकोखंड
सर्वांसाठी दुहेरी आनंद!

# वैदिक सरस्वतीचा शोध आणि बोध

वैदिक काळातील सरस्वती नदीचा उगम कोठे झाला? हा तसा पुरातत्त्वविषयक प्रश्न. परंतु आज सर्वत्र अहमहमिकेने त्याची चर्चा सुरू आहे. उज्जैनचे प्रसिद्ध प्राच्यविद्या पंडित-पद्मश्री डॉ. वाकणकर यांच्या मते सरस्वतीचा उगम भारतातच झाला व पुढे ती गुप्तही भारतातच झाली. तिच्या मार्गाचे संशोधन त्यांनी नुकतेच पूर्ण केलेले आहे.
या समजुतीला प्रचंड धक्का देणारे संशोधन या लेखात मांडलेले आहे. लेखकाचे 'सिंधु-संस्कृती व कल्याण' हे पुस्तक यापूर्वी संशोधन क्षेत्रात लक्षवेधी ठरलेले आहेच.

**● विवेकानंद गोडबोले ●**

जगातील आद्य मानव संस्कृती म्हणजे आर्यसंस्कृती हे आता विश्वमान्य झाले आहे. ह्या आद्य मानव संस्कृतीचा आद्य लिखित ग्रंथ 'ऋग्वेद' हेही मान्य झालेले आहे. 'ऋग्वेद' ह्या शब्दाचा अर्थ जगताच्या मातापितरांचे ज्ञान असा आहे. कारण 'ऋ' ह्या शब्दाचा अर्थ–जगताची मातापितरे असा आहे, आणि वेद म्हणजे ज्ञान. म्हणून ऋग्वेद हा ग्रंथ आद्य इतिहास-ग्रंथ आहे. हा वैदिक आर्यांचा इतिहास ग्रंथ आहे, म्हणून पितृपूर्वजांचा इतिहास ग्रंथ या दृष्टीने भारतीय आर्यांची अत्यंत अभिमानाची व अस्मितेची गोष्ट आहे.

ह्या ग्रंथातील सूक्तांत पितृपूर्वजांच्या देवतांसंबंधी प्रार्थना आहेत. वैदिक आर्यांच्या पूजनीय देवतांची सूक्ते ह्यात आहेत. ह्या देवतांत इंद्र, अग्नि, सूर्य, चंद्र, अश्विनीकुमार, मरूत, हे देव प्रामुख्याने आहेत. परंतु स्त्रीदेवता एकही नाही असे वाटते तरी अपवादात्मक एकच आहे व ती म्हणजे सरस्वती देवता. ऋग्वेदात सुमारे १० हजार सूक्ते आहेत. परंतु सरस्वती सूक्ते फक्त तीनच आहेत, हे लक्षणीय आहे. ह्यावरून सरस्वती देवता वैदिक आर्यांची अत्यंत महत्त्वाची एकमेव स्त्रीदेवता होती ह्यात शंका नाही.

भारतीय वैदिक आर्यच आता आर्यांचे अस्सल वारसदार आहेत. त्यांनी आपल्या पितृपूर्वजांचे ज्ञान बृहत्कष्टाने परंपरेने पठणपद्धतीने जास्तीत जास्त शुद्धस्वरूपांत काळापासून, नष्ट–अपभ्रष्ट होण्यापासून टिकवून धरून काळावरही मात केली आहे वैदिक धर्माच्या देवता, ग्रंथ, ह्यांच्या उपासनेच्या परंपरा व अभ्यास परंपराही ह्या विसाव्या शतकापर्यंत चालू आहेत. ह्यामुळे ऋग्वेदादी ग्रंथ भारतीय वैदिक आर्यांचे अत्यंत आदरणीय ग्रंथ आहेत, त्यातील देवही तितकेच आदरणीय व वैदिक आर्यांची अत्यंत प्रिय, आदरणीय, देवता सरस्वती ही आकाशस्थ देवता व नदी देवताही असल्यामुळे मूर्तरूपात ह्या नदीचा शोध घेणे मनुष्यस्वभावाला धरून आहे.

ही सरस्वती नदी वैदिक आर्यांची वाक्‌देवता, विद्यादेवता, ज्ञानदेवता, अन्नदेवता, संपत्तिदेवता, विश्वजननी साम्राज्यदेवता, यश देवता, पुण्यदेवता, रक्षकदेवता म्हणून वैदिक आर्यांनी अनुभवाने श्रीसरस्वतीसूक्तातून वर्णन केलेले आहे. अर्थात ह्या नदीदेवतेच्या तीर्थांत स्नान करून पावन व्हावे असे प्रत्येक आर्य मनुष्याला वाटते. म्हणून ह्या नदीचा शोध घेण्याचे कार्य शेकडो वर्षे चालू आहे. परंतु ती अजून सापडलेली नाही. म्हणून वैदिक आर्यांचा सारा इतिहासच रहस्यमय राहिलेला आहे.

हा वेदांतील इतिहास रहस्यमय राहण्याची कारणे दोन आहेत. पहिले कारण ऋग्वेदाच्या मूळ लिखित संहिता मुळीच उपलब्ध नाहीत, त्याबरोबर वेदांत उल्लेखिलेल्या वस्तूंपैकी नदीनामे, पर्वतनामे, देशनामे, काहीही वस्तुरूप अवशेष भारतात उपलब्ध नाहीत. हाही एक मोठा चमत्कार म्हणावा लागेल. सिंधू, गंगा, यमुना, परूष्णी वगैरे काही नद्यांचे उल्लेख ऋग्वेदात आहेत. त्यांच्या आधारे सरस्वती नदीचा शोध घेण्याचा प्रयत्न अनेक वेळा झालेला आहे, परंतु तो विफल झालेला आहे. परूष्णी नदीजवळ एक लहान नदी आहे व ती काही अंतर वाहते, पुढे नष्ट होते. पुढे पुन्हा ती वाळवंटात निघालेली दिसते. तिला सध्या 'घग्गर' म्हणतात, व परंपरेने म्हणत आले आहेत. ती घग्गर नदीच वैदिक सरस्वती होय असा निर्णय घेऊन संशोधक मोकळे झालेले आहेत. परंतु या निर्णयाने कोणाही श्रद्धावानाचेसुद्धा समाधान होत नाही. ऋग्वेदांतल्या वर्णनाला न शोभणारे व न पटणारे ह्या घग्गर नदीचे स्वरूप आहे. 'घग्गर' ही

नदी कदापिही वैदिक सरस्वती असू शकणार नाही.

संशोधक वेळोवेळी पुन्हा पुन्हा तेच तेच सांगतात की गंगा यमुना ह्यांच्यामधील परूष्णी नदी जवळची आहे. म्हणून हीच सरस्वती असणे शक्य आहे. ती आता सुकली, कोरडी झाली म्हणून तिची सरस्वती म्हणून ओळख नाकारणे योग्य होणार नाही.

काही विद्वान संशोधकांनी सरस्वतीनदीची ओळख अफगाणिस्तान, मधील गुंगुनदीजवळील एक हरहयवैती नदी हीच सरस्वती आहे असे प्रतिपादन केले. त्यांचे म्हणणे फक्त धन्योच्चार भ्रष्टतेवर आधारलेले आहे. इराणी लोक 'स'चा उच्चार 'ह' करतात म्हणून 'हरहयवैती' म्हणजे शुद्ध वाचनाने सरस्वती असेच होते. हे साधर्म्य मान्य करूनही ती एका सरोवराला मिळते, एवढ्यावरूनच ती वैदिक सरस्वती नाही हे सिद्ध होते. ऋग्वेदातील वर्णनाशी ती मुळीच जुळणारी नाही. म्हणून तिला वैदिक सरस्वती मानता येणार नाही.

ही स्वातंत्र्यपूर्व काळातील संशोधने, त्यातून काही पाश्चात्त्य पंडितांनी केलेली. म्हणूनही आता स्वातंत्र्यकाळानंतर भारतीय विद्वान संशोधकांनी देशप्रेमाने सत्य इतिहास संशोधनाचे कंकण बांधून इतिहास पुनर्लेखा समिती स्थापन केली आहे. त्यातील एका योजनेअन्वये उज्जैनचे पुरातत्व पंडित पद्मश्री डॉ. वाकणकर यांच्या नेतृत्वाखाली वैदिक सरस्वतीचा शोध घेण्याचे कार्य सुमारे १० / १५ विद्वान संशोधकांच्या साहाय्याने सुरू झाले व गेल्या एक-दोन वर्षांत त्यांनी आपला निष्कर्ष जाहीर करण्यास सुरुवात केली आहे.

या संबंधात डॉ. वाकणकरांनी मुंबई येथील 'PROBE' ह्या इंग्रजी साप्ताहिकाला एक प्रदीर्घ मुलाखत देऊन स्पष्ट केले की, 'मानवी संस्कृतीचा पहिला किरण हिमालयांतील शिवालिक टेकड्यांवर पडला. त्यापैकी आदिबद्री हे वैदिक सरस्वतीचे उगमस्थान आहे. हे स्थान हरियाना राज्यातील अम्बाला जिल्ह्यातील सिरमोर टेकडीवर असून ती कुरुक्षेत्राजवळून वाहत जाऊन सुरतगडकडे वळली व त्यानंतर ती सिंध प्रदेशात शिरून दक्षिणेला सिंधूला समांतर वाहून कच्छच्या रणात उतरली. तिच्या गुप्त होण्याच्या काळाबद्दल विद्वानांत एकमत नाही.'

ही विद्वानांनी शोधून नक्की केलेली वैदिक सरस्वती घग्गरच आहे, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

विद्वान पद्मश्री, डॉक्टरेट पंडित, पुरातत्ववेत्ते, प्राध्यापक, इत्यादी विद्वत् सूर्यांनी भगीरथ प्रयत्नाने केलेले हे संशोधन श्रद्धावत, आत्यंतिक देशप्रेमी, सरकार इत्यादी कदाचित मान्य करतीलही. परंतु साक्षेपी विचारवंत, ऋग्वेदाचे सत्यशोधक अभ्यासू कदापिही मान्य करणार नाहीत. कारण या संशोधनाचा पायाच गृहीत तत्त्वावर आधारलेला आहे. कळसाकडून पायाकडे मनोरा बांधत जाण्यासारखे हे संशोधन आहे.

वैदिक सरस्वतीचा शोध घेताना वैदिक आर्यांची कर्मभूमी, पितृभूमी कोणती ते निश्चित करणे जरूर आहे, त्यासाठी ऋग्वेद हा ग्रंथच मूलभूत आधार असून त्या आधारे आर्य संस्कृतीची जन्मभूमी त्यातील उल्लेखित स्थळनामे, नदीनामे, पर्वतनामे, देशनामे, व्यक्तिनामे, इत्यादी संदर्भ पाहून ते ज्ञात जगात कोठे आढळतात ते शोधून आर्यसंस्कृतीचे मूळस्थान, विकासस्थान, पितृपूर्वजांचे कर्तृत्वस्थान निश्चित करणे जरूर आहे.



ते अगोदर अनेक विद्वानांनी पुष्कळशा प्रमाणात करून ठेवलेले आहे, व असा निष्कर्ष काढला आहे की, वैदिक आर्य मूलत: भारतरहिवासी नसून त्यांचे कार्यक्षेत्र मध्य आशिया, इराण, बल्ख इत्यादी भागातच होते. हा निष्कर्ष ऋग्वेदातील संदर्भाधारेच काढला गेलेला आहे. म्हणून साक्षेपी विचारवंत संशोधकांनी आर्य भारताबाहेरून इराण, बॅबिलोन कश्यप सागर, बल्ख भागातूनच आले हे मान्य केलेले आहे व कितीही प्रचार व दुराग्रह धरला तरी त्याची सत्यता नष्ट होणार नाही.

आमचे म्हणणे असे आहे की, ऋग्वेदात वर्णन केलेल्या सर्व घटना मध्य आशियात घडलेल्या आहेत. मानवसंस्कृतीचे व आर्यसंस्कृतीचे प्रवर्तक सप्तर्षी हे मध्य आशिया व इराण भागात होऊन गेले. त्यांनी केलेले यज्ञ अर्थातच मध्य आशियातल्याच सरस्वतीतीरावर केले. ऋग्वेदात वर्णन केलेली पवित्र सरस्वती नदी त्याच भागात आहे. इंद्राने केलेले सारे पराक्रम मध्य-आशियात केलेले आहेत. इंद्राचे सर्व शत्रू मध्य-आशियातलेच होते. हे ऋग्वेदाच्या आधारे सिद्ध करण्यास भरपूर पुरावे ऋग्वेदातच उपलब्ध आहेत. एवढेच नव्हे तर त्यांचे वस्तुनिष्ठ भौगोलिक पुरावे इराण, बॅबिलोन कश्यपसागर प्रदेशातही

उपलब्ध आहेत व त्या आधारेच वैदिक सरस्वती इराणमध्ये आजही तेवढ्याच दिमाखाने वाहत आहे, हे आम्ही सिद्ध करीत आहोत

### मनूचे आद्यस्थान कोणते ?

वैदिक वाङ्मयात, आद्यमानव मनूचे पहिले अपत्य 'इला' नावाची कन्या होती, तिचा विवाह महर्षी अत्रीचा नातू व चंद्रपुत्र बुधाबरोबर झालेला होता अशी माहिती आहे. तिच्या पोटी आद्य चंद्रवंश–प्रवर्तक पुरूरवा राजा जन्माला आला. त्याचा व ऊर्वशीचा संवाद ऋग्वेदात आहे पुरुरवा माता 'इला' हिचा उल्लेख ऋग्वेदातील दशम मंडळा-तील ८६ व्या वृषाकपि सूक्तात 'पर्शुमानवी' असा केलेला आहे. ( ऋ. १०–८६–२३ )– वृषाकपि म्हणतो 'अनेक पुत्र प्रसवा कल्याणप्रद 'पर्शुमानवी 'प्रमाणे मला अनेक पुत्र होवोत,' ह्यामध्ये 'पर्शुमानवी' ह्याचा अर्थ असा – मानवी–मनुपुत्री व पर्शु–म्हणजे पर्शियातला. एकूण अर्थ पर्शियन मनुपुत्रीप्रमाणे. यामध्ये तिला आद-राने कल्याणकारी म्हटले असून अनेक पुत्रप्रसवा असेही म्हटले आहे. तेव्हा ही पर्शुमानवी इलाच आहे ह्यात शंका नाही. ती मनूची आद्य कन्या होती. ती पर्शियन होती म्हणजे मनूही पर्शियातलाच होता हे सिद्ध करणारा हा निर्णायक पुरावा ऋग्वेदानेच दिलेला आहे. आद्यमानव वंश प्रवर्तक मनू हा इराणमधील पर्शिया भागात-लाच होता. त्याची पुत्री इला ही पर्शियनच होती व तिच्या नावाचा एक प्रांतही दक्षिण इराणमध्ये आहे. त्याला प्राचीन काळापासून इलाम हेच नाव आहे. त्या इलामचा राजा तिचा पुत्र पुरुरवा हा वैदिक राजा होता, व तो चंद्रवंशीय म्हणजे अत्री कुलीन होता ह्याचा नातू 'नहुष' हा सम्राट होऊन गेला तसेच त्याला सप्तर्षींनी इंद्रपदावर बसवले होते. ह्या नहुषाचे पुरातत्वीय स्मारक इराणमध्ये देवामेंद्र पर्वतावर आहे, त्या पर्वताचे नावच देवामेंद्र असे आजही आहे, त्याच पर्वतावर आद्य अत्री ऋषीचे आश्रमस्थान होते असे आमच्या ब्राह्मपुराणात लिहिले आहे. तेथे अत्रीतीर्थ होते असेही म्हटले आहे. (ब्रह्मपु. अध्याय ७०)

नहुषपुत्र ययाती ऋग्वेदात प्राचीन राजा म्हणून उल्लेखित आहे त्याचा एका ठिकाणी 'नाहुष' शब्दानेही उल्लेख केलेला आहे. ययाती, देवयानी व शर्मिष्ठा या व्यक्ती वैदिक आहेत. ययातीचे पुत्र पाच होते. अनु, द्रह्यु, तुर्वसु, यदु व पूरू यापैकी ययातीचे इलामचे परंपरागत राज्य पूरूला मिळाले. बाकीच्या पुत्रांनी स्वतंत्र राज्ये स्थापन केली. ययातीच्या या पाच पुत्रांना पंचजन म्हणून वैदिक वाङ्मयात संबोधिले जाते. हे सर्व पंचजन, सरस्वती सूक्तासह, अनेक ठिकाणी नावानिशी ऋग्वेदात उल्लेखित आहेत.

त्यापैकी अनुने आपले राज्य कश्यप सागराच्या पूर्वेला स्थापन केले. त्याचे अनुनगर आजही अस्तित्वात आहे ह्याच्या वंशजाचे ऋग्वेदात आनव असे उल्लेख आहेत. द्रह्यूंनी थोडे पूर्वेला व दक्षिणेला राज्य स्थापन केले. ह्या द्रह्यूची कीर्ती अत्यंत शूर लढवय्ये म्हणून आर्य जनात होती. काही सूक्तात ह्या द्रह्यूचे सामर्थ्य व धन तू आम्हास मिळवून दे म्हणून इंद्राची प्रार्थना केली आहे. तुर्वसूंनी द्रह्यूच्याच जवळ आपले राज्य स्थापन केले.

ययातिपुत्रांनी उत्तर इराण ज्याला पार्थिया म्हणतात तो व्यापला. दक्षिणेला इलाममध्ये पुरु राजा होता. त्याचा मुलगा रूशम नावाचा होता. त्याने इलामच्या उत्तरेला नवीन राज्य स्थापले व त्याचे नावच रुशमदेश असे पडले. हे रुशम राज्य फार समृद्ध असल्याचे दिसते. कारण त्या देशाच्या सात राजाच्या दान–स्तुतीचे उल्लेख ऋग्वेदात आहेत, तसेच त्यांनी दिलेली दानेही भरघोस आहेत. बभ्री आत्रेय ऋषींना दान देणारा ऋणंचय राजा रुशमचा होता. तसेच आसगप्लायोगी हाही राजा प्रसिद्ध आहे, पेदू, पेरू पेरूक कौर्म हे रुशमचे राजे होते.

पंचजन म्हणजे पाच नद्यांच्या प्रदेशातले असा अर्थ मंत्रकारांना मुळीच अभिप्रेत नाही. ते पंजाबी नव्हेत. त्यांना एवढे महत्त्व ऋग्वे-दात का आहे त्याचे कारण मातेकडून ते वैवस्वत् मनुवंशीय व पित्या-कडून ब्रह्मापुत्र अत्री वंशीय म्हणजे दोन्हीकडून देव वंशीय होते. अत्रींना त्यांच्यामुळेच पांचजन्य संज्ञा वैदिक वाङ्मयात मिळालेली आहे.

इतर अत्रीपुत्रांनीही आपली राज्ये इराणमध्ये स्थापन केली. रुशमच्या बाजूला रुम, त्याच्या बाजूला शाव अत्रीचे राज्य त्याचे बाजूला कृप म्हणजे करप ह्याचे राज्य ही सर्व अत्री वंशीयाची राज्ये निर्माण झाली होती. ह्याचे उल्लेख ऋग्वेदात आहेत. म्हणजे थोड-क्यात असे म्हणता येईल की तैग्रीस नदीपासून पूर्वेला बल्ख मवेधार-शक (सेइस्तान) पर्यंत आर्य संस्कृतीचे साम्राज्य पसरवण्यात अत्रींचा वाटा मोठा होता, सर्व इराणच त्यांनी आर्यमय करून टाकला होता.

### कृषि-संस्कृतीचा उगम

वैवस्वत मनू पुत्रांची राज्ये बॅबिलोन प्रदेशात होती. अक्कड सुमेर बॅबिलोन इत्यादी भागात त्यांची राज्ये होती. निमी विदेहाची निमरूड राजधानी उत्खनित झालेली आहे.

त्याचबरोबर वैवस्वत् यम हा मनूचा भाऊ होता. ह्याचे राज्य उत्तर इराणच्या पूर्व भागात व काही इराणच्या मध्य भागात होते. यमाचा पुत्र तृत आप्त्य, ह्याला इंद्राने मदत केल्याचा उल्लेख ऋग्वे-दात आलेला आहे. ह्या तृताचे पुत्र भर्म्यश्व, सृंजय आणि भरत. यांपैकी भर्म्यश्व राजा होता. त्याचा मुलगा मुद्गल ह्याचे सूक्त ऋग्वेदात आहे. भरत जनसमूह सरस्वती नदीकाठी होता असे वैदिक वाङ्मयात म्हटले आहे. भरतांना यमवंशीय म्हणून ओळखले गेलेले आहे. पारशांच्या इतिहासात त्यांना कवि वंशीय म्हणून कैकोबाद वंशीय समजले जाते म्हणजे कैनानिअन वंश ऋग्वेदात एका पृथुवेन राजाचा उल्लेख आहे, परंतु अथर्ववेदात ह्या पृथुवेन राजाची हकी-गत एका सूक्तात आहे. त्यात म्हटले आहे की, पृथुपिता वेन अत्यंत जुलुमी व क्रूर निघाल्यामुळे ऋषी संघाने त्याला पदच्युत केले व त्याचा पुत्र पृथू ह्यास राज्याभिषेक केला. लोकनियुक्त व अभिषेक केलेला जगाच्या इतिहासातील आद्य राजा म्हणून त्याला समजले जाते. यानेच प्रथम कृषी संस्कृतीचा पुरस्कार करून जनजीवन. स्थिर, समाधानी व समृद्ध केले असे वर्णन केलेले आहे हा ज्या भागाचा राजा होता त्याला त्याच्या प्रजेने त्याचेच नाव देऊन त्याची व आर्य संस्कृतीची कीर्ती चिरंतन स्मरणीय व अमर केली आहे, हा पृथु देश म्हणजेच ऋग्वेदातला पार्थव देश व आजही त्याचे नाव पार्थिया असेच नकाशात दाखवले जाते. हा पृथु राजा अत्री महर्षींचा कन्या-पुत्र होता म्हणजे नातू होता. त्या कन्येचे नाव अंग ही एका अंगि-

रस कुलीनाला दिलेली होती, परंतु तिचा पतीकडून पदोपदी अपमान तिरस्कार, दुष्ट वर्तणूक होत असल्यामुळे ती तप्त झाली होती. म्हणून तिला परूष्णी असे नाव पडले होते. ही परूष्णी पृथुची माता. त्याच नावाची परूष्णी नदी ऋग्वेदात उल्लेखिलेली आहे. अर्थात ही नदी पार्थियातच असण्याची शक्यता जास्त आहे हे कोणीही मान्य करील, व त्यावरून हेही सिद्ध होते की, वैदिक परूष्णी नदी भारतात कधीच नव्हती व नाही. इराणच्या दक्षिण भागाला सखल प्रदेश असून इराणच्या खाडी भागात सागर सान्निध्यात आहे. त्याला पारस म्हणजे सखल प्रदेश म्हणून पर्शिया म्हणत असत. पर्शु हे त्याचे लघुरूप आहे, संपूर्ण देशाला हल्ली इराण म्हणतात. परंतु ते नावही इलाम ह्या प्राचीन नावाचे अपभ्रष्ट रूप आहे. ह्या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट झाले आहे की– पितृपूर्वज वैदिक आर्यांची पितृभूमी, मायभूमी, धर्मभूमी आणि कर्मभूमी इराण हीच आहे, भारत नव्हे.

वैदिक संस्कृतीची आद्य प्रभात किरणे मध्य आशियात इराणमध्येच पडली. **म्हणून मध्य आशियांतील तैग्रिस हीच नदी वैदिक आर्यांची एकमेव श्रेष्ठ परमपवित्र नदी देवता सरस्वती होती असे आमचे म्हणणे आहे.**

ह्या नदीची अधिकृत माहिती पुढीलप्रमाणे आहे. इराक व इराण असे दोन भाग पाडणारी ही तैग्रिस नदी पार्थियांतील 'लेक जेनलिअल' ह्या पर्वतीय ठिकाणापासून दक्षिणेकडे वाहते. हे तिचे उगमस्थान पाच हजार फूट उंचीवर आहे. ती दक्षिणेकडे इराणी आखाताला म्हणजे सागराला जाऊन मिळते. हिची उगमापासून समुद्रापर्यंतची लांबी १२३० मैल आहे.

ह्या नदीला प्राचीन काळी सुमेरी लोक इंडिग्ना ( Indigna ) असे म्हणत असत. तर बॅबिलोनिअन, असिरइन व गतिउम् (गौतम) लोक इदि–इक–लाट ( I–di–ik–lat ) असे म्हणत असत, तर तिच्या पूर्व किनाऱ्यावरील सुशियानि–इलामचे लोक तिला तिग्रा ह्या नावाने संबोधीत असत.

या नदीच्या पश्चिम भागाला प्राचीन काळी बॅबिलोन प्रदेश म्हणत असत. सध्या त्याला इराक म्हणतात. हा प्रदेश युफ्रेटिस व तैग्रिस ह्यांच्या दुआबातला प्रदेश आहे. युफ्रेटिस नदी आर्मेनिअन पठारावर १८००० फूट उंचीवरून निघते व बॅबिलोनच्या पश्चिम भागाकडून येऊन इराणी आखातालाच मिळते. ह्या दोन नद्यांच्या मधल्या बॅबिलोन प्रदेशाला पुढील काळात मेसापोटेमिया असे म्हणत असत. तैग्रिस–सरस्वतीच्या पूर्व किनाऱ्यावरील भागाला इलाम हे नाव होते. हेच ते चंद्रवंशप्रवर्तक पुरुरवा राजाचे राज्य. इलाम प्रांताच्या उत्तरेला व पार्थियाच्या दक्षिणेला कुरू पर्वतांची रांग आहे. त्याला त्यांच्या भाषेत कुरूकोह म्हणत असत; म्हणून सरस्वती–तिग्रा नदीच्या पूर्व भागाला कुरूक्षेत्र असे वैदिक आर्यांनी संबोधिले आहे; इलाम राज्य ह्याच प्रदेशात येते. तैग्रिस व युफ्रेटिस ह्या नद्या आखाताजवळ एकमेकींस मिळून संगमतीर्थ निर्माण झालेले आहे. त्याला सुशीयानी इराणी भाषेत 'कुरनाह' (Kurnah) असेच नाव होते. हल्ली त्याला शट्–अल्–अरब ( Shat–al–arab) असे म्हणतात, हे 'कुरनाह' संगमतीर्थ आखाती समुद्रापासून ८० मैल आत आहे.

ऋग्वेदात सरस्वती नदी किनाऱ्यावरील 'कुरुक्षेत्र' ह्या यज्ञ-



**लेखक श्री. गोडबोले यांचे मुख्य कार्यक्षेत्र शिक्षण हे आहे. तरीपण इतिहास संशोधन क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीने कै.दत्तो वामन पोतदार यांच्यासारख्यांचेही लक्ष वेधून घेतले होते.**

भूमीला पवित्र महाक्षेत्र मानून वैदिक वाङ्मयाने त्याच्या चतुःसीमा नोंदवल्या आहेत. त्यात म्हटले आहे की, कुरुक्षेत्राच्या उत्तरेला विदेह हे मनुपुत्र निमीचे राज्य–दक्षिणेला खांडवबन व पश्चिमेला 'परिणह' व पूर्वेला इतर प्रदेश राज्ये. ह्यांचा शोध घेता इलामच्या उत्तरेला मनुपुत्र निमीचे विदेह देशाचे स्मारक राजधानी स्थळ 'निमरूड' ह्या निमीच्याच नावाने उपलब्ध आहे. दक्षिणेला म्हणजे किनारपट्टीच्या प्रदेशात सखल भागात प्राचीन काळी खांडववन असणे शक्य आहे. आणि पश्चिमेला म्हटलेले 'परिणह' हे स्थळ युफ्रेटिस-तैग्रिस नदीचे संगमतीर्थ स्थान 'कुरनाह' या नावाचे अपभ्रष्ट रूप आहे. किंवा संस्कृतीकरणाने आलेले रूप आहे. या सर्व उल्लेखित सीमा स्पष्ट असून 'इलाम' ह्या पुरुरव्याच्या राज्याला पूर्णपणे लागू पडतात. इलाम राज्य कुरूकोह पर्वतरांगांच्या दक्षिणेलाच आहे. म्हणजे इलाम, सुशियाना प्रदेश हाच वैदिक वाङ्मयात पवित्र यज्ञभूमी मानलेला कुरूक्षेत्र प्रदेश होता हे म्हणणे अस्थानी होणार नाही.

आद्य मनूने पहिला आद्य यज्ञीय अग्नी सरस्वती नदीकाठी प्रज्वलित केला असे म्हटले जाते, व ऋग्वेदांतही त्याचे उल्लेख आलेले आहेत. त्या आद्य यज्ञीय अग्नि स्थानाला ऋग्वेदात इलास्पद असे म्हटलेले आहे. यामध्ये इला म्हणजे अग्नी म्हणून अग्नीचे स्थान त्याला आद्ययजन स्थळी असेही म्हणतात. ऋग्वेदात १–१२८–१ ह्या सूक्तात पृथ्वीवरील आद्य अग्नी 'इलस्पद' ह्या ठिकाणी झाल्याचा निर्देश आहे. सायणाचार्यांच्या मते इलस्पद म्हणजे उत्तरवेदी–कुरुक्षेत्र होय. थोडक्यात मनू ह्या आद्य मानवाने प्रज्वलित केलेला अग्नी कुरुक्षेत्रातच निर्माण केला. ते स्थान संगमतीर्थ 'कुरनाह' हेच असावे व शेजारीच त्याने इलाम राज्याची स्थापना करून आद्य कन्या इला हिला दिले, म्हणून त्याचे नाव इलाम. इलाम हे तैग्रिस सरस्वती नदी काठीच आहे, म्हणून इलामचे पूर्ण क्षेत्र यज्ञ महाक्षेत्र कुरुक्षेत्र समजले जाऊ लागले असावे.

कुरूक्षेत्र इलाम ज्या नदीकाठी आहे तिचे सुशियानी नाव तिग्रा असले तरी वैदिकांनी तिला सरस्वती संबोधिले आहे. त्या नदीवर प्राचीन जमदग्नी, वशिष्ठ मित्रावरुण, भरद्वाज बार्हस्पत्य इत्यादी सप्तर्षीपैकी ऋषींनी स्तोत्रे लिहून स्तुती केली आहे. त्या स्तुतीची वर्णने ह्या नदीला पूर्णपणे लागू पडतात हेच तपासून पाहिले म्हणजे शोध पूर्ण होईल.

त्या सर्व सूक्तांतील सरस्वती नदी देवतेची विशेषणे पुढीलप्रमाणे आहेत.

मंत्रकार महर्षी वशिष्ठ मैत्रावरुणी (ऋ. ७–९५–२ व ७–९६–१।२।३) = (१) पर्वतोद्‌भव (२) समुद्र गामी (३) विपुल संपत्ती-दाती (४) आर्त नाहुष राजाला (ययाती) दुग्ध व घृत प्रदान करणारी (५) सर्व नद्यांमध्ये श्रेष्ठ (६) द्यावा–पृथिवी ज्ञानदायी (७) शुभ्रवर्णी (८) पुरातनजमदग्नी स्तुत.

मंत्रकार महर्षी भारद्वाज बार्हस्पत्य (ऋ. ६–६१–) संपूर्ण सूक्त (१) कमलोत्पादक गजराजाप्रमाणे पर्वताचे कडे उखडणारी (२) बलवत्तर लाटा युक्त (३) जल प्रवाहक (४) अन्नसमृद्ध (५) अन्न दात्री (६) तेजस्वी जलधारानी खळाळत जाणारी (७) अजिक्य सामर्थ्य युक्त (८) उदक–सपन्न (९) सप्तनद्याची भगिनी अशी ऋषी स्तुत (१०) प्रियतम (११) पंचजनाचा उत्कर्ष करणारी (१२) तेजस्वी रथ सदृश वेगवान (१३) नदीश्रेष्ठ (१४) जल-सपन्न (१५) सपत्तीदात्री (१६) प्रमाथी उदकयुक्त (१७) शेती पिकवून देणारी (१८) वाहतुकीस कठीण (१९) पृथ्वीसाम्राज्य विजेती– ही सर्व वर्णने तैग्रिस–सरस्वतीला पूर्णपणे लागू आहेत. ती पर्वतोद्‌भव आहे सागरगामी आहे, १२३० मैल लाबीची आहे. पर्व-ताचे कडे उखडणारी बलवत्तर लाटायुक्त आहे. ऋग्वेदात अश्विनी कुमार कृपापात्र भुज्यूतिग्राची कथा अनेक वेळा आलेली आहे. ह्या भुज्यूला त्याचा पिता तिग्रा ह्याने रागावून सागरात ढकलले होते. (म्हणजे नदीत ढकलले होते) तेव्हा हा चार दिवस गटागळ्या खात असता अश्विनीकुमारांनी १०० वल्ह्यांनी युक्त नौकेच्या योजनेने याला वाचवले. यावरूनच या नदीच्या भव्यतेची कल्पना येईल. ही घटना सरस्वती नदीमध्येच घडलेली आहे. याच्या पित्याचे नाव तिग्रा. हा राजा होता. नदीचे नावही सुशियानी भाषेत तिग्राच आहे तसेच त्याची राजधानी तिग्रा. किल्लाही आजसुद्धा अस्तित्वात आहे हा वेदातला राजा आहे.

ह्यावरून तिग्रा हीच वैदिक सरस्वती ह्यात सशय राहत नाही. या नदीला मत्रकारानी अन्नपूर्णा म्हटलेले आहे. हे तर पूर्ण सत्यच आहे. कारण याच नदीच्या पाण्यावर ययाती राजाला अन्न घृत मिळाले म्हणजेच समृद्ध झाला. हिला ह्याचमुळे मत्रकारानी सपत्ति-दात्री म्हटलेले आहे. हिला पंचजनाचा उत्कर्ष करणारी म्हटलेले आहे. हे तर पूर्णपणे सत्य आहे. कारण इलामच्या ययाती राजाच्या पुत्राना पंचजन म्हणतात. याच अनु, द्रह्यु तुर्वसु, यदु व पुरु ह्या पाच ययाती पुत्रानी आपली स्वतत्र राज्ये इराणभर स्थापन करून साम्राज्य निर्माण केले. या नदीदेवतेच्या कृपेनेच ते समर्थ झाले असे म्हटले आहे. त्यातले इलाम रूशम ही राज्ये सरस्वती–तिग्रा तीरावरच होती हा आता इतिहास ठरला आहे, या नदीचे चद्रवशीयाचे अत्री-कुलाचे साम्राज्य इराणभर स्थापण्यास मदत झालेली आहे. ही वस्तु-स्थिती आहे.

या नदीला भरद्वाज बार्हस्पत्याने पृथ्वीसाम्राज्य विजेती म्हटलेले आहे. हे विशेषण देवीला उद्देशून वाटले तरी प्रत्यक्षात ह्याच नदी किनाऱ्यावरील राजांनी तत्कालीन ज्ञात विश्वाचे साम्राज्य जिंकलेले होते. या नदीवरील ययाती पिता नहुष हा तर सम्राटांचा सम्राट झाला होताच परंतु सप्तर्षीनी त्याला देवेंद्रपद दिले होते, अत्रीचंद्र वंशीय हा राजा देवेंद्र झाला ही सरस्वती नदी देवतेची कृपा समजून तशी स्तुती योग्यच आहे. ह्या देवेंद्र नहुषाचे चिरंजीव स्मारक आजही इराणमध्ये पार्थिया भागात त्याच्याच नावाने १८००० फूट उंचीचे हिमाच्छादित शिखर देवामेंद्र ह्याच नावाने ओळखले जाते. ब्रह्माड-पुराणात म्हटले आहे की येथेच प्राचीन आद्य ऋषी अत्रीचा आश्रम होता व अत्रीतीर्थही आहे.

दुसरा राजा विमिद हा मत्रकारही आहे व राजर्षीही आहे. नतर इंद्रही झाला होता. त्याला विमिदेंद्र असे म्हटले आहे.


ह्या विमिदेंद्राचा उल्लेख अश्विनीकुमार व इंद्र ह्यांचा कृपापात्र म्हणून आलेला आहे. ह्याचे बावयानाशी (बॅबिलोन) युद्ध चालले असता इद्राने ह्याला साहाय्य केले आहे, असे ऋग्वेदात (१–५१–३) म्हटलेले आहे. बॅबिलोनशी लढणारा विमिदेंद्र सरस्वती तीरावरचा होता. म्हणजे तो तिग्रा–सरस्वतीवरचा राजा होता व इद्रपद मिळव-लेला दुसरा राजा होता.

तिग्रा सरस्वतीला विश्वसाम्राज्य विजेती हे विशेषण तिच्या तीरावरच्या राजानी आपल्या पराक्रमाने सत्यार्थाने प्राप्त करून दिलेले आहे.

अशा तऱ्हेने ऋग्वेदातील मत्रकार महर्षीनी सरस्वती सूक्तातून सरस्वती नदीदेवतेला लावलेली सर्व विशेषणे इराणमधील तैग्रिस ह्याच नदीची आहेत हे सिद्ध होत आहे म्हणून इराक व इराण ह्याना दुभागणारी तैग्रिस नदी हीच ऋग्वेदात वैदिक मत्रकार महर्षी वसिष्ठ मित्रावरूण व महर्षी भरद्वाज बार्हस्पत्य यानी स्तवन केलेली वैदिक आर्य पितृपूर्वजाची परमपवित्र सरस्वती नदीदेवता आहे ह्यात शका राहू नये.

मत्रकार देवश्रवस व देववात ऋ ३–२३–४ मध्ये यानी म्हटले आहे की, दृषद्‌वति आपया व सरस्वती काठच्या भक्ताना समृद्धी प्रदान करण्यासाठी त्या ऋषीनी अग्नी प्रज्वलित केला. ह्यातील आपया ही नदी कुरुक्षेत्रातलीच आहे व तिचे सध्याचे नाव दियाला आहे. गोमती नदी पण कुरुक्षेत्रातलीच आहे. दृषद्वती नदीचे सध्याचे नाव 'झोग' असून ती खडकाळ आहे व सरस्वतीला समातर वाहते व सरस्वतीलाच मिळते. पुन्हा अलग होते. काही अंतर पुन्हा समातर वाहते व पुन्हा सरस्वतीलाच मिळते. म्हणून तिचा उल्लेख 'झोग' न १ व झोग न. २ असा नकाशात केलेला असतो. आपया व गोमती कुरुक्षेत्रातल्याच नद्या आहेत हे महाभारताने (३–८३–६८) मध्ये सागितलेले आहे.

भागवत पुराणाने स्पष्ट शब्दात आमच्या सशोधनास पुष्टी दिलेली आहे. त्यात शाल्मली द्वीपातील सप्त महानद्या दिल्या आहेत. (१) अनुमती (२) सिनिवाली (३) सरस्वती (४) कुहू (५) रजनी (६) नदा (७) राका. ही त्याची नावे आहेत. तसेच शाल्मली द्वीपातील लोकाचा मुख्य देव चद्र. ते चद्राची उपासना करतात असे म्हटले आहे हे शाल्मली द्वीप कोणते ? शाल्मली ह्याचा अर्थ कापूस असाही होतो व दुसरा अर्थ गरुड असा आहे. ज्या देशात गरुडाला देव मानतात तो देश, म्हणजे बॅबिलोन हा होय, या देशात प्राचीन काळी गरुडाला देव मानीत असत. तसेच येथील लोकांचा मुख्य उपा-सना देव चंद्र होता व तो पुरुष देव होता व सूर्य हा स्त्री देवता–सवितृ होता, हे आता उत्खननाने सिद्ध झालेले आहे. तेव्हा भागव-



६ वर्षांची
राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटे
६ वी व ७ वी मालिका
● प्रतिवर्षी रु. ४०,००० पर्यंतची गुंतवणूक कलम ८०-सी अन्वये आयकर सवलतीस पात्र.
● कलम ८०-एल अन्वये दरसाल रु. ७,००० पर्यंत व्याजावर आयकर भरावा लागत नाही.
● ६ व्या मालिकेतील सर्टिफिकिटांवर प्रतिवर्षी मिळणारे व्याज हे कलम ८०-एल आणि कलम ८०-सी या दोन्ही कलमानुसार आयकर सवलतीस पात्र.
● ६व्या मालिकेत दर सहा महिन्यानी ११ % दराने चक्रवाढ पद्धतीने व्याजाची आकारणी करण्यात येते तर ७ व्या मालिकेत हे व्याज प्रत्यक्षात गुंतवणूकदाराला देण्यात येते.
● रु. ५ लक्ष मर्यादेपर्यंत संपत्तीकरात सूट.
● ६व्या मालिकेत रु. १०,००० गुंतविल्यास मुदतीअंती त्याचे १९,०१० रुपये मिळतात.
● ७व्या मालिकेत रु. १०,००० गुंतविल्यास दर सहा महिन्यानी रुपये ५५० इतके व्याज मिळते व मुदतीअंती मूळ रक्कम परत मिळते.
SMALL SAVINGS
SERVE THE STATE & YOUR FAMILY
अल्पबचत संचालनालय
महाराष्ट्र शासन
DGIPR

ताचे म्हणणे सरस्वती नदी बॅबिलोनमध्ये होती हे ही सत्यार्थाने खरेच आहे कारण तैग्रिस सरस्वतीच्या पश्चिम किनाऱ्याला बॅबिलोन प्रदेश आहे व पूर्वेकडे इलाम इराण देश आहे यावरून भागवत पुराणाने सरस्वती नदी शाल्मली द्वीपात आहे हे आमचे संशोधन अगोदरच जाहीर करून ठेवले होते; परंतु बहुधा त्यावर कोणीही विश्वासच ठेवला नसावा काही असो. वैदिक आर्यांची परमपवित्र सरस्वती नदी देवता म्हणजे बॅबिलोन (इराक) व इराण याना दुभागणारी सध्या तैग्रिस नावाने ओळखली जाणारी महानदीच आहे हे मान्य व्हावे.

## सिंधू आणि सप्तसिंधू

सरस्वतीला सप्तस्वसा म्हटलेले आहे याचा अर्थ सात उपनद्या असा कुठेही उल्लेख नाही. तर सप्तसिंधू म्हणजे सात मोठया नद्या एवढाच आहे. ऋग्वेदात भारतातील एकाही नदीचा उल्लेख नाही असे आमचे म्हणणे आहे गंगा, यमुना ही दोन मोठया नद्याची नावे ही त्याकाठी येऊन वसलेल्या लोकाच्यावरून पडलेली आहेत. गुगु नदीकाठच्या कुरूनी राज्य स्थापन केले व जान्हवीची गंगा केली. यमाचे उपासक व वंशज भरतानी या देशात कालिंदी नदीकाठी वसाहत केली तिला यमुना करून टाकले. ऋग्वेदातली यमुना मूळ वैवस्वत् यमाच्या प्रदेशात म्हणजे इराणमध्येच सापडेल. परुष्णी नदी पर्शियात रसा नदीजवळच आहे हे अगोदर येऊन गेलेलेच आहे. विपाशा नदी इराणमध्ये बेहिस्तूनजवळ आहे. आनिकिया, कुभा इत्यादी नद्या अफगाणिस्तानमध्ये आहेत. कुर्रम नदी तर इलाममध्ये दक्षिण भागात असून ती मोठ्यात मोठी नदी आहे व ती बेहरीनच्या सागराला मिळते.

रसा नदी मोठी असून ती पार्थियातून जाऊन कश्यप सागराला मिळते. तिला आजही आरस म्हणतात.

भारतीय सिंधू नदीचाही उल्लेख ऋग्वेदात नाही. ऋग्वेदात सिंधूनदी सूक्त आहे; परंतु ऋग्वेदात मंत्रकारांनी 'सिंधू' ह्या शब्दाचा उपयोग सागराला मिळणारी नदी ह्या सामान्यार्थाने केलेला आहे. सप्तसिंधू म्हणजे सात नद्या एवढाच होतो तसेच सिंधूनदी सूक्त नेमक्या कोणत्या सागरगामी नदीला उद्देशून केलेले आहे हे स्पष्ट नाही.

१०–७५–५/६ मंत्रकार सिंधूक्षित प्रियमेध देवता– नदी ह्या सूक्तात मंत्रकाराने म्हटले आहे– की, 'तुष्टामा आणि गोमती नदीस मिळणाऱ्या हे सिंधू नदी (देवते) तू सुसर्तु, रसा, श्वेती, कुभा आणि मेहत्नु नद्यासमवेत रथाधिष्ठित होतेस

यातील सिंधूनदीस तुष्टामा व गोमती नद्याची उपनदी म्हणून म्हटलेले आहे. हे वर्णन भारतीय सिंधू नदीला कदापिही लागू होणार नाही कारण भारतीय सिंधूनदी एवढी प्रचंड आहे की दुसऱ्या कोणाची उपनदी होऊच शकत नाही सबब ह्या सूक्तातील सिंधू भारतीय सिंधू नाही.

ह्याच सूक्तात ह्या मंत्रकाराने गंगा, यमुना, सरस्वती, शुतद्री, परुष्णी, असिक्नी, मरुत् वृधा, वितस्ता, सुषोमा आर्जिकिया, सुसर्तु, रसा, श्वेती, कुंभा आणि मेहत्नू व सिंधू, तुष्टामा व गोमती इत्यादी अठरा नद्याचा उल्लेख नदी देवता म्हणून केला असून सुरुवातीच्याच मंत्रात म्हटले आहे द्यावा पृथिवी व्यापी अशा सिंधू प्रमुख नदी जलानो विवस्वत मनूच्या निवासस्थानी मी तुमचे स्तवन करीत आहे. याचा अर्थ मंत्रकाराने या सर्व देवताचे म्हणजे इराणपासून अफगाणिस्तानपर्यंतच्या सर्व नदी जलाचे विवस्वत् मनूच्या घरी म्हणजे सरस्वती तैग्रिस नदीकाठी बसून एकत्रित स्तवन केले आहे. त्या रथाधिष्ठित होत आहेत असे म्हटले आहे.

म्हणजे ही देवताची नामावली आहे कोणत्याही विशिष्ट प्रदेशातल्या सप्त सिंधू असा अर्थ होऊ शकत नाही व त्यात भारतीय सिंधू तर निश्चितच नाही. ह्या सूक्ताला सिंधूनदी सूक्त मानले जाते, परंतु देवता म्हणून फक्त 'नदी' एवढेच म्हटलेले आहे. म्हणजे सिंधू नदी सूक्त सबोधणे ही भाष्यकाराची व्यक्तिगत कामगिरी आहे. (२–१५ ५/६) मंत्रकार गृत्समद शौनक देवता इंद्र, ह्या सूक्तात मंत्रकार म्हणतात, 'इंद्राने पूर्ववाहिनी सिंधू नदीला स्वपराक्रमाने पश्चिमवाहिनी बनवले, यावरून ही सिंधू नदीदेखील भारतीय निश्चितच नाही. भारतीय सिंधू नदी कधीही पूर्ववाहिनी असण्याची शक्यता नाही. ती कधीच पूर्ववाहिनी नव्हती व तिचा ओघ कोणत्याही इंद्राने वळविल्याच्या खुणा उपलब्ध नाहीत. भारतीय सिंधूनदी कायम पश्चिमवाहिनीच आहे. म्हणून मंत्रकार गृत्समदानी उल्लेखिलेली सिंधूनदी भारतातील असण्याची शक्यता नाही.

ऋग्वेदातील सिंधूनदीचे असले उल्लेख इराणमधील सिंधयाना नदीचे आहेत व ती इलामच्या पूर्वेस पर्शियात आहे. वरील सर्व विवेचनावरून हे लक्षात येईल की, भारतातील कोणत्याही नदीचे नाव सुद्धा ऋग्वेदात नाही.

मग सरस्वतीनदी घग्गर रूपाने गुप्त झाली ह्यात विशेष काहीच नाही. कारण वैदिक सरस्वती भारतात कधीच नव्हती, परंतु त्या गुप्त झालेल्या वैदिक आर्यांच्या परमपवित्र श्रेष्ठतम सरस्वती नदी देवतेचा शोध आम्ही इराणमध्ये लावला आहे व ती आजही तैग्रिस नावाने मोठ्या दिमाखाने तितक्या जोमाने वाहत आहे व परिसरातील लोकाना तिने धन–समृद्ध केले आहे, हे मान्य व्हावे.

श्री सरस्वत्यै नम ।

☐

आधुनिक पाश्चात्त्य विज्ञान आणि प्राचीन पौर्वात्य तत्त्वज्ञान याच्या आधाराने पर्यावरणाचा मूलगामी व एकात्म विचार करणारे पुस्तक

**निसर्गायण**

**लेखक : दिलीप कुलकर्णी**

**किंमत : ४० रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे**




अलीकडे (डिसेंबर ८७) भारतात अनेक शहरांतून प्रथमच तिबेटी नागरिकांनी चीनविरोधी निदर्शने केली. तिबेटचा प्रश्न मिटलेला आहे, तिबेट ही चीनची अंतर्गत बाब आहे असे चीनचे राज्यकर्ते समजत असले तरी तिबेटी जनता मात्र तसे समजत नाही. अजूनही या जनतेची व तिचे धार्मिक / राजकीय नेतृत्व करणारे दलाई लामा यांची स्वातंत्र्याकांक्षा पूर्णपणे मावळलेली नाही. ही जर भविष्यात केव्हा तरी पूर्ण झाली व तिबेट खरोखरच स्वतंत्र झाला, मुक्त झाला तर भारताच्या दृष्टीने ही एक निश्चितच हितकारक घटना ठरेल. कारण तिबेटवर जोवर चीनचा ताबा आहे तोवर भारत-चीन वादात भारताची बाजू नेहमीच पडती व दुबळी राहणार आहे.

या प्रश्नाचे स्वरूप थोडे विस्तारपूर्वक उलगडून दाखवणारी

# तिबेट पुरवणी

# बोमदिल्याला-दुसऱ्यांदा

आपल्याकडे पळत जायला खूप जागा आहेत, ठिकठिकाणी दोर आहेत; पण ते कापून टाकायला शेलारमामा नाहीत...

● फिरोझ रानडे ●

बोमदिलाला आता मी दुसऱ्यांदा जात होतो. आमच्या खात्यातले काही अधिकारी आणि मी. काही तरी दोन–अडीच महिन्यांनी. काही दिवसांपूर्वी निम–सैनिक अधिकाऱ्यांची तुकडी बोमदिला–तवांगपर्यंत जाऊन आली होती. आता आम्ही मुलकी अधिकारी चाललो होतो.

शिलाँगहून निघाल्यापासून आमच्या बोलण्याचा एकच विषय होता. तो म्हणजे चिनी लोकांनी असं आक्रमण का केलं असेल, हा.

तिबेटच्या सीमेवर गेले कित्येक महिने कुरबुरी चालल्या होत्या. त्याबद्दल निषेधाचे खलिते पण पाठवले गेले होते. चिनी मॅकमोहनच्या सीमा रेषेबाबतच प्रश्न उभा करत होते, त्याचबरोबर हळूहळू काही प्रदेशही काबीज करत होते.

हे सगळं खरं असलं तरी हजारोंच्या संख्येनं चिनी जवळजवळ सर्व ठाण्यांवर हल्ला करतील असं कोणाला वाटलं नव्हतं. आमचा विभाग भारत सरकारनं नेफाकरता नेमलेल्या कमिशनरच्या हाताखाली काम करत होता. नेफा विभागाची सगळ्यांना चांगली माहिती. त्यामुळे असा हल्ला का व्हावा असा प्रश्न सर्वांना पडणं साहजिकच होतं.

हल्ला झाला तोसुद्धा अगदी मोठ्या झंझावाती वादळासारखा. वादळात मोठाले वृक्ष व झाडं मुळासकट उन्मळून पडावीत, तशी बोमदिला व इतर काही ठाणी पडली होती. तेजपूरसुद्धा पडलं आहे अशा अफवा होत्या. मोठ्या वादळासारखा होता तो हल्ला. म्हटलं ना, वादळात मोठी झाडं व घरदारं तर पडतातच पण त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे माणसाचं मनच उन्मळून पडतं. आपण जे बघितलं, बांधलं व वाढवलं ते असं वाऱ्यासरशी गेलं तर कुणाचं मन बावरून जाणार नाही ?

चिन्यांना आपण 'भाई' म्हणून चाललो होतो. त्यांच्या चाऊ–इन–लाय वगैरे पुढाऱ्यांचं मोठ्या प्रेमानं स्वागत केलं होतं. भावाप्रमाणं आपण त्यांच्याबद्दल प्रेम व आदर दाखवला होता. खैबर खिंडीतून आपल्यावर शेकडो हल्ले झाले तरी आतापर्यंत एकही तिबेट सीमेवरून झाला नाही, असं कौतुकानं म्हणत होतो.

ते प्रेम, तो आदर, तो भाई–चारा व कौतुक हल्ल्याच्या एका वावटळीनं उडून गेलं होतं. सगळ्या उत्तर सीमेवर चिनी सैन्य घुसलं होतं व महत्त्वाची ठाणी बळकावून बसलं होतं.

हे सगळं झालं होतं तरी ते का ह्याचं आकलन मात्र कुणालाच झालं नव्हतं. त्यांच्याशी चर्चा चालल्या होत्या. काही तरी देवाण–घेवाण होऊन प्रश्न सुटेल असं सगळ्यांना वाटत होतं आणि त्याचवेळी हल्ला झाला होता.

काही झालं तरी चिनी लोक हल्ला करणार नाहीत असं पंतप्रधान नेहरूच म्हणत होते. फक्त वेडं कुत्रं चावलेला माणूसच चिनी हल्ला करतील असं म्हणेल असं संरक्षणमंत्री सांगत होते. तेव्हा आता ते वेडं कुत्रं चावलं कुणाला ? कधी ? हा प्रश्न विचारला जात होता. चिन्यांनी हल्ला का केला हा आपल्यालाच नाही तर साऱ्या जगाला प्रश्न पडला होता.

इतिहासात असे किती तरी प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत. हाही तसाच अनुत्तरीत राहणार असं वाटतंय.

¤

शिलाँगला माझी बदली कोणत्या मुहूर्तावर झाली कुणास ठाऊक. मी बासष्ट सालच्या सप्टेंबर महिन्यात रूजू झालो व त्याच दिवशी चिन्यांनी तवांग घेतल्याची बातमी आली होती. कुणी अनोळखी माणूस वारल्याच्या बातमीनं आपल्याला फारसं काही वाटत नाही. तवांग आम्हाला अनोळखी माणसासारखंच होतं. तवांगच का शिलाँग, नेफा, बोमदिला, अगदी आसामसुद्धा अनोळखी माणसासारखा होता.

तवांग पडलं तरी आमच्या बांधकामखात्याचं काम व इतर सरकारी कामं नेहमी प्रमाणं चालली होती.

लगेच ऑक्टोबर महिन्यात मी बोमदिलाला, जिथं डेप्युटी कमिशनरची कचेरी व इतर इमारतींचं काम चाललं होतं, ते बघण्याकरता गेलो होतो. बरोबर जयसिंघानी नावाचा माझ्यासारखाच उत्साही इंजिनियर होता. नेहमी सरकारी कामाच्या फिरतीवर जाताना असते तशी आमची मनोवृत्ती होती.

मनोवृत्तीत फरक झाला तो बोमदिलाला पोहोचल्यानंतर. सगळ्या गावात सैनिकच सैनिक होते. मोठ्या उत्साहात होते सगळे. जीपस् व लहान तोफा वाहून नेण्याच्या गाड्या येत होत्या. त्याची व्यवस्था लावली जात होती. बंकर्स खणले जात होते. काही खणून झाले होते, त्यांची व्यवस्था लावली जात होती. ह्या सगळ्या गोष्टी आयुष्यात प्रथमच पाहत होतो. त्यामुळे मन उचंबळत होत, उत्साह वाटत होता.

दिवसा इमारतींचं काम बघून झाल्यावर संध्याकाळी तिथल्या डेप्युटी–कमिशनरकडे

पेय–पानाकरता गेलो. तिथं एक तगडा, सहा फुटी उंच असा पजाबी मेजर पण आला होता. असले जर आपले सैनिक असतील तर चिन्यांवरोबर युद्ध करायला आपल्याला काहीच हरकत नाही अस मनात येऊन गेलं.

गप्पाचा विषय अर्थातच तवांग हा होता वरचसं भारतीय सैन्य युद्धकैदी म्हणून पकडले गेल होत. काही निघून येऊ शकलं होतं. त्याना निघून यायला आमच्या ज्युनिअर इजिनियर्सनी व इतर लोकानी मदत केली होती कारण नेहमी पायी जाण्या–येण्यामुळे त्याना तिथल्या पायवाटा चांगल्या माहीत झाल्या होत्या.

पण सैन्याच वा त्यांच्या अधिकाऱ्याचं तसं नव्हत त्याना ह्या भागाची काही माहिती नव्हती आता हा भेटलेला मेजर सुद्धा त्यातलाच होता. ज्या भागाची सैन्याला काही माहिती नाही तिथे ते लढणार कसे; असा प्रश्न माझ्या मनात आला. आता वाटत असा प्रश्न माझ्यासारख्याच्या मनात येण्याऐवजी उच्च स्थानी असलेल्याच्या मनात आला असता तर ?

खाणं–पिण झाल्यावर आम्ही निघालो. बोमदिलाच्या उत्तरेला काही किलो मीटर्स अतरावर सेलापास इथ भारतीय व चिनी सैनिकांची लढत चालली होती. उत्तरेच्या डोगरावरुन चिनी व दक्षिणेकडल्या डोगरावरून हिंदी एकमेकावर बॉम्बचा वर्षाव करत होते. म्हणजे रोलिंग चालल होत. ते 'बघायला' म्हणून आम्ही जाऊ का ? म्हणून आम्ही डे. कमिशनरला विचारल. आम्ही एक उत्साही तर डेप्युटी दहा उत्साही. 'अगदी जरूर जा' तो उत्साहान म्हणाला. 'पण फार पुढे जाऊ नका. आठ–दहा किलोमीटर्स वरूनही रोलिंग चाललेलं दिसेल.'

आम्ही काय खुळेपणा करणार होतो ह्याची त्यावेळी आम्हाला कल्पना नव्हती. खरंच आम्ही सेलापासला गेलो असतो व काही अनुचित होऊन चिन्याच्या हाती पडलो असतो तर आमची धडगत नव्हती. सैनिकांना पकडले तर त्याना युद्धकैदी म्हणून वागवण्याचे काही नियम असतात. पण आम्हाला काय नियम लावणार ? एक आर्किटेक्ट व एक इंजिनिअर रोलिंग पहायला जातात ह्यावर चिन्याचा विश्वास बसला असता ? त्यानी आमचा छळ केला असता किंवा हेर समजून गोळ्यासुद्धा घातल्या असत्या.

हा विचार जरी आता मनात आला तरी मन थरकापून जातं

¤

दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो. सूर्याचं छान ऊन पडल होत. सैनिकाची जा–ये चालली होती. एका झाडाशी बसून एक थोडा वयस्क सैनिक पत्र लिहीत होता· कुणाला लिहीत असेल बरं ? काय लिहीत असेल ? बाहेर जाऊन त्याच्याशी बोलावं असं वाटलं. पण वेळ नव्हता. सेलापासला जायच होत.

पुढे बोमदिला पडलं हे जेव्हा कळल त्या वेळी प्रथम माझ्या मनात त्या सैनिकाबद्दल विचार आला. तिथे शेकडो सैनिक मारले गेले होते तितकेच युद्धकैदी झाले होते तो कोणत्यात असेल ? त्याचं ते शेवटचच पत्र असेल का ? ते मिळण्याआधीच त्याच्या मृत्यूची बातमी घरच्याना मिळाली असेल का ? असं पुष्कळदा होत. अशा पत्राच घरचे वाचन तरी कसं करत असतील ? कित्येक चित्रं आयुष्यात कधी पुसलीच जात नाहीत. आज पचवीस वर्षांनी सुद्धा तो उन्हात झाडाखाली पत्र लिहीत बसलेला सैनिक, त्याची बाजूला पडलेली बदूक सगळं मला स्पष्ट दिसतय.

¤

आम्ही सेलापासकडे जायला निघालो खरे पण तिथपर्यंत जायचं काही झाल नाही. रस्त्यातच आपल्या सैनिकानी आमची गाडी अडवली व पुढ जाता येणार नाही अस सागितल. तेव्हा आम्ही तिथूनच परतलो व बोमदिलाला आलो

आता आमच बोमदिलाला काहीच काम नव्हत. तेव्हा तिथ न रेंगाळता तेजपूर मार्गानं परत शिलांगला जायचं ठरवल व त्याप्रमाणे निघालो.

रस्त्यात शेकडो तिबेटी काम करत होते. पुरुष तर होतेच पण स्त्रिया, तरुण मुली व लहान दहा–बारा वर्षांची मुल पण काम करत होती बाजूची माती खुदाईचं व इतर. तिबेटी लोकाना मदत व्हावी म्हणून सरकारन मुद्दाम ह्या लोकाना काम दिली होती.

रस्त्यात चाकू नावाचं खेड लागलं. तिथं जेवण घेतल. तिथल्या झोपडीवजा हॉटेलचा मालक पण तिबेटी होता. चागल्या पक्क्या बाध्याचा व थोडं इग्रजी बोलता येणारा. त्याच्याकडे तीन–चार चुणचुणीत तरुण मुली होत्या. त्या चहा, जेवण, पाणी वगैरे देत होत्या. हिंदी सैनिक त्या मुलीशी थोडे जास्तच मोकळेपणी वागत होते. त्या मुली त्या मोकळेपणाचं कौतुक करत होत्या, थोड उत्तेजनच देत होत्या.

¤

तेजपूरच्या रस्त्यावर आलो त्यावेळी लक्षात आलं की रस्त्यावरचे किलोमीटर्सचे दगड काढून टाकले आहेत. थोडी चौकशी केली त्यावेळी कळल की चिन्याना तेजपूर वगैरे गाव किती अंतरावर आहेत हे कळू नये म्हणून हे किलोमीटर्सचे दगड मुद्दाम काढून टाकले आहेत.

हे कळल्यावर हसाव की रडाव हेच मला कळेना जसं काही चिनी लोक हातात नकाशा घेऊनच किलोमीटर्सचे दगड पाहतच येणार होते !

राष्ट्राला युद्धाचाही सराव असायला लागतो. गेल्या शभर–दीडशे वर्षांत लढाई म्हणजे काय हे इग्रजाच्या कृपेमुळं आपल्याला कधी कळलच नाही. तशी दोन महायुद्धं झाली पण ती आपल्या भूमीवर नव्हती. आपल्याला युद्धाची आच अशी कधी लागलीच नाही. व त्यामुळे युद्धप्रसगी काय करावं हेही आपल्याला माहीत नाही. हे त्यावेळी तर जाणवलच पण पुढेसुद्धा प्रखरतेन जाणवल.

तेजपूरला काही काम नव्हतं तेव्हा तिथ जेवण घेऊन लगोलग निघालो व मध्यरात्री शिलांगला पोहोचलो.

सकाळी उठलो तो बोमदिला पडल ह्या बातमीनच ! बोमदिला पडलं ? केव्हा ? काल रात्री ? अरे बापरे ! काल सकाळी तर आपण बोमदिलात होतो, सेलापासला जाण्याच्या प्रयत्नात. इग्रजी बातमी ऐकली होती. परत हिंदी ऐकली. डोक सुन्न झालं

डोकं सुन्न झाल तरी घरात बसून चालणार नव्हत सगळ आटोपून कचेरीत गेलो. कचेरीत वातावरण तग होत. म्हणजे आम्हा बाहेरच्या लोकात. तिथल्या खासी, जानीय, नागा लोकाना बोमदिला पडल्याच काही वाटत नव्हतं. चिन्यावद्दल त्याना आपलेपणा

नव्हता तसा हिंदी लोकाबद्दलही नव्हता. हा हिंदी व चिनी लोकांतला झगडा आहे, आपल्याला त्याच्याशी काय देणं–घेणं, अशी त्याची वृत्ती व वागणूक.

जेवायला घरी आलो तर प्रतिभा अगदी रडकुंडीला आलेली. आमच्या शेजारी मेजर नायर बायका–मुलासह राहत होता. बोमदिला पडल्याचं कळल्यावर सरकारन शिलाँग नॉन–फॅमिली स्टेशन जाहीर केलं. म्हणजे सगळया अधिकाऱ्याच्या बायकामुलाना आपआपल्या गावी पाठवणं आलं. सैन्याची कार्यपद्धती मोठी शिस्तीची. सध्याकाळपर्यंत सगळया अधिकाऱ्यानी आपल्या बायका–मुलाना सामानसुमान बाधून तयार राहण्याचा हुकूम सुटला. एक कॅप्टन त्या सर्वांना कलकत्त्यापर्यंत विमानान नेणार होता. पुढे आगगाड्यानी जाण्याची व्यवस्था कलकत्त्याचे अधिकारी करणार होते.

दुपारी नायरच्या घरात एवढी गडबड कसली आहे म्हणून प्रतिभान मेजर नायरला विचारल. त्यान सगळया व्यवस्थेबद्दल सागितलं व वर 'तुम्ही काय करणार आहात ?' म्हणून विचारलं.

आम्ही काय करणार आहोत हे प्रतिभाला कुठ माहीत होतं ? प्रतिभाच काय ? मला व इतर शेकडो लोकाना आता पुढे काय करायच हे माहीत नव्हतं.

मेजर नायरची फॅमिली जाण्याचा आमच्या आळीवर फार परिणाम झाला. आतापर्यंत युद्ध सीमेवर होत आता ते अगदी दाराशी आल आहे, दार ठोठावत आहे ह्याची सगळयाना जाणीव झाली. मूर्तिमत भीती म्हणजे काय असते ते सगळयाच्या चेहऱ्याकडे बघून लक्षात यायला लागल.

गर्ग, तिवारी वगैरे उत्तर प्रदेशातले सहकारी आपल्या कुटुबाना आगगाडीनं पाठवावयाचं ठरवून त्यामागे लागले. पण तसं करण आम्हाला शक्य नव्हत. प्रतिभाला अगदी जवळात जवळ म्हणजे नाशिक होत. तिथं जायचं म्हणजे चार ठिकाणी गाडी बदलायची व चार दिवसाचा प्रवास. तोही एकटीन दोन लहान मुलाना घेऊन करायचा. कारण आम्हा कुणाला रजा मिळणार नव्हती.

इथ राहण्यातल्या धोक्यापेक्षा त्या घुमश्चक्रीतल्या चार दिवसाच्या प्रवासातच काही बरं–वाईट होण्याचा सभव जास्त होता. तेव्हा जे काही आपल होईल ते सगळयांच बरोबर व शिलाँगलाच होऊ दे अस म्हणून आम्ही शिलाँग सोडायच नाही असं ठरवल. ¤

दुपारी परत कचेरीत गेलो तर टेबलावर आसाम सरकारच्या मुख्यसचिवाच एक परिपत्रक पडल होत. ज्याना कोणाला आपल्या कुटुबियाना मायदेशी पाठवावयाचं असेल त्याना आसाम सरकार मदत करेल अशा अर्थाच ते पत्रक होतं परत माझ्या मनात घरच्या लोकाना पाठवावं अस आल. मी आणि जयसिंघानी तडक निघालो व सरळ गृहसचिवालाच भेटलो. म्हटल उगाच अधल्या-मधल्या अधिकाऱ्याना भेटायला नको.

पण तोपर्यंत अस परिपत्रक मुख्य सचिवांनी काढल ही मोठी चूक केली अस आसाम सरकारला वाटायला लागल होतं. पुढं कळल की अस परिपत्रक काढल्याबद्दल लोकसभेत खूप आरडाओरड झाली होती व त्याला तोंड देता देता पडित नेहरूना नाकी–नऊ आले होते.

गृहसचिव कुणी सरदारजी होता.आम्हाला आमची बायका–मुलं मुंबईला पाठवायची आहेत तर तुम्ही आम्हाला काय मदत करणार आहात ? असं आम्ही त्याला विचारल. तर तो शहाणा अशा परिस्थितीत आपण भारत सरकारच्या अधिकाऱ्यानी आपली बायका–मुल जर आसामच्या बाहेर पाठवली तर त्याचा आसामच्या लोकाच्या मनावर फार वाईट परिणाम होईल वगैरे ज्ञान सागू लागला

'पण तुमच्या मुख्य सचिवांनी तर मदत देण्याविषयी पत्रक काढलं आहे ना ?' मी त्याच्या बोलण्याचा अर्थबोध न झाल्यामुळं विचारलं.

'हो, तस पत्रक काढल आहे खरं पण आता विचार बदलत्रा आहे.' वगैरे तो सांगत असतानाच टेलिफोन वाजला.

तो त्याच्या कुणा I. A. S. सहकाऱ्याचा असावा व त्यानही आमच्यासारखी मदतीकरता विनती केली असावी. ह्या सरदारानी त्याला काय मदत करता येईल वगैरे सागितलं. त्यानं खूप मखलाशीच्या भाषेत सागितलं होत, तरी आम्हाला जे काही करायचं होत ते कळलच होत.

फोन ठेवून देऊन तो आम्हाला परत 'ह्या वेळी सरकारी अधिकाऱ्यानी आपल्या कुटुंबियाना परत पाठवण कसं योग्य नाही हे सागू लागला. मग मात्र मी तडकलो.

'आताच तुम्ही तुमच्या सहकाऱ्याला त्याची फॅमिली पाठवण्याबद्दल मदत देण्याचं बोलत होतात, आणि आम्हाला हे असं सागताय ? ह्याचा अर्थ काय ?'

आम्ही पी. डब्ल्यू. डी. ची माणसं, त्यातून तो I. A. S. गृहसचिव त्याला आपल्याला अस कुणी तडकावून बोलेल असं वाटलच नव्हत. त्यामुळे प्रथम तो थोडा वरमला. पण I. A. S. अधिकारी चागले निगरगट्ट असतात.

'त्या सहकाऱ्यानं आमचे विचार बदलण्या आधीच अर्ज केला होता' वगैरे तो सांगू लागला.

'थोडक्यात म्हणजे तुम्ही फक्त I. A. S. अधिकाऱ्यांनाच मदत करणार आहात असं सागा ना.' माझा राग कमी झाला नव्हता.

'रानडे, आहे हे अस आहे.' तोही पूर्वीच्या निगरगट्टपणे म्हणाला.

हे गृहसचिवाबाबतच होतं असं नाही, तर सगळयाच्या बाबतीत ते तसच होतं. सगळेजण फक्त आपल्या खात्यातल्या लोकाबद्दल, आपल्या फॅमिलीबद्दलच पहात होते. तवाग ज्या वेळी खाली करायचं ठरल तेव्हा तिथल्या डेप्युटी कमिशनरन गाड्यातून प्रथम आपली बायका–मुलं बसवली, मग आपल सामान सुमान भरलं, फर्निचर भरलं व ते करून नतर जी जागा राहिली. त्यात हाताखालच्या लोकाची सोय केली होती.

काही अधिकाऱ्याच सामान–सुमान अस गाड्यातून गेल होत व बाकीच्याच्या बायकामुलाना रात्रीच काही किलोमीटर्स दूर जंगली प्रदेशातून पायी चालत जायला लागल होत.

अर्थात ह्यालाही काही अपवाद होते. एक ठिकाणी सघाचा एका सिंधी स्वयसेवक एक्झ्युकिटिव्ह इजिनियर होता. त्यान प्रथम हाताखालच्या लोकांना व त्याचं सामान गाड्यातून पाठवलं. मग आपली बायकामुल व सामान पाठवलं. व आपण सगळ्यात शेवटी त्यान गाव सोडलं ते गाव सोडणारा तो शेवटचा माणूस होता.

रात्री पंडित नेहरूचं रेडिओवर गर्भ-गळीत

भाषण झालं ते फक्त रडायचेच शिल्लक राहिले होते. आसामच्या मागे सारी भारतीय जनता आहे असं त्यानी लोकाना धीर यावा म्हणून सागितल. पण त्याचा उलटाच परिणाम झाला. शिलाँगमध्ये असणाऱ्याना वाटलं की तेजपूर वगैरे ब्रह्मपुत्रेच्या उत्तरेकडला प्रदेश चिन्यानी घेतलाय व भारतातल्या लोकाना वाटलं की चिन्यानी सगळा आसामच गिळकृत केलाय.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रथम गाठ पडली ती आमच्या आसामी घरमालकाशी. तो नेहरूच्या भाषणानं अगदी चवताळून गेला होता आसामवर भारत सरकारनं इतक्या सहजपणे पाणी सोडलं ह्याचा त्याला राग आला होता. 'काय तर म्हणे, सारा भारत आसामच्या मागे आहे. पण आमच्यापुढं उभं राहून रक्षण करायची कुणाचीही तयारी नाही.'

भारत सरकारचे सगळे अधिकारी आसाम सोडून जाणार आहेत, ह्याचाही त्याला राग आला होता. 'म्हणजे इथ परिस्थिती चांगली होती तोपर्यंत हे इथं रहाणार, मौज–मजा करणार, अधिकार गाजवणार आणि आता चिन्याच्या तोंडी आम्हाला देऊन पळून जाणार! पण आम्ही आसाम्यानी कुठं जायचं?' असं त्याच म्हणणं.

त्याच्या भावना मी समजू शकत होतो. त्याचा रागही योग्य होता. पण मी स्वत ही येथून निघून जाण्याच्या मनःस्थितीत एक वेळ होतो. त्याला मी काय उत्तर देणार?

आम्ही इथच रहायचं ठरवलय हे त्याला सागितल्यावर मात्र त्याला थोड बर वाटलं. 'तुम्ही काही काळजी करू नका. शिलाँगला काही धोका आहे असं वाटलं तर आपण सगळे आमच्या खेडयात जाऊ.' त्यानी आम्हाला धीर देत सागितल.

गर्ग वगैरे उत्तर प्रदेशियानी गोहात्तीला जाऊन अलाहाबादपर्यंतची तिकिट मिळवली होती. ज्या दुसऱ्या वर्गाच्या तिकिटाला तीसचाळीस रुपये पडत त्याला त्यानी अडीचशे–तीनशे रुपये दिले होते. आधीच रेल्वेचे लोक पैसा करण्यात पटाईत व आता युद्धासारखा प्रसग आला होता. गोंधळाची आणि भयाची ब्रह्मपुत्रा वहात होती ह्यात नुसते हातच धुवून नव्हे तर सपूर्ण आघोळ करून घेणार नाही तोच खुळा अन बावळट ठरला असता.

अस होता होता आमची सगळी कॉलनी ओस पडली. त्यातूनही कुणी राहिले होते ते लोकही आपसात फॅमिलीज्ना घरी कसं पाठवायचं ह्याच्याबद्दल बोलत होते. बातम्याशिवाय रेडियोवर काही ऐकलं जात नव्हतं. प्रथम आपला, नतर बी. बी. सी, व्हाईस ऑफ अमेरिका, रेडियो मॉस्को, चिनी रेडियो सगळे बारीबारीने लावले जात होते.

कचेऱ्यातून सरकारी काम कधीच ठप्प झालं होतं. सगळया जोप्स व गाडया सरकारन ताब्यात घेतल्या होत्या; पण त्याच पुढ काय करत होते ते कळत नव्हत. कारण नुसत्या गाडया ताब्यात घेऊन काय उपयोग होता? त्या करता ड्रायव्हरही नकोत?

दररोज अफवामिश्रित बातम्या येत होत्या. तेजपूरचा कलेक्टर आपल्या बायकोला पोहोचवायला विमानतळावर गेला. तिथं बायकोला रडताना पाहून स्वत.च विमानात बसून बायकोबरोबर पळून गेला होता. वेडयांच्या इस्पितळातले वेडे व तुरुंगातल्या सगळया कैद्याना सोडून दिलं होत. चहाचे मळे नष्ट करायचे व तेलाच्या विहिरीना आगी लावायच्या असं ठरवल जात होतं. भारतीय सैन्य बोमदिलाहून जे पळाले ते थेट अलाहाबादपर्यंत जाऊन पोहोचले होते.

थोडक्यात म्हणजे कोणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. भयाच्या अंधारात अफवाचा धूर मिसळला गेला होता कुणाला काही दिशाच दिसत नव्हत्या तर बाहेर पडण्याचा मार्ग तरी कसा दिसणार?

शेवटी चिनी लोकाच्या मनातला देव जागा झाला असावा. बोमदिला पडल तरी ते पुढे न येता तिथच थाबले व काही दिवसानी आपल्या बाजूने युद्ध थांबवत असल्याची घोषणा केली व आपण सैन्य मागं घ्यायला सुरुवात करणार आहोत असं जाहीर केल. पतप्रधानापासून तर सर्वसामान्यापर्यंत सगळयाचा जीव अगदी भाडयात पडला

भारतातही खूप घडामोडी झाल्या होत्या. कृष्ण मेननना जायला लागलं होत व तिथं यशवतराव आले होते. थापर, धार, कौल वगैरे काश्मिरी सेनाधिकारी जाऊन तिथं हैद्राबादमध्ये नाव कमावलेले चौधरी सेनेचे मुख्य झाले होते जनरल चौधरीनी 'असाल तिथच थांबा' असा सर्वप्रथम हुकूम काढला होता आणि पळणाऱ्या सैन्याला थाबवलं होत.

चिनी सैन्याने बोमदिलातून माघार घ्यायला सुरुवात केली होती. त्याची माघार सीमारेषेच्या वीस किलोमीटर्स दूर राहणार होती. भारत आपलं सैन्य पुढे नेऊन रेषेपासून वीस किलोमीटर्स अंतरावर थांबवणार होता. मात्र सैन्याच्या हालचाली मोठया प्रमाणात कुणीही करायच्या नाहीत असं चिन्यानी सुचवल होतं.

बोमदिलातून चिनी सैन्य गेल्यावर भारत सरकारनं आपले 'पोलिस' म्हणजे निम सैनिकी पथक पाठवलं ती तशी पोलिस तुकडी जाऊन आल्यावर सरकारनं मुलकी अधिकाऱ्याची तुकडी पाठवायचे ठरवले. त्या तुकडीत प्रशासन, अर्थ, इंजिनियरिंग खात्याचे अधिकारी व मी आर्किटेक्ट होतो. व त्या तुकडीबरोबरच बोमदिलाला दुसऱ्यादा जात होतो. उत्साह नव्हता तरी उत्सुकता होती, मन अगदी भयाकुल झालं नसलं तरी मनात थोडं भय होतच.

बोमदिलाला पोहोचल्यावर आधी आम्ही पी. डब्ल्यू. डीच्या कचेरीत गेलो. कचेरीतलं सगळं फर्निचर, फायली, कागदपत्र बाहेर उघडयावर टाकून दिले होते. ते तसेच उघडयावर पडले होते.

कुठेही पडझड झाली नव्हती, कारण तिथं लढाई अशी झालीच नव्हती. ते आले, त्यानी पाहिलं व त्यानी जिंकल असं घडल होतं. आपले सैनिक उत्तरेच्या दिशेन बदुका व तोफा डागून बसले होते तर चिनी दक्षिणेकडून चाकु गावावरून पायवाटेनं आले होते. चिनी अपेक्षेपेक्षा उलटयाच दिशेनं आलेले पाहून आपल्या सैन्याची फे–फे उडाली. त्याना बोमदिलाहून माघार घेण्याचा आदेश मिळाला. जे पळून जाऊ शकले ते पळाले व जे जाऊ शकले नाहीत ते चिन्याच्या हाती पडले व युद्धकैदी म्हणून पकडून नेले गेले.

कचेरीच्या भिंतीवर एक, दोन, तीन, चार असे क्रमाक टाकलेले कागदाचे कपटे लावले होते. इग्रजीत व चिनी भाषेत. ह्या खोल्याचा उपयोग चिनी इस्पितळासारखा करत होते.

चिन्यानी नासधूस अशी केली नव्हती

तरी इमारतीतल्या विजेच्या तारा, वल्वज् व इतर उपकरण, कपाऊडच्या तारा अशा गोष्टी काढून नेल्या होत्या. पडित नेहरूच्या भेटीकरता आणलेला किमती गालिचासुद्धा चिनी घेऊन गेले होते. त्या गालिच्याचे अजून पैसेसुद्धा दिले गेले नव्हते. तेव्हा आता त्याचे पैसे कसे द्यावेत असा अर्थखात्याच्या अधिकाऱ्याना प्रश्न पडला होता. युद्धाच्या प्रसगातही सरकारी नोकराना असे प्रश्न सतावत असतात !

चिनी लोक बोमदिलाला आल्यानतर खरच काय काय झाल ह्याचा 'आखों देखा हाल' सागायला आमच्या एका आदिवासी चपराश्याशिवाय कुणीही नव्हत. सगळे बोमदिला सोडून गेले तरी हा चपराशी व इतर आदिवासी लोक मात्र तिथच राहिले होते. चिनी लोक आपल्याला त्रास देणार नाहीत अशी त्याची भावना होती आणि खरोखरच चिन्यानी आदिवासीना बिलकूल त्रास दिला नव्हता.

'ते आम्हाला चाय–इन–लायचे व पडित नेहरूचे फोटो दाखवत असत.' आमचा चपराशी आम्हाला सांगत होता, 'व विचारत की ह्यातला कोण तुमच्यासारखा दिसतो, नेहरू की चाय–इन–लाय ?'

बोमदिलाला असतानाच अमेरिकन पत्रकाराची एक मोठी टीम तिथ आली होती. ते पुढे तसेच तवागला जाणार होते. युद्धक्षेत्राची पहाणी करायला. त्याना सीमेपर्यंत जाऊ देण भारत सरकारला भागच होतं. रशियाने भारताला मित्र व चीनला भाऊ म्हणून भारताला मदत देण्याच टाळलं होत. तर अमेरिकेने मदतीचा हात पुढे केला होता.

एकदा वाटलं होतं की त्याच्यापैकी कुणाशी तरी बोलाव. पण मी पडलो सरकारी अधिकारी व परिस्थिती अशी नाजूक उगाच नसतं झेंगट झाल तर काय करता म्हणून तो विचार बाद केला.

बोमदिलात एक दिवस राहून पुढं तवागला गेलो. गाडीत तो चपरासी पुढं काय झालं, कुठ काय झाल ते सागत होता. त्यावरून काही अनुमान काढण शक्य होत होतं तरी चिनी असे आपआपले परत का गेले ह्या प्रश्नाचं उत्तर मिळाल नव्हतं. पूर्वी प्रश्न पडला होता की ते आले का म्हणून, व आता ते गेले का असा प्रश्न पडला होता.

कुणी म्हणत होते काही चिनी अधिकारी चुकून भारताच्या हद्दीत आले होते. आता एकदा ते आल्यावर चिनी सरकारला त्याना पाठिंबा देण भागच होतं.

कुणी म्हणत होते की आपल्याच सैनिकानी त्यांची काहीतरी छेड काढली होती व त्यामुळे चिडून जाऊन चिनी सैन्य भारतात घुसल होत.

एक ना दोन. युद्धाच्या गोष्टी जितक्या रम्य असतात, तितक्याच त्याच्या बाबतचा चर्चापण चर्विष्ट होत असतात.

हे सगळ जरी खरं असल तरी चिन्यांच्या येण्याने व जाण्याने भारताची जगातली पत अगदी खाली आली हे सत्य.

तवागला एक खूप मोठ व छानदार बुद्धमंदिर आहे. आल्या आल्या तिथे गेलो. तिथल्या लामानं आमच्या मुख्याला व मुख्यान लामाला तिबेटी पद्धतीप्रमाणे पाढऱ्या शाली दिल्या–घेतल्या. तुपकट असा आम्हाला चहा देण्यात आला. तिथ दूध मिळत नाही तेव्हा याक गाईच्या तुपाचा चहा करतात. एरडेलाची आठवण यावी असा चहा होता. पण वाईट दिसेल म्हणून प्यायला लागला.

मदिरात चागली १०–१२ फूट उचीची बुद्धाची सुवर्ण–मूर्ती आहे. त्याचप्रमाणे मातीच्या लहान लहान शेकडो मूर्ती तिथं होत्या. भेट देणाऱ्याना एक–एक मूर्ती बक्षीस देतात. मी आणलेली मूर्ती पुढे पुष्कळ वर्षं आमचेकडे होती.

दुपारी जेवणाचे वेळी चर्चा सुरू झाली की चिन्यानी काही महिन्यात डझनानी पूल बाधले पण आमच्या इजिनियर्सना एक एक पूल बांधायला काही वर्षं लागतात. हे कस ? जी गोष्ट पुलाची तीच रस्त्याबाबतची. शिलाँगला असताना ही टीका मी ऐकली होती. त्यावेळी माझ कुतूहल जाग झाल होत. आता चिन्याचे पूल व रस्ते बघण्याची सधी आली होती.

'तस असेल तर आपण पूल व रस्ते पाहून तरी येऊया.' मी प्रस्ताव माडला. पण ते पूल व रस्ते पहायचे म्हणजे तिबेटची सरहद्द पार करून जाण आवश्यक होतं. तसं करण फार धोक्याच होतं. तेव्हा माझ्या कल्पनेबद्दल कुणीही उत्साह दाखवला नाही. मात्र एक इजिनियर तयार झाला. बरोबर तो आदिवासी ड्रायव्हर यायला तयार होताच.

जेवण करून आम्ही निघालो. रस्त्यात खरच खूप पूल लागले पण ते तीन ते चार फूट अतरावरचे म्हणजे ज्याला आपण कलव्हर्टस् म्हणू तसे. तसे पूल दोन ते तीन दिवसात बाधणे अगदी शक्य होते. आम्ही तसे भारतात बाधतो पण.

रस्त्याची सुद्धा तीच गोष्ट तिबेट हे पठार आहे. म्हणजे पुष्कळ एका उंचीचे. सपाट. तिथे रस्ते म्हणजे थोडा मुरूम टाकून बनवलेली सडक होती.

उद्या पुण्याहून लोणावळ्याचा रस्ता इतक्या दिवसात बांधला पण खोपोलीहून लोणावळ्यापर्यंतचा रस्ता बाधायला मात्र कित्येक वर्षं लागली अस जर कुणी म्हटलं तर आपण पुण्यापासूनचा रस्ता बाधायला सोपा आहे अस उत्तर देऊ. त्याचप्रमाणे तिबेटहून तवांगपर्यंतचे रस्ते करायला सोपे आहेत. आपल्याकडूनचे अवघड आहेत, काही हजार फूट उचीवर जायला लागत. तेव्हा ते बाधायला काही वर्षं लागण साहजिकच आहे.

पण चिन्यानी आपल्या पूल व रस्ता बाधणीचा गाजावाजा केला व आपल्या वर्तमानपत्रवाल्यानी त्याचीच 'री' ओढली. खर–खोटं पहातो कोण ? पण मी ते स्वतः पाहिल होत व चिन्यानी काही खास केल नव्हत ह्याची खात्री करून घेतली.

तवाग–बोमदिलाच काम सपल तसे आम्ही परत यायला निघालो. चाकुला पोहोचलो तेव्हा कळाल की, तिथला 'तिबेटी' चहावाला चिनी सैन्यातला कर्नल हुद्द्याचा अधिकारी होता म्हणून. व त्या चुणचुणीत 'तिबेटी' मुली चिनी गुप्तहेर खात्यातल्या होत्या.

चाकु अगदी मोक्यावर होतं. तिथूनच आपले सैनिक जायचे-यायचे. तिथेच विश्रांती घेऊन जेवायचे–खायचे. तेव्हा त्या चिनी मुलीना व कर्नलला आपल्या हालचालीबद्दल बित्तबातमी असायची. ती तशी मिळावी म्हणून तर त्या मुली आपल्या सैनिकाशी इतक्या मोकळेपणी वागत होत्या.

आपला एक रणगाडा घसरून खाली दरीत पडला तर आपण देण्याआधी चिनी रेडियोनं ती बातमी दिली होती. ह्याचे कारण तो 'चहावाला' तिबेटी व त्या चुणचुणीत तिबेटी मुली.

आता आम्ही तेजपूरच्या दिशेनं हिमालयाचे डोंगर उतरून येत होतो. फक्त आम्ही पी. डब्ल्यू. डी. खात्याचे अधिकारी. उतरताना एका थोड्या मोकळ्या जागी तंबू उभारण्याचं काम चालू होतं. जवळच एक लेफ्टनंट जनरल उभा होता. आम्ही गाड्या थांबवल्या व चपराश्याकडून जनरलना भेटायची इच्छा आहे असं कळवलं. त्या जनरलनेही भेटीला होकार दिला.

आमच्या उभ्या-उभ्याच गप्पा चालल्या होत्या. त्याचा शरीररक्षक हातात पिस्तूल घेऊन जनरलच्या मागे उभा होता. बोलणी जनरल चौधरी सैन्याचे मुख्य झाल्यापासून काय व कसा फरक पडला होता ह्याबद्दलची होती.

जनरल चौधरींनी सैन्याला असाल तिथंच थांबा असा हुकूम तर दिला होताच; पण सैन्याची हालचाल नेफाच्या दिशेनं करायला सुरुवात केली होती.

त्या हालचालीत पण फरक होता. पूर्वी कर्नलच्या हुद्द्यावरचे सगळे अधिकारी विमानाने जात-येत. चौधरींनी त्या अधिकाऱ्यांनी जीपनं तर जावंच पण ती जीप स्वतः चालवावी असा आदेश दिला. त्याचप्रमाणे आतापर्यंतचे कॅप्टन, मेजर वगैरे अधिकारी जीपनं जात-येत असत, त्यांनी पायी जावं असा हुकूम चौधरींनी काढला.

असं केलं तरच आपल्या अधिकाऱ्यांना नेफाचा प्रदेश चांगल्या प्रकारे कळेल. प्रदेश चांगला माहीत असेल तरच लढणार ना? मलाही बोमदिलाच्या पहिल्या भेटीत असंच वाटलं होतं.

बोलता-बोलता 'आपलं सैन्य पळत पळत पार अलाहाबादपर्यंत गेलं होतं की हो जनरल साहेब' असं मी म्हटलं. माझ्या बोलण्यातला कडवटपणा जनरल साहेबांना जाणवला. तरी ते शांतपणे म्हणाले,

'रानाडे साहाब, वर्दी (म्हणजे गणवेष) घातला तरी सैनिक हा शेवटी माणूसच असतो. त्याला तुझ्या-माझ्यासारखा आपला जीव वाचवायची इच्छा असते. त्यामुळे प्रसंग आला की तो प्रथम पळ काढायला पाहतो. हा मनुष्य स्वभाव आहे.

'चूक वरच्या अधिकाऱ्यांची झाली. त्यांनी सैनिकांना माघारी जायची परवानगी दिली. जर सैनिकाला कळलं की मागे जायचा मार्ग नाहीये, तर प्राणपणानं लढतो. असेही आपण मरणारच तेव्हा मरता मरता शत्रूची काही माणसं मारून का मरू नये? ह्या विचारांनी तो शौर्याची कामं करतो. बहुधा सगळ्या बहादुरींच्या कामामागे आता मागे पळायला मार्ग नाही हे कारण असतं.'

जनरल साहेब बोलत होते. माझ्या डोळ्यांसमोर 'दोर कापून टाकलाय, नामर्दांनो पळताय कुठे?' असं विचारणारा शेलारमामा उभा राहिला. शेलारमामानं दोर कापून टाकल्यामुळं मराठा सैन्य लढलं व कोंडाण्याचा सिंहगड केला.

आपल्याकडे पळून जायला खूप जागा आहे, ठिकठिकाणी दोर आहेत. पण ते कापून टाकायला शेलारमामा नाहीत हे आपल्या देशाचं दुर्दैव. त्यामुळे आपल्याकडले कोंडाणे कोंडाणेच रहातात, सिंहगड काही होत नाहीत! ☐

---

हात हलवून आम्हाला निरोप देणारी त्याची ती केविलवाणी मुद्रा!

# कामा सोन्द्रू


● ले. कर्नल श्याम चव्हाण ●

**नो**व्हेंबर महिन्याच्या कडाक्याच्या थंडीतील एक सकाळ. तिबेटमधील 'क्रॉनॉन' नदीच्या पूर्व काठावर असलेल्या भारतीय युद्धबंद्यांच्या कॅम्पमधील आम्हा युद्धकैद्यांना, त्या कॅम्पचा चिनी कमांडर भाषण देत होता. त्या कमांडरचे इतर सहकारी व दुभाषे त्याच्या मागेच उभे होते. कमांडर एकदोन वाक्ये चिनी भाषेत बोलायचा. मग दुभाष्या त्या वाक्यांचा हिंदीत अनुवाद करून आम्हाला सांगायचा. ते सर्व चिनी अधिकारी खाकी गणवेषात होते, तर दुभाषे निळ्या गणवेषात! त्यावेळेस माझ्या लक्षात आले की, त्यांच्यापासून थोड्या अंतरावर, जवळच्याच एका झाडाखाली, त्यांच्यासारखाच गणवेष घातलेला एक ऑफिसर, एकटाच उभा होता. तो सतत आमच्याकडे निरखून पाहत होता. जेव्हा चिनी कमांडर बोलायचा तेव्हा तो त्याच्याकडे डोळ्याच्या कडेनेच पाहयचा व मग जेव्हा दुभाष्या आम्हाला ते हिंदीत सांगायचा तेव्हा हा आमच्या चेहऱ्यावरचे भाव जाणून घ्यायचा प्रयत्न करायचा. त्याच्या या एकलेपणामुळे व निरखून पाहण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळेच तो माझ्या लक्षात आला. त्याचे नाव कामा सोन्द्रू आहे हे मला नंतर कळले.

१९६२ च्या चीनच्या लढाईत, नेफामधील 'वेलाँग'च्या आघाडीवर लढत असताना, आम्ही चिन्यांचे युद्धबंदी झालो होतो. काही दिवस वेलाँगमध्येच ठेवल्यानंतर आता आम्हाला त्यांनी तिबेटमध्ये उघडलेल्या युद्धबंद्यांच्या कॅम्पमध्ये आणले होते. हा कॅम्प पूर्व तिबेटमधील 'क्रॉनॉन' नदीच्या काठावर होता. याच नदीला भारतातील हिमालयाच्या डोंगराळ भागात 'लोहित' व पुढे सपाट प्रदेशात 'ब्रह्मपुत्रा' म्हणतात. जिथे आमचा कँप होता त्याच्या दोन्ही बाजूस उंच उंच कडेवजा डोंगर होते. नदीच्या वालुकामय किनाऱ्यावरच एकेठिकाणी देवदार वृक्षांचे वन होते व त्यामध्येच आमचा ऑफिसर व जे. सी. ओ. युद्धकैद्यांचा कॅम्प चिन्यानी

उघडला होता. आमच्या जवानांचा कॅम्प आमच्यापासून दूर होता, पण आम्हाला तो दिसायचा. आमच्या कॅम्पमध्ये आल्यावर चिन्यांनी आम्हाला तंबू आणून दिले व ते तुम्हीच तुमच्यासाठी उभारून घ्या असे सांगितले. त्याप्रमाणे पहिली रात्र आम्ही त्या तंबूत जमिनीवरच झोपून काढली. रात्री अंगाखालच्या थंड वाळूमुळे सकाळी उठल्यावर अग पुरं आंबून गेलं होतं. त्यात आता सकाळच्या थंडीत हे असं उघड्यावर एकत्र केलं गेलं होतं. आम्ही सर्वचजण पुरेसे गरम कपडे नसल्यामुळे थंडीने कुडकुडत होतो. चिनी सेनेतील सैनिक गोधडीवजा गणवेष घालून होते. कमांडर बोलताना, त्याच्या तोंडातील वाफ बाहेरच्या थंड हवेत स्पष्ट दिसून येत होती. झाडावरच्या पानावरून दवाचे थेंब टपटप् पडत होते. भलताच गारठा होता हवेत ! त्या सर्व चिनी ऑफिसरांची उभे राहण्याची पद्धत सारखीच होती. आपले दोन्ही हात ते छातीवर दुमडून घेत व तसे करताना गोधडीवजा कोटाच्या, उजव्या हाताच्या बाहीत डाव्या हाताचा पंजा व डाव्या बाहीत उजव्या हाताचा पंजा घालून उभे राहत. त्यामुळे त्यांच्या हातांना थंडी लागत नसावी. दूर झाडाखाली असलेला कामा सोन्द्रूही तसाच हात दुमडून उभा होता. भाषणाच्या शेवटी कमांडरने आम्हाला सांगितले की तुम्ही स्वत:साठी शौचकूप बनवून घ्या. नंतर त्याने कामा सोन्द्रूकडे पाहून चिनी भाषेत त्याला काही तरी सांगितले. इतका वेळ कमांडरचे बोलणे एखाद्या तिऱ्हाइतासारखे ऐकणारा कामा सोन्द्रू एकदम दचकल्यासारखा झाला व मग त्याच्या आज्ञेप्रमाणे निघून गेला.

थोड्या वेळाने कामा सोन्द्रू कुदळी व फावडी घेऊन आला. त्यानंतर चिनी भाषेत कमांडरने त्या सर्वांना काही आदेश दिले व तो निघून गेला. आता आमच्याजवळ दोन ऑफिसर, दुभाषे व कामा सोन्द्रू उभे होते. दुभाष्याने आम्हाला खोदकाम करण्यासाठी चला असा इशारा केला. कामा सोन्द्रूने कुदळ व फावडी आमच्याजवळ दिली. आम्हा ऑफिसरांत एक लेफ्टनंट कर्नल व काही मेजर आणि कॅप्टन या हुद्द्याचे लोक होते. सर्वांत तरुण मी होतो व एकटाच लेफ्टनंट होतो. कामा सोन्द्रूही चिनी सेनेतील



**आता कामा सोन्द्रु कुठे असेल ?**

□

लेफ्टनंट होता ! माझ्या हातात कुदळ देताना तो माझ्याकडे पाहून थोडासा हसला. मीही तुझ्याच सारखा लेफ्टनंट आहे हेच जणू तो मला सांगू पाहत होता ! भारतीय युद्धकैद्यांबरोबर आता आपल्याला बोलायला मिळणार याबद्दल त्याला आनंद तसेच उत्सुकता वाटत असलेली दिसली. त्यानेही आम्हाला खणण्यासाठी चला असे खुणावले, 'चला, ते काम आपण पटकन उरकून टाकू या' अशा भावना त्याच्या चेहऱ्यावर होत्या. आमच्यात मात्र शौचकूप का खोदायचे यावर थोडासा वाद झाला. शेवटी ते आपल्याच हिताचे आहे हे कळल्यावर खणावयास जायचे ठरले. कामा सोन्द्रूला दुभाष्यांच्या बोलण्यावरून 'ते काम' आम्हाला आवडलेलं नाही हे जेव्हा मला कळले तेव्हा तो थोडासा कावराबावरा झालेला दिसला. पण जेव्हा आम्ही निघालो तेव्हा त्याला बरे वाटले. आमच्यातील कर्नल व काही वयस्क मेजरना आम्ही बसण्यास सांगितले व उरलेले आम्ही जेवढे तरुण होतो त्या सर्वांनी खणण्यास सुरुवात केली. कामा सोन्द्रू बाजूला बसून आम्हाला न्याहाळीत होता. खणण्याची आम्हाला सवय नव्हती म्हणून दमून आम्ही मध्येच थांबायचे. कधी कधी मातीने भरलेले घमेले हातातून पडायचे तेव्हा कामा सोन्द्रू एखाद्या लहान मुलासारखा हसायचा व चटकन पुढे येऊन मदत करायचा. त्याच्या या वागण्याने पहिल्याच दिवशी कामा सोन्द्रूने आमची मने जिंकली.

त्याचा चेहरा जरी इतर चिनी लोकांप्रमाणे मंगोलियन पद्धतीचा होता तरीही त्यात फरक होता. सर्वसाधारण चिनी लोकांच्या गोरेपणात लालसर छटा होती. पण ह्याच्या गोरेपणात फिक्या पिवळ्या रंगाची झाक होती. चिन्यांच्या व याच्या डोळ्यांच्या आकारातही फरक होता. हा शरीरानं त्यांच्यापेक्षा बराच धिप्पाड होता. त्याच्या चालण्यात जरी चपलता नव्हती तरी त्या संथपणातही एक आब होता. जेव्हा इतर चिनी ऑफिसर बोलत उभे रहात तेव्हा हा त्यांच्यापासून दूर उभा राही. प्रथम मला वाटले हा लेफ्टनंट म्हणजे हुद्द्याने सर्वांत छोटा ऑफिसर असल्यामुळे तसा दूर उभा राहत असेल. पण तसे नव्हते. त्याचे वागणे व बोलणे इतर चिनी सैनिकांपेक्षा निराळेच होते. तेव्हाच मला वाटू लागलं होतं की हा चिनी नसावा ! पण कदाचित हा त्यांच्यातीलच अत्यंत तरबेज हेर असावा व आपली दिशाभूल करून आमच्या मनातील काढून घेण्यासाठी तसा वागत असावा, असे वाटून त्यानंतर बरेच दिवस आम्ही त्याच्यापासून दूर राहू लागलो. पण जसजसे दिवस जात होते तसतसा कामा सोन्द्रू आमच्या जास्तच जवळ येत होता !

चिनी फौजेत तो लेफ्टनंट होता. आमच्यावर सतत नजर ठेवायचे काम त्याचे होते. शिवाय आम्हाला लाकडे तोडायला नेणे व रेशन आणायला नेणे ही कामेही त्याचीच होती. या सर्व कामामुळे तो जवळजवळ सबंध दिवस आमच्याच बरोबर असायचा.



**ले. कर्नल श्याम चव्हाण**

१९६२ साली झालेल्या भारत–चीन युद्धात चिनी सेनेने पकडलेल्या भारतीय युद्धकैद्यांचे 'कॅम्प्स्' चीनने तिबेटमध्येच ठेवले होते. तसे करणे त्यांना सर्वच दृष्टया सोयीचे होते. परंतु त्यामुळे त्यांनी नुसती सोयच साधली नाही, तर त्याहीपेक्षा अधिक काही साधले. त्यायोगे सीमेवरील तिबेटी जनतेला त्यांनी त्यांच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली. भारतीय युद्धकैद्यांना तिबेटमध्येच ठेवून चिन्यांनी तिथल्या तिबेटी जनतेला जणू दाखवून दिले की, आम्ही जर मनात आणले तर ज्या देशात तुमच्या दलाई लामाने आश्रय घेतला आहे त्या देशाचे पहा आम्ही काय करू शकतो ते ! मला वाटतं या एका कृतीने चीनने तिबेटी जनतेच्या मनात असलेली उरली–सुरली उठावाची भावनाही नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये ते थोडेफार यशस्वीही झाले. कदाचित त्यामुळेही असेल– तिबेटी जनतेच्या मनात उठावाच्या भावना पुन्हा उचंबळून यायला २९ वर्षांचा अवधी लागला !

त्यावेळच्या तिबेटमधील युद्धबंद्यांच्या कॅम्पमध्ये लेखक सहा महिने युद्धकैदी होते. त्या कॅम्पची सारी व्यवस्था व देखरेख चिनी सेनाच करीत होती. मात्र देखरेख करणाऱ्या त्या चिनी अधिकाऱ्यांत एक 'लेफ्टनंट' हुद्द्याचा तिबेटी तरुण होता. चिनी सेनेमध्ये नाईलाज म्हणून भरती झालेल्या त्या तरुण लेफ्टनंटचे–कामा सोन्द्रूचे सोबतच्या पानावरील रेखाचित्र लेखकाने काढलेले आहे.

आताशा आम्ही एकमेकांशी बोलू लागलो होतो. आमची भाषा मुख्यत्वे हावभावांची ! त्यात थोडे इंग्रजी, हिंदी व चिनी भाषेतील शब्द आम्ही वापरायचो. तो बुद्धीनेही तल्लख होता. एक गोष्ट मात्र माझ्या लक्षात आली की त्याला चिनी भाषा जेमतेमच येत होती. एक दिवस मी हसत हसतच त्याला त्याबद्दल विचारले. माझ्या शंकेवर तो हसला ! मग त्याने मला एका बाजूला नेले व खाली बस म्हणाला. मी बसल्यावर तोही बसला. जमिनीवरच्या वाळूत त्याने बोटानेच एक अंडाकृती गोल काढला व माझ्याकडे पाहत म्हणाला, 'चायना–चायना'. मी मानेनेच समजलो म्हटले. नंतर त्याने त्या गोलाकृतीला जोडून दुसरी लहान गोलाकृती काढली व म्हणाला, 'तिब्बत–तिब्बत'! मग प्रथम स्वतःच्या छातीला बोट लावलं व नंतर त्या गोलाकृतीत ठेवले. आश्चर्याने मी त्याला विचारले, 'Are you a Tibetian?' तो जोरजोरात मान हलवून होय म्हणाला ! मी त्याला कुतूहलाने परत विचारले, 'You know Dalai Lama ?' तो होय म्हणाला. मग त्यानं क्षणभर डोळे बंद केले व नमस्कार करतात तसे हात जोडले.

चिन्यांनी आता आमच्यावर 'ब्रेन वॉशिंग'चे प्रयोग सुरू केले होते. आम्हा कैद्यांकडून त्यांच्या राजकीय प्रचाराचे साहित्य वाचून घेणे, वादविवाद करण्यास लावणे, लाऊडस्पीकरवरून चिनी वर्तमानपत्रांतील अग्रलेख ऐकवणे वगैरे प्रकारांनी ते ब्रेनवॉशिंगचा प्रयत्न करीत. भारतातील भांडवलशाही राजवटीमुळे त्या देशात भयानक परिस्थिती आहे अशी चिनी जनतेची समजूत करून दिलेली होती, म्हणून दुभाषेही आम्हाला एखादी गोष्ट समजावताना खूप तळमळीने सांगण्याचा प्रयत्न करीत. याउलट आम्ही वादविवादात, त्यांच्या सरकारने त्यांना आमच्याबद्दलचे किती खोटे चित्र रंगविले आहे हे पटवून देत असू. शेवटी शेवटी 'तुमच्या चिनी सरकारने तुम्हा सर्वांनाच जगाबद्दल किती अज्ञानी ठेवले आहे, याची जाणीवही करून देत असू. 'तुमच्या सरकारचे दाखवायचे दात वेगळे व खायचे दात वेगळे' असे म्हटल्यावर कामा सोन्द्रूला मात्र खूप खूप आनंद व्हायचा. यानंतर कामा सोन्द्रू चिनी राजवट किती धोकेबाज आहे हे आम्हाला सांगण्याचा प्रयत्न करी. काही महिन्यांतच आम्ही एकमेकांशी विचारांची देवाण–घेवाण अत्यंत चांगल्याप्रकारे करू लागलो. एक दिवस मी त्याला, तिबेटी लोकांनी चिनी राजवटीच्या विरुद्ध केलेल्या उठावाबद्दल विचारले, तेव्हा त्याने मला त्याची पूर्वकहाणी सांगितली.

त्याचे गाव 'ल्हासा' शहराच्या जवळपास होते. गावातील लोक अत्यंत भाविक ! कामा सोन्द्रूच्या वडिलांची शेती होती. घरातील सर्वजण शेतावर काम करायचे. त्यांचे गाव हेच त्यांचे जग होते. कामा सोन्द्रू लहानपणी दोन - तीन वेळा ल्हासा शहरी गेला होता तिथे त्याने भारतातून आलेल्या व्यापाऱ्यांना पाहिले होते. शिवाय काही भारतीय साधूंनाही पाहिल्याचे त्याला आठवत होते. धार्मिक भावनांमुळे चीनपेक्षा भारतीय संस्कृतीच तिबेटी लोकांना जवळची होती.

१९५० साल उजाडले. तिबेटमधल्या शहरातून चिनी लोक जास्त प्रमाणात दिसू लागले. सुरुवातीला तिबेटी लोकांशी ते अतिनम्रतेने वागत. बाजारात विकण्यासाठी आणलेला माल चिनी व्यापारी भारतीय

व्यापाऱ्यांपेक्षा बऱ्याच कमी किमतीत विकत. हळूहळू तिबेटमधील सर्व बाजारपेठा चिन्यांनी काबीज केल्या. त्याच वेळेस भारताने तिबेटला दिलेली टपालसेवा भारताने काढून घेतली व चिनी टपालसेवा सुरू झाली. कुठे कुठे चिनी पोलिस दिसू लागले. बरेच चिनी युवक व युवती आता तिबेटच्या प्रमुख शहरांतून वस्ती करून राहू लागले. साध्या-भोळ्या तिबेटी जनतेला चीनच्या शहरी जीवनाचे रंगीत सिनेमे दिसू लागले. मग तिबेटी तरुण-तरुणींना पेकिंग शहराचे आमिष दाखवून त्यांना नव्या चिनी सरकारने स्वखर्चाने तिथे पाठविण्यास सुरुवात केली. तिथून रजेवर परत येणाऱ्या तरुण मंडळींनी शहरी जीवनाचे गुणगान गाण्यास सुरुवात केली. त्यातील काही तिबेटी तरुण मुले चिनी मुलींशी लग्नेही करून आली व परत गेली. आता काही तिबेटी तरुण चिन्यांसारखा पेहरावही करू लागले. यामुळे वडीलधारी तिबेटी मंडळी चिंतेत पडली. सर्वसाधारण तिबेटी माणूस हा आपल्या प्राचीन संस्कृतीला व पेहरावाला कधीच सोडू इच्छीत नाही; पण आता तसे वारे वाहू लागलेले पाहून ही मंडळी सावध झाली आणि जेव्हा चिनी पोलिस व चिनी सेनेच्या तुकड्या तिबेटमध्ये भराभर येऊ लागल्या तेव्हा जाणकार तिबेटी लोकांचे डोळे उघडले. चिन्यांचा डाव त्या सर्वांच्या लक्षात आला. प्रथम 'खम्पा' जातीच्या कडव्या जमातीने उठाव केला. हा उठाव चिरडून टाकण्यासाठी चिनी पोलिस व सेनेची कुमक मागविण्यात आली. आता तिबेटी जनतेला चिनी राज्यकर्त्यांची अरेरावीची वृत्ती दिसू लागली. तेव्हा या उठावाची लाट सर्व तिबेटभर पसरली. त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीचे बरेचसे कार्यकर्ते भूमिगत झाले व जंगलांत आश्रय घेऊन राहू लागले. कामा सोन्द्रूचा भाऊही भूमिगत झाला होता. ही बातमी चिनी फौजेला लागल्याबरोबर कामा सोन्द्रूच्या वडिलांना पकडून नेण्यात आले. जंगलात राहून क्रांतिकारी लोक चिन्यांच्या पोलिस व लष्करावर गनिमी हल्ले चढवू लागले होते; पण धार्मिक भावनेच्या या तिबेटी जनतेकडे सुरुवातीला बंदुकाच नव्हत्या. कालांतराने त्या परदेशातून येऊ लागल्या.

चिनी सेनेतील लेफ्टनंट कामा सोन्द्रू भावनावश होऊन मला सांगत होता— संध्याकाळच्या वेळी आकाशातून मोठमोठाली विमाने येत व क्रांतिकारकांसाठी पॅरॅशूटच्या साहाय्याने लाकडी खोक्यातून शस्त्रे व दारूगोळा टाकीत. हे सहाय्य कुठून येत होते याची तिबेटी जनतेला कल्पना नव्हती; परंतु ते बहुधा अमेरिका पाठवीत असावी असा त्यांचा अंदाज होता. हा उठाव काही काळ चालली. पुढे जेव्हा स्वत: दलाई लामाच भारतात निघून गेले तेव्हा ही मदत यायची बंद झाली आणि उठावाचा जोर कमी झाला. कामा सोन्द्रू रागारागाने मला सांगत होता की हे चिनी, जपानला क्रूर अत्याचारांसाठी दोषी ठरवितात. पण ह्याच चिन्यांनी तिबेटी जनतेवर काही कमी अत्याचार केले नाहीत. अखेर शस्त्रबळाच्या जोरावर चिन्यांनी तिबेटी जनतेचा उठाव साफ चिरडून टाकला. यामध्ये कामा सोन्द्रूचा क्रांतिकारी भाऊ मारला गेला. बऱ्याच दिवसांनंतर कामा सोन्द्रूच्या वडिलांना मुक्त करण्यात आले; पण चिनी फौजेने त्यांची जमीन ताब्यात घेतली. आता उदरनिर्वाहाचे साधनच नव्हते. घर कसे चालवावे हा प्रश्न होता! पुन्हा चिन्यांनी तिबेटी तरुणांना हाताशी धरले. उच्च शिक्षणाचे व नोकरीचे आमिष दाखवून त्यांना उत्तर चीनमधील अनेक शहरांत पाठविण्यात आले. धिप्पाड बांध्याच्या कामा सोन्द्रूला सैन्यात भरती करण्यात आले. सैन्यात असल्यामुळे त्याला तिबेटपासून नेहमीच दूर रहावे लागे. शिवाय तिबेटी लोकांना तिथे कनिष्ठपणाचीच वागणूक मिळे म्हणून कामा सोन्द्रूला ही नोकरी रुचत नव्हती.

आपण आपल्या कट्टर शत्रूच्याच सेनेत काम करीत आहोत ही खंत त्याला सतत टोचत असे व हे तो बोलून दाखवीत असे. मुसक्या बांधलेल्या अवस्थेत तो चाकरी करीत होता. त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या शत्रूची. पण उदरनिर्वाहाचा दुसरा मार्गही नव्हता. त्यात त्याचे आता लग्न झाले होते व त्याला एक लहान मुलगाही होता. हे सर्व दु:ख कामा सोन्द्रू निमूटपणे सहन करीत होता. मात्र आतून जळत होता. आपलं स्वातंत्र्य गेलं आहे व आपली संस्कृतीच नष्ट केली जात आहे या दुहेरी दु:खात कामा सोन्द्रूप्रमाणेच सर्व तिबेटी जनता झुरत होती!

आम्हाला युद्धकैदी होऊन आता सहा महिने होत आले होते. एक दिवस कामा सोन्द्रूनेच मला येऊन सांगितले की, युद्धकैद्यांना भारतात परत पाठविण्याच्या गोष्टी चालल्या आहेत. प्रथम आम्हाला हे खरे वाटेना! कारण या सहा महिन्यांत बाहेरच्या जगात काय चालले आहे याची आम्हाला काहीच कल्पना नव्हती. 'रेडियो पेकिंग'च्या ऐकविलेल्या बातम्या (!) वर तर आमचा विश्वासच नव्हता! मात्र मायदेशी परत जायला मिळणार हा नुसता विचारच सुखावह होता. आम्ही खूप आनंदात होतो. कामा सोन्द्रूही आमच्या आनंदात सहभागी व्हायचा. मात्र 'मला विसरू नको. तिबेटला विसरू नको.' असे तो मला सांगायचा. शेवटी एकदा आम्ही परत जाण्याचा दिवस उजाडला. आमच्या कॅम्पचे सर्वच चिनी अधिकारी आम्हाला सीमेपर्यंत सोडायला येणार होते. कामा सोन्द्रूही येणार होता. प्रथम आम्ही चिनी सेनेच्या गाड्यांमधून प्रवासाला सुरुवात केली. पुढे गाडीचा रस्ता संपल्यावर पायी चालायला लागलो. रस्त्यात कामा सोन्द्रू माझ्या बाजूनेच चालत होता. मात्र तो गप्पच होता! कदाचित हे लोक आता त्यांच्या स्वतंत्र भारतात परत जात आहेत, पण आपला तिबेट


# निलगिरीची शेती

दुसरी आवृत्ती
प्रसिद्ध झाली

**किं. रुपये पंधरा**

लेखक
**विनायक पाटील**

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**

कधी स्वतंत्र होईल का हा विचार त्याला सतावीत असावा. संध्याकाळ झाल्यावर आम्ही रस्त्यालगतच थांबलो. शेकोट्या पेटवून ती रात्र नदीकिनारीच काढली. त्या रात्री कुणीही झोपले नाही ! दुसऱ्या दिवशी पहाटे पुन्हा चालायला सुरुवात केली. दुपारच्या वेळेस दूरवर भारतीय हद्दीतील डोंगरांची उंच उंच हिमशिखरे आम्हाला दिसू लागली. अत्यानंदाने वेडे होऊ की काय वाटू लागले ! आम्हाला आनंदात पाहून कॅम्प कमांडर व त्याचे सहकारीही खूष होते. मी पाहिलं– कामा सोन्द्रू मात्र खिन्न चेहऱ्याने मान खाली घालून आमच्याबरोबर चालत होता. मी त्याच्याजवळ गेलो आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवला. त्याने मान वर करून माझ्याकडे पाहिले. त्याचे डोळे अश्रूंनी भरून आले होते. मी त्याला म्हटले ' 'कामा, नी श्रीग हावरिन ' (चिनी भाषेत– 'कामा, तू फार चांगला माणूस आहेस ') Today I go to my country – I will not forget you ' यावर कोटाच्या बाहीनेच त्याने डोळे पुसले व भरून आलेल्या आवाजात म्हणाला, 'शावचॉव ', (श्याम चव्हाण या नावाऐवजी याच नावाने तो मला हाक मारायचा)' One day I will come India– meet you– meet Dalai Lama.'

आज २५ वर्षे लोटली आहेत ! कामा सोन्द्रूला मी विसरलेलो नाही. त्याला मी विसरूच शकत नाही. हात हलवून आम्हाला निरोप देणारी त्याची केविलवाणी मुद्रा अजूनही माझ्या डोळ्यांसमोर येते. चिनी राजवटीच्या अत्याचारांमुळे निर्माण झालेली त्याच्या हृदयातील उद्वेगाची आच, माझ्या मनाला आजही चटका लावून जाते. तिबेटबद्दल बोलताना त्याच्या भारावलेल्या नजरेत तरळणारं त्याचं देशमुक्तीचं स्वप्न आजही मला आठवतं. आज कामा सोन्द्रू कुठे असेल ? मुसक्या बांधलेल्या अवस्थेत तो आजही चिन्यांच्या चाकरीत असेल काय ? बहुतेक नसेल. कदाचित तो या जगातही नसेल ! पण पंचविशीतील त्याचा मुलगा तिबेटमध्ये कुठेतरी नक्कीच आहे ! तेव्हा धुमसत असलेला त्या माझ्या कामा सोन्द्रूच्या धिप्पाड छातीतील प्रचंड ज्वालामुखी, आज त्या मुलाच्या रूपाने चीनची गुलामी झुगारून देण्यासाठी खदखदत असेल. □

---

# तिबेटच्या स्वातंत्र्येच्छेचे प्रतीक दलाई लामा

## मातृभूमीपासून दूर... तीस वर्षे होत आली.

**● दि. वि. गोखले ●**

दलाई लामांशी माझी प्रत्यक्ष भेट १९७४ सालच्या मे महिन्यात झाली, तरी त्यांची ओळख मात्र १९५४ वा १९५५ सालीच झाली असावी. माओ झेडाँगच्या (जुने नाव माओ त्से तुंग)कम्युनिस्ट चिनी सैन्याने १९५० साली तिबेटवर आक्रमण केले. तेव्हापासूनच मला त्या देशाबद्दल आपुलकी वाटू लागली होती. पुढे मूठभर लोकसंख्या (सुमारे ४० ते ५० लक्ष) असलेल्या त्या देशातील जनतेने चिन्यांशी गनिमी लढा सुरू केल्याच्या बातम्या येऊ लागल्या, तेव्हा माझ्या आपुलकीचे रूपांतर आदरात झाले. खुद्द दलाई लामांबद्दल मात्र फारशी माहिती उपलब्ध नव्हती. एक तर ते फारच तरुण ( जन्म ६ जून, १९३५) होते. आणि तो काळ भारतात तरी धर्मगुरूंची निंदानालस्ती करण्याचा होता. आपल्या देशातील कम्युनिस्ट पक्ष व त्यांचे ढोलवादक बनलेले सहप्रवासी यांच्या माओ–प्रशंसेला त्या काळी बहर आलेला होता. 'चीनने तिबेटमध्ये नानाविध सुधारणा चालविल्या आहेत; बुरसटलेल्या, साकळलेल्या सामंतशाहीमधून त्या देशाला आधुनिक युगात आणण्यासाठी चीन प्रश्नांची पराकाष्ठा करीत आहे. दलाई लामा व एकूणच लामांची टोळी पुराणयुगात वावरत आहे; आणि चीनने चालविलेल्या सुधारणांमुळे तेथील तरुण पिढी कट्टर लामाविरोधी बनली आहे.' असा त्यांच्या प्रचाराचा सूर होता.

या परिस्थितीत माझ्या हाती एक ग्रंथ आला. त्याचे नाव **'सेव्हन इयर्स इन टिबेट '**. लेखक आहे हाइनरिख हारेर नावाचा एक जर्मन. हा ग्रंथ मी दोन दिवसांत वाचून काढला आणि दलाई लामा कोवळा तरुण असला, तरी कट्टर देशभक्त, तसेच सुधारणाप्रिय राज्यकर्ता आहे, अशी माझी खात्री झाली.

हाइनरिख हारेर हा नामवंत गिर्यारोहक व ऑलिंपिक स्की चॅंपियन. आल्प्स पर्वताची सर्व शिखरे १९३५ सालपर्यंत धाडसी गिर्यारोहकांनी पादाक्रांत केली होती. आयगर नावाचे एकमेव शिखर अजिंक्य राहिले होते. या शिखरावर जाण्यासाठी ६७०० फुटांचा उभा कडा चढावा लागे. या प्रयत्नात अनेक गिर्यारोहक ठार झाल्याने त्या कड्यासंबंधात अनेक विचित्र लोककथा निर्माण झाल्या. स्वित्झर्लंड सरकारनेही खास परवानगीवाचून तो कडा चढण्यावर बंदी घातली. आयगरचे हे आव्हान हारेर व त्याच्या मित्रांनी स्वीकारले व ३८ साली ते शिखर सर केले.

हारेरच्या या पराक्रमाचे पारितोषिक म्हणून हारेरला नंगा पर्वताच्या मोहिमेसाठी पाचारण करण्यात आले. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी हिमालयाची विविध शिखरे निरनिराळ्या युरोपीय राष्ट्रांसाठी राखून ठेवलेली असत. एव्हरेस्ट शिखर ब्रिटिशांसाठी, अन्नपूर्णा-

फ्रेंचांसाठी तर नगा पर्वत जर्मनासाठी. नगा पर्वतावरील जर्मनाच्या चार मोहिमा फसल्या होत्या व त्यात काही गिर्यारोहकाचा मृत्यू घडला होता. यामुळे या शिखराची विस्तृत पाहणी करून एखादी नवी वाट मिळते का ते पहाण्याचे या मोहिमेच्या चालकानी ठरविले व त्यासाठी एक पाहणी पथक भारतात धाडण्यात आले. या पथकात मोहिमेचा नेता पीटर आउफश्नायटर याच्याबरोबर असलेल्या तीन गिर्यारोहकात हारेरही होता. त्याना नवी वाट सापडली व पुढील वर्षीच्या मोहिमेची तयारी करण्यासाठी त्यानी जर्मनीस प्रस्थान ठेवले. तेवढ्यात दुसरे महायुद्ध सुरू झाले. इंग्लडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले व सर्व जर्मन गिर्यारोहकाना कराची बंदरात अटक करण्यात आली.

परदेशी कैद्यासाठी ब्रिटिश सरकारने डेहराडून येथे छावणी उभारली. तेथे हारेर व त्याच्या सहकाऱ्याची रवानगी झाली. इटली युद्धात आल्यावर इटॅलियन कैद्याचीही या छावणीत भर पडली. छावणीत कैद्याचे हाल होत नव्हते, तरी बदिस्त राहणे हारेरच्या मनास पटेना. एका इटॅलियन जनरलबरोबर त्याने छावणीतून पोबारा केला व हिमालय गाठला. अठरा दिवस पोलिस व सामान्य लोकानाही चुकवीत ते तेहरी गढवालमध्ये येऊन पोहोचले. पण वन-खात्याच्या एका अधिकाऱ्याने त्याना पाहिले व त्याची पुन्हा डेहेराडूनच्या छावणीत रवानगी झाली.

मात्र हारेर निराश होऊन बसला नाही. २९ एप्रिल, १९४४ रोजी त्याने फिरून छावणीतून पलायन केले. यावेळी त्याच्याबरोबर त्याचा गिर्यारोहक स्नेही पीटर आउफश्नायटर होता. भारत व नेपाळ सरकारच्या अधिकाऱ्याना त्यानी चुकविले व तिबेटमध्ये प्रवेश केल्यावर तिबेटी अधिकाऱ्याना चकवले. परकीयाना आपल्या देशात प्रवेश करू देण्यास तिबेटी लोक अत्यंत नाखूष असत. म्हणून बनावट सर्टिफिकिटे दाखवून व भारतात व नेपाळात परत जातो, असे सागून हारेरला तिबेटी अधिकाऱ्याची अनेकदा दिशाभूल करावी लागली. यामध्ये अक्षरशः जीवघेण्या वाटानी त्याना प्रवास करावा लागला. केवळ प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर साडेआठ महिन्यानी, म्हणजे २५ जानेवारीच्या उत्तरार्धात ते राजधानी ल्हासात येऊन पोहोचले. सुदैवाने त्याना तेथे आश्रय मिळाला व मार्च ५१ अखेर त्याचा मुक्काम तिबेटातच होता. ४४ ते ५१ ही हारेरची तिबेटातील सात वर्षे

ही माहिती विस्ताराने देण्याचे कारण, हा ग्रथ प्रत्येक तरुणाने वाचावा, अशी माझी शिफारस आहे. कादबरीला लाजविणारी साहस-कथा तर येथे सापडेलच; पण तिबेटचा रौद्र निसर्ग व तिबेटी जनतेचे जीवन याची भरगच्च नि पूर्वग्रहविरहित माहिती या ग्रंथात मिळेल.

हारेर व आउफश्नायटर याना ल्हासात आश्रय तर मिळालाच; शिवाय तेथील सरकारातील मत्री व धनिक मंडळींनी त्याच्या आधुनिक तत्रज्ञानाचा उपयोग करून घेण्याचे ठरविले. प्रथम काही मडळीच्या घरापुढे बगीचे सुधारण्याचे काम त्याना देण्यात आले. आउफश्नायटरला नतर एक कालवा बनविण्याचे व हारेरला धरण बाधण्याचे काम देण्यात आले. दलाई लामा यावेळी अवघे तेरा वर्षांचे होते. चवदावे दलाई लामा म्हणून त्याना अभिषेक होण्यापूर्वी त्यांची तयारी चालू होती. हळूहळू दलाईपर्यंत हारेरची कीर्ती पोहोचली व दलाईचे ट्यूटर म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली.

## प्रगतिशील व्यक्तिमत्त्व

दलाईंच्या बुद्धिमत्तेच्या व प्रगतिशीलतेच्या अनेक कथा हारेरनी या ग्रथात दिल्या आहेत. धर्मनेता व राज्यप्रमुख बनणाऱ्या या मुलाला पोताला प्रासादातून वाटेल तेव्हा बाहेर पडता येत नसे. त्यामुळे हा मुलगा दुर्बिणीतून ल्हासा शहराचे निरीक्षण करताना आढळे. या मुलाला हळूहळू कॅमेरा व प्रॉजेक्टर याचे आकर्षण निर्माण झाले हारेरना त्याने तिबेटमधील उत्तमोत्तम मंदिरांचे, मठांचे व मिरवणुकाचे माहितीपट बनविण्यास सागितले. हे माहितीपट दाखविण्यासाठी एक चित्रपटगृहही त्यानी बनवून घेतले. हारेर लिहितो– 'एका मठाचे वा मिरवणुकीचे चित्रीकरण करावयाचे ठरले की, त्यातील कोणत्या घटकाना महत्त्व द्यावे, याच्या लेखी सूचना दलाई देत.'

एक दिवस दलाईंनी हारेरना आश्चर्याचा धक्का दिला. एक प्रोजेक्टर सपूर्ण खोलून तो ते पुन्हा जुळवीत होते. दलाईंना इंग्रजी येत नव्हते. तथापि पुस्तिकेतील आकृत्याच्या सहाय्याने त्यांनी हे काम केले. जगातील नाना प्रकारची माहिती ते हारेरना विचारीत व तिबेटच्या जनतेसाठी कोणत्या सुधारणा करता येतील याची चर्चा करीत.

लामाना ठराविक पद्धतीचीच वस्त्रे परिधान करावी लागतात. आपल्या रामदास-पंथीयांप्रमाणे एक वस्त्र कमर व छातीभोवती ते गुडाळतात. बाल दलाईंनी मात्र प्रासादात वावरत असताना घालण्यासाठी खिसे असलेला एक कोट बनवून घेतला होता हेतू हा की, त्यात स्क्रू ड्रायव्हरसारखी छोटी हत्यारे ठेवता यावीत. घड्याळे जमविण्याचा त्याचा छद होता. स्वतःच्या खाजगी पैशातून ते विविध प्रकारची घड्याळे खरेदी करत, ती उलगडून परत जुळविण्याची त्याची हौस असे. तिबेटी लिपीतून इंग्रजी शब्दाची ओळख त्यांनी करून घेतली. अनेक दैनिके व विविध विषयावरील नियतकालिके ते भारतातून आणवीत.

१९५० ऑक्टोबरात चीनने तिबेटवर आक्रमण केले. दलाई लामा त्यावेळी भारताच्या सीमेकडे निघाले. त्याना चिन्यानी पकडू नये यासाठी मत्रिमडळाने त्याना हा सल्ला दिला होता. दलाईंबरोबर हारेरही होते पुढे तिबेट व चीन याच्यात करार झाला व आणखी काही आश्वासनानंतर दलाई लामा ल्हासाला परतले. हारेर मात्र भारतात आले व तेथून मायदेशी रवाना झाले.

हाइनरिख हारेरबरोबर आपण बरेच पुढे आलो. म्हणून प्रथम सध्याचे दलाई लामा ह्या पदावर कसे आले हे पाहिले पाहिजे. दलाई लामा हे तिबेटचे सर्वोच्च धर्मप्रमुख तसेच राज्यप्रमुखही आहेत. दलाई याचा अर्थ काय ? ही कथाही मजेदार आहे. चेंगीझखानाच्या मंगोल वशाने तेराव्या शतकापासून दीर्घकाल चीनवर, मात्र त्यापेक्षा कमी काळ तिबेटवर राज्य केले. मंगोल लोकांचा या देशात बौद्ध धर्माशी सबध आला व त्यांनी त्या धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्माचार्य चीन व तिबेट दोन्ही देशात होते, तरी मगोल राज्यकर्त्यांवर प्रभाव असे तिबेटी धर्मगुरूचा. म्हणजे लामाचा. चेंगीझखानाचा

नातू कुबलाईखान याने चीनवर राज्य केले. पण त्याच्यावर छाप होती तिबेटी शाक्य लामाची. त्याच्याच प्रभावामुळे त्याने शाक्य पथाची दीक्षा घेतली.

चौदाव्या शतकात ग्याल्टत्सेन नावाच्या पराक्रमी तिबेटी सरदाराने मगोल सैन्याला तिबेटमधून हुसकावून लावले. तरीही तिबेट व मगोल याच्यातील धार्मिक सबंध कायम होते. सोळाव्या शतकाच्या अखेरीस सोनाम ग्यात्सो नावाच्या एका विद्वान लामाने मंगोलियाला भेट दिली. तेथील राजा अल्तनखान याने आपल्या दरबारात स्तोनामचा सत्कार केला व त्याला 'दलाई' ही पदवी बहाल केली. दलाई म्हणजे विद्वत्तेचा सागर. सोनाम स्वतःला तिसरा दलाई म्हणवी. सध्याचे दलाई लामा हे चौदावे.

मात्र, दलाई लामा हे पद वशपरंपरागत नाही. दर वेळी सामान्यत: निराळ्या कुटुबातला पुरुष दलाई लामा बनत आहे. तेरावे दलाई कर्तृत्ववान होते, १९१० साली चिनी सैन्य तिबेटात शिरले व त्यानी ल्हासा शहर काबीज केले, तेव्हा दलाई भारतात ब्रिटिशाच्या आश्रयाला आले. लगेच ११ साली चीनमधील मांचू घराणे सत्ताच्युत झाले, तेव्हा तिबेटी लोकानीही उठाव केला व अनेक चिनी सैनिकाची कत्तल करून उरलेल्याना पळवून लावले. पाठोपाठ दलाई भारतातून परतले व १३ साली तिबेटच्या स्वातंत्र्याची घोषणा त्यानी केली. चिनी सम्राटाची मोहोर त्यानी फेकून दिली. भगवान बुद्धाच्या आज्ञेने म्हणून राज्यकारभार सुरू केला.

१९३४ साली तेरावे दलाई मरण पावले. तिबेटची श्रद्धा अशी की दलाईंचा पुनर्जन्म तिबेटातच होतो. या अवताराची ओळख पटवून घेऊन त्याला दलाई लामापदी आरूढ करण्याची कामगिरी इतर लामाकडे असते.

तेरावे दलाई गेल्यावर तीन, साडे-तीन वर्षांनी नव्या दलाई लामाचा शोध सुरू झाला. तो वेळपर्यंत एक बालक आजूबाजूच्या लोकात कौतुकाचा विषय होऊन बसले होते. त्याचे नाव ल्हामो तोड्रुप. हा मुलगा प्रकृतीने सुदृढ होता, तो रडत नसे व भावाबहिणीशी व इतर मुलाशी भाडत नसे. प्रवृत्तीने तो धार्मिक होता व आपल्या आईसमवेत बुद्ध मूर्तीसमोर तो दीर्घ काळ बसून राही. ॐ मणिपद्मे हुम् हा मत्रही तो दिवसात अनेकदा जपे.

मात्र नव्या अवताराचा शोध घेणाऱ्या लामा-पथकांपर्यंत ही कीर्ती गेली नव्हती. कारण तिबेट-चीन सीमेवरील चिनी हद्दीत असलेल्या आमडो प्रांतातील एका खेड्यात हे बालक होते. अखेर लामा श्रेष्ठीना हा अवतार आमडो प्रातात असल्याचा दृष्टात झाला. एक दिवस शोध-पथक ल्हामोच्या घरी आले. त्याच्यापाशी तेराव्या दलाई लामाची जपमाळ, त्याची फिरण्याची काठी, तसेच इतर अनेक वस्तू होत्या. हुबेहूब या वस्तूंसारख्याच दिसणाऱ्या वस्तूही बनवून घेऊन त्यानी आणल्या होत्या. ल्हामोच्या वडिलाशी काही औपचारिक बोलणे झाल्यावर पाहुणे मडळी ल्हामोला म्हणाली- बाळ, यातल्या तुला हव्या त्या वस्तू निवडून घे!

ल्हामोचे आईवडील, तसेच शोध पथकातील मडळीही श्वास रोखून छोट्या ल्हामोच्या हालचालीकडे पाहू लागली. ल्हामोने सहजपणे तेराव्या दलाई लामाच्या वस्तू निवडल्या.

पहिली कसोटी सपली. पाहुण्यांनी छोट्या ल्हामोला काही धर्मविषयक प्रश्न विचारले. ल्हामोच्या मुखाने एकादा वृद्ध पंडितच बोलत होता.

गौतम बुद्धाच्या नव्या अवताराचा शोध लागला. चौदावा दलाई लामा तिबेटी जनतेला मिळाला.

तिबेटी जनतेचा, या निवड प्रक्रियेवर तसेच ल्हामोच्या या कर्येवर विश्वास आहे. थोर व्यक्तीबद्दल सर्वत्र अशा कथा प्रसृत होतात. माओ त्सेडाँग वृद्धापकालात यांगत्से नदीत अनेक तास पोहत होते, अशी वार्ता बीजिंग नभोवाणीने दिली होती व चिनी कम्युनिस्टाचे भारतीय भाट गभीरपणे ते सर्वांना सागत असत.

दलाई लामा या वेळपासून ल्हासात पोताला व नोरबुलिका या प्रासादात राहू लागले तेथे त्याचे धर्मशिक्षण चालू होते. सर्वोच्च लामापदी अभिषेक होण्यापूर्वी, धर्मगुरूच्या सभेत त्याना आपल्या ज्ञानाची परीक्षा द्यावी लागली. त्या वेळी हारेर उपस्थित होते. ते म्हणतात-' दलाईंवर ज्येष्ठ तिबेटी गुरूनी प्रश्नाचा भडिमार केला. उपरोधिक भाषेतही काही प्रश्न विचारण्यात आले. तथापि दलाईंनी शातपणे विद्वत्ताप्रचुर उत्तरे दिली. हा तरुण आपणास भारी आहे, याबद्दल सर्व धर्माचार्यांची खात्री पटली असावी.'

## नेहरूंचा सल्ला मानला

१९५० साली चीनचे सैन्य तिबेटच्या हद्दीत शिरले. मात्र, तिबेट मुक्त करण्याची घोषणा माओने एक वर्ष आधी म्हणजे ऑक्टोबर ४९ मध्ये केली होती. या मधल्या काळात माओने तिबेटी जनतेला एक आवाहन केले. दलाई लामाची जुलमी सरंजामशाही राजवट उलथून टाका, असे हे आवाहन होते. चौदावे दलाई त्या वेळी अवघ्या पधरा वर्षांचे. राज्यकारभार आधीच्या दलाईंनी नेमलेला प्रतिनिधी पाही. स्वाभाविकच, आपल्या आवाहनास प्रतिसाद मिळेल, अशी माओची अपेक्षा असावी. मात्र झाले उलटेच. तिबेटी मंत्रिमंडळाने छोट्या दलाईच्या हाती सर्वाधिकार दिले.

आपल्या सैन्याची दलाईंनी लगोलग पाहणी केली. सैन्यापाशी आधुनिक शस्त्रास्त्रे नाहीत, त्याना युद्धतंत्राचे शिक्षण नाही हे त्याना कळून चुकले तरीही त्यानी युद्धाचा निर्णय घेतला व त्याचवेळी भारताकडे मदत मागण्यासाठी प्रतिनिधी मंडळ रवाना केले.

चिनी सैन्य सीमा ओलाडण्याच्या तयारीत आहे असे दिसताच तिबेटी सैन्याचीही आघाडीवर जमवाजमव सुरू झाली. चिन्यानी प्रत्यक्ष आक्रमण सुरू स्वत: केल्यावर दलाई भारतीय सीमेनजीकच्या याटुग ठाण्याकडे निघाले. तिबेटी सैन्य शौर्याने लढले, पण त्याचा पराभव अटळ होता याचा फायदा घेऊन चिन्यानी पचेन लामाशी वाटाघाटी केल्या व १७ कलमी चीन-तिबेट करार घोषित करून टाकला. दलाईंना डावलण्याचा माओचा डाव होता. पण तिबेटी लोकाच्या हे लक्षात आल्यावर घातपाताचे प्रकार होऊ लागले. त्यावर तिबेटातील चिनी सेनापती दलाई लामाना याटुग येथे जाऊन भेटला. तिबेटच्या स्वायत्ततेची हमी त्याने दलाईंना दिली. पंचेन लामाना समांतर सत्ता म्हणून उभा करणार नाही, अशी हमी दिली. यानतर दलाई लामा ल्हासास परतले.

या वेळपासूनचे दलाई लामाचे चरित्र व तिबेटचा अलीकडला इतिहास विभिन्न नाहीत. दलाई लामाचे स्वातत्र्यप्रेम, जनतेबद्दलची

त्याची कळकळ, त्याची बुद्धिमत्ता आदी गोष्टींचा पडताळा आल्यामुळे तिबेटी जनतेने त्यानाच नेता म्हणून आपल्या हृदयात स्थान दिले आहे.

चिन्यानी दलाईंना आश्वासने दिली खरी; पण माओ व चाऊ एन लाय याच्या मनातील आसुरी महत्त्वाकांक्षा मदावल्या नव्हत्या. तिबेट ही चीनची वसाहत करण्याची त्याची योजना होती. तीनुसार मोठ्या सख्येने चिनी सैन्य तिबेटात येऊ लागले. पाठोपाठ तज्ज्ञ म्हणून शेकडो चिनी अधिकारी आले. त्याच्यासाठी घरे बाधली गेली नि त्याची बायकामुले येऊन दाखल झाली. रस्ते तयार होऊ लागले. मात्र, प्रथम हात घालण्यात आला, चीन ते ल्हासा व ल्हासा ते भारतीय सीमा याना जोडणाऱ्या महामार्गांना. लडाखमधील भारताचा १२ हजार चौरस मैलाचा प्रदेश चिन्यानी बेकायदा बळकावला व त्यातून सिंकिआंगपर्यंत रस्ता काढला. तिबेट–भारत व्यापार चीन सरकारने जवळपास बदच पाडला. मग हे रस्ते कोणासाठी व कशासाठी होते ?

ल्हासातील चिनी अधिकारी प्रारंभी सौजन्याने वागत. हळूहळू ते नखे बाहेर काढू लागले. '५४ एप्रिलमध्ये भारत व चीन याच्यात पचशील करार झाल्यावर तर चिनी अधिकारी विनधास्त झाले. यातून मार्ग काढण्यासाठी दलाई लामानी '५४ च्या उत्तरार्धात बीजिंगला भेट दिली. माओ–चाऊनी त्याचे स्वागत उत्तम केले. पण आश्वासनाखेरीज स्वायत्ततेबाबत ते प्रत्यक्ष काही हाती लागू देईनात.

या निराशाजनक परिस्थितीत '५६ साली दलाई लामा भारतात आले. पुढे मी त्याना भेटलो (मे, १९७४), त्यावेळी आपल्या त्या भारत–भेटीचा उद्देश काय होता, असा प्रश्न मी त्याना विचारला होता

दलाई लामा म्हणाले, 'चिन्याना मी विटलो होतो. तिबेटी जनतेसाठी चिनी अधिकारी मला काही करू देईनात. तेव्हा तिबेटात चिन्याचा हस्तक म्हणून राहण्यात काही अर्थ नाही, या निष्कर्षाप्रत मी आलो होतो.'

**मग आपण परत का गेलात ?— माझा प्रश्न.**

दलाई लामा : 'त्याचवेळी चाऊ एन लायदेखील भारतात आले होते. प. नेहरूंची त्याच्याशी तिबेटबाबत चर्चा झाली असणारच त्यानंतर माझी पडितजीशी मुलाखत झाली, तेव्हा तिबेटला परत न जाण्याचा विचार मी बोलून दाखविला. पडितजीना धक्का बसल्यासारखे झाले. ते म्हणाले— थांबा, 'मी चाऊशी पुन्हा बोलतो.'

त्यानुसार चाऊशी त्याची बोलणी झाली, तेव्हा चाऊनी त्याना सागितले की, तिबेट हा चीनचा अविभाज्य भाग असला तरी इतर चिनी प्रातापेक्षा तो वेगळ्या स्वरूपाचा आहे, असे आम्ही मानतो. म्हणून १७ कलमी करारात मान्य केलेली स्वायत्तता आम्ही तिबेटमध्ये अमलात आणू !

मी ल्हासाला परत जावे, तिबेटी जनतेला ते हितावह ठरेल, असा सल्ला नेहरूनी दिला व मी ल्हासाला परतलो.

तिबेटला परतल्यावर दलाई लामानी चाऊनी नेहरूना दिलेल्या आश्वासनाबद्दल मत्रिमडळाला माहिती दिली व हळूहळू जनतेलाही ते सागण्यास प्रारभ केला. परिणामी चिनी सतापले व त्याचा जुलूम वाढू लागला. पूर्व तिबेटात खपा जमातीचे लोक राहतात. बेभान लढवय्ये अशी त्याची पूर्वापार ख्याती आहे. मनाने व शरीराने ते मजबूत असतात. या खपानी गनिमी उठाव केला चिनी सैनिक गनिमी युद्धातूनच तयार झालेले माओने जपान्याशी व चिअँग कै शेकच्या फौजेशी लढताना गनिमी काव्याचाच आश्रय घेतला होता. मात्र, तिबेटमधील चिन्यापाशी अद्ययावत शस्त्रास्त्रे होती, वाहने होती. खपाकडे गावठी बदुका व घोडे वा याक होते. तथापि त्यानी अनेकदा चिन्यांनाही चकित केले. लढा लाबत गेला, तेव्हा खंपाना आधुनिक बदुका मिळू लागल्या. चार वर्षे हा लढा चालू होता. शेकडो चिनी मारले गेले. ठार झालेल्या खपाची सख्या साठ हजार असावी. तीस लक्ष लोकसख्येशी हे प्रमाण ताडून पाहण्यासारखे आहे अखेर दलाई लामानीच खंपाना युद्ध थांबविण्याची सूचना दिली.

चिनी अधिकारी एका बाजूस दडपशाही करीत होते, तर दुसऱ्या बाजूला तिबेटी तरुणाना इतरापासून अलग करण्याचा त्याचा उद्योग चालू होता. तरुण–तरुणीचे मेळावे भरवून, प्रतिगाम्याना खलास केले पाहिजे असे ते सागत. चिनी सेनापती जनरल तान कुआन एका मेळाव्यात म्हणाला : मास कुजले की माशा गोळा होतात. त्यावर उपाय कुजके मास फेकून देणे हाच असतो. हे कुजके मास म्हणजे अर्थातच तिबेटी मत्रिमडळ व लामा ही सस्था.

वातावरण वरकरणी शात पण आतून तापत होते. अशातच चिनी सेनाधिकाऱ्यानी दलाई लामाना एका नाट्य–प्रयोगाचे निमंत्रण दिले. हा प्रयोग लष्करी छावणीत होणार होता. चिनी अधिकारी काही वेळा अशा प्रयोगांसाठी दलाईंना बोलावीत; पण बरोबर ५–१० तिबेटी मंत्र्याना वा ज्येष्ठ अधिकाऱ्यानाही निमत्रणे देत. यावेळी अशी निमत्रणे नव्हती. पुढे दलाईंबरोबर त्याच्या शरीर–रक्षक पथकाने येऊ नये, एक–दोन रक्षक पुरेत, असा निरोप चिन्याकडून आला.

या बातम्या ल्हासात पसरल्या व नाट्य–प्रयोगाच्या निमित्ताने चिनी सैन्य दलाईंना अटक करून बीजिंगला नेणार, अशी तिबेटींची भावना झाली. १० मार्चला (१९५९) नाट्य–प्रयोग होणार होता. त्यादिवशी सकाळपासून शेकडो लोक गटागटाने घोषणा देत नोखुलिंका प्रासादाकडे येऊ लागले व त्यानी प्रासादाला घेराव घातला. दलाई लामा याच प्रासादास होते.

हळूहळू जमाव वाढत गेला व प्रासादात येणाऱ्या व आतून बाहेर जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची झडती जमाव घेऊ लागला. पचमस्तभी असलेल्या एका माणसाला बुकलून बुकलून ठार मारण्यात आले. दलाई लामाना बाहेर जाऊ न देण्याचा जमावाचा निर्धार होता.

चिनी अधिकाऱ्यांनी ध्वनिक्षेपक बसविलेली एक जीप दुपारपासून जमावाच्या आजूबाजूने फिरवून नाट्य–प्रयोग रद्द झाल्याचे जाहीर केले. तथापि जमाव घेराव उठविण्यास तयार नव्हता.

यावर उपाय म्हणून दहशत–तत्राचा अवलब करण्यात आला. १४ मार्च रोजी चार मोठ्या तोफा व २८ भारी मशिनगन्स चिन्यानी ल्हासात आणून मोक्याच्या जागी उभारल्या दुसऱ्या दिवशी आणखी २० तोफा आल्या लष्करी ट्रक्सची वर्दळ चालू झाली. १७ मार्चला दूर अतरावर मॉर्टर्स गोळ्याचे दोन स्फोट घुमले.

आता दलाई लामाना निर्णय घेणे भाग होते. निवडक तिबेटी

नेत्यांना विश्वासात घेऊन घेरावमधून एक वाट त्यानी मोकळी करून घेतली. तीतून दलाई आवश्यक परिवारासह बाहेर पडले. ( १८ मार्च ) व त्यानी भारताची वाट धरली. त्याचे पलायन लक्षात यायला चिन्याना ४८ तास लागले. दलाईनी चिन्यावर मात केली. जनतेच्या अपूर्व जिद्दीमुळेच हे शक्य झाले. चिनी विमानाची टेहळणी चुकवीत अरुणाचल प्रदेशाच्या कामेंग डिव्हिजनमधील तावाग येथे ३१ मार्च रोजी ते प्रविष्ट झाले. तावागला प्रसिद्ध बौद्ध मठ आहे.

भारताने त्याना आश्रय द्यावा हे स्वाभाविक म्हटले पाहिजे. भारत–तिबेट सबध असाधारण स्वरूपाचे (Extra-ordinary ) आहेत, असे विचार दलाईंनी माझ्यापाशी बोलताना व्यक्त केले होते. ते म्हणाले, ' राजकीय वा आर्थिक असे या सबधाचे व्यावहारिक स्वरूप नाही. समान सस्कृती व समान जीवनमूल्याचा वारसा हा *आपल्या सबधातला अतूट दुवा आहे व जोपर्यंत हिमालय, मानस* सरोवर, बौद्ध धर्म व सस्कृत भाषा अस्तित्वात राहतील, तोपर्यंत प्रत्येक भारतीयाला तिबेटबद्दल सहानुभूती वाटत राहाणार आणि आम्ही तिबेटी सहकार्यांसाठी, मदतीसाठी भारताकडेच येत राहणार... '

## चिनी आश्वासने–मोडण्यासाठीच ?

दलाई लामा कसे आहेत ? ते भारतात आल्यावर सुमारे सव्वा महिन्याने (८ सप्टेंबर) विख्यात पत्रकार फ्रँक मोराइस यानी त्यांची दिल्लीत भेट घेतली. मोराइस लिहितात– ' पूज्यपाद ( His Holiness) स्वामी हा एक लोभसवाणा तरुण आहे. ते बुद्धिवान व चाणाक्ष आहेतच; शिवाय काही विषयांबद्दलचे त्याचे ज्ञान अद्ययावत आहे तर अनेक विषयाबद्दलची माहिती करून घेण्यास ते उत्सुक दिसले. *त्याचे वागणे मित्रत्वाचे व अनौपचारिक होते. मी त्याना* जेवढे प्रश्न विचारले, तेवढेच त्यानीही मला विचारले.

मी जगातले कोणकोणते देश पाहिले आहेत असा प्रश्न त्यानी मला केला तेव्हा बऱ्याच देशात मी जाऊन आलो, असे मी सांगितले. ' चीनला गेला होतात ?' मी उत्तरलो – हो, दोनदा. क्वामिटाग (चिअँग कै शेक) राजवटीत एकदा व एकदा कम्युनिस्ट राजवटीत.

यावर दलाई चीन व तिबेटबद्दल बोलू लागले. ' आम्ही संयुक्त राष्ट्राकडे नव्याने आवाहन केले आहे; त्याला भारताने पाठिंबा द्यायला नको का ?' त्यानी प्रश्न केला.

हा प्रश्न वाटाघाटीनी (चीनशी) सोडवावा, असे मत पतप्रधानांनी सूचित केल्याचे मला ठाऊक होते. तरीही तिबेटच्या आवाहनाला भारताने पाठिंबा दिला पाहिजे, असे माझे मत असल्याचे मी म्हणालो.

रशिया व चीन *याच्या सबधाबाबत मी बोलू लागलो. त्यात* रशियासबंधी बोलण्यास दलाई नाखूश दिसले. मी त्यावर खोल विचार केलेला नाही, एवढेच ते उद्गारले.

बीजिंगबाबत मात्र ते एकाग्रतेने ऐकत. माओची आश्वासने नतर मोडण्यासाठीच दिलेली असतात असे मी म्हणताच ते एकदम उद्गारले– ' बरोबर, कम्युनिस्ट चीनचा तो प्रघातच दिसतो.'

दलाई लामांनी सर्व उत्तरे तिबेटी भाषेतून दिली. तरी सोपे व थेट इग्रजी प्रश्न त्यांना समजले असावेत, अशी माझी भावना झाली.

मी जायला उठलो तेव्हा दलाई उभे राहिले व त्यानी माझ्याशी हस्तादोलन केले त्याची पकड मला मजबूत वाटली. '

¤

दलाई लामानी भारतातच राहण्याचा निर्णय घेतल्यावर काही महिन्यानी भारत सरकारने हिमाचल प्रदेशातील धर्मशाळा येथे कायम निवासासाठी त्याना जागा दिली. धर्मशाळा हे ६–७ हजार फूट उंचीवरील रम्य स्थान आहे. दलाई पाठोपाठ शेकडो तिबेटी निर्वासितही जवळपास वस्ती करून राहू लागले. मॅक्लॉईडगज नावाच्या गावानजिक तिबेटी बाधवाची वस्ती आहे. प्रारभी ते निर्वासित होते तरी आता त्यानी उपजीविकेची साधने शोधली असल्याने त्याचा फारसा बोजा भारत सरकारवर नाही गेली २०–२५ वर्षे ही मडळी तेथे राहत आहेत. तथापि त्याचा कोणालाही उपद्रव झालेला नाही

' माओचे लष्करी आव्हान ' या माझ्या पुस्तकाची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध करण्यापूर्वी दलाई लामांची भेट घेण्याचे मी ठरविले १९७४ सालच्या २८ मे रोजी सकाळी धर्मशाळा येथील त्याच्या निवासस्थानी मुलाखत ठरली

दोन दिवस आधीच मी *धर्मशाळा येथे जाऊन* दाखल झालो. मुलाखतीच्या आदल्या दिवशी दलाईंच्या मठात जाऊन त्याचे कार्यवाह तेर्नझिंग ग्येशे याना भेटलो. दलाई लामा धर्माचार्य व परदेशस्थ तिबेट सरकारचे प्रमुख आहेत. तेव्हा त्याच्या भेटीसाठी काही विशिष्ट शिष्टाचार आहेत काय, असे मी ग्येशेना विचारले तसेच काही स्वरूपाचे प्रश्न विचारू नयेत अशी त्याची इच्छा आहे काय, प्रश्नाची यादी आधी हवी आहे काय, याही गोष्टी विचारल्या.

ग्येशे हा प्राजळ व बहुश्रुत माणूस वाटला. ते म्हणाले– भेटीसाठी कसलेही उपचार नाहीत, आणि प्रश्नावर निर्बंध नाहीत. वाटेल ते प्रश्न विचारा. आधी प्रश्नांची यादी देण्याचीही आवश्यकता नाही.

दुसऱ्या दिवशी (२८ मे, ७४) सकाळी अकरा वाजता मठात पोहोचताच, ग्येश्येनी मला एका भव्य दिवाणखान्यात नेले. ' बूट काढायला हवेत ?' ' काही जरूर नाही, चला तसेच ' – ग्येशेंचे उत्तर.

आम्ही दिवाणखान्यात पोहोचतो तोच दलाई लामा सुस्मित वदनाने पुढे आले व माझे हात हातात घेऊन त्यांनी मला एका सोफ्यावर बसवले. या अनपेक्षित सन्मानाने स्वाभाविकच मी भारावून गेलो.

आपण चित्रात पाहतो त्यापेक्षा दलाई लामा अधिक थोराड व सुदृढ वाटले. उची ५ फूट ८ इच असावी. खादा व मान याच्यामधून ते वस्त्र गुडाळतात त्याचे खादे रुंद व भक्कम आहेत व मनगटही रुंद आहे. दलाईंचे वय तेव्हा चाळीस वर्षांचे होते नि प्रकृती दृष्ट लागण्याएवढी उत्तम होती.

मी प्रश्न इग्रजीतून विचारीत होतो. श्री. ग्येशे त्याचा तिबेटीत अनुवाद करीत व दलाई अर्ध तिबेटीत व अर्ध इग्रजीत उत्तरे देत माझे इग्रजी प्रश्न त्याना पूर्णपणे समजत असावेत. काही वेळा ग्येशे *याच्या अनुवादाने समाधान होत नसे. तेव्हा ते हाताने नाही, नाही* अशी खूण करीत व स्वत. इग्रजीत उत्तरे देत. त्याचे इंग्रजी अस्खलित नव्हते; मात्र त्याची शब्दयोजना अचूक होती. दलाई लामा

इंग्रजी कोठे शिकले, असे मी मागाहून ग्येशे यांना विचारले; तेव्हा ते म्हणाले असेच बोलता बोलता.

माझा कोणताही प्रश्न दलाईंनी टाळला नाही वा गुळमुळीत उत्तर दिले असेही घडले नाही. सर्व उत्तरे नि:संदिग्ध व सडेतोड होती. एकाच आवाजात म्हणजे शांतपणे ते उत्तरे देत होते. मात्र, काही झाले तरी चिन्यांना तिबेटी वंश नष्ट करता येणार नाही; तसेच तिबेट स्वतंत्र होईपर्यंत आमचा लढा थांबणार नाही, हे सांगताना त्याच्या आवाजाला धार असल्याचे मला जाणवले

मुलाखत संपली तेव्हा माझी खात्री पटली होती की, मातृभूमी सोडताना (१९५९) या पुरुषाच्या हृदयातील चीनविरोधी अग्नी जेवढा प्रदीप्त होता तेवढाच तो पधरा वर्षानंतरही आहे.

मुलाखत पूर्वी प्रसिद्ध झाली असल्यामुळे पुन्हा ती सगळी उद्धृत करण्यात हशील नाही, तथापि दोन महत्त्वाचे प्रश्न देतो.

**प्रश्न :** समजा चिन्यांनी तिबेटवर आक्रमण केले नसते तर आपण लोकांनी सरजामशाही व्यवस्था नाहीशी केली असती का ?

**दलाई लामा :** सरंजामशाही व्यवस्था कालबाह्य झाली असल्यामुळे ती नष्ट करण्याचा प्रयत्न आम्ही निश्चितपणे केला असता. जगात काय चालू आहे हे आम्ही पाहत होतो. राजकीय, तसेच सामाजिक क्षेत्रात सुधारणा करायला हव्यात हे आम्हाला पटले होते. मला चिनी राजवटीबद्दल राग होता. तरीही काही सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांच्याशी मी सहकार्य केले. अर्थात चिनी राज्यकर्त्यांनी ज्या वेगाने सुधारणा घडवून आणल्या त्या वेगाने आम्ही त्या घडवून आणू शकलो नसतो हे मी नाकारीत नाही. कारण राजकीय जागृतीखेरीज सामाजिक सुधारणा होत नाहीत, आणि राजकीय जागृती चिनी आक्रमणामुळे आली. एखाद्या भूकपासारखा प्रचंड धक्का तिबेटला बसला. चिनी नसते तर नवी समाजव्यवस्था आणायला आम्हाला उशीर लागला असता व आम्हाला विरोधही अधिक झाला असता हे खरे, तथापि आम्ही सुधारणा आणल्यावाचून राहिलो नसतो.

**प्रश्न :** चिन्यांनी सुधारणा आणल्या हे आपण मान्य करता. मग आपला त्यांच्याशी लढा कशासाठी आहे ?

**दलाई लामा :** चिन्यांनी शाळा काढल्या, रस्ते बांधले, धान्योत्पादन वाढविले, इस्पितळे उभारली हे सत्य आहे. पण याचा फायदा कोणाला मिळाला ? स्थानिक तिबेटी लोकांना ? मुळीच नाही. सारे फायदे मिळाले ते चिनी लोकांना. धान्य गेले तिबेटातील चिनी सैनिकांकडे वा चीनला निर्यात झाले. इस्पितळाचा उपयोग होतो तो चिनी सैनिकांना. रस्ते मुख्यत वापरले जातात ते लष्करी वाहतुकीसाठी. तिबेटींना काय मिळते ? त्यांच्या नशिबी आली आहे केवळ वेठबिगार !

चीनमध्ये माओ गेला आणि डेंग झिआओ पिंग आला. माओच्या सास्कृतिक क्रांतीने केलेला विध्वंस त्याने पाहिला होता, नव्हे तो स्वत: त्या तथाकथित क्रांतीतील अत्याचाराचा एक बळी होता चीनमध्ये त्याने विध्वंसाच्या खुणा पुसून टाकण्यास प्रारंभ केला, नि तिबेटमध्येही आपण काही कमावलेले नाही हे त्याच्या ध्यानात आले. तेथील सहाशे मठांचा विध्वंस झाला होता. ते मठ पुनरपि दुरुस्त करण्याचे काम चालू झाले आहे तिबेटी शेतकऱ्यांवर गहू पिकवण्याची सक्ती होती. आता फिरून त्यांना त्यांचे आवडते जवाचे पीक काढण्यास परवानगी देण्यात आली आहे. सक्तीच्या सामुदायिक शेतीच्या काचातून त्यांची मुक्तता होत आहे आमच्या लाल प्रचारकांची मौज अशी की ते माओचे ढोल पिटत असत आणि आता तेवढ्याच जोराने डेंगचेही बडवीत आहेत.

स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नसते, हे लो टिळकांचे वचन सुविख्यात आहे. डेंग माओपेक्षा बरा, म्हणजे दगडापेक्षा वीट मऊ, इतपतच. कम्युनिस्ट समाज व्यवस्थेतील मूलभूत जुलूम तो नाहीसा करू शकणार नाही. तिबेटमध्ये सध्या तिबेटी लोकांपेक्षा चिन्यांची वस्ती अधिक आहे १९५७ साली ल्हासाची लोकसंख्या देहा हजार होती. आता ती दीड लक्षाच्या पुढे गेली आहे. मात्र यापैकी दोन तृतीयांश चिनी आहेत डेंग त्यांना चीनमध्ये परत नेऊ शकणार नाहीत स्वायत्त, स्वतंत्र तिबेटलाच ते काम करावे लागेल.

सुदैवाने, दलाई लामांची स्वातंत्र्येच्छा आजच्या घटकेलाही पूर्वीएवढीच उत्कट आहे नि त्यांचा 'करिष्मा' अणुमात्र कमी झालेला नाही. स्वतंत्र तिबेटचा आवाज जगात मधूनमधून ऐकू येतो तो त्यांच्यामुळेच. अमेरिका व चीन गेली काही वर्षे मित्र बनले आहेत. तरीही अमेरिकन प्रतिनिधी सभेने ( हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज् ) तिबेटमध्ये मानवी हक्कांची पायमल्ली होत असल्याबद्दल चीनचा निषेध करणारा प्रस्ताव एकमताने संमत केला. ( जुलै ८७ ) पर्यटन व्यवसाय वाढविण्याच्या उद्देशाने का होईना, पण चीनने ल्हासाचे प्रवेशद्वार पर्यटकांसाठी उघडले होते. अनेक पाश्चात्त्य पर्यटकांनी याचा फायदा घेऊन तिबेटला भेट दिली व तेथील जनतेची दु:खे जगासमोर टागली. अमेरिकन सरकारने दलाई लामांना निमंत्रित केले. ( सप्टेंबर ८७ ) ह्यानुसार दलाईंनी गेल्या सप्टेंबरात तेथे दौरा केला. त्यांच्या भाषणांनी अमेरिकन जनता व वृत्तपत्रे प्रभावित होऊन गेली.

चिनी राज्यकर्त्यांचा तडफडाट झाला व तिबेटमध्ये त्यांनी दलाईंविरुद्ध जोरदार प्रचार मोहीम उघडली. दलाई देशद्रोही आहेत, तिबेटमध्ये ते पुन्हा सरंजामशाही आणू इच्छितात, असे चिनी वृत्तपत्रे लिहू लागली. नभोवाणीवर रोजच्या रोज हे ऐकविले जाऊ लागले.

परिणाम ? दलाई लामांच्या अमेरिकेतील भाषणातील घोषणांची भित्तिपत्रके रातोरात ल्हासात झळकली. २७ सप्टेंबरला ल्हासात चीनविरुद्ध पहिले निदर्शन झाले, आणि कम्युनिस्ट क्रांतीच्या दिनी म्हणजे १ ऑक्टोबरला (१९८७) ल्हासाच्या प्रमुख चौकात प्रचंड उग्र निदर्शने सुरू झाली. यात लामा होतेच, पण मोठ्या प्रमाणावर स्त्री-पुरुष व मुलेही होती. चिनी पोलिसांनी गोळीबार केला त्यात किमान दोन डझन तिबेटी ठार व अनेक घायाळ झाले. अशीच निदर्शने इतर गावातही झाली. तिबेटचा आत्मा चिन्यांना शरण गेलेला नाही. दलाई लामांनी मातृभूमी सोडल्याला तीस वर्षे होत आली पण तिबेटी जनतेचे तेच एकमेव नेते आहेत. इतर कोणालाही ती जनता ओळखत नाही.

भारतासमोर राजनैतिक अडचणी असतील, पण कोणत्या देशासमोर त्या नसतात ? त्यातूनच मार्ग काढून आपण तिबेटी स्वायत्ततेच्या मागणीला भक्कम पाठिंबा दिला पाहिजे. १९५० साली भारताने वरलीही हालचाल केली नाही, म्हणून तिबेटवर चिनी साम्राज्य आले. चीनने तिबेट व्यापला म्हणून आपली उत्तर सीमा धोक्यात आली म्हणून तिबेटचे स्वातंत्र्य भारताच्या सरक्षणासाठी आवश्यक आहे. ह्याशिवाय ती आपली नैतिक जबाबदारी आहे.

एका छोट्या, निरपराध राष्ट्राचे हरपलेले स्वातंत्र्य आपण परत मिळवून देऊ शकत नसलो, तर भारताच्या मोठेपणाला काय किंमत? □

तिबेट स्वतंत्र होणं हे भारताच्या फायद्याचं आहे.

# सांग-पो सांगतोय...

● विनय सहस्रबुद्धे ●

मुंबईला परळ स्टेशनाच्या पूर्वेला आत-एक मोठा उड्डाणपूल झालाय. लाल-बागच्या दिशेनं हा पूल जिथे उतरतो तिथंच उजव्या हाताला परळ पोस्टाची गल्ली नावाची चारचौघींसारखी एक साधीसुधी गल्ली आहे. गल्लीच्या तोंडाशी बहुमजली इमारती आहेत, पुढे पुढे मात्र झोपडपट्टीवजा चाळींचा पसारा. मूळ वस्ती मुख्यतः देशा-वरनं गेलेल्या कामकऱ्यांची. यात काही मुसलमानही आहेत. आतून मराठी–वरून हिंदी ' असं मुंबईचं टिपिकल म्हणता येईल असंच, याही वस्तीचं भाषिक चित्र आहे.

या गल्लीच्या दुसऱ्या टोकाला डावीकडे उभ्या–आडव्या पसरलेल्या बैठ्या चाळींच्या भाऊगर्दीत, माणसांच्या मोहोळात मधनंच वसक्या चेहरेपट्टीची, पिवळसर अंगकांतीची नि उथळ डोळ्यांची मुलं–माणसं दिसतात. जरा शोधक नजरेन बघावं तर अशा परक्या चेहऱ्याच्या माणसांची बरीच मोठी संख्या असावी असा अंदाज येतो. गाठोड्यात स्वेटर्सच्या घड्या नीट बांधून ठेवणाऱ्या मंगोलॉईड चेहऱ्याच्या बाया दिसतात, काळ्या–सावळ्यांच्या पोरवड्यात पिवळ्या गोरेपणानं उठून दिसणारी पोरं दिसतात, नि सिगरेटी फुंकत दिवसभराचा हिशेब जुळविणारे बाप्येही दिसतात.

या वस्तीतले हे सगळे तिबेटी लोक आहेत. जरा हिवाळ्याची चाहूल लागतेय न लागतेय तोच गावोगाव स्वेटर्स विकायला जाणारे, शंभर रुपये किंमत सांगून चाळीसातही विकायला तयार होणारे हे लोक आपल्याला वाटतात तसे नेपाळी लोक नाहीत. ही मंडळी थंड प्रदेशातली, त्यामुळे ते स्वतः हातानं विणून आणलेले स्वेटर्स विकतात असाही एक लोकप्रिय गैरसमज आहे, पण तोही इथं वस्तीत आल्यावर दूर होतो. चक्क लुधियानातून आलेल्या हजारो स्वेटर्सची खोकी हारीनं रचलेली, अशी काही गोडा-उन्सही या वस्तीत आहेत.

दहा डिसेंबरचा मानवाधिकार दिन संपूर्ण देशभर विद्यार्थी–परिषदेनं 'तिबेट' दिन म्हणून पाळला. त्या निमित्तानं या वस्तीतल्या तिबेटींपैकी काही तरुण, अर्ध-शिक्षित पण सक्रिय अशा कार्यकर्त्यांच्या प्रकट मुलाखतींचे किंवा भाषणाचे कार्यक्रम योजले होते. 'तिबेटन यूथ काँग्रेस' या तिबेटी निर्वासितांच्या भारतातल्या संघटनेच्या मुंबई शाखेचा एक पदाधिकारी डी. टी. जिग्मे, आणखी एक कार्यकर्ता थुप तान आणि १९८० मध्ये तिबेटातून पळून आलेला एक लामा 'लामा' जामयांग सांग–पो अशा तीन प्रमुख मंडळींना मी भेटलो. आणि कादंबरी म्हणून लिहायला घेतली तर पॅपिलॉनसारखी एक कथा आकाराला यावी इतकी हृद्य, रोचक कहाणी ऐकायला मिळाली.

परळ पोस्टाच्या गल्लीतल्या वस्तीत भेटलेलं हे त्रिकूट नेहमीकरता मुंबईत राह-णारं नाही. भारतात आसाम, हिमाचल प्रदेश, आंध्र, महाराष्ट्र आणि कर्नाटकात वेगवेगळ्या ठिकाणी वसविल्या गेलेल्या तिबेटी वसाहतींपैकी कर्नाटकात धारवाड जवळ टिटाली येथे असलेल्या एका वसा-हतीत जिग्मे, थुप तान आणि सांग–पो हे तिघंही राहतात. दरवर्षी हिवाळ्याच्या सुरुवातीला हे लोक वसाहत सोडून मुंबईत येतात नि परळ पोस्टाच्या गल्लीतल्या वस्तीत पोट–भाडेकरू म्हणून राहतात. चार महिने मुंबईत स्वेटर्सचा धंदा करतात नि कमाई करून पुन्हा टिटालीत परततात.

सतीश कुलकर्णी, प्रकाश पाटील या परिषद कार्यकर्त्यांबरोबर आदल्या दिवशी जाऊन थुप तानला भेटून, 'दुसऱ्या दिवशी येतो आहोत' असं मी सांगून आलो होतो. त्यामुळे संध्याकाळी सात–साडेसातला गेलो तर तिघंही तयारच होते. वस्तीच्या तोंडा-शीच एक स्वेटर्सचं स्टोअर–रूम आहे. आम्ही आलो म्हणताना साफ–सूफ करून, जमिनी-वरच चटई घालून तिघंही जण बसले.

जिग्मे आणि थुपतान हे दोघेही तरुण. वयाच्या पाचव्या वर्षापासून थुप तान तिबे-टच्या बाहेरच आहे. जिग्मेही तसाच. साहजिकच तिबेटच्या त्यांच्या आठवणी तशा नावापुरत्याच. त्यामुळे या गप्पांच्या कार्य-क्रमांचा नायक झाला तो मध्यमवयीन सांग–पो ! जिग्मे हा त्यातल्या त्यात चार बुक शिकलेला. सांग–पोला हिंदी–इंग्रजीतून बोलणं जमत नाही, त्यामुळे जिग्मेलाच दुभाष्याची कामगिरी करावी लागली.

या मुलाखत नायकाचं पूर्ण नाव जामयांग सांग–पो. राजधानी ल्हासापासून सुमारे २०० कि. मी. अंतरावरच्या चेडाँग या गावात तो राहायचा. शेती हा घरातला पिढीजाद व्यवसाय. आजमितीस त्याचं वय सुमारे पन्नास वर्षांचं ! लग्न झालेलं नाही. त्यामुळे वर्तमानातल्या त्याच्या कुटुंबात तोच तेवढा सदस्य.

**: १९४९ साली तिबेटवर चीनचं अति-क्रमण नि त्या वेळच्या काही आठवणी आठवतात ?**

या प्रश्नाला कसंनुसं हसून तो उत्तरला, 'आठवतं खूप, पण खरे म्हणजे ते फार लक्षात ठेवण्यासारखं नाही. १९४९ ते ५९ या दहा वर्षांत चीननं नागरी स्वरूपाचं अतिक्रमण केलं. आल्या आल्या लगेचच त्यांनी आपले लष्करी पाय पसरले नाहीत.

सरजामशाहीच्या जोखडातून तिबेटी जनतेला मुक्त करण्यासाठी आपण आलो आहोत अशी तारणहाराची भूमिका त्यानी घेतली होती. कुठे कुणावर भेटीचा वर्षाव कर, आणखी कुठे शिक्षणाच्या सोयी-सवलती दे, असा लोकानुरंजनाचा सगळा प्रकार चिनी आक्रमकानी चालविला होता. मोठ्या हुशारीनं आम्हाला वश करून घेण्याचे नानाविध प्रयत्न चिन्यानी चालविले होते. पुढे १९५९ नतर त्यानी लष्कर आणल नि आमच्यावर अनन्वित अत्याचाराना सुरुवात झाली.

**: तुमच्या चेडांग गावाबद्दल काही आठवतं ?**

'आठवत ना ! गाव खूप टुमदार होते. तिबेटात खेचर हेच वाहतुकीच साधन. वडिलाबरोबर मी ल्हासा या आमच्या राजधानीच्या गावी जायचो. तेव्हा सतत सात दिवस खेचरावरन प्रवास व्हायचा.'

**: इतके दिवस ? खेचराचा वेग तरी किती असतो ?**

'दिवसाला ३० मैल. पण आम्हाला वाहतुकीसाठी खेचरावाचून दुसरा पर्यायच नाही. आमचा बौद्ध धर्म औद्योगीकरणाच्या विरोधात आहे होता होईतो यत्र वापरायची नाहीत, अशी आमची पद्धत आहे. त्यामुळे नद्यावरती पूल नाहीत. ब्रह्मपुत्रेला आमच्या भागात यालुग या नावाने ओळखतात. तिच्यावरही एकही पूल नव्हता. अशा स्थितीत खेचराशिवाय वाहतुकीसाठी आणखी काय वापरणार ? १९६० मध्ये चिनी सेना आमच्या गावात घुसली तेव्हापासून पूल-बिल बाधायला सुरुवात झाली.

**: चिनी सेना आल्या, त्यावेळच्या वातावरणाबद्दल त्यांनी केलेल्या कारवायांबद्दल सांगाल ?**

. सेना गावागावातनं घुसल्या आणि हाहाकार माजला. बदुकाचे दस्ते रोखत सैनिकाच्या झुडीच्या झुडी घराघरावर आल्या अवघी कुटुबच्या कुटुब त्यानी हुसकून लावली. माणस बाहेर काढायची, चीजवस्तू सरकारात जमा करायची आणि धान्य-धुन्य सेनेनं आपल्या ताब्यात घ्यायच या पद्धतीनं सेनेची सुलतानी सुरू झाली. घराला बाहेरून कुलूप आणि सील ठोकून आमची मालमत्ताही त्यानी गिळंकृत केली

'घराबाहेर काढलेल्या सगळ्या गावकऱ्याची मग छाननी व्हायची. तरुण, धट्टेकट्टे किंवा प्रौढांपैकी निवडक प्रतिष्ठित अशाना सरळ अटक करून उरलेल्या बाया-बापड्या आणि कच्ची-बच्ची या सगळ्यांना त्यानी सोडून दिल. माझ्या वडिलानाही अटक झाली आई आणि भावंडासह मग आमच्या हालअपेष्टाना काही सीमाच उरली नाही. अगावरच्या कपड्यानिशी आम्ही देशोधडीला लागलो. तुमचा विश्वास बसणार नाही, पण अक्षरशः गवत आणि घास खाऊन आम्ही महिना-महिना गुजराण केली. नेसायला कपडे नव्हते, तेव्हा दगडांचा आडोसा उभा करून नदीच्या पात्रात आघोळी केल्या.

**: तुमच्या वडिलांना अटक केलं होतं. त्यांचं आणि अटकेतल्या इतरांचं पुढे काय झालं ?**

'आम्ही जेलबाहेर हालअपेष्टांत होतो आणि ते आतमध्ये. पण शारीरिक हाल परवडले, असे त्यांचे मानसिक छळ झाले. आठवड्यातनं एकदा रविवारी, त्यांना जेलच्या गाडीतनं गावातल्या मध्यवर्ती मैदानात आणायचे जेलबाहेरच्या इतर गावकऱ्यानाही ठरलेल्या वेळी मैदानात जमण बधनकारक होतं अटकेतनं आलेल्याना मधोमध उभे करायचे आणि आम्हाला त्यांच्याभोवती उभं करून त्यांच्या विरोधात अर्वाच्य शिव्या आणि जहरी टीकेची भाषणं करायला लावायचे. हा सगळा मेंदू सफाईचा (ब्रेन-वॉशिंग) प्रकार होता. ज्यांना अटकेत ठेवलेलं आहे तेच आमच्या सध्याच्या दुर्दशेला जबाबदार आहेत असं आमच्याकडून सक्तीनं वदवून घ्यायचे !

## सांस्कृतिक क्रांतीनंतर..

हा सगळा संवाद मी स्वत आणि सांग-पो यांच्यात व्हाया जिग्मे असा सुरू होता. सांग-पो तसा फार वयस्कर वगैरे नसला तरी आठ-दहा वर्षांच्या मनाच्या आणि शरीराच्या छळांमुळे त्याच्या चेहऱ्यावर आणि बोलण्यातही अकाली वृद्धत्वाच्या खुणा वाचता येण्याइतपत ठळक आहेत. स्पष्ट आणि सलग बोलण त्याला बरंच कठीण जात होत. मग मधूनमधून 'थेने, थेने' (तिबेटी भाषेतला अर्थ, 'पुढे') म्हणत सभाषणाची गाडी आमच्या दुभाष्याला पुढे न्यायला लागायची.

साग-पो पुढे म्हणाला, 'सहासष्ट सालापासून चीनमध्ये सास्कृतिक क्रातीच वार आल, ते तिबेटलाही चांगलच भोवलं. सास्कृतिक क्रातीच्या या काळात आमची पुरातन तिबेटी संस्कृती होत्याची नव्हती झाली. जुन्या, परपरेन चालत आलेल्या अशा सगळ्या गोष्टीचा पार विध्वस झाला. आम्ही तिबेटी बौद्धामध्ये केस न कापता वाढविण्याची पद्धत आहे; पण सास्कृतिक क्रातीत केस कापण सक्तीचं झाल. जुन्या शैलीतली चित्रं, जुनी देवळं, इमारती सगळ भुईसपाट झालं आणि ते ही सक्तीन, आमच्याच हातून आणि आमच्याच डोळ्यादेखत सैनिकांच एखादं टोळक यायच नि समोरच्या एखाद्या स्तूपाकडे, बुद्ध-मदिराकडे बोट दाखवून सागायच की हा स्तूप किंवा हे मदिर चोवीस तासाच्या आत भुईसपाट व्हायला हवं. तुम्ही ज्या देवाला भजता त्यान तुमची सरजामशाही कधी घालविलीय ? मग तो काय कामाचा ? चला, कुदळी घ्या नि हे अवशेष तोडून टाका' खरच, इतका भीषण प्रसग होता तो... कुदळी आणि पहारी घेऊन आम्ही फक्त मदिरेच उद्ध्वस्त केली नाहीत, आमच आमचं अस जे भावविश्व होत त्यालाही मूठमाती दिली !

साग-पोशी भेट होण्याआगोदर माझी अशी समजूत होती की, तिबेट हे 'स्वतत्र राष्ट्र' म्हणून एकेकाळी नादल असल तरी तिथही सस्कृती ही बरीचशी चीनशीच मिळतीजुळती असणार कम्युनिस्ट राष्ट्र असूनही चीनमध्यें बौद्ध धर्माला महत्त्वाच स्थान असेल असही वाटल होत; पण साग-पो वेगळच सागत होता. तो म्हणाला, 'चिन्यांना बौद्ध धर्माविषयी अजिबात प्रेम नाही. खर सांगायच तर कोणत्याच धर्माविषयी नाही. बौद्ध धर्माच्या भारत-शाखेविषयी तर तिरस्कारच दिसून येतो. याच सास्कृतिक क्रातीच्या लाटेत आमच्यावर चिनी शिक्षण पद्धती लादली गेली. आमच्याकडे तिबेटी भाषेसाठी देवनागरीला जवळची अशी एक खास तिबेटी लिपी प्रचलित होती, पण सास्कृतिक क्रातीनतर चिनी लिपी आमच्या बोकाडी बसली.'

तिबेटातही सास्कृतिक क्रातीनतरची अवस्था म्हणजे साग-पोच्या सागण्यानुसार

नुसती अंदाधुंदी किंवा बेबंदशाही. कायद्याचं राज्य नावाची चीजच उरली नव्हती आणि तथाकथित क्रांतिद्रोही व्यक्तींना अटक करण्याच्या अधिकारांचा सेनेकडून सर्रास दुरुपयोग होत होता. अटकसत्राच्या अशाच एका वावटळीत सांग-पो सापडला आणि १० मे १९७० ते १९७७ अशी तब्बल सात वर्षं सांग-पोनं कारावासात काढली, अर्थातच १००% निरपराधी असूनही !

'सुरुवातीस मी शिगात्से जेलमध्ये होतो. शेवटी, माझ्या सुटकेबाबतचा अंतिम निर्णय होण्यापूर्वी जेमतेम महिनाभर शिगात्सेचं जिल्ह्याचं ठिकाण असलेल्या लिमिशिआन कारागृहात मला पाठवलं गेलं. जितक्या आश्चर्यकारक पद्धतीनं मला अटक करण्यात आली तितक्याच आश्चर्यकारक पद्धतीने जेलमधून माझी सुटकाही झाली. आनंदाची गोष्ट म्हणजे माझ्या बरोबरीने त्यांनी माझ्या बहिणीचीही सुटका केली.

'सुटका होताच क्षणी आम्ही दोघांनीही ठरविलं की, इतःपर तिबेटात राहायचं नाही. आणि नाहीतरी तिबेटात आमचं काय उरलं होतं ?

१९६० नंतर दलाई लामाही भारतात आश्रय घेऊन होते. आमच्या कैक नातेवाईकांनीही भारताला जवळ केलं होतं. त्यामुळे भारताविषयी एक जबरदस्त ओढ आमच्या मनात होती. २३ वर्षांच्या बहिणीला घेऊन, बर्फिल्या थंडीत आणि निर्मनुष्य पण घनदाट जंगलातून सुमारे दीड-दोनशे किलोमीटरचे अंतर चालून जाणं सोपं खासच नव्हतं; पण आमची जिद्द विलक्षण होती. तिबेटात ठाण मांडून बसलेल्या चिनी आक्रमकांविषयी इतका जबरदस्त तिटकारा आमच्या मनात होता की, काय वाट्टेल ते होवो, तिबेट सोडून भारताच्या आश्रयाला जायचं हा आमचा वज्रनिर्धार राहिला.

'या वज्रनिर्धाराच्या बळावरच भारताच्या सीमेपासून जेमतेम वीस-पंचवीस कि. मी. अलीकडे गंगटोकच्या उत्तरेला थसांग मोनॅस्ट्री नावाचं एक धर्मक्षेत्र आहे, तिथपर्यंत आम्ही पोचलो. पण या शेवटच्या टप्प्यातच कुणीतरी आमच्या पलायनाची माहिती चिनी सैनिकांना दिली, परिणामतः चिनी सेनेच्या सशस्त्र सैनिकांनी आमच्यावर अचानक छापा घातला आणि आम्ही पकडले गेलो. खूप वाईट वाटलं. एकदम पहाटे पहाटेच पुन्हा रात्र सुरू झाल्यासारखे आम्ही खूप निराश झालो. तेवीस वर्षांच्या माझ्या निरपराध बहिणीसह माझी पुन्हा एकदा शिगात्से जेलमध्ये रवानगी झाली. महिन्यादोन महिन्यातच जिल्ह्याच्या ठिकाणी म्हणजे लिमिशिआन कारागृहात आम्ही कोंडले गेलो.

'याच जेलमधनं, कशी कोण जाणे; पण माझ्या बहिणीची महिनाभरातच सुटका झाली. या उलट माझ्या हालअपेष्टांत मात्र भरच पडली होती. त्यांच्या लेखी मी विशेष धोकादायक कैदी होतो, त्यामुळे या ना त्या प्रकारे छळण्याचे प्रकार सुरू झाले.

'चिनी जवान कुत्र्याचं मांस खातात. अशा, फस्त केलेल्या कुत्र्याचं चामडं शिवून त्याचा बिछाना तयार करायचं काम माझ्या वाट्याला आलं. इथंच मला एक सच्चा, जिवाला जीव देणारा मित्र भेटला. जेलमधनं पळण्याची जबरदस्त इच्छा हा आम्हा दोघांना जोडणारा दुवा होता. सुदैवानं आम्हाला दोघांनाही जेलच्या आवारात बगिच्याचं काम दिलं गेलं. या बगिच्याच्या बाहेर कच्च्या विटांनी बांधलेली भली थोरली भिंत होती. आमच्याकडे पक्क्या, नीट भाजलेल्या विटा वापरण्याची पद्धत नाही, त्यामुळे या कच्च्या विटांच्या भिंतीवर रोज पाणी मारून त्या मऊ पडतील व नंतर त्यात भगदाड पाडून सटकणं सोपं जाईल या हिशोबाने आम्ही योजना तयार केली आणि एक दिवस खरोखरच याच मार्गानं जेलच्या बाहेर पडून पुन्हा भारताचा रस्ता धरला.

## तिसरा कारावास

लिमिशिआनच्या दक्षिणेला आम्ही चालत राहिलो. सतत सात दिवस, विशेषतः रात्री, सर्वांची नजर चुकवून आम्ही चालत होतो. जेलमध्ये रोज शंभर ग्रॅम सत्तूचं पीठ आम्हाला मिळायचं, त्यातलं जे बचत करून बरोबर आणलं होतं, त्यावर गुजराण चालली होती. आमच्या जवळचं अन्न संपायला नि दूरवर भटक्या जमातीच्या लोकांचा एक तंबू दिसायला एकच गाठ पडली. पण प्रत्यक्ष तिथं गेल्यावर मात्र आमची निराशा झाली. बर्फाच्छादित पहाडावरच्या तंबूत मनुष्यवस्तीची चिन्हं नव्हती. अन्नधान्या-



**सांग-पो, तिबेटची हाक**

□

चाही पत्ता नव्हता. नाही म्हणायला प्राणी मारायला उपयोगी अशी काही लोखंडी शस्त्रं मिळाली. त्या शस्त्रांचा उपयोग करून खेचरं, कुत्री किंवा मिळतील ते प्राणी, पक्षी मारायचे नि खायचे या पद्धतीनं सुमारे दीड महिना आमची गुजराण झाली. रोज असं कच्चं मांस खाल्ल्याने मी स्वाभाविकच आजारी पडलो आणि तब्येत इतकी बिघडली की बरोबरच्या साथीदाराला जवळच्या एका गावात औषधासाठी पिटाळणं भाग पडलं आणि इथंच नेमकं दुर्दैव आड आलं. औषध घेऊन परतणाऱ्या माझ्या मित्राला पोलिसांनी पाहिलं नि पाठलाग सुरू केला. शेवटी तोही पकडला गेला नि पाठोपाठ माझीही रवानगी पुन्हा एकदा शिगात्सेच्या जेलमध्ये झाली.

'शिगात्सेच्या भिंतींआडचा माझा तिसरा

कारावास म्हणजे चिन्यांच्या अमानुष छळ-काडाची हकीगत आहे. चाबकाच्या फटक्यानी मारमार मारून शेवटी हातात बेड्या बाधून नि साखळदडाच दुसरं टोक खेचराच्या पायाला बाधून फरपटत फरपटत मला जेलपर्यंत नेण्यात आले. १९७७ ते १९७९ ही अडीच–पावणेतीन वर्षे मी २४ तास साखळदडात बाधलेल्या स्थितीत घालविली. दिवसातन तीन वेळा नैसर्गिक विधीसाठी सोडायचे उभ्या उभ्याच झोपायच, उभ्या उभ्याच जेवायचे. असे सगळे हाल चालले होते पुढे पुढे तर आमच्यातल्या माझ्यासकट सर्व 'खतरनाक' कैद्याना वेगळ काढून त्याच्या गळ्याभोवती लाकडाचा त्रिकोणी खोडा अडकवून सबध जेलमधून आमची धिंड काढायला सुरुवात केली. हेतू हाच की जास्त गडबड केली तर काय होत याचा बोध इतर कैद्याना घेता यावा.

'सतत पावणेतीन वर्षं आघोळ नाही. अगाला पाण्याचा स्पर्श नाही. साहजिकच माझ्या त्वचेला कीड लागल्यासारखी अवस्था झाली. डोक्यात किडे झाले, पाय, हात सुजले, तळपायाला फोड आले. सगळ शरीर एकदम 'टाकाऊ' झाल्यासारख झाल मनगटावर बेड्या होत्या. त्याखालचा उरला सुरला मासल भाग सुजून सुजून फुटला नि बेड्या त्यात घट्ट रूतून बसल्या. सबध अंगाला घाण वास यायला लागला. हे सगळं असह्य झाल्यानतर मी स्वतःच मुकादमाला ओरडून सागितल की, कृपा करून आता मला लौकरात लौकर फाशी द्या आणि यमयातनातून मोकळं करा.

'पण बहुधा या यातनाकांडातून वेगळ्या पद्धतीनं मुक्त होण्याची वेळ आली होती. सांस्कृतिक क्रातीचा काळ सपला होता आणि हुआकुवो फेंगची राजवट आली होती तिबेट बद्दलच्या त्याच्या काहीशा उदार धोरणाचा भाग म्हणून आमची लगेचच सुटका करण्यात आली. मृत्यूच्या दारातन मी परत आलो तो असा...'

सांग–पोच प्रदीर्घ निवेदन संपलं, तरी माझा प्रश्न अनुत्तरितच होता.

**'सुटका झाल्यावर तुम्ही भारतात कसे आलात?' –मी विचारले**

'सुटकेनतर तीन–चार महिने विश्राती घेतली. तब्येत चांगली झाल्यावर सतत नऊ दिवस पायपीट करून भारताच्या सीमेवर, म्हणजे सिक्कीमपर्यंत येऊन पोहोचलो. सीमेवर भारतीय जवानानी अडवले सतत अठरा महिने 'मी नेमका कोण आहे' याची शहानिशा करण्यात त्यानी खर्च केले. तोपर्यंत एकप्रकारे मी त्याच्या कैदेतच होतो. पुढे, त्याची खात्री पटल्यानतर मात्र, त्यांनी स्वतः तिबेटी निर्वासिताच्या पुनर्वसनाच्या योजनेनुसार मिळणाऱ्या सगळ्या सोयी, सवलती मला उपलब्ध करून दिल्या. त्यांनीच टिटालीच्या वसाहतीत माझी रवानगी केली.

## विजनवासातलं सरकार

अनधिकृत अदाजानुसार भारतात सध्या राहत असलेल्या तिबेटी नागरिकाची एकूण सख्या १ लाख २० हजाराच्या आत–बाहेर आहे. यातले बहुसख्य १९५९–६० च्या सुमारास खुद्द दलाई लामा भारतात आले त्यावेळीच भारतात आलेले आहेत. उर्वरित हजारोनी जामयाग–साग पो सारखीच खडतर वाट चालून येऊन भारतात आश्रय मिळविला आहे. कर्नाटकात कारवार, हुबळी आणि म्हैसूर जिल्ह्यातून मिळून एकूण सुमारे ५ वेगवेगळ्या वसाहतीतून हे तिबेटी निर्वासित राहतात. महाराष्ट्रात भडारा जिल्ह्यात, ओरिसात ब्रह्मपूर व अरुणाचलात म्याओ, तेजू आणि बोमदिला या ठिकाणीही अशाच तिबेटी निर्वासिताच्या वसाहती आहेत. या शिवाय स्वित्झर्लंड आणि कॅनडातही तिबेटी वस्त्या आहेत.

चागली गोष्ट अशी की भारत सरकारनं त्याना घर आणि जमिनीच फक्त दिल्या असं नसून त्याना आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या सर्व सधीही उपलब्ध करून दिल्या आहेत. सर्वत्र चागल्या शाळा आहेत, फार काय, तिबेटी भाषेतून पाठ्यपुस्तकही दिली आहेत.

भारताच्या सदिच्छेच्या बळावरच आज हिमाचलात धर्मशाळा या ठिकाणी दलाई लामाच 'विजनवासातल सरकार' काम करू शकत आहे. साग–पो आणि त्याच्या मित्राच्या सागण्यानुसार दलाई लामा वर्षातन किमान एकदा देशातल्या सर्व तिबेटी निर्वासितांच्या छावण्याना भेट द्यायला येतात. एकूणच भारताच्या, भारत सरकारच्या समर्थनाबद्दल, सरकारन आणि जनतेन देऊ केलेल्या उदार आश्रयाबद्दल तिबेटी निर्वासित समाधानी आहेत.

प्रश्न आहे तो हा की, हे एवढ पुरेसं आहे का? तिबेटच्या जनतेला उदार आश्रय देण एवढच फक्त आपल्याकडून अपेक्षित आहे? की, स्वातत्र्य, समता आणि बधुतेचा जयघोष करणाराकडून काही भरघोस कृतीही अपेक्षित आहे? जगातील अन्य कोणत्याही राष्ट्राकडून तिबेटला समर्थनाची अपेक्षा नाही, अपेक्षा आहे ती फक्त भारताकडून. तिबेट हे एका अर्थानं बृहद्–भारताचच एक अग आहे साग–पो, जिग्मे आणि त्याच्या मित्रानी या सदर्भात जे सागितलं ते महत्त्वाच आहे ते म्हणाले, 'तिबेट स्वतत्र होणं हे भारताच्या फायद्याच आहे. तिबेट स्वतत्र झाला तर उत्तर सीमेचं रक्षण करण्यासाठी भारताला सध्या जी प्रचड लष्करी सिद्धता ठेवावी लागते, ती लागणार नाही. खर्च वाचेल. शिवाय मानवतेच्या आणि जागतिक शाततेच्या दृष्टिकोणातूनही तिबेटच्या स्वातत्र्यासाठी भारतान पुढाकार घेण्याची गरज आहे. शेजारच्या निर्वासिताला केवळ आश्रय देऊन शेजारधर्म पाळता येईल? तुम्हीच सागा.

अर्थात भारताची मजबुरी आम्ही जाणतो. भारताविषयी आम्ही सर्व कृतज्ञ आहोत. तिबेटचा प्रश्न डावलून चीनशी सीमाविषयक बोलणी करण्याच्या भारतीय प्रयत्नामुळे आमचे लोक नाराज आहेत, पण अर्थात यातही भारताची अडचण आम्हाला ठाऊक आहे. चर्चेची अशी नाटक करावीच लागतात.

आणखी एक सागतो. चीनन तिबेटात आण्विक प्रक्षेपणास्त्र आणून ठेवली आहेत. ती जोपर्यंत हटत नाहीत, तोपर्यंत दक्षिण आशियातली शातता धोक्यातच राहणार.

साग–पो सांगतोय ती तिबेटची हाक आहे. नगाधिराज हिमालयाची प्रचंड भिंत, उत्तरेकडचे गोठवून टाकणारे गार वारे थोपवू शकली आहे. पण तिबेटी जनतेचा आक्रोश ती थोपवू शकणार नाही. बागला देशातल्या चकमासारखाच आणखी एक बौद्ध समाज टाहो फोडून आम्हाला साद घालतोय. 'साउथ ब्लॉक'च्या प्रासादात बसलेले मुत्सद्दी ही साद ऐकतील? ☐

**१९४७ साली फाळणी मान्य करून भारतीय जनतेने आपल्याला पाठीचा कणा नाही, इतिहासाचे भान नाही हे सिद्ध केले आहे. परंतु इतर आशियाई राष्ट्रे आपल्या गटात (सुदैवाने) मोडणारी नाहीत. व्हिएतनाम आणि चीन दोघांनीही हे सिद्ध केलेले आहे.**

# तिबेट: काही समज-अपसमज

**● गोविंद पुरुषोत्तम देशपांडे ●**

## एक

तिबेटच्या प्रश्नावर भारतात फारशी मत-मतांतरे पाहयला मिळत नाहीत. १९५० पासून विशेषत: तिबेटविषयी एक सूर सारखा कानावर पडतो. स्थूलमानाने असे म्हणायला हरकत नसावी की आंतरराष्ट्रीय राजकारणात रूची असलेल्या सुशिक्षित भारतीयांच्या मनात तिबेट हा आमच्या देशाचा अविभाज्य भाग आहे या चिनी भूमिकेविषयी संदेह आहे. अर्थात संदेह आहे हे म्हणणे सुद्धा सौम्यपणे मांडणं आहे. खरी गोष्ट अशी आहे की, त्यांच्या मनात संदेह नसून चीनचा तिबेटवर कसलाही हवक नाही अशी त्यांची खात्री आहे. त्यामुळेच गेल्या तीनचार महिन्यांत तिबेटमध्ये ज्या घटना घडल्या त्यासंबंधी भारतीय प्रतिक्रिया (व्यक्तिगत प्रतिक्रिया, सरकारी किंवा राजकीय पक्षाच्या नव्हे) दोलायमान तरी होती किंवा चीनने तिबेटला गिळून टाकले आहे तेव्हा अशा स्फोटाला चीनला तोंड द्यावे लागणार, आज ना उद्या तिबेटचे स्वातंत्र्य चीनला कबूल करावे लागेल असे मांडणारी होती. प्रस्तुत लेखात तिबेटमधल्या अलीकडच्या काळातील घटनांचा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात काय अर्थ होतो आणि विशेषत: भारतीय परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात कोणते धडे आपण शिकले पाहिजेत आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कोणते धडे आपण टाळायला हवेत याची चिकित्सा करण्याचा प्रयत्न आहे.

मी हा लेख १९८७ च्या शेवटच्या पंधरवड्यात लिहीत आहे. तेव्हा तिबेटमधील निदर्शने किंवा ल्हासामधील घटनाक्रमांची बारीक उजळणी करण्याची जरुरी नसावी. वर्तमानपत्रात त्यासंबंधी जे काही येऊन गेले ते वाचले गेलेच आहे, हे मी गृहीत धरलेले आहे. थोडक्यात सांगायचे तर हा लेख किंवा हे लेख एकत्र का करण्यात आलेले आहेत हे वाचकांस ठाऊक आहे हे गृहीत धरून खालील प्रपंच केला आहे.

ह्या प्रकरणात लक्ष द्यायची पहिली गोष्ट अशी की भारत स्वतंत्र झाल्यावर त्यापूर्वी दोनदा तिबेटवर आपल्या राजकीय पक्षांनी, वृत्तपत्रांनी, विविध माध्यमांनी चर्चा केलेली आहे. ते दोन प्रसंग म्हणजे १९५० मध्ये चिनी फौजा तिबेटमध्ये शिरल्या तो प्रसंग. आणि दुसरा, १९५९ त तिबेटमध्ये उठाव होऊन दलाई लामा तिबेट सोडून हिंदुस्थानात आले तो. ह्या दोन्ही प्रसंगांत आणि १९८७ च्या घटनांच्या बाबतीत दोन महत्त्वाचे फरक ध्यानात घ्यायला हवेत. मी वर वर्णन केले त्याप्रमाणे १९५० व १९५९ मध्ये भारतीय वृत्तपत्रे आणि माध्यमे चीनच्या तिबेट-विषयक धोरणाबाबत फारच प्रतिकूल भूमिका घेताना दिसतात. १९८७ मध्ये तसे झालेले दिसत नाही. श्री. राजीव गांधींचे परराष्ट्र धोरण अजिबात न आवडणाऱ्या वृत्तपत्रांनीसुद्धा ज्या भूमिका घेतल्या त्या १९५० व १९५९ च्या तुलनेने फारच सौम्य म्हणायला हव्यात. दुसरा फरक असा की इंग्रजी वृत्तपत्रांनी स्थानिक वृत्तपत्रांच्या तुलनेने सौम्य भूमिका घेतलेली दिसते. हा फरकही ५० किंवा ५९ मध्ये दृष्टीस पडला नव्हता. उदाहरणादाखल टाइम्स ऑफ इंडिया गटाची नियतकालिके पाहावीत. खुद्द टाइम्सने तिबेटमधल्या अशांततेची आणि त्या अशांततेनंतर निर्माण होणाऱ्या धोरणविषयक निष्कर्षाची सौम्यपणे, आक्रमक राष्ट्रवाद न दाखविता दखल घेतलेली दिसते. त्याच्या उलट महाराष्ट्र टाइम्समधील लेखात तिबेटच्या मुक्तीचे वेळापत्रक मांडायचेच बाकी ठेवलेले होते. ५० साली किंवा ५९ साली टाइम्सने अशी सौम्य भूमिका घेतलेली होती, असे दिसत नाही.

त्याच्या जोडीला ५९–६२ ह्या ४ वर्षांत चीनच्या संदर्भात आणि नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत अगदी निष्ठूरपणे घणाघाती टीका करणारी मंडळी गेल्या आठ–दहा वर्षांत शांत आहेत. 'अवर क्रेडयुलिटी अँण्ड निग्लिजन्स्' हे पुस्तक लिहिणारे ए. जी. नुराणी आता चीन–भारत सीमा प्रश्नावर फारसे बोलायला तयार नाहीत. चीन–रशिया यांच्यातील खडाष्टकामुळे रशिया-विरोध (पर्यायाने कम्युनिस्टविरोध) ज्यांच्या राजकीय समजुतीचा पाया होता त्यांनी एकदम आपला मोहरा चीनच्या बाजूने आणि रशियाच्या विरुद्ध वळविला आहे. आता चीन-सोविएत युनियन संबंध सुधारण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे ही मंडळी लवकरच चीनबरोबर कसलाही समझोता करू नये असे पुनरपि मांडू लागली तर आश्चर्य वाटायचे कारण नाही. भारतीय इतिहासात स्तालिनने केलेल्या काही तह–करारांमुळे डाव्यांची

शत्रूची व्याख्या कशी बदलत गेली ह्याची बरीच चर्चा होती. (आणि ती व्हायलाही हवी) पण उदारमतवाद्यात झालेले हे सूक्ष्म म्हणा किंवा स्थूल म्हणा बदल कुणी फारसे लक्षात घेतलेले नाहीत ! ते असो. मुद्दा असा की सोविएतविरोधाचा चिन्यांना हा एक अनपेक्षित फायदा मिळाला आहे. एरवी जी मंडळी तिबेटच्या बातम्या ऐकून संतापून बोलली असती ती शांत आहेत. हाही ५९ च्या तुलनेने महत्त्वाचा बदल मानायला हवा

## दोन

तिबेटच्या प्रश्नावर भारतीय मानसात दोन समजुती अगदी घट्टपणे विराजमान आहेत असे म्हणायला हरकत नाही तिबेट हिंदुस्थान ह्यांच्यातील सांस्कृतिक आणि दार्शनिक देवाणघेवाणीमुळे तशी काही देवाण-घेवाण चीन-तिबेटमध्ये कधी झालेली होती हे आपल्याला स्पर्शूनही जात नाही. चीन गेले कित्येक शतके तिबेट हा चीनचा अविभाज्य भाग आहे असे म्हणत आलेला आहे हे आपल्या गावीही नाही. सारांश तिबेटचे स्थान काय आहे. यावर सुशिक्षित भारतीयाला काही गोष्टी ठामपणे जाणवतात त्याचप्रमाणे चिनी नागरिकासही जाणवतात, मुख्य म्हणजे तिबेटचे स्वतंत्र सार्वभौम अस्तित्व आंतरराष्ट्रीय पातळीवर कधीही मान्य झाले नव्हते. त्याचा काय अर्थ होतो, असतो हे आपल्या गावीही नाही. एका ऐतिहासिक-सांस्कृतिक अर्थाने तिबेट चीनचा भाग होता, आहे आणि चिनी शासन त्याबाबतीत कसल्याही तडजोडीला तयार होणार नाही, याचा काय अर्थ आहे याचा विचार झालेला नाही. सारांश पहिल्या समजुतीपाठीमागे इतिहासाचे निष्काळजी अज्ञान आहे. जे इतिहास धड वाचत नाहीत ते आंतरराष्ट्रीय राजकारणाचा व्यवहार धडपणे करू शकत नाहीत.

### सरदार पटेलांचे पत्र

दुसरी समजूत तुलनेने अलीकडच्या राजकारणाशी संबंधित आहे. १९५४ मध्ये पंचशील करारावर नेहरूंनी सही केली तेव्हा चीनला तिबेटची दक्षिणा दिली असा एक गैरसमज आहे. वस्तुस्थिती बरोबर उलटी आहे. १९५४ मध्ये झालेला करार ही वस्तुस्थिती आहे, जी आपण बदलू शकत नाही ती मान्य करण्याचा तो एक प्रकार होता असं फार तर म्हणता येईल त्यामुळे त्या करारावर एवढी टीका होण्याचे कारण नाही. ती झाली ह्याचे कारण म्हणजे ब्रिटिशांनी तिबेटच्या संदर्भात रूढ केलेला दृष्टिकोण. तिबेट एक बफर-स्टेट होते आणि चीनने तिबेटचा कब्जा केल्यामुळे ते बफर-स्टेट संपुष्टात आले. शिवाय चीनचा अधिकार सार्वभौमत्वाचा नव्हता. सुझरेन्टीचा होता. सावरिन्टी आणि सुझरेन्टीचा सूक्ष्म फरक करणाऱ्या ब्रिटिशांना तिबेट स्वतंत्र, सार्वभौम करणे का शक्य झाले नाही त्याचा विचार आपण करीत नाही. किंवा सुझरेन्टी आणि सावरेन्टीमधला ब्रिटिशांनी केलेला फरक कुणी मान्य केला होता ? चीनने केला नव्हता, झारच्या रशियाने केला नव्हता, किंबहुना जगातल्या कुठल्याही राष्ट्राने केलेला नव्हता. एकूण सुझरेन्टी आणि सावरेन्टीमधला फरक शब्दावरचा खेळ होता. तो खेळ चालू शकला याचे कारण चीनमध्ये बळकट केंद्रीय सत्तेचा उदय अजून व्हायचा होता. तो १९४९ नंतर झालेला आहे. आता या शब्दाच्या खेळी उपयुक्त ठरण्याजोग्या नाहीत. भारतीयाप्रमाणे चर्चा करून किंवा चार निदर्शनांच्या दडपणाखाली' देशाचे विभाजन मान्य करण्याची चिन्यांना सवय नाही.

बऱ्याच पुस्तकांत-लेखांत १९५० मध्ये चिनी फौजा तिबेटमध्ये घुसल्या तेव्हा सरदार पटेलांनी नेहरूंना लिहिलेल्या पत्राचा उल्लेख होतो तथापि त्या पत्रातही पटेलांनी भारतीय परराष्ट्र मंत्र्यांनी (नेहरू त्यावेळी परराष्ट्रमंत्रीही होते) नेमके काय करावे हे सांगितलेले नाही. खरी गोष्ट अशी आहे की, तिबेट स्वतंत्र व्हावा, असला पाहिजे असं धोरण असावं असं म्हणणारांनी हिमालयाच्या पलीकडे फौजा गुंतवायला आपण सांगत आहोत हे ध्यानात ठेवलं पाहिजे दोन महासत्ता आणि भारत याच्यापैकी कुणाच्या तरी फौजा तिबेटमध्ये शिरत नाहीत तोवर तिबेट स्वतंत्र होणे शक्य नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. व्हिएतनामचा अपवाद वगळता अमेरिकन राष्ट्रपतींनी रंगीत दुनियेत गोऱ्या शिपायाला गुंतवून नामुष्की ओढवून घेण्याचा प्रसंग शक्यतो टाळला आहे. अफगाणिस्तानात सेना गुंतवून रशियन नेते असे फसले आहेत की, ते तिबेटची दखल तर घेणार नाहीतच पण अफगाणिस्तानला लागून आणखी लढाया होऊ नयेत म्हणून ते काय वाटेल ते करतील आपली देश म्हणून इतकी नाजूक तब्येत आहे की, आहे हा भारत एकत्र ठेवता आला तरी पुष्कळ झाले असे म्हणायची वेळ आलेली आहे. त्यामुळे तिबेटमध्ये लष्करी धाष्टर्य करणे कुणाला शक्य नाही, भारताच्या दृष्टीने इष्ट नाही हे स्वच्छपणे पाहणे अगत्याचे आहे. तोच प्रकार १९५० मध्ये होता पटेलसुद्धा नेहरूंना 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' या चालीवरचे पत्र लिहून थांबले ते उगाच नाही. अमेरिका कोरिया-जपानमध्ये फसलेली होती मॉस्कोमध्ये जोसेफ स्तालिन नामक माणूस सत्ताधारी होता. भारत फाळणी आणि काश्मीरमधल्या पहिल्या युद्धातून सावरत होता. त्यावेळी आणखी धाडसीपणा करणे म्हणजे तिबेट स्वतंत्र करण्यापेक्षा काश्मीर घालविणे होते. सरदार पटेलांनी हा सत्ताकारणाचा विवेक पाळला असे म्हणावे लागेल सारांश पटेलांच्या पत्राचा सर्वसाधारणपणे जो अर्थ लावला जातो तो योग्य नव्हे. मला तरी तो अर्थ पटत नाही पटेलांचे राजकारण शक्याशक्यतेच्या पलीकडे जाणारे नव्हते; असणे इष्टही नव्हते त्यांना तिबेट स्वतंत्र करता येईल किंवा होईल असे वाटत होते असे मानण्याला फारशी जागा नाही, आणि तसे त्यांना वाटत होते असे मानले तर त्यांनी सत्ताकारणाचा पुरेसा विचार केलेला नव्हता असे नाईलाजाने म्हणावे लागेल.

## तीन

तिबेटमधील जनता चिनी आधिपत्याखाली संतुष्ट आहे की नाही हे मला सांगता येणार नाही. दरिद्री देशात जनसामान्याचा संतोष अपवादात्मकच मानायला हवा. मुद्दा तो नाही. ती संतुष्ट नाही याची चिन्हे दिसतात ती पुरेशी नाहीत हा खरा भाग आहे. चार निदर्शने झाली, आठ-दहा माणसे मारली

गेली ह्यावरून काही सिद्ध होत नाही तसले काही मानायचे तर तिसऱ्या दुनियेत कुठल्याही राष्ट्राला एकसंध राहायचा अधिकार उरणार नाही हे ध्यानात ठेवले पाहिजे. ल्हासाच्या धर्मपीठाला अधिकार असावेत असं म्हटल तर ते अमृतसरच्या धर्मपीठाला का असू नयेत ह्याचे उत्तर देणे अवघड आहे. १९४७ साली फाळणी मान्य करून भारतीय जनतेने आपल्याला पाठीचा कणा नाही, इतिहासाचे भान नाही हे सिद्ध केले आहे; परतु इतर आशियायी राष्ट्रे आपल्या गटात (सुदैवाने) मोडणारी नाहीत. व्हिएतनाम आणि चीन दोघानीही हे सिद्ध केलेले आहे. ते लक्षात ठेवले पाहिजे.

## नजरेत भरणारी प्रगती

परंतु हा प्रश्न केवळ राष्ट्रवादी भावभावनापुरता मर्यादित नाही. १९५० नतर तिबेटची नजरेत भरण्याइतकी प्रगती झालेली आहे. गेल्या वर्षी (१९८६ त) तिबेटमधले धान्योत्पादन ४ लक्ष ५० हजार टनावर पोचले आहे. १९८६ च्या अखेरीस तिबेटमध्ये ३ कॉलेजे, १४ पॉलिटेक्निक प्रशाला, ६४ माध्यमिक विद्यालये आणि २,३८८ प्राथमिक शाळा स्थापन झाल्या आहेत. १९४९ त तिबेटात १३ प्राथमिक शाळा आणि १ माध्यमिक शाळा होती हे लक्षात घेतले म्हणजे झालेल्या प्रगतीचा अदाज येण्याजोगा आहे तिबेटमध्ये सर्व नागरिकाना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध झालेली आहे. १९८६ च्या अखेरीस तिबेटमध्ये ९५६ इस्पितळे आणि क्लिनिक, २५ उच्च वैज्ञानिक सशोधन केंद्रे आणि एक हजारावर खेळ, सास्कृतिक आणि करमणुकीचे कार्यक्रम करणारे गटोपगट निर्माण झाले आहेत. शाळा, प्रशाला तिबेट माध्यमांतून चालतात. एका अर्थाने आज मुंबई–पुण्याला ज्या प्रमाणात मराठी माध्यमाचा आणि भाषेचा आदर होतो त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात तिबेटी भाषेचा आदर तिबेटमध्ये होतो. ३९,७०३ खाजगी व्यापारी पेढ्या काम करीत आहेत त्याच्या पदरी ५१,३४२ कामगार आहेत. साराश तिबेटमध्ये तिबेटच्या इतिहासात यापूर्वी कधी झालेली नव्हती एवढी शैक्षणिक औद्योगिक आणि कृषिक्षेत्रात प्रगती झालेली आहे. ५ टक्के साक्षरतेपासून ह्या प्रदेशाने विकासाला आरभ केला आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. थोडक्यात सागायचे तर इतक्या विकासाचा अनुकूल परिणाम झालेली तिबेटमध्ये कुणीच मडळी नसतील असे म्हणता यायचे नाही. निव्वळ राष्ट्रवादी घोषणावर राष्ट्रे टिकत नसतात, जन्माला येत नसतात. केवळ आर्थिक विकासाच्या आधारावरही ती टिकतात असे मला म्हणयचे नाही. परतु दलाई लामाच्या अमलाखाली धर्मपीठे सुरक्षित राहिली तशी निरक्षरता आणि शेतकऱ्याचे आणि शेतमजुराचे शोषणही सुरक्षित राहिले होते हे विसरून चालणार नाही. दलाई लामाच्या कार्यालयाने तिबेटमध्ये हान् चिनी (चीनमधले बहुसख्य लोक ह्या वशाचे आहेत) आणून तिबेटी लोकाना अल्पसख्य करण्याच्या कारस्थानाविषयी फार मोठ्या प्रमाणात आवाज उठविलेला आहे.

तिबेटी जनता तिबेटमधेच केव्हाच अल्पसख्य झालेली आहे असे त्याचे म्हणणे आहे. चिनी सरकारने दोन महिन्यापूर्वी जी लोकवस्तीची आकडेवारी प्रसिद्धीला दिली त्यावरून ते म्हणणे वादग्रस्त आहे असे मानावे लागते. १९८७ मध्ये तिबेटची लोकवस्ती वीस लक्ष, दोन हजार होती. त्यापैकी सुमारे १९ लक्ष, तीस हजार लोक तिबेटी होते तर बहात्तर ते ब्याहत्तर हजार लोक हान चिनी आहेत असे सरकारी आकडेवारी सागते. ती बहुधा रास्त असावी. ह्याचे कारण सुमारे १९ हजार तिबेटी लोकांना अल्पसख्य करायला लागतील एवढ्या हान् चिनीना उद्योग तिबेट पुरवू शकत नाही किंवा पुरवत असेल तर औद्योगीकरण फारच झपाट्याने आणि विस्तृत झाले असले पाहिजे। ते शक्य नाही. तसे झाले आहे. असे चिनी सरकार तर सोडाच पण दलाई लामासुद्धा म्हणत नाहीत त्याचबरोबर मुख्य चीनमध्ये लागू असलेले कुटुंब नियोजनाचे नियमोपनियम तिबेटमध्ये लागू नाहीत. तिबेटच्या प्रमुख गावातून तिबेटी लोकापेक्षा हान् चिनी जास्त दिसतात असे तिथे जाऊन आलेल्या पाश्चात्त्य चीन विशारदानी किंवा टूरिस्टानी म्हटलेले नाही. साराश तिबेटमधे तिबेटी लोक अल्पसख्य झाले आहेत किंवा होऊ घातलेले आहेत हे पटण्याजोगे नाही.

याचा अर्थ सर्वसाधारण तिबेटी आपण नदनवनात राहत आहोत असे मानतो असा नव्हे असतोष नसता तर निदर्शने झालीच नसती. पण विकसनशील देशात असे असंतोष अटळ आहेत व त्याहीपेक्षा परकीय सत्तेचा हस्तक्षेप नसेल तर ह्या देशाना हे असतोष काबूत ठेवणे अशक्य नाही हे महत्त्वाचे आहे. आणि तिसऱ्या जगातील अगदी लष्करी हुकूमशहाची कारकीर्द पाहिली तरी चीनमधले उद्रेक इतर देशाच्या तुलनेने काहीच नव्हते हे ध्यानात येईल. तिबेटमधल्या घटनाचा अर्थ एक हात लाकूड आणि सहा हात ढलपी या पद्धतीने लावण्यात काही मतलब नाही.

## चार

शेवटी आतरराष्ट्रीय राजकारणाच्या सदर्भात ह्या घटनाचा काही अर्थ लावला पाहिजे. महासत्तानी विशेषतः अमेरिकनानी वाशिक आणि सास्कृतिक तणावाचे मोठे महाभारत करायचे ठरविले आहे त्याला आमचे पत्रकार, समीक्षक, अध्यापकमडळी बळी पडत आहेत. त्याना मोठे देश नको आहेत. भारताच्या फाळणीने एक मार्ग दाखविला होता. तो मार्ग चोखाळून जितके मोठे आणि प्राचीन देश लहान आकाराने आणि वयाने होतील तेवढे त्याना हवेच आहे इडिया ह्या सास्कृतिक सकल्पनेचा त्यानी साऊथ एशिया केला आहे. उद्या चीनचे तुकडे पडून त्या देशाचा ईस्ट एशिया करता आला तर ते गोऱ्या राष्ट्राच्या पथ्यावरच पडणार आहे. या धोक्यापासून उदारमतवादी बुरखा पांघरून येणाऱ्या आशियायी राष्ट्रसकल्पनेचा विनाश करणाऱ्या तत्त्वज्ञानापासून, मोहापासून अलिप्त राहिले पाहिजे. चीन काय, भारत काय, ही सस्कृतिराष्ट्रे (सिविलिझेशन–स्टेट्स) आहेत. ती टिकली पाहिजेत. एरव्ही वास्को–द–गामापासून सुरू झालेल्या अन्याय्य आणि लुटीच्या इतिहासचक्राला परत फिरविणे शक्य नाही.

याचा अर्थ प्रातीय भाषा, सस्कृती, धर्म टिकू नयेत असे नाही. किंबहुना तोही आत्मघाताचाच प्रकार आहे परतु प्रादेशिक व्यक्तिमत्त्व राष्ट्रीय महिरपीतच खुलले

पाहिजे. प्रत्येक प्रादेशिक भाषा किंवा अल्पसंख्यांची धर्मपीठे स्वतंत्र, सार्वभौम होणे हाच त्यांच्या जिवंत राहण्याचा एकमेव मार्ग आहे असे मानणे आशियाई मंडळींच्या बाबतीत अक्षम्य आत्मघाताचे ठरणारे आहे. तिबेटचा विचार एका प्रकारे काँग्रेस आणि मुस्लिम लीग १९४७ पूर्वी हिंदू–मुस्लिम प्रश्नांचा विचार करीत, म्हणजे तत्कालीन सत्ताकारणाचा विचार न करता करीत तसा काही वर्तुळात तरी केला जातो. त्यामुळे तिबेटबाबत फार मोठे गैरसमज झाले आहेत.

किंबहुना, तिबेटमधील निदर्शनाच्या निमित्ताने मोठे व्यापक राष्ट्र असणे पूर्व आणि पश्चिम यांच्यामधल्या वास्को–द–गामापासून सुरू झालेल्या आणि अजून न संपलेल्या मोठ्या संघर्षातले उपयुक्त शस्त्र आहे, हे पुनः मांडायला हवे. अविकसित असण्याची काही एक किंमत मोजावीच लागते. चिनी मोजत आहेत, आपणही मोजत आहोत. पण त्यामुळे आनंद होण्याचे काही कारण दिसत नाही. मध्याच्या सत्ताकारणात आशियाई शासकीय राष्ट्र ( स्टेट ) अखंड राहणे अगत्याचे झाले आहे. भारतात हा विवेक अलीकडे ढळल्यागत दिसतो, अर्थात या अरिष्टांतून जाणारे आपण एकटेच आहोत असे मानण्याचे कारण नाही. किंबहुना सर्व संबंधित राष्ट्रांनी एकत्र येऊन युरोप अमेरिकेचे वर्चस्व वाढविणाऱ्या वंशवादी–संस्कृतवादी–धर्मवादी ( एथ्निक ) पृथगात्मतेचे वाजवीपेक्षा जास्त कौतुक करणाऱ्या विचारांचा ( थिअरीज ) मुकाबला करायला पाहिजे. खरे म्हणजे फाळणीपूर्व भारत पुनः निर्माण होणे जरूर आहे. पण तो निराळा मुद्दा आहे. तो पुन्हा केव्हा तरी मांडेन. तूर्त भारत-चीनमधील तणाव भारताच्या किंवा चीनच्या कल्याणाचे न ठरता युरोप–अमेरिकेच्या कल्याणाचे आहेत. प्रस्थापित सत्तावाटपात ( डिस्ट्रिब्यूशन ऑफ पॉवर ) त्यांचे पारडे वर आहे. त्यांचे पारडे आणखी वर नेणारे आहेत आणि म्हणूनच त्यांचा कसून विरोध केला पाहिजे. सत्तावाटपाचे भान नसलेला राष्ट्रवाद कुचकामी ठरतो हे तिबेटच्या स्वातंत्र्याचा सिद्धांत मांडणाऱ्यांच्या लक्षात आलेले नाही. तिबेटमध्ये असलीच काही समस्या तर ती या कुचकामी राष्ट्रवादाची आहे. भारतीय प्रतिक्रिया आणि धोरण ते लक्षात घेऊन घडले गेले पाहिजे. □

भारताच्या पराभवाची बीजे तिबेटवरच्या चिनी हल्ल्यात आढळतात.

# तिबेटच्या स्वातंत्र्याचा प्रश्न

● डॉ. अशोक मोडक ●

गेल्या वर्षी म्हणजे सन १९८७ च्या ऑक्टोबरात चिनी जनतेने दोन परस्परविरुद्ध सोहोळे भरल्या डोळ्यांनी पाहिले. एक सोहोळा झाला पेकिंग मुक्कामी; तर दुसऱ्या सोहोळ्याचे स्थान होते श्रीक्षेत्र ल्हासा. पेकिंगमध्ये चिनी राज्यक्रांतीच्या जन्मतिथीचा आनंद ओसंडत होता तर तेव्हाच ल्हासाच्या तीर्थक्षेत्री या राज्यक्रांतीमुळे वैकुंठवासी झालेल्या तिबेटी स्वातंत्र्याची पुण्यतिथी साजरी होत होती. पेकिंगच्या समारंभांतून चिनी कम्युनिस्टांचे कोडकौतुक प्रकट झाले; तर ल्हासा नगरीत नेमक्या या कम्युनिस्टांनाच लाखोली वाहिली गेली. वास्तविक पाहता गेली सदतीस वर्षे सातत्याने ही लाखोली वाहिली गेली आहे; प्रतिवर्षी या पुण्यतिथीच्या निमित्ताने तिबेटी जनतेने आपला आक्रोश व्यक्त केला आहे; पण सन १९८७ च्या पुण्यतिथीने नवा विक्रम केला आणि या संतापाला जगभर प्रसिद्धी मिळाली. साहजिकच चीनचे भारतीय भक्त विशेषत्वाने नाराज झाले. या मंडळींच्या साडेतीन दशकांच्या उद्योगांवर पाणी फिरले. या सहप्रवाशांनी सन १९५० पासून आजतागायत चिनी राज्यक्रांतीची तोंड भरून स्तुती केली आहे. अशा क्रांतीमुळे सर्व शोषित-पीडित लोकांना अभूतपूर्व आनंद झाला आहे. तिबेटसारख्या रूढिप्रिय भूभागाचा तर अचाट कायापालट झाला आहे, रोजी-रोटीचा प्रश्न सुटला आहे, निरक्षरता संपली आहे, सरंजामशाहीऐवजी थेट समाजवाद अवतीर्ण झाला आहे...वगैरे वगैरे जाहिराती तमाम कम्युनिस्टांनी जगाला ऐकविल्या...या अशा जाहिरातींवरच गेल्या तीन-चार महिन्यांत बोळा फिरला. सप्टेंबरमध्ये दलाई लामा थेट अमेरिकेत गेले. त्यांनी तिथे जे विचार मांडले ते सर्व वृत्तपत्रांमधून दुनियेपर्यंत पोचले. लोकांच्या लक्षात आले ते इतकेच की चिनी कम्युनिस्टांनी साम, दाम, भेद आणि दंड असे विविध उपाय योजूनही तिबेटी जनता आपल्या स्वातंत्र्याची मागणी विसरलेली नाही. बरं स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही हे वाक्यसुद्धा निरर्थक ठरले आहे, कारण सन १९५० पासून तिबेटी लोकांच्या कपाळी ज्या यातना लिहिल्या गेल्या आहेत त्या ' सुराज्य ' शब्दावर नांगर फिरविणाऱ्या ठरल्या आहेत. दलाई लामांनी त्यांच्या ताज्या वक्तव्यांतून पाच मागण्या शब्दबद्ध केल्या आहेत. या मागण्या आणि सुराज्यनामक शब्द अहिनकुलाप्रमाणे परस्परांशी संबद्ध आहेत. हान वंशीय नागरिकांची तिबेटमधली घुसखोरी थांबवा ही मागणी डोळ्यांसमोर आणा. तसेच या संदर्भात खालील कोष्टक अभ्यासा, म्हणजे चिनी कम्युनिस्टांच्या लीला लक्षात येतील.

**हान वंशीय चिन्यांची तिबेटमधली घूसखोरी**

| प्रदेशाचे नाव | तिबेटीनागरिकाची संख्या (दशलक्ष) | हानवंशीय संख्या (दशलक्ष) |
|---|---|---|
| मध्य तिबेट | १ ९ | २.० |
| आमडो | ०.८ | २.५ |
| खाम | ३.३ | ३ ० |
| एकूण | ६.० | ७.५ |

चिन्याच्या या घूसखोरीमुळे अरब व उंट या कहाणीतला तिबेटी अरब परागंदा झाला आहे; आपल्याच घरात उपरा ठरला आहे. शिवाय हा उंट स्वतःला प्रोग्रेसिव्ह वगैरे म्हणून घेतो तेव्हा त्याच्याविरुद्ध 'ब्र' काढण्याची सोय नाही. उलटपक्षी तिबेटी मठ आणि मंदिरे उद्ध्वस्त करावीत हा चिनी कम्युनिस्टांचा म्हणे लाडका छंद आहे. जुने तण उखडून काढले तरच कम्युनिझमचे नंदनवन इत्यादी फुलविता येते हा समज या छंदाच्या मुळाशी आहे. परिणामतः पूर्वी दोन लाख बुद्ध भिक्षूंना आश्रय देणाऱ्या अडीच हजार मठांच्या जागी आता केवळ दहा मठ शिल्लक राहिले आहेत. दलाई लामांनी या पार्श्वभूमीवर तिबेटी जनतेच्या हक्कांना अभय मागितले आहे. दक्षिण आफ्रिकेत मूठभर गोरे महाभाग लाखो कृष्णवर्णीयांना पायदळी तुडवीत आहेत. त्यांचा वर्णद्वेष चिन्यांच्या वंशद्वेषाशी पैजा खेळत आहे. हिटलरने ज्यू मंडळीच्या कत्तली केल्या; माओचे अनुयायी तिबेटी जनतेच्या जिवावर उठले आहेत. मग बळजबरीने चिनी पुरुष आणि तिबेटी स्त्रिया यांच्यात शरीरसंबंध वाढविले जात आहेत. भाषणाचे व आचरणाचे स्वातंत्र्य ही नंतरची पायरी झाली, जगण्याचे स्वातंत्र्यसुद्धा क्रूरबुद्धीने तुडविले जात आहे. दलाई लामांनी चिनी सैन्य हटवा अशी मागणी केली आहे, तीही शांततेसाठी आसुसलेल्या लोकांना आवाहन करणारी आहे. संपूर्ण तिबेट हे शांततेचे क्षेत्र व्हावे अशी आकांक्षा आहे. या आकांक्षेचा भारताच्या सुरक्षेशी जवळचा संबंध आहे. दलाई लामांच्या भाषणातला हा एक उतारा किती बोलका आहे—

'इतिहास म्हणून बघितले तर, चीन आणि भारत यांच्यातले संबंध कधीच तणावाचे नव्हते असे लक्षात येईल. पण चिनी सैन्याने तिबेटमध्ये प्रवेश केला व त्यामुळे चीनची सरहद्द भारताच्या सीमेशी भिडली. ताणतणाव उत्पन्न झाले ते या कारणामुळे. पुढे सन १९६२ चे युद्ध उद्भवले ते या तणावाच्या पार्श्वभूमीवर. चीन आणि भारत यांच्यात पुनश्च सलोख्याचे संबंध निर्माण करायचे असतील तर चिनी सैन्याने तिबेटमधून काढता पाय घ्यावा हाच रामबाण उपाय आहे. अशा उपायामुळे तिबेट हे एक बफरराज्य परत जन्माला येईल व पेकिंग आणि नवी दिल्ली या राजधान्यांमध्ये मैत्री उत्पन्न होईल.'

दलाई लामांनी सैन्य हटविण्याच्या मागणीला अण्वस्त्रे हटवा या मागणीचीही जोड दिली आहे. चीनने जगाच्या नकाशात महासत्ता म्हणून पुढे येण्याचे ठरविले; सन १९६४ मध्ये अणुबाँब उडविला व रशिया आणि भारत या दोन्ही देशांवर जरब बसविण्यासाठी अण्वस्त्रे रोवण्याचे धोरण नक्की केले. चीनची ढोंगबाजी कशी असली आहे पहा, सोव्हिएत संघाने अफगाणिस्तानातून तसेच मंगोलियातून सेना हटवावी तर व्हिएतनामने काम्पुचियामधून सेनादले काढून घ्यावीत अशी मागणी करणारे चिनी राज्यकर्ते आपल्या पायाखाली काय जळत आहे ते पाहण्यास तयार नाहीत. भारताने अरुणाचल प्रदेशाला राज्याचा दर्जा दिला, सिक्कीमवर विलीनीकरणाचे शिक्कामोर्तब केले आणि मिझो बंडखोरांचा बीमोड केला... अशा विषयावर आगपाखड करणारे चिनी शासक तिबेटच्या स्वातंत्र्यावर सातत्याने नांगर फिरवीत आहेत. या महाभागांनी तिबेटच्या भूमीला अण्वस्त्रनिर्मितीची प्रयोगशाळा बनविली आहे; तिबेटच्या पर्यावरणावर, या परिस्थितीत भीषण आघात झाला आहे. तिबेटच्या स्वातंत्र्याचा प्रश्न, या साऱ्या मागण्यांच्या संदर्भात निर्भेळ माणुसकीचा प्रश्न ठरतो.

दुर्दैवाने तिबेटच्या स्वातंत्र्याकडे विशेष उत्कटतेने पाहिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. मग कुणी एखादा लेखक तिबेटी लोकसंख्या केवळ साठ लाख आहे, तर चिनी प्रजा शंभर कोटींपेक्षा जास्त आहे असा रागडा हिशोब मांडतो व या अल्पसंख्य तिबेटी नागरिकांनी स्वातंत्र्याची 'अव्यवहार्य' मागणी करू नये असा अनाहूत सल्ला देतो. याचा अर्थ जर्मन फौजांनी पूर्व युरोपात घातलेला धुमाकूळ समर्थनीय होता असेच या लेखकाला सुचवायचे आहे का? बाल्टिक राष्ट्रे तसेच यूक्रेन, पोलंड आदी छोटी राष्ट्रे आणि सुरिनामसारखी लॅटिन अमेरिकेतली राष्ट्रे केवळ आकारमानाने व लोकसंख्येने लहान आहेत, सबब स्वतंत्र राहण्याच्या लायकीची नाहीत हा निष्कर्ष या लेखकास अभिप्रेत आहे का? मग 'सत्य न मरते दळभारे' ही सुभाषितवजा पंक्ती लिलावात काढावयाची का? दुसरा एक पुरोगामी लेखक तिबेटमधली सरंजामशाही संपुष्टात आणणाऱ्या चिनी कम्युनिस्टांना धन्यवाद देत आहे. हे तर्कशास्त्रही अजब आहे! क्लाईव्ह आणि हेस्टिंग्ज् 'गोऱ्या माणसाचे ओझे' असा शब्दप्रयोग करीत असत, भारतीय नागरिकांच्या कल्याणासाठीच इंग्रजांनी हे ओझे खांद्यावर घेतले आहे हा युक्तिवाद करीत असत. डच नागरिकांचा याच पोताचा अभिमान इंडोनेशियावर वरवंटा फिरवून मोकळा झाला हे जगाला माहीत आहे. इंग्लंड आणि हॉलंड भांडवलशाही देश होते; तर चीनने समाजवादाची झूल आपल्या अंगावर चढविली आहे; पण म्हणून काही चीनचे पाप समर्थनीय ठरत नाही. एडगर स्नो हे नाव तसे सर्वपरिचित आहे. चीनमधल्या घडामोडींचा साक्षेपी अभ्यासक' हा लौकिक स्नो नामक माणसाने आपल्या गाठीशी बांधला आहे. या माणसाच्या The Other Side of the River नामक पुस्तकात पान क्र. ५४० वर एक उतारा वाचावयास मिळतो; तो असा—

## एडगर स्नोचा क्रूर नियतिवाद

'तिबेटमध्ये खूप मोठे चिनी सैन्य अडकून पडले आहे व ते तसेच तिथे राहील अशी चिन्हे आहेत; कारण तिबेटमधली जनता चीनविरोधी असून चीनपासून स्वतंत्र होण्यास अधीर आहे. समजा जगभर पसरत चाललेल्या यांत्रिकी संस्कृतीच्या चटक्यापासून तिबेट वाचला असता, तर आपणा सर्वांच्या सदसद्विवेकबुद्धीस समाधान वाटले असते. पण परिवर्तनाच्या नियमाला कोणताही अपवाद असू नये अशीच नियतीची इच्छा दिसते. तेव्हा तिबेटी लोकांनी देखील या कालगतीशी जुळवून घ्यावे अथवा नष्ट व्हावे.'

' एडगर स्नो याचा हा नियतिवाद किती क्रूर आहे! पश्चिम युरोपातल्या बेल्जियमसारख्या छोट्या भांडवलशाही राष्ट्रांनी आफ्रिकेतल्या कांगोवर राज्य केले तेव्हा असाच नियतिवाद अवघे साम्राज्यशहा लोकांना ऐकवीत होते. या न्यायाने फ्रान्सचे अल्जिरियावरचे वा इंग्लंडचे वेस्ट इंडीजवरचे, अमेरिकेचे ग्रेनाडावरचे आणि सोव्हिएत संघाचे अफगाण भूमीवरचे आक्रमण कालगतीचा महिमा गाणारे व म्हणून स्वागतार्ह ठरते. शूमॅकरने 'Small is Beautiful' या पुस्तकात बौद्ध संस्कृतीची तारीफ केली आहे; पण या बौद्ध संस्कृतीचीच होळी करणारे चिनी राज्यकर्ते म्हणे परिवर्तनाच्या नियमाची कार्यवाही करीत आहेत असे नामी शिफारसपत्र स्नो भाऊसाहेबाने दिले आहे. वस्तुत चिनी शासकांनी लाल बावट्याच्या छायेत इनर मंगोलिया, सिंक्यांग आणि तिबेट अशा स्वायत्त प्रदेशामधून त्या त्या ठिकाणच्या राष्ट्रजीवनाची राखरांगोळी केली आहे... पण तिबेटचा फिनिक्स पक्षी या

# जगाच्या नकाशावरून कायमचे नाहीसे होणे

**प्रश्न** : महोदय, आपण एका फ्रेंच पत्रकाराला दिलेल्या मुलाखतीत सांगितले आहे की, नजिकच्या भविष्यकाळात आपण तिबेटला परतणार आहात?

**लामा** : नाही, नाही. काय झालं की त्या फ्रेंच पत्रकाराला आमच्याविषयी सहानुभूती आहे. तो म्हणाला की समजा चिन्यांनी एखाद्या लहान मुलाला 'दलाई लामा' म्हणून घोषित केले तर? तेव्हा मी म्हणालो की काळजी करू नका. मी काही चिन्यांच्या हाती पुनर्जन्म घेणार नाही.

**प्रश्न** : म्हणजे सद्य:परिस्थितीत तुमचा तिबेटला परतण्याचा विचार नाही.

**लामा** : अगदी बरोबर. एक तर त्याचा काही उपयोग नाही. शिवाय तिबेटी लोकांनी, सध्या मी परतू नये, अशीच इच्छा व्यक्त केली आहे. तिथे काही वयोवृद्ध मंडळी आहेत, ज्यांची अशी इच्छा आहे की, त्यांच्या मृत्यूपूर्वी माझे दर्शन व्हावे; पण इतरेजनांना वाटते की, सध्याच्या परिस्थितीत मी न येणेच उत्तम. मला स्वत लाही तसेच वाटते. पचेन लामाचे उदाहरण आपल्यासमोर आहेच. जरी तो तिबेटी आहे तरीही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठीसुद्धा त्याला चिनी सरकारची परवानगी घ्यावी लागते हे अतिशय हास्यास्पद आहे अशा परिस्थितीत अडकण्याची माझी इच्छा नाही.

**प्रश्न** : आम्ही जे चिन्यांचे 'लोकसंख्या आक्रमण' बद्दल ऐकतो, त्याबद्दल तुमचे काय मत आहे?

**लामा** : तो फार मोठा धोका आहे फारच मोठा.

**प्रश्न** : चिन्यांनी माघार घेतली तर परिस्थिती पालटेल, असे नाही का तुम्हाला वाटत?

**लामा** : काही सांगता येत नाही. १९५५ साली जेव्हा मी चीनमध्ये होतो, तेव्हा चाऊ एन लाय म्हणाले होते की, तिबेटकडे प्रचंड जमीन आहे–रिकामी जमीन आणि चीनजवळ प्रचंड लोकसंख्या आहे अशा परिस्थितीत एकमेकांशी व्यापार करणे फायद्याचे आहे. तिबेटची जमीन काही चीनमध्ये उचलून नेता येत नाही, तेव्हा...

**प्रश्न** : तुमच्या हयातीत तुम्ही तिबेटमध्ये परत जाण्याची शक्यता आहे का? (लामाचे वय आज ५२ वर्षे आहे.)

**लामा** : हो. तशी आशा आहे; पण निर्णय घेण्याचा हा काळ नव्हे. सध्याचा काळ फार उलथापालथीचा काळ आहे. म्हणून वाट पाहणे सूज्ञपणाचे आहे.

**प्रश्न** : तिबेटमधील परिस्थिती सुधारली आहे, असे तुम्हाला वाटते का?

**लामा** : हो निश्चितच. तिबेटची परिस्थिती खूप सुधारली आहे. सध्याच्या सैल धोरणामुळे कितपत यश मिळेल, हा चीनसमोरचा खरा प्रश्न आहे. डेंगनंतर त्याच्याच गटाकडे सत्ता राहिल्यास परिस्थिती आणखी सुधारेल. आजचे म्हणाल तर परिस्थिती फार अनिश्चित आहे; पण आम्ही आशावादी आहोत. आम्ही चांगल्याची आशा करतो आणि मधल्या काळात वाईटाशी झगडण्याची तयारी ठेवतो.

**प्रश्न** : तुमच्या मते 'वाईट' म्हणजे काय? तिबेटला कधीही न परतणे?

**लामा** : ते सुद्धा; पण त्यापेक्षा वाईट म्हणजे जगाच्या नकाशावरून कायमचे नाहीसे होणे. हे सगळ्यात वाईट.

**प्रश्न** : एकेकाळी तुम्ही म्हणत होता की, सार्वमत (Plebiscite) घेतले तर तुम्ही तिबेटला परतण्यास तयार आहात; पण ज्या प्रमाणात चिनी लोक आज तिबेटमध्ये आहेत, ते लक्षात घेता सार्वमतसुद्धा निरुपयोगी ठरेल.

**लामा** : आमची मुख्य कल्पना सार्वमताचीच आहे; पण योग्य परिस्थितीत. कारण तोच एकमेव मार्ग आहे. चीन सरकार म्हणते तिबेटी जनता आनंदात आहे. तिबेटी जनता म्हणते आम्ही आनंदात नाही.

**प्रश्न** : मठ आणि देवळांच्या विध्वंसाबरोबरच जंगल आणि प्राणी जीवनाचा फार मोठ्या प्रमाणात विध्वंस करण्यात येत आहे.

**लामा** : हो, बरोबर आहे; पण आणखी एक गोष्ट– एकेकाळी खूप हस्तलिखित होती– भूर्जपत्रावर लिहिलेली. मूळ भारतीय किंवा तिबेटी. मी स्वत अशी हस्तलिखिते खूप ठिकाणी पाहिली आहेत. कधीही प्रसिद्ध न झालेली. ती सर्व आता

राखेतूनही भरारी मारून उडाला आहे, त्याने आकाशात झेप घेण्याची कोशीश चालवली आहे. आता चिनी राज्यकर्त्यांनी कालगती ओळखावी हेच तुम्ही-आम्ही बुलद आवाजात दुनियेस ऐकविले पाहिजे.

माओ त्से तुगचे सन १९७६ मध्ये निधन झाले, त्या नतर आणि खास करून सन १९७९ पासून चीनमध्ये जरा उदारमतवादाचे वारे वाहू लागले आहेत हे सर्वांना ठाऊक आहे. डेंग सिहाओ पिंगच्या नेतृत्वाखाली वातावरणात खूप सैलपणा अथवा मोकळेपणा आला हेही सर्वांना माहीत आहे. या नवनीतीमुळे राज्यकर्ते आपल्या चुका अधिकृतपणे लोकासमोर माडत आहेत. तिबेटी जनतेस आम्ही पुरेसा न्याय देऊ शकलो नाही' अशा आशयाचे कबुलीजबाब सन १९७९ पासून प्रकट झाले. या कबुलीनतर काही दुरुस्त्या-काही सुधारणा झाल्या हे खरेच आहे. पण म्हणून काही तिबेटी जनतेच्या असतोषावर उतारा झाला असा दावा करता येणार नाही. म्हणजे माओने हातात चाबूक

---

# हे सगळयात वाईट....दलाई लामा

नष्ट करण्यात आलेली आहेत. हा तोटा फार मोठा आहे.

**प्रश्न** : चीनव्याप्त तिबेटमध्ये तिबेटी कम्युनिस्ट पार्टीचे सभासद खूप आहेत का ?

**लामा** : हो खूपच आहेत. तात्त्विक पातळीवर ते कम्युनिस्ट असतीलही, पण जेव्हा तिबेटचा प्रश्न येतो, तेव्हा सर्व एक होतात. भूतकाळातसुद्धा तिबेटी कम्युनिस्ट होते, १९३० सालीसुद्धा होते. त्यापैकी काही चीन-जपान युद्धामध्ये लढले होते. ते खरे कम्युनिस्ट होते. त्याचा कोणत्याच धर्मावर विश्वास नव्हता, ते निधर्मी होते. एकेकाळी त्यानी मला अप्रत्यक्षपणे सुचवले होते की, आपण धार्मिकतेवर विसबून राहणे योग्य नाही त्याना वाटत होते की तिबेटमध्ये क्राती होणे आवश्यक आहे. त्याशिवाय तिबेटची आर्थिक प्रगती होणार नाही. त्यासाठी त्यांना चीनची मदत हवी होती. त्यानी चिनी सैन्यामध्ये प्रवेश केला व अधिकाराच्या जागा मिळविल्या.

पण १९५१ ते १९५५ च्या दरम्यान परिस्थिती बदलायला लागली. पेकिंगमध्ये जाहीर होणारी धोरणे आणि तिबेटमधील त्याची प्रत्यक्ष अमलबजावणी वेगवेगळी असल्याचे जाणवू लागले. पेकिंगमधून जाहीर होणाऱ्या योजना फारच आकर्षक असत त्यामुळे स्थानिक पातळीवर असमाधान, असंतोष होता. तिबेटी कम्युनिस्टाना पदच्युत करण्यात येऊ लागले. त्याना १८-२० वर्षांचा तुरुगवास घडू लागला. त्यापैकी बरेचसे आज मृत्यू पावले आहेत. आज चिनी तत्वज्ञानामुळे तरुण पिढी कम्युनिस्ट असेलही, पण (आणि हे एक गूढच आहे.) ही नवी पिढी मागच्या पिढीपेक्षा जास्त धार्मिक आहे. नव्या पिढीला खरा बुद्ध धर्म म्हणजे काय माहिती नाही, पण तरीही ते जास्त श्रद्धाळू आहेत. ते जर आधीच कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झालेले असतील तर त्याना पूजा वगैरे करायला बदी आहे त्यामुळे भल्या पहाटे किंवा सध्याकाळी उशिरा ते टोप्या घालतात, चेहरे लपवितात आणि मदिराला प्रदक्षिणा घालतात.

**प्रश्न** : जोपर्यंत तुम्ही येथे आहात, तोपर्यंत तुम्ही तुमचा 'निर्वासित' हा दर्जाच कायम ठेवणार का ?

**लामा** : हो. १९६० साली किंवा ७० साली याविषयी काही प्रश्न निर्माण झाले होते

**प्रश्न** : भारत सरकार बरोबर ?

**लामा** : नाही, नाही. आमच्यातच. काही तिबेटी मडळीना भारतीय नागरिकत्व घेण्याची इच्छा होती. आमचे धोरण अशा प्रत्येक विनतीचा स्वतत्रपणे विचार करण्याचे आहे; पण समजा सबध समाजालाच भारतीय नागरिकत्व घेण्याची इच्छा असल्यास मात्र मग वेगळा विचार करावा लागेल. तसे केल्यास आम्ही तिबेटला परतण्याची आशा कायमची सोडली, असा त्याचा अर्थ होईल.

**प्रश्न** शिवाय 'निर्वासित' दर्जा ठेवल्यास आर्थिक मदत सुरू राहील.

**लामा** : नाही, तसं नाही. सध्या फारशी मदत मिळत नाहीच. काही सस्थानी तर आधीच गाशा गुडाळला आहे. आम्हाला आजही मदतीची गरज आहे तिबेटीय सस्कृती जपण्यासाठी, बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी. जर तुम्हाला वेळ असेल तर दक्षिण भारतातील आमच्या वसाहतीला अवश्य भेट द्या.

**प्रश्न** . चीन-व्याप्त तिबेटमधून बरीच मुले भारतात आली आहेत. ते उघडपणे भारतात येतात की छुप्या मार्गाने ? आजपर्यंत किती आले असतील ?

**उत्तर** : जवळ जवळ एक हजार आले असतील. छुप्या मार्गाने. काही तिबेटी लोक यात्रेच्या निमित्ताने येतात. लहान मुले सामानात बाधून आणतात आणि परत जाताना मुले इथेच ठेवून जातात. काही प्रौढ मडळीसुद्धा यशस्वीपणे पळून येऊ शकतात. विशेषत: अमगे आणि खाम भागातील ते वेगवेगळया मार्गांनी येतात-नेपाळमधून, पहाडामधून. हे मार्ग फार त्रासदायक आहेत- १५ दिवस चालूनच ते मार्ग पार करता येतात. तरीही ते यतात, कारण तेथील परिस्थिती चागली नाही.

**नर्गिस दलाल**

**(संडे ऑब्झर्व्हर अंकावरून साभार)**

घेऊन थैमान घातले वा नतर आलेल्या ढंगने गाजर नाचविले तरी तिबेटी माणूस खूष होत नाही हे विदारक सत्य आहे 'धरले तर चावते व सोडले तर पळते' ही म्हण तमाम चिनी राज्यकर्त्यांनी या सदर्भात पाठ करावी शासकानी गाजर नाचविले म्हणजे परतत्र प्रजा आपली अस्मिता परत मिळवील असे समीकरण केवळ बाळबोध आहे. तिबेटी स्वातत्र्याचा प्रश्न हा तिबेटी अस्मितेचा, तिबेटी स्वत्वाचा प्रश्न आहे कदाचित म्हणूनच दलाई लामाची पाचवी मागणी– स्वातत्र्याची मागणी अगदी न्यायोचित आहे.

आतरराष्ट्रीय कायद्याच्या भूमिकेतूनही तिबेटच्या स्वातत्र्याचा प्रश्न मौलिक आहे. गिरी देशिंगकर याचा Red star over Tibet अशा शीर्षकाचा एक लेख इंडियन एक्स्प्रेसच्या अकात (१२ ऑक्टोबर १९८७) प्रसिद्ध झाला आहे. या लेखानुसार अर्थातच जगातल्या कुणाही राष्ट्राने तिबेटच्या सार्वभौम अस्तित्वास मान्यता दिली नाही व म्हणून आतरराष्ट्रीय कायद्याच्या भाषेत तिबेट परतत्र नाही– असा युक्तिवाद वाचण्यास मिळतो. फार तर स्पेनमधले बास्कस्, इराण व इराक तसेच टर्की या देशातले कुर्डस् श्रीलकेतले तमिळ आणि भारत व ब्रह्मदेश या ठिकाणचे नागा... 'या लोकाप्रमाणे चीनमधले तिबेटी हेही असंतुष्ट अल्पसंख्य ठरतात... व त्याच दृष्टीने त्याच्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे' ही आहे देशिंगकरी शिफारस आता जगातल्या कुणाही राष्ट्राने सन १९५० पासून आजतागायत तिबेटचे सार्वभौमत्व मान्य केले नाही हे खरेच आहे, पण मग ख्रिस्तपूर्व शतकात सन १२७ मध्ये सुरू होणाऱ्या तिबेटी इतिहासाने सरळ आत्महत्या करावी का? सातव्या आणि दहाव्या शतकात तिबेट एकात्म झाला आणि मग या शतकाच्या मध्यापर्यंत स्वतंत्र सार्वभौम राहिला हा सारा घटनाक्रम दृष्टीआड करायचा का? या प्रदीर्घ कालखडात कधी मगोल खानानी तरी कधी नेपाळी गुरख्यानी वा काश्मिरी डोग्रानी अथवा मचू राजानी किंवा ब्रिटिश बादशहानी तिबेटवर घाले घातले, तिबेटी जनतेस गुलाम बनविले ही वस्तुस्थिती आहे. पण अशा खारट, तुरट व तिखट घटना घडल्या तरी तिबेटचा स्वातत्र्यसूर्य वारंवार या ढगाना दूर सारून आकाशात झळकू लागला हीही वस्तुस्थिती आहे. सन १८७३ मध्ये ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधीकडून तिबेटच्या प्रश्नाचा काही अभ्यास झाला व त्यातूनच चीन, ग्रेट ब्रिटन आणि तिबेट अशी त्रिपक्षीय परिषद साकार झाली सन १८०० पासून ते सन १८७३ पर्यंत नेपाळच्या आणि जम्मूच्या राजानी तिबेटवर आक्रमणे केली तेव्हा चीनचे सैनिक आणि तिबेटी सैनिक परस्पराना साह्यकर्ते ठरले... असा इतिहास लक्षात घेऊन सन १८७६ च्या परिषदेत चीन तिबेटच्या दृष्टीने अधिपती आहे या निष्कर्षावर शिक्का उठविण्यात आला. पण एकतर या परिषदेचे निर्णय तिबेटी जनतेने सरळ झिडकारले; दुसरे म्हणजे तिबेट हा काही चीनचा प्रात नव्हे .. या शब्दात १८७६ च्या परिषदेनेसुद्धा कबुली दिली होती... आणि अखेर पुढच्या तीन दशकात खुद्द ब्रिटिशानाच तिबेटच्या स्वतत्र अस्तित्वास मान्यता द्यावी लागली हा सारा इतिहास डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. लॉर्ड कर्झनच्या धोरणामुळे शेवटी सरळ तिबेटी लोकावरच घाला घालण्यात आला, बौद्ध भिक्षूवर जरब बसविली गेली तेव्हा कुठे ग्रेट ब्रिटनला तिबेटमध्ये पाय रोवता आला. पुढे सन १९०७ मध्ये रशिया व ब्रिटन याच्यात एक करार झाला. या करारात चीनच्या तिबेटवरच्या आधिपत्याचा उल्लेख जरूर झाला, पण हा उल्लेख नाममात्र होता. कारण त्यापूर्वी (केवळ एक वर्षापूर्वी) ग्रेट ब्रिटन आणि चीन यांच्यात जो समझौता झाला होता त्याचा प्रतिज्ञालेख स्वच्छपणे तिबेटी स्वातत्र्याची ग्वाही देणारा होता... हा घ्या पुरावा.

'सन १८९० तसेच सन १८९३ या वर्षी ग्रेट ब्रिटन आणि चीन या देशामध्ये काही कररमदार झाले; पण या कराराच्या तरतुदी तिबेटी लोकानी पूर्णपणे नाकारल्या.'

### बफर स्टेट म्हणून मान्यता

या साऱ्या पार्श्वभूमीवर रशिया व ग्रेट ब्रिटन अशा दोन्ही सत्तानी चीनच्या तिबेटवरच्या आधिपत्यास मंजुरी द्यावी या गोष्टीचे कुणालाही आश्चर्य वाटेल. पण या महासत्ताना आशिया खडात आपापली प्रभावक्षेत्रे उत्पन्न करण्याची इच्छा होती व चीनचा उल्लेख एकमेकाना शह-काटशह देण्यासाठी आवश्यक वाटत होता हे लक्षात ठेवले पाहिजे. सुदैवाने केवळ चार वर्षांत असा नाममात्र उल्लेख देखील सपुष्टात आला. सन १९११ मध्ये चीनदेशी क्राती झाली; मंचू घराण्याची सत्ता कोसळली व तिबेट पूर्णत. मुक्त झाला. अलेक्झान्ड्रोविझ् आणि रिचर्डसन या ख्यातनाम विचारवतानी मचू घराण्याच्या विनाशानतर, चीन व तिबेट याच्यातले संबध संपुष्टात आले हे नि.संदिग्ध शब्दात मान्य केले आहे. नतर तिबेटने आपले स्वातंत्र्य जाहीर केले. सन १९१४ च्या सिमला परिषदेने या स्वातत्र्याला मंजुरी दिली. चीनच्या प्रतिनिधीने या परिषदेच्या दस्तऐवजावर हस्ताक्षरे उमटविण्यास नकार दिला तरी अशा नकाराची पर्वा न करता ग्रेट ब्रिटनने 'तिबेट हे एक बफर स्टेट आहे' या निर्णयावर मोहोर उठविली. सन १९५० पर्यंत या सार्वभौम राज्याने देशोदेशी आपले दूतावास उभे केले, आंतरराष्ट्रीय सभा-समेलनामधून हजेरी लावली. आपले अस्तित्व वारंवार सिद्ध केले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ग्रेट ब्रिटनला तिबेटच्या भूमीवर सैन्य ठेवायचे होते; जपानच्या विरोधात हे सैन्य अकुश ठेवील अशी समजूत होती– पण तिबेटच्या सरकारला युद्धाच्या धकाधकीतून बाजूला राहण्याची इच्छा होती– तेव्हा या सरकारने ग्रेट ब्रिटनच्या सैनिकी हालचालीना विरोध केला. सन १९३० ते सन १९४५ या पधरा वर्षांत माओ त्से तुगने आपला प्रभाव वेगाने वाढविला. चॅंग कै शेकशी यशस्वी संघर्ष करून माओने आपली सत्ता मजबूत केली– पण तिबेटी टोळ्याशी लढताना माओच्या अनुयायाना ब्रह्मांड आठवले. एडगर स्नो या लेखकाने 'Red Star Over China' नावाच्या सुप्रसिद्ध पुस्तकात पान क्र. २३४ वर किती मार्मिक उल्लेख केला आहे–

'कम्युनिस्टाना विरोध करण्यासाठी मान्सू आणि तिबेटन टोळीवाले एकत्र आले. त्यानी कम्युनिस्टांचा घाम काढला. त्यांच्या सक्रिय विरोधामुळे कम्युनिस्टाची फार दैना झाली. दऱ्याखोऱ्या आणि नदीनाले ओलाडताना हे लाल बावटेवाले कासावीस झाले, कारण त्यांच्या बदुकांमधून उडणाऱ्या गोळ्या निरर्थक ठरल्या, टोळीवाल्यानी त्याना चुकवले... शेवटी या टोळीवाल्याची घरे लुटून कम्यु-

निस्टांना गुजराण करावी लागली... पण तिथेही काही पदरात पडले नाही.' (टोळीवाल्यांनी जणू उद्ध्वस्त भूचे धोरण पत्करले होते.)

तिबेटी जनतेची ही जिद्द, ही स्वातंत्र्याकांक्षा आणि ही सारी परिणती थक्क करणारी आहे. सन १९५० मधे चीनने आपल्या सैन्याच्या बळावर तिबेटची हीच जिद्द मोडून काढण्याचे ठरविले. पण सैनिकी हडेलहप्पी आणि सुलतानी हुकूमशाही या साडेतीन दशकांत निष्प्रभ ठरली, तिबेटी ईर्षा साक्षात मृत्युदंडाशी पैजा खेळू लागली...आज या जिद्दीला जगाने मान्यता दिली आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या इतिहासाने या जिद्दीसमोर मान झुकविली आहे.

आपणही तिबेटच्या स्वातंत्र्याचा जयघोष केला पाहिजे, कारण भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तिबेटचे स्वातंत्र्य निर्णायक आहे. आपल्या पहिल्या पंतप्रधानांनी, डॉक्टर राधाकृष्णन् यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास भोळसटपणा दाखविला, जोडीला हलगर्जीपणाही केला. चीनचे तिबेटवर आधिपत्य आहे, एवढेच नव्हे तर सार्वभौमत्वही आहे हे मान्य करणारे पंडित जवाहरलाल नेहरू शेवटी 'हिंदी-चिनी भाई भाई' या घोषणेला मूठमाती द्यावी या निष्कर्षाप्रत पोचले. मुळात चीनच्या हातावर तिबेटचे उदक सोडले की चीनचा त्रस्त समंध शांत होईल ही समजूत बाळगणेच चूक होते. पण जवाहरलालजींनी ही चूक केली. सन १९५० मधे तिबेटचा प्रश्न युनायटेड नेशन्सच्या वेशीवर टांगावा ही सूचना कैक राष्ट्रवादी नेत्यांनी केली होती, पण ही सूचना करणारे हे पुढारी उजवे आणि प्रतिगामी आहेत अशी संभावना करण्यात आली. दुर्दैवाचा कळस म्हणजे काश्मीरचा प्रश्न युनायटेड नेशन्सच्या चावडीवर नेण्यात आला. म्हणजे ज्या विषयावर वादाची रणधुमाळी छेडणे शक्य आणि आवश्यक होते तो विषय निर्विवाद आहे हे सांगण्यात आले. तर काश्मीरचा निर्विवाद विषय वादग्रस्त आहे यावर मोहोर उठविली. सरदार के. एम. पणिक्कर हे भारतीय राजदूत तेव्हा पेकिंगमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत होते. त्यांचा पत्रव्यवहार पाहून असे वाटते की बहुधा या माणसाने चीनचीच वकिली करण्याचा वसा उचलला होता. व्ही. के. कृष्णमेनन यांचाही कदाचित तोच बाणा होता. या दोघांनी आवर्जून सांगितले की चीनचे राज्यकर्ते शांततेच्या मार्गाने समाजपरिवर्तन करू इच्छितात व म्हणून तिबेटमधल्या मठामंदिरांना धक्का लागणार नाही. या दोघांनीच चीनच्या शांतिपूर्ण विदेशनीतीची ग्वाही दिली व भारतासारख्या शेजारी राष्ट्राने चीनचे भय बाळगू नये असा सल्ला दिला. पंडित जवाहरलाल नेहरूंनी हीच वक्तव्ये भारतीय जनतेस ऐकविली. प्रत्यक्षात तिबेटवर चिनी सत्तेचा रणगाडा फिरू लागला. ज्या भारताने या कृत्याचा निषेध करायचा तो भारतच गप्प राहिला तर अन्य देशांनी तरी कशाला वाईटपणा पत्करावा ? 'बळी तो कान पिळी' असे म्हणतात. चीनची मग्रुरी जगाने दुर्लक्षिली बिचारा तिबेट आपले स्वातंत्र्य गमावून बसला. तेव्हा दलाई लामांनी पंडित जवाहरलाल नेहरूंकडे गाऱ्हाणे गायिले; पण आपल्या पंतप्रधानांनी या गाऱ्हाणे मांडणाऱ्या सज्जनालाच उपदेश केला; चाऊ एन लाय आणि माओत्से तुंग 'तसे चांगले आहेत'— वगैरे ऐकवले. बांडुंग परिषदेत याच चिनी राज्यकर्त्यांचा नेहरूजींनी गौरव केला. वस्तुत: केवळ एक वर्षापूर्वी म्हणजे सन १९५४ मधे पंचशील करारावर स्वाक्षऱ्या झाल्या होत्या व या कराराची शाई वाळण्याअगोदरच चीनने भारताच्या सीमांना धडका मारण्यास सुरुवातही केली होती. सारांश, तिबेटचा घास पचवून चिनी बकासूर भारताच्या उत्तरी सीमांवर हल्ले करू लागला होता. पण जागतिक शांतता व जगातली भारताची प्रतिमा वगैरे गोष्टींविषयी अवाजवी आस्था दाखविणाऱ्या पंडित नेहरूंनी चीनच्या पापांकडे दुर्लक्ष करणे श्रेयस्कर मानले. घरात घुसलेला लुटारू मुळात चांगलाच आहे अशी शिफारसपत्रे प्रसृत करणे पसंत केले. सन १९५५ ते १९६० ही पाच वर्षे भारताच्या दृष्टीने भयानक ठरली. एकेका स्वप्नाचा चक्काचूर, आपल्या सीमांची होळी आणि जगात रूढ झालेल्या प्रतिमेची धूळधाण अशी सारी कुंडली भारताच्या भाळी लिहिली गेली. आता वेळ टळली होती. चीनच्या सेना भारताच्या सीमा ओलांडून थेट असमला खतरा उत्पन्न करणार... हे विधिलिखित सुस्पष्टपणे दिसू लागले होते. सन १९६२ मधे चीनने भारतीय सेनेचा पराभव केला व मग अमेरिका, इंग्लंड, इस्रायल, सोव्हिएत संघ वगैरे देशांनी 'आम्हाला सहाय्य करावे' अशी करुणा भाकण्याची वेळ भारतावर आली. दुनियेच्या दृष्टीने भारताची पार नाचक्की झाली.

भारताच्या पराभवाची बीजे तिबेटवरच्या चिनी हल्ल्यात आढळतात, म्हणूनच या पराभवाचा बदला घेण्यासाठी तिबेटच्या मुक्तीचा ध्यास घेतला पाहिजे. तिबेटची मुक्ती भारताच्या हिताची आहे. माणुसकीच्या तत्त्वाचा विचार केला वा आंतरराष्ट्रीय संबंधांचा आढावा घेतला, अथवा भारतीय हितसंबंधाचा ध्यास घेतला तरी तिबेटचे स्वातंत्र्य अपरिहार्य ठरते.

आपण या स्वातंत्र्याचा उद्घोष सातत्याने केला पाहिजे. काशीस जावे, नित्य वदावे ही उक्ती किती मार्मिक आहे.

□


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# मातंगी

● प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे ●

: १ :

**गां**धीनगर ही महात्मा गांधी हॉस्पिटलमध्ये डॉक्टरपासून ते चतुर्थ-श्रेणी कर्मचारी म्हणून काम करणाऱ्यांपर्यंतची आदर्श वसाहत. धन्वंतरीपासून वृंदावनापर्यंत निरनिराळ्या नावांच्या छोट्या छोट्या वस्त्यांची एकत्र वसाहत: महाराष्ट्र सरकारनं स्वातंत्र्योत्तर काळात उभारलेलं मुंबईतलं सर्वांत मोठं हॉस्पिटल, महात्मा गांधी हॉस्पिटल! महानगरीतलं महाहॉस्पिटल म्हणा ना.

वृंदावन कॉलनीतील पाचव्या नंबरची क्वॉर्टर विठ्ठलराव जाधवाची. विठ्ठलराव वृंदावनात आला तेव्हा होता विठल्याच ! वॉर्ड बॉयचं काम त्याला मोठ्या मिनतवारीनं मिळालेलं. त्यापूर्वी तो थेट कुर्ल्याच्या झोपडपट्टीत राहायचा आणि दारूचे फुगे दारूभट्टीवरून घेऊन पोहोच करायचं काम करायचा. हे काम त्याला लांबच्या मामानं मिळवून दिलेलं. कुर्ल्याच्या झोपडपट्टीत गावागावांतली अठरापगड जातीची, देशोधडी लागलेली माणसं मुंबईत पोटापाण्याचं बघायला आलेली. मिळेल ते, जमेल तसं कष्टाचं काम करायचं अन् आभाळ-फाटल्या अवस्थेच्या जीवनाला फाटक्या झोपडीची सांधवणूक करीत जगायचं. गावगाड्यातलं जातपरत्वे माजूरपणाचं जगणं मुंबईच्या झोपडपट्टीत टराटरा फाटतं ! तरी झोपडपट्टीत रोज भर पडतच असते. या झोपड्यांमधून निरनिराळ्या उच्चनीच साऱ्या जातींच्या भुकेल्यांच्या लाटा रोज भरतं आणत असतात. त्यातच गावगाड्यात ओहोटीच्या चिखलात गडप होऊ पाहणाऱ्या मांग-वाड्यातून पळून आलेल्या पोरांचीही एक लाट ! झोपडपट्टीला माण-सांची ओहोटी माहीत नाही. विठ्ठल्या जाधव अकोलपाटाच्या भिव्या मांगाचा पोर ! गावाकडल्या बरबादीला कंटाळून, कावून मुंबईला पळून आला; तो वाट शोधीत थेट कुर्ल्याच्या झोपडपट्टीत ! आगी-तून फुफाट्यात ! इथंही नरकातलं जिणं ! अकोलपाटच्या मराठी शाळेत कुलकर्णी मास्तरच्या हाताखाली छड्या खाऊन बेजार झालेला विठल्या भिव्याच्या आग्रहानं घरी राहिला अन् मग पस्तावला. पस्ता-वला तसा पळून थेट मुंबईला आला. दहा वर्षांनी भिव्याला कळलं ! तोपर्यंत भिव्याचा पोर महात्मा गांधी हॉस्पिटलात वॉर्डबॉयचा ड्रेसर झाला होता. वृंदावनात क्वॉर्टरमध्ये मोठ्या दिमाखानं राहत होता. हे सारे त्या डॉ. गोखल्यांचे उपकार ! डॉ. गोखले मोठा देव-माणूस. त्यानं विठल्याचा विठ्ठलराव केला.

पाच नंबरच्या क्वॉर्टरमध्ये आता विठ्ठलराव जाधवाचा नेवर एकचा संसार चालला होता. डॉ. गोखल्यांनी आणि त्यांच्या पत्नी डॉ. चारुशीलाताईंनी त्याच्या जीवनाची कळाच पालटली होती. रोज त्याची विचारपूस. त्याला अडलं पडलं, लागलं सवरलं ! विठ्ठलराव एकदा गावी गेला. त्यानं बरोबर विठीला आणलं ! डॉ. गोखल्यांच्या आणि ताईंच्या पायावर घातलं. आता विठ्ठलराव जाधव, विठाबाई, रेणुका आणि विठ्ठलरावाचा मुलगा परशुराम असा परिवार सुखात नांदतोय. रेणुका मुंबईच्या कॉलेजमध्ये शिकून प्रोफेसर होण्यासाठी इंटरव्ह्यू देऊन आली होती. परशुराम महात्मा गांधी हॉस्पिटलला जोडून असलेल्या मेडिकल कॉलेजात एम. बी. बी. एस. च्या परीक्षेला बसला होता.

झोपडपट्टीत आल्यापासूनच विठ्ठलरावाचा आदितराव गाय-कवाडाशी परिचय झाला होता. त्यावेळी आदितराव कामगार चळ-वळीत असायचा. अलीकडे त्यांनी मुंबईत आलेल्या मातंगांच्या संघ-टनेचं काम सुरू केलं होतं. विठ्ठलरावाच्या घरी त्यांची नेहमी उठबस—जाणयेणं. विठ्ठलराव कधी चळवळी, संघटनेच्या भानगडीत पडला नाही. आपल्या पोराचं भलं झालं तरी चांगभलं; असं त्याला वाटायचं. पण रेणुका आणि परशुराम मात्र आदितरावाच्या संघटनेत असायचे. रेणुका तर विशेष रस घ्यायची.

दोन्ही चुणचुणीत मुलं चारुशीलाताईंना आणि डॉ. गोखल्यांना भारी आवडायची. डॉक्टरांना दोन मुलीच. सुमारे या मुलांच्याच बरोबरीच्या. ताईंनी आपल्या मुलींबरोबरच या कभिन्न रंगाच्या मांग मुलांना अगदी आपली मुलं म्हणून शिकवलं, पाहिलं. जणू गंगायमु-नेचा संगम ! रेणुकेला मातंग समाजाच्या संघटनेत विशेष रस आहे हे डॉक्टरांच्या केव्हाच लक्षात आलेलं. त्यांनी किती तरी वेळा तिच्याशी या विषयावर चर्चा केलेली. एव्हढंच नव्हे तर आदितराव गायकवाडांनाही घरी बोलावून संघटनेची चौकशी केलेली. चर्चा केलेली. वादविवाद केलेले. मुंबईतल्या मातंग समाजाच्या कार्यक्रमालाही ते एकदा चारुशीलाताईसह उपस्थित राहिलेले. डॉ. गोखल्यांशी चर्चा म्हणजे रेणुकेला लिहायला विषय मिळत असत. अलीकडे ती दलित चळवळ, मातंग समाज यांसारख्या विषयांवर लिहू लागली होती आणि ते छापून आलं की डॉक्टर आणि चारुशीलाताई तिचं तोंडभरून कौतुक करीत.

विठीला या संसाराचं मोठं अप्रूप वाटायचं. ती किती वेळा आपल्या पोरांची आलाबला घ्यायची. पोरांकडं पाहिलं की तिचा उर अभिमानानं भरून फाटायला लागायचा. डोळ्यांतून गंगा वाहायची !

¤

रेणुका संगमपूर कॉलेजच्या इंटरव्ह्यूला जाऊन आली होती आणि काल तिला प्रत्यक्ष नोकरीची ऑर्डर आली होती. संगमपूर गाव मोठं तालुक्याचं. अकोलपाटाजवळ तासाच्या रस्त्यावर ! ऑर्डर पाहून विठ्ठल आणि विठी हरखून गेली होती. ज्या गावात घेऊ म्हणता कर्म आड आलं आणि शिक्षण चुलीत गेलं; त्याच परिसरातल्या पोरांना शिकवायला आपली पोरगी चाललीये तीही कॉलेजात या विचारानं विठीला आभाळ ठेंगणं झालं होतं. ती अकोलपाटाहून विठ्ठल रावाबरोबर पळून आली होती. तेव्हापासून पुन्हा तिनं त्या अकोल-



पाटाचं थोबाड पाहिलं नव्हतं; पण म्हणूनच आता रेणुकेची तिकडे जायची वेळ आली आणि तिला गंगा उलटी वाहतेसं वाटू लागलं. मन काहीसं भेदरलं. तिच्या डोळ्यांसमोर ते अकोलगाट उभं राहिलं. ते प्रसंग, ती माणसं सारं सारं उभं राहिलं. तिचं मन घारीच्या नजरेनं भूतकालाचा वेध घेत निघालं.

डांग चिंग चिंगाक्, डांग चिंग चिंग, डांग चिंग चिंगाक् डांग चिंग चिंग–

डडंग डंग डंग डांग चिंग चिंग–डडंग डंग डंग डांग चिंग चिंग चिंग–डांग चिंग... आखाडीतली सोंगं नाचत होती. एका मागून एक सरस्वती, गणपती, परशुराम, रक्तादेवी. रात्रभर नुसता गदारोळ चालणार होता. 'रात्र थोडी सोंगं फार !' गणपा माळी, रामू तेली, सावता कुंभार, सदाशिव जोशी, सुका बेलदार, असे अनेक देवीचे भक्त मोठ्या हौसेनं सोंग घेणार होते. सगळ्यांची धावपळ. आपापल्या सोंगाची सजावट. नंबर लावून सगळे तयार. वर्षातून एकदा आखाडीत नाचायचं. मग चेव येतो. चेकाळून चेकाळून सोंगं नाचतात. आपल्या डफड्या पिपाण्यांनी मांगं त्यांना नाचवतात.

त्या दिवशीच्या आखाडीतही चांगला रंग भरला होता. सोंग घेणारे आणि वाजवणारे दोघेही दारू पिऊन तर्र. प्रत्येक सोंग्या आपलं सोंग जोरात झालं पाहिजे म्हणून वाजंत्री मांगांना खाजगीत नेऊन दारूला नोटा सोडायचा. सोंग निघता निघता मग सोंगाच्या तोंडून वाजंत्रीला सूचना मिळत होती, 'वाईच्यानो, हेपलून हेपलून

वाजवलं तर गाडीवर लाथ मारीन भर माडवात हा ! ठासून वाजवायचं भाडखाऊनो, वररे पिपाण्या !' असा जोरकस दम भरायचा. डफडयावर टिपरू आपटीत तितकाच जोरकस प्रतिसाद मिळत होता. सोग नवा नवा नाच काढून नाचायला लागल की आखाडीतला तमाशा बंद पडायचा. बघ्याची नुसती गर्दी, सोगाचे मैंतर सोगावरून पैसे ओवाळून मागाच्या हातात द्यायचे. पैसे हातात पडले की पिपाणी डफडे वाजवायला आणखी चेव यायचा. 'हाड!' 'अँट्या'! असं तोडान उत्साहात ओरडत मागं वाजवायची. जसा डफड्याला चेव तसा सोंगाला चेव !

विठीचा बाप सुराजी माग डफड्याला गुलाम माणूस ! वाजवायला लागला की सारं विसरून वाजवायचा त्यात नऊ टाक पोटात गेलेली; मग गडी चेकाळलाच ! त्याचं डफड्यावरचं टिपरू ठरत नव्हतं. तोडानी चितकारत तो साठमारीच्या खेळात हत्तीला चेतवतात तसा धावधावून चेतवीत होता. टोपी अन धोतराचा फाडाणा त्या तालावर नाचत होते. सोग तितकंच चेकाळून उठत होतं. सुराजीचे साथीदार त्याला नुसता खेळवीत होते. सुराजीच्या जोडीन आणखी सात–आठ माग वाजंत्रीत गुतलेले.

अकोलपाटच्या अष्टभुजा देवीसमोर सालाबादप्रमाणे पाच दिवसाची आखाडी बसलेली. सुपारी देऊन चागला तमाशा आणलेला. चार दिवस तमाशाची उठवस, धामधूम, जागरण अन् पाचव्या दिवशी सोगं ! देवळासमोर मांडव. रस्त्याच्या एका टोकाकडून सोग नाचत यायच दुसऱ्या टोकाकडे. माडवातून नाच करीत जायचं. एका बाजूला माडवाच्या, तमाशाचा बोर्ड केलेला. बोर्ड म्हणजे अगाच. फडाच्या उजव्या हाताला रस्त्याच्या कडेला चहाच दुकान, भेळभत्ता, गुडीशेवेच दुकान. बाजूला एक दोन पानलाद्या. या निमित्ताने दुकानदाराची चलती. त्यात वैशाखाचे दिवस त्यामुळं तिथच घातलेल्या सोडालेमनच्या दुकानावर नुसती झुबड !

गेले पाच दिवस आखाडी चाललेली. चार दिवस नुसताच हजेरीचा तमाशा. आखाडी जत्रेची पचमडळी वर्गणीदार तमाशाची हौशी मडळी आणि गावातले गुलहौशी आपापली हजेरी मोठ्या रूबाबात लावून जायचे, फडाजवळ ! आज पाचवा दिवस सोगांचा. रात्रभर नुसता धुमाकूळ. सोंगाचा नाच आणि उत्सवकर्त्यांची नुसती धावाधाव. वाजंत्री मागांना पर्वणीचा दिवस ! सारा मागूडा आखाडीत हरवलेला. मागाची शाळकरी वयाची पोरं सोडालेमन बाटल्या विकताहेत ! 'सोऽऽडा लेमन, घे गार हे गोड हे !' ओरडत झुई करून बुचाची बाटली फुटतेय. बाया, पोरी सोरी चहा भेळीच्या दुकानाशी फतकल देऊन बसलेल्या. आखाडीची गमत पहायला. तरणी बाड पोरं तमाशामाग, दारूमाग, सोगामाग हिडताहेत. तरण्याताठ्या पोरी मधूनच आयाबायाजवळून उठून गर्दीत गर्दी गमत पाहून येताहेत. बसलेल्या आयाबायाना, पोरं, बाप्ये मधूनच चहा, भेळ, भजी, गुडीशेव काय मिळेल ते आणून देताहेत. लहान पोरं आयाबायाच्या हाती आलेल्या खाऊवर तुटून पडताहेत, झोबी घेताहेत. आया-बायाच्या ह्या घोळक्यात सुराजी मागाची परीगा बसलीये. सोगाभोवतीच्या घोळक्यातून सुराजीचा चेकाळला आरड ऐकून डोकावून डोकावून सुराजीचं घामानं गच्च झालेल उसळतं ध्यान पाहतीये. मधूनच तोंडातलं जमलं पान पचकदिशी थुकून टाकतीये. सुराजीचा डगरा बाप मात्र मागुड्यात पडलाय खोकत. एका कोपऱ्यात. त्याच्या खोकण्याला अधार चिरून सोबत करताहेत दोन म्हातारे दोन म्हाताऱ्या ! त्यांच्या अस्तित्वाला आधार अधारातून दरवळणाऱ्या आवाडी दोरखंडांच्या वासाला आणि अधार उद्‌ध्वस्त करणाऱ्या कुत्र्याच्या कालव्याला ! अधारात डोळे फाडून मांगवाड्याकडे पाहत वर्षानुवर्षे उभी असलेली पडक्या मदिरातली मातगी !

आखाडी म्हणजे भोम्या मागाला पर्वणी ! भोम्या माग उभ्या गावाला माहीत धंदा हमालीचा पण केवळ नावालाच ! त्याचा खरा धदा भाड्याचा ! भोम्या भाड्या ! असच लोकं सबोधायचे आणि तो खुशाल हाकेला ओ द्यायचा. भोम्या तसा चागला पचविशीचा तरुण! कुठून कुठून पँटी शर्ट आणायचा. घालायचा तोडात पान नाही असा दिवस नसायचा, त्याची नजर तरण्या पोरींना पार भेदून जायची. त्यानं मागुड्यातल्या चार पोरीना मातग्याच बनविलं होतं. त्यांच्या जीवावर याचा रूबाब. पोटासाठी लाचार झालेल्या मांगुड्यातल्या दोन चार लग्न झाल्या बायानाही त्यानं धद्याला बसवलं होत. त्याच्या खिशात कायम पैसे खुळखुळायचे ! गावातली चोरटी गिऱ्हाईकं त्याच्या भाड्याला बाधलेली गुलहौशी मडळीच्या वासना भागवायला भोम्यान जणू मांगाच्या पोरीची दावण बाधलेली. वयात आली पोर भोम्या केव्हा कुणाच्या अगाखाली अज्ज्यात दडपील याचा पत्ता नसायचा. माणस गावातली कर्ती, अधिकारी, प्रतिष्ठित, पैसेवाली असायची. बिचाऱ्या मागवाड्यातल्या बापय माणसाची हाक ना बोंब! जरा गुरकणाऱ्या दोन गड्याना भोम्यानं चागलाच हिसका दाखवला होता. त्यानी आपण होऊन घरातल्या बाया कामाला पाठवल्या होत्या. मागवाड्यात भोम्या मागाची असली झोटींगशाही !

आखाडीच्या जत्रेच्या निमित्तान भोम्याच्या धद्यालाही बरकत आलेली. गिऱ्हाइक पाह्यचं, हेरायच, पकडायच अन् गाठून द्यायच. गिऱ्हाइकाला अधाऱ्या आडोशाला नेऊन धद्याला जोर चढलेला. भोम्याच्या ह्या धटिंगणपणानं, भाडेगिरीनं न्हात्याधुत्या पोरीच्या आया भेदरलेल्या ! अशा जत्रेची गर्दी भोम्याच्या धद्याला नामी सधी. नव्या पोरीना धंद्याला लावायची ! त्याची ख्यातीच तशी होती. त्याच्या या करणीन साऱ्या मागुड्याला बट्टा लागला होता. सगळ्या गावाची वासना-गिधाड मागवाड्यातल्या मागिणीवर टपलेली असायची ! भोम्यान एक दोन पोरी तमाशाच्या फडासाठीही विकल्या होत्या. कुणाच्या मनात कोणती पोरगी ठसेल, भरेल याचा नेम नसायचा. ती सुपारी भोम्या मोठ्या रूबाबात घ्यायचा आणि हरहिकमतीनं काम फत्ते करून द्यायचा. भोम्याचं लक्ष परिगाच्या विठीकड गेलं होतं !

आखाडीच्या गर्दीत विठी न्हित नव्हती. विठी परिगाची सोळा-सत्तरा वर्षांची पोर. चागली भरलेली. घोटीव. कभिन्न पण नितळ आणि तुकतुकीत. गोलवट चेहऱ्याची विठी डाळिंबी हसायची ! भोम्या एकदा परिगाच्या देखत विठीला म्हणाला, 'विठे, तू त जशी शिनेमातली जयश्री गडकरच दिसती र !' परिगाच काळीज कापल होत. विठी भेदरली तरी मनोमन खुलली होती. तरी भोम्यावर चागली फिसकारली होती. विठीला शिक्षणाची भारी आवड. तिच शिक्षण चागल तिसरीपर्यंत झालं. पण मग परिगानच तिला घरी ठेवल.

विठी परिगाच्या हाताखाली कामाला लागली. शेण विकून भाकरी मागण, खाटकाकडून बोकडाच्या आतडयाच्या माळा आणून आई-बरोबर नदीवर जाऊन दगडावर घासघासून स्वच्छ करण, सडू-घातल्या आबाडीच्या मुठी आईजवळ देण, आपटधोपट करण,दोराला पीळ घालायला उभ राहण, आईवरोबर ग्रहण, आवस मागायला गावभर फिरणं, मौतघरी जाऊन कपडे मागणं, आईबरोबर मोल-मजुरीला, भाडी धुण्याला जाण, एक ना अनेक कामं ती करू लागली. तरी मधूनच तिला वाचायची लहर यायची. गुडीशेव, बुदी लाडू, भेळ बाधून बापान आणलेला कागद घेऊन ती वाचायचा प्रयत्न करायची. कधी तिला पुन्हा शाळेत जावसं वाटायच मागुडया-तल्या शाळकरी पोराची पुस्तक ती वाचण्याचा प्रयत्न करायची. शाळकरी पोराना शाळेला नीटनेटक जाव म्हणून सागायची. येव्हढच नव्हे तर भिक्षेला कुठं शेणगीण द्यायला गेली तर मागुडधातल्या पोरासाठी धडोतीचे कपडे मागून आणायची, परिगाला ही नसती उठाठेव वाटायची. विठी तेरा-चवदा वर्षांची झाल्यापासून परिगाची तिच्यावर डोळघात तेल घालून नजर होती. परिगान विठी वयात आल्यावर काय काय सागितल होत. *तारुण्याच्या खुणा उठावान टच* दिसायला लागल्यावर मागुडधातल्या चहाटळ पोरी तिची भलतीच मस्करी करायच्या. विठीला स्वत विषयीच कुतूहल वाटायच, तेवढाच मुलीचा राग यायचा. नवाट हरिणीसारखी ती कावरी झाली होती. ‘ अव पोरीच लगीन वाजून टाकाया पाजीन ’ परिगा एकदा जेवता जेवता सुराजीला म्हणाली आणि विठीला उगा अपराध्या-सारखं वाटल. अलीकडे नदीवर धुणपाणी करताकरता आयाबायाच्या बडबडीतून तिला झोपायचा धंदा, बसायचा धदा, ठेवेल राड, आबूस-वाडीमधली दाणाकुटी सगळे शब्द माहीत झाले होते. भीती वाढत होती भोम्याची नजर आपल्याला मिळायला आल्यासारख वाटायच तिला ! सुराजीच कुटुंब तस लहान. एक विठी झाल्यावर ब-याच दिवसानी मणाजी झाला. त्याच्या पाठीवर गुणाजी झाला. विठीच्या मानानं शेबडी पोरं ती. कोबडीच्या पिलासारखी परिगाच्या माग हिंडायची. विठीच्या बरोबरीची एक मावस वहीण शेवती कधी कधी तिच्या बरोबर असायची. सुराजी हमाली करायचा, दोर वळायचा, डफड वाजवायचा. परिगा सुराजीला मदत करायची.

मागुडयाची रीतच न्यारी ! *मागुडा जागा झाला की जथ्यान* निघायचा अन् बाळू शेठच्या हॉटेलपुढं येऊन बसायचा. तिथ तोड तोड धुण, चहा पिण, कुणाच मिसळ खाण, कुणाचं पावरशी खाण चालायच अन् मग माग हलायची. समोरच्या मोटार अड्डयावर कोणी हमाली शोधायला जायचं. कोणी मजुरी पहायला जायच. लहान पोरी-पोर शेण गोळा करायला, भीक मागायला नाही तर कुणी शाळेला जायच. बाया घायपाताला निघायच्या, फाटयाला निघायच्या. भोम्यानं धद्याला लावलेल्या पोरी मात्र एस्. टी स्टँड आणि बाळूशेठच्या हॉटेलच्या आसपास उडरायच्या. साऱ्या मागुड्या-बरोबर, सुराजी परिगा आणि त्याचबरोबर विठी असायची. टवाळ पोराची नजर कधी या भेदरल्या पाखराकडं जायची. विठीची छाती धपापायची !

त्या दिवशी तिच्या कानावर बाळू शेठचा तो सवाद आला—

‘ भाम्या, ती लाल लुगडयातली पोर कुणाची रे?’

‘ जी, माझ्या चुलत्याची ना ती ?’ भोम्या मिस्कील हसत बोलला.

‘ कोण ! ’

‘ सुग्राजी. ’

‘ सुग्रा डफडयाची ?’

‘ फर्मान बाळूशेठ !

‘ पोरगी दाणा आहे ! माझ्याकड ठिवतो का ? कामाला ! ’

‘ अव शेठ, तुमच्या मुखातून निघालं आन मी नाही म्हनल असं झालंय ? जोडधान मारा जी ! पर सुग्रा लय माजुरा. तुम्ही त्याचं कान बडवा. नीट येईल. ’ परिगाही हे ऐकत होती. तिच्या काळजात धस्स झाल. विठी भेदरली. माजल्या बोकडानं नवाट शेळीला ढुशी दिल्यावर भेदरून सुसाट उडत पळाव तस तिच्या मनाच झाल. मग परिगान चार–सहा दिवस हॉटेलावर यायचंच टाकल. पण पुन्हा हॉटेलावर येण सुरूच ! सुराजीन विठीला बरोबर हमालीला न्यायला सुरुवात केली तर एक दिवस माळघाचा किसन्या ड्रायव्हर पार्सल-खोलीत तिच्या एकदम अगचटी यायला लागला ! विठीला एकेक अनुभव येत होता तारुण्याची नवलाई तिचा काळ बनून तिच्या *पाठीस लागली* होती.

ऐन आखाडीच्या दिवसात भिव्याचा पळून गेलेला विठल्या सुटा-बुटात मागुडघात आला तेव्हा सगळा मागुडा चकित होऊन पाहत राहिला होता. विठल्याचा काळा कभिन्न देह आणि फुगेबाज भाग पाढऱ्या स्वच्छ पँटशर्टमध्ये मोठा खुलून दिसत होता. तिशी गाठायला आलेला विठल्या तब्बल दहा–बारा वर्षांनी परतला होता. सगळया मागुडघाचा त्याच्या भोवती गराडा पडला होता. जसा गावात हत्ती


चारित्र्याच्या निर्माणाविण
समाजजीवन व्यर्थ असे
कर्तव्याची जाणीव नसता
प्रगतीलाही " अर्थ " नसे...

**जनतेची बँक**

## जनता सहकारी बँक लि. पुणे

मुख्य कचेरी : १४४४ शुक्रवार पेठ,
थोरले बाजीराव रस्ता, पुणे – ४११ ००२

**दूरध्वनी : ४४ ३२ ५८**

- १०० कोटीचेवर ठेवी
- ६५ कोटीच्यावर कर्जे
- " नॉन रेसिडेंट " खात्याची विशेष सुविधा.
- विविध आकर्षक ठेव योजना

आजच नजिकच्या शाखेस भेट द्या.

**ह. ना. कुंदेन** — कार्यकारी संचालक
**वि. न. साठे** — कार्याध्यक्ष

आला ! सुराजीनं घरात त्याचा विषय काढला तेव्हा ऐन सतरातल्या विठीला कळल, विठल्या मोठ्या दवाखान्यात कामाला आहे. मुंबईला ! त्याला राहायला चांगलं घर आहे. तिच्या मनाचा मोर जरा फरारला. पण विठल्या आपल्याला कसा मिळेल ? त्याच्या भोवती बुभुक्षितांचं कड पडल होत. सगळ्या मांगुड्याला त्यान मुंबईहून काय काय आणलेलं देऊन खूष केलं होत. मांगुड्यातल्या तिच्या बरोबरीच्या पोरींनी तर त्याला हैराण करून सोडल होतं, भोम्या त्याच्या ठाऊक्यावर होताच.

तीन-चार दिवसानी दुपारी अकराच्या सुमाराला विठल्या स्वत च 'अव सुराजी, अव सुराजीऽ' अशा हाका देत थेट घरात शिरला ते दोन्ही खोल्या ओलाडून एकदम मागीलदारी आला घरात कोणी नव्हतं, घर सताड उघड होत तो मागील दारी आला अन् 'अरं तिच्यायला !' म्हणून एकदम बाहेर पळाला. विठी घराच्या आडुशाला मागीलदारी आघोळ करीत होती. विठ्ठलला पाहून ती एकदम कावरीबावरी झाली. दोन्ही हातानी जवानीचा उरावरला ऐवज झाकून ती एकदम उभी राहिली. त्या गडबडीत अंगावरची सोडली ओलीगच्च चिरगुट तशीच खालच्या दगडाला खिळून राहिली. दोघाच्या नजरा भिडल्या आणि विठल्या पळालाच. 'अरं तिच्यायला, हे त्याचे लाजरे, सकोचले, आश्चर्यभरले शब्द विठीच्या कानात आणि मनात भरून गेले. ती लाजली. ओठात हसू फुटल. विठ्ठल बाहेर पळाला तो ओलेत्या, भरल्या विठीला नजरेत साठवूनच. गेल्या चार-पाच दिवसात आपल्याला विठी कशी दिसली नाही, असा विचार त्याच्या मनात रेंगाळत होता. तो बाहेर काही वेळ थांबला आणि तेवढ्यात विठीचे बोल त्याच्या कानी आले. तो वळला. दोघाच्याही भिडल्या नजरा खाली झुकल्या. 'अव, बा मोटारअड्ड्यावर गेलाय जी !' तिकडच गावल.

मग तो जरा धिटाईन बोलला.

'विठे'

'जी !'

'लईच मोठी मोठी झालीस रे ! गेलतो तवा उलीउली व्हतीस. फाटका फराक घालून नाकाचा शेंबूड पालथ्या हातानं पुसून ढुंगाला पुशीत शाळला जायची ! कितीक शिकली रं !'

'उगा काय तरी !' ती हसत मन घालून त्याच्याकडे पाहात बोलली. अन् तेव्हापासून दोघाच जमल !

ऐन आखाडीच्या जत्रेच्या गडबडीत सोंगाच्या गर्दीत थेट नाशिकपर्यंत जाणाऱ्या दुधाच्या गाडीनं दोघं मुंबईला पळाली.

गाडीच्या केबिनमध्ये बसतानच भोम्याचा आवाज कानावर आला होता—

'अव विठल्या, भाडखाऊ तुहायला विठीला पळून नेतोस××× ! मुंबईच्या फोरास रोडला बाजार बसवी करायला ! ××× ! तुझ्या भनला घिऊन जा गधडीच्या. इथं पालती पडती !' पण ट्रक सुरू होऊन गेलासुद्धा !

× × ×

पुढ दोन वर्षांनी भिव्या मुंबईला आला तेव्हा त्या आखाडीच्या रात्री भोम्यानं केलेला तमाशा विठीच्या कानी आला. विठ्ठल आणि विठी पोट धरून हसली.

× × ×

आता या गोष्टीला पचवीस वर्षं उलटली असतील कदाचित. रेणुकेला पुन्हा हा प्रसग विठाबाई रंगवून सांगत होती. स्वरात काळजी होती. रेणुकेला हसू येत होतं

काळ कुठल्या कुठे निघून गेला होता पण मार्ग होती तिथ आणि होती तशी राहिली होती म्हणूनच तर जी अपवादान पुढं गेली होती त्यांनी काही करायचं ठरवल होत म्हणूनच रेणुकान निर्धारानं सगमपूरला नोकरीनिमित्त जायच ठरवलं होत. विठीनं थरारत्या अत करणान होकार भरला होता.

## : २ :

स्वामी विवेकानद महाविद्यालयाच्या भव्य गेटातून गतीनंच आत येऊन रिक्षेनं रेणुकेला थेट प्राचार्यांच्या कार्यालयासमोर आणून सोडल; तेव्हा दुपारचे साडेबारा वाजले होते. मळभानं आच्छादिलेल्या आभाळानं सूर्य झाकोळला होता. सकाळी पावसाची सर येऊन गेली होती तरी हवा अजून गुदमरून टाकणारी होती. तब्बल सहा तासांचा प्रवास सपवून रेणुका संगमपूरला पोचली होती. मनात विचारांची गर्दी होती. मुंबई आणि आईवडिलाचा सहवास, छत्र सोडून ती स्वतंत्रपणान सगमपुरात राहणार होती. नावाजलेल मोठं कॉलेज तिला मिळालं होत आणि ती तशी अगदी फ्रेश एम. ए. सुटली होती. सगमपूर स्वीकारताना तिच्या डोळ्यासमोर एक ध्येयही होत. या सर्व प्रकारच्या विचारांनी तिच्या मनाला गुदमरून टाकलं होतं. ती बॅग उचलून ऑफिसच्या दिशेनं निघाली.

'मॅडम आपण मिस रेणुका जाधव ?' खाकी पोशाखातल्या एका गोऱ्या, घाऱ्या, देखण्या, तरुण, प्यून म्हणून न शोभणाऱ्या प्यूनने विचारले आणि सुटकेस घ्यायला हात पुढे केला.

'अं, हो !' त्याच्या हाती सुटकेस देत, निरखून पहात म्हटलं.

'साहेबांनी आपल्याला त्यांच्या केबिनमध्ये बसायला सांगितलय. येतीलच. राऊंडला गेलेत. वॉश घ्यायचाय ?' त्यानं मोठ्या अदबीनं विचारलं. रेणुकाला त्याच्याविषयी आपुलकी वाटली.

'तुझं नाव ?'

'मेघश्याम पराजपे; पण सगळे बाबूच म्हणतात मला.' तो उगा ओशाळलेपणाने म्हणाला. आपण उगाच त्याचं नाव विचारलं असं रेणुकेला वाटलं. ती त्याच्या मागोमाग प्राचार्यांच्या केबिनमध्ये गेली. प्राचार्यांचं केबिन म्हणजे कोणीही प्रभावित व्हावं, दबून जावं असा प्रशस्त हॉलच होता. मत्रालयात एखाद्या कॅबिनेट मिनिस्टरचा असावा तसा. रेणुका एका खुर्चीत अगदी अदबीन बसली. सुटकेस कुठे ठेवली ते पाहिल आणि ती प्राचार्यांच्या हॉलचे निरीक्षण करू लागली.

'मॅडम, आपण इकडेच जाऊन वॉश घेतलात तरी चालेल !' त्यानी हॉलशी सलग्न असलेला प्रसाधनकक्ष दाखवून म्हटलं आणि तो बाहेर पडला. रेणुका आत जाऊन वॉश घेऊन बाहेर येते तो बाबू चहा घेऊन हजर होता.

'अरे, चहासुद्धा आणलास ?' तिला सानदाश्चर्य वाटलं.

'मॅडम, काल आपली वायर मिळाली तेव्हाच साहेबानी मला

बोलावून आपल्याला मदत करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली, त्यान खुलासा केला.

रेणुका एका बाजूला मांडलेल्या सोफासेटच्या चेअरमध्ये बसली. चहाचा मग तिनं समोरच्या टी पॉयवर ठेवला आणि ती हॉलचं निरीक्षण करू लागली. हॉलमध्ये महात्मा गांधी, आंबेडकर, फुले, लोकमान्य टिळक, सावरकर, नेहरू असे मोजकेच फोटो विशेष अंतरावर लावलेले. कॉलेजला मिळालेली, निरनिराळ्या क्षेत्रातली मानचिन्हे सुबकतेन शोकेसमध्ये मांडली होती. शोकेसवर स्वामी विवेकानंदाची आकर्षक मूर्ती भव्योदात्तपणे विराजित झाली होती. टेबल, खुर्च्या, सोफासेट याची मांडणीही एका विशिष्ट शिस्तबद्धतेनं केलेली होती. प्राचार्यांच्या खुर्चीमागच्या भिंतीवर अगदी वर छोटया शोकेसमध्ये वीणावादिनी विराजित होती. त्याखाली केशरी रंगात अत्यंत रेखीव सुबक अशी बोधवाक्याची अक्षरे लिहिली होती– ' उत्तिष्ठत । जाग्रत । प्राप्यवरान्निबोधत ।' आणि त्याखाली वर्तुळाकृती घड्याळ काळाचं भान राखीत होतं. एव्हढं मोठं कॉलेज पण बाहेरचा एवढाही आवाज केबिनमध्ये येत नव्हता. एक प्रकारची जरब निर्माण होत होती. कॉलेजचा परिसर जवळपास आठनऊ हेक्टरचा असावा. गेटातून आत आल की लगेच जवळच प्राचार्यांच आणि कॉलेजच ऑफिस, ऑडिटोरियम आणि लायब्ररीची भव्य इमारत होती. भोवतीच्या हिरव्या वृक्षराजीनं सुशोभित झाली होती आणि मग त्या इमारतीच्या टप्प्यात कॉलेजच्या अन्य सर्व इमारती, परिसर व्हरांड्यातून दृष्टिक्षेपात यायचा.

एवढ्या मोठ्या कॉलेजमध्ये आपल्याला अगदी सहज नोकरी मिळाली म्हणून क्षणभर रेणुका स्वत वरच खूष झाली. त्यात अगदी आल्याबरोबर बाबूकडून मिळालेल्या सन्मान्य वागणुकीनं आणि प्राचार्यांच्या जरब निर्माण करणाऱ्या केबिनच्या शांत आणि प्रभावी वातावरणाने तिला आणखीनच प्रभावित केलं होतं.

' खरच, एवढ्या कॅंडिडेटस्मधून आपलीच निवड कशी झाली ?' क्षणभर पुन्हा तिच्या मनात प्रश्न उमटला. पण त्याच क्षणी तिला त्या प्रश्नाचे उत्तर मिळाले–

' कॉलेजचा ' बी. सी. कोटा ' पूर्ण करण्यासाठी !' आणि ती एकदम विचारमग्न झाली. तिच्या मनात विचाराचं वादळ उठलं ! तेवढ्यात टेलिफोनची रिंग वाली म्हणून बाबू आत आला.

' आपण चहा नाही घेतलात अजून ?' त्यान फोन उचलता उचलता विचारल.

' अ, हो हो. घेते न !' ती गडबडून म्हणाली.

' हॅलो ! मी बाबू बोलतोय, कोण ?'

' ............ ?'

' हो हो आल्या आहेत. आत्ताच आल्यात.'

' ............ ?'

' प्राचार्यसाहेब येतील एवढ्यात.'

' ............ '

' सांगतो. सांगतो साहेब !'

' कुणाचा फोन ?' फोन आपल्याच संदर्भात आहे हे ओळखून रेणुकेन साशंकतेनं विचारलं.

' बापूराव आवचितेसाहेबाचा !'

' माझ्याविषयी काही...?'

' आपण येऊन हजर झालात का; विचारीत होते.'

' कोण हे आवचितेसाहेब ? आमच्या समाजाचे पुढारी ?'

' होय मॅडम, जिल्हापरिषद सदस्य आहेत. आपल्या कॉलेज कमिटीवर आहेत. मागे राखीव मतदारसंघ असताना विरोधी पार्टीनं त्याना आमदारकीला उभ केल होत. आता आहेत जिल्हापरिषदेत. आमदार होते तेव्हा खूप धुऊन घेतल' बाबूनं एकदमच सगळं मोकळेपणान सांगितलं.

' असं ?' रेणुकानही मोठ्या गंभीरपणान ऐकलं. तेवढ्यात केबीनचं दार उघडल आणि रेणुका एकदम ताडकन उठून उभी राहिली. तिच्या हातात अजून चहाचा मग तसाच होता. प्राचार्य डॉ. दुर्वास फडके आत आले आणि पाठोपाठ आणखीही एक तरुण गृहस्थ आत आला.

' हॅलो मिस रेणुका जाधव ! अरे, तुम्ही चहा घेतला नाही अजून ?' मग सकट उभ्या राहिलेल्या रेणुकाकडे गमतीन पाहत प्राचार्य म्हणाले. लालबुंद गोऱ्यापान, घाऱ्या डोळ्यांच्या, सहाफूट उंचीच्या, पन्नाशी गाठलेल्या रुबाबदार प्राचार्यांचा हा मोकळेपणा रेणुकेला आवडला.

' थॅंक यू सर !' ती एका विद्यार्थिनीसारखी म्हणाली.

' बसा बसा, चहा घ्या !' त्यांनी पुन्हा चहाची आठवण करून दिल्यावर मात्र तिन एकाच घोटात पटकन चहा संपवला. तिच्या या गडबडलेल्या अवस्थेकडे प्राचार्यांबरोबर आलेला उंच, काळासावळा स्मार्ट तरुण निरखून पाहत होता. रेणुका संकोचली. तिनं हळूच दोघांच्याही नजरा चुकवीत पदर सारखा केला.

' अरे हो तुमची ओळख करून देतो.' रेणुका गडबडलेली पाहून प्राचार्य म्हणाले.

' मीट धिस यंग अँड एनर्जेटिक फेलो प्रो. जमदग्नी पंडित ! लेक्चरर इन पॉलिटिक्स ! ए चार्मिंग पर्सन्यालिटी.'

' नमस्कार !' प्रो. जमदग्नी झालेल्या स्तुतीन संकोचून म्हणाले.

' मिस्टर जमदग्नी, धिस इज आवर न्यू चॉइस फॉर सोशिओलॉजी डिपार्टमेंट, मिस रेणुका जाधव !'

' नमस्कार !' रेणुका जरा लाजतच म्हणाली. अजूनही प्रा. जमदग्नी तिच्याकडे निरखून पाहत होते.

' मिस रेणुका, आम्ही तुमचं कॉलेजच्या वतीन स्वागत करतो. हे बघा, आपल्या लेडिज होस्टेलला आपली राहण्याची सोय केलेली आहे. आपण होस्टेल रेक्टर अनुताई लिमयाना भेटा. इफ यू डोन्ट माइंड आम्ही आपल्यावरही होस्टेलची काही जबाबदारी टाकण्याचा विचार करतो आहोत.'

' बाय ऑल मिन्स सर, मला त्यात आनंदच वाटेल; पण......' रेणुका जरा घुटमळतच म्हणाली.

' इफ इट इज समथिंग ट्रबलसम ?'

' मी माझ्या आईवडिलांना इथे घेऊन येणार म्हणत्येय, गावातच जागा घेऊन राहण्याचा विचार आहे माझा. इफ यू अलौ ?'

' हो हो चालेल ना. अस बघा तुम्हाला जागा मिळेस्तोवर तुम्ही होस्टेलवर रहा !'

' साहेब, बापूराव आवचिते साहेबाचा फोन आला होता.' इतका-

वेळ सागण्याची सधी पाहत उभा असलेला बाबू म्हणाला.

'अरे हो, हे बघा मिस रेणुका, बापूराव आवचिते गेल्या चार दिवसापासून चवकशी करताहेत. तुमची राहण्याची वगैरे सोय करतो म्हणाले. आपल्या कॉलेज कमेटीचे मेंबर आहेत. पहा, अॅट युवर कन्व्हीनियन्स !'

'सर...'

'थावा, माझ्या सूचना सपल्यात. तुमचे हेड ऑफ दी डिपार्टमेंट डॉ. भिसेंना भेटा आणि उद्यापासून जॉइन युवर ड्यूटीज. आता प्रथम होस्टेलला मेसमध्ये जेवण वगैरे करा. बापूराव अवचित्यांकडे जाऊन या. प्रा. जमदग्नी येतील तुमच्याबरोबर; आपल्याला हवं तर ! येस जमदग्नी ?'

'येस सर, आय वुईल बी ग्लॅड टू कपनी हर !' प्रा. जमदग्नी रेणुकाकडे पाहत मिश्किलपणे म्हणाले.

'येस, आय वुईल बी थँकफुल टू यू !'

रेणुकान जमदग्नीच्या सहाय्यान पुन्हा एकदा कॉलेजचा प्रिमायसेस पाहिला व डॉ. भिस्याकडे ती जाऊन आली. होस्टेलची खोली हवी तशी सोयिस्कर लावून घेतली. सगळ आटोपेपर्यंत सध्याकाळचे सहा वाजले.

चार–पाच तासांचा प्रा. जमदग्नीचा सहवास रेणुकेला अतिशय सुखद वाटला. त्यानी वेळोवेळी तिची आणि तिच्या बोलण्याची केलेली तारीफ. त्याच्या वागण्या–बोलण्यातला मैत्रीपूर्ण खटघाळ मोकळेपणा तिला विशेष प्रभावित करून गेला. प्रा. जमदग्नीही तिच्यावर अगदी प्रसन्न झाले. उंच सडपातळ, रेखीव बाध्याची, काळी पण तेजस्वी अशा रेणुकाने प्रा. जमदग्नीला तिच्यात गुतविले. तिच्या बोलण्यानं आणि वागण्यानं प्रा. जमदग्नीची तिच्याशी मैत्रीच जमली. प्रा. जमदग्नीना समाजकार्याची आवड होती. रेणुकाला हा त्याचा विशेष गुण वाटला. दिवसभर इतर सर्व काम झाल्यानतर रेणुकेला बाबुराव आवचितेकडे जायच होत.

'मिस, रेणुका आपण एकट्याच बापूराव अवचित्यांकडे जाऊन याव अस मला वाटतं !'

'का ?'

'मला वाटत त्यांनी मुद्दाम तुम्हाला घरी भेटायला बोलावलय बहुधा...'

'आम्ही एकाच जातीचे आहोत म्हणून ?'

'बहुधा तेच खर असेल. !'

'मग त्यात तुम्हाला यायला काय अडचण आहे ?'

'बोलताना संकोच वाटायला नको ! आणि त्याना तुम्हाला एकट्यानाच भेटायचं असेल तर–?'

'म्हणजे ? मी नाही समजले ?'

'मिस रेणुका तुम्ही फारच निरागस आहात. म्हणजे मी खर बोलू नये; पण मित्र म्हणून एवढंच सांगतो की, बापूराव आवचित्यांकडे जरा सावधगिरीने बोला आणि त्यानी आग्रह केला तरी त्यानी राहण्याची सोय केली असेल तर ती तरी टाळा.' प्रा. जमदग्नी गाभीर्याने आणि सावधगिरीने सागत होते.

'म्हणजे ...?' 'ओ ! आय सी ! थँक यू फॉर युवर काइंड सजेशन ! पण निदान त्याच्या घरापर्यंत मला सोडायला तुम्ही आलात तर हरकत नाही ना ?' रेणुकान त्याच्याकडे रोखून पाहत विचारल, अवघ्या पाच–सहा तासाच्या सहवासातच वर्षांची मैत्री असल्यासारख रेणुकेला आणि जमदग्नीला वाटत होत. नभात एकत्र आलेल्या दोन मेघासारख.

'हो हो, येतो न, सरानी ड्यूटीच दिलीये !' जमदग्नी छद्मीपणानं म्हणाला.

'मग काही नकोय यायला !' रेणुका फुरगटून म्हणाली.

'ओहोहो ! रागावलात ? अरे ! मी आपला गमतीनं म्हणालो. येतो तर ! आता मला यायलाच हवं !' तो रोखून पाहत म्हणाला. आणि रेणुकाला त्याच्या शरणागतीने लाजरं हसू आल. तिची नजर जमिनीला झुकली

बापूराव आवचित्याचा, सरकारी रेस्ट हाऊससारखा कौलारू बंगला जरा गावाबाहेर आहेस वाटल. त्याच्या मागच त्याची दोन-तीन एकर बागायती जमीन आहे. गावातून त्याच्या बगल्याकडे जाताना सगपूरचा मागवाडा ओलाडून जाव लागतं. रेणुकेला बगल्याशी सोडून जमदग्नी परतला. रेणुकानं एकवार सभोवार नजर टाकली आणि मग तिनं फाटक उघडल आणि ती कपाउंडमधे आली. तो एकदम दोन कुत्री कालवा करीत अंगावर आली. रेणुका घाबरी झाली. ती आल्यापावली परत फिरली. तोच कुत्र्याचा आवाज एकदम गप्प झाला. पोलिसाना वरिष्ठाचा फोन यावा तसा. बापूराव आले होते. त्यानी हिरा–मोतीना गप्प केलं होत. ते दोघे शेपटं हलवीत बापूरावाच्या पायाभोवती 'ऊ ऊं !' करीत आपली इमानदारी पेश करीत होते.

'ये ये रेणुका ! घाबरू नकोस. पाळलेली कुत्री कुठं धन्याच्या माणसाला चावतात ? ये येड्यांनो अरं ती आपली पोर आहे !' बापूराव रेणुकाला आपल्या भेदक नजरेत साठवून घेत म्हणाले. हिरा-मोती रेणुकेजवळ जाऊन जिभल्या चाटू लागले. झालेल्या असल्या स्वागतान रेणुका चागलीच गोधळली होती. 'ये ये घरात ! रेणुकाच्या काळजाचा बापूरावाच्या नजरेनं हिरोशिमा होत होता. 'ये ये !' बापूराव मधाळ घोगऱ्या आवाजात तिला पुन्हा पुन्हा म्हणत होते.

रेणुका पदर आणि पर्स सावरीत पुढे पुढे पाऊल टाकीत बापूरावाच्या मागे त्याच्या बगल्यात जात होती, जणू हरणी आपण होऊन लाडग्याच्या झापेत येत होती प्रथम तिला पळून जावसं वाटल; पण तिच्याच जातीतला हा माणूस तिला समजून घ्यायचा होता. ती धीरान, हिमतीन पुढे निघाली.

'कोण व आल ?' आतून टिकला कुकू लावलेली अन् चागलं उंच नऊवार उभार पातळ नेसलेली कभिन्न पण नितळ सतेज बाई डोक्यावरचा पदर सावरीत बाहेर आली डोळयात माया होती. वागण्यात मोकळेपणा होता. 'ही बापूरावाची बायको ?' रेणुकान मनाशीच प्रश्न केला. तिला पाहून रेणुकाच्या मनातलं भीतीचं माजल रान विरून गेलं.

'अव कोन काय ? च्या ठेव पह्यला ! ती सादी बाई नाही. कॉलेजात प्रोफेसर आहे ! त्याहायचं येडंमाप !' बापूराव रेणुकेकडे

रोखून पाहत मिशीवर ताव भरत आसरटपसरटपणान बायकोला सांगत होता. तरी सुद्धा रेणुका त्याच्या या बोलण्याला हासली.

'असं ? कुनाची पोर बया तू ?'

'जाधवाची, आकोलपाटच्या !'

'असं ? अव लई ना हुचार पोर बया !' म्हणत सखूबाईनं तिची आलाबाला घेतली. 'ये आत ये बया !' म्हणत सखू बापूरावाला मुरका मारून फणक्यानं निघाली. रेणुका तिच्यामागे आत जाऊ लागताच बापूराव आपल्या बायकोवर डाफरला.

'अव सखे तिला कुठं आत. ती का तुला मांगुड्यातली जनी वाटली काय रं ? लय ना शहाणी तुझ्या मारी !' बापूरावानं खास आतल्या भाषेत सुनावलं.

'मी जाते ना आत !' रेणुका भीत भीत म्हणाली.

'तिचं काही ऐकू नको. ये बस अशी ! त्ये आमचं येडं आहे जन्माला पावलंय !' बापूराव रेणुकेला आग्रह करीत म्हणाला. 'ये अशी बस निवांत !' रेणुका त्याची नजर टाळीत बैठकीत पलंगासमोर ओळीनं मांडलेल्या खुर्चीत बसली. 'हां अस्सं.'

'पाह्यलं कॉलेज ?' खाकरून रेणुकाचं लक्ष खेचून घेत बापूराव म्हणाले.

'अं, हो हो !' रेणुका अजून विचार-तंद्रीत होती.

'रेणुका, पाह्यलं आमचं येडं माणूस ! जाऊ दे तिच्याकडं लक्ष नको देऊ ! ते आमचं असंच चाललंय जन्मभर ! जाऊ दे !' बापूराव आपल्या बायकोविषयी खुलासा करीत म्हणाले.

'नाही तसं नाही !' ती उगा बोलली.

'तू दुपारी आली ना बारा-साडेबाराला ? अरे, मग लगुलग इकडेच यायचं. आम्ही नेलं असतं नंतर कॉलेजावर ! सांगून ठेवलं होतं कॉलेजमध्ये ! त्यांनी सांगितलं नाही ?'

'हो सांगितलं ना ! पण मीच म्हणाले जाऊ नंतर !'

'ह्ये बघ कशाची काळजी करायची नाही. ह्ये घर आपलं. घरच्यासारखं न्हायचं इथं !' तेव्हढ्यात फोनची रिंग आली.

'हॅलो, आ ? कोन ?'

'.........'

'हा हा मीच बापूराव बोलतोय !'

'.........'

'अरेच्या मारी ! आपण आहात होय. मी ओळखलंच नाही !'

'.........?'

'मी जरा गडबडीत आहे. जरा गेस्ट आलेत.' बापूरावानं रेणुकाकडे साभिप्राय पाहिलं. रेणुकाचा चेहरा गंभीर झाला होता.

'.........?'

'हा हा रात्री येतोच ! विसरायचा नाही !'

'.........?'

'गेस्ट ? परवा आपल्या कॉलेजात आमची पोरगी घेतली ना प्रोफेसर !'

'.........'

'नाही तसं नाही हः हः हः ! तसं नाही !'

'.........'

'बरंय !' फोन खाली ठेवून बापूराव थेट रेणुकाच्या शेजारच्या खुर्चीत येऊन बसले. तशी रेणुका एकदम बावरली.

'आमचं हे असयं ! जरा दम खाऊ देत नाहीत. असूदे. बरं कसंकाय वाटलं कॉलेज ?'

'चांगलंय !'

'कॉलेज मस चांगलंय पण सगळं जातीचं राजकारण ! सगळं बामणांच्या ताब्यात. बी. सी. नको म्हणतात. आम्ही आग्रह धरला· म्हटलं मोर्चे काढू ! तेव्हा घेतो म्हणाले. आता नारायणरावच्या हातात कारखाना आहे आमदारकी आहे म्हणून त्याच्या पुढंपुढं करतात हे संघवाले. आपले एखाद-दोन लोक त्याचे घेतले म्हणजे जमलं. पण घाबरायचं नाही हां. बिनधास्त काम करायचं. मी आहेच की. आता तुझा इंटरव्ह्यू झाला, तुला पाह्यली आन् म्हटलं घिऊनच टाकायची !' बापुराव फुशारकीनं सांगून रेणुकेला खूष करीत होते.

'पण आणखी बी. सी. होतेच ना आलेले ?'

'पण तू कशी स्मार्ट ! तसं कोणी नव्हतं !' बापूराव खुशीत येऊन तिच्या खांद्यावर थोपटीत म्हणाले. ती सावरली तसे थोड वरमले. तेव्हढ्यात चहा आला. बापूरावानं स्वतः उठून चहा घेतला आणि तिच्या हातात दिला 'घे चहा घे !' पाघळून ते म्हणाले. रेणुकाने पटकन चहा संपविला. तिच्या हालचालींवर बापूरावाचं लक्ष होतं. चहा होताच त्यांनी तिला आग्रहानं आपला बंगला फिरवून दाखवला. मागच्या बाजूला स्वतंत्र दोन खोल्या दाखवून, 'ह्या आम्ही तुझ्यासाठी तयार करून ठेवल्यात !' बापूराव मिशीवर ताव देत तिच्या नजरेत पाहत म्हणाले.

'पण मी लेडीज होस्टेलवर न्हायचं ठरवलंय !'



'वा वा ! असं कसं ? मग आमचा काय उपयोग ? लोक आमच्या थोबाडावर जोडे हाणतील ! ते काही नाही. तू इथं आमच्याकडं ऱ्हायचं ! नाही म्हणायच नाही !' बापूराव रेणुकाच्या पाठीवर थोपटीत म्हणाले. रेणुका आता मनोमन संतापली होती. तरी जरा तोल साभाळीत ती म्हणाली.

'मी लेडीज होस्टेलवरच राहणार आहे. मला होस्टेलच काही कामही दिलय् !' रेणुका रोखूनच म्हणाली.

'मग माझं ऐकायचं नाही ? बरंय बुवा, तुझी मर्जी. पण काही लागलं-सवरलं, अडचण आली तर सरळ यायच. घर तुझं आहे !' जरा वरमून तरी नेटानं बापूराव बोलले.

'बरंय येऊ मी आता ? भेटू परत !' रेणुका निरोप घेतच म्हणाली.

'हे बघ, तो प्रिन्सिपॉल महा बिलदर माणूस आहे ह. ध्यानात ठेव. सावध राहायच ! तो काय करतो आम्ही मागं असल्यावर ? पण या भटुड्यांना आन पाटलाना आम्ही माग म्हणजे वापराच्या वस्तूच वाटतो ! तू आपल्या संघटनेचं काम करती म्हणतीस ना ? हे बरं झालं. आम्हाला बायकाचं काम तुझ्यावर सोपवता येईल. राज्य परिषद बोलवतोय आपण !' बापूराव उगा नेटानं पसरट अन् फाजील बोलत होता. आता रेणुकाला स्वतःला साभाळणं कठीण होत.

'बरंय, बोलू आपण नतर ! निघते मी !' आणि ती निघालीच. जाता जाता आत जाऊन ती सखूबाईला सागून आली तेवढ्यात बापूराव पुन्हा आडवे झाले.

'सोडू का कॉलेजवर गाडीवर ?' मनात चरफडत पण अगदी लघळपणाने बापूराव म्हणाले.

'नको जाईन मी रिक्षेनं ! आभारी !' हात जोडून ती मागे न पाहताच फाटकाच्या बाहेरही गेली.

## : ३ :

रेणुकाला संगमपूरला येऊन आता महिना होऊन गेला होता. विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यात अवघ्या महिनाभरात तिन लोकप्रियता मिळविली होती. ती आली. तिनं पाहिल आणि जिंकल प्रा. जमदग्नी आणि प्रा. रेणुका याची जणू पूर्वीचीच मैत्री असावी असे सर्वांना वाटत होते. प्रा. जमदग्नी दोन वर्षे धुळे भागात राष्ट्रीय स्वयसेवक संघाचा प्रचारक म्हणून काम करून आले होते आणि आता त्यानी विश्व हिंदू परिषदेची जिल्हा संघटन मत्री म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. एका पठडीत कार्यकर्ता म्हणून काम केलेल्या प्रा. जमदग्नीमध्ये कमालीचा मोकळेपणा आणि समजूतदारपणा होता. गेल्या वर्षभराच्या कामात त्यानं जिल्ह्यात जवळजवळ तेवीस गावी परिषदेच्या शाखा उघडल्या होत्या. विशेषतः दलित समाजात जाऊन विश्व हिंदू परिषदेचं काम उभारण्यात त्याना कमालीच यश आलं होतं. त्याच्या या कामाचं रेणुकेला खूपच कौतुक वाटायच. विद्रोही चळवळीचा रेणुकानं सूक्ष्म अभ्यास केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारांचा आधार घेऊन उभ्या राहिलेल्या दलित चळवळीत तिन कॉलिजमध्ये असताना भागही घेतला होता. पण या चळवळीचा पुनर्विचार करायला हवा असे तिला वाटत होते. आदितराव गायकवाडाशी चर्चा करताना ती नेहमी आपले विचार बोलून दाखवी. विद्रोहातून विघटन साधायच की प्रबोधनात्मक ऐक्य साधावयाच असा तिचा दलित चळवळीना सवाल होता तिच्या अनेक लेखामधून तिन या दृष्टिकोणातून विचार मांडले होते. 'भारतीय सस्कृतीतील जातीयतेचा इतिहास' यावर ती अभ्यास करीत होती. सास्कृतिक इतिहासात तिला विघटनाला विरोध करणाऱ्या विचाराचीच बीजं मिळत होती. तिच्या विचाराच्या तारा प्रा. जमदग्नीशी जुळल्या होत्या त्यामुळेच प्रा. जमदग्नीविषयी आदरयुक्त जवळीक निर्माण झाली होती. प्रा. जमदग्नीनी तिची फकीरबाबाशी ओळख करून दिली होती फकीरबाबाविषयी सगळ्या सगमपुरात आदराची भावना होती. फकीरबाबा निकाळजे, माग. मागवाड्यामध्ये तो राहत नसे. मुसलमान वस्तीच्या जवळ अलीकडे त्याला जागा बक्षीसपत्र करून मिळाली होती. त्यावर त्यानं मातीच्या भेंड्याचं घर बाधलं होत. पत्रा टाकून आसरा केला होता. बायको, तीन मुलं असा त्याचा ससार, त्या घरात, तुळशीच्या बागेत गावान दिल्या भिक्षेवर चालायचा. रोज सकाळी स्नान आटोपल की फकीरबाबा निघायचा. डोक्याला लाब उपरण्याचा भगवा उभार फेटा. गळ्यात तुळशीची माळ. कपाळ, कान आणि गळा यावर गोपीचंदनाच्या मुद्रा. नेहरू शर्ट. तोही भगवा आणि खाली लुंगीसारख भगव वस्त्र, खांद्याला झोळी. छातीशी कवटाळलेली एकतारी आणि उजव्या हातात चिपळ्या. तुकडोजीची भजनं म्हणत स्वारी निघायची. मांगवाड्यावर यायची. महामरी मातगीच दर्शन घ्यायचं. लोकाची विचारपूस करायची. पहिली पिठाची भिक्षा तिथ घ्यायची आणि मग दुपारी बारा वाजेपर्यंत सगळ्या गावात त्याची फेरी व्हायची. वाड्यावर, घरासमोर गल्लीत उभं राहून त्याची गाणी आणि भजनं चालायची.

कोण दिवस येईल कसा;
कोण जाणतो रे ?

एका दिशी हाती वरी...... लोक गाण ऐकायचे. आदरानं भिक्षा वाढायचे. त्याची विचारपूस करायचे. त्याच्या मुलांची विचारपूस करायचे. लोकाना कबीराच ध्यान दृष्टी पडल्यासारख वाटायच. फकीरबाबा हिंदूवस्तीत हिंडायचा तसाच मुसलमान वस्तीत हिंडायचा. त्याच्या दृष्टीन मुसलमान ही हिंदूचीच एक जात तो तसं बोलायचाच मुळी. 'जस ब्राह्मण, मराठा, माग तसा मुसलमान. कोणी कोणत्याही देवाला भजावं. मागाची मातगी तसा मुसलमानाचा पीर. अल्ला !' त्याची पोर मोठी झाली. कामधद्याला निघून गेली. एक पोलिस झाला. एक मास्तर झाला. एक ड्रायव्हर झाला. पण फकीरबाबानं गावफेरी सोडली नाही इदिरा घरकुल योजना आली. फकीरबाबा आमदार नारायणरावाला भेटला आणि मांगवाडा सोडून जाण्यापेक्षा त्याच मागवाड्याचा कायापालट करायला लावला. या घटनेन कोणे एकेकाळी बापूराव आवचित्यामागं असलेली माग फकीरबाबाच्या आणि आमदार नारायणरावाच्या मागं असायची. बापूराव फकीरबाबाला पाण्यात पाहायचे. 'जोगड !' म्हणायचे पण करतो काय. साऱ्या मांगवाड्याला फकीरबाबावं, मागबाबान शिस्त लावली. सगमपूरच्या मागवाड्यातली सगळी माग मरस्तोवर कष्ट करायची.

तरणी पोरं हमाली करायची. चारसहा पोरं साखरकारखान्यावर नारायणरावानं लावलेली. काही मांग चऱ्हाटाचा धंदा करायची तर काही मांग केरसुण्या, पाट्या, टोपल्या करायची. दोघं कडकलक्ष्मीचे देव्हारे घेऊन गावोगाव फिरून राहणारी होती. सगळ्याची घरं आता सारखी झाली होती. घराबरोबर मरीमाता मातंगीचं देऊळ चांगलं प्रशस्त झालं होतं. पुढे पत्र्याचा भला सभामंडप पडला होता. प्राध्यापक जमदग्नींनी मातंगीच्या देवळाला फरशी बसवून घेतली. मातंगांचं भजनीमंडळ तिथं भजन करू लागलं. डफडी, पिपाण्या याबरोबर टाळ मृदुंग वाजू लागले. एक बँडपथक उभं झालं हा सारा बदल फकीरबाबाच्या आशीर्वादानं, आमदार नारायणराव तिटमेच्या सहाय्यानं. प्रा. जमदग्नींनी फकीरबाबाला संगमपूर विश्व हिंदू परिषद शाखेचं उपाध्यक्ष केलं होतं. रेणुका फकीरबाबाचं ध्यान आणि काम पाहून थक्क झाली होती. तिच्या मनात चाललेल्या विचारमंथनाला समर्पक, अनुरूप उत्तर संगमपुरात मांगबाबानं दिलं होतं.

गल्या पाच-सहा दिवसापासून रेणुकानं अकोलपाटचा मांगवाडा पाहून यायचा हट्टच धरला होता. प्रा जमदग्नींनी बरोबर यावं असा तिचा हट्ट होता आणि आज त्यांना अकोलपाटला निघायला मुहूर्त लाभला होता, तर सकाळपासून पाऊस सुरू झाला होता. हो नाही करता दोघं पाऊस जरा थांबलायसं पाहून अकोलपाटला निघाली.

संगमपूर-मुंबई बसनं अवघ्या पाऊण तासात रेणुका आणि प्रा. जमदग्नी अकोलपाटला पोहोचले. सायंकाळचे पाच वाजले होते. नुकताच वाहवणी पाऊस पडून गेला होता. स्टँडवर गाडी आल्या बरोबर गाडीच्या दाराशी एकदम गर्दी झाली. त्यातच हमालाची गर्दी, घाई! मांगाची चार-पाच पोरं हमालीसाठी पळत आली पण खाकी कपडे घातलेल्या दोन हमालांनी त्यांना गाडीवर चढायचं नाही म्हणून बजावलं. गाडीतली माणसं दारातून बाहेर पडतानाच 'हमाल हमाल' म्हणून ओरडत ती पोरं आशाळभूतपणे प्रत्येक उतरणाऱ्या प्रवाशाकडे पाहत होती. सामान घेऊन न येणाऱ्याचा जणू त्यांना राग येत होता. पटकन उतरून बाजूला जाण्यासाठी ते त्या प्रवाशावर खेकसत होते. त्या गर्दीत रेणुका आणि जमदग्नी खाली उतरले. गर्दीतून कसेबसे बाहेर आले ते पाण्याच्या डबक्यात. त्या गर्दीत रेणुकाच्या आणि जमदग्नींच्या कपड्यावर चिखल उडाला.

'ईऽऽ किती चिखल उडालाय साडीवर!' साडी सावरून बाजूला होत रेणुका ओरडली.

'ते काही नाही. आता असंच हिंडायच गावातून! मी सांगत होतो, आज जाऊया नको. पण तुझाच हट्ट!'

'मग जाऊया परत?' डोळे विस्फारून रेणुका म्हणाली.

'आता सगळ्या गावभर तुला फिरविल्याशिवाय परत जायचं नाही! अगदी कोण तुझी ती आजी, मामा आणखी कोण त्यांना शोधून भेटून मगच जायच!'

'अहो पण... पहा हं पुन्हा माझ्या नावानं नाही खडे फोडायचे!'

'वा! म्हणजे जणू मलाच यायचं होतं अकोलपाट पाहायला!'

'बर बाई, आपण चहा तरी घेऊ या का? किती गार वारं सुटलय!'

कँटिनला चहा घेऊन दोघं स्टँडवरून गावात निघाली. पाण्याचे ओहळ वाहत होते. डबक्यावरून कसरत करीत जावं लागत होतं. रेणुका तर उड्या मारून जाताना चित्कारत होती.

'अहो मॅडम, आपण गावातून चाललो आहोत. लोक मला ओळखत असतील कदाचित. या गावातली काही मुलं येतात कॉलेजला!'

'झालं बाई तुमचं लेक्चर सुरू!'

संगमपूर-मुंबई रोडवरून ते बाजारपेठेत शिरले. कच्चा रस्ता असल्यानं चिखल, रबडी, पाणी, चिकचिक झाली होती. त्यांना गढी गल्लीकडे जायचं होतं. एक-दोघाना विचारून ती जरा गतीनंच निघाली. पूर्वजाचे चिंतन करून ती दोघे रस्त्यानं निघाली. लोकाकडे लक्ष न देता अवघ्या तीन-चार मिनिटातच ती कसरत करीत गढी गल्लीला आली गढीगल्लीतून एकदम उतार होता त्यामुळे तेथे निदान चिकचिक नव्हती गढी गल्ली अशी उतरती थेट नदीकडे गेली होती

अकोलपाट तसं लुच्चं गाव. एकदम स्टँडवरून दिसत नाही. मग एकदम एकाआड एक गल्ल्या लांब ओळीच्या. गुजरगल्ली, ब्राह्मणगल्ली, मधली गल्ली, गढी गल्ली-गावाच्या जवळून वाहती पेहरा. पूर्वीचे पाच-सात पाणवठे नळानं गावात पळवलेले. मराठी शाळा, एक मोठं हायस्कूल, छोटंस पोस्ट, प्राथमिक आरोग्य केंद्र, दोन दूध डेअऱ्या, सोसायटीचं गोडाऊन, तीन-चार बँका असं शहरवजा खेडं. पाच वार्डाचं आणि ग्रामपंचायतीच्या पंधरा मेंबराचं. गावाला वेशीजवळ रहाडीत मांगवाडा. त्याच्या विरुद्ध टोकाला बुद्धवाडा. पेहरा नदीकडे चोराच्या वेशीवर जाताना गढीगल्लीतून उतरत उतरत जायचं. शेवटी वेशीपर्यंत मुसलमानाची घरं. गावात सोनार, शिंपी, न्हावी, सुतार, चांभार, महार, मांग, तेली, कुंभार, पाथरट, तांबट आणि ब्राह्मण आणि त्यांच्या जोडीला गावात आलेले नोकरदार राहतात. माळी मराठा राजकारणकर्ती मंडळी गावाच्या वाड्यात भोवताली. मुंबई रस्त्याला एक बाजारतळ, त्याच्या पलीकडे मागासवर्गीयाचे होस्टेल. आणखी पलीकडे एक टेकडी. नळटाकीची. तिच्या उराशी शाहूनगर कवटाळलेलं. इंदिरा घरकुल योजनेत मांगवाडा तिथंच हाललेला. त्याच्या जोडीला भटक्यानी आपल्या झोपड्या थाटलेल्या. गावात दुकानं, दवाखाने, हॉटेलं, बँका सगळं गल्ल्यागल्ल्यातून हरवलेलं

गढी गल्लीतून खाली जाता जाता एक प्राचीन मंदिर महादेवाचं. अप्रतिम शिल्प-स्थापत्य! जणू खजुराहोच! रेणुका आणि जमदग्नी देवळात शिरली मंदिराच्या शिल्पचमत्कृतीत हरवली. अष्टनायिका, कामक्रीडा, शिवक्रीडा पाहताना दोघेही खूपच गंभीर झाले होते. देवळाला फेरी मारून पलीकडल्या कठड्याकडे आल्यावर रेणुका ओठंगून खाली डोकावून पाहत होती.

'जमदग्नी लवकर इकडे या!' अजून शिल्प पाहण्यात गढलेल्या जमदग्नींना रेणुकेनं बोलावलं, सौंदर्य समाधी भंगली.

'काय?' जरा वैतागूनच ते म्हणाले.

'त्या दोन बायका बघा रस्त्यात पाणी वाहून गेलेल्या रस्त्यात काय शोधताहेत, त्यांच्याबरोबर ती मुलं सुद्धा!'

'हरवलं असेल काही.'

'नाही हो माझी आई सांगत असे असं पाणी वाहून गेल्या रस्त्यात काही सापडतं म्हणून.'

'आपण शोधायचं जाऊन ?'

'त्यांना विचारायला काय हरकत आहे ? बहुधा आमच्या समाजाच्या दिसताहेत !'

रेणुका जमदग्नीना घेऊन घाईनंच तिकडे आली. अगदी एकाग्रतेने शोध चालला होता. दृष्टी तीक्ष्ण बनली होती. शरीर कमरेतून खाली वाकून वाकून रगावली होती. मधेच एकदा लहान पोरांनी झेप घालून काहीसं, वाळूमातीतून उचललं.

'आये हे पय !' दोन्ही बायांची शोध समाधी भगली. आईनं हातात घेऊन निरखून पाहिल आणि फेकाटून दिलं. 'काही उचलित्यात !' एव्हढंच बोलून ती पुन्हा शोधू लागली. रेणुका बोलण्याची संधी पाहतच उभी होती. जमदग्नी तिच्याकडे मिश्किलपणे पाहून हसत होते. बायानी पुन्हा शोध सुरू केला खरा पण त्याना या दोघांची चाहूल लागली होती. त्यानी एक कटाक्ष त्या दोघांकडे टाकून पुन्हा शोधाशोध सुरू केली.

'हरवलंय काही ? रेणुकान विचारलं. सगळ्यानी एकदम विचकून वर पाह्यल. त्यांच्या सशयी नजरेत या वेडगळ प्रश्नाविषयी शका होती. त्याचबरोबर मिश्किल हास्य त्या सर्वांच्या चेहऱ्यावर पसरल होतं.

'अव उगा कायबाय गवसतय किडुकमिडुक !'

'नेहमी ?'

'छ्या छ्या अव बाईसायब आता खोट घालित्यात येव्हढी बी. पार वाण्याबामणाच्या बायाबी !'

'मग तुम्ही ?'

'अव गवसलं तं गवसलं काही !' बोलण्यातलं रेणुकाच फुकटच लांबण सपवून त्या पुन्हा शोधू लागल्या तरी रेणुका पुन्हा म्हणालीच.

'आज सापडलं काही !'

'नाय्य बया काय गवसलं !'

'आये त्या कुडक गवसलय ना !' एक मलगा बोलून गेला.

'हव, हवना पर त्ये बी ताब्याचं हाये जणू !'

पोराकडं जळजळीत कटाक्ष टाकून सरकतेपणे बाई बोलली.

'असूद्या हो, बरं मागवाडा कुठय सागता ?'

'कावं ? मागुड्यात कोन नाही आता !'

'मला माझ्या आजीला, मामाला, मावशीला भेटायचंय !'

'कुठ मागुड्यात ?' दोघीनी रेणुका जमदग्नीकडे संशयाने पाहत विचारलं.

'मुंबईची विठी आहे माहीत ? तिची मी मुलगी !'

'अव बया गय ! खरं !' इतका वेळ सशयानं बोलणारी बाई लगलग पुढ झाली.

'कशी ग बया परीवानी पोर आहे. अव बाऱ्याबाम्हनाच्या पोरीपरीस देखणी जशी चांदणी ! पन बया म्या सटवाइना वळखलच नाई बया. तुझी शेवतीमावशी ना बया मी !' शेवंता तिची अलाबला घेत, तिचे पटापट मुके घेत बोलत होती. विसकटल्या डोबलाची. भल्या टिकला कुकवाची, कभिन्न, किटण चढलेली दोन तुकड्याच उभार जुनेर नेसलेली एक स्थूल बाई रस्त्यात रेणुकेचे मुके घेत होती. गांडुळानं विळखा घातल्यासारख वाटत होतं, किळसवाण ! रेणुका गुदमरली. 'ही आपली मावशी !' मनात तिला कसंसच वाटल. पण अशाच माणसांना उभं करायचं होत !

'अग अग मावशी, आता पुरे ! आणि ही कोण ?'

'अव तुही भामीमामी ना बया ही गुणाजीची बायकू !' इतका वेळ आश्चर्य आणि कौतुक भरल्या नजरेन पाहणारं ते ओगळवाणं ध्यान हलल. आता हीही आपल्याला असं घुसळून काढणार असं वाटून रेणुकानं लांबूनच पटकन हात जोडले. शहरी नमस्कार ! भामीनं कपाळाच्या आखावर खोबऱ्याच्या वाट्या काडकन मोडल्या आणि बाजूला तोंड नेऊन पचकन थुकली. शेवंती संशयान जमदग्नीकडे पाहत होती, हे रेणुकेच्या लक्षात आलं.

'मावशी ते आमच्या कॉलेजात प्रोफेसर आहेत. जमदग्नी ! आलेत सोबत मला.'

'या बया मला ना कायनु काय वाट सूलत !' भामीकडे पाहून खळखळून हसत शेवती म्हणाली. रेणुका लाजली. जमदग्नी खटघाळ हसला.

'मावशी, मागवाड्यात जायचं ना ?'

'अव कोन मढ हाये तिठं बया. तुही आजी न्हाती तिठ घरात आन त्ये पलिकड आहिलाजी फुकण्या डगर न्हातय. एकलच !'

'वाड्यावरची सगळी माणसं ?'

'शाहू नगरात गेली नव्या घरात इद्राबाईच्या ! पार इढलल वासं काढूकाढू नेहेलय. बोडका झालाय मागुडा.'

'आजी एकटीच रहाते इथं ?'

'उगा येड्यावाणी करीसूलय धाबारा वर्षांपून ! महामरीचा फेरा आलता ना तवा सुराजी आन मणाजी गेला खल्लास. तवाधनरं निसती येड्यावानी मातगी आईला शिव्या घालती. मसना इना ओरबडून न्यायची म्हनं पर ती कुठ येतीय ?'

मागवाड्यातल्या मरीआईच्या फेऱ्यात सापडलेल्या माणसाची हकीगत ऐकून रेणुकेच्या अगावर काटा येत होता.

'गुणाजीमामा काय करतो ?' रेणुकानं विचारलं, भामीचा चेहरा खरकला.

'अव काय हमाली करतय पर ध्यान कुठंय ? त्ये येड्यावानी झालय. त्यो भोम्या खवीस हाये नव्ह समदा मागुडा नासवाया !' शेवता असा वेडावाकडा चेहरा करून बोलली की रेणुकाच्या डोळ्यासमोर आपलं उद्ध्वस्त मातुल उभ राहिलं. 'आपण आपल्या आईबरोबर इथेच असतो तर !' तिच्या मनात नुसता विचार आला आणि काळजाचा थरकाप झाला.

छत्र्या मारुतीच मदिर आणि रहाडीतला गाळ ओलांडून रेणुका आणि जमदग्नी मागवाड्यात आले तेव्हा त्याना अक्षरशः नाक मुठीत धरून ठेवाव लागल. दलदलीत उभी असलेली, धुरान काळ्याठिक्कर झालेल्या मातीभेडा भिंतीची बोडखी घर लोबल्या काळ्या आभाळाखाली अब्रू ओरबडलेपणे उभी होती. मधल्या वाहून चालल्या ओटधावर थोबाड वासून पडलेल्या मरतमढ्यासारखी ! दोरक्या खुट्याच्या खुणा, घायपत् आबाडीचे पुजके गाळात रुतून बसल्यासारखे झाले होते. भोवतीकुजक्या उकिरड्यांवर भरीला मेल्या जित्राघाचा दुर्गंध सारं वातावरण असह्य करीत होता. चार गाढव डुकरं मुराद चरत होती. उद्ध्वस्त मागवाडा तरीही मातामरी मातगीच्या देवळाच्या, अहीलाजीच्या झोपडीच्या अन परिगाच्या घराच्या मरू

घातल्या अस्तित्वानं अजून जीव धरून होता. हा जिवतपणीचा नरकवास रेणुका आणि जमदग्नीला गुदमरून टाकत होता तरी शेवती आणि भामी निवात होत्या. त्यानी पोराना शाहूनगरात पिटाळल आणि रेणुकेला आजीच्या घरात नेल.

असह्य अवस्थेत ते घरात शिरले.

'मावशेऽ !' शेवतान हाक मारली. म्हातारीच्या डोळयात हालचाल झाली. हाडाकाडाची झुरळली खुडूक म्हातारी धडपडत उठली. 'शेवती ऽऽ ?' तिन विचारल.

'मावशे, माये, विठीची पोर आलीये वाइच तुला पघायला, रेणकी !' शेवतान दिमाखात सागितल. मावशीन करून दिलेल्या ओळखीनं रेणुकेच्या अगावर काटा आला. कुजक्या आबाडीसारखी आजी पाहून रेणुकेला किळस आली पण आईच्या आईन पसरल्या हातातून मायेचा स्पर्श मनाला भिडला. ती आजीजवळ बसली आणि आजीनं चापसून चापसून तिला उगशी कवटाळली. आबाडीच्या फासानं गळा आवळावं तसं होत असताना येडया आजीच्या आसवानी तिच मन भिजून गहिवरल.

'आज आली व माय मढयाला पघायला. त्या मरीनं खालं माहं घर. तिचा मुडदा बशीवला !' मोतीबिंदूच्या आडून आजी एकदम चवताळून बोलली आजीच्या डोक्यावरून हात फिरवीत रेणुकेनं तिच्या खरबुडया चरे पडल्या हाती पन्नासाची नोट कोबली. 'आजी येतेस माझ्याकडे ?' रेणुकेच्या या प्रश्नान जमदग्नीला भोवळ यायला झालं.

'काय हे ? पैसं ? माझ्या मढयावं घालाया ? ठेव तुझ्याक !'

तिने पुढ केलेले पैसे शेवतीन ओरबडून घेतले.

'लई गुणाची पोर. माय तुह्यासाटी पन्नास रुपये दिलंत.' रेणुकेची अलाबला काढीत शेवती बोलली.

'घाल तुह्या मढयावं पोरासोराना न ह्या मह्या नातीला काही गोडधोड तरी घाल. भामी हाये का सग ?'

'जी हाये.' भामी भीतभीत म्हणाली.

'अव विदखाईच ठून घे त्या पोरीला घरला !'

'आजी येतीस ना तू संगमपूरला ?'

'आता या मातगीचं वाटुळ झाल्यापरीस कुठं जायची नाही मी. तू ये उजूक मह्या मढयाला पहायला.'

'मॅडम, अहो, निघा आता. साडेसहा होत आलेत !' जमदग्नी असह्यतेनं म्हणाले.

'अगवाई खरच, आजी येतो आम्ही !'

'रेणुके शाहूनगरातल्या घरी मुक्काम करा. आन मग जावा सकाळूच !' शेवता उसन्या आग्रहान म्हणाली.

'नको येऊ नतर !' रेणुका लगबगीन उठत म्हणाली.

मागवाडा सोडताना सगळे मातगीच्या मदिराकडे गेले. पडक्या देवळाच्या अधाऱ्या गाभाऱ्यात तादळयाची मातगी कवडयाच्या डोळयानी झालं गेल पाहत होती. बाहेर ओळीन चार–सहा गोल गोटे चेहडयाचे, मातगीला सोबत करीत होते. रक्षकासारखे. देवळाजवळ उभी माणस पाहून अहिलाजी तुरतुरू आला. कभिन्न सुरकुतला मिटमिटता देह उघडाबब ! लगोटीवरच तिथ आला.

'ह्यो अहिलाजी, परशरामाचा बाप ! एकुलता पोरगा पर ह्ये मढ येतय कुठं तिढं ?'

'कोण परशुराम ?'

'अव लय आश्राप चहाणा पोरगा हाये पर करत काय नाही. लगीन दिकील करत नाही. मही फुली ह्यायाची व्हती त कुढं ऐकतोय !'

'त्यो कसा ऐकल ? म्या मातगीला सोडलाय त्येला !' अहिलाजी शून्यात पाहत म्हणाला. रेणुकान मग दहा रुपयाची नोट मातगीपुढं ठेवली तशी भामीनं त्यावर झडप घातली.

'अग भामीमामी, ते पैसे अहिलाजीला दे. तो दिवा लावतो ना मातगीपुढे मी तुला दुसरे देते.' रेणुका बोलली तशी भामी वरमली. रेणुकान दिलेले पैसे तरी तिनं घेतले.

'भामे, व्हय तू मोहर मी घिऊन येती ना स्टॅंडावर !' भामी लगबग निघाली. आणि मग रेणुका आणि जमदग्नीही निघाले. मागवाडयातून बाहेर पडताना रेणुका विचारमग्न झाली होती. ओसाड मागवाडा, आजी, आहिलाजी, कवडयाच्या डोळयानी उद्‌ध्वस्त मागवाडा पाहणारी भग्न देवळातली मातगी, तिच्या डोळयासमोर ही चित्र पुन्हा पुन्हा येत होती. 'नशीब आमच्या सरकारन नदीच्या वाटेवरचं वेशीवरच रहाडीतल, उकिरडयातल मातगाचं जीवन इंदिरा घरकुलात नेलं. पण ही घरकुल पुन्हा नवे मागवाडे होणार तर नाहीत ? गावाची इडापीडा टाळणारी मातगी मागवाडयात इडापीडा घेऊन मागवाडयाच मागाइत करून टाकणार का ?' रेणुकाच्या मनात विचाराचं काहूर माजल होत.

स्टॅंडवर पोहोचतात तो शाहूनगरातली सगळी माग एकदम गराडा करून तिच्या भोवती जमा झाली. भोवतालची माणसं मुद्दाम कुतूहलानं पाहू लागली. प्रा. जमदग्नीना ओशाळल्यासारख झालं होत. हमाली करणारी माग पोरे आता तिच्या भोवती पडलेला गराडा मोडण्याचा प्रयत्न करीत होती. इतकी नेटकी, सुशिक्षित मातंग तरुणी जणू ती प्रथमच पाहत होती.

'विठीची पोर का तू ?' आडदाड अगाच्या कभिन्न कसाई चेहऱ्याच्या भोम्यान पुढ होऊन विचारल. तसा अणाजी शेवतीचा नवरा मधेच म्हणाला, 'अव हवंना भोम्या ! प्रोफेसरीण हाये सगमपुरात ! अणाजी बोलला आणि रेणुका एकदम गभीर झाली. 'हाच भोम्या ! सगळा मागवाडा उद्‌ध्वस्त करणारा !'

'आज मागुडयात न्हाऊन जायाच !' भोम्या लघळपणे म्हणाला. हसताना त्याच्या पडलेल्या दोन दातांची खिंडारं आणि भिवयाचे पुजके फारच विचित्र वाटत होते.

'रेणुकाताई, तुम्ही मुद्दामून मागुडा पहायला आलात का ?' परशुरामान पुढे येवन विचारलं.

'ये येडया मग काय तुला पाह्यला आलती का ती ? तुहायला ह्या परशा येक येडाच हाये !' मध्येच भोम्या पाघळ हसत बरळला. रेणुकानं भोम्याकडे दुर्लक्ष केल.

'तू *अहिलाजीचा परशुराम का ? जरा सगमपूरला येशील ?'*

'हो येईन ना ताई ! कवाशिक येऊ ? उद्याकडच येतो !'

'असं बघ रविवारी ये. घर सापडेल तुला ? अस कर फकीरबाबा माहिती आहे तुला, त्याना घेऊन ये !'

'हव हवं. येतु येतू !'

रेणुकाच हे परशरामाशी बोलण ऐकून भोम्या सतापलाच होता.

पण तो जरा शात होता, तेव्हढयात गाडी आली. परशुराम आणि अणाजीन हमाल पोरांना जागा धरायला सांगितली. आता उत्तम जागाही गाडीत मिळाली. रेणुका गाडीत बसली. खिडकीभोवती बाया-बापडया पोराना कडेवर घेऊन उभ्या सगळा मांगुडा खिडकीपुढं पोराच्या आशाळभूत नजरा रेणुकाच्या ध्यानी आल्या. आपण काही चुकलो अस वाटल. तेवढयात गाडी सुरू झाली. अण्णाजी वर हात करून म्हणाला, 'पोरी ये उजुक' शेवंतानंही आग्रह केला. तेव्हढयात रेणुकान पुन्हा शंभराची नोट काढली आणि आणाजीच्या हाती देत ती म्हणाली, पोराना खाऊ द्या.

'अव कशाला त्येच्या हातात दिली नोट. दारू पिऊन फुक्कट जाईल येडा त्यो !' भोम्या मध्येच बोलला. येवढया गडबडीत गुणाजी आणि भामी मात्र परत दिसली नाहीत. शेवंताची फुला मात्र गाडी दृष्टीआड होईस्तोवर हात करीत होती. पण मागांचा कळप—!

दिलेल्या शंभराच्या नोटेभोवती मागकळपाचा कालवा चालला होता. रेणुकाच मन व्याकुळ व्याकुळ होत होतं.

## : ४ :

नळटाकीच्या टेकडीभोवती वसलेल्या शाहूनगरच्या पलीकडल्या लाब शेतात वाहाळाच्या कडेला असलेल्या लिंबाच्या झाडावर शे-शभर कावळा नुसता उच्चरवाने कारव करीत होता. हिरवा लिंब काळाकुट्ट झाला होता. एखाद्या मोठ्या कभिन्न लोबत्या ढगासारखा. दोन दोन चार चार कावळे धिटाईनं फडफडून फाद्यावरून भेदक नजर टाकीत एकदम झेपावत होते. जवळ जाण्याची छाती होत नव्हती. तरी फांद्यावरच तुरूतुरू इकडून तिकडे जाऊन माना वाकडया करकरून, समोर दिसणाऱ्या मेजवानीकडे काकदृष्टीन पाहत होते. मध्येच एखादा दुसरा एकदम झेप घेण्याचा प्रयत्न करी. 'हाडया !! हाडया !! तुहायला मी !' असा कोणी पिटारा केला की उच्च काकरव करीत फडफडून पुन्हा फादीवर झेपावायचा. क्षणभरानं दुसरे, तिसरे...पुन्हा पुन्हा !

लिंबाच्या झाडाखाली रामु तेल्याची भली धिप्पाड गाय कचाकच तोडण्यात फसम्या दग होता. काल रात्री विहिरीच्या पाण्यात पडून मेलेली गाय ! फसम्या वाटं घालीत होता. भोम्या हवलदारकी करीत होता.

मांगं लेकराबाळांसह धोत्रालुगडयाचे फडके घेऊन भोवती टाकून बसली होती. मासकडाचा एखादा तुकडा कोणाच्या फडक्यात जास्त गेला की नुसता कालवा व्हायचा. मग भोम्या डरकाळायचा, 'अव जरा मुकाच ! समद्याना मिळन ना, तुमच्यायला !' तो ओरडला की, थोडा वेळ शातता. मग पुन्हा कालवा माडीच्या च्यापासाठी, काळजासाठी पोर नुसती टकून बसलेली. ये सक्या अणाजी, गुणाजी, भामी, सुभान्या, कोडी, शेवती, सगळी नुसती टपलेली. थोड चुकून कुणाच्यात जास्त गेलं की, 'अवं फसम्या म्या का तुझं आड चोरलं काय रं ?' कोणी डाफरायचं.

'आव मिळन त मी काय आख्वी गाय खातु काय ? त्यहायचे फुकणे त्येंच्या !' फसम्या हरिश्चंद्राचा आव आणून बोलायचा. सगळे अगदी टाकल्या तुकडयावर टपून ! मागुडयातली कुत्री त्यातच कालवा वाढवायची. ल्हा ल्हा करीत, शेपटचा जोरात हलवीत ती आपल्या मालकाकडे गान्हाण माडताना मधूनच तोंड खुपसून काही पळवायची. मग पेकाटात लाथ बसायची. शेवटी भोम्यान त्यांच्यापुढं शिर टाकल आणि सगळी कुत्री तिकडं एकच भोकार तांडव करीत तुटून पडली. अजून कावळचांना काही साधल नव्हतं. ते झेपावण्याचा विचार करीत होते. परमेश्वरान त्याच्यासाठी जमवलेलं भक्ष्य माणसाचे बुभुक्षित थवे ओरबडून नेत होते. गाय हाडाहाडातून फुटत होती, मरणोत्तर तिचा आत्मयज्ञ चालला होता. गायीचा सागाडा कसाबसा शिल्लक राहिला होता. पिटाराचा आरडा कावळे ऐकायला तयार नव्हते चार कावळचांच्या एका टोळीनं एकदम झेप घेतली आणि फडक्यातल्या वाटचांमधून तुकडे घेऊन ते पळाले सुद्धा आणि आक्रमणाला तोड लागले. माग माणसाचे कळप आपली गाठुडी घेऊन घरी पळू लागले. कावळचांनी माणसांना पळवल आणि आता कावळे, कुत्री याचे तुबळ युद्ध जुपले ! मेली गाय हाडाच्या शेवटच्या तुकडयापर्यंत बुभुक्षिताच्या भुका भागविण्याचा भाबडा केविलवाणा प्रयत्न करीत होती.

सकाळीच फसम्याच्या नेतृत्वाखाली चार दाड पोरानी ओढून आणली. गाय गठुडया-गठुडयातून शाहूनगरातल्या मागुडयात आली तेव्हा सूर्य मध्याकडे सरकू लागला होता. रामू तेल्यान घरातली आणि गावातली घाण मागाच्या पोटी सोपविली होती. मागुडा आनंदला होता. मागाच पोट म्हणजे जणू जळता उकिरडा! आज माग कुणी कामाला गेली नाहीत. सकाळी उडून बाळूशेठच्या हॉटेलपुढची हाजेरी आटोपली आणि लिंबाखाली गोयज्ञ सुरू झाला. काम करायचं ते तरी पोट जाळण्यासाठीच ! रामू तेल्याच्या गोनिधनाबद्दल शाळकरी पोरानी सुद्धा शाळेची सुट्टी घेतली. भोम्याला मस्ती भरली त्यानं फस्म्याला बरोबर घेऊन दारूचे फुगे आणले. तोवर आयाबायानी मीठ मिरची, पीठ मसाला दळून, धुडून, मागून जमा केला. त्या उद्योगाला लागल्या. भोम्यानं सारा मागुडा आग्रहानं दारूत बुडवला. पोरं—सार बाप्यें—बाया पोरी दारूने धुद झाली. आणाजी नको नको म्हणताना भोम्यानं शाळकरी पोरानाही घोट घोट दिली. भोम्यानं राखलेल्या बाजारबसव्या पोटात दारू रिचवून चेकाळल्या. त्या धुंदीत चुली पेटल्या. चुलीवर गाय खदखदायला लागली आणि मागाच्या पोटात दारू उडया मारू लागली. मटणाचा घमघमाट पोटात बारा वर्षांची भूक दाटून आणू लागला. पोरं अर्धकच्च शिजलेलं खांड पळवू लागली आया ओरडू लागल्या. दिवस वर चढत गेला, गाय शिजून मस्त झाली भाकऱ्या चुलीशी उभ्या राहल्या. वटकण लावून आलिमेनच्या थाळधा बसल्या रश्यात भाकरी चुरून चवदार झाल्या. मागानी रामू तेल्याच्या गायीवर ताव मारला. तर्रं ढेकरा देत मागं बाहेर पडली. पोट फुगली आणि मनातली उणीदुणी फुटून बाहेर पडली.

आणाजी अहिरावाचा परश्या कुठं दिसना जसा कालधरनं. भोम्यानं जरा तिढयात अणाजीला विचारल.

'काजीनबा ?'

'तुझ्या...तुला ठाव नाही मतो ?'

'देवाच्यान बा त्यो का माला मागून जातो व्हय ?'

'गाढवीच्या, कायम त्येच्याच माग ना तू !'

'कह्याला बा ?' भोम्याचा गुरकाव वाढला अणाजी बारडा बचाव करू लागला.

'अवं का बीद खाल्यावानी बोलसूलय ? त्यो त्या रेणकीमागं फिरतोक नाय ती...आल्या घरतं.'

'अव आता वरबर असन पर...'

'ती का लगीन करन त्येच्या सगट ?' त्येच्या...कशी काय गवसती त्येला त्येच पयतो. नाय आगाखाली दडापली तिच्यायला त...

'ती त लगीन बी करायची नाई मंती !' अणाजी उगा बोलून गेला.

'मग का त्यो बामण ठुणार हये का उराव !

'त्यो का हिच्या संगट लगन करील का येडघव. तिला जाऊन झोपावा लागन... ! पर हा परशा का चाटितोय तिला ?

'नोकरी लाऊन देनार मन !

'आता बरयका तिच्यायला. त्यो नोकरी करतो भाडखाऊ ! हिंडतो पुढाऱ्यामागं, गावाच्या म्हारक्या करीत ! अरं त्या बाबूरावाला सागितल त त्यानं त्येच्या गाडीव लाथ मारून हाकलला. बिदखाईच्याला !'

'काय ठाव नही मपल मो कवाच त्येच्या सग नस !'

'त्येच्यायचा भाडखाऊ त्येच्या फुली सग लगीन कर मनलं त नाही मनला...चा ! मंग भाड खातोका मना ?'

'अव पन मांगाचं गाऱ्हाणं माडातयना पुढ. नळाच काम त्येनाच केलत !' आणाजीनं उगा तेल ओतल.

'कारं आण्या लय त्येचा मोठेपना गातो भाडया काडा काय त्येच्याखाली ?'

'ए भोम्या, मुकाच ! तुझ्यावानी भाडखाऊपना नाही करीत त्यो !' शेवंता अणाजीवर डाफरल्यागत भोम्याला बोलली मात्र.

'हा हा तुझ्याय...करतो भाडखाऊपना. पैसं घ्येतांना बिन लाज्यानो लय...? तुमच्यायला तुमच्या तू सुदिक पासली पडतीना नोट दावल्याव !'

'हां भोम्या, मह्या बायकुचा नाव घ्येतो...!'

आणि पाहता पाहता बाचाबाची झाली. उखाळ्या पाखाळ्या, उणीदुणी होऊन अखेर मारामारी सुरू झाली, त्यातच अक्षरश: लाखोली वाहिली गेली. गाढवाच्या गाडीपासून सीतेच्या पदरापर्यंत सगळ्या रामायण-महाभारताचा उद्धार झाला. नातगोत बाजूला ठेवून पोरींना धद्याला लावणारा भोम्या असा गुरकला अन् आणाजीन आज हिंमत केली. अन् मग सगळी तरुण पोरं तुटून पडली. मागाची प्रत्येक बाई जणू आपलीच मालमत्ता आहे अशा रुबाबात वाटेल ती सुपारी घेऊन मागुडयाच्या अब्रूवर नागर फिरवणारा भोम्या आज असा पोराच्या तावडीत सापडला आणि रण माजले. भोम्याच्या बाजूची उडगी दोन पोरं भोम्याला वाचविण्याचा प्रयत्न करीत होती. गेल्या दहा-बारा वर्षांत भोम्याच्या धद्याला आडवा येणारा परशुराम आज नव्हता म्हणून भोम्या मागुडयावर जरब बसवायला गेला अन् त्याच्या आगलटी आलं.

परशुराम अहिलाजीचा पोरगा. बाड तिशीचा गडी. कुणालाच हार जायचा नाही. मागवाडयासाठी झिजायचा. आपल्या परीनं वाईट वगाळ दूर करण्याचा प्रयत्न करायचा. हमाल पोरांमध्ये त्याच्याविषयी आदर. बायांना परशुरामाचा आधार. फुलीला म्हणूनच तो आवडायचा. पण त्याचं तिसरच. तो लगीन करायला नको म्हणत होता. रेणुका आल्यापासनं त्यानं रेणुकेचं मार्गदर्शन घ्यायला सुरुवात केलेली मातगीच्या मंदिराचा जीर्णोद्धार करायचा त्याचा विचार. मागाच्या पोरांसाठी बोर्डिंग काढाव म्हणून त्याची धडपड. तिसरी चवथी शिकलेला परशुराम मागानी शिकाव म्हणून जीव जाळायचा. पुढाऱ्याच्या हातापाया पडायचा. जीवाबाई माग तमासगिरीण अन् त्याच लफड आहे असं बोललं जायच. जीवाबाईचा परशरामावर फार जीव. शाहूनगरात घर बाधताना त्याच्या शब्दाखातर तमाशाचे दोन खेळ तिनं दान दिलेले भोम्याला हे देखवायच नाही. एकदा त्यानं जीवाबाईच्या तमाशात धिंगाणा केला होता. आणि मार खाल्ला होता भोम्याची डुकधऱ्या सापाची जात. तो जमेल तेव्हा परशुरामाला त्रास देण्याचा प्रयत्न करायचा. रेणुकेकडे परशुराम जातो. रेणुका मागाच्या सघटनेच काम करतीये. त्या फकीरबाबाच्या मागे हे दोघही असतात. हे त्याला बापूराव आवचित्यानी सागितलं होतं. भोम्याला बापूरावानं कायम सुपारी देऊन टाकली होती आणि नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणं ती त्यानी घेतली होती.

परशुरामला मात्र रेणुका भेटल्यापासून आशा उत्पन्न झाली होती. रेणका कॉलेजात वाण्याबामणाच्याही पोराना शिकविते याचं त्याला कौतुक वाटायचं तिच्या बरोबर त्यानं जिल्ह्यातल्या मातग वस्त्याना भेटी दिल्या होत्या मागाच्या सघटनेची कल्पना त्याला फार आवडली होती. त्यान रेणुकाची जीवाबाईशी ओळखही करून दिली होती. जीवाबाईनं मनाशी ठरवलेल्या गोष्टी रेणुका साकार करू शकेल असं त्याला वाटत होत.

तो सारखा विचार करायचा. पोटासाठी वाट्टेल ते करून जगणारी जात आणि पोटासाठी दुनियेचा नरक स्वत:वर ओढून घेणारी जात. पिढ्यापिढ्या चाडाळ गुन्हेगार म्हणून जगताना त्याला पाहवत नव्हत. लोकाच्या लग्न-कार्यांना, जत्रा-यात्राना मोठ्या दिमाखानं वाजंत्र्या घेऊन जाणारी मागं पाहून त्याच्या पिपाण्याच्या स्वरानी त्याच्या मनात यायच जगाच शुभ करण्यासाठी, कल्याणाचा डका वाजविण्यासाठी स्वत.च्या जीवाच्या पायघड्या घालून जगाच्या आनंदानं आनदून जाणाऱ्या माणसाना समाजानं काय दिलं ? उष्ट्या पत्रावळी ! मतिकाचे कपडे ! जगाला लागलेल्या ग्रहणाचं अशुभ ! सगळ्याच्या इडापिडा उराशी कवटाळत मागानं युगे जगायच ! पण समाजानं तरी का कदर करावी आमची ? जगाव लागणार जिण नशिबाला आल म्हणून कामाचा कटाळा करीत कुत्र्यासारखी फेकून टाकलेल्या पत्रावळीवर तुटून पडणारी जात आमची. हाड म्हता शेपट हालवीत लाचार होऊन पायातल पायताण म्हणून जगणारी जात आमची ! जग बदलताना पाहणाऱ्या परशुरामाला हे सार बदलावस वाटायच. गेल्या दहा वर्षांत हे बदलत होत एकाकी पणान मास्तर, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, नट, मामलेदार, बी. डी ओ. कलेक्टर अशी काही हुद्देदार मडळी मातग म्हणून निपजलेली होती पण समुद्रातल्या ओंजळभर पाण्याइतकी. तीही एकेकटी. जी सुधारायची ती कधी मागुडयाकड पहायची नाहीत ! त्याचा

मागुडयाला काय उपयोग ? मागुडयाचा उद्धार कधी होणार ? मनात आलेल्या उठलेल्या विचाराच काढूर परशुराम रेणुकाकडे माडी आणि रेणुका त्याला समजावून सागे. आदितराव गायकवाडाचा आधार देई ! समाजपरिवर्तनासाठी चाललेली समाजसेवी स्वयंसेवी संघटनाची माहिती सागे आणि आपण काय कराव या विषयी विचारही सागे

आज असाच तो रेणुकाकडे गेला होता. जमदग्नी, फकीरबाबा, जीवाबाई, रेणुका आणि तो एकत्र बसून अकोलपाटच्या महामरी मातगीच्या देवळाच्या जीर्णोद्धाराचा विचार करणार होते. रात्री बराच वेळ त्याची मिटीग चालली होती. तो दुसऱ्या दिवशी उशिरा परतला. रामूतेल्याची मेली गाय त्याला अज्ञात होती. तो शाहूनगरात पोहचला तेव्हा शाहूनगरातला मागुडा उभा पेटला होता. माग आपल्याच हातानी अब्रूचे धिडवडे काढून वेशीला टागत होते. शाहूनगरातले सगळे लोक मागाचा हा फुकट तमाशा पहायला भोवताली जमले होते. परशुरामाला ते पहावेना. तो मधे घुसला आणि तरुण पोरांना बाजूला करू लागला. सगळी इरेला पेटून भोम्यावर तुटून पडली होती.

'अर का त्या बघ्याना तुमचा बिनअक्कलेचा फुकट तमाशा दावता ! आता मुकाच !' परशुराम दरडावून ओरडला. तशी मारामारी थांबली. माग तरुण त्याच्याजवळ गाऱ्हाणी माडू लागली, तो त्याना आवरण्याचा प्रयत्न करू लागला बाया, बाप्ये, पोरं, पोरी, हातवारे करून भोम्याच कर्तुक शिव्याच्या लाखोलीतून परशुरामाला ऐकवीत होते

'अर सागा सागा, बिदखाईच्यानो त्यो काय माह वाकडं करणार?' दातातून आणि नाकातून रक्तबबाळ झालेला भोम्या परशुरामाकडं हातवारे करून म्हणत होता.

'अरं नाही त्याच्या रेणकीला राड बनवली तर टागखालून जाईल भाडखावा ! ये ये XXXXXX मार मला !

'अरं आता जावा मुकाचं नाहीतं इठच मढं निघन मागाइतात ! परशुरामान पुन्हा भोम्याला दरडावल तसा भोम्या आणि त्याचे दोन बाड साथीदार काढता पाय घेऊन भोम्याच्या घरात घुसू लागले.

'अरं जारं फुकणीच्या, लई आला दम देनार ! तुला दम शिदळऱ्यात जिरवन तवा पाहूरं ! म्हणत भोम्या घरात गेला. ते तिथे आत गेले तसे परशुरामान त्याच्या घराला बाहेरून कडी लावली आणि दारूनं धुंद होऊन बेबद झालेल्या मांगवाडयाला घराघरात पिटाळलं. तरण्या पोराना कामावर हाकलल.

दाराच्या आतून परशुरामाच्या चवदा पिढयाचा उद्धार होत होता. परशुराम मात्र सुन्न होऊन त्याच्या घरापुढल्या ओटयावर बसला.

'अव परशुराम, का मुकाच ? वाईच कोलडयास भाकर खातो ?' फुलीनं जवळ येऊन विचारलं.

'पोट भरलं भाडणं पाहून !'

'अव बा बोलितोय !'

'परशादा, चाल दोन घास खाय माया सगट' कधी नव्हे तो गुणाजी परशुरामाच्या खांद्यावर हात ठिवून म्हनाला.

'बरा झाला XXXXX समदघानी धरूनसनी कुटला...!' गुणाजी शून्यात पाहत म्हणाला.

'अव, परशुराम व चाल ना वया !' अणाजीला घेऊन शेवंता बोलवायला आली.

आणि घडून गेल्या रामायणानंतर रामू तेल्याची गाय दोन दोन घासांतून परशुरामाच्याही पोटात अमर झाली. परशुराम मात्र गाय पोटात गेल्यान आणखी विचारमग्न झाला. त्याच्या मनात एकच भीती होती– हा भाडखाऊ भोम्या ताईला बेसावध कुठ गाठणार तर नाही ना ? आपण सावली होऊन तिला जपल पाहिजे. तिचा विचार जपला पायजे.

## : ५ :

रेणुकान सबध वर्षभरात मातग सघटनेच्या दृष्टीनं बरंच काम केलं त्यात तिला फकीरबाबा, परशुराम याच्या बरोबरच जीवाबाई तमासगिरीण आणि जमदग्नी याचा खूपच उपयोग सुरू झाला होता. अकोलपाटचा ओसाड मागवाडा आता संस्कार केंद्र बनला होता. मातामरी मातंगीच्या मदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी जीवाबाई आणि जमदग्नी यानी खूपच परिश्रम घेतले होते. मातंगीपुढे सभामंडप उभारला होता. अहिलाजी आणि रेणुकाची आजी याच्याबरोबर आणखी दोन कुटुबं आपल्या जुन्या घरी पाचटाचं छप्पर करून रहायला आली होती. मातंगीपुढे दर मंगळवारी डक्केलवाराची गाणी होऊ लागली होती. गावातले इतर लोकही मातामरीला काही वाहून जात होते. आदितराव गायकवाड खास मातंगी मदिराच्या उद्घाटनप्रसगी हजर होते. नारायणराव तिटमे आमदार याच्या हस्ते मदिराचा उद्घाटन समारभ झाला होता. आदितरावानी रेणुकेसह जिल्ह्याचा दौरा केला होता. आता मातग महासघाचं जिल्ह्याच युनिट उभ राहिलं होतं. फकीरबाबा जिल्हा मातग सघाचे अध्यक्ष झाले होते. तर जिल्ह्याचे उमाजीराव आवचिते उपाध्यक्ष बनले होते. रेणुका जिल्हा सेक्रेटरी म्हणून काम करीत होती. या सगळया सघटनात्मक कार्यात आदितराव गायकवाडानी जमदग्नीच्या सहाय्याचा गौरव केला होता. मात्र बापूराव अवचितेला सगळीकडून टाळलं गेलं होतं.

भोम्याच अकोलपाटातल वर्चस्व सपुष्टात येऊ पाहत होत. त्याच्या या धंद्याच्या निषेधार्थ त्याला जातीबाहेर काढण्याचा विचार थेट जिल्हा कमिटीतही आला होता. भोम्या चरफडत होता. रेणुका, परशुराम, फुली, जमदग्नी, फकीरबाबा याच्या हालचालीवर बारकाईनं नजर ठेवणं हा त्याचा नित्याचा उद्योग झाला होता. त्यानं बापूराव अवचित्याकडे जाऊन त्याना आणखी भडकून देण्याचा प्रयत्न सातत्यानं चालू ठेवला होता. बापूराव पेटला होता.

रेणुकेला पाहून बापूरावानं जे मनाशी योजलं होतं त्याला सुरुग लागला होता. चवताळलेल्या लाडग्यासारखी त्याची अवस्था झाली होती. त्यानं एकदा रेणुकेला शामराव पाटील नगराध्यक्ष याच्या मळयातल्या वस्तीवर बोलावून रेणुकेचा विनयभग करण्यापर्यंत मजल मारली होती. कॉलेजमधून काढून टाकण्याची धमकी दिली होती. रेणुका हातात आलेलं सावज शिताफीनं सुटून जावे तशी

निसटली होती आणि आता तीच बापूराव आवचित्याचा काळ बनू पाहत होती. या सगळयाला जबाबदार आपणच आहोत असं त्याला वाटत होत. त्यातच जमदग्नीचं आणि रेणुकाचं एकत्र उठणं-बसणं आणि फकीरबाबाचं त्यांना आशीर्वाद देणं त्याच्या डोळयांत सलत होतं. त्यानं एकदा परशुरामाला बोलावून, रेणुका जमदग्नीचे अनैतिक संबंध आहेत असं सांगून भडकवून देण्याचा प्रयत्न केला होता.

दलित मुक्ती मंचाच्या तरुणानी बापूरावाचा फायदा उठविण्याचा मनसुबा केला होता. दलितांच्या वस्त्यांवर विश्व हिंदू परिषदेच्या चाललेल्या सेवा योजना त्याना उधळून लावायच्या होत्या. जिल्ह्यात ठिकठिकाणी त्यानी आंबेडकर जयंतीनिमित्त सभा आयोजित करून बापूराव आवचिते माजी आमदार, जिल्हा परिषद सदस्य याना मातगांचे पुढारी म्हणून आवर्जून बोलावून जिल्ह्यात विश्व-हिंदू परिषद आणि मातंग संघटनेवर आगपाखड करवून घेतली होती. स्थानिक वर्तमानपत्रातून त्याला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु रेणुका, जमदग्नी, फकीरबाबा, परशुराम, उमाजीराव आवचिते यानी त्याना भीक घातली नाही. आणि वर्तमानपत्राच्या प्रसिद्धीकडे मातंग समाजातल्या कोणाचे लक्ष तरी कशाला होते ?

याला जणू प्रत्युत्तर म्हणून की काय रेणुका आणि जमदग्नी यांनी प्रयत्नपूर्वक दोर, टोपल्या, केरसुण्या, हमाली असे कष्ट करणाऱ्या कष्टकरी मातंगाना राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत कर्ज मिळवून दिले होते. आ. नारायणराव तिटम्यांच्या मदतीने सरकारी अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. गावगावच्या मागवाड्यावर प्रौढ शिक्षण वर्ग सुरू करण्याचा प्रयत्न केला होता. शाळकरी मुलांच्या नोंदी घेऊन त्यांना कपडे, पाट्या, वह्या, पुस्तके पुरविणारे दाते शोधले होते. अवघ्या वर्षभरामध्ये सबंध जिल्ह्यात मातंगसमाजात रेणुकाताई प्रसिद्ध झाली होती. घरातल्या भांडणापासून ते गावोगावी भोमेगिरी करणाऱ्यापर्यंतच्या तक्रारी रेणुकापर्यंत येऊन पोहोचत असत फकीरबाबाच्या तर गावापेक्षा जिल्ह्यात फेऱ्या अधिक होऊ लागल्या होत्या. ह्या सगळ्या कार्याच्या झपाट्यात जमदग्नी आणि रेणुका अधिकाधिक जवळ येत होते. परशुरामाच्या कामाला उधाण आलं होतं. आदितराव गायकवाडानी रेणुकाच्या कामाची तडफ महाराष्ट्रात पोचविली होती.

बापूराव आवचित्यानी रेणुकाच्या सगळयाच कामाला सुरुंग लावायचा ठरवला. भोम्यानं त्याना हा नामी उपाय सुचविला आणि ते मनोमन खूष झाले. त्यानी रेणुकावर जमदग्नीशी असलेल्या अनैतिक संबंधाचा जाहीर आरोप करून रेणुकेला कॉलेजमधून काढून टाकण्याची मागणी केली. दलित मुक्ती मंचच्या मुलांना सह्यांचे निवेदन प्राचार्यांकडे द्यावयास भाग पाडले आणि अखेर कॉलेज कमिटीच्या मिटींगपुढे रेणुकाचा प्रश्न आला. आजपर्यंत 'आपलेच दात आणि आपलेच ओठ' म्हणून गप्प बसलेली रेणुका रणचंडी बनली. भर कॉलेज कमिटीत सर्वांच्या समोर तिनं बापूराव आवचितेच वासनेचं गिधाड उलट करून टांगलं. बापूराव आवचित्यानी, 'भटाबामणाच्या कॉलेजमध्ये दलितांना लाचार बनवून दलित पुढाऱ्यांना बदनाम केलं जाणार !' असा आरोप करून स्वत:चा राजीनामा दिला आणि मिटींगमधून बाहेर पडता पडता त्यानी, 'कशी रेणुका आणि हा जमदग्नी गावात ऱ्हातो तेच पहातो !' अशी घोर प्रतिज्ञा केली.

'सत्तांतर' या दलित मुक्ती मंचच्या मुखपत्रात कव्हर स्टोरी म्हणून घटना रंगविली आणि रेणुका व जमदग्नीला बदनाम करण्याचा किळसवाणा प्रयत्न केला. डॉ. दुर्वास मात्र त्या दोघाच्याही पाठीशी पहाडासारखे उभे होते. झाल्या प्रकारानं फकीरबाबा, परशुराम, फुला मात्र चिंतित झाले. आदितराव गायकवाडानी पत्रातून त्याच समाधान केलं तेव्हा त्याना बरं वाटलं !

## : ६ :

'सत्तांतर' नं अवघ्या संगमपुरात अक्षरशः हलकल्लोळ उडविला होता. पुण्याहून निघणारं दलित मुक्ती मंचचे मुखपत्र. पाचशेवर अंक वाटले गेले होते. वार्ताफलकावर चिकटविले होते. दलित युवकाचा मोर्चा कॉलेजवर येणार होता. प्रा. जमदग्नीना झोपेची गोळी देऊन त्यांच्या रूमवर प्राचार्यांनी झोपविले होते. कॉलेजचा प्यून बाबू परांजपे मुद्दाम त्याची देखभाल करण्यासाठी मुक्कामाला थांबला होता. प्रा. जमदग्नी वेदनानी विव्हळत होता. सकाळी त्याला जाग आली तेव्हा त्याच्या पुढ्यात सत्तांतराचे अंक पडलेले होते.

'दलित तरुणीवर बलात्कार करण्याचा प्रा. जमदग्नी याचा प्रयत्न !' पुढे हकीगत दिली होती– 'अकोलपाट येथील मातंग समाजातील एकोणीस-वीस वर्षांची गरीब तरुणी फुला हिच्यावर संगमपूर येथील विवेकानंद कॉलेजमधील प्राध्यापिका कु. रेणुका विठ्ठलराव जाधव याच्या राहत्या घरी त्या कॉलेजमधील तरुण प्राध्यापक जमदग्नी याचा बलात्कार करण्याचा प्रयत्न ! प्राध्यापिका कु. रेणुका जाधव ह्या काही दिवसांच्या रजेवर आपल्या आईवडिलांकडे मुंबईला गेल्या होत्या. ह्याचा फायदा घेऊन त्यांच्याकडे सर्व घरकामासाठी राहणाऱ्या फुला नावाच्या त्यांच्या मावस बहिणीकडे प्रा. कु. रेणुका आल्या किंवा नाही याची चौकशी करण्याच्या निमित्ताने प्रा. जमदग्नी गेले तीन दिवस सातत्याने येत होते. फुला एकटी असल्याची संधी साधून त्यांनी बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. गेल्या तीन दिवसांतील प्रा. जमदग्नी यांचे लघळपणाचे वागणे पाहून तिला त्याचा संशय आला होता. आपल्या बहिणीचे मित्र व प्राचार्यांच्या मर्जीतले असल्याने आपल्या बहिणीला त्रास नको म्हणून तिने सहन केले. परंतु त्यांचे वागणे अखेर सहन न होऊन फुलाने संगमपूर येथील मातंग समाजाचे नेते व माजी आमदार, जि. प. सदस्य बापूराव आवचिते यांच्या कानी हा प्रकार घातला. त्यानी तिला संरक्षणाचे आश्वासन दिले. श्री. बापूराव आवचिते यानी नुकताच प्रा. कु. रेणुका व प्रा. जमदग्नी याच्यातील अनैतिक संबंधाविषयी झालेल्या तक्रारीवरून कॉलेज कमिटीचा राजीनामा दिला होता.

काल रात्री आठच्या सुमारास प्रा. जमदग्नी प्रा. रेणुकेच्या घरी गेले घराचे दार उघडेच होते. आत शिरताच त्यानी दार बंद केले. दरवाज्याचा आवाज होताच फुला सावध झाली. परंतु दार बंद झाल्याचे पाहून ती घाबरली. ती नको नको म्हणत असता प्राध्यापक जमदग्नी एकदम तिला कवटाळून तिची अब्रू लुटण्याचा प्रयत्न करू

लागले. तेव्हा तिने त्याना जोराचा चावा घेतला व ढकलून दिले. धावत जाऊन दार उघडले आणि आरडाओरडा केला. तेव्हा प्रा. जमदग्नी यानी पळून जाण्याचा प्रयत्न केला परंतु तेवढ्यात पाळत ठेवून असणाऱ्या बाबूराव आवचित्यांच्या माणसानी त्याना पकडले आणि फुलाच्या भावकीतल्याच असलेल्या या माणसानी जमदग्नीना बेदम मारून पोलिसाच्या ताब्यात दिले. पोलिसानी गुन्हा नोंदवून घेऊन मेडिकल करविली तेव्हा जमदग्नीच्या हाताला फुलाने चावल्याचे व्रण स्पष्ट दिसत होते. फुलाचे लुगडे व झंपर फाटलेले असल्याने पुराव्यासाठी तिचे ते कपडे जप्त करण्यात आले आहेत. गुन्ह्याचा तपास पुढे चालू असून प्रा. जमदग्नी यांना सध्या जामिनावर सोडून देण्यात आले आहे. दलित मुक्ती मंचने या घटनेच्या तीव्र निषेध करणाऱ्या तारा मुख्यमंत्र्याना पाठविल्या आहेत.'

प्रा. जमदग्नी हतबुद्ध झाले होते. त्याना प्रचंड धक्का बसला होता. प्राचार्यांनी त्याना कसेबसे सावरले होते आणि वेळीच फोनवर या घडल्या घटनेविषयी पुण्यातील मोठ्या वृत्तपत्रांना निवेदन दिले होते. मोठ्या वर्तमानपत्रानी म्हणूनच दोन ओळीत छोटी बातमी दिली होती. सगमपूर येथील प्रा जमदग्नी यांनी एका मातग मुलीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केल्याचे समजते. पोलिस तपास करीत असून हा बहुधा प्रा. जमदग्नी याच्या चारित्र्य-हननासाठी सूडबुद्धीने केलेला खोडसाळपणा असावा असे बोलले जाते!' बाबू पराजपेने त्या बातमीकडे प्रा. जमदग्नीचे लक्ष वेधले होते.

आणखी थोडा वेळाने प्रा. जमदग्नीचे घर चौकशी करून सहानुभूती दाखविणाऱ्या आणि आधार देणाऱ्या सहानुभूतदारानी भरून गेले. 'चारित्र्य-हननाचा मुद्दाम केलेला प्रयत्न!' एवढाच मत्र प्रा. जमदग्नी सारखे पुटपुटत होते. प्रा. जमदग्नीविषयी गावात, विद्यार्थ्यांत आदराची भावना होती. विद्यार्थी बापूराव आवचित्यावर मोर्चा काढायला निघाले होते, परंतु प्राचार्यांनी त्याना थोपविले. प्रा. कु रेणुका येतील आणि सारे व्यवस्थित होईल. प्राचार्यांनी रात्रीच प्रा. रेणुका आणि मा. आदितराव गायकवाड याना फोनने वृत्त कळविले होते. थोड्याच वेळात परशुराम सगमपूरला आला आणि फकीर बाबीना बरोबर घेऊन त्याने प्राचार्यांना गाठले आणि खरा प्रकार सागितला.

दुपारपर्यंत रेणुका, आदितराव गायकवाड, उमाजीराव आवचिते, जीवाबाई माग ही सगळी महत्त्वाची माणस सगमपुरात दाखल झाली. बरोबरच कमिशनर साहेबाचा फोन पोलिस इन्स्पेक्टरकडे खणाणला आणि तपासाची चक्रं जलदगतीनं फिरली. फुलाला गाठून सगळी हकीगत समजली. स्वत: प्रा रेणुका फुलाला विचारीत होती. रेणुकाला पाहताच फुला ओक्साबोक्सी रडू लागली.

'ताई मी लई चुकले!'

'अग पण तू पोलिसांना सागितल काय?'

'जमदग्नीसाहेबानी माझी आब्रू घ्यायचा प्रयत्न केला म्हणून सागितलं.'

'का?'

'मला बापूरावानी आणि भोम्यानं दम दिलता का तू जर असं सागितले नाही त रेणुकेला जीवच मारू! मलायबी मारून टाकू म्हणाले.'

'पण जमदग्नी तरी तुझ्याकडे कसे आले?'

'साहेब आलेच नव्हते. बापूरावान पोराना पाठवून कायबाय सागून बोलिवलं. आपल्या घरी त्ये समदे आले. बापूराव, भोम्या आन आणिक तीन जण. भोम्या ना बया कायबाय म्हनाया लागला.'

'अस? काय म्हणाला भोम्या?'

'मन, तू ही ती गुलछडी कवाशिक येणारहे? तिला नीट बापूरावाकं आणायच. बापूराव राड डुनार तिला. मी घावरून ग्येले. तवा भोम्या गेला आन बापूराव आत आला. आन माझ्या आगचाटी याया लागला. मी बाहेर पडून जाया लागले त भोम्यान मला मुस्काटात लावली आन आत ढकलल. मन, झोप. लय साविञी म्हनारहेस झोप...!'

'बाहेर भोम्या आन आत बापूराव, मी पारच घावरून ग्येले. बापूराव मझ्या उजूक आगचटी याया लागला. मला त्यानं कवळीत धरलं असन...'

'आणि मग?'

'बया त्यान पार माला उखलून तुमच्या पलगावर दणाकलं आन तो माझ्या आगचटी आला. मी वराडले आन तवाच साहेब आले. त्यानी बापूरावाला कवळी घातली. तशीच मी बापूरावाला हिसडा दिला आन त्येच्या हाताला चावले. बया त्याला काह्याची मी सायबाच्याच हाताला चावले! साहेब आराडले तसे भोम्या आन समदेच सायबाच्या आगावर आले, लईना बुनाकल बया! आन मला दम दिला का तू सायबाचं नाव ठाण्याव सागायच. नाहीत....'

'मग?'

'सायब पार निपचित पडल्यावर बापूरावानं पोलिसाला बोलिवला आन मग आमाला चौकीव नेल. मला बाहेर बोलिवल. लुगडंचोळी दिली. दोन शभरा-शंभराच्या नोटा हातात दिल्या. आगावरली पागुरणं सोडून घेतली आन भोम्याला सगट दिऊन थेट मोटार आड्यावर लावल.'

इन्स्पेक्टरसाहेब त्याची ही प्रश्नोत्तरे टेप करून घेत होते. रीतसर जाबजबाब झाले. बापूरावाला अटक करून जामिनावर सोडले. आदितराव गायकवाड आणि प्राचार्यांनी वर्तमानपत्राना पोलिस इन्स्पेक्टरच्या वतीने कळविले.

दुसऱ्या दिवशी वार्तागगेत प्रा जमदग्नीची सगळी बेअब्रू धुऊन निघाली. याप्रकाराने रेणुका मात्र फारच होरपळल्यासारखी झाली तिन समाजाच्या वतीनं प्रा. जमदग्नी आणि प्राचार्य स्वामी विवेकानंद कॉलेज यांची माफी मागितली.'

'आपलीच माणस अस करू लागली तर कस होणार?' रेणुका आदितरावाना म्हणत होती.

'रेणुका, अग हे आपल्याच समाजात आहे असं नाही. 'घरचा भेदी' हा आपल्या देशाला शाप आहे म्हणून का आपण आपलं ध्येय सोडायचं?'

□

अखिल महाराष्ट्र मातग महासघाची परिषद भरविण्याविषयीची मुबईत चाललेली बैठक संगमपुरात अशी सपली. अखेर सगमपूरच्या स्वामी विवेकानद कोलेजमध्ये मातग महासघाची परिषद भरवायचे ठरविले. प्रा. जमदग्नी बेअब्रू प्रकरण त्याच्याच कॉलेजच्या प्रागणात

महासघाची पहिली परिषद घ्यायचे ठरविण्याने, परिषदेच्या बातमीत विरून गेले. रेणूका पुन्हा कामाला लागली

¤

बापुराव आवचिते आता उभा पेटला. कुत्र्यासारखा पिसाळला· तेवढात भोम्या पिसाट बनला. 'तुहायला त्ये आपल्याला सुइच जगू देणार नाहीत ह्यांचा पारच काटा काहाडला पायजे !' बापूराव भोम्याशी बोलत होते

'त्ये आपल्याकड लागल. अव याचा तर काटा निघलच पण उजूक कुणाची वासना होणार नाही तुम्हाक आन मह्याकं वर डोळा करून पाह्यला.' भोम्या आणि बापूराव पुन्हा एकदा प्रतिज्ञित झाले.

हे असलं पिसाटपण सघटनेचे लचके तोडून सघटनेला घायाळ करीत होत.

## : ७ :

**प्रा.** जमदग्नीचे वडील गंगाधरपंत आणि निर्मलाताई मुद्दाम जमदग्नीला पाहायला आले होते. दोघेही ठाणे जिल्ह्यातल्या वनवासी कल्याण आश्रम केंद्रावर सेवाभावी वृत्तीने कार्यकर्ते म्हणून जाऊन राहिले होते. खरं तर गगाधरपत जन्मभर सातत्याने हेच कार्य करीत आले होते. हायस्कुलात शिक्षक म्हणून काम करतानाच त्याचे सामाजिक कार्य नेटाने चाललेले असायचे. प्रा. जमदग्नी सघ प्रचारक म्हणून थाबले आणि प्राध्यापक म्हणून त्यानी काम सुरू केले तेव्हा गंगाधरपंतांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती स्वीकारली आणि वनवासी कल्याणआश्रम केंद्राची वाट धरली. निर्मलाताई आपल्या उगा त्याच्या बरोबर पतीमागे पतिव्रता ! एकुलत्या एका मुलान सामाजिक कार्यात उडी घेऊन जीवन झोकून द्यावे असे त्याना वाटत नव्हते; पण प्रा. जमदग्नी अजून ऐकत नव्हते. निर्मलाताईंच्या हट्टानेच त्यानी सघ-प्रचारकाचं काम दोन वर्षांत थांबविलं होतं. पण अजून लग्न करून संसार थाटावा असा निर्णय त्यानं घेतला नव्हता. गगाधरपंत त्याच्या बाबतीत आग्रही नव्हते. प्रा. जमदग्नीला त्यांनी पूर्ण स्वातन्त्र्य दिलं होत. आत्ता संगमपूरला आल्यावर निर्मलाताईंनी गगाधरपतासमोर मुद्दामच जमदग्नीच्या लग्नाचा आग्रह धरला होता. पण गंगाधरपतानी ते त्याचं त्याला ठरवू दे म्हणून दुसऱ्याच दिवशी पुन्हा केंद्रावर प्रयाण केले होते. निर्मलाताई मात्र निदान काही दिवस जमदग्नीजवळच राहण्याच्या इराद्याने आल्या होत्या. त्यांच्या येण्यानं प्रा. जमदग्नीच्या खोलीच स्वरूपच पालटल होतं. ब्रह्मचाऱ्याची खोली आता गृहस्थाची खोली वाटत होती.

प्रा. जमदग्नीनी निर्मलाताईंशी प्रा. कु. रेणुकाची ओळख करून दिली होती. निर्मलाताईंना रेणुकाच फारच कौतुक वाटलं. त्यांनी मोठ्या आस्थेवाईकपणानं तिची चौकशी केली होती. रेणुकाचं आणि त्याचं चागलंच सूत जमलं होत. रेणुका मातग समाजाच्या संघटनेचं काम करते आहे, त्यासाठी तिनं जीवन झोकून द्यायचं ठरवलं आहे हे ऐकून तर त्याना तिच्याविषयी विशेष प्रेम निर्माण झालं होतं. त्या नेहमी म्हणत, 'आदिवासी, 'दलित, पीडित, उपेक्षित याच्यासाठी तुम्ही कार्यकर्ते खूप काम कराल पण त्याच्यातले कुणी धडपडताहेत का त्याच्या स्वतःच्या उद्धारासाठी ?' त्याच्या या प्रश्नाला रेणुकानं सुखद उत्तर दिलेल होतं.

मातंग समाजाच्या अखिल महाराष्ट्र परिषदेच्या निमित्ताने प्रा. रेणुकानं 'केरसुणी' नावाचा लिहिलेला लेख आज वर्तमानपत्रात झळकला होता. खर तर पुण्याच्या वर्तमानपत्रात दोन दिवसापूर्वीच येऊन गेला होता. परतु मुबईच्या वर्तमानपत्रात त्याला विशेष स्थान देऊन प्रसिद्धी मिळाली होती. निर्मलाताई मुद्दामच मन पूर्वक तो लेख वाचीत होत्या—

'केरसुणी 'नं मातंग महासंघाची समन्वयवादी भूमिका स्पष्ट केली होती— भारताच्या मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र आणि म्हैसूर प्रांतात आढळणाऱ्या मातंग जमातीची माहिती देताना तिनं महाराष्ट्राची तपशीलवार माहिती दिली होती—अस्सल मांग, बाळे, बुरूड, दवकर, डाकेलवार किंवा वाजंत्री, देसुर, दवडे, घोडके, ढोर, घडशी, होलगे, जिनगर, जिराइत, काकरमोची, नाडे आणि मागगारुडी असे पोटभेद दिले होते. आणि मातंग जातीनं हिंदुधर्माच्या वैभवात कशी भर घातली आणि सरक्षणात कसा सहभाग घेतला हे सगतवार पटवून दिले होते. भगवान परशुरामाच्या दीक्षेनं वाटाडे पहारेकरी, स्मशानरक्षक, देहदंडाधिकारी म्हणून समाजव्यवस्थेत आणि राजव्यवस्थेत पिढीजात महत्त्वाची कामे कशी करीत आले आहेत; ह्याचे स्पष्टीकरण केले होते. रेणुका मातंगी कशी झाली हे सागून मरीमातेचा देव्हारा सांभाळण्याचे महत्त्वाचे कार्य मरणाला सामोरे जात या समाजाने केले आहे, हे पटवून दिले होते. काळाबरोबर उद्योगधदे बदलत गेले. त्यातही दोर, नाडे, सुपली, करंडे, चट्टे, तट्टे, केरसुण्या, शिकाळी, बाजा विणणे अशा दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या वस्तू अतिकष्ट करून पुरविण्याचे काम कसे केले ते स्पष्ट केले होते. आजच्या औद्योगिक प्रगतीच्या काळात, अणुयुगात, मातंगाची दुर्दशा वर्णन केली होतीच पण त्याचबरोबर मातगाचे समाजाशी होत आलेले वर्तन तिने स्पष्ट करून त्याकडे सबंध हिंदुसमाजाचे लक्ष वेधले होते. तिने लिहिले होते—समाजाच्या दृष्टीने महत्त्वाची कामे करीत असतानाच एकीकडे साऱ्या समाजातील घाण नष्ट करण्याचे काम करणाऱ्या चाडाळपणाचे व्रत यांनी घेतले आणि समाजाचे सर्वतोपरीने रक्षण केले. हिंदू समाजाचे अविभाज्य अग असलेल्या या समाजाला एकंदर हिंदू समाजाने मात्र केरसुणीचे स्थान दिले. झाडून झाले की केले कोपऱ्यात उभे ! दिवाळीच्या दिवशी नर्क झाडून काढणाऱ्या केरसुणीची लक्ष्मी म्हणून पूजा केली की समाजाचे औदार्य संपले. भगवान परशुरामानी समस्त समाजजीवनाला जी शिस्त लावली त्यात जंबऋषीपासून निर्माण झालेल्या टोळीला प्रतिष्ठापूर्वक स्थान दिले. पण अखेर मातंगाला समाजाने अंत्यजाचे स्थान दिले. समाजाने स्वत.च आपल्याच एका अगाला नासविले, नरकात लोटून दिले. स्वच्छता करणाऱ्यानाच अस्वच्छ म्हणून गावाबाहेर टाकले. पण मातग समाजानं आपलं कष्टाचं जीवन सोडलं नाही. मरणावर ते जगत राहिले. प्रसंगी स्मशानावर त्यानी आपली पोटं भरली; पण स्वतःला शूद्र म्हणवून घेतानाही देशाशी आणि धर्माशी कधी प्रतारणा केली नाही. कालौघात धदे बसले, इनाम जमिनी विकून टिकून संपल्या दारिद्र्य पदरी आले आणि ममाजाने

त्याचा उकीरडा बनविला. साऱ्या गावाची घाण मागवाड्यावर आली. दारिद्र्यात आणि गावाच्या घाणीतल गावगाड्यात राहून गावाबाहेरचं जीवन जगत असतानाही मागानी देवाचे देव्हारे मिरविले. शेंडीचा बुचडा बाधून धर्म पाळला. घराघरातली इडापीडा स्वत:च्या पदरात घेतली शेठ, सावकार, पाटील कुलकर्णी, सोनार, शिंपी, एकच का ? सर्वांच्याच धरापुढे वाजत्री वाजवून त्याचे वैभव प्रदर्शित केले. अशुभाला स्वत:मध्ये आसरा देऊन राष्ट्रातील शुभाला जागविले. सारे मुकाट सोसले ! इमानी कुत्र्याप्रमाणे ! आजही माग शात आहे. गावाच्या अगोदर सूर्याचं दर्शन घडत असतानाही लाचारीचे आणि जातिहीनतेचे हलाहल पचवीत स्मशानातील शिवाचे व्रत घेऊन गावाच्या पोटात रिचवून ते शिवाप्रमाणे स्वत:च्या गळ्यात सर्पाची माळ घेऊन इतरांच्या स्वागतासाठी वाजंत्री घेऊन उभे राहिले. हा महादेव साऱ्या गावगन्ना देवाची डक्केलवारी, भाटगिरी करीत राहिला. मातगातल्या या माणसांना माणूस म्हणून जगण्यालाही दारिद्र्याने नाकारले तेव्हा गुन्हेगारी केली तीही स्वत:च्याच तोडाला काजळ फासून नाही तर राख फासून, तेही खडोबा, म्हसोबा, अंबाबाई, बहिरोबा, विठोबा, यमाई, मातगी, मरीआई याचा जयघोष करीत. आपल्या देवाधर्माला न विसरता ! त्याच जीर्ण सर्वांच मरण अंगावर ओढून घेत. स्वत:ला मातीत गाडून घेऊन, मागाइतात ! काळ बदलला तरी स्वत:च्या हीन स्थानाची कधी किळस नाही केली. समाजाने किळस केली तरी मागांनी विद्रोह नाही केला. महंत ते मांग ! या मोठेपणाने ते जगले स्वत:च्या जातीचा तमाशा वेशीवर टांगून !

या बदल्यात त्याना मिळाली उपेक्षा ! पूर्ण उपेक्षा ! सूर्याची फुले हाती घेऊन दलितोद्धारासाठी आधुनिक मनूचा अवतार घेऊन आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकराना बुद्ध तेजान उजळल, पवित्र केलं; तरी मातंग मात्र बुद्धमताच्या पलीकडील अतिम सत्याचा जप करीत शिवपणाने राहिले ! समाजव्यवस्थेतून झालेल्या उपेक्षेन पददलित म्हणून जगताना समाजावर चिडून, समाजातल्या भुजगाना ठेचून धनधान्य पळविण्याचा उद्योग केला पण डोईवरले देवाचे देव्हारे मिरवून देवाचे डके वाजविण्याची डक्केलवारी सोडली नाही. सस्कृतीचं उपेक्षित अंग म्हणून जगतानाही राष्ट्राची शकल होऊ दिली नाहीत ! विद्रोहाची आग भडकली तरी विघटनाची वाट धरली नाही !

आता तरी एका बाजूला विद्रोहाचे ज्वालामुखी सगळीकडे उसळून राष्ट्र तुटण्याच्या मार्गावर असताना उपेक्षिताचे अतरंग जाणून त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण ह्या देशातली माणस बदलणार का ? पण असा प्रश्नसुद्धा मातग विचारीत नाहीत; कारण त्याच्याजवळ मुळी विचार करायला आणि विचारायला वेळच नाही. धर्माच्या शिवेवरच्याच उत्तरदायित्व आपणावर सोपवून ते श्रमानं शिणून धामाने उजळून निघाले, निघताहेत.

आनदाची गोष्ट ही आहे की, धर्मपीठाला आज जागृती आली आहे आणि राज्यपीठाचे लोकदेखील जागृत झाले आहेत. नाईलाजाने असो किंवा तुटू पाहणाऱ्या राष्ट्रास एकसध ठेवण्याचा इलाज म्हणून असो, त्याचे लक्ष मातग समाजाकडे, दलित, उपेक्षित पीडिताकडे जाते आहे. पीठाच्या गाद्या सोडून त्याची पायपीट सुरू आहे आम्हाला राष्ट्र तोडावयाचे नाही. ज्या समाजात आमची गोत्रे, सताने नादली, ज्या समाजात गावगाड्यात आमच्या मेहतरानी समाजाच नेतृत्व करीत गावगाड्याला गती दिली; त्या समाजात आम्हाला बदलत्या काळानुरूप एकसध समाजात बरोबरीच्या नात्याने आणि जबाबदारीने जगायचे आहे !'

हा तिचा लेख वाचताना निर्मलाताई तिच्या विचाराच्या उचीनं दिपून गेल्या होत्या. त्याच लेखाबरोबर लेखावरील उलटसुलट प्रतिक्रिया वर्तमानपत्रानी छापल्या होत्या. मातग समाजातील अनेक सुशिक्षितानी तिची प्रशसा केली होती तर विद्रोही दलित चळवळीने आगपाखड केली होती. निर्मलाताईंनी लेख वाचून सपविला तरी जमदग्नीचा पत्ता नव्हता. त्याचा स्वयपाक केव्हाच आटोपला होता. आज रेणुकाला त्यानी मुद्दाम जेवायला बोलावलं होत. त्याच्या हातचं जेवायचा तिचा केव्हढा हट्ट ! वाट पाहून त्या कटाळल्या. दुपारचे बारा वाजून गेले होते. त्या गॅलरीत आल्या आणि त्याच लक्ष त्या दोघाकडे गेलं. दोघ काही तरी बोलत बोलत येत होती. निर्मलाताई कौतुक-भरल्या नजरेन रेणुकेकडे पाहत होत्या. ती दोघं वर येताच निर्मलाताई म्हणाल्या ' रेणुका, दृष्टच काढली पाहिजे बाई तुझी !'

' का, का काय झाल ?' प्रा. जमदग्नीनी मिश्किलपणे विचारल.

' छान माडलायेस हो लेख ! मी सगळा वाचून काढला. मातग समाजाची सगळी माहिती तर आहेच पण त्यातले विचार खूपच चागले माडलेस तू !'

' आभारी आहे हं आई तुम्ही लेख वाचला, किती बरं वाटल मला !'

' बर तुम्ही बसा .मी आत्ता तयारी करते हं जेवायची. आज तुझ्या आवडीचा मटारभात केलाय !'

' आय्या हो !'

' रेणुका तू सूडाच चक्र थाबविण्याचं महनीय कार्य करते आहेस !'

' झाली मला हरभऱ्याच्या झाडावर चढवून द्यायला सुरुवात !'

' अगं खरच सागतोय मी. दलित साहित्य आणि दलित चळवळ विद्रोहावरच उभी नाही का ? त्यातून काय निर्माण होतय ? सूडाची भावना ! दलितांमध्ये सवर्णांविषयी !'

' विद्रोह केल्याशिवाय समाजाचे डोळे उघडले नसते हेही खरंच !'

' हे बघ तू म्हणतेस ते खरंच; पण हा विद्रोह मूलभूत संस्कृतीशी आणि आतरिक मनाशी साधला गेला असता तर चित्र वेगळे झाले असते. या विद्रोहाला आर्थिक दुर्बलतेच्या दरीतून स्फोटीत झालेल्या उद्वेगाचीच धार अधिक आहे !'

' आणि युद्ध मात्र पेटले आहे सामाजिक सघर्षाचे, समतेकरिता !' रेणुकानं मध्येच पुष्टी जोडली.

' किती बरोबर बोललीस तू. सामाजिक समतेच्या नावान जयघोष चालू असतानाच दुहीची, असतोषाची बीजं मात्र पेरली गेली ! दलितस्थानाच्या मागणीपर्यंत विचाराची घसरण झालीये. हे सूडाचं चक्र थाबलं पाहिजे !'

' अरे जमदग्नी, जेवणार आहात आता की चर्चाच करीत बसणार आहात !' निर्मलाताई म्हणाल्या.

'आय्या ! खरंच आई, मी मदतसुद्धा करायला आले नाही

तुम्हाला. बसले खुशाल गप्पा मारीत !' रेणुका खजिल होत म्हणाली.

'अगं जिव्हाळ्याचा विषय असला की तहानभूक विसरत माणूस !'

'आई !' रेणुका एकदम चोरट्या नजरेन जमदग्नीकडे पाहत लाजत म्हणाली.

'मग, एव्हढ लाजायला काय झालं ? मी आपली सहज बोलले हो !'

'बरं, चल बघू आई. जेवू या !' जमदग्नी म्हणाला.

जेवता जेवता पुन्हा सुरुवात झाली.

'तुम्हाला दुसर काही सुचतं की नाही ! ह्याचही असच चालायचं जन्मभर ! आता बसलेत वनवासी कल्याण आश्रमाच्या केंद्रावर जाऊन. माझी आपली त्याच्याबरोबर नळ्याची यात्रा !'

'आई, मग काय बिघडलं त्यात ?'

'अग पण जन्मभर तेच ! कटाळा आला आता ! काही देवधर्म, तीर्थयात्रा आहे की नाही ?'

'समाजसेवेतूनच मिळवितात ते हे सारं !'

'वा ! याच्या संगतीत राहून तू सुद्धा अगदी तशीच बोलायला लागलीस हं ! उद्या तुझं लग्न झालं आणि नवरा जर दिवसदिवस बाहेर राहू लागला तर काय वाटेल ?'

'मी मुळी लग्नच करणार नाही !' रेणुका जमदग्नीकडे पाहत लाजत म्हणाली.

'वा !' रेणुका तू अगदी माझ्या मनातल बोललीस ! मी सुद्धा—'

'वा वा ! बोलेल ना मनातल. बसा जन्मभर सघटन सघटन करीत. लोकांना आहे का काही त्याचं ? तुमची जळताहेत जीवनं !'

'आई काहींची जीवनं जळतात तेव्हाच बाकीच्याची उजळतात ना ?'

'पण मी म्हणते ससार करता करताही येत करता हे सारं.'

'पण आई—'

'पुरे समजलं ! ए पोळी घे ग. बोलण्याच्या नादात जेवली नाहीस अगदी. भातही एव्हढासा खाल्लास !'

'आई, तुम्ही एव्हढं म्हटलत की पोट भरतं बघा !'

...............

दोघांची चर्चा अशी तासंतास रगायची. मन जुळायची !

## : ८ :

विठाबाई आणि विठ्ठलराव सगमपुरात येऊन राहिले होते. रेणुकेचा संघटनेचा व्याप वाढत होता. कौतुकाबरोबरच काळजीही वाटत होती,

'फुला, अग अजून कसा रेणुकेचा पत्ता नाही ?'

आतबाहेर करणाऱ्या फुलाला विठाबाईन विचारल.

'कार्यक्रम आखायचा असेल काही.' विठ्ठलराव सिगारेटचा झुरका ओढीत म्हणाले.

'मावशी ती ना ताई आली आन परशुराम बी तीच्या सगट.' तेव्हढ्यात फुला म्हणाली.

'रेणुका किती ग उशीर ?' रेणुका घरात येतानाच विठाबाईन विचारलं.

'अग, फकीरबाबा आणि जमदग्नीबरोबर शकराचार्यांच्या दर्शनाला गेलो होतो. परशुरामनं आमत्रण दिलेय त्याना अकोलपाटच्या मागवाड्यात येण्याचं. फकीरबाबानी सगमपूरच्या मांगवाड्यात कार्यक्रम ठरवलाय त्याचा.'

'वा वा ! असे कार्यक्रम झाले तर सारा मागवाडा उद्धरून जाईल.' विठ्ठलराव रेणुकेचं कौतुक करीत म्हणाले.

'अग पण तो बापूराव आवचिते आणि दलितमुक्ती मचचे लोक काही निदर्शन करणार आहेत म्हणे.

फकीरबाबानी निमत्रण देता कामा नये असा निरोप पाठवला होता त्यांनी.'

'ताई चहा ठिवू का ?' मधेच फुलान परशुरामकडे पाहत विचारल. विठ्ठलरावाच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही.

'ठेव, ठेव. तुझ्या परशुरामला चहाशिवाय जमत नाही !' विठ्ठलराव हसत हसत फुलाला खिजवत म्हणाले. तशी दोघंही लाजली.

'का रे परशुराम लाजलास ?' विठ्ठलरावानी आणखी खिजवलं.

'छ्या छ्या मी कह्याला लाजू ?' परशुराम आणखीच खजिल होत म्हणाला. फुला आतच पळाली.

'का रे करतोस लग्न फुलाशी ?' विठाबाईनी विचारलं.

'नाय बा !'

'हा हा नकू करूस. मी कुठय तुह्या माग लागली. तशी राहीन !' फुला तरातरा बाहेर येऊन फणकाऱ्यान बोलली.

'अरे वा ! बरंच पुढं गेलय तुमच प्रकरण ! बघ बघ कशी म्हणत्ये, करीन त तुझ्याशीच !'

'हा मलाय बी करायचच नाही लगीन !'

'बर बरं फुला. अग तू चहा आणत होतीस ना की, परशुरामला पाहून विसरलीस ?' रेणुका तिला आणखी चिडवत म्हणाली.

'या बया इसरलेच !' फुला आत पळाली. परशुराम चोरट्या नजरेन तिच्याकडे पाहत होता.

चहा झाला. सध्याकाळच्या बैठकीच्या दृष्टीनं काही कामं रेणुकान परशुरामला सागितली.

¤

दुसऱ्या दिवशी सगमपूरच्या मातंगवाड्यावर फकीरबाबा, रेणुका, परशुराम, जीवाबाई पोहचले तेव्हा महामरी मातगीच्या देवळासमोरच्या पटागणात गर्दी दिसली. बाजूला बापूरावाची मोटारसायकल उभी होती. दलित मुक्ती मचाचे पवार भाषण देत होते. मोठ्या पोटतिडकीने ते बोलताहेत हे त्याच्या हावभावावरून, हातवाऱ्यावरून लक्षात येत होत.

'फकीरबाबा आपण जायच का ?'

'नको बया ! उगा भाडणाला कहार. बोलू दे त्याला काय बोलायच ते.' जीवाबाई म्हणाली.

तेव्हढ्यात घोळक्यातल्या कुणाचे तरी लक्ष फकीरबाबाकडे गेले.

त्यानं एकाला खुणावले. सुगावा लागला. वीजखांबावरच्या दिव्याच्या प्रकाशात नजरा चाळवल्या. तसं बापूराव आवचित्यानं तिकडं पाहिलं आणि तो चपापलाच. तेवढ्यात पवाराचं भाषण संपलं आणि त्यानी प्रश्न विचारण्याच आवाहन केल.

'अव पवार, आपल्या पायानं सीता देवबाप्पा शकराचार्य मागुडघावर आल तर आमाला काही लाजलजा पावनचार हाये का नाही ?' त्यावर सर्वांनी माना डोलावल्या. 'खरय बा !'

'आन आता फकीरबाबानं त्येला मागुडघावर बोलावलं म्हनल्याव कसं काय व ?' दुसऱ्यानं म्हटल.

'कोण देवबाप्पा तो शकराचार्य सोवळवाला ? आरे या देवबाप्पानी आम्हाला पायदळी तुडवलं', आणि पवार एकदम कविता बोलायला लागले—

त्यानी फुलं वेचली तेव्हा
आम्ही गोवऱ्याच वेचल्या
सरणावर मोक्ष त्याना मिळताना
गोवऱ्याची राखच होत होती
तर—
आम्हाला मोक्षवाट दाखविताना
गोवऱ्या कोण होणार ते सागणार ?

पवार जीव खाऊन बोलला. पोरांनी टाळ्या दिल्या आणि पवाराला पुन्हा पट्टी लागली. आता मात्र जीवाबाई थाबायला तयार नव्हती. ती तावातानं पुढं झाली.

'अवऽपवार, कशाला त्या पोराच्या डोक्यात राख घालता, तुमच्या फुटक्या नशिबाच्या कविता सागून ? अव, राजवाड्याचा बुद्धवाडा झाला तरी हडकी हाडवळा सोडल्या तुम्ही? बुद्धाचं नाव घेत बोकडाच्या नळ्या तोडतांना शरम नाही वाटली ! व बुद्धवाड्यातून शाळा-कॉलेजला जाताना वाटेवरल्या मांगुडघावर थुकून जातांना डोस्क का शेतखान्यात ग्येलत ?'

'हा, जीवाबाई मी आणलय पवाराना मांगुडघावर. काय बोलायचं माझ्याशी बोला. आम्ही या सगमपूरच्या मागुडघात शकराचार्यांचा कार्यक्रम होऊ देणार नाही. काय करायच घ्या करून !'

'जीवाबाई, आवचिते कशाला भाडता ? मागवाड्यातला एकही माणूस बोलत नाही काही आणि तुम्हीच आपापसांत बोलता ? आपण त्यानाच विचारू, काहो पवार ? पोरानो शंकराचार्यांना मी बोलावलं मागुडघावर, अपराध मी केला असन, तुम्ही ठरवा कार्यक्रम घ्यायचा का नको ?' फकीरबाबा बोलला.

'व्हवद्या व्हवद्या !' पोरं एकमुखी ओरडली.

'व्हवूद्या नाही झालाच पायजे' एकानं उठून ठणकून सागितलं. पोरं पवाराचं भाषण विसरली होती.

'बापूराव, पवार, हे बघा मागुडघाचं मत आहे तर कार्यक्रम होऊ द्या. तुम्हीही या कार्यक्रमाला. आमदार आणि तुमचे नगराध्यक्ष सुद्धा येणार आहेत.' फकीरबाबा शात पण आग्रहीपणे म्हणाला.

'फकीरबाबा, चुकीच्या मार्गाने घेऊन जाता आहात तुम्ही मांगाना. आम्ही ते सहन करणार नाही. आम्ही निदर्शनं करू !' पवार म्हणाले.

'अवो या टवळीचं डोस्कं असेल हे.' बापूराव बोलला मात्र...

'हा, बापूराव तू काय लायकीचा हायेस सगळ्या मांगुडघाला मालुमहे. अरं आया-बहिणीची ओळख नाही तुला: फडातल्या पोरी लॉजवर बोलावतो तू, तू काय मार्ग दाखवणार ?'

'बर बर बघून घीन ! चला पवार.' आपल्या मोटरसायकलला कीक मारत बापूराव बोलला आणि त्यान काढता पाय घेतला.

मग फकीरबाबानी सगळ्या लोकाना बोलवायला सागितलं, उद्याच्या कार्यक्रमाची बैठक घ्यायची होती.

'मिटींग बसणार नाही,' मागाचा एक म्हातारा म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून फकीरबाबा म्हणाला, 'का ?'

'अव, पोटाला चार घास खाल का नाही ?'

'खाऊ ना ! वा वा ! जरूर' रेणुका म्हणाली.

मग जेवणखावणं झाल्यावर पुन्हा मिटींग बसली. तेवढ्यात मोटरसायकलचा आवाज आला. मोटरसायकल जवळ येऊन थांबली आणि जमदग्नी खाली उतरला.

'उद्या कार्यक्रमावर दगडफेक होण्याची शक्यता आहे.' जमदग्नीनी सागितले.

'मग आम्ही का मेलो काय ? जीवच मारू एकेकाला' एका तरुण हमालाने ओरडून सागितले.

'एकदम असं काही ठरवू नका; पण आपणास सावधानतेनं राहायला हवं. मी आत्ताच आमदाराना भेटून आलो.'

'काय म्हणाले आमदार ? रेणुकेने आतुरतेने विचारले.

'तणाव वाढणार असेल तर शकराचार्यांना मांगवाड्यावर नेण्यापेक्षा त्यांच्या निवासस्थानीच मागवाड्यातील लोकानी जावं, असं म्हणाले. मी विचारून येतो असं म्हणाले.'

'काय रे काय करायच ?' फकीरबाबानी सर्वांना विचारल.

'कारेक्रम व्हाया पाजेल !' सर्वांचच मत दिसलं.

मग फकीरबाबा, रेणुका, परशुराम, जमदग्नी, मागवाड्यातले चार कर्ते लोक सगळ्यानीच आमदाराकडे जायचं ठरवलं.

¤

दुसऱ्या दिवशी मागवाड्यात जणू दिवाळी साजरी होत होती. मोठा समारंभ ! रस्त्यापासून मातगीच्या देवळापर्यंत आबाडीची तोरण बाधली होती. दुतर्फा आबाडी घायपाताच्या झिरमिळ्या सोडल्या होत्या. घायपाताचे खुट दोन्ही बाजूला जागोजाग लावले होते. बाबू रोवून कमानी उभ्या केल्या होत्या. घराच्या कोयंड्याना आब्याची तोरणं लावली होती शेणसडे पडले होते. रागोळ्या रेखल्या होत्या. मातगीच्या ओट्यावर सभेची तयारी केलेली होती. खुर्च्या, टेबले, शकराचार्यांसाठी आसन, लाऊडस्पीकर सारं काही आणलं होतं. लाऊड स्पीकरवरून लताबाईंच्या आवाजात गीतेचे श्लोक गायिले जात होते. मांगवाड्याच्या बाहेर शकराचार्यांच्या स्वागताची तयारी केली होती. वाजत्री, डफडे, पिपाण्या, बॅंड तयार होते. कडक लक्ष्मीवाले आसूड घेऊन उभे होते. एका बाजूला बाईच्या डोक्यावर मऱ्याईचा देव्हारा होता, दुसऱ्या बाजूला पाटीत मातगीचा लाकडी मुखोटा होता. दोघींनी कलश डोक्यावर घेतले होते. चार जण हार घेऊन उभे होते.

सोहळा पाहण्यासाठी गावातले बरेच लोक मुद्दाम आले होते.

व्हीडिओ फिल्म कॅमेरामन, पत्रकार, जातीने विशेष कुतूहलाने हजर होते. आदल्या दिवशी सागितल्याप्रमाणे पोलिस बदोबस्त कडक ठेवलेला होता.

एकापाठोपाठ दोन मोटारी आल्या. आमदार, नगराध्यक्ष आले. आणखी काही स्थानिक पुढारी आले. दुसऱ्या मोटारीतून शकराचार्य उतरले. जमदग्नी त्याना घेऊन आला होता. शंकराचार्य खाली उतरताच जयघोष निनादला. शकराचार्यांनी हात उचावून सर्वांना आशीर्वाद दिला. हार घालून मान्यवराचे स्वागत झाले. पाच जणीनी ओवाळले. व्हिडीओ फिल्म घेतली जात होती. कॅमेरे दृश्ये टिपत होते. वाजंत्री वाजू लागली. कडकलक्ष्मीचे आसूड कडाडले. आणि शंकराचार्य मातगवाड्यात निघाले ! शंकराचार्यांबरोबर दडधारी होते. फकीरबाबा आणि वाजत्र्यामागे शंकराचार्य आपला धर्मदड घेऊन चालले होते पाठोपाठ आमदार, नगराध्यक्ष, पुढारी मडळी, जमदग्नी, परशुराम, जीवाबाई, फुला आणि रेणुका निघाले होते. त्याच्याबरोबर कलशधारी स्त्रिया होत्या.

शंकराचार्य प्रसन्न मुद्रेने सर्व मातंग बाधवाना आशीर्वचन देत पुढे निघाले ते थेट मातगीच्या मदिरापाशी. त्यानी मातंगीला पुष्पमाला अर्पण करून नमस्कार केला. मातंगीचा उधेकार झडला. शकराचार्यांचा जयघोष झाला. सभास्थानी सर्व स्थानापन्न झाले आणि *आमदाराच्या अध्यक्षतेखाली शंकराचार्यांच्या प्रवचनाला सुरुवात* झाली.

शात स्निग्ध आवाजात शकराचार्यांचे प्रवचन चालले होते आणि श्रोत्याचे श्रवण तृप्त होत होते. शकराचार्यांनी मरीअम्म, रेणुका, मातगी, येल्लम्म, मातामरी, मरीआई या सगळ्या देवतांविषयीच्या पुराणकथा थोडक्यात सांगितल्या. मातगाचे प्राचीन काळापासूनचे समाजातील महत्त्वाचे स्थान विशद केले. मातग किंवा अन्य दलित समाजांना कालौघात शूद्रता, तुच्छता कशी प्राप्त झाली, ती कशी खोटी आहे हे स्पष्ट केले आणि अत्यंत मनमोकळेपणाने ते म्हणाले, 'सनातन हिंदू धर्म आपण सगळेच परमेश्वराचे अश आहोत एवढेच काय पण परमेश्वररूप आहोत असे सांगतो. जातीव्यवस्था कालौघात समाजाच्या नाममात्र स्वार्थासाठी निर्माण झाली आहे. ती पूर्णत: मोडलीच पाहिजे. मी आणि तुमच्यातला प्रत्येकजण एकच आहोत. मधल्या काळात आम्ही चुकलो. आपल्याकडे आलो नाही. आम्हाला क्षमा करा. आता आम्ही आलो आहोत ते आमच्या खाद्यावरची धर्माची धुरा आपल्या खाद्यावर देण्यासाठी. खरं म्हणजे धर्माचे रक्षण आपणच केले आहे. आमच्यावर काही लोक चिडतात. चिडले आहेत. आमच्याकडून त्याच्यावर अन्याय झालाय. आता होणार नाही. आपण अवघे हिंदू एकच आहोत. त्यात लहान मोठा कोणी नाही. आपापल्या कर्माचं फळ प्रत्येकाला ठेवलेलं असतं म्हणून लहानमोठेपणाचा आभास निर्माण होतो. रुसलेल्या आमच्या बाधवाना आम्ही असे म्हणू, आपल्याला रूसण्याचा अधिकार आहे. आपण आईवर रूसतो म्हणजे तिला मारून टाकीत नाही. पुन्हा लडिवाळपणे तिच्याकडे जातो. कालौघात अत्यत कठीण परिस्थितीतही तुम्ही धर्माचे पालन केले आहे, करीत आहात. आता रुसवा सोडा आणि आणि आपल्या मातेची शकल होऊ देऊ नका. हिंदू धर्म आपली माता आहे. माता कुटुबाचे पालन करते. ती कधी दुबळ्या मुलांना त्रास होऊ देत नाही. त्रास देतात ती आडदाड मुलं. पण ती आपली भावडेच ! त्यांना पश्चात्ताप झाला आहे त्याना क्षमा करा. धर्म एकसध ठेवा. आपले ऐक्य राहिले की राष्ट्र एकसंध राहील. भारतात राहणारे सगळेच हिंदू आहेत. मुसलमान, ख्रिश्चन पथानुयायी हे सुद्धा खरे हिंदूच होत. कारण हिंदू तत्त्वज्ञानाला कोणीही छेद दिलेला नाही. सगळे धर्मपथ त्या हिंदू धर्माच्या शाखाच आहेत. भारतात जन्मलेल्याचा वेगळा पंथ, धर्म असू शकत नाही. ते सारे सहृदयी संस्कृतीचे पायिकच होत !' शातपणे शकराचार्यांचे बोलणे झाले. जयघोष निनादला.

अध्यक्षपदावरून आमदार तिटम्यानी राष्ट्रीय एकात्मतेसाठी जगद्‌गुरू शकराचार्यांची सद्‌भावयात्रा किती महत्त्वाची आहे ते पटवून दिले आणि तेवढ्यात कोणीतरी एक चिठ्ठी शकराचार्यांना आणून दिली. शंकराचार्यांनी स्वत. चिठ्ठी वाचली. त्याच्या चेहऱ्यावर मंद प्रसन्न हास्य उमटले. चिठ्ठीत लिहिले होते– 'दलिताशी रोटीबेटी व्यवहार करावयास शकराचार्यांची मान्यता आहे काय ? जाती तोडण्याचा तोच एक उपाय आहे असे वाटत नाही काय ?' चिठ्ठी वाचून होताच शकराचार्य पुन्हा बोलू लागले. 'सनातन हिंदू सस्कृतीमध्ये वर्णाश्रम पद्धती होती ती केवळ कार्य-विभाजनासाठी. सोयीसाठी. अन्यथा प्रत्येक जातीने आपली जातकुळी सांगताना वेदकालीन ऋषीशी सबंध जोडला नसता. मातग समाजही जमदग्नीऋषी किंवा जंबऋषीशी आपले नाते सागतोच की नाही. जातीयता ही भारतीय सस्कृतीला मध्यकाळात लागलेली कीड आहे. पूर्वीच्या पुराणकथेतून जातीचे नव्हे तर व्यवसायाचे उल्लेख आहेत. योग्य स्त्री-पुरुष जोडा असेल तर लग्नास सर्वांची मान्यता आहेच. वेदपुराणकाळीही अशी मान्यता होती. मग रोटी व्यवहाराच्या मान्यतेचा प्रश्न येतच नाही !' शंकराचार्यांच्या उत्तराने आनंदीआनंद झाला.

'अहो मग ते समोर बसलेले प्रा. जमदग्नी प्रा. रेणुकेशी लग्न करणार का ? विचारा विचारा !'

दूर जमावातून एकजण उभा राहून मोठ्याने ओरडला आणि त्याच्या ओरडण्याला अचानक सर्वांनी टाळ्या वाजवल्या. मोठाच पेच उभा राहिला. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर !' असा प्रसग.

'त्या दोघाची एकमेकाला समती असेल तर आम्ही त्याना आशीर्वाद देऊ !' शकराचार्य म्हणाले.

'बोला जमदग्नी बोला ! आता गप्प का ?' आरोळी उठली आणि एकदम अंडी आणि दगड कागदाच्या बोळ्यातून जमदग्नीच्या अंगावर येऊ लागले. पोलिसाची धावपळ झाली. पण जमदग्नी शातपणे उभे राहिले. आणि एकदम समुदाय शात आणि गभीर झाला–

'मी लग्न न करता समाजकार्य करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे तरीसुद्धा त्या प्रतिज्ञेला स्मरून सागतो आणि पू जगद्‌गुरू शंकराचार्यांच्या साक्षीने सांगतो. एकात्मतेची सुरुवात म्हणून मी लग्न कराव अशी सर्वांची आज्ञा असेल तर मी प्रा. रेणुका याच्याशी विवाह करावयास तयार आहे !' आणि त्याच्या उद्‌गाराना टाळ्याचा कडकडाट झाला.

'रेणुकाताई बोला !' एकच आरोळी उठली. रेणुका गोंधळून गेली. काय बोलावे ते तिला कळेना. अखेर ती उभी राहिली तेव्हा ओरडा थावला.

'मी सर्वांच्या इच्छेविरुद्ध नाही!' रेणुका अगदी लाजून चूर होत म्हणाली.

विक्षेप आणू पाहणाऱ्यांची थोबाडे बंद झाली.

¤

वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी यानी या समारंभाच्या प्रसिद्धीला विशेष महत्त्व दिले. निरनिराळ्या पक्षोपपक्षानी जगद्‌गुरू शंकराचार्यांच्या या सद्भाव-यात्रेचे विशेष स्वागत केले. दलित मुक्ती मंचाच्या पत्रकात मात्र या घटनेचे विकृत विश्लेषण केले होते— 'धर्मपीठाच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाल्याने आता शंकराचार्यांनी हे उपक्रम सुरू केले आहेत. वर्षानुवर्षे आणि पिढ्यान्‌पिढ्या दलित उपेक्षित होते. सामाजिक अन्याय सोसत होते त्यावेळी हे शंकराचार्य आपल्या पीठांवरून शिवाशिवीचा खेळ खेळत होते. उशिरा का होईना आमची दखल त्यांना घ्यावी लागली हा दलित चळवळीचा विजय आहे. विद्रोहाचा विजय आहे!'

या कार्यक्रमाने पुन्हा एकदा मातंग समाजाचा विचार दलित चळवळीना करावा लागला. दलित मुक्ती मंचच्या पुढाऱ्यानी आदितराव गायकवाडाची मुंबईत भेट घेतली. पुण्यातल्या कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या. दलित मुक्ती मंचपासून मातंग समाज दूर असू नये असे नेटाने प्रयत्न सुरू झाले. विश्व हिंदू परिषदेवर जोरदार आगपाखड झाली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेने मातंग महासघाच्या कामास अधिक गती मिळाली.

## : ९ :

संगमपुरात मातंगवाड्याच्या साक्षीनं शंकराचार्यांनी रेणुका आणि जमदग्नीला आशीर्वाद देऊन एक सभा जिंकली. पण रेणुका आणि जमदग्नी मात्र चांगलेच अडचणीत आले होते. दोघंही खरोखरीच मनाने जवळ आले होते खर पण पतिपत्नी या दृष्टीनं त्यानी एकमेकाचा विचार केला नव्हता. त्या दोघाच्याही घरात मात्र वादळ निर्माण झालं होतं. जमदग्नीच्या आईला एका बाजूनं जमदग्नी लग्नाला तयार झालाय याचा आनंद झाला होता तर दुसऱ्या बाजूला जमदग्नी काय भलतच बोलून बसला असं झाल होतं. 'धरलं तर चावतंय सोडल तर पळतय!' अशी काहीशी अवस्था जमदग्नीच्या आईची झाली होती. त्यातच जमदग्नीच्या वडिलांनी पोरानं शंकराचार्यांच्या साक्षीनं जो निर्णय घेतला त्याची प्रशसा केली होती. जमदग्नीला रोज नवी मुलगी सागून येऊ लागली होती आणि नातेवाईकानी तर अमृताचे डोस पाजायला सुरुवात केली होती. आतरजातीय विवाहाचे आणि त्यातही मातंग समाजातील मुलीशी लग्न केल्याने होणाऱ्या सामाजिक परिणामाचे घोर चित्र उभे केले होते. जमदग्नी मात्र अगदी शांत होता. निर्मलाताई मात्र भलत्याच व्यथित झाल्या होत्या. जमदग्नीन आता एखादी ब्राह्मणाची चागलीशी मुलगी पाहून लग्न करून टाकावं असं निर्मलाबाईंनी त्याला परोपरीनं समजावून सांगितलं होतं. कॉलेजमधल्या लोकाना तर एक चर्चेचा विषयच झालेला होता. ते दोघे कुठे गेले, कसे जात होते, मोटरसायकलवर दोघे कसे गेले, कॉलेजला हे चालतं का?, बापूरावांनी बरोबर ओळखलं होतं, ह्या आणि अशा विषयावर चर्चा झडत होती. प्रा. जमदग्नी या संबंधात एक शब्दही बोलत नव्हता. रेणुकेशी वागण्यातही त्यानी कुठे काही बदल केला नव्हता. किंवा घडून गेलेल्या घटनेविषयी पुन्हा रेणुकेजवळही विषय काढला नव्हता.

¤

विठ्ठलराव आणि विठाबाई खरं म्हणजे रेणुकाचं कॉलेज सपल तेव्हापासूनच तिच्या लग्नाच्या मागे होत्या. त्यानी तिच्याजोगी एक दोन स्थळ पाहली होती; पण एक तिनं नाकारलं तर दुसरं त्यानं नाकारलं. रेणुकानं प्रा. जमदग्नीशी लग्न करायच ठरवल, हे ऐकून त्या दोघाना तसा धक्काच बसला. प्रा. जमदग्नी लग्न करतो म्हणून रेणुकेला फसवणार तर नाहीत असे त्यांना वाटत होते. विठ्ठलरावानी सगळी हकीगत आदितराव गायकवाडना पत्रान कळवली होती त्यानी एक दोन स्थळ पाहिल्याच त्याना कळवलं होतं. मातंग महासघाच्या परिषदेच्या निमित्तानं सामुदायिक विवाह होणार होते. त्याच वेळी जमलं तर रेणुकाचही लग्न करू अस त्यांनी पत्रात लिहिलं होतं. विठाबाईच रेणुकेकडे सारख टुटकणं चाललं होतं. जी गत रेणुकाची तीच गत राजीवची. तो आता 'एम. डी.' पूर्ण करीत होता. त्याला मुली सागून येत होत्या. विठ्ठलरावला मुलीसाठी कुणापुढ पदर पसरण्याचं कारण नव्हत. डॉ. गोखल्यांनी तर दोन्ही पोराना मनाप्रमाणे विवाह करा असं सागून चिथावल्यासारखच विठ्ठलरावाला वाटत होतं. स्वत· रेणुका मात्र थड होती. विठ्ठलराव आणि विठाबाईंनी लग्नाचा विषय काढला की ती तो टाळी. अलीकडे प्रा. जमदग्नीवरून रेणुकाचे घरात खटके उडत होते. विठ्ठलराव कधी कधी रेणुकावर काय वाटेल तसे आरोप करी. त्यावेळी मात्र रेणुकाला राग येत असे. घरात लग्न विषयाने गदारोळ घातला होता. तरी ती शांतपणानं परिषदेच्या दृष्टीने ठरीव काम करीत होती. आदितराव गायकवाड येणार होते म्हणून ती परशुरामच्या मदतीनं सभासदाच्या नोंदी करून घेत होती. मातंग समाजातील नोकरदाराचं एक रजिस्टर करण्याचं काम परशुरामच्या मदतीनं ती करीत होती. गेल्या पंधरावीस दिवसांत मातंग समाजातील नोकरदारानी आपापली माहिती पत्रद्वारा कळविली होती पत्रांचा अक्षरशः पाऊस पडला होता. रेणुकानं एकंदर सभासदाची छाननी केली होती. शासकीय उच्चाधिकारी, आरोग्यतज्ज्ञ, तंत्रज्ञ, प्राध्यापक याची संख्या अगदीच नाममात्र होती. उलटपक्षी कामगार, मजूर आणि हमाल याचीच भरती दिसत होती. रेणुका व्यथित झाली होती. आनंद फक्त एकाच गोष्टीचा होता की सर्वांना अशा संघटनाची गरज जाणवत होती. त्यातही तमाशा व्यवसायात असलेले कलावंत चारसहा फडांत विखुरले होते. कलावतिणीची संख्या त्यात जास्त होती. आदितराव गायकवाड येणार होते. मधल्या पुण्यातल्या बैठकीत काही कार्यक्रम परिषदेची पूर्वतयारी म्हणून घ्यावेत असे ठरले होते.

¤

गायकवाडानी रजिस्टरची पाहणी केली. परिषदेच्या दृष्टीने त्यांनी सगमपूरमधील काही निमंत्रितांची बैठकही घेतली होती. आज सकाळी मुद्दामच ते फकीरबाबांना घेऊन रेणुकाच्या घरी आले होते.

बरोबर परशुरामही होता.

विठ्ठलराव आणि विठाबाई आदितरावाची आतुरतेने वाट पाहत होते. संघटनेच्या कामात आपण काम करतो, वेळ घालवतो याबद्दल चिंता करणारे विठ्ठलराव आणि विठाबाई आज गायकवाडांची एवढ्या आतुरतेने वाट का पाहत आहेत हे तिला कळत नव्हते.

'रेणुका तू रजिस्टरचे काम अतिशय उत्तम केलेस !'

'याचे खरे श्रेय परशुरामचे आहे. त्याला ही कल्पना सुचली !' रेणुकानं केलेल्या स्तुतीन परशुराम हरखून गेला पण तो आल्यापासून सारखं आतबाहेर करणारी फुला भलतीच लाजली.

'पण ह्यात संघटनेच काम करणारे जवळजवळ नाहीतच. सगळे संघटनेच काम झालं पाहिजे म्हणतात फक्त !'

'छे छे ! अग, हे असच असत !' गायकवाडदादा म्हणाले.रेणुका गायकवाडांना घरी दादा म्हणत असे.

'अव, गायकवाडसाहेब तिला वाटतय सगळ्यांनी ह्येच काम कराव ! अव, पोटासाठी वाटेल ते काम करणारी जात आपली ! मागुडे पहा म्हणावं जाऊन एकदा !' विठ्ठलराव म्हणाले.

'पाहिलेत हं नाना !' रेणुका जरा फुरगटून म्हणाली.

'काय पाहिलंस तिथ ? अग बया, तू पाहिलस ते सुधारणेच्या चष्म्यातून ! आत शिरून पाहिलंस तर मागवाड्यात जाणार नाहीस. मुंबईत आयुष्य घालविलेल्या नाही माणसाना कळायचा मागवाडा ! काय गायकवाड मी मतो त्ये खरं का नाही !

'खरं आहे तुमचं म्हणणं !' गायकवाडाच्या डोळ्यापुढं त्यांनी मांगवाडा सोडून मुंबईची वाट धरली, तो काळ उभा राहिला— लोकाच्या जेवणाभोवती माशानी घोंगावावं तशी घोटाळणारी मांग पोरं आणि माश्या वाराव्यात तितक्याच सहजतेनं यजमान आणि वाढप्यानी त्यांना तेथून वारण्याचा प्रयत्न करावा. तरी 'अवऽऽ उलिसक द्या ना माय ! आऽऽये ऽऽ !' अशी काळजाला भेदून जाणारी ईवळहाक भरावी. गायकवाडांना आठवलं. त्याचं काळीज थरारलं. मागून आणलेल्या भिक्षेतल्या भाकरीसाठी भांडणाऱ्या भावंडाची एकमेकाचा जीव घेऊ पाहणारी जीवघेणी स्पर्धा त्यांच्या डोळ्यांसमोर उभी राहिली.

गायकवाड नगर जिल्ह्यातले. नेहमी दुष्काळ पडायचा. एका दुष्काळातली कथा. मागांना मजुरी मिळेना. भीक कोणी वाढेना. रोज तडफडून मेलेली गुरं फाडून खाताना मागाचे डोळे फाटले ! पोटाला भाकरीची भूक लागली. शेठ बिच्यूलाल मारवाड्याचं ठिक्या लावलेल धान्य कोठार लुटायच ठरलं मागुड्यात ! तरण्याबाड भुकेल्या पोराच्या अंगात वार शिरलं. अंधाऱ्या रात्री कोठार फोडलं. पळवता आली ती तीनचार पोती पळवली. पोटासाठी घरफोडी करून पोटाला पाठीवर घालून उरापोटी पळत असतांनाच राऊंडवरच्या पोलिसानं पाहिलं. पाठीवरल्या दाणे भरल्या पोत्यानी पोरं धुंद झालेली. मांगुड्याच्या दिशेन लपकत पळत निघालेली. पोलिसानी पाहिलं. काही पोरं पोती टाकून पळाली. शिट्ट्या वाजवीत पोलिस पळत होते. आदितराव पाठीवरल्या पोत्यानिशी पळाला. मागुडा गाठला. मांगुड्याचा मेहेत्रे वाट पहात होता. आदितराव दिसताच 'चांगभलं !' झालं. पाठीवरलं पोतं खाली पडलं तसा मांगवाडा सावजावर लांडग्यांनी तुटून पडावं तसा तुटून पडला. वाटे घालतो म्हणोस्तवर वाटे पळवले. त्यात धरणो मातेन आपलाही वाटा पळवला. त्येंव्हढ्यात पोलिसाना भिऊन पळालेली पोरं पाठीवर पोलिस घेऊनच मागवाड्यावर आली. पोटासाठी पाठीवर ओझं वाहणारी मांगं चाबकाच्या आणि दडुक्याच्या फटक्यानी उरीपाठी फुटत होती. कुणाला करुणा आली नाही. काशिनाथपंत आले, त्यानी जामिनावर सोडवलं. त्याच रात्री कोंबडं आरवायच्या बेताला आदितरावनं मुंबईचा रस्ता धरला. पायपीट करीत !

गायकवाडाची हकीगत अशी होती. ऐकून डोळ्यांत पाणी तराळलं होतं.

'रेणुका, विठ्ठलराव म्हणतात ते खोटं नाही !' गायकवाड शून्यात पाहत पुन्हा म्हणाले. 'आजही मागवाडा फारसा बदलला नाही ! आज निदान महाराष्ट्रातली मागं जागी झाली आहेत !' गायकवाडांनी जरा समाधान व्यक्त केलं.

'परिषद जोरदार व्हायला पाहिजे.' फकीरबाबा म्हणाले.

'हो हो. ते झालं पण आता निधी जमविला पाहिजे, कार्यक्रम दिले गेले पाहिजेत !'

मग बराच वेळ परिषदेची चर्चा झाली. मुंबईत कै. आण्णाभाऊ साठ्याची पुण्यतिथी साजरी करायची ठरली होती. त्या दिवशी मुंबईतल्या मागानी एकत्र येऊन मुख्यमंत्र्यांपुढे मागण्यांचं निवेदन द्यायच, त्याचवेळी त्यांना परिषदेचं निमंत्रण द्यायचं असं ठरलं होतं. गावपातळीवर निदान मातंगीची जत्रा होऊन सहभोजन व्हावं, त्यावेळी अण्णाभाऊ साठ्यावर कोणी बोलावं किंवा 'मातंगी'ची जन्मकथा आणि मातंगाची कुळकथा सागावी असं ठरवलं होतं. जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणी कलेक्टर आणि मामलेदार यांना निवेदने द्यावीत. स्थानिक आमदार किंवा खासदार किंवा प्रमुख पुढाऱ्याला तेथे उपस्थित राहण्याचं निमंत्रण द्याव असं ठरलं होतं. चर्चा चालू असतानाच फुलानं उत्तम चहा करून आणला आणि विठ्ठलराव चहाचा आग्रह करीत म्हणाले—

'गायकवाडसाहेब, फकीरबाबा, आता चर्चा लई झाली. चहा घ्या पाहू आधी ! फुला बिस्किटं आण !'

'वा ! हे बाकी खरंच साहेबी झालं हा विठ्ठलराव !' चहाबिस्किटं होत असतानाच विठ्ठलरावानी विषयाला हात घातला.

'फकीरबाबा आता गायकवाड आहेत आणि रेणुका समोरच आहे. तुम्ही सगळ्यांनी तिला नादी लावलं; पोरगी तेवीस वर्षांची झाली. गंज प्रोफेसरीण झाली असन; पण अजून लग्न केलं नाही ! लग्न करायचं नाही म्हणतो. तिचं एक ठीक झालं, पण विठाबाई रोज गाऱ्हाणं करती. परवा अकोलपाटला जाऊन आली तेव्हापासून भुणभुण करतीये. जातीतले लोक नावं ठेवतात. कुणाचा हात धरून पळून बी जात नाही, हे संघटनेच भूत बसलंय डोक्यावर !'

'अरे, बापरे ! तुम्ही फारच चिडलेले दिसताय विठ्ठलराव !' गायकवाड रेणुकाकडे पाहत म्हणाले.

'मला लग्न करायचं नाही. मी किती तरी वेळा सागिनलंय. उगा डोकंफोड !' रेणुका वैतागून म्हणाली.

'हा हा लग्न करणार नाहीस...' विठ्ठलराव काही बोलणार तो विठाबाईनी दापलं.

'गायकवाड तुम्हीच सांगा समजावून लग्नं न करण्याचा काय अर्थ

होतो. लोक बोलतात...'

'काय बोलतात लोक ?' रेणुका आता संतापली होती. भलत्या-वेळी असला विषय काढण तिला अगदी पसंत नव्हतं.

'हा हा येव्हढ्याकरता आम्ही शिकवलं तुला! अव काय ? म्हनलं आपली येक परवड झाली. लेकराची व्हायला नको म्हणून आम्ही पोटं जाळली रात्रदिवस ! म्हणलं शिक्षण झाल की नोकरी करन आन मजेत ससार थाटन बामणावाणी ! पण इचं लक्षण.....'

'नाना, काय केलय मी असं ?' रेणुका आता पुरतीच चिडली होती.

'अग इतक्या वर्षांची होऊन लग्न करायचं नाही म्हणजे मातंगीचा जन्म जगल्यासारखच आहे !'

'म्हणजे ?' ती रागानेच म्हणाली—

'सांगा गायकवाड हिला.'

'रेणुका अगं, सोळावं वर्ष उलटून गेलेली मुलगी लग्न करणार नाही म्हणाली की तिला जातपंचायतीच्या परवानगीनं रीतसर धंदा करण्याची परवानगी द्यायची आणि मातंगी आईच्या नावानं सोडायच, मातगी म्हणून अशी आपल्या जातकुळीची पूर्वीची प्रथा.' गायकवाडांनी सागितलं.

'नाना, तुम्ही चांगले सुधारलेले. तुमची पोरं शिकलेली. मोठी झालेली. समाजासाठी स्वत चं सुख बाजूला ठेवायचं म्हटलं तर तुम्ही घरातूनच असं म्हणायला सुरुवात करणार आम्हाला ? मग त्या बिचाऱ्या फुलानं काय करायचं ?'

'व्हय, काय म्हनतात तिच्याविषी ते एकदा आणाजीला विचारा. अव किती दिसापून परशुरामाच्यामागं लागली ही, पण त्यांनीसुद्धा तिचा विचार नाही केला !' विठ्ठलराव परशुराम आणि फुलाकड पाहत वैतागून म्हणाले.

'त्याची काळजी मिटली बरं का फुला, इकडं ये अशी. कालच मला परशुरामानं शब्द दिला. तुझ्याशी लग्न करणार. म्हणून परिषदेत सामुदायिक विवाह करणार आहोत आपण. त्यात पहिला जोडा तुमचा !' फुला बाहेर होती ती देखील आत पळाली. ताणलेल्या वातावरणात हास्याची फुलबाजी फुलली.

'पण गायकवाड आमच्या रेणुकेचं काय ?'

'विठ्ठलराव, अहो तिचा विचार घ्यायला हवा की नाही ? आता तुम्ही मला मागच्यावेळी काकुळतीनं विचारलं, सांगितलं. त्याप्रमाणे मी सुभानराव गायकवाडला विचारलंय...'

'कोण सुभानराव गायकवाड, कलेक्टर आहेत ते ? काय विचारलय तुम्ही त्याना, दादा ?' रेणुकानं विचारल.

'हो हो, एव्हढं गडबडून जाऊ नकोस. माझा पुतण्याच आहे तो. तुझ्याशी लग्न करायला तयार आहे. अग, त्याला शिकलेली समजस मुलगी हवी आहे. तुझ्याविषयी सागितलं तर खूष झाला !' गायकवाडानी सांगितलं तेव्हा विठ्ठलराव आणि विठाबाईच्या चेहऱ्यावर आनद मावत नव्हता.

'पण दादा...!'

'अग तू बघ त्याला, बोल त्याच्याशी. पुढच्या मुबईतल्या बैठकीला येणार आहे तो मुद्दाम. आम्ही कोणी तुला कोणती गोष्ट सक्तीनं थोडीच करायला सागणार आहोत ?'

'पण दादा, मी अजून असं काही ठरवलं नाही अजून. मला लग्नच करायच नाही !' रेणुका गभीर होत म्हणाली.

'हा लग्न नाही करायच. मग काय त्या जमदग्नीबरोबर हिंडायचं बिन लग्नाच !' विठाबाई चिडून म्हणाली.

'अहो असं काही म्हणू नका. मला ते जमदग्नी चांगले माहीत आहेत !' गायकवाड म्हणाले.

'खरच निर्मळ आहे पोरगा !' फकीरबाबानं पुस्ती जोडली.

'अवं, पण आपण माग, ते ब्राह्मण !' विठ्ठलराव म्हणाले—

'अहो पण दादा मला लग्नच करायच नाही तर ही चर्चा का करताय उगाच !'

'गायकवाडसाहेब, तिचं काही ऐकू नका. तुम्ही ठरवूनच टाका सुभानरावाशी तिच लग्न. आम्ही घोरातून सुटू यव्हढा सोन्यासारखा पोरगा... ! विठ्ठलराव पुन्हा म्हणाले.

आता मात्र रेणुकाला असह्य झाल होतं. ती मोठ्या सयमानं तिथं थाबली होती.

'त्याचं काय झाल गायकवाडसाहेब...' फकीरबाबानी शकराचार्यांसमोरचा घडलेला प्रकार सागितला.

'मला कळलंय ते सगळ. रेणुका, तुम्ही दोघानी खरच तसं काही ठरवलय का ?' गायकवाडानी विचारल.

'पण दादा ठरविण्याचा प्रश्न येतोच कुठे, जमदग्नींनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यासाठी आजीवन लग्न न करता रहायचं असं ठरवलय !'

'हा, हा, आन त्याच्या नादान तूही तशीच रहा !' विठ्ठलराव पुन्हा चिडून म्हणाले.

'हे बघ रेणुका, सघटनेसाठी अविवाहित राहण्याची आवश्यकता वाटत नाही. तू तो विचार सोडून देणच चांगलं. आणि हे बघ जमदग्नी कितीही चागला असला तरी तो लग्न करायला तयार होईलच असं निश्चित नाही सागता येत. अगं, ही सघातली माणसं ध्येयानं वेडी झालेली असतात. तो पुरुष आहे. त्यान लग्न नाही केलं तर बिघडत नाही काही. पण मुली कितीही चागल्या वागल्या तरी समाज अविवाहित मुलींवर शितोडे उडविल्याशिवाय राहत नाही. तेव्हा हट्टाला न पेटता विचार कर !'

'ताई, आता आम्ही ऐकणार नाही. तुम्ही लग्न केलच पाहिजे.'

'ताई अस काय करीसुलंय यव्हढ सायब सागत्यात त' आता फुलालाही कठ फुटला होता.

'रेणुकाताई, तुम्हाला जमदग्नीशीच लग्न करायचं असेल तर मी एकदा त्यांना विचारतो स्पष्ट, पण त्ये नाही म्हणाले तर तुम्हाला आमचं ऐकावं लागेल.'

रेणुकान बरेच आढेवेढे घेऊन अखेर लग्न करायला संमती दिली आणि विठी आणि विठ्ठलराव कलेक्टर जावयाच स्वप्न रंगवू लागले. ¤

बापूराव आवचित्याच्या वासनेचं गिधाड चवताळलं होतं. एका बावीस-तेवीस वर्षांच्या पोरीनं त्याला पिसाळून सोडलं होतं. एका बामणाच्या पोरान मागाच्या पोरीला अशी हातोहात नेण्याचा प्रयत्न करावा हे त्याच्या बुद्धीला पटत नव्हत. बापूराव जळत होता. फकीरबाबाला शिव्या घालत होता. शंकराचार्यांच्या कार्यक्रमापासून

त्याचा भडका उडाला होता. भोम्या त्यांच्या या भडक्यात तेल ओतत होता. आज बापूरावाचा निरोप आलेला पाहून तो टापुटाप बापूरावासमोर हजर झाला होता. त्याच्या डोळ्यातला विखार लाचार बनून बापूरावाच्या आज्ञेची वाट पाहत होता.

'फर्मान सायेब, मायबापान कस्याला बलिवलं ?'

'भोम्या, तुला कशाला बोलावतात लोक ?'

'फर्मान, मी तं कुतरा तुमच्या दारचा ! तुमच्या शब्दाबाहेर नाही !'

'काम आहे एक.'

'सांगा मायबाप !'

'रेणकीनं येड लावलंय शामराव पाटलाला आन आम्हाला ! यव्हढं काम झालं पाहाजेन !'

'झालं मालक !' भोम्याचे डोळे सूडानं पेटले होते. भक्ष्यावर झडप घालणारी नजर त्याच्या डोळ्यांतून थेट रेणुकापर्यंत जणू पोहोचली होती.

'जशी गाडीत टाकायची तशी शामरावाच्या मळ्यावर !'

'काम कधी करायचं ?

आर ती जत्रा आहे ना अकोलपाटच्या मांगुडधावर त्या रात्री !'

'ठरलं !'

'मग जा शामरावाच्या मळ्यावर ठरवून टाकू सगळं. मी फोन करतो आणि तुझ्यापाठोपाठ आलोच !'

बापूरावांनी फोन केला. भोम्या जणू पळतच निघाला. त्याच्या मनात आनंदाच्या फुलबाज्या पेटल्या होत्या. 'एकदा पोर आगाखालून काढली की आपली म्हतारपणाची पेन्सलच झाली म्हणायची !' त्याच्यातला भाड्या विचार करीत होता. 'त्या फुलीलाही अशीच भट्टी दावायची !' तो अधीरतेने शामरावाच्या मळ्याशी पोहोचला होता. पाठोपाठ बापूराव मोटरसायकलवरून, मोहिमेवर निघालेल्या अफजुलखानासारखा निघाला.

प्रा. जमदग्नीनी नेमकं या दोघांना पाटलाच्या मळ्याकडं जाताना पाहिलं. मनात शकांचं काहूर माजलं. कारस्थानाचा वास लागला. तीन रस्त्यावरच्या पुस्तकाच्या दुकानात येऊन तो त्याच्या परतीची वाट पाहत होता. तास–अर्ध्या तासान भोम्या येताना दिसला. जमदग्नी मुद्दाम रस्त्याच्या कडेला येऊन उभा राहिला. भोम्याची आणि त्याची नजरानजर झाली. भोम्यानं पळता पाय काढला.

□

कॉलेजकडे निघतानाच जमदग्नी रेणुकेच्या घरी आला. त्याला पाहून विठ्ठलराव आणि विठोच्या कपाळाला आठी पडली.

'काय नानासाहेब, काय चाललय, रेणुका आहे ना घरात ?' जमदग्नीने विठ्ठलरावांनाच विचारले.

'अरे ! तुम्ही आत्ता इकडे ? कॉलेजला जायचय ना ?' रेणुका आवरून बाहेर येऊन जमदग्नीला पाहून म्हणाली.

'म्हटलं तुमच्याकडे येऊन मग बरोबरच कॉलेजला जावं.'

'चहा घेऊन निघूया, चालेल ?

'चालेल. जशी आपली आज्ञा.' जमदग्नी मिश्किलपणे म्हणाला.

'आज्ञा करायला मी काही प्राचार्य नाही म्हटलं ?'

'पण मैत्रीतही आज्ञा होते म्हटलं आणि सख्या मैत्रीतल्या आज्ञा मोडवत नाही'

'भाग्य माझं ! तुम्ही मला सख्खी मैत्रीण मानता ते !'

'हो मानण्याची मर्यादा आणखी वाढविता येत नाही. खरं ना ?' त्यानं रोखून पाहत विचारले आणि दोघंही खळखळून हसली.

दोघे चहा पिऊन बाहेर पडले तेव्हा विठ्ठलरावचा चेहरा आणखीच चिंताक्रांत झाला होता.

'मला वाटत जमदग्नी तुम्ही सहज म्हणून काही येणार नाही असे अगदी सकाळीच !'

'का ? येऊ नये मी सकाळी ?'

'तरी पण ?' रेणुकेच्या नजरेत उत्कंठा होती.

'काल सध्याकाळी भोम्या शामराव पाटलाच्या मळ्यावर आला होता !'

'तो नेहमीच जातो. त्याच काय ?'

'पाठोपाठ बापूराव तिकडेच गेले. साधारण अर्ध्या तासानं भोम्या परतला.'

'बरं मग ?'

'बर मग काय ? मी गोष्ट नाहीये सागत ! मी नगर वाचनालयातून पाहत होतो. भोम्याची आणि माझी नजरानजर झाली आणि त्यानं एस. टी. स्टँडच्या दिशेनं पळच काढला. मला वाटतं काही शिजत असले पाहिजे. तुमचा उद्या काही कार्यक्रम आहे का ?'

'हो. उद्या नाही परवा. अकोलपाटला मरीआई मातंगीच्या जत्रेचा कार्यक्रम आहे. आजच फुला जाणार आहे तिकडे तयारीला. मी जाणार आहे अण्णाभाऊ साठोंवर बोलायला. आई, नानाही जाणार आहेत.'

'जरा सावधगिरीने गेलेले बर !'

'एव्हढी काळजी वाटते माझी तर येत का नाही आमच्या बरोबर ? आमच्या जत्रेचं जेवण चालणार नाही म्हणून ?' रेणुका खटयाळपणे म्हणाली.

'तुम्ही अन्य कुणालाही बोलावले नाही मग मीच कसा चालेन ? ए, तुम्ही जीपने जाणारात ?'

'हो. यायला उशीर होईल कदाचित !'

'मला वाटतं एस. टी. ने गेलात तर ?'

'हरकत नाही. पण माझ्यावर दोन जबाबदाऱ्या आहेत. दुसऱ्या दिवशी सकाळीच सगळीकडचे रिपोर्ट जिल्ह्याला न्यायचे आहेत. निवेदन द्यायचंय, ते कसं जमणार ?'

'ठीक यं !' जमदग्नी विचार करीत म्हणाला.

'खरंच काही धोका आहे असं वाटतं तुम्हाला ?'

'बापूराव कसाय कळलेय ना आता !'

कॉलेज आले आणि दोघ आपापल्या उद्योगाला लागले.

ऑफ पिरीयडला जमदग्नी नेहमीप्रमाणे लायब्ररीमध्ये निवांत जाऊन बसला होता. गलेलठ्ठ पुस्तक काढून तो अभ्यासात गढून गेला. अभ्यासिकेच्या केबिनमध्ये आज तो एकटाच बसला होता. कधी खाजगी गप्पांसाठी प्राध्यापक अभ्यासिकेच्या इतर केबिनमध्ये बसत.

'जमदग्नी ! मी आले तर चालेल ?' रेणुकानं लाघवीपणानं विचारले.

'ये ना ये!'

'तुझा अभ्यास...' आणि रेणुका लाजली. एकदम तिच्या तोडून एकेरी संबोधन गेले.

'ये ये! विशेष?' जमदग्नीने तिला विचारले.

'डिस्टर्ब होत असेल तर जाते मी!' ती आणखी लाडिकपणाने म्हणाली आणि तो विस्फारीत नजरेन तिच्याकडे पाहतच राहिला. नजरेला नजर भिडली. तिच्या नजरेत भावूकता दाटून आली होती. काही पडल्याचा आवाज आला आणि दोघं एकदम भानावर आली.

'काय पाहतोयस एव्हढं!' तिनं पुन्हा एकेरी संबोधले.

'आं!'

'ए, आवडले नाही माझं एकेरी हाक मारणं?'

'फक्त एकेरी हाक मारणच आवडले मला.' तो पुन्हा तिच्या डोळ्यात पाहत म्हणाला.

'मग पहातोयस काय एव्हढं?'

'शिवशक्ती!'

'म्हणजे?'

'मातंग समाजाच्या उत्थापनासाठी परमेश्वरानं पाठविलेली!'

'एव्हढी काही मी मोठी कार्यकर्ती नाही की, आंबेडकरही नाही!'

'म्हणूनच मी तुला शिवशक्ती म्हणालो! सामान्यामधून झोकून देणारी माणसं पुढं येतात आणि प्रगटते शिवशक्ती!'

'माझ्या स्तुतीची लहर आलीये?'

'खरं सांगू रेणुका माझा निर्णय बदलायचं सामर्थ्य आहे तुझ्यात!'

'खरच?' रेणुका त्याच्या पुढ्यातल्या खुर्चीतून पुढे झुकत म्हणाली.

'खरंच? ज्यासाठी जीवन झोकून द्यायच ते ध्येय समोर आल्यासारखं वाटले...वाटते...' जमदग्नीनं भावूकपणानं तिचा हात हाती घेतला होता. अंधार प्रकाशाचं मीलन होत होतं.

'काय वाटतं?' रेणुकाचा कंठ प्रीतीनं दाटून आला होता.

'असे लक्ष लक्ष प्रेमदीप उभ्या भारतात लागावेत! भेदाचं ग्रहण सुटून जावं. पुन्हा भा-रत भारत व्हावा. तेजाची उपासना करणारा!'

रेणुकाचं मन जमदग्नीच्या अंतःचक्षुन त्याच्या डोळ्यासमोरील भेदाभेदरहित भारताचं चित्र आपल्या अंतःचक्षूसमोर आणीत होती. दोघं एकमेकात हरवली होती.

'जमदग्नी, एक विचारू तुला?'

'गायकवाडानी सुभान गायकवाडच स्थळ आणलेय माझ्यासाठी. कलेक्टर आहे. गायकवाडाचा पुतण्या आहे. आई, नानाचा आग्रह चाललाय मी त्याच्याशी लग्न करावं म्हणून! तुला काय वाटतं?'

'आनंदान, जरूर जरूर! त्यात विचार करण्याचं काय कारण?' विजेचा झटका बसल्यासारखा जमदग्नी एकदम उठून उभा राहिला होता. त्याच्या हृदयात खोल कुठेतरी जखम झाल्याच त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होतं.

'तुला खरंच वाटतं तसं?' रेणुकानं पुन्हा त्याचा अंदाज घेण्याचा खटपटाळ प्रयत्न केला.

'मला काही वाटायचं काय कारण?' त्यानं गोंधळल्या मनःस्थितीन उत्तर दिले. त्यानं तिच्यासाठी आपला लग्न न करण्याचा निर्णय बदलायचं ठरवलं होतं.

'पण मला तुझ्याशीच लग्न करायचं असेल तर तुझी काही हरकत?' रेणुकान एकदम जवळ जाऊन त्याचा हात घट्ट धरीत विचारलं.

'रेणुका! रेणुका...तू...तू जिंकलेस मला रेणुका...' त्यानं तिला घट्ट हृदयाशी धरलं. त्याचे डोळे पाणावले होते. रेणुका आनंदान फुलून गेली होती. शिव आणि शक्तीच मीलन होत होतं. काही तरी वाजलं आणि आपण कुठे आहोत याचं भान त्या दोघानाही आलं. तेव्हढ्यात बाबू आला. त्यानं प्राचार्यांनी दोघानाही बोलावलं असल्याचं सांगितलं.

¤

दोन बोकडाच्या बळीनं अकोलपाटची जत्रा रंगली. रक्ताच्या टिळ्यानं महामरी मातंगी प्रसन्न झाली. चुलागणावर भल्या मगुल्यात बोकड शिजून तयार झाले होते. बळी देण्यापूर्वी रेणुकेचं भाषण झालं होतं. फुला आणि परशुराम जातीनं जत्रेची व्यवस्था पहात होते. रेणुकेच्या आजीला आज आनंद झाला होता. तिची नात मागुड्याला ज्ञान देत होती. विठ्ठलराव, विठी, आणाजी, गुणाजी, शेवंता, आजी जवळ बसून रेणुकाचे गुण घेत होते. जमदग्नीनं ज्याची भीती घातली होती तो भोम्या आज निमूटपणानं परशुरामचं ऐकत होता. आदबीनं वागत होता. मांगुडा अचंब्यानं थक्क झाला होता.

'फर्मान, विठ्ठलराव!' भोम्यानं आत येत म्हटलं.

'का रे कशाला आलास?' विठ्ठलराव तिढ्यानंच म्हणाले.

'रेणुके, पोरी आमाला एकडाव माफी कर.' भोम्यानं एकदम रेणुकेचे पाय धरीत म्हटलं.

'कशाबद्दल?' रेणुका भांबावून साशकतेनं म्हणाली.

'अव असं काय करी सूलय, तुमचा राग गेला नाही बाई! चुकी झाली माह्यावाली! पोटासाठी केल आन पोरीला दुखावलं म्या चंडाळान! चुकलो मायबाप चुकलो! मातंगीची आण!' स्वतःच्या फाडफाड थोबाडात मारून घेत भोम्या बोलत होता. परशुराम आश्चर्यानं थक्क झाला. भोम्याचा हा अवतार पहायला आता मांगुडा जमा झाला होता. सगळ्याना मागुड्याच ग्रहण फिटल्यासारखं वाटत होतं. भोम्या पुन्हा पुन्हा काकुळतीन बोलत होता.

'भोम्या, वाईट धंदा सोडण्याच वचन दे या मांगुड्याला!'

'पोरी, सोडला. आजपासून धंदा सोडला. माझ्या घरातल्या पोरीबाळी लोकाच्या अंगाखाली घालून पैसा मिळविला! पर आम्ही काय करावा. हमाली व्हइना माझ्याकडून. पोरी सिमिटाची पोती उतरवता उतरवता पाठीचा कणा मोडला माझ्यावाला. तीन महिनं पडून व्हतो, घरात! कोनी पाह्यलं नही मह्याकं. मग बाळूशेठनं हाटेलीत खाऊपिऊ घातलं. त्याच्या दारचा कुत्रा झालो. एक दिवस मन सांगितली भाडी घासाया. म्या मपल्या हातान नेली तिला. भांड्याच्या मागून माझा भाड्याचा धंदा सुरू झाला. पोटाचा प्रश्न मिटला माह्या. पोटाचा प्रश्न सुटला आन मागुड्याच्या आब्रूचायबी सुटला!' भोम्या रडून रडून सांगत होता.

'मग त्या शामराव पाटलाच्या मळ्यावर कशाला गेला होतास बापूरावाबरोबर?' रेणुकानं त्याला एकदम विचारलं आणि भोम्या चपापला.

'त्येच्या मळधाव राखणाचं काम मिळवून देतो म्हणाला.' भोम्या म्हणाला.

'तुला काम मिळवून द्यायला तो बापूरावच बरा मिळाला ?' परशुरामनं तिरकसपणान विचारलं.

'अव तुमच्याकडं यायला; माहं तोंड गुवानं भरेल ! कसं यावं ?' त्यान पुन्हा तोंडात मारून घेत म्हटलं.

'बरं बरं राहू दे. भोम्या पुन्हा असलं उद्योग करू नकोस. झालं गेलं गंगेला मिळालं.'

'लय लय उपकार झालं मायबाप !' भोम्या पटापट सगळ्याच्या पाया पडत म्हणाला.

'भोम्या, ध्यान धर परत भाड्याचा धंदा करशील तर मागाड्यात पुरल्याल तुला मांग.' परिगाआजी थरथरत्या हातान बोलली. मरी-आईचा आसूड उडाल्यासारखं वाटलं मागुड्याला.

'नाही माय उजुक काही घडणार नाही. माझं तं काय मी कुत्राच पर त्यो बापुरावबी म्हणत होता चुकलं म्हून. रेणुकाताईंचा राग गेला पायजे म्हनाला.'

'अरे, माणूस किती मोठा झाला तरी जातीची समाजाची जरूर लागतीच माणसाला.' विठ्ठलरावाने पुस्ती जोडली.

'मला लईच आग्रोव्ह केलाय का आमच्याक घिऊन ये रेणुकेला. मापी मागतो म्हणाला.' भोम्यान आणखी सांगितलं.

'असं ? उशिरा का होईना सद्बुद्धी झाली म्हणायची !'

'मंग पोरी तू जाशीन बापुरावाक ?'

'बघू !'

'पघु नाही पोरी, ह्यो खटका उद्याच्या उद्या मिटलाच पायजे.' भोम्यान आग्रह केला.

संघटनेच्या दृष्टीनं भलीबुरी सर्व प्रकारची माणसं जोडावीच लागतात हे रेणुकेला पटलं होतं.

'बघू उद्या फकीरबाबाशी बोलून.' रेणुका म्हणाली.

'नग नाई. मी तुमच्या संगंच येतो. उद्या सकाळी फकीरबाबाला घिऊनच जाऊ बापुरावाक' भोम्या म्हणाला.

'कारे किती सुपारी दिली बापूरावानी तुला ?' विठ्ठलरावानी एकदम विचारलं.

'सुपारी ? विठ्ठलराव, हाणा माह्या मुस्कुटात ! वाईट वंगाळ नाही करायचा. मळधात पोटापाण्याला लागलोय आता. त्या शामरावानं डोळंच उघडलं त्याचं !'

¤

मागवाड्यातला कार्यक्रम आटोपून शाहूनगरातल्या इंदिरा घरकुलातली मांग परतू लागली. कार्यक्रम संपता संपता अकरा वाजले. मुक्कामाचा आग्रह झाला; परंतु रेणुकान जायचं ठरविलं होतं. फारसा प्रवासही नव्हता. भोम्या मागे लागून अखेर निघालाच. परशुराम, फुला उद्या येतो म्हणाले. भोम्याबरोबर आणखी दोन पोरं गाडीत चढली.

'अरे आता गर्दी कशाला करता ?' विठ्ठलराव ओरडले.

'संगमपूरला मावळणीकडे जायचय !' पोरं म्हणाली आणि गाडी संगमपूरला निघाली.

संगमपूरचा नाका दोन फर्लांगावरच असेल. झाडीतून एकदम गाडीवर दगड आले. चार काठ्या घेतलेले बाड तरुण एकदम पुढे आले. ड्रायव्हरने एकदम गाडी थांबवली. लाईट चालू होते. गाडी बंदही केली नव्हती. भोम्याने एकदम 'चोट्टं आलं हो ऽऽ !' म्हणत बोंबलायला सुरुवात केली. पोरानी खाली उड्या टाकल्या आणि ती झाडात पळाली. लाठ्या पुढे येत होत्या 'एकदम सुसाट गाडी पळव !' विठ्ठलराव म्हणाले. तसा भोम्या एकदम पुढे होऊन म्हणाला 'नकोरं भाऊ !' तो जोरात ओरडतोय हे पाहून ड्रायव्हरनं गाडी सुरू करण्यासाठी ब्रेकला हात घातला. तेवढ्यात एकजण पळत आला आणि त्याने ड्रायव्हरवर काठी उगारली. ड्रायव्हर आधीच गर्भगळित झालेला. त्यान गाडी बंद केली आणि खाली उडी टाकून पळू लागला. गाडीच बंद झाल्यान अंधार झाला होता. काय घडतय ते कळत नव्हतं. तेवढ्यात कोणीतरी गाडीत उड्या घेतल्या भोम्याच्या पाठीत रपाटा बसला. भोम्या पुन्हा बोंबलून उठला. काय करावे सुचत नव्हते. दुसरा टोला विठ्ठलरावाच्या टाळक्यात बसला. आता मात्र रेणुका चिडली. ताडकन उभी राहण्याचा प्रयत्न करते तो वरचा वार डोक्याला लागला आणि कोणीतरी एकदम तिला आवळले. आता मात्र तीही भेदरली. तिनं मदतीसाठी मोठ्यान ओरडायला सुरुवात केली. अंधारात कोण काय करतय लक्षात येत नव्हते.

'बोंबलू नका !' कोणीतरी दरडावले. तसा भोम्या एकदम शांत झाला.

'कोण तुम्ही ? काय हवय तुम्हाला ?' रेणुकानं हिसडा देत विचारलं.

'तुझं बाप ! आरडायचं काम नाही. जीव घेत नाही तुमचा. मुकाच आमच्या बरबर यायचं !'

'अव कुठं नेता ऽऽ !' आता विठीन ओरडायला सुरुवात केली.

तेवढ्यात कोणीतरी हात दोरीनं आवळायला सुरुवात केली. ओरडाल तर मुस्क्या बांधू. कोणीतरी दरडावलं. तीच दोरी पायापर्यंत सरकली. जीपमध्ये बसल्या जागी त्या सर्वांचे हात-पाय आवळले जाताच जीप सुरू झाली. आता ड्रायव्हर कुणी वेगळाच होता. त्यान तोंडावर उपरणं बांधलं होतं. बोलण्यात, ओरडण्यात काही अर्थ नव्हता.

नाक्याजवळ जीप जात असतानाच पाठीमागून ट्रकचा प्रकाशझोत लावून जीपमध्ये आला. मघाचे लाठीधारी जीपमध्ये होते. कोण ते समजत नव्हतं. सगळ्याचे चेहरे बळी चढवायला चालविलेल्या बळीसारखे केविलवाणे झाले होते. जीप आणखी जोरान जात होती. तो समोरून भरधाव वेगान मोटरसायकल येताना दिसली. आता दोन्ही कडून जीपवर प्रकाश होता. क्षणार्धात मोटरसायकलचा आवाज रेणुकान ओळखला तेव्हा तिनं 'वाचवा ! वाचवा !' म्हणून ओरडायला सुरुवात केली. तिचेच अनुकरण विठीनही केले. शेजारी बसलेल्यानी त्याची तोंडे दाबून धरली. तेव्हढ्यात जीप नाक्याच्या पुढच्या चौकातून एकदम डाव्या हाताला वळली आणि पुन्हा अधिक सुसाट निघाली. समोरून येणारी मोटारसायकल वळली आणि ती शहरात गेली. रस्त्यावरची क्षणापूर्वीची धामधूम संपली.

शामराव पाटलाच्या मळ्याच्या एका बाजूच्या वस्तीवर जीप येऊन थांबली. विठ्ठलरावचे मुटकुळे दोघानी उचलून एका खोलीत आणून टाकले. वडान्यानी धरलेल्या डुकरासारखे विठ्ठलराव ओरडत

होते. त्याच्या ओरडण्याने वस्तीवरची कुत्री एकदम भुकायला लागली. नतर भोम्या उचलला गेला. खास मागवाडयातल्या शिव्याचा पट्टा तोडान चालला होता. पण थोडयात वेळात त्याचं ओरडण थावल. आणि दोघावरोबर तिसरा अधारातून बाहेर आला आणि अधारातच पळाला. रेणुकान अधारात फाटल्या नजरेन पाहिल 'हा पळालेला तिसरा भोम्या तर नसेल !' आणि तिला प्रा. जमदग्नीचा इशारा आठवला. तिला रडू कोसळले. माणस इतकी क्रूर असू शकतात याचा अनुभव ती घेत होती. आता तिला मघाशी ऐकू आलेल्या मोटर-सायकलच्या आवाजाचा दिलासा वाटत होता. एखाद्या चित्रपटातला प्रसग प्रत्यक्ष अनुभवल्यासारख वाटत होतं. ती अशी विचार करीत असतानाच त्या दोघीनाही उचलल गेल. दोघी जीवाच्या आकातानं ओरडू लागल्या. दुसरं होतच काय हातात ? दोघीना घेऊन ते वस्तीतल्या खोलीकडे निघाले. तेवढयात दोन जीप हार्न देत भरधाव वेगान तेथे येऊन थडकल्या सुद्धा. पाठोपाठ चार मोटरसायकली होत्या. त्या दोघीना तेथेच टाकून ते चारी दाणगेश्वर तेव्हढयातही शिताफीनं मळयात पळाले. त्याच्या पाठीमागे काही शिपाई पळाले. जमदग्नी आणि इन्स्पेक्टर भागन्यानी रेणुका आणि विठाबाई दोघीना मुक्त केल. तोवर शिपायानी वस्तीवर छापा घातला. वस्तीवर कोणीही नव्हत. विठ्ठलरावाची सुटका केल्यानतर एका जीपन त्याना पोलिस स्टेशनला रवाना केल.

'मळा शामराव पाटलांचा ना ?' इन्स्पेक्टर भागन्यानी विचारल

'होय !' शिपाई म्हणाला.

'चला आपण त्याच्या बगल्यावर जाऊ !' भागरे म्हणाले.


## एकाच छत्राखाली अनेक वैशिष्टये

१. निवडक इंग्रजी ललित वाङमय

२. वेचक मराठी ललित वाङ्मय

३. अमेरिकन, ब्रिटिश व भारतीय इग्रजी नियतकालिकाचा भरपूर साठा

४. ग्रंथाची उत्कृष्ट निगा

५. ग्रथाच्या आतच कात्रणसेवा अंतर्भूत

६. दीर्घ मुदतीच्या वर्गणीवर भरपूर सवलत

७. आमच्याकडे सभासद झाल्यास तुम्हाला अनेक पुस्तक विक्रेत्याकडे जाण्याची किंवा प्रदर्शने बघण्याची जरुरी नाही.

**फिनिक्स लायब्ररी**

सदाशिव पोस्टासमोर

पुणे ४११ ०३०


जीप आणि दोन मोटरसायकल्स मळयाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या बगल्यावर पोचल्या जवळजवळ एक किलोमीटर अतर असाव बगल्याच्या बाहेर बापूराव आवचित्याची मोटरसायकल होती आणि बगल्यात शामराव पाटील आणि बापूराव याची मदिरापार्टी रगात आली होती

□

'मातग महासघाच्या चिटणीस प्रा. कु. रेणुका जाधव याना पळविण्याचा प्रयत्न !' ठळक मथळयातील या बातमीने पुन्हा एकदा खळबळ उडाली. या निमित्ताने महाराष्ट्राला मातग महासघाची आणि त्याच्या कार्यकर्त्यांची, कार्याची माहिती मिळाली. मुख्यमत्र्यापासून सर्व विरोधी पक्षाच्या आणि सघटनाच्या प्रमुखानी समाजकटकानी घडविलेल्या घटनेचा निषेध तीव्र शब्दात नोंदविला

त्यात पुण्याच्या एका वृत्तपत्राने प्रा. जमदग्नीची या सदर्भात घेतलेली मुलाखत फार गाजली—

'अब्रू वाचली पण चोरच साव झाले !'

या मुलाखतीचा संदर्भ देऊन कॉलम भरभरून लेखन घडत गेले

## : ११ :

दलित मुक्ती मचाच्या वतीने एका भव्य व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. 'व्यासपीठ' या व्याख्यानमालेच्या निमित्ताने दलित चळवळीतील श्रेष्ठ आणि ज्येष्ठ नेते, साहित्यिक आणि दलित साहित्याचे समीक्षक 'व्यासपीठा'वर येणार होते. 'आबेडकर आणि मार्क्स', 'दलित चळवळीची दिशा आणि भविष्य', 'दलित साहित्य-प्रेरणा आणि स्वरूप', 'दलित रगभूमी', 'दलित कविता आणि समाज', 'दलित आणि समाजव्यवस्था—काल आज उद्या' अशा विषयावर भाषणे झालेली होती

दलित साहित्य चळवळ आता चागली फोफावून स्थिरावली आहे, दलित साहित्यान साहित्याचा प्रात अधिक समृद्ध केला आहे, दलित साहित्य रजनासाठी नसून पिढयान्पिढयाच्या दालित्य भजनासाठी आहे, औद्योगिक विश्वाच्या प्रगतीबरोबरच पुन्हा एकदा आबेडकराचा विचार करायला पाहिजे, आबेडकराचा धम्म विचार हा मार्क्सच्या साम्य विचाराशी सदृश्य असून दलिताकडून बुद्धधम्म हा पारपरिक हिंदू धर्माप्रमाणे बनविण्याचा प्रयत्न होत आहे, दलित चळवळ विद्रोहातून ब्राह्मण्यग्रस्ताचे साम्राज्य सपवून सामाजिक समता आणणारी चळवळ आहे, दलित चळवळीच्या विद्रोही चळवळीने सवर्णांचे डोळे उघडत नसतील तर विघटनाची कास धरणे अपरिहार्य होईल का ? असे निष्कर्ष 'व्यासपीठ'च्या व्याख्यानमालेतून व्यक्त होत होते वर्तमानपत्रानी विशेष जाणीवपूर्वक या व्याख्यानमालेची दखल घेतली होती.

रेणुकेला 'व्यासपीठ' सचालकानी खास आग्रहपूर्वक बोलावले होते. तिने विषय निवडताना मोठेच चातुर्य दाखविले होते. तिचा विषय 'दलित चळवळ : काळ आणि भान' असा होता दलित साहित्य आवर्तात सापडून त्याची एक प्रकारची कोंडी झाली आहे.

दलित साहित्यात अधिक व्यापकता आणि विचाराची सखोलता आली पाहिजे, असे विचार पूर्वीच्या वक्त्यांनी वारवार व्यक्त केले होते या विचारावरचा उपाय आणि अशी कोंडी होण्यामागची कारणे ज्या तऱ्हेने सांगितली गेली होती त्यापेक्षा वेगळेपणाने प्रा. रेणुकेने विचार मांडले. मातंग समाजातील एखाद्या तरुणीने प्रथमच अशा प्रकारे व्याख्यानमालेच्या व्यासपीठावरून व्यापक स्वरूपात चर्चा केली होती. तिचे भाषण खूपच गाजले. तिने तिच्या भाषणात ज्या पायावर दलित साहित्य उभे होते त्या मूलभूत विचारानाच आव्हान केले होते–

विद्रोही चळवळ या मातीतून मुळी निर्माणच झालेली नाही. कारण विद्रोही चळवळीची बीजे या देशात इंग्रजाच्या तथाकथित ज्ञान गाठोडीतून गाजरगवताच्या बीजासारखी येऊन पडली आणि पिढ्या-पिढ्याच्या अन्यायाला विद्रोहाची धार आली. एका विशिष्ट मध्य काळाच्या कालखंडामध्ये आचारकांडाला महत्त्व आले आणि नीति-अनीतीच्या, शूद्राशूद्रतेच्या कल्पनाना विशेष महत्त्व आले पण त्याच काळात मानवतावादी सनातन संस्कृतीला लागलेले हे ग्रहण फेडण्या-साठी बंडाचेही निशाण परोपरीने हाती घेतले गेले. पण त्या बंडात फुटीरतेची बीजे नव्हती, एकात्मतेसाठी लढलेला तो आध्यात्मिक लढा होता. सामाजिक अन्यायाचा विचारच करायचा तर कोणी कोणावर केला अन्याय ? कोणाचा कोणावर झाला अन्याय ? कोण कुणाचे दास झाले ? कोण कुणाचे सेवक झाले ? याचा मुळातूनच विचार केला तर उत्तरे काही निराळेच सांगून जातात– राजा हरिश्चंद्र डोंबाघरी विकला जाऊ शकला गुलाम म्हणून तेव्हा सामा-जिक अन्याय कुणावर झाला होता ? ज्ञानेश्वराना समस्त समाज-व्यवस्थेनेच नाकारले तेव्हा अन्याय कोणावर झाला होता ? नामदेवाला विसोबा खेचराला गुरुस्थानी मानावे लागले होते तेव्हा सामाजिक अन्याय कोणावर झाला होता ? सोनकोळी जमातीतल्या पोरीच्या पोटी जन्माला आलेल्या एका कोळी पोरान-व्यासान लिहि-लेल महाभारत आणि केलेल वेदाचं संपादन सर्वांना शिरोधार्य मानाव लागल तेव्हा कोणी कोणावर काय लादलं ? अन्याय झाला कुणा-वर ? ढोरकोळी समाजातल्या एका पोरान रामायण लिहिल आणि आदर्श आपण सारेच गिरवतो आहोत तेव्हा कोण कुणावर अन्याय करीत असत ? परमेश्वराचे दशावतार हे कोणी कोणाविरुद्ध केलेल युद्ध होत ? कोणाला न्याय देण्यासाठी हे सार घडल ? लोककथा-मधल्या युगायुगाच्या गरीब भिकारी ब्राह्मणाला मनुस्मृतीन कडक व्रताचरण आणि बंधनाच्या जाळ्यात अडकवलं तेव्हा कोणी कोणा-वर अन्याय केला होता ? त्याच दशावतारातील बुद्ध अहिंसेचे निशाण घेऊन निघाले ते या देशाचे सनातन राष्ट्रीयत्व अबाधित रहाव म्हणूनच ! या देशाच सनातन राष्ट्रीयत्व म्हणजेच हिंदू धर्मातील सर्वभूती परमेश्वराचे तत्त्व ! म्हणजेच वारकऱ्याच्या विष्णुमय जगाची कल्पना ! हे सारे मांडले गेले ते कोणाला राष्ट्रातून फोडून काढण्यासाठी की कोणावर सामाजिक अन्याय करण्यासाठी ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी चवदार तळ्यावर केलेल्या धर्मसंगराच्या इतिहासाचा उल्लेख करून डॉ. बाबासाहेबानी केलेला विद्रोह हा मुळी हिंदूधर्माच्या उच्च तत्त्वज्ञानाशी नव्हताच तो तात्कालिकपणे निर्माण झालेल्या कर्मठपणाने समाजाचे विभाजन करू पाहणाऱ्या आचारकांडा-विरुद्ध होता. म्हणूनच हिंदू धर्माचा अहिंसात्मक पथ असलेल्या बुद्ध मताचा स्वीकार त्यानी आपल्या अनुयायासह केला. राष्ट्र तोडण्या-साठी नव्हे तर जोडण्यासाठी ! त्याची तळमळ, तगमग ही प्रबुद्ध भारत आणि बहिष्कृत भारताचे पुन्हा एकवार भारत राष्ट्र बनविण्यासाठी होती. पुन्हा पूर्व वैभवसंपन्न सनातन राष्ट्र उभारण्यासाठी होती, याचे भान आमच्या विद्रोही चळवळीला नाही. कवी बीच्या 'डंका' कवि-तेच्या ओजस्वी ओळी म्हणून रेणुकाने दशावतारापासून ते आंबेड-करापर्यंत सर्वांची मीमांसा केली. औद्योगिक प्रगती बरोबरच या विज्ञान युगात दलित चळवळीचे लक्ष्य हे मुख्यत्वे करून आर्थिक विषमतेतून प्राप्त झालेल्या पददलिततेकडे पाहिजे दास्य आणि लाचारी आणि त्यातून निर्माण होणारे अज्ञान या सगळ्याच्या मुळाशी असते 'भूक !' आर्थिक विषमता ! म्हणूनच दलित चळवळीने श्रम-प्रतिष्ठेचे महत्त्व ओळखले पाहिजे. त्याचबरोबर शैक्षणिक चळवळीचे महत्त्व ध्यानी घेतले पाहिजे. मग भारताचे मन स्पृश्यास्पृश्यतेच्या पलीकडे जाऊन डॉ. बाबासाहेबानाही शिरोधार्य मानते. कर्मठ जातीय-वादाच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन जाणारा समन्वयवादी विचार या देशात नेहमीच सांगितला गेला. 'दैवायत्तं कुले जन्म स्व हस्ते नु पौरुषम् !' ते पौरुष जो करील त्याला भारतीय परमेश्वर मानतो. महात्मा गांधीचे उदाहरण आपल्यासमोर आहे औद्योगिक विकसनाच्या गर्दीत जेथे गावच राहत नाही तेथे गावगाड्यात अज्ञान मूलकतेने घडणाऱ्या अन्यायाचा विचार करीत बसण्यात काय अर्थ आहे ? या देशावरच निष्ठा ठेवायची की नाही ? असा प्रश्न विचारणाराना मला विचारावेसे वाटते एकाच आईच्या कुशीतून जन्माला येणारी विविध वृत्तीची मुले आईविषयी शंका घेत नाहीत. घेतली तर ते योग्य होणार नाही. यादृष्टीने विद्रोही चळ-वळीला वळण लागले पाहिजे म्हणूनच विद्रोही चळवळीने काळाचे भान ठेवून राष्ट्रीय एकात्मतेसाठी बंधुत्वाचा मंत्र जपत आर्थिक विषमतेला मूठमाती देण्यासाठी ज्ञान आणि श्रम या दोन्हींची उपा-सना चळवळीच्या स्वरूपात केली पाहिजे. अगस्त्याचे व्रत घेतले पाहिजे ! मग अस्पृश्यतेचा कलंक समूळ नष्ट होईल. झाले गेले विसरून जाऊन जातीयतेचे निर्माण झालेले सूडाचे चक्र थांबविण्या-साठी कुटुंब संस्थेपासून सुरुवात केली पाहिजे आणि त्याचा एकच मार्ग नि:शंक रोटीबेटी व्यवहार ! मग विघटनाचे ज्वालामुखी भडक-णार नाहीत ! आपण सारेच सनातन भारतीय सूर्याचे पुजारी आहोत हेच विसरून कसे चालेल ?

–प्रा. रेणुकेचे 'व्यासपीठा'तले ओजस्वी, वेधक भाषण महाराष्ट्र-भर गाजले. रेणुकावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. एव्हढेच नव्हे तर दलित साहित्य समेलनाच्या अध्यक्षानी, दलित मुक्ती मंचाच्या पुढाऱ्यानी त्या भाषणाची दखल घेतली.

प्रा. रेणुकेला आलेल्या अभिनंदनाच्या पत्रात सुमान गायकवाडचे अतिशय भारावून लिहिलेले पत्र होते विठ्ठलरावानी पुन्हा एकदा त्याच्याशी लग्न करण्याविषयीचा हट्ट धरला होता. प्रा. रेणुकेच्या मनात आणि डोक्यात मात्र प्रा. जमदग्नीचेच विचार घोळत होते

## : १२ :

रेणुका मुंबईच्या बैठकीला जाऊन आली होती. परिषदेच्या दृष्टीने झालेल्या बैठकीत आत्तापर्यंत केलेल्या कार्यक्रमाचा आढावा घेतला गेला होता. परिषद यशस्वी होण्याच्या दृष्टीने पैसे गोळा होणं फार महत्त्वाच होतं. त्या दृष्टीने काही भेटीगाठी झाल्या होत्या.

मुंबईतल्या वास्तव्यात रेणुकेचा मुक्काम डॉ गोखल्याच्या घरीच होता. डॉ. गोखले आणि चारुशीलाताई तिच्या संघटनात्मक कार्यावर भलतेच खूष होते. दोनतीन दिवसाच्या तिच्या वास्तव्यात राजीव विषयी खूप बोलणं झाल होतं. डॉ. गोखल्याच्या दीप्तीनं तर रेणुकेला धक्काच दिला होता. लहानपणापासून एकत्र वाढलेल्या राजीववर तिच प्रेम जडलं होतं. प्रगती दीप्तीपेक्षा थोडी मोठी. तिनं ही गोष्ट रेणुकेच्या कानी घातली होती. राजीवचा मित्र संजीव नेने प्रगतीनं पसत केला होता आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे डॉ. गोखल्यानी या लग्नांना समती दिलेली होती. रेणुकेनं विठ्ठलरावाचा विचार डॉ. गोखले आणि चारुशीलाताईना सागितला. तेव्हा डॉ. गोखल्यांनी तिला तिच्या मनाचा निर्णय विचारला आणि रेणुका लाजून चूर झाली. तिनं जमदग्नीशी लग्न करण्याचं निश्चित केल होत. परिषदेमध्ये होणाऱ्या सामूहिक विवाहातच हे विवाह करावेत असं सुचविले आणि रेणुका हुरखून गेली.

मुंबईच्या बैठकीहून ती आली ती गुलाबी स्वप्न उराशी घेऊनच! तिनं आणलेल्या बातम्यानी विठ्ठलरावाला धक्का बसला होता; परंतु विठीन त्याची समजूत काढली होती.

¤

रेणुका आज विशेष खुषीत होती. तिन आपला निर्णय प्रा. जमदग्नीच्या आईजवळ सागायचं ठरविल होतं. खरतर तिचा हा निर्णय केव्हाच षट्कर्णी झाला होता. रेणुका प्रा. जमदग्नीच्या घरी पोहोचली तेव्हा तिला उगाच हुरहुरल्यासारखं झाल. ती दाराशीच थबकली. तिला का कोण जाणे निर्मलाताई आपल्याला स्वीकारतील की नाही अस वाटत होतं. तिन धडधडत्या हातानं डोअरबेल दाबली. खरतर तिची प्रा. जमदग्नीच्या घरी येण्याची ही पहिलीच वेळ नव्हती.

'ये ग रेणुका!' निर्मलाताईंनी तिला हात धरून घरात आणलं. 'काय ग, रागावलीस माझ्यावर?'

'नाही बाई! तुमच्यावर कशी रागवेन मी आई!'

'अग मग बरेच दिवस अगदी फिरकली नाहीस ती!'

'नाही, मी किनई...!'

'समजले. अलीकडे तुझ्या डोक्यात नुसती ती परिषद भरलीये! खरं ना! जमदग्नी सागत होता मला.'

अग पण मग माझ्या जमदग्नीचा ससार कसा करणारेस तू?' निर्मलाताईंनी तिच्या डोक्यावरून कौतुकानं हात फिरवत विचारल.

'आई...' रेणुकेला राहवलं नाही. ती एकदम त्याच्या कुशीत शिरली.

'रेणुका, अग मी केव्हाच ओळखलं होतं! मला शका होती तुझी आणि समाजाची आणि त्यात काय ह्यांनी तर मुळी सरळच कळवलं पत्रानं, तुमच्या त्या शंकराचार्यांच्या समोर झालेल्या प्रतिज्ञेनंतर!'

'आई...मी...मला भीती वाटत होती तुम्ही...!' रेणुका कशी-बशी बोलली निर्मलाताईंच्या निर्मल प्रीतीनं शकांचं वादळ केव्हाच विरून गेल होतं.

'मी आडवी येईन म्हणून! अग आता जमदग्नीच्या वडलांनीच फर्मान काढल्यावर मी काय बोलणार?'

'म्हणजे तुम्ही . ?'

'तसं नव्हे ग. तू अगदी खुळी आहेस. अग अशा रूढी मोडताना प्रत्येकाला चिंता वाटणारच जग काय म्हणेल याची. पण तुमचा खटाटोप जगान तुमच अनुकरण करून जगावं असा आहे नं? मग तुम्ही सुरुवात नको करायला?'

'आई तुम्ही किती महान आहात!'

'नाही ग बाई मी आपला लहानच आहे. माझा जमदग्नी तुम्यामुळे लग्न करायला तयार झाला हा माझा स्वार्थच नाही का?'

'आई...'

'हे बघ आता काही बोलू नकोस. अगोदर तुझं तोंड गोड करते. लाडू करून ठेवलेत चुटीयाचे जमदग्नीला आवडतात म्हणून. चल बघू आत.'

निर्मलाताईंनी रेणुकेला लडिवाळपणाने आत नेले. रेणुका मोगऱ्यासारखी फुलून आली होती. तेव्हढ्यात दारात मोटारसायकलचा आवाज आला.

'जमदग्नी आला वाटतं! थाब हं चागली गम्मत करते त्याची! तू बाहेर जाऊन रडत बस हं!' रेणुकेला आईच्या खिलाडूपणाचं कौतुक वाटल. जमदग्नी धाडधाड करीत घरात आला मात्र–

'वा! कायपण समाजसेवा चाललीये! काय रे तू लग्नाच वचन दिलस हिला?'

'अ...नाही तसं...' जमदग्नी बोलून गेला.

'नाही? मग ही सटवाई कशी आलीये इथे गळेपडूपणा करायला! करणारेस तिच्याशी लग्न? आणि मारे आजन्म अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा केली होतीस ना?'

'हो पण मी तस काही केलही नाही आणि बोललोही नाही!' जमदग्नी गोंधळून रेणुकाकडे पाहत म्हणाला.

'काय पण ढोंगीपणा! हे हा! तुम्ही पुरुष असलेच! तुम्हा सवर्णीयाना आम्ही दलित मुली फक्त फिरवयाला आणि मजा करायला हव्यात! म्हणे मी काही बोललो नाही! मग त्या दिवशी, रेणुका तू मला माझी प्रतिज्ञा मोडायला लावलीस! कशाला म्हणाला होतास? किती मुलीना फसवलंय अस! रेणुका तोड वेंगाडून तावातावाने बोलत होती.

'हा रेणुका, मी कुणालाही फसवलेल नाही. मला मत व्यक्त करायला काही कोणाची बदी नाही!'

'मग करणारेस हिच्याशी लग्न?'

'मी मागेच सागितल होत तिची तयारी असेल तर जरूर करीन म्हणून! त्यात फसवायचा मुळी प्रश्नच येत नाही!' जमदग्नी आता जरा रागानेच म्हणाला.

'माझ्या मनाविरुद्ध ? जमदग्नी, मांग मुलीशी लग्न करण्या-ऐवजी तू अविवाहित राहिलेला सहन करीन मी !'

'पण आई,...!'

'का आता का वाचा बसली !'

'आई मला असं वाटत मी समाजहिताच्याच दृष्टीनं निर्णय घेतला आहे. बाबांचीही त्याला अनुमती आहे. प्राचार्यांनीही पाठिंबा दिलाय. तेव्हा तू दुराग्रह धरू नये असं वाटतं.'

'म्हणजे एव्हढ्या थराला गोष्टी गेल्या तरी मला तू सांगितलं नाहीस !'

पण आता सांगतोय ना ?' जमदग्नी खंबीरपणे म्हणाला.

'मग चला दोघही. चुटीयाचे लाडू केलेत ! तोंड गोड करा आणि पुन्हा आम्हो असं काही ठरवल नव्हतं असं म्हणू नका !' एकदम निर्मलाताई बोलल्या आणि जमदग्नी फजित झाला. रेणुका खळखळून छद्मीपणाने हसत होती. जमदग्नी लटक्या रागानं तिच्यावर धावून गेला. आई आत गेली होती. रेणुका जमदग्नीच्या मिठीत गुदमरून गेली.

'अरे, सोड ना !' आई येतील हं परत बोलवायला.' रेणुका लाजऱ्या आवाजात प्रफुल्ल अंतःकरणाने प्रेमभरल्या नजरेन जमदग्नी-कडे पाहत म्हणाली

¤

परिषदेच्या कामाला आलेली गती पाहून बापूराव आवचिते संतप्त होत होता. त्याच्याच जातीतल्या एका मुलीनं त्याच्या पुढार-पणाला सुरुंग लावला होता. मातंग महासंघाच्या कामात त्याला कुठेही सहभागी करून घेतलं नव्हतं. उलट एक जोगडा, भिक्कारडा माणूस मातंग समाजाचं जिल्ह्याचं नेतृत्व करीत होता. त्याच्या डोळयादेखत त्याच्याच गावात, ज्या गावावर त्यानं सत्ता गाजविली, जिथे त्याचा शब्द म्हणजे हुकूम होत होता, तिथे त्याच्या जातीतले शेकडो प्रतिनिधी येणार होते आणि त्या सगळ्यासमोर त्याची एक प्रकारे नाचक्की होणार होती. ही परिषद निदान संगमपुरात होऊ नये असे त्याला मनोमन वाटत होते, पण तो हताश होत होता. सगळे फासे त्याच्या विरोधात पडत होते. सुदैवानं त्यान गावपातळी-वर नगराध्यक्ष त्याच्या राजकारणात त्याच्या बाजूला ओढण्यात यश मिळविलं होतं. शामराव पाटील देखील आता परिषद इथे होऊ नये याच मताचे होते. पण त्यांच्या डोळ्यादेखत परिषदेच्या बातम्या वर्तमानपत्रात होत्या. मुख्यमंत्री परिषदेला उपस्थित रहावेत यासाठी प्रयत्न सुरू होते. सामुदायिक विवाहातील जोडप्यांची संख्या वाढत होती. त्याबरोबरच परिषदेला येणाऱ्या प्रतिनिधींची संख्या वाढत होती. स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये परिषदेच्या दृष्टीने तयारीला सुरुवात झाली होती. मातंग महासंघाच्या वतीने कार्यकारिणीतील दहा स्वयंसेवक स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये होस्टेलमध्ये येऊन राहिले होते. जीवाबाई मांग, फकीरबाबा, परशुराम आणि फुला रात्रंदिवस पडेल ते काम करायला सज्ज होते. जीवाबाईने आपल्या फडाची गाडी खास परिषदेसाठी वापरायला दिली होती. निधी गोळा होत होता. आदितराव गायकवाड, उमाजीराव आवचिते धावपळ करीत होते. दलित साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षानी परि-षदेचं अध्यक्षपद स्वीकारायचं मान्य केलं होतं. बापूराव आवचितेला सर्वांत काही खटकलं असेल तर सामुदायिक विवाहाचं पौरोहित्य करण्यासाठी जगद्गुरू शंकराचार्य उपस्थित राहणार होते ही गोष्ट. मुळात परिषदेचा डाव उधळून लावण्याचा प्रयत्न बापूराव आवचिते करीत होते. त्यासाठी त्यांनी डाव टाकला होता.

¤

आदितराव गायकवाड आपल्या मुंबईच्या कार्यालयात बसले होते. त्यांच्यासमोर पुणे, कोल्हापूर, मराठवाडा, खानदेश, कोकण या सर्व प्रमुख भागातील मोजकेच कार्यकर्ते मुद्दाम फोननं बोलावून घेतले होते, रेणुकाही मिटींगला उपस्थित होती. आदितराव गायकवाडांनी संगमपूरच्या नारायणराव तिटमे, शामराव पाटील आणि गावातल्या स्वागत समितीतील एकवीसपैकी पंधरा जणांनी सह्या करून पाठवि-लेले पत्र सर्व सदस्यांसमोर टाकले. परिषद संगमपुरात घेण्यातील असमर्थता या मंडळींनी स्पष्ट केली होती. 'जातीय संघटनांचा हात या मातंग महासंघाची परिषद भरविण्यामागे असून दलित चळवळीला विरोधी अशी ही परिषद आहे हे प्रा. जमदग्नी यांचा विवाह आणि शंकराचार्यांचे परिषदेत होणारे आगमन यामुळे सिद्ध होते आहे. त्यामुळे आम्ही ही परिषद संगमपुरात घेऊ इच्छीत नाही. पुन्हा एकदा स्पृश्यास्पृश्यतेला खतपाणी घालणाऱ्या आणि धर्मदंडाचा बडगा दलिताच्या पाठीत घालणाऱ्या या परिषदेचा निषेध या पत्रा-द्वारे आम्ही करीत आहोत.'

पत्रातील आशयाने मातंग महासंघातील कार्यकर्त्यांचा अगदी बरोबर बुद्धिभेद केला होता. रेणुकेला यातील कोणत्याही गोष्टीची कल्पना नव्हती. कोल्हापूरकडील कार्यकर्त्यांनी तिला धारेवर धरले. एकंदर सर्वांच्या भावना ऐकून घेतल्यावर मात्र आदितराव गाय-कवाडांनी सर्वांना काय घडले असावे ते समजून सांगितले आणि सगळ्यांनीच संगमपुरात परिषद घेण्याचा निर्णय घेतला. दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाची भेट घेतली. त्यांना हा प्रकार समजावून सांगितला आणि त्यांनी कोणत्याही परिस्थितीत परिषदेला उपस्थित राहण्याचे मान्य केले.

¤

आदितराव गायकवाड जसे कामगार आणि दलित समाजाचे पुढारी होते तसेच ते सरकारी पक्षाचे पुढारी होते. त्यांनी लाइटनिंग कॉल लावून नारायण तिमटयांना प्रदेशाध्यक्षांच्या मार्फत विचारणा केली. होती.

आदितराव गायकवाड कार्यकर्त्यांना घेऊन मुख्यमंत्र्याच्या भेटीला गेले तेव्हा त्यांनी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या स्वागत समितीच्या पत्राबद्दल विचारले. आदितरावांनी थोडक्यात बापूराव आवचित्याची हकीगत सांगितली. उलटसुलट प्रश्नोत्तरे होऊन अखेर मुख्यमंत्र्यांनी परिषदेच्या समारोपासाठी येण्याचे मान्य केले आणि स्वागत समितीच्या पत्रास चोख उत्तर मिळाले.

¤

स्वागत समितीतील लोकांनी पाठविलेल्या पत्राला काटशह म्हणून स्वामी विवेकानंद कॉलेजच्या मॅनेजमेंटने पत्रक काढून परिषदेचे यजमानत्व स्वीकारण्याची तयारी दाखविली. त्यांचे पत्रक प्रसिद्ध झाले आणि त्याचबरोबर नारायणराव तिमटयांनी आपला खुलासाही केलेला होता. आदितराव गायकवाडांची खूपच धावपळ झाली होती.

रेडिओन साथ दिल्यामुळं त्याची काम पुष्कळ सरळ झाली. रेणुकेला या प्रकारान खूपच मनस्ताप झाला होता, परतु कॉलेजन सारं निभावून न्यायच ठरविलं होत. विश्वहिंदू परिषदेन मातग महासघाच्या परिषदेच्या बाबतीत आपला सबध केवळ पाठिंबा देणारी सस्था इतकाच असल्याचं स्पष्ट केलं होतं.

बापूराव आवचितेन टाकलेला हाही डाव हातोहात उधळला गेला तरी परिषदेच्या तयारीला काही प्रमाणात खीळ बसली. त्या निमित्तानं त्याच नाव पुन्हा वर्तमानपत्रात झळकल. दलित मुक्ती मचच्या सैनिकांनी बापूराव आवचितेच्या नेतृत्वाखाली शकराचार्यांसमोर निदर्शने करण्याचा निर्णय घेतल्याचे वर्तमानपत्रातून जाहीर झाले आणि मग मात्र बापूरावानं वेठीला धरलेले स्वागत समितीतले लोक पुन्हा परिषदेस पाठिंबा देऊन मोकळे झाले. परिषदेस मुख्यमंत्री स्वत: येणार असून त्यांच्याबरोबर सर्व दलित आमदार-खासदारांना निमत्रणे गेलेली आहेत असे समजल्यावर मात्र शामराव पाटलानी आपला पवित्रा बदलला. नगरपालिकेच्या वतीने परिषदेचे स्वागत करून शकराचार्य आणि मुख्यमंत्री याच्या स्वागताची योजना आखली होती.

बापूराव आवचिते चरफडत होता. आपण त्रास दिल्याने निदान सघटनेत आपण सामील व्हावे असे आदितराव आवाहन करतील आणि आपण सघटनेत सामील झालो की पुढचं सारं काही साधता येईल ही त्याची योजना सवँच पातळीवर कोसळून पडत होती. त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जात होती. आपण जगतो कशासाठी असे त्याना होऊन गेले होते. त्याच्या डोक्यात ज्वालामुखी भडकला होता. या सगळ्याला कारणीभूत असलेली रेणुका आणि जमदग्नी याना सपवून टाकण्याचे विचार त्याच्या डोक्यात थैमान घालीत होते. बापूराव सैतान झाला होता पण अजूनही त्याला सधी सापडत नव्हती. मातंग संघटनेशी त्याच वैर नव्हतच मुळी पण या रेणुकेपायी संपूर्ण जातीच वैर त्यान ओढवून घेतल होतं. या रेणुकेला सगमपुरात जातीत स्थान मिळवून द्यायला फकीरबाबा कारणीभूत झाला होता. एका जोगड्यान बापूरावाला जीवनातून, राजकारणातून उठविलं होत या जाणिवेन त्याच्या डोक्याचं रान झाल होतं. आपल्या पुठच्यातल्या खास माणसाना त्यानी बोलावून घेतल होत. घर-दार, पैसा आडका सारं काही पणाला लावून तो आता कामाला लागला होता. भोम्या त्याच्याबरोबर होताच. त्याचं घरात चाललेलं बोलणं ऐकून बापूरावाची सरळ साधी बायको सखूबाई मात्र भेदरली होती.

## : १३ :

अस्सल माग, वाळे, बुरूड, दवकर, देसूर, डाकेलवार वाजत्रीमाग, ढोर, घडशी, होलगे, जिनगर, जिराइत, काकरमोची, नाडे, मागगारुडी अशा अनेक पोटजातीचे मातग आपल्या पारंपरिक आणि नित्य धद्यातल्या प्रदर्शनीय वस्तू घेऊन अण्णाभाऊ साठे नगरात मोठ्या उत्साहान दाखल होत होते. जमेल ती वाहन वापरून, काही रेल्वेन विदाऊट तिकीट तर काही पायी रस्ता तुडवीत येऊन पोहोचली होती. हे अभूतपूर्व समेलन टिपण्यासाठी टी. व्ही. कॅमेरे सज्ज होते. मोठ्या वर्तमानपत्राचे वार्ताहर आवर्जून उपस्थित होते.

स्वागत समितीच्या लोकानी जेवणखाण, पाणी आणि राहण्याची उत्तम सोय स्वामी विवेकानद कॉलेजमध्येच केली होती. अण्णाभाऊ साठे नगर उभारण्याची जबाबदारी महाराष्ट्रातल्या मातंग तमासगीर फडकऱ्यानी केली होती. जीवाबाई माग जातीनिशी राबल्या होत्या. पाच फडाचे तबू कनाती एकत्र लावून भव्य नगर वसविलं होतं. त्यातच एक भव्य दालन मातग समाजाच्या सास्कृतिक आणि सामाजिक वैशिष्टयांच वस्तुरूप आणि चित्ररूप प्रदर्शन मांडण्यासाठी उपयोगात आणल होत तमाशा फडानी नगराची खास रोषणाई केली होती

प्रदर्शनाच्या भव्य दालनात विभाग पाडून त्यात निरनिराळ्या विशेषाच प्रदर्शन केल होत. एका विभागात मातग समाजाच्या व्युत्पत्तीपासून ते आजच्या औद्योगिक शहरातील त्याच्या जीवनापर्यंतचे ऐतिहासिक टप्पे सामाजिक व सास्कृतिक दृष्टीने चित्रित करून चित्रप्रदर्शन माडले होते. विशेषत: काही फोटोग्राफ्सनी ते अधिक जिवत केले होते. काही प्रसग मातीचे पुतळे उभारून जिवत केले होते. फाशी देण्याचे आणि शिरच्छेद करण्याचे काम करणारे मातग किंवा चाडाळ. दोर वळणारे, बुरूड काम करणारे, गावातील जनावरे ओढून नेणारे असे प्रसग वेधक झाले होते. प्रदर्शनाची कॉमेंट्री करण्यासाठी खास चार तरुणाची नियुक्ती केली होती. स्मशान व्यवस्थापक, वाजत्र्ये, मातामरीचे देव्हारे याची चित्रे वैशिष्टचपूर्ण वाटत होती.

दुसऱ्या विभागात वस्तुप्रदर्शनात मागाच्या डफड्यापासून पिपाणीपर्यंतची वाद्ये. मातगीचे देव्हारे, टोपल्या, घायपत, आबाडीचे दोर, गोफणी, शिकी, केरसुण्या, टोपल्या, सुपे, जोडे, कमावलेली कातडी, दारू बनविण्यासाठीची डबडी मडकी, बावू, चट्टे, पाट्या अशा वस्तू होत्या. घरात नित्य वापरायची भाडी, दोर वळण्याच्या फिरक्या खुटाळी, गुर फाडायची कोयती एक ना अनेक वस्तू माडल्या होत्या. याच विभागात मागाच्या मागवाड्यातल्या झोपड्या, घरे याची भव्य चित्रे माडली होती. घराची मॉडेल्स माडली होती. याच विभागात भिक्षा मागणारे, जेवणावळीभोवती आशाळभूतपणे जमलेली माग पोरे चितारून मांडली होती.

शेजारच्या विभागात औद्योगिक शहरातील कामगार, हमाल माग जीवनाची बोलकी चित्रे माडली होती. मातग समाजाच्या सामाजिक राजकीय, आर्थिक प्रश्नाची माहिती तक्त्यांच्या स्वरूपात माडली होती व्हिडोओ फिल्मची व्यवस्थाही याच दालनात केली होती. याच दालनात अण्णाभाऊ साठे याच्या जीवनावरील दृश्ये आणि त्याचे साहित्य माडले होते.

प्रदर्शनाच्या रूपाने भारतीय संस्कृतीतील मातग समग्रपणाने साकार झाला होता. प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते.

अण्णाभाऊ साठे नगरचा एक भाग सामुदायिक विवाहांसाठी सुशोभित केला होता. एकावेळी एक्केचाळीस विवाह या एकाच मडपात जगद्गुरू शकराचार्यांच्या पौरोहित्याखाली होणार होते. पुराणातरीच्या स्वयवरोत्सवाचे स्वरूप या दालनाला आले होते. विश्व हिंदु परिषदेचे पन्नास कार्यकर्ते हे दालन सांभाळत होते. या एक्केचाळीस विवाहातील दोन विवाहाकडे परिषदेच लक्ष वेधलेलं होत. या समारभानतरच मुख्यमत्र्यांच्या हस्ते परिषदेचा समारोप होणार होता.

नगराचा तिसरा भाग सभागृह होते. चारहजार प्रतिनिधी बसू शकतील अशा या सभागृहात उच आणि भव्य असे व्यासपीठ होते. व्यासपीठाच्या पार्श्वभूमीवर भारतमातेच्या विशाल नकाशात महामरी मातगीचे विलोभनीय चित्र होते. अखिल महाराष्ट्र मातग महा-

सघाचा फलक शिरोभागी होता. सबध दिवसभर चालणाऱ्या या परिषदेच उद्घाटन केंद्रीय कामगार कल्याण मंत्री करणार होते आणि अध्यक्षपदी समाजकल्याण मत्री विराजित होणार होते. आदितराव गायकवाडानी सपूर्ण परिषदेच अध्यक्षपद दलित साहित्य समेलनाच्या अध्यक्षाकडे सोपविल होत. नगराध्यक्ष आणि आमदार तिटमे आता सर्वांच्या स्वागतासाठी सिद्ध होते. सुभानराव गायकवाडाकडे प्रमुख पाहुण्याच्या सदर्भातली सर्व व्यवस्था सोपविली होती. प्राचार्य डॉ. दुर्वास आणि कॉलेजचे प्राध्यापक मोठ्या तत्परतेने आलेल्या सर्वांच्या व्यवस्थेत गढून गेले होते.

आदल्या दिवशी रात्रीच आदितराव गायकवाडानी मातग महासघाच्या कार्यकारिणीची बैठक घेऊन आम सभेमध्ये मजूर करावयाच्या ठरावाचा मसुदा तयार केला. त्यात–

(१) सरकारी, निमसरकारी, खाजगी नोकऱ्यामध्ये असलेल्या राखीव जागामध्ये प्रत्येक जातीच्या लोकसख्या प्रमाणात जागा राखून ठेवाव्यात. (२) मातग मुलासाठी आश्रमशाळातून काही विशिष्ट जागा राखून ठेवाव्यात. (३) मातंग समाजाच्या उद्योगाना लघुउद्योगाचा दर्जा देऊन त्यास सहाय्य करावे व आधुनिक तत्र-प्रशिक्षणाची सोय करावी प्लॅस्टिक वस्तूच्या आक्रमणाचे स्वरूप लक्षात घेऊन उद्योग आणि काम याची हमी सरकारने घ्यावी. (४) मजूर, हमाल आणि कामगार तसेच कारागीर याचे वेतन निश्चित करावे व त्याना रोजगाराची हमी देऊन पेन्शन योजना सुरू करावी (५) मागासवर्गीयाची नोद अद्ययावत करून त्याना निवारा आणि रोजगार हमी या गोष्टीची उपलब्धी करून द्यावी.– अशा काही ठरावाचा विशेषत्वाने समावेश होता.

◻

मातग महासघाच्या परिषदेच उद्घाटन झाले कडाके फुटले फटाके वाजले. स्वामी विवेकानद कॉलेजमध्ये झालेली, मागुड्यातल्या उपाशीपोटी काबाडकष्ट करीत जगणाऱ्या मातगाची सोय पाहून; आलेले प्रतिनिधी अक्षरशः दिपून गेले. आपण स्वप्न नगरीत वावरतो आहोत असे जणू प्रतिनिधीना वाटत होते. आदितराव गायकवाड, फकीरबाबा, रेणुका, उमाजीराव आवचिते, परशुराम आणि कार्यकर्ती मंडळी अगदी खूश झाली होती.

आता लगीनघाई उडाली होती. सगमपुरान शकराचार्यांच अभूतपूर्व स्वागत केलं होत. शकराचार्य अण्णाभाऊ साठे नगरात धर्मदडासह उपस्थित होते. पण या धर्मदडाला स्वत:चं नाक कापून अपशकून करणाऱ्या बापूराव आवचित्यांन दलितमुक्ती मचाच्या पधरा तरुण निदर्शकासह निदर्शने करून अपशकून करण्याचा प्रयत्न केला होता. आणि पोलिसानी त्या सर्वांना अटक करून ठेवलं होत.

मुख्यमत्र्याच हेलिकॅप्टर बरोबर लग्न लागण्यापूर्वी विवेकानद कॉलेजच्या मैदानावर उतरल आणि अण्णाभाऊ नगरात आता एकच गर्दी उडाली सोहळा पाहण्यासाठी खास कक्ष केलेले होते, तरी त्यात गर्दी मावत नव्हती. मुख्यमत्र्यानी स्वत: जगद्गुरू शकराचार्यांना पायावर मस्तक ठेवून वदन केल आणि शकराचार्य, मुख्यमत्री आणि महासघ याच्या जयघोषान आसमत दुमदुमून गेला.

शकराचार्यांच्या पौराहित्याने मंगल विवाहाची मगलाष्टके झाली. मागाच्या वाजत्रीनी एकच गलबलाट झाला आणि शकराचार्य सर्वांना शुभाशीर्वाद देत असतानाच दोन व्यक्ती जनसमुदायामध्ये निषेधाची पत्रके वाटत होती. दोन पत्रके थेट व्यासपीठावर टाकण्यात आली. तेवढ्यात पोलिसानी त्या दोघानाही अटक करून त्या दोघावर येणाऱ्या प्रसगातून त्याना वाचविले. मुख्यमत्र्यानी समारोपाचे भाषण अत्यत शातपणाने केले. परिषदेत पारित झालेल्या ठरावाचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचे आश्वासन त्यानी दिले. सामूहिक विवाहावर बोलताना ते अतिशय भारावून बोलत होते. 'रेणुका आणि जमदग्नी, दीप्ती आणि राजीव यानी दाखविलेले धैर्य अतुलनीय आहे. राष्ट्रीय एकात्मता मदिराचा तो अढळ चिरा ठरणार आहे. या देशातील सनातन सस्कृतीच्या आचार्यांनी या घटनेला दिलेले शुभाशीर्वाद ही वैभवसपन्न एकात्म भारत राष्ट्राची नादी ठरेल ! आम्ही पुढारी जे व्यासपीठावरून केवळ बोलतो ते कृतीतून करून दाखविण्याचे धाडस विश्व हिंदू परिषदेला प्रतिसाद देऊन मातग महासघाने दाखविले असून ही घटना भारतात एका नव्या सुपर्वाला प्रारभ करणारी आहे असे सागितले. सारीच माणसे भारावून गेली होती. कार्यकर्त्यांच्या छात्या रुदावल्या होत्या. आदितराव गायकवाडानी गावातून मुबईत जाताना उराशी बाळगलेले स्वप्न साकार होण्यास सुरुवात झाली होती.

परिषदेच्या सपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या दलित साहित्य समेलनाच्या अध्यक्षानी भारावून जाऊन आपल्या अखेरच्या अध्यक्षीय भाषणात 'दलित आणि सवर्ण याच्या सूडचक्राला थोपविणारी आणि दलित चळवळीला नवी दृष्टी देणारी परिषद !' या शब्दात परिषदेचा गौरव केला होता.

रात्री जमलेल्या प्रतिनिधींनी आपल्या समाजातील पारपरिक कार्यक्रमानी रात्र जागवली होती. तमाशा कलावतानी सर्वांची रात्रभर मुक्तपणान करमणूक करून नव्या पहाटेचे स्वागत केले होते !

आदितरावानी परिषदेच्या यशस्वितेचे श्रेय स्वामी विवेकानद कॉलेज, सगमपूरनिवासी याना देऊन सर्वांचे आभार मानले होते.

◻

रेडिओवरील बातम्या, वर्तमानपत्रातील क्षणचित्रे आणि टी. व्हीवरील खास कार्यक्रमाने साऱ्या महाराष्ट्राला मातग महासघाच्या यशस्वितेचे विराट दर्शन घडविले. महाराष्ट्राच्या मातग महासघाने भारताच्या जनतेला मानवी शरीरावरील शूद्रतेचा, अस्पृश्यतेचा कलक धुऊन काढण्याचा महामत्र दिला होता. रेणुका आणि जमदग्नी याच्या विवाहान भारतीय एकात्मतेच मनामनातील सवेदन जागृत झाल होतं. समाजातील दुरित नष्ट करण्यासाठी पुन्हा एकवार परशुरामाला जन्म देण्यासाठी रेणुका आणि जमदग्नी पवित्र बधनात बद्ध झाले होते. पवित्र सनातन धर्मदडाच्या साक्षीने सनातन भारतधर्मावर, आर्यधर्मावर श्रद्धा ठेवून !

## : १४ :

नवोदय गुरुकुलात प्रार्थना होत होती. एकात्मतेची बीज मनामनात अकुरत होती. बालमनावरून भेदाचे कलक धुवून जात होते. मानवातील एकात्मतेचा सस्कार बालमनावर होत होता. या वातात नवा परशुराम ज्ञानकण वेचीत होता. रेणुका आणि जमदग्नीच्या सान्निध्यात नवोदय गुरुकुलातली फुल फुलत होती नवा भारत साकारत होता


◻

फकीरबाबाचे मातग सघटन चालूच होते आणि भिक्षाफेरीही चालू होती. घराघराच्या दारादारात जाऊन तो गात होता–

नाना भिंती एकच माती
राजण आणि रांगड्या
जगामधी एकच ब्रह्म गड्या
जगामधी एकच ब्रह्म गड्या ।।

गॅब्रिअेल गार्सिआ मार्खेज यांच्या ' क्रॉनिकल ऑफ अ डेथ फोरटोल्ड ' या कादंबरीचा परिचय

**वसंत आबाजी डहाके**




# एका पूर्वकथित मृत्यूचा वृत्तांत

गॅब्रिअेल गार्सिआ मार्खेज यांचा जन्म कोलंबियात १९२८ साली झाला. त्यांनी स्पॅनिश भाषेत आपले लेखन केलेले असून १९८२ साली त्यांना वाङ्मयाचे नोबेल पारितोषिक मिळाले. ' वन हंड्रेड अियर्स ऑफ सॉलिट्यूड ' ही त्यांची अत्यंत गाजलेली कादंबरी. मूर्त वास्तवता आणि कल्पनारम्यता या दोन धाग्यांनी त्यांच्या साहित्याचा पट विणलेला आहे असे दिसते. प्रत्यक्ष वास्तवाप्रमाणेच लेखक पारलौकिक आणि अद्‌भुतरम्य, स्मृती आणि विलक्षण अनुभव यांचेही वास्तववादी वर्णन करतो. त्यांनी पत्रकार म्हणून बरीच वर्षे काम केले. तपशील भरण्याच्या त्यांच्या वृत्तपत्रीय तंत्रामुळे कादंबरी विश्वसनीय वाटते. घडलेल्या घटनांचा दस्तऐवज असे जरी या लेखनाचे बाह्य रूप असले तरी मार्खेज यांची विश्लेषकाची दृष्टी घटनांमागील विविध स्तरांवर काम करणाऱ्या मानवी मनातही डोकावून पाहत असल्यामुळे त्याला कलाकृतीचे रूप लाभते.

' एका पूर्वकथित मृत्यूचा वृत्तांत ' (क्रॉनिकल ऑफ अ डेथ फोरटोल्ड) या कादंबरीची रचना न्यायालयीन कागदपत्रे, साक्षी, कबुलीजबाब, पुरावे, मुलाखती, विविध व्यक्तींची संभाषणे यातून घडलेली आहे. एका विशिष्ट प्रदेशातील मानवसमूह आपल्या मूलभूत अंत:प्रेरणा आणि सांस्कृतिक

◻



**विश्लेषकाची दृष्टी**
**पूर्ण वेगळ्या तऱ्हेचे निवेदन**

वारसा यांच्या द्वंद्वात सापडल्यानंतर त्याच्या होणाऱ्या विविध क्रिया प्रतिक्रियांचा आलेखच येथे काढला आहे. व्यक्तीचे जीवन घटनांच्या साखळीने जोडलेले असते, पण एका विशिष्ट पद्धतीनेच सारे दुवे जोडले जातील असे नव्हे. कधी कधी साऱ्याच गोष्टी अतर्क्याच्या अदृश्य सूत्रात ओवल्या आहेत असे वाटते, (अर्थात, अतर्क्याचेही काही सूत्र असते असे आपण समजत असलो तर ! ) गावातल्या जवळजवळ प्रत्येकाला सांतियागो नासरचा खून होणार आहे याची कल्पना असते, (फक्त सांतियागोला ते ठाऊक नसते,) परंतु कोणीही कोणत्याही प्रकारे ही हत्या रोखता येईल यासाठी काही करू शकत नाही. यात अगदी साध्यासाध्या योगायोगाचा भाग जसा आहे, तसाच समजशक्तीचा अभावही आहे. प्रारब्ध आणि मानवी प्रयत्न यांची समज. कॅरिबीअन खेड्यातील जीवनाचे चित्र रेखाटीत असताना एकंदरीत मानव समाजाची समीक्षा करण्यात ही कादंबरी यशस्वी होते.

## ‘कोणतीही कादंबरी ही, विश्वाची गुंतागुंत उकलण्याची एक प्रक्रिया असते.’

—गॅब्रिएल गार्सिआ मार्खेज

□

ते त्याला ठार करणार होते त्यादिवशी सातियागो नासर पहाटे साडेपाचला उठला होता. बिशप यायचे होते आणि त्याला त्यांच्या स्वागतासाठी बंदरावर जायचे होते. त्याला पहाटे स्वप्न पडले होते, त्यात तो रिमझिम पाऊस अंगावर घेणाऱ्या झाडांच्या राईतून चालला होता. स्वप्न पाहताना काही काळ त्याला बरे वाटत होते, पण आपल्या अंगावर पक्षी शिटला आहे या जाणिवेने तो जागा झाला. ‘त्याला नेहमी झाडांचीच स्वप्न पडायची’, त्याच्या आईने, प्लासिडा लिनेरोने सत्तावीस वर्षानंतर त्या दुःखद सोमवारच्या आठवणी काढताना मला सांगितले. ‘त्या आठवड्याच्या आधी त्याला स्वप्न पडले होते. त्यात तो एकटाच एका पत्र्याच्या विमानात बसलाय आणि ते कुठंही न आद-ळता बदामाच्या झाडांवरून जातय, असं दिसलं होतं.’ ती मला म्हणाली. लोकांच्या स्वप्नांचा अचूक अर्थ सांगण्याबाबत तिने चांगलीच ख्याती मिळवली होती. मात्र त्यांनी ती तिला जेवणापूर्वी सांगायला हवी. तिला आपल्या मुलाच्या त्या दोन स्वप्नांत काही अशुभ शकुन आढळला नाही किंवा त्याच्या मृत्यूपूर्वी सकाळी त्याने सांगितलेल्या झाडांच्या इतर स्वप्नांतूनही काही अरि-ष्टाची चाहूल तिला लागली नाही.

सातियागो नासरलाही अरिष्टाची जाणीव झाली नाही. त्याला थोडा वेळ झोप लागली होती, पण अस्वस्थ. तो अंगावरून पोषाख न उतरवता तसाच झोपून गेला होता आणि उठला तेव्हा त्याचे डोके दुखत होते आणि जिभेवर कडवट गाळ जमला होता. मध्य-रात्रीपर्यंत चाललेल्या लग्नाच्या जल्लोषाच्या या खुणा आहेत असे त्याला वाटले. सहा वाजून पाच मिनिटांनी तो घरातून बाहेर पडल्यानंतर पुढल्या एक तासाने त्याचे डुकरासारखे तुकडे होईपर्यंत जे जे लोक त्याला भेटले त्यांना तो थोडा झोपेत असल्या-सारखा, पण चांगल्या मनःस्थितीत वाटला. त्यानेही सगळ्यांना हसून अभिवादन केले होते आणि चांगला दिवस निघाल्याचे सहज-पणे म्हटले होते. त्यावेळी तो हवामानाविषयी बोलत होता की आणखी कशाविषयी हे कुणालाही सांगता आले नसते. पुष्कळांना ही आठवण सांगताना केळीच्या बागातून येणाऱ्या समुद्राच्या वाऱ्याने सुखद झालेली उजळ सकाळ आठवत होती. फेब्रुवारीतल्या या दिवसात असेच हवामान असायचे. परंतु काहींना ती एक उदास, ढगाळ आणि साच-लेल्या पाण्याचा वास असलेली सकाळ होती असे वाटत होते. ती दुर्घटना घडली तेव्हा सातियागो नासरने स्वप्नात पाहिली तशी पावसाची रिमझिम सुरू होती. मी त्या रात्रीच्या लग्नाच्या आनंदकल्लोळातून हळू-हळू बाहेर येऊ लागलो तेव्हा मी मारिया आलेजान्द्रिना सर्वांटिसच्या शांत मिठीत पहुडलो होतो आणि मला जाग आली ती बिशपच्या आगमनाप्रीत्यर्थ झालेल्या घंटा-नादाने.

सातियागो नासरने पांढरा शर्ट घातला आणि पांढरी पँट चढविली. काल लग्ना-साठीही त्याने असाच पांढरा पोषाख केलेला होता. खास प्रसंगासाठी त्याचा हा खास पोषाख होता. बिशप यायचे नसते तर त्याने दर सोमवारप्रमाणे रँचवर जाण्यासाठी म्हणून खाकी कपडे आणि घोडदौडीचे बूट घातले असते. रानात जाताना त्याच्याजवळ एक पिस्तूल आणि काडतुस असायची. एखाद्या घोड्याचे अगदी मधोमध दोन तुकडे करणारी ती काडतुस आहेत असे तो म्हणा-यचा. तितर पक्ष्याच्या शिकारीच्या दिवसात तो शिकारीची साधने जवळ बाळगायचा. त्याच्या फडताळात आणखी चार बंदुका होत्या त्याच्या बापाप्रमाणेच तो झोपण्या-पूर्वी उशीच्या खोलीत पिस्तूल ठेवायचा, मात्र घरातून बाहेर पडण्यापूर्वी त्यातल्या गोळ्या काढून तो त्या टेबलाच्या खणात ठेवायचा. ‘त्यानं कधीही भरलेलं पिस्तूल तसंच राहू दिलं नाही,’ त्याच्या आईने मला सांगितले. मला ते माहीत होते आणि मला हेही माहीत होते की, घरात कुणी चुकूनही बंदूक भरू नये म्हणून तो बंदुका एका ठिकाणी तर गोळ्या दुसऱ्या जागी ठेवायचा. त्याच्या बापाने घालून दिलेले हे एक चांगले वळण होते. एका सकाळी मोलकरीण उशीची खोळ नीट करीत असाताना पिस्तूल खाली पडले आणि त्यातून गोळी उडाली ती जमि-नीला भिडून परत वर उडून, कपाटाला भेदून भिंतीतून पार गेली आणि शेजारच्या घरातून ती रस्त्याच्या पलीकडे असलेल्या चर्चमध्ये घुसली आणि तिथल्या संताच्या पुतळ्याचा तिने अगदी भुगा करून टाकला. सातियागो नासर त्यावेळी लहान होता पण त्या अपघाताचा ठसा त्याच्या मनावर खोल उमटलेला होता

त्याच्या आईच्या मनावर कोरलेली त्याची शेवटची प्रतिमा म्हणजे त्याची बेडरूममधून जात असलेली निसटती आकृती तो बाथ-रूममधल्या औषधाच्या खोक्यात डोकेदुखी-वरची गोळी शोधत असताना ती जागी झाली होती तिने दिवा लावला तेव्हा हातात पाण्याचा ग्लास घेऊन दारात तो उभा होता हेच दृश्य तिला नंतर सतत आठवत राहिले. सातियागो नासरने तिला त्यावेळी ते स्वप्न सांगितले पण तिने त्यातल्या झाडाकडे फारसे लक्ष दिले नाही.

‘पक्ष्याचं स्वप्न म्हणजे प्रकृतीचं स्वास्थ्य,’ ती म्हणाली.

स्मृतीच्या फुटलेल्या आरशाचे तुकडे जुळ-वण्याचा प्रयत्न करीत असताना जेव्हा मी त्या विसरलेल्या खेड्यात परतलो तेव्हा ती त्याच झोळण्यात म्हातारपणाने थकून पड-लेली होती आणि अगदी तशीच. त्या सकाळी तिने सातियागोला शेवटचे पाहिले त्याच स्थितीत उजेडातही तिच्या डोळ्यांना फारसे दिसत नव्हते आणि तिच्या मुलाने बेडरूम-मधून शेवटचे जाताना मागे ठेवलेल्या काय-मच्या डोकेदुखीवर उतार पडण्यासाठी म्हणून तिने कपाळावर कसलीशी औषधी पाने बांधलेली होती. उठण्यासाठी तिने झोळण्याचे दोर पकडले *त्यावेळी हत्येच्या सकाळी ज्या* वासाने मला चक्रावून टाकले होते तो देवळा-तल्या सारखा वास मला त्या धूसर काळोख्या खोलीत येऊ लागला.

मी उबरठ्यावर उभा राहिलो तेव्हा क्षणभर तिला माझ्या ठिकाणी सातियागो नासरचा भास झाला. 'तिथ तो उभा होता.' ती मला म्हणाली. 'साधी मऊ वस्त्रं त्यान घातली होती. त्याची कांती इतकी नाजूक होती की खळीचा कडकडीतपणा त्याला सहनच होत नसे.' आपला मुलगा परतलाय असा भ्रम मनातून नाहीसा होईपर्यंत ती काहीतरी चघळत ती त्या झोळण्यात बसून राहिली. नंतर तिने एक दीर्घ उसासा टाकला आणि ती उद्गारली, 'तो माझ्या आयुष्यातला एकमेव पुरुष होता!'

मी त्याला तिच्या स्मृतिविश्वात पाहिले. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात तो एकवीस वर्षांचा झाला. तो सडसडीत आणि फिकट गोरा होता. पापण्या आणि कुरळे केस हे त्याने आपल्या बापाकडून घेतले होते. सुखाचा एकही क्षण न देणाऱ्या आणि एक तडजोड म्हणून झालेल्या लग्नातून जन्माला आलेला तो एकुलता एक मुलगा होता. पण तीन वर्षांपूर्वी त्याच्या बापाचे अचानक निधन होईपर्यंत तो त्याच्यावर खूष होता असेच वाटत होते आणि नंतरही त्या सोमवारी त्याला मरण येईपर्यंत तो आपल्या एकाकी आईबरोबर तसाच खुषीत जगत होता. तिच्याकडून त्याला अंतःप्रवृत्तीचा वारसा मिळाला होता. बापाकडून त्याने अगदी लहान वयातच शस्त्रांवर प्रावीण्य मिळवले होते, तसेच त्याची घोड्याची आवड त्याने घेतली होती आणि उंच अंतराळात उडून भक्ष्यावर झेप घालणाऱ्या पक्ष्यावर त्याने ताबा मिळवला होता; पण त्याचबरोबर बापाकडून त्याने शौर्य आणि दूरदर्शित्वही घेतले होते. एकमेकांशी ते अरबी भाषेत बोलत; पण प्लासिडा लिनेरोच्या समोर नव्हे. नाहीतर तिला बाजूला टाकल्यासारखे वाटले असते. शहरात वावरत असताना त्याच्याजवळ शस्त्रे नसत आणि फक्त एकदाच त्यानी एका मदतीसाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात आपले शिकवलेले पक्षी ससाणेबाजीचे प्रदर्शन करण्यासाठी आणले होते. बापाचे निधन झाल्यानंतर घरचे शेत आणि गुरेढोरे सांभाळण्यासाठी त्याला शिक्षण सोडावे लागले होते; पण सातियागो नासरमध्ये उपजतच आनंदी आणि शांत वृत्ती होती आणि तो खुल्या दिलाचा होता.

ते त्याला ज्या दिवशी ठार करणार होते त्या दिवशी त्याला पांढऱ्या पोषाखात पाहून त्याने दिवसामध्ये घोटाळा केला आहे असे त्याच्या आईला वाटले 'मी त्या दिवशी त्याला सोमवार असल्याची आठवण दिली,' ती मला म्हणाली. बिशपच्या अंगठीचे चुंबन घ्यायची संधी त्याला मिळावी यासाठी त्याने तसा धार्मिक पोषाख केलाय असे त्याने स्पष्ट केले. तिला त्यात काही अर्थ वाटला नाही. 'तो बोटीवरून खाली उतरणारदेखील नाही,' तिने त्याला म्हटले, 'तो नेहमीप्रमाणे उपकार केल्यासारखा आशीर्वाद देईल आणि आला तसा परत जाईल. या गावाचा त्याला तिरस्कार वाटतो.'

*सातियागो नासरला हे ठाऊक होते;* पण चर्चच्या डामडौलाविषयी त्याला आतूनच एक अनावर आकर्षण होते. 'सिनेमासारखच ते आहे,' तो एकदा मला म्हणाला होता. तो बिशप येवो की न येवो, त्याच्या आईला वेगळीच काळजी होती. ती म्हणजे आपल्या मुलाने पावसात भिजू नये. तो झोपला असताना तिने त्याच्या शिंका ऐकल्या होत्या. तिने त्याला छत्री घेऊन जा म्हटले; पण त्याने निरोपादाखल हात हलवला. खोलीतून बाहेर गेला. तिने त्याला हे शेवटचेच पाहिले होते.

त्या दिवशी पाऊस पडत नव्हता याची व्हिक्टोरिया गुझमान या स्वयंपाकिणीला संपूर्ण खात्री होती आणि त्याच दिवशी नव्हे तर संबंध फेब्रुवारीत पाऊस पडला नाही असे तिचे म्हणणे होते. 'याउलट स्थिती होती' मी तिला भेटायला गेलो होतो, ती मरण्यापूर्वी थोडे आधी, तेव्हा ती म्हणाली. 'ऑगस्टपेक्षा या दिवसात ऊन लवकरच चढतं' सातियागो नासर स्वयंपाकघरात शिरला तेव्हा ती दुपारच्या जेवणासाठी ससे सोलत बसली होती आणि तिला ल्हा ल्हा करणाऱ्या कुत्र्यानी वेढले होते. 'रात्र वाईट गेली असावी असा चेहरा घेऊन तो सकाळी उठायचा,' व्हिक्टोरिया गुझमान कोरडेपणे म्हणाली. तिच्या *वयात येत अस*लेल्या मुलीने, डिव्हायना फ्लोरने, त्याला ऊसाचा अर्क घातलेली कॉफी दिली गेलेल्या रात्रीचे ओझे सुसह्य व्हावे म्हणून दर सोमवारी त्याला असले पेय द्यायचे हा रिवाजच होता अवाढव्य स्वयंपाकघर, विस्तवाची कुजबूज आणि खुराड्यात झोपलेल्या कोंबड्यांचे हळूवार श्वास. सातियागो नासरने आणखी एक ॲस्पिरिन घेतली आणि कॉफीचे सावकाश घोट घेत तो खाली बसला. चुलीवरच्या सशाची आतडी साफ करणाऱ्या त्या दोन स्त्रियांवरची नजर न काढता तो शांतपणे विचार करीत होता. वय झालेले असूनही व्हिक्टोरिया गुझमानचा बांधा चांगला होता. मुलगी उफाड्याची दिसत होती आणि एखाद्या अवखळ घोडीसारखी मुसमुसलेली होती. कॉफीचा मग घेण्यासाठी ती आली तेव्हा सातियागो नासरने तिचे मनगट पकडले.

'तुला लगाम घालण्याची वेळ आलीय,' *तो तिला म्हणाला.*

व्हिक्टोरिया गुझमानने त्याला रक्ताने माखलेला सुरा दाखवला.

'सोड तिला, गोऱ्या,' तिने त्याला आज्ञा केली. 'मी जिवंत असेपर्यंत तुला त्या झऱ्याचा घोटसुद्धा मिळणार नाही.'

तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना तिला इब्राहीम नासरने भ्रष्ट केले होते किती तरी वर्षे ती त्याला शेतावरच्या तबेल्यात गुप्तपणे भेटत असे आणि जेव्हा तिचे आकर्षण त्याला वाटेनासे झाले तेव्हा त्याने तिला घरातली कामे करण्यासाठी आणले. डिव्हायना फ्लोर ही तिच्या नंतरच्या एका सोबत्यापासून झालेली मुलगी होती. सातियागो नासरच्या शय्येवर जाणे हीच आपली नियती आहे हे त्या मुलीने जाणले होते आणि त्यामुळे ती अकालीच भयभीत झालेली होती. 'त्याच्यासारखा दुसरा पुरुष अजून जन्माला यायचा आहे' ती मला म्हणाली. ती आता लठ्ठ झालेली होती, तिची पार रया गेलेली होती. आणि वेगवेगळ्या सोबत्यापासून झालेल्या मुलांच्या कोंडाळ्यात ती बसली होती. 'तो त्याच्या बापासारखाच होता.' व्हिक्टोरिया गुझमानने उत्तर दिले. 'घाणेरडा.' भयाची एक शिरशिरी तिच्या शरीरामधून गेली. तिने सशाची आतडी काढली आणि तशीच *ती कुत्र्यासमोर फेकली तेव्हाचा सातियागो* नासरचा भयग्रस्त चेहरा तिला आठवला.

'काय हा जंगलीपणा,' तो तिला म्हणाला. 'तो माणूस आहे अशी कल्पना कर.'

असहाय जनावराची हत्या करण्यास सरावलेला माणूस अशा प्रकारे एका वेळी भीती व्यक्त करतो ती का हे समजायला व्हिक्टोरिया गुझमानला वीस वर्षे लागली. 'अरे देवा !' ती आश्चर्याने उद्‌गारली. 'त्याचा अर्थ हा होता तर.' तिच्या मनात आजवर साचलेल्या रागाला वाट देण्यासाठी त्या हत्येच्या सकाळी ती ससाची आतडी कुत्र्यांसमोर फेकत राहिली आणि तिने सातियगो नासरची न्याहरी कडवट करून टाकली. बिशपला घेऊन येणाऱ्या वाफेच्या बोटीच्या पृथ्वी हादरून टाकणाऱ्या आवाजाने सारे सारे गाव जागे झाले तेव्हा हे असे सुरू होते.

या घराचा पूर्वी वखार म्हणून उपयोग होत असे. दुमजली, फळयाच्या भिंती असलेले आणि किनाऱ्यावरील कचऱ्यावर लक्ष ठेवून असलेले ससाणे ज्यावर कायम बसलेले असत असले टिनाचे उच छप्पर. समुद्राकडे जाणारे पडाव आणि कधी कधी मोठी जहाजे देखील जाण्याच्या दृष्टीने नदी योग्य होती तेव्हा ते बाधले होते. गृहयुद्धानंतर उरल्यासुरल्या अरबासोबत इब्राहीम नासर इथे आला तेव्हा नदीच्या प्रवाहातील बदलामुळे जहाजाची ये-जा थावलेली होती आणि वखारीचा काही उपयोग केला जात नव्हता. बाहेरून मागवलेल्या वस्तूचे दुकान लावावे म्हणून इब्राहीम नासरने ते धर स्वस्त किंमतीत विकत घेतले, पण त्याने दुकान मात्र कधीच लावले नाही. त्याला लग्न करायचे होते तेव्हा त्याने त्याचे राहत्या घरात रूपांतर केले. तळमजल्यावर बैठकीची खोली, मागे चार जनावरांचा एक तबेला, नोकरांसाठी खोल्या आणि समुद्राच्या बाजूने उघडणाऱ्या खिडक्या असलेले एक स्वयपाकघर. त्या खिडक्यातून दिवसभर पाण्यावरले कीटक जात-येत असत. फुटलेल्या जहाजातून वाचवलेला एक वर्तुळाकार जिना त्याने जसाच्या तसा ठेवला होता. वरच्या मजल्यावर पूर्वी जकात कार्यालये होती तिथे दोन मोठ्या बेडरूमस् त्याने बाधल्या आणि पुढे होणार असलेल्या खडीभर मुलासाठी पाच छोटी छोटी खुराडी आणि चौकातील बदामाच्या झाडाकडे पाहता येईल असा एक लाकडी सज्जा. मार्चमधल्या सध्याकाळी त्या सज्जात प्लासिडी लिनेरोला शांती अनुभवत बसून राहता येईल. पुढच्या बाजूला घराचे मुख्य दार होते आणि लोखंडी सळधा लावलेल्या दोन मोठ्या खिडक्या. मागचे दारसुद्धा त्याने जरा मोठेच ठेवले, एखादा घोडा आत येऊ शकेल इतपत. जुन्या धक्क्याचा काही भागही आपल्या वापरात ठेवला. मागच्या दारानेच नेहमी घरातली ये-जा होत असे. त्यामुळे तबेल्याकडे आणि स्वयपाकघराकडे सहज जाता येत असे हे तर होतेच, शिवाय नव्या धक्क्याच्या रस्त्यावर येण्यासाठी चौक ओलाडावा लागत असे. पुढचे दार समारभ-उत्सवाचे दिवस सोडले तर कायम अडणा लावून बदच ठेवलेले असे. तेथेच, मागच्या दाराकडे नव्हे तर या समोरच्या दाराकडे लक्ष ठेवून सातियागो नासरला ठार करणारे लोक त्याची वाट पाहत थाबले होते. घराला सपूर्ण वळसा घालावा लागेल हे ठाऊक असूनही याच दारातून तो बिशपच्या स्वागतासाठी बाहेर पडला.

अशा प्राणधातक योगायोगाचा अर्थ कधीच कुणाला समजला नाही. रिओहाचाहून चौकशीसाठी आलेल्या न्यायाधीशाला कदाचित तो उमगला असावा पण तो काही बोलला नाही. त्याला या साऱ्या घटनाचे शास्त्रीय स्पष्टीकरण द्यायचे होते हे अहवालावरून दिसून येते. चौकातल्या दाराचा उल्लेख, चार आणे मालेतल्या कादंबरीच्या शीर्षकासारखा सतत होत होता. 'प्राणघातक दरवाजा.' प्रत्यक्षात प्लासिडा लिनेरोने दिलेले स्पष्टीकरणच अधिक पटण्यासारखे होते. त्यातून आईची समज व्यक्त झालेली होती. ती म्हणाली, 'चांगला पोषाख केल्यावर माझा मुलगा कधीही मागच्या दारानं बाहेर पडत नसे.' चौकशी अधिकाऱ्याला तो वरवरचा अदाज वाटला. त्याची त्याने नोद घेतली पण अहवालात समावेश केला नाही.

सातियागो नासरला ठार करण्यासाठी ते लोक वाट पाहत थाबले आहेत हे आपल्याला किंवा आपल्या मुलीला मुळी ठाऊकच नव्हते असे व्हिक्टोरिया गुझमानने उत्तर दिले; पण पुढे काळाच्या ओघात तिने मान्य केले की तो सकाळी कॉफी घ्यायला आला तेव्हा दोघीनाही ते ठाऊक होते. पाच वाजल्यानतर दूध मागणाऱ्या एका बाईने ते सांगितले होते. खून करण्याचे कारण आणि कुठे ते लोक बसलेले आहेत हेही ती बोलली होती. 'मी त्याला सावध केलं नाही, कारण मला वाटलं ती दारूड्याची बडबड आहे.' ती मला म्हणाली. पुढे आई मरण पावल्यानतर एका भेटीत डिव्हायना फ्लोरने माझ्यापाशी कबूल केले की सातियागो नासरला तिने सावध केले नाही, कारण त्यानी त्याला ठार करावे असेच तिच्या मनाच्या खोल तळात वाटत होते. तिने स्वत:ला देखील केले सावध नाही कारण की, त्यावेळी ती स्वत: कोणताही निर्णय न घेऊ शकणारी एक भित्री मुलगी होती. त्याने तिचे मनगट आपल्या थड आणि दगडी हाताने पकडले तेव्हा तो हात तिला मेलेल्या माणसाच्या हातासारखा वाटला होता, त्यामुळेही ती अधिकच घाबरून गेलेली होती.

बिशपच्या बोटीवरल्या आनदाच्या आरोळ्या ऐकू येऊ लागल्या तेव्हा सातियागो नासर उठला आणि लाब लाब पावले टाकत त्या अधाऱ्या घरातून तो पुढे निघाला. डिव्हायना फ्लोर दार उघडण्यासाठी त्याच्या पुढे पळाली. जेवणाच्या खोलीतल्या झोपलेल्या पक्ष्याच्या पिंजऱ्याच्या आणि फर्निचरच्यामध्ये, बैठकीच्या खोलीतल्या टागलेल्या कुंड्यांच्या आसपास त्याने आपल्या पुढे जाऊ नये म्हणून ती लगबगीने धावली; पण दाराचा अडणा काढताना त्या ससाण्यासारख्या हाताची पकड तिला टाळता आली नाही. 'त्यानं माझ्या जाघेतच हात घातला,' डिव्हायना फ्लोर मला म्हणाली. 'घराच्या सांदीकोपऱ्यात मला एकटीला गाठून तो असं नेहमीच करायचा; पण त्या दिवशी मी चकित झाले नाही तर मला रडावस वाटत होतं' त्याला जायला तिने वाट करून दिली आणि अर्धवट उघड्या दारातून पहाटेच्या फिकट प्रकाशात चौकातली बदामाची झाडे तिने पाहिली; पण अन्यत्र कुठे पाहण्याचे धैर्य मात्र तिला झाले नाही. 'नतर बोटीचा आवाज थांबला आणि कोंबडे आरवू लागले,' ती मला म्हणाली. 'तो एवढा मोठा आवाज होता की इतके कोंबडे आपल्या गावात असण शक्यच नाही, ते बिशपच्या बोटीवरले असतील असं वाटलं.' त्याच्यासाठी, जो तिचा कधीही झाला नाही, ती एकच गोष्ट करू शकली. ती म्हणजे प्लासिडा लिनेरोची सक्त ताकीद असूनही

तिने समोरचे दार उघडे ठेवले. तशीच काही स्थिती उद्भवली तर त्याला पटकन् आत येता येईल कोणीतरी, तो कोण हे कधीच कळले नाही, दाराखालून एक पाकीट आत सारले होते. त्यात कागदाच्या एका तुकड्यावर सातियागो नासरसाठी धोक्याची सूचना होती की ते त्याला ठार करण्यासाठी वाट पाहत थांबले आहेत. त्यात स्थळ, कारण आणि एकूण योजनेचा तपशीलही नोंदला होता. सातियागो नासर घरातून बाहेर पडत होता तेव्हा हा संदेश जमिनीवर पडलेला होता. पण त्याला तो दिसला नाही किंवा डिव्हायना फ्लोरलाही, प्रत्यक्ष हत्या घडल्यानंतर बराच काळपर्यंत इतर कुणालाही तो दिसला नाही

सहा वाजले होते तरीही रस्त्यावरचे दिवे अजून लागलेलेच होते. बदामाच्या फांद्यावर आणि काही घराच्या सज्ज्यावर लग्नसमारंभाच्या रंगीत पताका लावलेल्या होत्या, त्या पाहून एखाद्याला वाटले असते की बिशपच्या स्वागतासाठी त्या आता एवढ्यातच लावलेल्या आहेत. पण चौक कचऱ्याच्या भल्या मोठ्या ढिगासारखा दिसत होता. रिकाम्या बाटल्या आणि सार्वजनिक उत्सवातील सर्वप्रकारची घाण तिथे पडलेली होती. सातियागो नासर घरातून बाहेर निघाला तेव्हा अनेक लोक बोटीचा आवाज ऐकून बंदराकडे पळत सुटलेले होते.

चौकातले चर्चच्या एका बाजूला असलेले दुधाचे दुकान तेवढे उघडे होते. तिथेच सातियागो नासरला ठार करू इच्छिणारी दोन माणसे बसलेली होती. पहाटेच्या उजळत्या प्रकाशात त्याला पहिल्यादा पाहिले ते त्या दुकानाच्या मालकिणीने, क्लॉटिल्ड आर्मेन्टाने. ॲल्युमिनियमची वस्त्रे त्याने घातली आहेत असे तिला वाटले. 'तो एखाद्या भुतासारखा दिसत होता,' ती मला म्हणाली. त्याला ठार करणारी माणसे वर्तमानपत्रात गुडाळलेले सुरे छातीशी धरून बाकावर झोपली होती आणि ती जागी होऊ नयेत म्हणून क्लॉटिल्ड आर्मेन्टाने स्वत:चा श्वासदेखील आवरून धरला होता.

ते जुळे होते : पेद्रो आणि पाब्लो व्हिकारिओ. ते चोवीस वर्षे वयाचे होते आणि हे इतके सारखे दिसत की पेद्रो कोण अन् पाब्लो कोण हे सांगता येत नसे. 'ते कठोर दिसत, पण भले होते,' अहवालात म्हटले होते. मी त्याना प्राथमिक शाळेत असल्यापासून ओळखत होतो, मीही तेच लिहिले असते. त्या सकाळी ते लग्नसमारंभाच्या पोषाखातच होते आणि त्याचे चेहरे रात्रभरच्या जागरणाने अन् पिण्याने भकास दिसत होते. पण त्यानी दाढ्या केलेल्या होत्या. लग्नाच्या आदल्या दिवसापासून सुरू झालेले त्याचे पिणे अजून थाबले नव्हते. तथापि ते या तिसऱ्या दिवसाच्या शेवटीदेखील झिंगलेले नव्हते. ते झोपेत चालणाऱ्या माणसासारखे दिसत होते एवढेच. क्लॉटिल्ड आर्मेन्टाच्या दुकानात तीन तास वाट पाहिल्यानतर पहाटेच्या वाऱ्याने त्याना गाढ झोप लागली होती. शुक्रवारपासून आज पहिल्यादाच त्याचे डोळे मिटले होते. बोटीच्या भोंग्याने त्याची झोप चाळवली होती, पण सातियागो नासर घराबाहेर पडला तेव्हा ते अंत:प्रेरणेनेच पूर्ण जागे झाले. मग दोघानीही गुडाळी केलेली वर्तमानपत्रे घट्ट पकडली आणि पेद्रो व्हिकारिओ उठून उभा झाला.

'देवासाठी,' क्लॉटिल्ड आर्मेन्टा पुटपुटली. 'आता नको, बिशपचा मान राखावा म्हणून तरी.'

'पवित्र आत्म्याचा तो नि:श्वास होता,' ती पुन: पुन्हा म्हणायची. ती ईश्वरी घटना होती, पण क्षणिक सामर्थ्य असलेली. तिचे म्हणणे ऐकल्यावर व्हिकारिओ बंधू घुटमळले आणि जो उठून उभा झाला होता तो खाली बसला. दोघाचीही नजर चौक ओलांडत असलेल्या सातियागो नासरचा पाठलाग करीत होती. 'ते त्याच्याकडे करुणेच्या दृष्टीने पाहत होते,' क्लॉटिल्ड आर्मेन्टा म्हणाली. अनाथाच्या पोषाखातल्या जोगिणीच्या शाळेतल्या मुली त्याचवेळी चौकातून दुडूदुडू धावत चालल्या होत्या.

प्लासिडा लिनेरोचे म्हणणे बरोबरच ठरले : बिशप बोटीतून खाली उतरलेच नाहीत डॉकवर अधिकारी आणि शाळेतली मुले तर होतीच, पण बिशपला भेट देण्यासाठी म्हणून गुबगुबीत कोबडे घेऊन आलेले असख्य लोक तिथे जमलेले होते. कोबड्याच्या तुऱ्याचे सूप हे बिशपचे एक आवडते खाद्य होते. सामानाच्या धक्क्यावर इंधनाचा एवढा मोठा ढीग रचलेला होता की तेवढे सगळे बोटीवर चढवायला दोन तास लागले असते. पण बोट थांबली नाही. नदीच्या वळणाशी ती ड्रॅगनसारखी फुरफुरत थांबली आणि मग वाद्यवृंद बिशपचे स्तुतिगीत वाजवू लागला. शेकडो कोबडे टोपल्यामध्येच आरवू लागले आणि त्यानी गावातल्या इतर कोंबड्यांनाही जागे केले.

त्या काळात लाकूड खाणारी ऐतिहासिक पॅडल-व्हीलर्स अस्तगत होऊ लागली होती. जी काही उरली होती त्यावर पियानो नव्हते की वधूवरकक्ष. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने त्याना वळवणे कठीण झाले होते. पण ही बोट नवी होती आणि तिच्यावर एकाऐवजी दोन धुराडी होती. त्यावर आडव्या पट्ट्यासारखे झेंडे रगवले होते. मागच्या बाजूला असलेल्या चाकामुळे ती समुद्रावरील जहाजासारखी पळत होती. पांढरा पायघोळ झगा घातलेले बिशप कॅप्टनच्या केबिनच्या बाजूला उभे होते. त्याच्याभोवती त्याचा स्पॅनिश लवाजमा होता. 'ख्रिसमसचे वातावरण होते,' माझी बहीण मारगॉट म्हणाली. घडले काय होते, ती म्हणाली त्यानुसार, की बोटीने धक्क्याजवळून जाताना शिटी वाजवली आणि दाबलेली वाफ बाहेर पडली. त्यामुळे अगदी समोर असलेले लोक भिजले. तो एक क्षणिक आभास होता : बिशपने हवेतच क्रॉसचे चिन्ह केले आणि तसे तो बोट दिसेनाशी होईपर्यंत यांत्रिकपणे करीतच राहिला. कोंबड्याचे कर्कश आरवणे तेवढे उरले.

सांतियागो नासरला फसवल्यासारखे वाटले त्याचे कारण होते. त्याने फादर कार्मेन अमादोरच्या विनतीवरून लाकडाच्या कितीतरी मोळ्या स्वत: आणून टाकल्या होत्या. शिवाय रसरशीत तुरे असलेले कोंबडे निवडून दिले होते. पण ती फसवणूक त्याने फारशी मनावर घेतली नाही. माझी बहीण मारगॉट धक्क्यावर त्याच्या बाजूलाच उभी होती. तिला तो चागल्या मन:स्थितीत आढळला. डोकेदुखीच्या गोळ्यानी काही आराम पडलेला नसतानाही तो उत्साहात वावरत होता. 'तो उदास नव्हता तर लग्नाला एकूण खर्च किती आला असेल याचा विचार करीत होता,' तिने मला सागितले. ख्रिस्तो बेदोया त्याच्याबरोबरच होता. त्याने खर्चाचा आकडा सागितला तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. जवळजवळ चार वाजेपर्यंत तो सातियागो

नासर आणि मी असे दारू पीत बसलो होतो. मग तो आपल्या घरी झोपायला गेला नाही तर आजोबाकडे गप्पा करीत बसला तिथे त्याला ते आकडे समजले आणि पार्टीला आलेल्या खर्चाचा अदाज आला. त्याने हिशेब केला चाळीस कोंबडया, अकरा डुकरे, पाहुण्यासाठी आणि चौकातल्या लोकासाठी भाजलेली चार वासरं. दोनशे पाच खोकी विदेशी दारू आणि जवळजवळ दोन हजार बाटल्या उसाची दारू. असा एकही श्रीमत अथवा गरीब माणूस उरला नाही जो यां ना त्या तऱ्हेने गावाने पूर्वी कधीही न अनुभवलेल्या या पार्टीत सहभागी झाला नाही. सातियागो नासर स्वप्नात दग होता.

'माझं लग्नही याच थाटात करायच,' तो म्हणाला. 'त्या लग्नाविषयी बोलताना लोकाना आयुष्य अपुरं पडेल.'

जवळून एखादा देवदूत गेला असावा, असे माझ्या बहिणीला वाटले. फ्लोरा मिग्युएलच्या भाग्याचे विचार तिच्या मनात घोळू लागले. तिच्याजवळ आधीच पुष्कळ गोष्टी होत्या आणि आता या वर्षीच्या ख्रिसमसमध्ये तिला सातियागो नासरही मिळणार होता. 'मला एकदम वाटलं की त्याच्याखेरीज दुसरी कोणतीच निवड इतकी चागली नसती,' ती मला म्हणाली. 'कल्पना करून पहा : देखणा, शब्दाला जागणारा आणि वयाच्या एकविसाव्या वर्षी स्वतःची चागली मिळकत असलेला, असला दुसरा शोधूनही सापडणार नाही.' त्याच्या आवडीचा काही पदार्थ केला की ती त्याला न्याहारीसाठी बोलवीत असे. तसे आजही तिने त्याला निमत्रण दिले.

'मी कपडे बदलतो अन् येतो,' तो म्हणाला अन् त्याला जाणवल की त्याचे घडयाळ घरी टेबलावरच राहिले. 'किती वाजले ?' त्याने विचारले.

सहा वाजून पचवीस मिनिटे झाली होती. सातियागो नासरने ख्रिस्ती बेदोयाच्या हातात हात अडकवला आणि त्याला चौकाकडे ओढतच नेले.

'मी पधरा मिनिटानी तुझ्या घरी असेन.' त्याने माझ्या बहिणीला म्हटले.

तिच्यासोबतच चलण्याचा तिने आग्रह केला. कारण न्याहरीचे पदार्थ आधीच तयार झालेले होते. 'तो एक विचित्रच आग्रह होता.' ख्रिस्ती बेदोया मला म्हणाला. 'इतका की कधीकधी मला वाटतं की, मारगॉटला ते त्याला ठार करणार आहेत हे आधीच ठाऊक होत आणि त्यामुळे त्याला तुमच्या घरात लपवून ठेवायचं होत.' सातियागो नासरने तिची समजूत घातली अन् पुढे जायला सागितले. तो शेतावर जायचे कपडे घालून येणार होता आणि तिथून परस्परच तो शेतावर जाणार होता. गोऱ्हे ठेचायचे होते. त्याने हात हलवून तिचा निरोप घेतला आणि ख्रिस्तो बेदोयाच्या खाद्यावर रेलून तो चौकाकडे निघाला. तिने पाहिलेले हे शेवटचे दृश्य.

ते सातियागो नासरला ठार करणार आहेत हे बदरावर असलेल्या पुष्कळाना ठाऊक होते. गेली अकरा वर्षे शहराचे मेयर असलेले निवृत्त लष्करी अधिकारी डॉन लाझारो अपॉन्ती यानी त्याच्याकडे पाहून हात हलवला. 'त्याला कुठलाही धोका नाही अस मला वाटण्याची काही कारण होती,' त्यानी मला सागितले. फादर कार्मेन अमादोर यानादेखील चिंतेचे काही कारण आहे असे वाटले नाही. 'जेव्हा तो मला धडधाकट असा दिसला तेव्हा वाटल की ती एक वावडी असावी.' ते मला म्हणाले. सातियागो नासरला कुणी या गोष्टीची सूचना दिली आहे की नाही याची कुणी चौकशीही केली नाही. कारण त्याला ते माहीत नसणे कुणाला शक्यच वाटले नाही.

प्रत्यक्षात माझी बहीण मारगॉट ही एक अशी होती की जिला ते त्याला ठार करणार आहोत हे माहीतच नव्हते. 'मला माहीत असते तर मी त्याला डुकरासारखं बाधून घरी ठेवून गेले असते.' चौकशी अधिकाऱ्याला तिने सागितले. तिला माहीत नव्हते हे चमत्कारिकच होते, पण त्याहून चमत्कारिक म्हणजे 'माझ्या आईलाही ते ठाऊक नव्हते. वास्तविक तिला घरातल्या कुणाच्याही आधी कोणत्याही गोष्टीविषयी कळत असे आणि आश्चर्य म्हणजे कित्येक वर्षांत तिने घराबाहेर पाऊलही टाकलेले नव्हते. अगदी रविवारच्या सार्वजनिक प्रार्थनेसाठीदेखील. तिच्यातल्या या गुणाची जाणीव मी सकाळी शाळेत जाण्यासाठी उठायला लागल्यापासून झाली होती. त्या दिवसात मला ती पहाटेच्या राखाडी प्रकाशात झाडूने अंगण झाडत असलेली, फिकट आणि गूढ दिसायची. आम्ही सगळे झोपलो असताना जगात काय काय घडले हे ती कॉफीचे घोट घेताना सागायची. गावातल्या इतर लोकाशी सवाद साधण्याचे काही गुप्त धागेदोरे तिच्यापाशी आहेत असे वाटायचे. विशेषत: तिच्या वयाच्या लोकाशी. कधी कधी तर पुढे घडणाऱ्या गोष्टी आधीच सागून आम्हाला ती चकित करून टाकायची. अशा गोष्टी केवळ ज्योतिषज्ञानानेच तिला कळू शकतं. त्या सकाळी मात्र पहाटे तीन वाजल्यापासून घडत असलेल्या शोकातिकेची हालचालही तिला जाणवली नाही.

आमचे घर मुख्य चौकापासून जरा दूर नदीकाठच्या आमराईत होते. माझी बहीण मारगॉट नदीच्या काठाने चालत चालत बंदरावर पोचली होती आणि लोक बिशप येणार म्हणून इतके उत्तेजित झालेले होते की त्याना दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची फिकीर नव्हती. त्यानी आजाऱ्याना देवाच्या औषधासाठी दारात बसवून ठेवले होते आणि स्त्रिया त्यांच्या परसातील कोंबडया, डुकराची पिलं आणि इतर सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ घेऊन पळत सुटल्या होत्या. दुसऱ्या तीरावरून फुलानी लदलेल्या नावा आल्या होत्या. पण बिशप जमिनीवर पाऊलही न टेकवता तसाच निघून गेल्याने तोपर्यंत दडपलेली बातमी अफवेसारखी पसरली. तेव्हा मारगॉटला ते समजले आणि तेही अतिशय घाणेरडया पद्धतीने. आदल्याच दिवशी लग्न झालेली सुदर मुलगी, अँजेला व्हिकारिओ आपल्या आईबापाकडे परत आलेली आहे, कारण तिचे कौमार्य आधीच भगलेले आहे हे तिच्या नवऱ्याला समजले. 'मला वाटलं मीच मरणार आहे,' माझी बहीण म्हणाली. 'ती गोष्ट कितीही ताणली तरी तिचा सातियागो नासरशी काय संबध आहे मात्र कुणी सागू शकल नाही.' सगळ्याना फक्त एकच गोष्ट खात्रीपूर्वक माहीत होती आणि ती म्हणजे अँजेला व्हिकारिओचे भाऊ त्याला ठार मारण्यासाठी टपून बसलेले आहेत.

माझी बहीण आत फुटणारे रडू आवरत कशीबशी घरी पोचली. माझी आई जेवणघरात होती निळया फुलाचा खास रविवारचा पोषाख तिने घातला होता, न जाणो एखादवेळी बिशप भेटीला आले तर, आणि टेबल सजवताना ती अमूर्त प्रेमाचे गीत गात

होती. नेहमीपेक्षा एक पान जास्त घेतलेले माझ्या बहिणीला दिसले.

'हे सातियागो नासरसाठी घेतलय,' माझ्या आईने तिला सांगितले. 'तू त्याला न्याहरीसाठी बोलावलय असं मला कळलं.'

'काढून टाक,' माझी बहीण म्हणाली.

नतर तिने तिला ते सांगितले. 'पण जणू काही ते तिला आधीच ठाऊक होते,' ती मला म्हणाली, 'नेहमीसारखच. तुम्ही तिला काही सांगू लागला आणि गोष्ट अर्धी होण्याआधीच पुढे काय झाल ते तिला कळत' त्या वाईट बातमीमुळे माझ्या आईसमोर कठीण प्रश्न उभा राहिला. सातियागो नासरचे नामकरण तिच्या नावावरून केले होते आणि नामकरणाच्या वेळी ती त्याची प्रमाता होती, पण ती घरी परतलेल्या नववधूच्या आईची, पुरा व्हिकारिओचीही रक्ताने नातलग होती. तरीही, ती बातमी कानी पडताच तिने उच टाचाचे बूट घातले आणि काळी शाल अगावर घेतली. माझ्या वडलानी बिछान्यात पडूनच सगळे ऐकले होते. ते जेवणघरात आले आणि तिला कुठे जाते आहेस असे चिंतेनेच विचारले.

'प्लासिडाला सावध करायला,' तिने उत्तर दिले. 'ते तिच्या मुलाला ठार करणार आहेत हे सगळ्याना ठाऊक आहे आणि तिलाच ते माहीत नाही हे बरोबर नाही.'

'तिच्यासारखेच व्हिकारिओशीही आपले सबध आहेत,' माझे वडील म्हणाले.

'नेहमीच मरणाऱ्याच्या बाजूला असल पाहिजे,' ती म्हणाली.

माझे धाकटे भाऊ झोपण्याच्या खोल्यातून बाहेर येऊ लागले. लहानगा तर, अनिष्टाच्या चाहुलीन रडायलाच लागला. माझ्या आईने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. आयुष्यात पहिल्यादाच तिने आपल्या नवऱ्याकडेही अजिबात लक्ष दिले नाही.

'थाब थोडी, मी कपडे करतो,' ते म्हणाले.

ती रस्त्यावर पोचली होती. माझा भाऊ जेम, त्याला सात वर्षे पुरी झाली नव्हती त्यावेळी, शाळेचे कपडे घालून तयार होता.

'तू जा रे तिच्याबरोबर' माझ्या बापाने आज्ञा केली.

जेम तिच्यामागे धावत गेला आणि तिचा हात धरला. त्याला काय चालले आहे आणि आपण कुठे चाललो आहोत, काही ठाऊक नव्हते. 'ती स्वत:शीच बडबडत चालली होती,' जेमने मला सांगितले. 'हलकट माणसं.'... ती पुटपुटत होती, 'घाणेरडी माणस...काही करू शकत नाहीत ..हे नाही का भयानक!' तिने मुलाचा हात आपल्या हातात धरलाय हेसुद्धा ती विसरून गेली असावी. 'मी पागल झालेय असे त्याना वाटले असेल,' तिने मला म्हटले. 'मला एकच गोष्ट आठवते, ती म्हणजे दूर लोकाचा गोगाट ऐकू येतोय, जणू काही लग्नाची पार्टी पुन्हा सुरू झालीय, आणि प्रत्येकजण चौकाकडे धावत होता.' एक जीव धोक्यात आहे या जाणिवेने ती अधिकच वेगात चालायला लागली. कुणीतरी माणूस विरुद्ध दिशेने धावत येत होता. त्याला तिच्या खुळेपणाची कीव आली

'त्रास करून घेऊ नकोस, लुईसा सातियागा,' तो जाताना ओरडला. 'त्यानी त्याला मघाशीच ठार केलय'

बायार्दो सान रोमान, ज्याने आपली नवपरिणित वधू लग्न झाल्यानतर लगेच आईबापाकडे परत धाडली तो माणूस, त्या आधीच्या वर्षी ऑगस्टमध्ये पहिल्यादा इथे आला. लग्नापूर्वी सहाच महिने आधी. आठवड्याला येणाऱ्या बोटीने तो उतरला तेव्हा त्याच्या पाठीवर काही पडशा होत्या. त्या चादीच्या कामाने मढवल्या होत्या. आणि त्याच्याशी जुळणारे असे त्याच्या पट्ट्याचे बकल व बुटाच्या रिंग्ज चमकत होत्या तो तिशीच्या आसपास होता, पण तेवढा तो दिसत नव्हता. त्याची कबर बुलफायटरसारखी होती, डोळे सोनेरी आणि त्वचा सोन्याने किंचित भाजलेली असावी तशी होती. वासराच्या कातड्याचे आखूड जाकिट आणि अत्यत तग विजार त्याने घातलेली होती आणि त्याच्या हातात तसेच मोजेही होते. माग्दालेना ऑलिव्हर त्याच बोटीने आली होती आणि साऱ्या प्रवासात तिची नजर त्याच्यावरच खिळलेली होती 'तो एखाद्या देवदूतासारखा दिसत होता,' ती मला म्हणाली, 'मी त्याला लोणी लावून जिवतच खाऊन टाकल असत.' असे वाटणारी ती एकटीच नव्हती किंवा बायार्दो सान रोमान हा माणूस पाहता क्षणीच ओळखता येईल याची जाणीव असणारी ती एकमेव नव्हती.

ऑगस्टच्या शेवटी माझ्या शाळेच्या पत्त्यावर पाठवलेल्या पत्रात आईने एक ओळ लिहिली होती : 'एक चमत्कारिक माणूस गावात आलाय.' नतरच्या पत्रात तिने लिहिले होते : 'त्या चमत्कारिक माणसाच नाव बायार्दो सान रोमान अस आहे आणि प्रत्येकजण सागतोय की तो मोठा भारून टाकणारा माणूस आहे. पण मी अजून त्याला पाहिल नाही.' कोणालाही तो कशासाठी आलाय ते ठाऊक नव्हते. आपली जिज्ञासा आवरता न आलेल्या एकाने लग्नाच्या काही काळ आधी त्याला विचारले तेव्हा उत्तर आले : 'लग्नासाठी कुणी चागली मुलगी सापडते का हे पाहण्यासाठी मी गावोगाव भटकतोय' हे उत्तर खरेच असेल कदाचित, पण त्याने याच पद्धतीने कोणतेही उत्तर दिले असते. काही उघड करण्याऐवजी लपवता येईल अशी बोलण्याची शैली त्याला साध्य झाली होती.

ज्या दिवशी तो इथे आला त्या रात्री त्याने लोकाना सागितले की तो रेल्वे इजिनिअर आहे आणि या भागात रेल्वे होण्याची आवश्यकता त्याने आग्रहाने माडली. त्याच्या मते, त्यामुळे नदीच्या लहरीपणावर अवलबून राहावे लागणार नाही. दुसऱ्या दिवशी त्याला एक तार पाठवायची होती, ती त्याने स्वत:च तारायंत्रावर काम करून पाठवली आणि त्याने जुन्या बॅटऱ्याचा पुन्हा उपयोग करता येण्यासाठी टेलिग्राफरला एक खास युक्तीही सागितली. याच आत्मविश्वासाने तो एका लष्करी डॉक्टरशी विविध आजाराबाबत बोलला त्याला खूप आरडाओरडा असलेली आणि बराच काळ चालणारी मौज–मजा आवडत असे, पण तो पट्टीचा दारूबाज होता, मध्यस्थी करणारा आणि लबाड खेळणाराचा तो शत्रू होता. एका रविवारी सार्वजनिक प्रार्थनेनतर पोहण्यात तरबेज असलेल्याना त्याने आव्हान दिले आणि त्याना मागे टाकले. माझ्या आईने पत्रात हे सगळे कळवले होते आणि पत्राच्या शेवटी खास तिचाच अमा शेराही होता 'तो सुवर्णसरितेत पोहतो आहे हेही

दिसून येते.' बायार्दो सान रोमानला अशक्य असे काही नाही, तो धनाढ्य आहे आणि त्याची पोच दूरपर्यंत आहे अशी जी त्याची ख्याती पसरली होती तिला अनुलक्षून हा शेरा होता.

ऑक्टोबरमधल्या एका पत्रात आईने लिहिले होते, 'लोकांना तो खूप आवडतो, कारण तो प्रामाणिक आहे आणि धार्मिकही. ' त्यानंतरच्या दोन–तीन पत्रात तिने बायार्दो सान रोमानविषयी काही लिहिले नाही, इतकेच नव्हे तर तो एंजेला व्हिकारिओशी लग्न करणार आहे ही बातमी जगजाहीर झालेली होती, तेव्हाही नाही. त्या दुर्दैवी लग्नानंतर बऱ्याच काळाने तिने माझ्यापाशी कबूल केले की तो तिला कळला तेव्हा ऑक्टोबरच्या पत्रात दुरुस्ती करणे शक्य नव्हते. त्याच्या सोनेरी डोळ्यानी तिच्या मनात भीतीची लहर उत्पन्न झाली होती.

'त्याला पाहताना मला सैतानाची आठवण येत असे,' तिने मला सांगितले, 'पण असल्या गोष्टी पत्रात लिहू नये असं तूच मला सांगितलं होतस.'

तिची भेट झाल्यानंतर काही दिवसातच मी नाताळच्या सुटीसाठी घरी आलो असता माझी त्याची भेट झाली आणि त्याच्याविषयी बोलले जात होते तसाच तो चमत्कारिक वाटला. मलाही तो आकर्षक वाटला. पण माग्दालेना ऑलिव्हरच्या काव्यात्म दृष्टीतून वाटला तसा नव्हे. तो थट्टामस्करी करीत होता, परंतु मला तो गंभीर प्रकृतीचा वाटला आणि त्याच्या अतिशय सौहार्दपूर्ण वर्तनामागे दडवलेला अदृश्य ताणही मला जाणवला. एकंदरीत मला तो एक दु:खी मनुष्य आहे असे वाटले, त्यावेळी त्याचे एंजेला व्हिकारिओशी ठरलेले लग्न निश्चित झाले होते.

त्या दोघांची भेट नेमकी केव्हा आणि कशी झाली हे कुणालाच नीटसे कळले नव्हते. बायार्दो सान रोमान ज्या खाणावळीत उतरला होता तिथल्या मालकिणीने सांगितले की बैटकीतल्या झुलत्या खुर्चीत बसून कसा तो सप्टेंबर अखेरच्या दुपारी डुलक्या घ्यायचा आणि कशा एके दिवशी एंजेला व्हिकारिओ आणि तिची आई कृत्रिम फुलांनी भरलेल्या दोन टोपल्या घेऊन चौकातून जात होत्या. बायार्दो सान रोमानने अर्ध-जागृत अवस्थेत त्या दुपारी दोन वाजता रस्त्यांतून जाणाऱ्या काळी वस्त्रे परिधान केलेल्या स्त्रियांना पाहिले आणि त्यातल्या तरुण मुलीविषयी त्याने चौकशी केली. ती तरुण मुलगी त्या स्त्रीची सर्वात धाकटी मुलगी असून तिचे नाव एंजेला व्हिकारिओ असल्याचे मालकिणीने सांगितले. बायार्दो सान रोमान त्या चौकाच्या पलीकडे जाईपर्यंत त्यांना पाहत राहिला.

'चांगलं आहे तिचे नाव,' तो म्हणाला.

नंतर त्याने मान मागे टेकवली आणि परत डोळे मिटून घेतले

'मी जागा होईन तेव्हा,' तो म्हणाला. 'मला आठवण कर, मी तिच्याशी लग्न करणार आहे.'

बायार्दो सान रोमान तिला भेटण्यापूर्वी खाणावळीच्या मालकिणीने तिला हा प्रसंग सांगितला होता हे मला एंजेला व्हिकारिओने सांगितले. 'मी चकित झाले होते,' ती म्हणाली. खाणावळीतल्या तिघानी हा प्रसंग घडल्याचे खात्रीपूर्वक सांगितले, पण इतर चौघांना तशी खात्री नव्हती. या उलट एंजेला व्हिकारिओ आणि बायार्दो सान रोमान यांची पहिली भेट ऑक्टोबरमध्ये एका राष्ट्रीय सुटीच्या दिवशी आयोजित केलेल्या चॅरिटी बझारमध्ये झाली, असे सांगणारे बरेच होते. बायार्दो सान रोमान तिथे आला व एंजेला व्हिकारिओच्या स्टॉलवर गेला. तिथल्या शिंपले जडवलेल्या बाजाच्या पेटीची किंमत त्याने विचारली. ती विकण्यासाठी नाही, तर ज्याचा नंबर लागेल त्याला ती मिळेल असे उत्तर तिने दिले.

'मग छानच की,' तो म्हणाला, 'ती सहज मिळेल अन् स्वस्तही.'

तिने कबूल केले की त्याने तिच्यावर छाप जरूर टाकली, पण त्याचा प्रेमाशी काही संबंध नाही. 'मला अहमन्य माणसं आवडत नाहीत आणि याच्यासारखा दुसरा मी पाहिला नव्हता,' त्या दिवशीचा प्रसंग आठवत ती मला म्हणाली. ती बाजाची पेटी त्यानेच जिंकली. तिच्यावर छाप मारण्यासाठी तो सारीच्या सारी तिकिटे विकत घेईल याची ती कल्पनाही करू शकली नव्हती.

त्या रात्री एंजेला व्हिकारिओ घरी परतली तेव्हा तिला ती बाजाची पेटी चांगल्या कागदात गुंडाळून वर रिबन बांधून व्यवस्थित अशी ठेवलेली आढळली. 'माझा वाढदिवस होता हे त्याला कसं कळलं कुणास ठाउक,' ती मला म्हणाली. बायार्दो सान रोमानने ती भेट तिला का पाठवावी याचे कोणतेच स्पष्टीकरण ती आपल्या आईवडलांकडे करू शकली नाही. शिवाय ती वस्तू चार-चौघांना सहज दिसेल अशाप्रकारे त्याने ठेवली होती. पेद्रो आणि पाब्लो या तिच्या वडील भावांनी ती बाजाची पेटी तिच्या मालकाला परत करण्यासाठी त्याच्या हॉटेलवर नेली. ते काम त्यांनी इतक्या चपळाईने केले की त्यांना आत जाताना कुणी पाहिले नाही की बाहेर येताना. पण बायार्दो सान रोमानच्या मोहिनीविद्येची त्या कुटुंबाला पुरेशी कल्पना नव्हती. ती जुळी मुले दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत घरी परतली नाहीत, ती आली तेव्हा त्यांच्या हातात पुन्हा ती बाजाची पेटी होतीच, दारूने झिंगलेली होती, शिवाय उरलेली मैफल घरी सुरू ठेवण्यासाठी बायार्दो सान रोमानही त्यांच्यासोबत होता.

एंजेला व्हिकारिओ ही एका गरीब कुटुंबातली सर्वात धाकटी मुलगी होती. तिचे वडील पोन्सिओ व्हिकारिओ हे गरीब लोकांचे सोनार होते आणि कुटुंबाला अन्नाने जगता यावे म्हणून सोन्याची इतकी नाजूक कामे त्यांनी केली होती की आता त्यांना अधत्व आले होते. तिची आई पुरिसीमा डेल कार्मेन लग्न होईपर्यंत शाळेत शिक्षिका होती. तिच्या सोशिक आणि काहीशा दु:खी मुद्रेमागे तिच्या व्यक्तिमत्वातले सामर्थ्य लपलेले असे. 'ती एखाद्या जोगिणीसारखी दिसायची,' मर्सिडिस आठवू लागतो. नवऱ्याची काळजी आणि मुलांचे संगोपन या गोष्टींना तिने स्वत:ला इतके वाहून घेतलेले होते की ती अस्तित्वात आहे हे विसरायला होत असे. दोन मोठ्या मुलींची लग्ने जरा उशिराच झाली. जुळ्या मुलांखेरीज मधली एक मुलगी होती, ती तापाने वारली. दोन वर्षे झाली तरी ते सुतक पाळतच होते. मुलांना पुरुष म्हणून वाढवण्यात आले आणि मुलींना लग्नासाठी योग्य वधू म्हणून घडवले. त्यांना भरतकाम, शिवणकाम, कपडे धुणे आणि इस्त्री करणे, कृत्रिम फुले तयार करणे, वेगवेगळ्या प्रकारची मिठाई तयार करणे हे सगळे त्यांना येत असे, शिवाय साखरपुड्याची गाणीही

त्यांना लिहिता येत असत धर्माविषयी त्याच्या मनात गाढ श्रद्धा होती. आजारी आणि मरणासन्न लोकाची सेवा त्या करत. माझ्या आईला त्यांची एकच गोष्ट आवडत नसे, ती म्हणजे त्या झोपी जाण्यापूर्वी केस विचरत 'मुलीनो', ती त्याना म्हणायची, 'रात्री केस विंचरू नका, जहाज अडतात, बायानो.' ही एक गोष्ट सोडली तर इतके चागले वाढवलेल्या दुसऱ्या मुली नाहीत असे तिला वाटे 'त्या अगदी परिपूर्ण आहेत' ती वारवार म्हणायची. 'त्याच्याबरोबर कुठलाही माणूस सुखी होईल, कारण त्याना सोसण ठाऊक आहे.' परंतु त्या दोन मुलीशी लग्न करणाऱ्याना कठीणच जात होते. कारण त्या दोन बहिणी सतत एकत्रच राहत, एकत्रच कुठेही जात, स्त्रियामध्येच त्या मिसळत आणि पुरुषाना दोन हात दूर ठेवत.

एजेला व्हिकारिओ ही त्या चार बहिणीत सर्वांत सुदर होती. माझ्या आईने सागितले होते की इतिहासातल्या थोर राण्याप्रमाणेच गळ्याभोवती नाळ गुडाळलेल्या अवस्थेत तिचा जन्म झाला होता परतु ती दिसायला नाजूक आणि मनाने कोमल असल्यामुळे तिचे भवितव्य कठीणच होते. दरवर्षी ती नाताळच्या सुटीत घरी येत असे तेव्हा ती दिसायची घराच्या खिडकीत बसलेली ती दिवसेंदिवस अधिकच असहाय वाटत असे. 'गळाला लागण्यासाठीच जणू काय बसलीय,' सातियागो नासर मला म्हणायचा, 'तुझी मूर्ख चुलत बहीण.' तिच्या बहिणीच्या मृत्यूपूर्वी एके दिवशी मोठ्या बाईसारखा पोषाख करून ती रस्त्याने जात असताना मी तिला पाहिले, तेव्हा ती तीच आहे यावर माझा विश्वास बसेना. पण तो एक भास होता : तिच्यातली चैतन्यहीनता गेलेल्या वर्षांनी अधिकच वाढवलेली होती. अशा स्थितीत बायार्दो सान रोमान तिच्याशी लग्न करायला उत्सुक आहे हे जेव्हा लोकांना कळले, तेव्हा बाहेरगावच्या माणसाची ही शुद्ध फसवणूक आहे असे त्याना वाटले.

त्या कुटुबाने ही गोष्ट अतिशय गंभीरपणे तर घेतलीच शिवाय त्याना अत्यत आनदही झाला. फक्त पुरा व्हिकारिओने हा बायार्दो सान रोमान कोण, कुठला याविषयी खातरजमा करण्याची अट घातली. तोपर्यंत तो कोण हे नक्की कुणालाच ठाऊक नव्हते. एका सध्याकाळी तो एखाद्या नटासारख्या पोषाखात अवतरला यापलीकडे त्याची माहिती नव्हती आणि त्यानेही स्वत विषयीची गुप्तता कायम राखली होती. त्यामुळे त्याच्याविषयी अनेक अफवा पसरल्या होत्या. त्याने सैन्यात कमाडर म्हणून खेडीच्या खेडी उद्ध्वस्त करून कॅसानारेमध्ये दहशत निर्माण केली, किंवा डेव्हिल्स आयलडवरून त्याने सुटका करून घेतली किंवा, तो परनाम्बकोमध्ये दोन अस्वले नाचवून पोट भरताना आढळला, किंवा विडवर्ड खाडीत बुडालेल्या जहाजावरचे सोने त्याने मिळवले, वगैरे बायार्दो सान रोमानने या सर्व तर्कवितर्कांना एकाच गोष्टीने फाटा दिला : त्याने स्वत.चे अख्खे कुटुबच इथे आणले

ते चार लोक होते : वडील, आई आणि दोन उन्मादक बहिणी. ते बदकाच्या केकाटण्यासारखा हॉर्न असलेल्या फोर्ड गाडीतून सकाळी अकरा वाजता अवतरले. त्याची आई अलवर्टा सायमंड्स् कुरासावची राहणारी असून ती मिश्र स्पॅनिश बोलायची. ती तरुण होती तेव्हा अॅन्टिलसमधल्या सगळ्या दोनशे मुलीमध्ये ती सर्वांत सुदर ठरली होती. नुकत्याच तारुण्यात आलेल्या बहिणी फुरफुरणाऱ्या दोन घोड्यासारख्या दिसत होत्या. पण मुख्य आकर्षण होते वडील जनरल पेद्रोनिओ सान रोमान, गेल्या शतकातील गृहयुद्धाचे नायक, सनातनी राजवटीचे एक गौरवचिन्ह. तो कोण आहे हे कळल्यानंतर माझी आईच तेवढी त्याच्या स्वागतासाठी पुढे झाली नाही 'त्याच लग्न व्हाव असच मला वाटत,' ती मला म्हणाली. 'पण त्या गोष्टीचा इथ काही सबध नाही, ज्या माणसान गेरिनेल्डो मार्केजच्या पाठीत गोळ्या घालण्याची आज्ञा दिली त्याच्याशी हस्तादोलन करण ही वेगळी गोष्ट आहे.' मोटारीच्या खिडकीतून जेव्हा त्याने बाहेर डोकावले आणि आपली पाढरी हॅट हलवली तेव्हा सगळ्यानी त्याला पटकन् ओळखले. कारण त्याची चित्रे लोकानी पूर्वी पाहिली होती त्याने गव्हाळी रंगाचा सूट घातला होता आणि कातडी बूट. त्याच्या चष्म्याची साखळी जाकिटाच्या बटनहोलमध्ये अडकवलेली होती. त्याच्या कोटावर शौर्याचे पदक लावलेले होते आणि हातात मुठीवर राष्ट्रीय चिन्ह कोरलेली छडी घेतलेली होती. मोटारीतून पहिल्यादा तोच खाली उतरला. आमच्या खराब रस्त्याच्या धुळीने तो माखलेला होता. बायार्दो सान रोमानने ज्या कुणाशी लग्न करायचे ठरवले आहे तिच्याशी ते होणारच हे सगळ्याना कळावे यासाठीच त्याला स्वत.ला असे सादर करायचे होते

एजेला व्हिकारिओ ही एक अशी होती, तिला त्याच्याशी लग्न करायचे नव्हते. 'तो मला झेपेल असा पुरुष वाटला नाही,' ती मला म्हणाली. याखेरीज बायार्दो सान रोमानने तिचे आर्जव केले नाही की प्रेमयाचना केली नाही. पण त्याने तिच्या कुटुंबाला भारावून टाकले होते एजेला व्हिकारिओला त्या रात्रीचा विसर कधीच पडला नाही. जेव्हा तिचे आईवडील, तिच्या बहिणी आणि त्याचे नवरे असे सगळे बैठकीच्या खोलीत जमले आणि त्यानी तिच्यावर ते लग्न लादले. त्या माणसाला तिने जेमतेम पाहिले होते. जुळ्या भावानी या चर्चेत मुळीच भाग घेतला नाही. 'आम्हाला ती बायकाची बाब वाटली,' पाब्लो व्हिकारिओ मला म्हणाला. देवाने दिलेले हे दान आपल्यासारख्या गरीब कुटुबाने लाथाडू नये असे आईबापाचे म्हणणे होते. एजेला व्हिकारिओने भीतभीत प्रेमाच्या अभावाचा निर्देश केला; परतु आईने एकाच वाक्यात तिचे म्हणणे उडवून लावले.

'प्रेम काय, नतर होईलच की.'

लग्न ठरल्यानतर इतराप्रमाणे त्याना फार काळ तिष्ठत राहावे लागले नाही. बायार्दो सान रोमानच्या आग्रहामुळे चारच महिन्यात तिथिनिश्चय झाला. सुतक सपेपर्यंत थाबावे असे पुरा व्हिकारिओचे म्हणणे होते; परतु बायार्दो सान रोमानने सगळ्या गोष्टी अशा रीतीने केल्या की कोणतीही काळजी उत्पन्न न होता काळ भराभर गेला. 'एका रात्री त्याने मला विचारले की गावातले कोणते घर तुला फार आवडते'– एजेला व्हिकारिओ मला म्हणाली. 'आणि मी, का कोण जाणे, गावातल्या सर्वांत सुदर घराचा, विधुर झिअसच्या फार्महाऊसचा निर्देश केला. मीही तेच म्हटले असते. ते घर एका टेकडीवर होते आणि गच्चीवरून दलदलीत उगवलेल्या जाभळ्या फुलाचे नदनवन दिसत असे. उन्हाळ्यातल्या निरभ्र दिवशी कॅरिबिअनची क्षितिजरेषा आणि तिच्यावरून

सरकणारी कार्तागिनाची प्रवासी जहाजे दिसत असत. त्याच रात्री बायार्दो सान रोमान सोशल क्लबमध्ये गेला आणि विधुर झिअसच्या टेबलाशी डॉमिनो खेळायला बसला.

'झिअस,' तो त्याला म्हणाला, 'मी तुझं घर विकत घेईन.'

'ते विकायला काढलेले नाही,' विधुर म्हणाला.

'मी ते आतल्या साऱ्या सामानासह विकत घेईन.'

झिअसने त्याला अतिशय शातपणे समजावून सागितले की घरातल्या साऱ्या वस्तू त्याच्या बायकोने आयुष्यभर खपून एक एक करीत गोळा केलेल्या आहेत आणि त्या तिच्या आठवणी आहेत. 'तो अगदी काळजातून बोलत होता,' त्याच्याबरोबर खेळत असलेले डॉ. डायोनिझिओ इग्वारान मला म्हणाले. 'मी अगदी खात्रीने सागतो, जिथ त्यान आयुष्यातली तीस सुखाची वर्षं घालवली ते घर विकण्याआधी तो मरण पत्करील.' बायार्दो सान रोमानलाही त्याचे म्हणणे कळत होते.

'मान्य,' तो म्हणाला, 'मग मला ते घर रिकाम करून वीक.'

पण झिअस खेळ सपेपर्यंत नकारच देत राहिला. तीन रात्रीनतर बायार्दो सान रोमान साऱ्या तयारीनिशी डॉमिनो टेबलाजवळ येऊन बसला.

'झिअस,' त्याने सुरुवात केली, 'घराची किंमत साग.'

'त्याची काही किंमत नाही'

'तू वाटेल ती साग'

'मला माफ कर, बायार्दो,' झिअस म्हणाला, 'पण तुम्हा तरुण मुलाना हृदयाची भाषा समजत नाही'

बायार्दो सान रोमान विचार करायलाही थाबला नाही

'पाच हजार पेसो,' तो म्हणाला.

'उगाच काही तरी बोलू नकोस,' विधुर म्हणाला. त्याची आत्मप्रतिष्ठा जागी झाली होती.

'त्या घराची एवढी किंमत नाही'

'दहा हजार,' बायार्दो सान रोमान म्हणाला 'आत्ताच्या आत्ता आणि एक रकमी.'

झिअसने त्याच्याकडे पाहिले, त्याचे डोळे अश्रूनी भरले होते. 'राग अनावर होऊन तो रडत होता' डॉ. डायोनिझिओ अिग्वारान याच्याकडून मला कळले ते डॉक्टर तर होतेच, शिवाय वाङ्मयाचीही त्याना आवड होती. 'कल्पना कर : हाताशी आलेली एवढी मोठी रक्कम आणि केवळ आत्मप्रतिष्ठेमुळे नकार द्यावा लागतोय.' विधुर झिअसच्या तोंडून शब्द फुटला नाही, त्याने मानेनेच नकार दर्शवला.

'मग माझ्यावर एक कृपा कर,' बायार्दो सान रोमान म्हणाला,' माझ्यासाठी पाच मिनिटं इथच थाब.'

पाच मिनिटानी तो चादीने मढवलेल्या थैल्या घेऊन परत सोशल क्लबमध्ये आला. टेबलवर त्याने हजार पेसोची करकरीत दहा बडले ठेवली. त्यावरची स्टेट बँकेची छापील पट्टी जशीच्या तशी होती विधुर झिअस दोन महिन्यानी वारला 'त्यामुळेच त्याचं मरण ओढवल, डॉ. डायोनिझिओ अिग्वारान म्हणाले. आमच्यापेक्षा तो अधिक निरोगी होता, पण त्याच्या छातीवर स्टेथॉस्कोप लावून ऐकलं तर त्याच्या काळजात अश्रू उकळताहेत अस वाटत होतं' त्याने आतल्या साऱ्या वस्तूसह ते घर बायार्दो सान रोमानला नुस्ते विकले एवढेच नाही तर घराची किंमत हप्त्याहप्त्याने देण्याची विनती केली कारण त्याच्याजवळ एवढे पैसे ठेवायला नीटशी पेटीदेखील नव्हती.

अेजेला व्हिकारिओ ही कुमारिका नाही असे कुणी बोलले तर नसतेच पण असा कुणी विचारही केला नसता तिला पूर्वी कुणी प्रियकर असल्याचे ऐकिवात नव्हते आणि ती इतर बहिणीसोबत आईच्या करड्या शिस्तीखाली वाढली होती. लग्नाला केवळ दोन महिने असतानादेखील पुरा व्हिकारिओने तिला एकटीला बायार्दो सान रोमानसोबत घर पाहायला जाऊ दिले नव्हते. ती आणि आधळा बाप अॅजेलाच्या सोबत गेले. 'देवाकडे मी एकच गोष्ट मागितली, स्वतःला ठार करण्याच धैर्य मला दे,' अॅजिला व्हिकारिओ मला म्हणाली 'पण त्यानं ते मला दिल नाही.' ती इतकी अस्वस्थ झाली होती की आईला सगळे सत्य सागून हुतात्मा होण्यापासून स्वत ला वाचवावे. परतु तिच्या दोन मैत्रिणींनी तिला त्यापासून परावृत्त केले. 'मी आधळ्याप्रमाणे त्याच्या मागे गेले,' तिने मला म्हटले, 'पुरुषाना फसवण्याच्या युक्त्यामध्ये त्या अगदी तरबेज आहेत अस त्यानी मला भासवलं' बहुतेक सर्वच स्त्रियाचे कौमार्य बाळपणी अपघाताने भग पावत असते असा दिलासा त्यांनी दिला. अगदी आडमुठ्या नवऱ्याची देखील समजूत घालता येते. बहुतेक पुरुष त्या रात्री घाबरलेलेच असतात. आणि आपल्या बायकाच्या सहकार्याशिवाय त्यांना काही करता येत नाही मोक्याच्या क्षणी तर त्यांचे त्यांना कळत नाही की, आपण काय केले, अशाप्रकारे त्यांनी तिला पटवून दिले की, धास्ती बाळगण्याचे काही कारण नाही. 'चादरीवर काय दिसतं यावरच ते विश्वास ठेवतात' त्यानी त्याला सागितले. नवऱ्याच्या डोळ्यात धूळफेक करता येईल अशा अनुभवी स्त्रियांच्या काही युक्त्या त्यानी तिला सागितल्या. त्यामुळे वैवाहिक जीवनाच्या पहिल्याच सकाळी तिला लख्ख सूर्यप्रकाशात आपल्या घराच्या अगणात कौमार्याचे चिन्ह असलेली चादर वाळत घालता येईल.

तिने या भ्रमातच लग्न केले बायार्दो सान रोमानही सामर्थ्य आणि श्रीमतीच्या जोरावर सुख विकत घेतल्याच्या भ्रमात असेल. लग्नसमारभाच्या योजना ठरायला लागल्या तसतशा त्याच्या डोक्यात तो अधिकाधिक भव्य प्रमाणात कसा करता येईल याविषयी तऱ्हेतऱ्हेच्या कल्पना नाचू लागल्या. बिशपकडूनच आपले लग्न लागावे यासाठी एक दिवस ते पुढे ढकलावे असे त्याला वाटत होते. पण अॅजिला व्हिकारिओने त्याला विरोध केला. 'खर तर,' ती मला म्हणाली, 'असं आहे की जो माणूस सूपसाठी कोबड्याचा तुर्रा केवळ कापतो आणि बाकीचा अख्खा कोबडा कचऱ्यात फेकतो, त्याच्या हातून आपल लग्न लागाव असं मला वाटत नाही.' बिशपच्या आशीर्वादाशिवाय लग्न लागले आणि समारंभ इतक्या थाटात झाला की बायार्दो सान रोमानचे त्यावर नियत्रण राहिले नाही आणि त्याला सार्वजनिक समारंभाचे रूप आले.

'जनरल पेट्रोनिओ सान रोमान आणि त्याची कुटुंबीय मंडळी नॅशनल काँग्रेसच्या ज्या समारभी नौकेत आले ती लग्न आटोपे-

पर्यंत बंदरात नागरलेली राहिली. त्याच्या सोबत काही बडे लोकही आलेले होते, परंतु नवनव्या चेहऱ्यांच्या गर्दीत त्याच्याकडे कुणाचे फारसे लक्ष गेले नाही. बऱ्याच भेट-वस्तू मिळाल्या होत्या आणि त्यातल्या काही नव्या जोडप्याच्या नव्या घरात गेलेल्याही होत्या वराला त्याची नेमप्लेट असलेली नवी कार मिळाली. वधूला शुद्ध सोन्याची चोवीस भोजनपात्रे मिळाली. एक बॅले कंपनी आणि दोन वॉल्टझ् वाद्यवृंद यानाही त्यानी बोलावले होते स्थानिक बॅण्डशी त्याचा मेळ जमला नाही आणि त्या सगळ्यांचा मिळून एकच गोंधळ झाला.

व्हिकारिओ कुटुंब विटांच्या भिंती आणि ताडाचे छप्पर असलेल्या एका साध्या घरात राहत असे. घरावर दोन पोटमाळे होते, त्यात पाकोळ्या जानेवारीत बाळंत झाल्या होत्या समोरच्या बाजूला गच्ची होती, ती फुलांच्या कुंड्यानी भरून गेलेली होती अंगणात फळांची झाडे होती आणि कोंबड्या मोकळेपणाने फिरत असत. मागच्या अंगणात डुकरखाना होता तिथे सुरी चालवण्यासाठी एक दगड आणि तुकडे करण्यासाठी एक टेबल होते. पोन्सिओ व्हिकारिओची दृष्टी गेल्यापासून हे मिळकतीचे एक बरे साधन होते. पेद्रो व्हिकारिओने हा धंदा सुरू केला, पण तो लष्करात भरती झाला तेव्हा त्याच्या जुळ्या भावाने कसायाचे काम शिकून घेतले

घरात सर्वांना राहण्याच्या दृष्टीने जागा कमीच पडत होती. त्यामुळे लग्न समारंभाच्या काळात भाड्याने एखादे घर घ्यावे असे वडील बहिणींना वाटले. 'गमत बघ,' एंजेला व्हिकारिओ मला म्हणाली, 'त्याच्या मनात प्लासिडा लिनेरोच घर घ्याव अस होत. पण सुदैवाने आई-वडिलानी विरोध केला त्यानी म्हटलं, आमच्या मुलींचं लग्न डुकराच्या खुराड्यातच होतील, नाही तर होणार नाहीत.' मग घराला त्याचा मूळचा पिवळा रंग दिला, दारे-खिडक्या नीट केल्या. फरशी दुरुस्ती केली आणि लग्नसमारंभासाठी ते सज्ज केले. जुळ्यानी डुकरे दुसरीकडे नेऊन ठेवली आणि डुक्करखाना स्वच्छ धुतला, तरीही फारशी जागा झाली नाही. शेवटी बायार्दो सान रोमानच्या मदतीने त्यानी अंगणाचे कुंपण तोडले, नाचासाठी शेजारचे घर मागितले आणि बसण्या-खाण्यासाठी चिंचेच्या झाडाखाली लाकडी बाके ठेवली.

लग्नाच्या दिवशी सकाळी एक आश्चर्य घडले, ते म्हणजे नवरा मुलगा एंजेला व्हिकारिओकडे दोन तास उशिरा आला. आणि त्याने घरात पाऊल टाकल्याशिवाय आपण लग्नवेष धारण करणार नाही असे तिने जाहीर केले. 'हे बघ,' ती मला म्हणाली, 'तो मुळी आलाच नसता तर मला बरच वाटल असत, पण लग्नाचा पोषाख घालून मी तयार होऊन बसले असताना त्याने मला तसच वाट पाहत ठेवलं असत तर वाईट वाटलं असत.' तिची दक्षता स्वाभाविक होती. लग्नाचा पोषाख चढवून बसलेल्या मुलीची अशी चेष्टा करणे यासारखी लज्जास्पद घटना दुसरी नसती. नाही तर कुमारिका नसूनही एंजेला व्हिकारिओने वधूवेष केला असता तर मागाहून शुद्धतेच्या प्रतीकाची तिने कुचेष्टा केली असे बोलले गेले असते. माझ्या आईने तेवढे तिच्या धैर्याचे कौतुक केले. 'जुन्या काळी' ती मला म्हणाली, 'देवाला सगळं समजत असे.' दुसरीकडे बायार्दो सान रोमानच्या मनात काय चालले होते कुणास ठाऊक. शेवटी तो कोट आणि हॅट घालून आल्यापासून तो लग्नानतरच्या वधूवराच्या नृत्यापर्यंत सुखी वराची परिपूर्ण प्रतिमाच असा तो दिसत होता.

सातियागो नासरची खेळी काय चालली होती हेही कुणाला ठाऊक नव्हते. चर्चमध्ये आणि एकूण समारंभात मी बहुतेक वेळी त्याच्या सोबतच होतो. क्रिस्तो बेदोया आणि माझा भाऊ लुई एनरिक् हेही सोबत होते, पण आम्हा कुणालाही त्याच्यात काही बदल झालाय असे वाटले नाही. मला ही गोष्ट वारवार सागावी लागली. कारण आम्ही चौघेही शाळेत बरोबरच होतो, एकत्रच वाढलो आणि सुटीत आम्ही एकत्रच असायचो. आमच्यात काही गुपित राहत नसे आणि एवढे मोठे रहस्यमय प्रकरण तर न सागता तसे राहिलेच नसते.

सातियागो नासर हा पार्ट्याबिटर्यामधला दर्दी माणूस होता. मरायच्या आदल्या सध्याकाळी लग्नसमारंभाला आलेल्या खर्चाचा ताळेबंद जुळवण्यात त्याचा वेळ फारच छान गेला होता. चर्चमध्ये बसून त्याने अदाज केला की साधारणपणे चौदा उत्कृष्टरीत्या सजवलेल्या प्रेतयात्राना लागेल एवढी फुले लग्नाच्या सजावटीसाठी वापरली आहेत. या दोन गोष्टीचा त्याने जो चमत्कारिक सबंध जुळवला होता त्याने मी पुढे कित्येक वर्षे बेचैन झालो कारण सातियागो नासरने मला अनेकदा सागितले होते की गुफलेल्या फुलाचा तो विशिष्ट गंध त्याला नेहमीच मृत्यूची आठवण करून देत असे आणि त्या दिवशी आम्ही दोघे चर्चमध्ये गेलो असता तर त्याने ही गोष्ट वारवार बोलून दाखविली. 'माझ्या प्रेतयात्रेच्या वेळी फुले अजिबात नकोत,' त्याने मला बजावले होते. आणि ते सागताना त्याला कल्पनाही नव्हती की दुसऱ्याच दिवशी तशी फुले नसावीत याची काळजी मला घ्यावी लागणार आहे. चर्चकडून व्हिकारिओच्या घराकडे जाताना त्याने रस्त्यावर ठिकठिकाणी लावलेल्या रंगीत माळाचा हिशेब केला सगीत, शोभेचे दारुकाम आणि उधळल्या जाणाऱ्या कच्च्या तादळाच्या दाण्याचाही त्याने हिशेब केला. दुपारच्या सुस्त वेळी नवपरिणित दांपत्याने अंगणात एक फेरफटका मारला. बायार्दो सान रोमानशी आमची चागलीच गट्टी जमली आणि आमच्यासोबत तो अगदी आरामात होता एंजेला व्हिकारिओने वधूवेष उतरवला होता आणि एकाएकी ती एखाद्या विवाहितेसारखी दिसू लागली होती. सातियागो नासरने हिशेब केला आणि बायार्दो सान रोमानला सागितले की आतापर्यंतचा खर्च किमान नऊ हजार पेसो एवढा आलेला आहे तिला त्याचा आगाऊपणा आवडला नाही हे तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसले. 'परक्यासमोर पैशाविषयी बोलू नये अशी माझ्या आईची शिकवण होती.' ती मला म्हणाली. बायार्दो सान रोमानला मात्र आनद आणि अभिमानच वाटला.

'जवळजवळ,' तो म्हणाला, 'पण ही तर सुरुवात आहे. समारंभ सपेल तेव्हा खर्च दुपटीवर गेलेला असेल.'

सातियागो नासरच्या मृत्यूच्या पाऊण तास अगोदर क्रिस्तो बेदोयाने त्याला खर्चाचा शेवटचा आकडा सागितला तेव्हा, बायार्दो सान रोमानचा अदाज किती बरोबर होता असे तो म्हणाला

इतराकडून या समारंभाविषयी थोडी-थोडी माहिती मिळविण्यापूर्वी माझी आठवण अंधुकच होती. पुढेही कित्येक वर्षे घरातली माणसे या सोहोळ्याविषयी बोलत असत. नव्या जोडप्याचे स्वागत म्हणून माझ्या वडलांनी आपले लहानपणचे व्हायोलिन कसे वाजवले, माझ्या नन असलेल्या बहिणीने नृत्य कसे केले आणि डॉ. डायोनिझिओ इग्वारान यानी दुसरे दिवशी बिशपच्या स्वागतासाठी हजर राहावे लागू नये म्हणून जोडप्याच्या बोटीवर स्वतःची वर्णी कशी लावली, अशा अनेक लहान-सहान गोष्टीचे तपशील नतर कळत गेले. या वृत्तातासाठी माहिती गोळा करताना मला असेही कळले की बायार्दो सान रोमानच्या बहिणींनी आपल्या फुलपाखरी पखाच्या पोशाखाने कसे लोकाचे लक्ष वेधून घेतले होते, तेवढे त्याच्या वडलांनी लावलेल्या पदकानीदेखील नाही. त्या तसल्या गोधळात मी मर्सिडिज बार्चाला मागणी घातली होती हे अनेकाना ठाऊक आहे आणि त्यानतर चौदा वर्षांनी आम्ही विवाहबद्ध झालो तेव्हा तिनेही मला ते सागितले. पण माझ्या मनात त्या अवाच्छनीय रविवारची रुतून बसलेली आठवण होती ती अगणात मध्यभागी एकाकीपणे स्टुलवर बसलेल्या म्हाताऱ्या पोन्सिओ व्हिकरिओची जणू काही ती मोठी मानाची जागा आहे या भावनेने त्याला तिथे बसवण्यात आले होते. येणारे-जाणारे पाहुणे त्याच्यावर आदळत, तो म्हणजे दुसराच कोणी आहे असे समजत आणि त्याला बाजूला ढकलून पुढे जात. नुकतेच अंधत्व आलेल्या माणसाने इकडे तिकडे भिरीभिरी पाहावे तसा तो बघून आपले पाढरेशुभ्र मस्तक झुकवीत असे आणि कोणीही न हलवलेल्या हाताना तो आपला हात उचलून प्रत्युत्तर देत असे. कडक खळ लावलेले कपडे घालून, हातात एक शोभिवत काठी घेऊन तो बसला होता आणि आपल्या दृष्टिहीनतेच्या कोषात तो सुखी होता.

विवाहसमारभातले औपचारिक कार्यक्रम संध्याकाळी सहाच्या सुमारास सपले आणि खास निमत्रित पाहुण्यानी रजा घेतली. झगमगीत दिव्यांची रोषणाई केलेली बोट पियानोच्या सुरांवर तरंगू लागली. काय करावे हे न सुचून आम्ही काही काळ तिथे उभे राहिलो. पण पुन्हा आम्ही भानावर आलो आणि त्या जल्लोषात आम्ही स्वतःला झोकून दिले नवपरिणित दापत्य काही वेळाने एका उघड्या कारमधून त्या गर्दीतून मुश्किलीने वाट काढीत आले. बायार्दो सान रोमानने फटाके उडवले, लोकांनी पुढे केलेल्या बाटल्यातून मद्य त्याने घेतले आणि नृत्यात सामील होण्यासाठी एंजेला व्हिकारिओसह तो खाली उतरला. त्याच्या खर्चाने आम्ही मनसोक्त नाचले पाहिजे असे बजावून तो आपल्या भयचकित बायकोला घेऊन विधुर झिअस जिथे सुखाने राहिला होता त्या स्वप्नगृहाकडे निघून गेला

लोकाचा जल्लोष मध्यरात्रीपर्यंत चालला आणि नतर ते गटागटाने पागू लागले. तेव्हा चौकात एका बाजूला असलेले क्लॉटिल्ड आर्मेन्टाचे दुकान तेवढे उघडे होते. सातियागो नासर, मी, माझा भाऊ लुई एनरिक् आणि क्रिस्तो बेदोया असे मिळूनच मारिआ आलेजान्द्रिना सर्वांटिसच्या घरी गेलो व्हिकारिओ बधूही तिथे आले होते. सांतियागो नासरला ठार करण्यापूर्वी पाच तास अगोदर ते त्याच्याबरोबर गात होते आणि आमच्याबरोबर दारू पीत बसले होते. समारभाच्या जल्लोषाचे वातावरण अजूनही रेंगाळत होते. कारण सगीताचे लहरणारे स्वर आणि मारामारीचे आवाज दुरून येत होते बिशपच्या बोटीचा भोगा वाजेपर्यंत हे असेच सुरू होते.

पुरा व्हिकारिओने माझ्या आईला सागितले होते की रात्री अकरा वाजता ती बिछान्यावर पडली होती. तत्पूर्वी तिच्या मोठ्या मुलींनी आवराआवर करण्यात मदत केली होती. दहाच्या सुमारास, चौकात काही दारूडे गात असताना, एंजेला व्हिकारिओने तिच्या खाजगी वस्तू आणि दररोजच्या वापराचे कपडे असलेली सूटकेस आणायला एक माणूस पाठवला होता. तो जरा घाईतच होता. पुरा व्हिकारिओला नंतर गाढ झोप लागली होती. तेव्हा दार ठोठावण्याचा आवाज तिला ऐकू आला. 'दार हळूहळू तीनदा ठोठावण्यात आले,' तिने माझ्या आईला सागितले, 'पण त्या ठोठावण्यातच काही तरी अशुभ वार्तेची सूचना होती,' इतर कुणी जागे होऊ नये म्हणून दिवा न लावताच तिने दार उघडले. रस्त्यावरच्या दिव्याच्या उजेडात तिला बायोर्दो सान मानारो दिसला. त्याच्या रेशमी शर्टाची बटणे लावलेली नव्हती आणि पँट कशीबशी बाधलेली होती. 'अशुभ स्वप्नासारखा तो दिसत होता,' पुरा व्हिकारिओ माझ्या आईला म्हणाली. एजेला व्हिकारिओ अंधारात उभी होती. जेव्हा बायार्दो सान रोमानने तिला हाताने खेचून उजेडात आणले तेव्हा ती दिसली. तिच्या सॅटिनच्या पोषाखाच्या चिंध्या झालेल्या होत्या आणि कमरेला एक टॉवेल गुंडाळलेला होता. कारमधून जाताना काही अपघात होऊन ते बाहेर फेकले गेले असावेत आणि धुळीत मृतावस्थेत पडलेले असावेत असे पुरा व्हिकारिओला वाटले.

'देवा,' ती भयभीत होऊन म्हणाली, 'तुम्ही जिवंत आहात ना.'

बायार्दो सान रोमान आत गेला नाही. एक शब्दही न बोलता त्याने आपल्या बायकोला आत ढकलले. पुरा व्हिकारिओच्या गालावर ओठ टेकवून तो अतिशय दुःखी, आर्त आवाजात म्हणाला, 'मी फार आभारी आहे तुमचा, आई तुम्ही थोर आहा.'

त्या नंतरच्या दोन तासात काय घडले हे फक्त पुरा व्हिकारिओलाच ठाऊक होते आणि ती ते रहस्य सोबत घेऊनच हे जग सोडून गेली 'मला आठवतं ते एवढंच की एका हातान तिनं माझे केस गच्च धरून ठेवले होते आणि दुसऱ्या हातानं ती मला बडवत होती. तिला राग इतका अनावर झाला होता की ती आता माझा जीवच घेईल असं मला वाटलं,' एजेला व्हिकारिओने मला म्हटले. पण हे सारे तिने इतके गुपचूप केले की शेजारच्या खोलीत झोपलेल्या मोठ्या मुलीना आणि त्यांच्या नवऱ्याना पहाट होईपर्यंत काही कळलेदेखील नाही आणि कळले तेव्हा सर्वनाश घडून गेलेला होता.

जुळे घरी परतले तेव्हा तीनचा सुमार होता त्याच्या आईने त्याना बोलावले. जेवणघरातल्या कोचावर तोंड खुपसून पडलेली एजेला त्यांना दिसली. तिच्या चेहऱ्यावर माराच्या खुणा होत्या, पण तिचे रडणे थाबलेले होते. 'मला भीती वाटत नव्हती,' ती मला म्हणाली, 'उलट माझ्यावर पसरलेली मृत्यूची गुगी निघून गेली आहे असंच मला वाटत होत. हे सगळं एकदाचं सपावं आणि मला गाढ झोपायला मिळावं असंच त्यावेळी मला वाटत राहिलं.' पेद्रो व्हिका-

रिओ त्या दोघात अधिक बळकट होता. त्याने तिला उचलले आणि जेवणाच्या टेबलवर आदळले.

'ठीक आहे,' रागाने थरथरत तो म्हणाला, 'पण तो कोण होता एवढच मला साग'

तिने नाव उच्चारण्यापुरता वेळ घेतला. भोवतीच्या अंधारात तिने ते शोधले, या आणि त्या दुसऱ्या जगातल्या असंख्य नावाच्या कल्लोळात तिला तेच नाव चटकन सापडले आणि ज्याच्या मृत्यूचे विधिलिखित आधीच लिहून झालेले होते अशा एखाद्या फुलपाखराला अचूकपणे भिंतीवर टाचावे तसे तिने ते उच्चारले.

'सातयागो नासर,' ती म्हणाली.

सदोष मनुष्यवधाचा हा मामला आहे असे वकिलाने मत माडले आणि न्यायाधीशाने ते मान्य केले. जुळयानी खटल्याच्या शेवटी जाहीर केले की त्याच कारणासाठी तीच कृती त्यांनी हजारदा केली असती. गुन्हा घडल्यानतर लगेच ते चर्चमध्ये आत्मसमर्पण करण्यासाठी गेले यावरून त्यांच्या बचावाला दिशा मिळाली. अरब जमावाचा पाठलाग चुकवीत ते चर्चमध्ये धापा टाकत घुसले आणि त्यानी स्वच्छ पुसलेले सुरे फादर अमादोरच्या टेबलावर ठेवले खुनासारख्या रानटी कृत्याने दोघेही थकून गेले होते आणि त्याचे कपडे, चेहरे घामाने व रक्ताने भिजलेले होते. त्याचे आत्मसमर्पण ही एक महान कृती आहे असे धर्मगुरूला वाटले.

'आम्ही त्याला उघडपणे मारले,' पेद्रो व्हिकारिओ म्हणाला, 'पण आम्ही निष्पाप आहोत.'

'कदाचित, देवासमोर!' फादर अमादोर म्हणाले.

'देवासमोर आणि मनुष्यासमोरही, पाब्लो व्हिकारिओ म्हणाला 'तो प्रतिष्ठेचा प्रश्न होता'

पुढे घटनांची व्यवस्थित माडणी केल्यानतर, त्यानी मुळात होती त्याहून अधिक रक्तपिपासू वृत्ती दाखवली, असे दिसले. प्लासिदा लिनेरोच्या घराचे मुख्य दार सार्वजनिक पैशानी दुरुस्त करावे लागले. सुऱ्याच्या आघातानी ते पार चिरफाळून गेले होते. रिओहाचा येथील तुरुगात, त्याना जामीन न मिळाल्यामुळे, खटल्याची वाट पाहत तीन वर्षे घालवावी लागली. तिथल्या कैद्याना त्याचे चांगले चारित्र्य आणि मिळूनमिसळून वागण्याची वृत्ती आठवते; परतु त्याच्यात पश्चात्तापाची भावना कधी दिसल्याचे त्याना स्मरत नाही. तरी असे दिसते की व्हिकारिओ बधूनी सातियागो नासरला ताबडतोब आणि गुप्तपणे ठार केले नाही; पण आपल्याला तो खून करण्यापासून कुणीतरी थाबवावे यासाठी त्यानी आपण कल्पना करू त्याहूनही कितीतरी अधिक प्रयत्न केले आणि त्यात त्यांना अपयश आले.

पुष्कळ वर्षांनी त्यांनी मला सागितले त्यानुसार, त्यानी त्याला मारिआ आलेजान्द्रिना सर्वांटिसकडे शोधले. तिथे ते त्याच्या बरोबर दोन वाजेपर्यंत होते ही गोष्ट इतर अनेक गोष्टीप्रमाणे अहवालात नोदली नव्हती. प्रत्यक्षात सातियागो नासर त्यावेळी तिथे नव्हता. कारण आम्ही गाणी म्हणण्यासाठी बाहेर पडलो होतो पण ते तिथे गेलेच असतील असे नाही. 'ते इथून गेले नसते,' मारिआ आलेजान्द्रिना सर्वांटिस मला म्हणाली आणि तिचे म्हणणे मला खरे वाटले उलट, ती क्लॉटिल्ड आर्मेन्टाच्या दुकानात त्याची वाट पाहत थाबले आणि सातियागो नासर तिथे कधीच थावत नाही, हे त्याना चागलेच ठाऊक होते 'तेच दुकान तेवढे उघडे होते, 'त्यानी चौकशी अधिकाऱ्याला सागितले.' केव्हा ना केव्हा तो बाहेर येणारच होता,' त्यांची मुक्तता झाल्यानंतर त्यांनी मला सागितले. प्रत्येकाला हेही ठाऊक होते की प्लासिदा लिनेरोच्या घराचे पुढचे दार आतून कायम बंद केलेले असते, अगदी दुपारीसुद्धा. सातियागो नासरजवळ नेहमी चाव्या असतात त्या मागच्या दाराच्या. तो त्या मागच्या दाराने घरात गेला. त्यावेळी व्हिकारिओ बंधू पुढल्या दारावर नजर ठेवून एक तासाहून अधिक काळ वाट पाहत बसले होते. नंतर तो बिशपचे स्वागत करण्यासाठी चौकातल्या, पुढच्या दाराने बाहेर पडला ते का हे चौकशी अधिकाऱ्याला समजू शकले नाही.

आधीपासूनच ज्याची इतकी माहिती लोकांना झालेली होती असे मरण पूर्वी कुणाला आलेले नव्हते. बहिणीने नाव सागितल्यानंतर व्हिकारिओ बधू डुक्करखान्यात गेले. तिथे ते डुकरे कापण्याची शस्त्रे ठेवीत असत. त्यातून उत्तम अशी दोन हत्यारे त्यानी उचलली, एक दहा इंच लाब आणि अडीच इंच रुद पाते असलेला आणि दुसरा, सात इच लाब आणि दीड इच रुंद पात्याचा असे दोन सुरे त्यानी फडक्यात गुडाळले आणि मटण मार्केटमध्ये धार लावण्यासाठी ते गेले. तिथे एखाद-दुसरे दुकान उघडले होते. इतक्या पहाटे तिथे फारशी गिऱ्हाइके नव्हती. पण बावीस लोकानी सागितले की त्यानी तिथला शब्द न् शब्द ऐकला आहे. आणि कोणी तरी ऐकावे म्हणूनच ते बोलत होते असेही त्याच्या सागण्यावरून दिसून येते. फास्तीनो सातोस या त्याच्या खाटिक मित्राने तीन वाजून वीस मिनिटांनी त्याना पाहिले. तेव्हा त्याने दुकान नुकतेच उघडले होते. ते इतक्या सकाळी आणि तेही सोमवारी का आले आहेत याचे त्याला आश्चर्य वाटले. शिवाय त्याच्या अंगावर लग्नाचे कपडे अजून तसेच होते. ते नेहमी शुक्रवारी येत असत, जरा उशिराच, आणि कसाई कामासाठी चामड्याचे ॲप्रन त्यानी चढवलेले असत. 'मला वाटल ते इतके प्यायलेले आहेत,' फास्तीनो सांतोस मला म्हणाला, 'की किती वाजले आहेत याच भान तर त्याना नव्हतच, पण दिवस कोणता आहे याचही.' –त्याने त्याना तो सोमवार असल्याचे सागितले.

'तू नशा करतोस हे सगळ्याना ठाऊक आहे,' पाब्लो व्हिकारिओ गमतीने म्हणाला. 'आम्ही सुरे पाजळायला आणले आहेत.'

त्यांनी सुऱ्याना दगडी जात्यावर धार लावून घेतली. नेहमीप्रमाणे पेद्रोने सुरा धरून ठेवला आणि पाब्लोने चाकाचा दाडा फिरवला. त्याचवेळी इतर खाटकाबरोबर त्यांनी लग्नसमारंभाच्या थाटमाटाच्या गोष्टी केल्या. काहीनी तक्रार केली की ते त्याचे व्यवसायबधू असूनही त्याना केकचा तुकडा मिळाला नाही. त्यावर त्यानी नंतर पाठवून देऊ असे आश्वासनही दिले. शेवटी त्यानी पात्यांचा दगडावर उमटलेला सुरेल नाद ऐकला आणि पाब्लोने दिव्याच्या उजेडात ते पाते धरले तेव्हा ते झगझगत होते.

'आम्ही सांतियागो नासरला ठार करणार आहोत,' तो म्हणाला.

ते फार चागल्या स्वभावाचे लोक आहेत

अशी त्याची ख्याती होती, त्यामुळं कुणीही त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. 'आम्हाला वाटल ते दारूड्याचं वरळणं आहे,' व्हिक्टोरिया गुझमानप्रमाणे अनेक खाटकानी सागितले. नतर एकदा मी खाटकाना विचारले की कसायाचा धदा करणारा असल्यामुळे एखादा माणूस कुणाचा खून करणार आहे हे कळत नाही की काय. त्यानी त्याचा निषेध केला : 'वासराच मुडक उडवताना आम्ही त्याच्या डोळ्यात पाहण्याच धारिष्ट करू शकत नाही.' त्याच्यापैकी एकाने सागितले की त्याने कापलेल्या प्राण्याचे मास तो खाऊ शकत नाही. दुसरा म्हणाला, ज्या गाईचे दूध आपण प्यायलो असतो तिला ठार करणे जमत नाही. मी त्याना आठवण दिली की व्हिकारिओ बधू स्वतःच वाढवलेली डुकरे मारीत आणि त्या डुकराशी त्याची इतकी ओळख असायची की ते त्याना त्याच्या नावाप्रमाणे हाका मारायचे. 'ते खरं आहे,' एकजण म्हणाला, 'पण त्यानी त्यांना माणसाची नावं ठेवली नव्हती तर फुलाची ठेवली होती.' पाब्लो व्हिकारिओच्या धमकीत सत्याचा अंश असावा असे फक्त फास्तीनो सातोसला वाटले आणि त्याने त्याना गंमतीने विचारलेही की सातियागो नासरलाच का, दुसरे बरेच अमीर लोक मरायच्या लायकीचे आहेत की

'का ते सातियागो नासरला ठाऊक आहे,' पेद्रो व्हिकारिओने त्याला उत्तर दिले.

फास्तीनो सातोसने मला सागितले की, त्याच्या मनात सशय उत्पन्न झाला होता आणि त्याने एका पोलिसाला, जो मेयरच्या न्याहरीसाठी लिव्हर विकत घ्यायला आला होता, सागितले. कागदपत्रानुसार पोलिसाचे नाव लिआँन्द्रो पोरनॉय हे होते. पुढच्याच वर्षी तो बैलाने त्याच्या गळ्यात शिंग खुपसल्यामुळे मरण पावला होता. त्यामुळे मला त्याच्याशी बोलता आले नाही. पण क्लॉटिल्ड आर्मेन्टाने मला खात्रीपूर्वक सागितले की व्हिकारिओ बधू तिच्या दुकानात वाट पाहत बसले होते तेव्हा तिथे आलेला पहिला माणूस तोच होता.

क्लॉटिल्ड आर्मेन्टाने थोड्या वेळापूर्वीच काउंटरवर बसलेल्या नवऱ्याला मोकळे केले होते आणि ती स्वत. तिथे बसली होती. ही त्यांची नेहमीची पद्धती होती. त्या दुकानात सकाळी दूध विकले जात असे, दुपारी किराणा भुसार माल आणि सध्याकाळी सहानंतर त्याचे बारमध्ये रूपातर होई तिचा नवरा डॉन रोगेलिओ डिला फ्लोर बार बद होईपर्यंत त्याचा ताबा घेई. पण त्या रात्री लग्नसमारंभानिमित्त आलेली इतकी विविध गिऱ्हाईके होती की त्याला झोपायला तीन वाजले आणि दुकान बद करावे लागले नाही. क्लॉटिल्ड आर्मेन्टा नेहमीपेक्षा लवकरच उठली होती. बिशप येण्याआधी तिला सगळे आटपायचे होते.

व्हिकारिओ बधू चार वाजून दहा मिनिटानी तिथे आले त्यावेळी खाण्याचे जिन्नस तेवढे विकले जात, पण क्लॉटिल्ड आर्मेन्टाने त्याना उसाच्या दारूची एक बाटली विकली. तिला त्याच्याविषयी केवळ आदरभावच होता असे नव्हे त्यानी पाठवलेल्या लग्नाच्या केकच्या तुकड्यामुळेही ती त्याची कृतज्ञ होती. त्यानी ती बाटली दोन मोठ्या घोटामध्ये सपवली, पण ते ताठ राहिले. 'ते सुन्न झाले होते,' क्लॉटिल्ड आर्मेन्टा मला म्हणाली, 'आणि त्याचा रक्तदाब दिव्याच्या तेलानंही वाढला नसता.' नतर त्यानी आपली जाकिटे काढली, ती खुर्च्याच्या पाठीवर नीट ठेवली आणि तिला दुसरी बाटली मागितली. त्याचे शर्टस् घामाने घाणेरडे झालेले होते आणि एक दिवसाच्या दाढीचे खुंट त्याच्या गालावर उगवलेले होते. दुसरी बाटली त्यानी खाली बसून शातपणे सपवली, प्लासिडा लिनेरोच्या घराकडे, विशेषतः वरच्या काळोख्या खिडक्याकडे पाहात. बाल्कनीवरची मोठी खिडकी सातियागो नासरच्या झोपण्याच्या खोलीची होती. पेद्रो व्हिकारिओने क्लॉटिल्ड आर्मेन्टाला विचारले की, त्या खिडकीत तिने उजेड पाहिला होता का, आणि तिने नाही म्हणून सागितले, पण तिला तो प्रश्न चमत्कारिक वाटला.

'त्याला काही झालय का?' तिने विचारले.

'नाही,' पेद्रो व्हिकारिओने उत्तर दिले. 'आम्ही त्याला ठार करण्यासाठी जरा शोधतोय.'

हे उत्तर इतके ताबडतोब आले की आपण नीट ऐकले की नाही याचा तिला सभ्रम पडला. पण त्या जुळ्या भावानी खाटकाचे दोन मोठे सुरे चिरगुटामध्ये गुडाळून आणले आहेत हे तिला दिसले.

'एवढ्या सकाळी त्याला ठार कराव अस तुम्हाला का वाटतय हे कळेल का?' तिने विचारले.

'त्याला ते ठाऊक आहे,' पेद्रो व्हिकारिओ म्हणाला

क्लॉटिल्ड आर्मेन्टाने त्याच्याकडे गभीरपणे पाहिले. ती त्याना इतकी चांगली ओळखत होती की त्याच्यापैकी कोणता कोण आहे हे तिला सांगता येत असे विशेषतः पेद्रो व्हिकारिओ युद्धावरून परत आल्यापासून. 'ती दोघं मला दोन लहान मुलासारखी दिसत होती,' तिने मला म्हटले आणि त्या विचारानेच ती भयभीत झाली. कारण लहान मुले काय वाटेल ते करू शकतात. तिने दुधाचा जग भरून घेतला आणि दुकानात काय चाललेय ते सागण्यासाठी ती आपल्या नवऱ्याला उठवायला गेली. डॉन रोगेलिओ डि ला फ्लोरने अर्धवट झोपेत तिचे बोलणे ऐकले. 'मूर्खासारख काहीतरीच बडबडू नकोस,' तो तिला म्हणाला, 'ती दोघ अशी कुणालाही ठार करणार नाहीत. निदान अशा फारशा श्रीमत नसलेल्याला तर नाहीच.'

क्लॉटिल्ड आर्मेन्टा दुकानात परतली त्यावेळी ते जुळे भाऊ मेयरसाठी दूध न्यायला आलेल्या लिआन्द्रो पोरनॉय या पोलिसाबरोबर गप्पा मारीत होते. ते काय बोलत होते ते तिने ऐकले नाही, पण ज्या तऱ्हेने त्याने जाताना त्या सुऱ्याकडे पाहिले, त्यावरून त्यानी त्याला आपल्या बेताची कल्पना दिली असावी असे तिला वाटले.

कर्नल लाझारो चार वाजण्यापूर्वी जागा झाला होता. त्याने आपली दाढी उरकली तेव्हा लिआन्द्रो पोरनॉयने या पोलिसाने त्याला व्हिकारिओ बधूनी काय ठरवले आहे याची बातमी दिली. आदल्या रात्रीच मित्रामित्रामध्ये झालेल्या इतक्या मारामाऱ्या त्याने सोडवल्या होत्या की आता सकाळी उठून आणखी एक मारामारी सोडवायला जाण्याची त्याने मुळीच घाई केली नाही. त्याने अतिशय शातपणे कपडे केले. आपला बो मनासारखा बाधून होईपर्यंत पुनःपुन्हा बाधला आणि बिशपचे स्वागत करण्यासाठी तो तयार झाला लिव्हरचे तळलेले तुकडे काद्याच्या चकत्यावरोबर खात असताना त्याच्या बायकोने त्याला बायार्दो सान रोमानने

एंजेला व्हिकारिओला घरी परत आणून सोडले ही खळबळजनक बातमी सागितली. पण त्यातले गाभीर्य लक्षात न घेता तो उद्गारला, 'अरे देवा, आता बिशपला काय वाटेल !'

तरीही न्याहरी संपवताना आपल्या नोकराने नुकतीच दिलेली बातमी त्याला आठवली. त्या दोन बातम्या एका शेजारी दुसरी ठेवल्यावर एखाद्या कोड्याचे दोन तुकडे बरोबर जुळावे तसा त्याच्या डोक्यात तावडतोब प्रकाश पडला त्यानतर तो चौकाकडे चालू लागला. रस्त्यावरची घरे जागी होऊन हळूहळू बिशपच्या आगमनाच्या तयारीला लागली होती. 'मला पूर्ण आठवते आहे की त्यावेळी पाच वाजण्याचा सुमार होता आणि झिमझिम पावसाला सुरुवात झाली होती.' कर्नल लाझारो अपॉन्तीने मला सागितले. वाटेवर तिघानी त्याला थाबवून व्हिकारिओ वंधू सातियागो नासरला ठार करण्यासाठी वाट पहात बसले आहेत हे हळूच सागितले पण कोणत्या ठिकाणी हे त्यापैकी एकानेच सांगितले क्लॉटिल्ड आर्मेन्टाच्या दुकानात ते बसलेले त्याला आढळले. 'मी त्याना पाहिले तेव्हा ते मला मोठे थापेबाज वाटले' त्यामागे त्याचे तर्कशास्त्र होते. मला वाटले होते तेवढे ते प्यायलेले नव्हते.' ते काय करताहेत याची चौकशी त्याने केली नाही, पण त्याच्या जवळचे सुरे मात्र त्याने काढून घेतले: आणि त्याना झोपायला पिटाळले त्याने ज्या आत्मविश्वासाने बायकोने दिलेल्या बातमीला उडवून लावले त्याच आत्मविश्वासाने तो त्याच्याशी वागला.

'अरे जरा कल्पना करा,' तो त्यांना म्हणाला, 'बिशपने जर तुम्हाला या स्थितीत पाहिले तर ते काय म्हणतील !'

ते निघून गेले. मेयरने त्या गोष्टीकडे फारसे गंभीरपणे पाहिले नाही यामुळे क्लॉटिल्ड आर्मेन्टा पुन्हा निराश झाली. त्याने त्या जुळयाना ताब्यात घ्यावे आणि त्याच्याकडून सत्य वदवून घ्यावे असे तिला वाटत होते. कर्नल अपोन्तीने उत्तर म्हणून ते सुरे तिला दाखवले.

'आता कुणाला मारायला त्याच्याजवळ कोणतही शस्त्र नाही,' तो म्हणाला

'त्यासाठी नव्हे.' ती म्हणाली, 'त्या बिचाऱ्या पोरावर जी भयकर जवाबदारी येऊन पडली आहे त्यापासून त्याना वाचवण्यासाठी.'

कारण तिला ते मनोमन कळले होते. व्हिकारिओ बधूना ती शिक्षा बजावण्याची फारशी घाई नव्हती, त्यापेक्षा ते कृत्य करण्यापासून त्याना रोखणारा कुणी भेटला तर ते त्याना अधिक हवे होते याची तिला खात्री वाटत होती. कर्नल अपॉन्ती स्वत.वरच खूष होता

'असं काही कुणाला नुस्त्या सशयावरून पकडता येत नाही,' तो म्हणाला, 'आता फक्त सातियागो नासरला सावध केल म्हणजे झालं. नव वर्ष सुखाच जावो.'

क्लॉटिल्ड आर्मेन्टाला नेहमीच कर्नल अपॉन्तीच्या गुबगुबीत देहयष्टीकडे पाहिले की काहीशी दया येई, पण मला मात्र तो नेहमीच मजेत असल्याचे आठवते. त्याने पत्रद्वारा केलेली अध्यात्मसाधना हेही कदाचित याचे कारण असेल. त्या सोमवारचे त्याचे वर्तन हा त्याच्या खुळचटपणाचा पुरावाच म्हटले पाहिजे खरे म्हणजे सातियागो नासरला बदरावर बघेपर्यंत तो ती गोष्ट विसरून गेला होता. आणि आपण घेतलेला निर्णय अगदी अचूक होता याबद्दल त्याने स्वत चेच अभिनदन केले.

व्हिकारिओ बधूंनी आपल्या बेताची कल्पना दूध घ्यायला आलेल्या दहा-पधरा माणसाना तरी दिली असेल. आणि त्यानी ती सहा वाजण्यापूर्वीच सगळीकडे पसरवली होती. रस्त्याच्या पलीकडे असलेल्या त्या घरातल्या लोकाना ती कळली नसेल हे क्लॉटिल्ड आर्मेन्टाला शक्यच वाटले नाही. सातियागो नासर घरात असेल असे तिला वाटले नाही, कारण त्याच्या झोपण्याच्या खोलीतला दिवा लागलेला नव्हता. तो कुणाला दिसला तर त्याने त्याला सावध करावे म्हणून तिने जवळजवळ प्रत्येकाला सागितले होते ननसाठी दूध घ्यायला आलेल्या नोकराकरवी तिने फादर अमादोरकडेही निरोप पाठवला होता. चार वाजल्यानतर जेव्हा तिने प्लासिडा लिनेरोच्या स्वयपाकघरात उजेड पाहिला तेव्हा रोज दूध मागायला येणाऱ्या भिकारणीबरोवर तिने व्हिक्टोरिया गुझमानला तातडीचा सदेशही पाठवला बिशपच्या बोटीचा भोगा वाजला तेव्हा त्याच्या स्वागतासाठी सगळे गावच हजर झाले होते आणि आमच्यासारखे दोन-चार वगळता जवळजवळ प्रत्येकाला ठाऊक होते की व्हिकारिओ बधू सातियागो नासरला ठार करण्यासाठी वाट बघत बसले आहेत. एवढेच नव्हे तर त्यामागील कारणेही बारीकसारीक तपशिलासह सगळयाना ठाऊक होती.

क्लॉटिल्ड आर्मेन्टाचे दुधाचे वाटप अजून सपलेले नव्हते. तेवढयात व्हिकारिओ बधू वर्तमानपत्रात गुडाळलेले दुसरे दोन सुरे घेऊन हजर झाले होते. एक बारा इंची लाब आणि तीन इंच रुद आणि दुसरा लहान होता, पण रुद आणि बाक असलेला. चौकशी अधिकाऱ्याने अहवालात त्याच्या आकृत्या काढल्या होत्या. कारण त्याचे वर्णन त्याला जमले नसावे. एखाद्या लहानशा जबियासारखे ते हत्यार आहे असा त्याच्या म्हणण्याचा साराश होता. या दोन सुऱ्यानी खून करण्यात आला होता आणि दोन्ही सुरे अगदीच साधारण प्रतीचे होते शिवाय त्याचा वापरही पुष्कळ झाला होता.

फास्तीनो सातोसला मध्यतरी काय घडले ते समजू शकले नाही 'ते दुसऱ्यादा सुऱ्याना धार लावण्यासाठी आले,' तो मला म्हणाला, 'पुन्हा एकदा ते लोकानी ऐकावं म्हणून मोठयानं ओरडले की ते सातियागो नासरची आतडी बाहेर काढणार आहेत मला वाटलं ते चेष्टाच करताहेत. त्यामुळे मी त्या सुऱ्याकडे लक्ष दिल नाही, मला वाटलं, ते मघाचेच आहेत,' क्लॉटिल्ड आर्मेन्टाने त्यांना आत शिरताना पाहिले तेव्हा, यावेळी त्याचा निर्धार आधीच्या इतका ठाम नसावा असे तिला वाटले.

खरे तर त्याच्यात आज पहिल्यादाच मतभेद झाला होता. बाहेरून ते सारखे दिसत असले तरी आतून ते निराळे होते इतकेच नव्हे तर आणीबाणीच्या परिस्थितीत त्याचा वेगवेगळा स्वभाव उमटून दिसत असे. आमच्यासारख्या त्याच्या मित्राना शाळेत असल्यापासून ते समजले होते. पाब्लो व्हिकारिओ सहा मिनिटानी वडील होता. तो अधिक कल्पक नि करारी होता पौगडावस्थेत येईपर्यंत पेद्रो व्हिकारिओ भावनाप्रधान आहे असे मला वाटायचे. त्यामुळेच तो अधिकार गाजवणारा होता विसाव्या वर्षी त्या दोघानी एकाचवेळी लष्करी सेवे-

साठी स्वत:ला सादर केले' पाब्लो व्हिकारिओला सूट मिळाली. पेद्रो व्हिकारिओने अकरा महिने गस्तीचे काम केले. लष्कराच्या शिस्तीमुळे हुकूम करण्याची आणि भावासाठी प्रत्येक गोष्ट स्वतःच ठरवण्याची त्याला सवय जडली. पाब्लो व्हिकारिओही त्याच्यावर अवलंबून राहू लागला.

पेद्रो व्हिकारिओने, त्याने केलेल्या निवेदनानुसार, सातियागो नासरला ठार करण्याचा निर्णय घेतला आणि त्याच्या भावाने तो मान्य केला. मेयरने त्यांच्याजवळची हत्यारे काढून घेतली तेव्हा आपल्या जबाबदारीतून आपण मोकळे झालो असे त्याला वाटले; पण आता पाब्लो व्हिकारिओने सारी सूत्रे आपल्या हातात घेतली. चौकशी अधिकाऱ्यासमोर स्वतंत्रपणे केलेल्या निवेदनात दोघांपैकी एकानेही या मतभेदाचा निर्देश केला नाही; परंतु पाब्लो व्हिकारिओने पुढे मला पुष्कळदा खात्रीपूर्वक सांगितले की त्यानी ठरवलेल्या कृत्यासाठी त्याच्या भावाला प्रवृत्त करणे अजिबात सोपे नव्हते. भीतीची ती क्षणिक लहर असेल, दुसरे काही नसेल, पण पाब्लो व्हिकारिओ एकटाच डुक्करखान्यात दुसरे सुरे आणायला गेला हे मात्र खरे. त्यावेळी त्याचा भाऊ चिचेखाली उभा राहून थेंबथेंब लघवी करीत होता आणि त्याला अतिशय यातना होत होत्या. 'माझ्या भावाला त्या यातना काय होत्या हे कळल नाही,' पेद्रो व्हिकारिओने मला एका भेटीत सांगितले, 'लघवीतून अणकुचीदार काचा पडताहेत असं वाटत होतं.' पाब्लो व्हिकारिओ सुरे घेऊन बाहेर आला तेव्हा तो झाडाला बिलगलेला दिसला. 'वेदनेमुळे त्याला घाम फुटला होता.' तो मला म्हणाला, 'आणि मी एकट्यानेच जाव असं तो म्हणत होता. कारण खून करण्याच्या स्थितीत तो नव्हता.' लग्नसमारंभाच्या वेळी जेवणासाठी म्हणून चिचेखाली टाकलेल्या बाकड्यावर तो बसला आणि त्याने आपली पँट खाली सरकवली. 'त्यानं त्याच्या लिंगाभोवती गुंडाळलेलं कापड नीट करण्यासाठी अर्धा तास लावला,' पाब्लो व्हिकारिओने मला सांगितले. प्रत्यक्षात त्याने दहा मिनिटाच्यावर वेळ घेतला नव्हता. पण पाब्लो व्हिकारिओला ते इतके चमत्कारिक वाटले की आपल्या भावाची सकाळपर्यंतचा वेळ वाया घालवण्याची ही काही नवीन युक्ती आहे असा त्याने त्याचा अर्थ केला. म्हणून त्याने सुरा त्याच्या हाती ठेवला आणि त्याला ओढतच आपल्याबरोबर नेले.

'यातून सुटण्याचा काही मार्गच नाही,' तो त्याला म्हणाला, 'हे जणू काही आधीच घडून गेलं आहे.'

डुक्करखान्याच्या दारातून ते सुरे घेऊन बाहेर पडले तेव्हा अंगणातली कुत्री त्याच्यावर भुंकली. दिशा उजळू लागल्या होत्या. 'पाऊस पडत नव्हता,' पाब्लो व्हिकारिओ म्हणाला. 'अगदी उलट होत,' पेद्रो म्हणाला. 'समुद्राचं वारं वाहत होत आणि तारे तुम्ही बोटानी मोजू शकाल इतके लख्ख होते.' तोपर्यंत बातमी इतकी पसरलेली होती की हॉर्टेन्शिया बॉटने दार उघडले तेव्हा तिच्या घरासमोरून त्यांना जाताना पाहून तिला रडूच आले. 'मला वाटल ते त्याला ठार करूनच येत आहेत,' तिने मला म्हटले, 'रस्त्यावरच्या दिव्याच्या उजेडात त्यांच्याजवळचे सुरे मला दिसले आणि त्यावरून रक्त ओघळत आहे असं मला वाटलं.' त्या रस्त्यावरचे आणखी एक घर उघडे होते, ते म्हणजे पाब्लो व्हिकारिओची वाग्दत्त वधू प्रुडेन्शिया कोटस् हिचे. जेव्हा केव्हा हे भाऊ त्या रस्त्याने जात असत, विशेषतः शुक्रवारी बाजाराकडे जाताना, ते आत जात असत आणि कॉफीचा पहिला प्याला घेत असत. अंगणाचे फाटक त्यानी ढकलले, कुत्री त्यांच्याभोवती गोळा झाली पण पहाटेच्या अंधुक प्रकाशात त्यानी त्याना ओळखले. स्वयंपाकघरात जाऊन प्रुडेन्शिया कोटस्च्या आईला त्यानी नमस्कार केला. कॉफी अजून तयार नव्हती.

'नंतर येऊ.' पाब्लो व्हिकारिओ म्हणाला, 'आम्ही सध्या घाईत आहोत.'

'मला कळतं मुलानो,' ती म्हणाली, 'इभ्रत कुणाची वाट पाहात नसते.'

पण तरीदेखील ते थांबले आणि आता पेद्रो व्हिकारिओला वाटलं की आपला भाऊ हेतुपुरस्सर वेळ वाया घालवीत आहे. ते कॉफी घेत होते तेव्हा तारुण्याने बहरलेली प्रुडेन्शिया कोटस् स्वयंपाकघरात आली. तिच्या हातात चुलीतला जाळ वाढवण्यासाठी म्हणून आणलेली जुन्या वर्तमानपत्रांची एक गुंडाळी होती. 'ते कुठं निघाले आहेत ते मला ठाऊक होतं,' तिने मला सांगितले, 'त्या गोष्टीला माझी संमती तर होतीच, इतकच नव्हे तर अशावेळी पुरुषाला साजेलसं तो वागला नसता तर मी त्याच्याशी लग्नच केल नसतं.' स्वयपाकघरातून निघण्यापूर्वी पाब्लो व्हिकारिओने वर्तमानपत्राचे दोन कागद घेतले आणि सुरे गुंडाळण्यासाठी ते आपल्या भावाजवळ दिले. प्रुडेन्शिया कोटस् ते बाहेर पडेपर्यंत स्वयपाकघरातच थांबली. एवढेच नव्हे तर क्षणभरही निराश न होता पाब्लो व्हिकारिओ तुरुंगातून बाहेर येऊन तिच्याशी लग्न करीपर्यंत तीन वर्षे ती वाट पाहात थांबली.

'काळजी घ्या,' ती त्याना म्हणाली.

ते मघाइतके आता ठाम नाहीत असे समजायला क्लॉटिल्ड आर्मेन्टाला निश्चितच काही कारण होते. तिने त्याना कडक रमची एक बाटली दिली. ती झोकून त्यानी लोळत पडावे अशीच तिची इच्छा होती. 'त्या दिवशी,' ती मला म्हणाली, 'आम्ही बायका या जगात किती एकाकी असतो याची खरी जाणीव मला झाली.' पेद्रो व्हिकारिओने तिला तिच्या नवऱ्याचे दाढीचे सामान आणायला सांगितले. ब्रश, साबण, छोटा आरसा आणि नवे ब्लेड लावलेले सेफ्टी रेझर तिने त्याला दिले; पण त्याने हातातल्या खाटकाच्या सुऱ्याने आपली दाढी केली. क्लॉटिल्ड आर्मेन्टाला वाटले, मर्दानगीची अगदी हद्द झाली. 'तो सिनेमातल्या खुन्यासारखा दिसत होता,' तिने मला म्हटले; पण नंतर त्याने या संदर्भात माझ्याजवळ स्पष्ट केले आणि ते मला पटले. सैन्यात असताना वस्तऱ्याने दाढी करायला तो शिकला होता आणि तेव्हापासून वस्तऱ्याशिवाय दुसऱ्या कशाने त्याला दाढी करताच येत नव्हती. त्यामानाने त्याच्या भावाने जरा मवाळ पद्धतीने दाढी उरकली. त्याने डॉन रोगेलिओ डि ला फ्लोरचे रेझर वापरले. नतर त्यानी एक अख्खी बाटली काहीही न बोलता, अगदी हळूहळू रस्त्यापलीकडच्या खिडक्याच्या तावदानावर पडलेल्या लालसर उजेडाकडे पाहात संपवली. ते तिथे तसे बसलेले असताना केवळ त्याना पाहाण्यासाठी, नको असलेले दूध विकत घेण्यासाठी आणि नको असलेले पदार्थ मागण्यासाठी सारखी गिऱ्हाईके येत होती. आणि सांतियागो नासरला ठार करण्यासाठी

ते दोघे भाऊ खरेच तिथे वाट पाहात थाबले आहेत का याची खात्री करून घेत होती.

व्हिकारिओ बधूना वरच्या खिडकीत दिवा लागलेला दिसला नाही. सातियागो नासर चार वाजून वीस मिनिटानी घरात शिरला होता, परंतु आपल्या झोपण्याच्या खोलीकडे जाताना त्याला दिवा लावण्याची गरज पडली नाही. कारण जिन्यावरचा दिवा रात्रभर लावलेलाच असे. त्याने स्वत.ला काळोखातच अगावरचे कपडे न काढता अथरुणात झोकून दिले. आता जेमतेम तासभरच झोपायला मिळणार होते. बिशपच्या स्वागतासाठी बदरावर जायचे असल्याने त्याला उठवण्यासाठी व्हिक्टोरिया गुझमान त्याच्या खोलीत गेली तेव्हा तिला तो असा आढळला. आम्ही मारिया आलेजान्द्रिना सर्वांटिसकडे तीन वाजून गेल्यावरही एकत्रच होतो जेव्हा तिने स्वतःच साजिद्याना रजा दिली आणि नृत्याच्या प्रागणातील सगळे दिवे मालवले तेव्हा कुठे तिच्याकडच्या सुख देणाऱ्या मिश्रवशीय मुलीना झोपायला जाता आले. त्याना विश्रांतीची गरज होती. कारण त्या तीन दिवस अखड काम करीत होत्या. आधी सन्माननीय पाहुण्याचे गुप्तपणे अतिथ्य केले आणि नतर लग्नाच्या जल्लोषाने अजून न उबलेल्या आमच्यासारख्यासाठी दारे मोकळी केली. मारिआ आलेजान्द्रिना सर्वांटिसविषयी आम्ही म्हणायचो की ती एकदाच झोपणार आहे आणि तेही मरतेवेळी. ती मला माहीत असलेली एक अतिशय सुदर आणि कोमल स्त्री होती आणि बिछान्यात अतिशय सुख देणारी पण त्याचबरोबर कडक शिस्त असलेली स्त्री होती. ती इथेच जन्मली, इथेच वाढली आणि इथेच ती राहिली. उघड्या दाराच्या, भाड्याने देण्यासाठी अनेक खोल्या असलेल्या, नाचण्यासाठी मोठे प्रागण आणि पारामारिबोच्या चिनी बाजारात विकत घेतलेले दिवे असलेल्या या घरात. माझ्या पिढीचे कौमार्य तिनेच घालवले होते. आम्ही स्वतः शिकू शकलो नसतो असे बरेच काही तिने आम्हाला शिकवले. तिने शिकवलेले सर्वांत खरे तत्त्व म्हणजे *रिक्त शय्येखेरीज अधिक दुःखद अशी दुसरी* गोष्ट या जगात नाही. तिला पहिल्यादा पाहिल्याबरोबर सातियागो नासर स्वतःची शुद्धबुद्ध हरवून बसला होता. मी त्याला सावधगिरीचा इशारा दिला होता. 'ससाणा जो धावतो लढाऊ बगळ्यापाठी, यातनाच येते त्याच्या गाठी.' पण त्याने माझे ऐकले नाही. मारिआ आलेजान्द्रिना सर्वांटिसच्या मोहजालात तो गुरफटला होता. तिच्यासाठी तो वेडा झाला होता. *त्याच्या वयाच्या पधराव्या* वर्षी ती त्याच्या भावनाशील हृदयाची स्वामिनी बनली होती. एके दिवशी इब्राहीम नासरने त्याला चाबकाच्या फटकाऱ्याने बिछान्यातून उठवले आणि एक वर्षाहून अधिक काळपर्यंत डिव्हाइन फेस या त्याच्या रँचवर कोडून ठेवले. तेव्हापासून त्याच्यामध्ये एक अतूट हृदयबध निर्माण झाला होता. त्याच्याविषयी तिच्या मनात इतका आदर होता की तो हजर असताना तिने दुसऱ्या कुणाबरोबर शय्या केली नाही. त्या शेवटच्या सुट्टयामध्ये ती थकवा आल्याचा बहाणा करून आम्हाला लवकर घालवून देत असे, पण मला आत येता यावे यासाठी ती दार उघडे ठेवीत असे आणि समोरच्या हॉलमधला दिवाही सुरू ठेवीत असे.

आम्ही साजिद्याना आमच्या सोबत घेतले आणि आमची आम्हीच गाणी म्हणून धमाल केली. आणि त्यावेळी व्हिकारिओ बधू सातियागो नासरला ठार करण्यासाठी त्याची वाट पाहत बसले होते. चार वाजण्याच्या सुमाराला विधुर झिअसच्या टेकडीवरच्या घरासमोर जाऊन नवविवाहित जोडप्यासाठी गाणी म्हणण्याची कल्पना त्याने काढली.

आम्ही जिथे जाऊन खिडकीखाली नुस्ती गाणीच म्हटली नाहीत तर बागेत फटाकेही उडवले. पण त्या फार्महाऊसमध्ये जाग असल्याची काही खूण आढळली नाही. तिथे कुणी नसेल असे आमच्या मनातही आले नाही. कारण नवविवाहिताची नवी मोटार तिथे दाराशीच उभी होती. माझा भाऊ लुईस एनरिक् याने एखाद्या कुशल कलाकाराप्रमाणे गिटार वाजवले आणि खास नवविवाहितासाठी दुहेरी अर्थ असलेले एक गाणेही रचून म्हटले तोपर्यंत पावसाला सुरुवात झाली नव्हती. उलट आकाशात *लख्ख चंद्र होता. हवा स्वच्छ होती आणि* टेकडीच्या पायथ्याशी सेंट एल्मोच्या स्मशान भूमीतील ज्योतीचा उजेड स्पष्ट दिसत होता. दुसऱ्या बाजूला केळीचे निळसर बन चादण्यात न्हात होते. काळसर दलदल आणि कॅरिबीअनची उजळलेली क्षितिजरेषाही ओळखू येत होती. सातियागो नासरने समुद्रावर अधूनमधून उजळणाऱ्या प्रकाशाकडे बोट दाखवले आणि सेनेगलमधल्या काळ्या गुलामानी लादलेल्या आणि बुडालेल्या जहाजाचा तो आत्मा आहे असे आम्हाला सागितले. त्यावेळी त्याचे मन त्याला खात होते असे म्हणता आले. अर्थात त्यावेळी त्याला एजेला व्हिकारिओचे क्षणिक वैवाहिक जीवन दोन तासापूर्वीच उद्ध्वस्त झाले होते हे माहीतही नव्हते. मोटारीच्या आवाजाने त्याच्यावर कोसळलेली दुर्दैवी स्थिती लोकाना आधीच कळली असती म्हणून बायार्दो सान रोमानने तिला तिच्या आईवडिलाच्या घराकडे पायी चालवत नेले. तो एकटाच घरी परतला होता आणि विधुर झिअसच्या त्या एकेकाळच्या सुखी घरात तो काळोखात पडून होता

*आम्ही* टेकडीवरून परत फिरलो तेव्हा माझ्या भावाने बाजारातील न्याहरीच्या कट्ट्यावर तळलेल्या मासळीचा समाचार घेण्याची कल्पना माडली. पण सातियागो नासरने ती फेटाळली. बिशप येण्याआधी त्याला तासभर झोप काढायची होती. ख्रिस्तो बेदोयाबरोबर तो नदीच्या काठाने जाऊ लागला. जुन्या बंदरावरच्या हळूहळू उजळू लागलेल्या गरिबासाठी असलेल्या लहानसहान खाणावळीच्या जवळून तो जाऊ लागला. आणि कोपऱ्यावर वळण्यापूर्वी त्याने आमच्याकडे पाहून हात हलवला. हे त्याचे अखेरचे दर्शन होते.

ख्रिस्तो बेदोयाला नतर नव्या बदरावर भेटायचे ठरवून त्याने आपल्या घराच्या मागच्या दाराशी त्याचा निरोप घेतला. तो घरात येत असताना नेहमीप्रमाणे कुत्री त्याच्यावर भुकली. पण चाव्याचा किणकिण आवाज करीत त्या अस्पष्ट प्रकाशात त्याने त्याना शात केले. स्टोवर उकळणाऱ्या कॉफीच्या भाड्याकडे लक्ष ठेवून असलेल्या व्हिक्टोरिआ गुझमानने स्वयपाकघरातून त्याला जाताना पाहिले.

*'गोऱ्या,' ती त्याला म्हणाली, 'कॉफी होते आहे.'*

सातियागो नासरने नतर थोडी घेईन असे तिला सागितले डिव्हायना फ्लोरला साडे-

पाच वाजता उठवायला सांग आणि आत्ता घातले आहेत तसेच धुतलेले कपडे घेऊन यायला सांग हेही तो म्हणाला. तो झोपी गेल्यानंतर लगेच दूध मागणाऱ्या भिकारणी-बरोबर क्लॉटिल्ड आर्मेन्टाने पाठवलेला संदेश व्हिक्टोरिया गुझमानला मिळाला होता साडेपाच वाजता त्याने सांगितल्या-प्रमाणे त्याला जागे करायला ती स्वतःच गेली. तिने डिव्हायना फ्लोरला पाठवले नाही. कारण आपल्या मुलीला मालकाच्या पंज्यापासून दूर ठेवण्याची कोणतीही संधी ती घालवीत नसे.

मारिया आलेजान्द्रिना सर्वांटिसने घराचे दार उघडेच ठेवले होते. मी माझ्या भावाचा निरोप घेतला. माजराच्या शेपटावर पाय न देता व्हराड्यातून पलीकडे गेलो आणि टकटक न करता झोपण्याच्या खोलीचे दार ढकलले. दिवा लावलेला नव्हता, पण आत शिरताच उबदार स्त्रीचा वास मला आला आणि मी काळोखातच त्या निद्रानाश जड-लेल्या चित्तिणीचे डोळे पाहिले नतर घटा-नाद होईपर्यंत मला कसलीही शुद्ध राहिली नाही

आमच्या घराकडे जाताना माझा भाऊ क्लॉटिल्ड आर्मेन्टाच्या दुकानात सिगरेटी घेण्यासाठी गेला. तो इतका प्यायलेला होता की त्या प्रसंगाविषयी त्याच्या मनात गोंधळ आहे. पण पेद्रो व्हिकारिओने दिलेले प्राण-घातक मद्य तो कधीच विसरू शकला नाही. 'ती निव्वळ आग होती,' तो मला म्हणाला. पाब्लो व्हिकारिओला झोप लागली होती, पण त्याची चाहूल लागल्याने तो खडबडून जागा झाला आणि त्याने त्याला सुरा दाखवला.

'आम्ही सातियागो नासरला ठार कर-णार आहोत.' तो त्याला म्हणाला.

माझ्या भावाला ते आठवत नाही. 'पण मला आठवत असतं तरी मी त्यावर विश्वास ठेवला नसता,' त्याने मला वारंवार सांगितले 'कुणा भडविच्याला वाटेल की ते जुळे कुणाला ठार करतील म्हणून अन् तेही त्या डुक्कर कापण्याच्या सुऱ्यानं!' नंतर त्यांनी त्याला सातियागो नासर कुठे आहे ते विचा-रले. त्यांनी त्या दोघांना एकत्र पाहिले होते. माझ्या भावाने काय उत्तर दिले होते ते त्याला आठवत नाही. पण त्याने दिलेले उत्तर ऐकून क्लॉटिल्ड आर्मेन्टा आणि व्हिकारिओ बंधू यांना जबर धक्का बसला होता हे त्यांच्या अहवालातील स्वतंत्र निवे-दनावरून दिसून येते. त्याच्या कथनानुसार माझा भाऊ म्हणाला होता : सातियागो नासर मरण पावला.' नतर त्याने मृता-त्म्याला शांती मिळो म्हटले, तो उंबरठ्यावर अडखळला आणि झोकांड्या देत बाहेर पडला चौकामध्ये तो आला असताना विरुद्ध दिशेने फादर अमादोर येत होते. ते धर्मोपदेशकाचा पोषाख करून बंदराकडे निघाले होते. त्यांच्या पाठोपाठ एक सहायक घंटा वाजवीत येत होता आणि बिशपला प्रार्थनेसाठी लागणारी वेदी उचलून काही माणसे चालली होती. ही मंडळी जात अस-ताना व्हिकारिओ बंधूंनी क्रॉसची खूण केली.

क्लॉटिल्ड आर्मेन्टाने मला सांगितले की धर्मोपदेशक तिच्या घराजवळून गेले तेव्हा तिच्या उरल्या सुरल्या आशाही मावळल्या. 'मला वाटलं, त्यांना माझा संदेश मिळाला नसावा,' ती म्हणाली. पुष्कळ वर्षांनी फादर अमादोर यांनी माझ्यापाशी कबूल केले की त्यांना क्लॉटिल्ड आर्मेन्टाचा संदेश खरे तर मिळाला होता. 'सत्य हे आहे की काय करावं हे मला कळलं नाही,' ते म्हणाले, 'पहिल्यांदा मला वाटलं हे माझं काम नाही, पोलिसांचं आहे, पण नतर जाताना प्लासिडा लिनेरोला काही सांगावं असं मी ठरवलं होतं.' ते चौक ओलांडत होते त्यावेळी ते सगळे काही विसरून गेलेले होते. 'तू ते समजून घे.' ते मला म्हणाले, 'त्या दुर्दैवी दिवशी नेमके बिशप यायचे होते.' खुनाच्या क्षणी त्यांच्या मनात इतकी निराशा दाटून आली आणि स्वतःचाच इतका तिरस्कार त्यांना वाटला की आगीची घंटा वाजवावी एवढा एकच विचार त्यांच्या मनात आला.

माझा भाऊ लुई एनरिक् स्वयंपाक-घराच्या दाराने आत गेला, ते दार वडलांना आमची चाहूल लागू नये म्हणून आईने उघडे ठेवले होते. झोपायला जाण्यापूर्वी तो बाथरूममध्ये गेला, पण टॉयलेटवरच तो झोपी गेला. माझा धाकटा भाऊ जेम शाळेत जाण्यासाठी उठला तेव्हा त्याला तो खाली फरशीवर उपडा पडलेला आढळला. माझी नन असलेली बहीण म्हणाली, 'पाचचे ठोके पडत असताना मी बाथरूममध्ये गेले.' ती त्याला उठवू शकली नाही. नतर माझी बहीण मारगॉट बंदरावर जाण्यापूर्वी बाथ-रूममध्ये गेली तेव्हा तिने त्याला कसेबसे ओढत ओढत बेडरूममध्ये नेले. झोपेतच त्याने बिशपच्या बोटीचा भोंगा ऐकला नंतर तो गाढ झोपी गेला. तो जागा झाला तो माझ्या नन असलेल्या बहिणीच्या आक्रदनाने.

'त्यांनी सातियागो नासरला ठार केलं!'

डॉ. डायोनिझिओ इग्वारानच्या अनुप-स्थितीत फादर अमादोर यांना कराव्या लागलेल्या शवविच्छेदनाची सुऱ्यांनी केलेले वार ही सुरुवात होती. 'तो एकदा मेल्या-नतर आम्ही पुन्हा त्याला मारण्यासारखंच होत.' कालाफेलच्या वृद्धाश्रमात निवृत्त आयुष्य घालवीत असलेले वयोवृद्ध धर्मोपदे-शक मला म्हणाले. 'पण ती मेयरची आज्ञा होती, आणि त्या रानटी माणसाच्या कितीही मूर्खासारख्या आज्ञा असोत, पाळणं भागच होतं.' ते सर्वस्वी बरोबर होते असे नाही. त्या अतर्क्य सोमवारच्या गोंधळात कर्नल अपॉन्ती यांचे प्रांताच्या गव्हर्नरशी तातडीचे टेलिग्राफिक संभाषण झाले आणि गव्हर्नरांनी त्यांना प्राथमिक पावले उचलण्याची परवा-नगी दिली. चौकशी करणारा एक न्याया-धीशही त्वरित पाठवला. मेयर पूर्वी सैन्यात कमांडर होते, त्यांना कायद्याच्या कक्षेतले काहीही ज्ञान नव्हते. पण ते इतके अहंमन्य होते की आपण सुरुवात कुठून करावी या विषयी कुणा जाणत्याला विचारण्याचा त्यांना सकोच वाटत होता. शवविच्छेदन ही त्यांना काळजीत टाकणारी गोष्ट वाटत होती. क्रिस्तो बेदोया हा मेडिकलचा विद्यार्थी होता आणि सातियागो नासरचा मित्र होता. त्याने त्यांना या चिंतेतून बाहेर काढले. डॉ. डायो-निझिओ इग्वारान येईपर्यंत शरीर शीतपेटीत ठेवता येईल असे मेयरला वाटले, पण त्याला मनुष्यदेह मावेल एवढी मोठी शीतपेटी साप-डली नाही. उपयोग होऊ शकेल अशी बाजा-रात एक होती, पण ती नादुरुस्त होती. शरीर दिवाणखान्यात मधोमध, लोकांना पाहाता यावे म्हणून, एका अरुंद लोखंडी खाटेवर ठेवले होते. बाजूलाच श्रीमंत थाटाची शवपेटी तयार होत होती. बेडरूममधून आणि

शेजारच्या घरामधून पखे आणले होते प्रेत पाहण्यासाठी इतके लोक जमले होते की फर्निचर बाजूला करावे लागले, पक्ष्याचे पिंजरे आणि झाडाच्या कुंड्या हलवाव्या लागल्या. उष्मा असह्य होता भरीत भर प्रेताच्या वासाने कुत्री अस्वस्थ झाली होती मी त्या घरात शिरल्यापासून त्याचे भुंकणे थांबलेले नव्हते. तेव्हा सातियागो नासर स्वयपाकघरात आचके देत होता आणि डिव्हायना फ्लेर हुदके देऊन रडत होती आणि एका दाडक्याने कुत्र्यांना कशीबशी आवरत होती.

'मला मदत कर,' ती माझ्याकडे बघून ओरडली, 'त्याना त्याची आतडी खायची आहेत.'

आम्ही त्याना तबेल्यात कोंडून ठेवले. प्लासिडा लिनेरोने नतर अंत्यसस्कार होईपर्यंत त्यांना कुठेतरी दूर घेऊन जाण्यास सांगितले. पण दुपारच्या सुमारास ती कशी कोण जाणे निसटली आणि घरात वेड्यासारखी घुसली. प्लासिडा लिनेरोचा सयम एकदाच, सुटला.

'घाणेरडी जनावर!' ती ओरडली, 'ठार करा त्याना.'

तिची आज्ञा ताबडतोब पाळली गेली. आणि घर पुन्हा एकदा शात झाले. नतर प्रेताची काळजी करण्यासारखे काही उरले नाही चेहरा जसाच्या तसा होता, तो गात असताना जो भाव त्यावर होता तोच आताही दिसत होता. क्रिस्तो बेदोयाने त्याची बाहेर पडलेली आतडी आत ढकलली होती आणि सबंध शरीर कापडी पट्टीने गुडाळले होते. दुपारी एक लालसर द्रव जखमामधून वाहू लागला आणि त्यामुळे माशा घोंगावू लागल्या. एक जाभळट डाग त्याच्या वरच्या ओठावर दिसू लागला. आणि पाण्यावर ढगाची सावली पसरत जावी तसा तो त्याच्या कानशिलापर्यंत पसरत गेला. एरवी त्याचा प्रसन्न वाटणारा चेहरा आता आक्रसल्यासारखा दिसू लागला आणि त्याच्या आजीने रुमालाने तो झाकून टाकला. कर्नल अपॉन्तीला वाटले की आता फार वेळ वाट पाहण्यात अर्थ नाही. फादर अमादोरला त्यांनी शवविच्छेदन करण्याची विनती केली. 'आणखी एका आठवड्यान त्याला पुन्हा उकरून काढणं चागलं नाही,' ते म्हणाले. त्या धर्मोपदेशकाने सालामाका येथे मेडिसिन आणि सर्जरीचा अभ्यास केला होता. पण पदवी मिळण्यापूर्वीच त्याने मठात प्रवेश घेतला होता. त्याने केलेल्या शवविच्छेदनाला कायदेशीरपणा असणार नाही याची मेयरलाही कल्पना होती, पण तरीही त्याने त्याला परवानगी दिली.

त्या सगळ्या प्रकाराला कत्तलच म्हणावे लागेल. टिपणे घेणाऱ्या औषधविक्रेत्याच्या आणि सुटीवर आलेल्या मेडिकलच्या पहिल्या वर्षाला असलेल्या एका विद्यार्थ्याच्या सहकार्याने एका सार्वजनिक शाळेमध्ये ती करण्यात आली. त्याच्याजवळ किरकोळ शस्त्रक्रियेची काही मोजकी साधने होती आणि बाकीची सगळी कारागिराची हत्यारे होती. परंतु त्या शरीरावर झालेल्या अत्याचारामधूनही फादर अमादोरने दिलेला अहवाल सुसगत होता आणि चौकशी अधिकाऱ्याने तो एक उपयुक्त पुरावा म्हणून आपल्या कागदपत्रात सामील केला

त्याच्यावर केलेल्या अनेक आघातापैकी सात जबरदस्त प्राणघातक होते. आतल्या बाजूवर केलेल्या दोन तीक्ष्ण वारानी यकृताचे दोन तुकडेच झाले होते. पोटावर चार घाव होते. आणि त्यातला एक तर आरपार गेलेला होता. मोठ्या आतड्याला सहा छोटी भगदाडे पडली होती आणि लहान आतड्यात कित्येक जखमा होत्या. फक्त एकच घाव मागच्या बाजूने बसला होता आणि त्याने उजवीकडच्या किडनीच्या चिंधड्या केल्या होत्या. पोटाच्या आतड्यातली पोकळी थिजलेल्या रक्ताच्या मोठ्या गाठीनी भरून गेली होती. वातनलिकेच्या दलदलीतून सातियागो नासरने चार वर्षांचा असताना मिळलेले व्हर्जिन ऑफ कार्मेलचे एक लहानसे पदक बाहेर आले फुफ्फुसाजवळ आणि डाव्या काखेजवळ दोन तीक्ष्ण घाव होते. शिवाय बाहूंवर आणि हातावर सहा किरकोळ जखमा होत्या. उजव्या मांडीवर आणि पोटाच्या स्नायूवर दोन खोल घाव होते. तर उजव्या हातात खोलवर भोसकलेले होते. अहवालात म्हटले होते, 'तो क्रूसावर चढवलेल्या ख्रिस्ताच्या हातावरील व्रणासारखा दिसत होता.' मेंदूचे वजन सर्वसामान्य इंग्लिश माणसाच्या मेंदूपेक्षा साठ ग्रॅम अधिक होते आणि फादर अमादोरने अहवालात नोंदवले होते की, सातियागो नासर कुशाग्र बुद्धिमत्तेचा आणि उज्ज्वल भवितव्य असलेला माणूस होता. पण अहवालातील शेवटच्या कलमात सातियागो नासरच्या लिव्हरवरील सुजेची नोद घेण्यात आली होती आणि त्यावरून त्याची नीट बरी न झालेली कावीळ लक्षात येते असे म्हटले होते. 'खरे म्हणजे,' त्यानी मला सांगितले, 'तो थोडीच वर्षं जगणार होता.' डॉ. डायोनिझिओ इग्वारानने सांतियागो नासर बारा वर्षांचा असताना त्याच्या काविळीवर उपचार केले होते. त्याने या शवचिकित्सेबद्दल तुच्छतेचे उद्गार काढले. 'एखादा धर्मोपदेशक एवढा मठ्ठ असू शकतो,' तो मला म्हणाला, 'आम्हा कटिबंधीय माणसाची यकृत गॅलिशियन स्पॅनियार्डसपेक्षा मुळातच मोठी असतात हे त्याला कोणत्याही प्रकारे समजावून सागणे शक्य नव्हते.' अहवालात शेवटी म्हटले होते की, या सात जबर जखमापैकी कोणत्याही एका जखमेतून झालेला प्रचड रक्तस्राव हे या मृत्यूचे कारण आहे.

त्यानी आम्हाला सपूर्णपणे वेगळेच असे शरीर परत केले. मेंदूच्या विच्छेदनामुळे कवटीचा अर्धा-अधिक भाग नष्ट झाला होता, आणि स्त्रियाना आकर्षित करणारा तो चेहरा, मरणाची कळा पसरलेला, आपले मूळचे व्यक्तिमत्त्व गमावून बसला होता. धर्मोपदेशकाने तुकडे झालेली आतडी मुळापासून ओढून काढली होती आणि शेवटी त्याचे काय करायचे हे न सुचून रागारागाने ती कचऱ्याच्या बादलीत टाकून दिली. शाळेच्या खिडक्यातून डोकावून पाहणाराची उत्सुकता मावळली, मदतनीसाला मूर्च्छा आली आणि ज्याने असख्य कत्तली पाहिल्या होत्या व त्यात भागही घेतला होता तो कर्नल लाझारो अपॉन्ती यापुढे शाकाहारी आणि धार्मिक बनला चिंध्या आणि चुनखड्यानी भरलेली, जाड दोऱ्याने व दाभणीने कशीबशी शिवलेली ती शरीराची रिकामी खोळ आम्ही नव्या शवपेटीत टाकत असताना सारखी उसवेल की काय अशी भीती वाटत होती 'मला वाटल त्यामुळे ते बराच काळ नीट राहील,' फादर अमादोर मला म्हणाले पण या उलट घडले. आणि आम्हाला त्याला घाईघाईने पहाटेच पुरावे लागले. प्रेताची स्थिती इतकी वाईट झाली होती की घरात ते आणखी ठेवणे शक्य नव्हते.

ढगाळ मंगळवार उगवत होता त्या थकवून टाकणाऱ्या स्थितीनतर मला उरलेली रात्र झोपी जाण्याचे धैर्य झाले नाही. मी मारिया आलेजान्द्रिना सर्वांटिसच्या घराचे दार ढकलले झाडांना टांगलेले दिवे उजळलेले होते. नृत्य करण्याच्या प्रांगणात चुली पेटलेल्या होत्या नि त्यावर ठेवलेल्या मोठमोठ्या भांड्यातल्या काळ्या रंगात मुलींचे पार्टीचे पोषाख टाकलेले होते. नेहमीप्रमाणे पहाटे उठलेली मारिया आलेजान्द्रिना सर्वांटिस मला दिसली. घरात कुणी परकी नसताना ती पूर्णपणे नग्न असायची. तशीच ती होती. तिच्या एखाद्या राणीसारख्या शय्येवर तुर्की हूरप्रमाणे उकिडवी बसलेली होती. तिच्यासमोर खाद्यपदार्थांनी भरलेली बॅबिलोहिनक परात ठेवलेली होती. वासराच्या मासाची कटलेटस्, उकडलेली कोंबडी, डुकराची कवर, आणि पाच माणसाना पुरतील एवढी केळी आणि कच्च्या भाज्या. बेसुमार खाणे हाच एक तिचा शोक व्यक्त करण्याचा मार्ग होता आणि इतक्या मोठ्या दुःखाला ती सामोरी गेली आहे हे मी पूर्वी कधी पाहिले नव्हते. मी माझे कपडे न काढता तिच्या शेजारी पहुडलो आणि माझ्या पद्धतीने दुःख व्यक्त करू लागलो. मी सातियागो नासरच्या दैवाच्या क्रूरतेविषयी विचार करीत होतो. त्या दैवाने त्याच्यापासून वीस सुखाची वर्षे हिरावून घेतली, त्याला मरण देऊनच नव्हे तर त्याचे शरीर छिन्नविच्छिन्न करून, अगदी वाताहत करून. मला स्वप्न पडले की कडेवर छोटी मुलगी घेऊन एक स्त्री खोलीत येते आहे आणि ती मुलगी श्वासही न घेता अखंड चावते आहे. तिने चावलेले कण त्या स्त्रीच्या चोळीत पडताहेत. ती स्त्री मला म्हणाली. 'ती पाखरासारखी ओली करून कठीण फळं फोडते आहे, कडाकड, मचमच.' माझ्या सदऱ्याची बटणे काढणारी उत्सुक बोटे मला अचानक जाणवली. आणि माझ्या पाठीशी पहुडलेल्या वासनेच्या पशूचा हिंस्त्र गंध मला आला आणि मला वाटले मी तिच्या कोमलपणाच्या पुळणीवरील ओल्या वाळूत फसत चाललो आहे. पण एकाएकी ती थाबली, दूर कुठेतरी खोकली आणि माझ्या जीवनातून कायमची निघून गेली.

'मला शक्य नाही.' ती म्हणाली, 'तुला त्याचा वास येतोय.'

मलाच नव्हे. त्यादिवशी प्रत्येकच गोष्टीला सातियागो नासरचा वास येत होता दुसरी काही व्यवस्था होईपर्यंत मेयरने व्हिकारिओ बंधूना तुरुगाच्या कोठडीत डांबून ठेवले होते. तिथे त्यानाही त्याचा वास येत होता. 'मी कितीदा साबणानं अन् चिंध्यानी घासल–खरवडलं; पण त्या वासापासून माझी सुटका झाली नाही,' पेद्रो व्हिकारिओ मला म्हणाला. तीन रात्री त्याचा डोळा लागला नाही. पण ते डोळे मिटू शकत नव्हते. कारण डोळे मिटले की आपण पुन्हा सातियागो नासरची हत्या करतो आहोत असे त्याना वाटायचे. आता जवळजवळ म्हातारा झालेला पाब्लो व्हिकारिओ त्या शेवट नसलेल्या दिवशी त्याची स्थिती कशी होती हे सागताना सहज म्हणाला: 'दुप्पट जागं असल्यासारख वाटत होत.' तुरुंगात त्याना त्याचे शुद्धीवर असणेच असह्य होत असावे असे मला त्याच्या या शब्दावरून वाटते.

ती खोली दहा बाय दहाची होती आणि त्या खोलीला लोखंडी सळ्या लावलेली एक उंच खिडकी होती. त्या खोलीत संडासाचे भांडे, एक खुजा, हात धुण्यासाठी पात्र आणि झोपण्यासाठी पेंढा भरलेल्या गाद्या अशी व्यवस्था होती. कर्नल अपॉन्तीच्या आदेशानुसार ती खोली बाधली होती आणि त्याच्या मते हॉटेलमध्येसुद्धा इतक्या सोयी नसतात. माझा भाऊ लुई एनरिकला ते पटले होते. कारण एका रात्री वादकाशी मारामारी झाल्यानतर त्याला तिथे कोंडले होते. मेयरने एक मिश्रवशीय मुलगी त्याच्यासोबत असण्यास परवानगी दिली होती. अरबापासून आपण सुरक्षित आहोत हे जाणवल्यानतर सकाळी आठ वाजता व्हिकारिओ बधूनाही तसेच वाटले असते. त्या क्षणी मात्र त्याना कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभले होते आणि एकाच गोष्टीचा त्यांना त्रास होत होता, ती म्हणजे सतत येणारा तो वास. त्यानी खूपसे पाणी मागितले आणि आपल्या हातावरचे, चेहऱ्यावरचे रक्त धुऊन काढले त्यानी आपले सदरेही धुतले. पण त्याना स्वस्थता मिळाली नाही. पेद्रो व्हिकारिओने मलावरोध आणि मूत्रावरोधावर औषध मागितले. व बॅण्डेज बदलण्यासाठी निर्जंतुक कापड मागितले. सकाळी तो दोनदा लघवी करू शकला होता. दिवस वर येऊ लागला तसतसे आयुष्य त्याला इतके कठीण होऊन बसले की वासाला आता तेवढे महत्त्व राहिले नाही. दुपारी दोन वाजता ते वितळून जातील एवढी उष्णता होती. पेद्रो व्हिकारिओला बिछान्यावर पडून राहवत नव्हते. पण थकव्यामुळे त्याला उभेही राहता येत नव्हते. त्याच्या जाघेतली वेदना कंठापर्यंत पोचली होती. त्याची लघवी बद झाली होती आणि उरलेल्या आयुष्यात आपण कधीही झोपू शकणार नाही या भीतीने त्याला ग्रासले होते. 'मी अकरा महिने जागा होतो,' तो मला म्हणाला, आणि तो खरे सांगतोय असेच मला वाटले. त्याला अन्न खावेसे वाटत नव्हते. पाब्लो व्हिकारिओने मात्र पुढे केलेल्या अन्नापैकी थोडे थोडे खाल्ले आणि पधरा मिनिटानी त्याला उलट्या अन् जुलाब सुरू झाले. सध्याकाळी सहा वाजता, सातियागो नासरच्या शवाचे विच्छेदन चालले असताना मेयरला ताबडतोब बोलावण्यात आले आपल्या भावावर विषप्रयोग झाला आहे याची पेद्रो व्हिकारिओला खात्री पटली होती. 'त्याला सारखं पाणी पडत होत,' पेद्रो व्हिकारिओ मला म्हणाला,' आणि ही तुर्कांची करणी आहे या कल्पनेनं आमचा पिच्छा पुरवला.' तोपर्यंत परसाकडचे भांडे दोनदा भरून वाहिले होते आणि पहारेकऱ्याने त्याला आणखी सहादा टाऊनहॉलच्या स्वच्छतागृहात नेले होते तिथे दारे नसलेल्या सडासात बसून पाण्यासारखे जोरदार जुलाब होत असलेल्या पाब्लोला पाहून कर्नल अपॉन्ती यांनाही विषप्रयोगाची कल्पना अगदीच चुकीची वाटली नाही; पण त्याने फक्त पुरा व्हिकारिओने पाठवलेले अन्न–पाणी घेतले आहे हे कळल्यावर ती कल्पना त्यांनी बाजूला ठेवली; पण मेयरवर या प्रकाराचा एवढा परिणाम झाला होता की त्याने ताबडतोब कैद्याना आपल्या घरी हलवले आणि चौकशी अधिकारी आल्यावर त्याची रवानगी रिओहाचा येथील तुरुगात केली.

जुळ्याना भीती वाटत होती ती बाहेरच्या जमावाची. अरब आपला सूड घेतील असे त्याना वाटत होतेच. पण व्हिकारिओ बधू सोडता कुणाच्याही मनात विषप्रयोगाचा विचार आला नाही. रात्र पडेपर्यंत थांबून नतर ते वरच्या खिडकीतून पेट्रोल ओतून

आग लावतील आणि कैद्यांना कोठडीतच जाळून मारतील असेही गृहीत धरण्यात आले होते. पण अशीही शक्यता नव्हती. अरब तसे शांत प्रकृतीचे लोक होते. ते या शतकाच्या सुरुवातीला बाहेरून येऊन दूर-दूरच्या आणि दरिद्री अशा देखील कॅरिबीअन शहरामध्ये स्थायिक झाले होते. तिथे ते रंगीत कापड आणि नकली दागदागिने विकून आपला उदरनिर्वाह करीत. ते टोळी करून राहणारे, मेहनती आणि कॅथलिक होते. ते आपापसात लग्ने जमवीत, आपल्याला लागणारा गहू आयात करीत, मेंढराची पैदास करीत. पत्ते खेळणे हे त्याचे व्यसन होते. म्हातारी माणसे आपली मायबोली अरबी बोलत असत ती त्यानी आपल्या कुटुंबामध्ये दुसऱ्या पिढीपर्यंत टिकवून धरली होती, पण तिसऱ्या पिढीतील एक सातियागो नासर सोडला तर इतर लोक आपल्या आई-बापाच्या अरबी बोलण्याला स्पॅनिशमध्ये उत्तरे देत. ज्या मृत्यूसाठी आम्हा सगळयांनाच जबाबदार धरता आले असते अशा एका मृत्यूचा ते आपला गावठी स्वभाव एकाएकी बदलून सूड घेतील असे मानणे फारसे पटण्यासारखे नव्हते. उलट एकेकाळी जबरदस्त आणि भाडकुदळ समजल्या जाणाऱ्या प्लासिडा लिनेरोच्या कुटुंबाकडूनसुद्धा बदला घेतला जाईल असे देखील कुणाच्या मनात आले नव्हते.

कर्नल अपॉन्ती उठणाऱ्या वावडयांनी काळजीत पडला आणि त्याने अरबाच्या घरोघर जाऊन त्याच्या भेटी घेतल्या आणि त्यावेळी तरी त्याने काढलेला निष्कर्ष बरोबर ठरला. ते अरब लोक त्याला चकित आणि दु:खी झालेले दिसले. त्यानी आपल्या वेदीवर शोकसूचक चिन्हे लावलेली होती. त्याच्यापैकी काही जमिनीवर बसून हुबरडा फोडून रडत होते. पण कुणीही सूडाची भाषा केली नाही. हत्येची त्वरित प्रतिक्रिया म्हणून सकाळचा प्रकार घडला होता, पण जास्तीत जास्त मारामारीपलीकडे विशेष काही घडले नसते असेच मत त्यात पुढाकार घेणाऱ्यानी सांगितले. आणखी म्हणजे सुसाना अबदाला या शभरी गाठलेल्या बाईने पाब्लो व्हिकारिओच्या जुलाबांवर आणि त्याच्या भावाच्या मूत्रावरोधावर उपाय सुचवले. पेद्रो व्हिकारिओला नंतर निद्रानाशामुळे आलेल्या सुस्तीने घेरले आणि त्याच्या बऱ्या झालेल्या भावाला स्वस्थ झोप लागली. त्यांचा निरोप घेण्यासाठी मंगळवारी पहाटे तीन वाजता जेव्हा मेयरने पुरिसिमा व्हिकारिओला तिथे आणले तेव्हा तिला ते दोघे या स्थितीत दिसले.

कर्नल अपॉन्तीच्या सूचनेवरून सगळे कुटुंब गाव सोडून गेले थोरल्या बहिणीदेखील आपापल्या नवऱ्यासह गेल्या. सारे गाव शिणून झोपले होते. त्यामुळे त्याचे असे जाणे कुणाच्या लक्षात आले नाही आणि जे त्या उद्ध्वस्त करून टाकणाऱ्या दिवसातून बाहेर पडले होते आणि अजून जागे होते असे आम्ही काही लोक सातियागो नासरला पुरण्यात व्यस्त होतो. गावात उडालेला भडका शात होईपर्यंत त्यानी गावात परतू नये असे मेयरने त्याना सुचवले होते, परंतु ते पुढे कधीही परतले नाहीत. पुरा व्हिकारिओने आपल्या नाकारलेल्या मुलीचा चेहरा तिच्या चेहऱ्यावरचे ओरखडे कुणाला दिसू नयेत म्हणून कापडाने झाकून टाकला होता. आपल्या गुप्त प्रियकराबद्दल ती शोक करते आहे असे कुणाला वाटू नये म्हणून तिला झगझगीत लाल वस्त्रात सजवले होते. जाण्यापूर्वी तिने आपल्या मुलाकडून तुरुगातच पापाचा कबुलीजवाब घ्यावा असे फादर अमादोर यांना सांगितले होते. पण पेद्रो व्हिकारिओने स्वत: ते नाकारले आणि आपण जे केले त्यात पश्चात्ताप करण्यासारखे काही नाही असे आपल्या भावाला पटवूनही दिले. ते आता दोघेच राहिले होते आणि रिहोहाचाला जाण्याच्या दिवशी त्याची प्रकृती इतकी सुधारली होती आणि आपण जे केले ते अगदी बरोबरच होते याची त्याना इतकी खात्री वाटत होती की आपल्या कुटुंबियाप्रमाणे त्यानाही रात्री हलवले जावे याला त्याचा विरोधच होता उलट दिवसाच्या ढळढळीत उजेडात उजळ माथ्याने जावे अशीच त्यांची इच्छा होती. पोन्सिओ व्हिकारिओ त्यानतर लवकरच वारला. त्याला झालेल्या नैतिक दु खाने त्याचा बळी घेतला. 'अँजेला व्हिकारिओने मला सांगितले. जुळयाची तुरुंगातून सुटका झाल्यावर ते रिओहाचातच राहिले. तिथून त्याची कुटुंबीय मंडळी राहात होती ते मॅनोर गाव एक दिवसाच्या प्रवासाच्या अतरावर होते. प्रुडेन्शिया कोटस् पाब्लो व्हिकारिओशी लग्न करण्यासाठी त्याच्याकडे गेली. पाब्लो व्हिकारिओ आपल्या बापाच्या दुकानातच मूल्यवान धातूचे काम शिकला होता तो आता चागला कारागीर म्हणून नावाजला होता. पेद्रो व्हिकारिओ लग्नाच्या किंवा नोकरीच्या भानगडीत न पडता तीन वर्षांनी पुन्हा सैन्यात दाखल झाला. त्याला सार्जंटचा हुद्दा मिळाला. एका भल्या सकाळी आपल्या दलासह तो बंडखोराच्या हद्दीत गाणी गात गेला आणि नंतर त्याच्याविषयी काही कळले नाही.

बहुसंख्य लोकाच्या मते खराखुरा बळी गेला तो बायार्दो सान रोमान. त्यांच्या मते या शोकातिकेतील इतर पात्रानी आपल्या वाटयाला आलेले विधिलिखित प्रतिष्ठेने एवढेच नव्हे तर मोठया दिमाखानेच भोगले होते. सातियागो नासरला अपमानाचे प्रायश्चित्त घ्यावे लागले, व्हिकारिओ बधूनी पौरुषाची प्रतिष्ठा सिद्ध केली आणि त्याच्या कलकित बहिणीला तिचा गेलेला सन्मान परत प्राप्त झाला होता. पण ज्याचे सर्वस्व गेले असा एकच होता, तो म्हणजे बायार्दो सान रोमान 'बिचारा बायार्दो' असे त्याच्याबाबत नतर किती तरी वर्षे म्हटले जात होते. परतु शनिवारच्या चद्रग्रहणापर्यंत त्याची कुणाला आठवणही झाली नव्हती. विधुर झिअसने मेयरला म्हटले की त्याच्या पूर्वीच्या घरावर एक झळझळीत पिवळा पक्षी त्याला फडफडताना दिसला आणि त्याला वाटलं की तो आपल्या बायकोचा आत्माच आहे. जे तिचे आहे ते मागायला आलेला. मेयरने कपाळावर हात मारला, पण त्याचा त्या विधुराच्या कल्पनेशी काही सबध नव्हता. 'च्यायला!' तो ओरडला. 'मी त्या बिचाऱ्याला साफ विसरून गेलो.'

तो एका पहारेकऱ्यासोबत टेकडीवर गेला तेव्हा त्याला टॉप खाली टाकलेली घरासमोरची कार दिसली आणि बेडरूममधला एकाकी दिवा त्याला दिसला, पण त्याच्या ठोठावण्याला कोणी उत्तर दिले नाही. त्यामुळे त्यानी बाजूचे एक दार तोडले आणि खोलीखोलीत शोध घेतला. त्या ग्रहणग्रस्त चंद्राच्या उजेडाने अधुक उजळलेल्या होत्या. 'वस्तू अशा दिसत होत्या की जणू काही त्या पाण्याखाली होत्या.' मेयरने मला सांगि-

तले. बायार्दो सान रोमान बिछान्यावर बेहोष पडून होता. पुरा व्हिकारिओने त्याला सोमवारी सकाळी ज्या पोषाखात पाहिले होते त्याच पोषाखात. जमिनीवर रिकाम्या बाटल्या पडल्या होत्या आणि बिछान्याच्या आजूबाजूला काही न उघडलेल्या. पण अन्नाचा कणही तिथे नव्हता. 'तो एथिलिक इटॉक्सिकेशनच्या शेवटच्या अवस्थेत होता,' 'डॉ डायोनिझिअ इग्वारान मला म्हणाले. त्यानी त्याच्यावर ताबडतोब उपचार सुरू केले. तो काही तासातच शुद्धीवर आला, त्याला भान आले तेव्हा त्याने सर्वांना घराबाहेर हाकलले.

मेयरने जनरल पेद्रोनिओ सान रोमान याना तार केली आणि सारे वृत्त कळवले. पण जनरलने स्वत: न येता आपल्या बायकोला पाठवले, तिच्याबरोबर तिच्या दोन मुली आणि तिच्या बहिणी वाटाव्या अशा दोन वडिलधाऱ्या स्त्रियाही होत्या. त्या मालवाहू बोटीवर आल्या. त्यानी बायार्दो सान रोमानवर ओढवलेल्या दुर्दैवाची निदर्शक म्हणून सारे अंग झाकून जाईल अशी वस्त्रे धारण केली होती आणि केस मोकळे सोडले होते. जमिनीवर पाय ठेवण्यापूर्वी त्यानी आपली पादत्राणे काढून ठेवली आणि त्या दुपारच्या तसल्या फुफाट्यात टेकडीपर्यंत अनवाणी चालत गेल्या. रस्त्यातून जाताना त्या आपले केस उपटीत होत्या आणि इतक्या मोठ्याने आक्रोश करीत होत्या की जणू ते आनंदाचेच चीत्कार वाटावेत. माग्दालेना ऑलिव्हरच्या बाल्कनीतून मी त्यांना पाहिले आणि दुसऱ्या अधिक लज्जास्पद गोष्टी झाकण्यासाठी तसले शोकप्रदर्शन करावे लागते असे त्यावेळी मला वाटल्याचे आता आठवते.

कर्नल लाझारो अपॉन्ती टेकडीवरील घरापर्यंत त्याच्यासोबत गेला आणि त्याच्या मागोमाग डॉ. डायोनिझिओ इग्वारान आपल्या तातडीच्या वेळी वापरावयाच्या खेचरावरून तिथे गेला. ऊन थोडे उतरले तेव्हा दोन सरकारी सेवकानी एका झोळण्यात घालून बायार्दो सान रोमानला बाहेर आणले, त्याला गळ्यापर्यंत झाकले होते आणि त्याच्याभोवती जमलेल्या स्त्रिया रडत होत्या. माग्दालेना ऑलिव्हरला वाटले, तो मेलाय,' 'काय हा अपव्यय !' ती उद्गारली.

तो पुन्हा मद्याच्या नशेत होता. परंतु ते एखाद्या जिवंत माणसाला उचलून नेत आहेत यावर विश्वास बसत नव्हता. कारण त्याचा उजवा हात जमिनीवर लोंबत होता. त्याच्या आईने एकदा तो झोळण्यात टाकला होता, पण पुन्हा तो तसाच खाली लोंबू लागला. त्यामुळे टेकडीपासून बोटीच्या डेकपर्यंत त्याच्या या लोंबत्या हाताने जमिनीवर एकप्रकारे भाग ठेवला होता. त्याची ती तेवढीच खूण आमच्यासाठी उरली : एका बळीची आठवण.

ते फार्महाऊस जसे होते तसेच ठेवून ते निघून गेले. माझे भाऊ आणि मी सुटीत घरी येत असू तेव्हा रात्री त्या घराकडे एखादी चक्कर टाकत असू. दरवेळी त्या टाकून दिलेल्या घरात काही मौल्यवान वस्तू कमी झालेल्या आढळत. एकदा एंजेला व्हिकारिओने लग्नाच्या रात्री आईकडून मागवलेली छोटी थैली आम्हाला सापडली. तिच्याकडे आम्ही फारसे लक्ष दिले नाही. त्यात बायकांच्या नेहमीच्या वापराच्या वस्तू होत्या. पण त्यांचा खरा उपयोग मला नतर कळला. अनेक वर्षांनी एंजेला व्हिकारिओने मला सागितले तेव्हा. नवऱ्याला फसवण्यासाठी अनुभवी बायकानी सागितलेले काही नुस्खे त्यात होते विवाहित म्हणून ती ज्या घरात आली त्या घरात तेवढी एकच वस्तू पाच वर्षे राहिली

पुष्कळ वर्षांनी या वृत्तातासाठी आणखी माहिती गोळा करण्यासाठी म्हणून मी जेव्हा इथे आलो तेव्हा योलादा झिअसच्या घराची स्थिती अधिकच वाईट झालेली होती कर्नल लाझारो अपॉन्तीची करडी नजर पहारा करीत असूनही एक एक वस्तू गायब होत राहिली. अगदी पूर्ण आकाराचे सहा आरशाचे कपाटदेखील. ते मॉमपॉक्सच्या कारागिरानी दारातून घरात जाणे शक्य नसल्याने आत जाऊन त्याचे वेगवेगळे भाग जोडून तयार केले होते. सुरुवातीला विधुर झिअसला आनंद झाला होता. त्याला वाटत होते, आपल्या पत्नीचे परलोकातील सहायक तिच्या वस्तू घेऊन जाताहेत. कर्नल लाझारो अपॉन्तीने त्याची चेष्टा केली. एके दिवशी त्याने मत्रतत्र जाणणाऱ्याला हे गूढ उकलण्यासाठी बोलावले. तेव्हा योलादा झिअसच्या आत्म्याने स्वत:च्या हस्ताक्षरात लिहून दिले की, ती स्वतःच तिच्या परलोकातील घरासाठी या वस्तू गोळा करते आहे. घराची पडझड होऊ लागली. दाराशी असलेली लग्नाची मोटार मोडकळीस आली. शेवटी वाऱ्यापावसाच्या माऱ्याने गजलेल्या सागाड्याशिवाय काही उरले नाही. पुष्कळ वर्षे तिच्या मालकाविषयी काही ऐकिवात आले नाही. खटल्याच्या कागदपत्रात त्याचे निवेदन आहे, पण इतके सक्षिप्त आणि औपचारिक आहे की कार्यवाहीची पूर्ती म्हणून आयत्यावेळी ते घाईघाईत लिहून घेतले असावे असे वाटते. तेवीस वर्षांनी माझी त्याची भेट झाली तेव्हा माझ्याशी जरा आक्रमकपणेच बोलला आणि काहीही सागायला नकार दिला. त्याच्या कुटुंबालाही त्याची काही माहिती नव्हती. त्या तसल्या कुग्रामात तो नेमका कशासाठी आला होता, आयुष्यात पूर्वी कधीही न पाहिलेल्या अशा एका मुलीशी लग्न करण्याव्यतिरिक्त दुसरा काही हेतू होता का, याविषयी त्याना काही कल्पना नव्हती.

एजेला व्हिकारिओविषयी मला नेहमीच काही ना काही माहिती मिळत असे. त्यातून माझ्या मनात तिची एक प्रतिमा आकारास येऊ लागली. माझी नन असलेली बहीण अप्पर ग्वाजिरामध्ये उरल्यासुरल्या मूर्तिपूजकाचे धर्मांतर करण्यासाठी काही काळ जायची, तेव्हा जाता येता ती त्या कॅरिबीअन मिठाने भाजलेल्या खेड्यात थांबायची आणि तिच्याशी गप्पागोष्टी करायची. तिच्या आईने तिला तिथे जिवत पुरण्याचाच प्रयत्न चालवला होता. 'तुझ्या चुलतबहिणीने तुला नमस्कार सागितला आहे,' ती नेहमी मला सागायची. माझी बहीण मारगॉटदेखील सुरुवातीची काही वर्षे तिला भेटत असे. तिच्याकडूनही मला माहिती मिळायची तिने एक मोठे अगण असलेले घर विकत घेतलेले आहे. त्या घराचा दोष एवढाच की भरतीच्या रात्री समुद्राचे पाणी आत यायचे आणि सकाळी बेडरूममध्ये मासे तडफडताना दिसायचे त्या काळात तिला ज्यानी ज्यांनी पाहिले त्या सर्वांना ती स्वतःच्या एम्ब्रॉयडरीच्या कामात गढून गेलेली दिसली आणि त्यात मग्न राहिल्यामुळेच तिला विसरणे शक्य झाले.

पुष्कळ नतर अनिश्चिततेच्या काळात मी

ग्वाजिराच्या शहरामध्ये एन्सायक्लोपीडिया आणि मेडिकलची पुस्तके विकत स्वतःची कुवत अजमावून पाहात होतो, तेव्हा योगायोगाने मी त्या मसणवटीसारख्या खेड्यात पोचलो. समुद्राकडे तोंड करून असलेल्या एका घराच्या खिडकीत, अतिशय उष्मा होत असताना, मशीनवर एम्ब्रॉयडरी करीत असलेली, शोकसूचक वस्त्रे नेसलेली, काड्याच्या फ्रेमचा चष्मा लावलेली, पिवळसर करड्या केसाची एक स्त्री दिसली. तिच्या डोक्यावर पिंजरा होता. आणि त्यात एक साळुंकी होती आणि ती सारखी गात होती. प्रेमकथेत असते तशी खिडकीच्या चौकटीत बसलेली ती जेव्हा मी पाहिली, तेव्हा आपल्या विचाराचा विषय झालेली स्त्री ती हीच यावर माझा विश्वास बसत नव्हता. कपोलकल्पित वाङ्मयातल्यासारखे प्रत्यक्षातील जीवनाला इतके असे रूप यावे हे मला मान्यच होत नव्हते. पण तीच होती. एंजेला व्हिकारिओ, शोकातिकेनंतर तेवीस वर्षांनी.

तिने माझे नेहमीप्रमाणे दूरच्या चुलतभावाचे करावे तसे स्वागत केले. आणि माझ्या प्रश्नांना नेमकी आणि हसत खेळत उत्तरे दिली. ती इतकी प्रगल्भ आणि खेळकर झालेली दिसली की ती तीच व्यक्ती आहे यावर विश्वास बसणे कठीण होते तिने स्वतःचे जीवन समजून घेतले होते या गोष्टीने मी चकित झालो. काही वेळाने, पहिल्यांदा वाटली तितकी वयस्क वाटली नाही, उलट माझ्या आठवणीत ती जशी तरुण होती तशीच वाटली. तिची आई बरीच म्हातारी झाली होती. तिने मला पाहून एखादे भूत पाहिल्यासारखे केले. भूतकाळाविषयी बोलण्याला तिने मला साफ नकार दिला. या वृत्तातासाठी तिचे माझ्या आईशी झालेले संभाषण आणि माझ्या आठवणी यावरच समाधान मानावे लागले. एंजेला व्हिकारिओचे जगणे माणसासारखे करून टाकण्यासाठी तिने काय वाटेल ते केले पण तिच्या मुलीनेच तिचे सगळे प्रयत्न फोल ठरवले कारण तिने आपल्या दुर्दैवाला रहस्याचे रूप दिले नाही, उलट ज्या कुणाला जाणून घ्यायचे असेल त्याला ती सगळे काही तपशीलवार सांगायची. फक्त एकच मुद्दा कधी स्पष्ट झाला नाही : तिच्या नाशाला कारण होणारा कोण होता, कसा आणि का, कारण तो सांतियागो नासर असेल यावर कुणी विश्वास ठेवला नव्हता. ती दोन वेगवेगळ्या जगात राहणारी माणसे होती. त्याना कुणी कधी एकत्र पाहिले नव्हते आणि केवळ दोघानाच तर कुणीही पाहिले नव्हते. सांतियागो नासर इतका मगरूर होता की त्याने तिच्याकडे कधी लक्षदेखील दिले नाही. 'तुझी ती मूर्ख चुलत बहीण' तिचा उल्लेख करताना तो म्हणायचा शिवाय त्यावेळी आम्ही त्याच्याविषयी म्हणायचो तसा तो 'चिकन हॉक' होता. याबाबतीत तो त्याच्या बापासारखा होता. रानात दिसू लागलेल्या कुठल्याही स्वच्छंदी कळीला तो खुडायचा. पण शहरात फ्लोरा मिग्युएलशी असलेले समाजसमत सबंध आणि मारिया आलेजान्द्रि नाशी असलेले वादळी सबंध याखेरीज दुसऱ्या कुठल्या सबंधाची माहिती नव्हती. एक मत असेही होते की एंजेला व्हिकारिओने तिच्यावर खरे प्रेम करणाऱ्या कुणाचे तरी रक्षण करावे म्हणून सांतियागो नासरचे नाव घेतले. तिला वाटले होते, त्याच्याविरुद्ध जाण्याची तिच्या भावांना हिंमत होणार नाही. मी तिला दुसऱ्यांदा भेटलो तेव्हा सत्य काय ते काढून घेण्याचा मी प्रयत्न केला. माझे म्हणणे खोडण्यासाठी तिने तिच्या समोरच्या एम्ब्रॉयडरीवरून नजर वरदेखील केली नाही. 'व्यर्थ वाद घालू नकोस बाबा.' ती मला म्हणाली, 'तोच होता.'

बाकी सगळ्या गोष्टी तिने निःसकोचपणे सांगितल्या. अगदी तिच्या विवाहाच्या रात्री तिच्यावर कोसळलेल्या अरिष्टाविषयीदेखील तिच्या मैत्रिणींनी तिला सूचना कशा दिल्या होत्या की नवऱ्याला इतकी दारू पाज की तो बिछान्यावर बेशुद्ध पडला पाहिजे, लज्जेचे इतके प्रदर्शन कर की त्यामुळे तो दिवा मालवेल, वगैरे गोष्टी तिने आठवून सांगितल्या. तुरटीचे पाणी भरलेली पिचकारी घेऊन जाण्याची सूचनाही त्यानी केली होती. चादरीवर पिवळसर डाग पडेल आणि दुसऱ्या दिवशी ती चादर वाळत घालशील त्यावर तो दिसेल. तिच्या मैत्रिणींनी दोन गोष्टी विचारात घेतल्या नाहीत : मद्य पचवण्याची बायार्दो सान रोमानमध्ये असलेली असाधारण क्षमता आणि एंजेला व्हिकारिओची मर्यादशीलता. 'मी त्यानी सांगितलेलं काही एक केलं नाही,' ती म्हणाली, कारण मी त्याविषयी जसजसा विचार करू लागले, तसतसं मला वाटू लागलं की ते सगळं इतकं घाणेरड आहे की कुणाच्याच बाबतीत तसं काही करू नये, आणि ते त्या बिचाऱ्या माझ्याशी लग्न करणाऱ्या दुर्दैवी माणसाच्या बाबतीत तर नाहीच.' म्हणून ती उजेडात विवस्त्र झाली, तिचे जीवन नष्ट करणाऱ्या भीतीच्या बागुलबुवापासून अगदी मुक्त होऊन, 'ते अगदी सोप होत,' ती मला म्हणाली, 'कारण मरायला मी तयार झाले होते.'

ती आपल्या दुर्दैवाबद्दल कसलीही भीड न बाळगता बोलली ते तिच्या आत जळत असलेले दुसरे खरेखुरे दुर्दैव झाकण्यासाठी हे त्यातले सत्य होते. तिला तिच्या घरी नेऊन पोचवल्यापासून बायार्दो सान रोमानने तिचे मन व्यापलेले होते. 'अचानक, आई मारू लागली तसतसा तो मला आठवू लागला,' तिने मला सांगितले. माराचा तिला त्रास होत नव्हता कारण तो त्याच्यासाठी तिला सोसावा लागत होता. जेवणघरातल्या कोचावर हुदके देत ती पडली होती तेव्हा ती त्याचाच विचार करीत होती. 'मी मारामुळे किंवा दुसऱ्या कशामुळे रडत नव्हते,' ती मला म्हणाली, 'मी त्याच्यासाठी रडत होते.' तिची आई तिच्या चेहऱ्यावरच्या जखमावर औषध लावीत होती तेव्हाही ती त्याचाच विचार करीत होती. रस्त्यावरचा आरडाओरडा तिला ऐकू आला, आगीच्या घंटा ऐकू आल्या आणि वाईट सगळे संपले आहे, आता ती निवांत झोपू शकते असे तिची आई सांगत आली तेव्हाही ती त्याचाच विचार करीत होती.

तिच्या आईसोबत डोळे तपासण्यासाठी रिओहाचा येथील हॉस्पिटलमध्ये तिला जावे लागले तेव्हापासून ती त्याच्याविषयी अधिकच विचार करू लागली होती. त्या वाटेत हॉटेल डेल प्यूएर्तोमध्ये थांबल्या होत्या. त्या हॉटेलचा मालक त्यांच्या ओळखीचा होता. पुरा व्हिकारिओने तिथे प्यायला पाणी मागितले. तिच्याकडे पाठ करून ती पाणी पीत होती तेव्हा तिला सभोवार लावलेल्या आरशामध्ये तिच्या मनातला तो प्रतिबिंबित झालेला दिसला. एंजेला श्वास रोखून आपली मान मागे वळवली आणि त्याला पाहिले. तो तिच्याकडे न पाहता हॉटेलच्या बाहेर

पडत होता. मग तिने आपल्या फाटले हृदयाने आपल्या आईकडे पाहिले. पुरा व्हिकारिओ पाणी प्यायली, बाहीला ओठ पुसले आणि आपल्या नव्या चष्म्यातून तिच्याकडे पाहत हसली. ती इतकी अस्वस्थ होती की त्या परतीच्या प्रवासात ती उच्च रवात सारखी गात होती आणि नंतर बिछान्यात पडून तीन दिवस रडत होती.

तिचा पुनर्जन्म झाला होता. 'मला त्याच वेड लागलं होतं,' मला ती म्हणाली. त्याला पाहायला तिला फक्त डोळे मिटावे लागत. समुद्राच्या लाटात त्याचा श्वास तिला ऐकू येई, त्याच्या शरीराच्या उबेने मध्यरात्री ती बिछान्यात उठून बसे. त्या आठवड्याच्या शेवटी क्षणाचीही स्वस्थता न लाभल्याने तिने त्याला पहिले पत्र लिहिले. एका साध्या चिठीत तिने त्याला कळवले होते. तो हॉटेलमधून बाहेर पडत असताना तिने त्याला पाहिले. त्यानेही तिच्याकडे पाहिले असते तर बरे वाटले असते. ती उत्तराची वाट पहात होती. पण ते आले नाही. दोन महिन्यांनी, वाट पाहून थकल्यानंतर. तिने त्याला दुसरे पत्र लिहिले. त्याने न दाखवलेल्या सभ्यतेविषयी टीका करणारे. सहा महिन्यानी तिने सहा पत्रे लिहिली, पण एकाचेही उत्तर आले नाही. त्याला ती मिळत असतीलच या विचाराने ती स्वतःचे समाधान करीत राहिली.

द्वेष आणि प्रेम या परस्परपूरक भावना आहेत हे एंजेला व्हिकारिओला आता कळले होते. ती जसजशी पत्रे पाठवायची तसतसे तिच्या ज्वराचे कोळसे पेटायचे, त्याचवेळी आईविषयी द्वेषभावनाही फुलायची. 'तिला पाहताच माझं पोट उमलून यायचं,' ती मला म्हणाली, 'पण तिला पाहताच मला त्याची आठवण येत असे.' परित्यक्त पत्नी म्हणून तिचे जीवन चालले होते. एखाद्या वयस्क बाईसारखे साधे, मैत्रिणीसोबत एम्ब्रॉयडरीच्या मशीनवर काम करीत, कापडाची फुले आणि कागदाचे पक्षी बनवीत. पण तिची आई झोपायला गेली की ती पहाटेपर्यंत पत्रे लिहीत राहायची.

अर्धे अधिक आयुष्य ती दर आठवड्याला पत्र लिहीत राहिली. 'कधीकधी काय म्हणावे ते मला सुचत नसे,' मोठमोठ्याने हसत ती मला म्हणाली, 'त्याला ती मिळताहेत एवढे मला पुरेसं होत असे.' सुरुवातीला ती प्रेयसीची पत्रे असत, नंतर चोरून प्रेम करणाऱ्याचे ते छोटे छोटे संदेश असत, चोरट्या प्रेमिकेची सुगंधित पत्रे, व्यापारविषयक कागदपत्रासारखी, प्रेमाचे दस्तऐवज, आणि शेवटी नवऱ्याने परत यावे म्हणून भयानक आजाराची निमित्ते शोधून काढणाऱ्या टाकलेल्या बायकोची क्रुद्ध पत्रे असत. एके रात्री तिने लिहिलेल्या पत्रावर मजेत शाई सांडली आणि ते फाडून टाकण्याऐवजी तिने ताजा कलम लिहिला: 'माझ्या प्रेमाचा पुरावा म्हणून मी माझे अश्रू तुला पाठवीत आहे.' कधीकधी रडण्याचा कंटाळा आल्यावर आपल्या पागलपणाची ती स्वतःच चेष्टा करीत असे. पण तरी पत्रे लिहिणे थांबवावे असे तिला वाटले नाही. ती सारी पत्रे अस्तित्वात नसलेल्या कुणाला तरी लिहिण्यासारखे होते. तिच्या उन्मादाला त्याच्याकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

दहाव्या वर्षी एका वादळी सकाळी तो तिच्या बिछान्यात विवस्त्र होऊन पडला आहे ही जाणीव होऊन ती जागी झाली. नतर तिने त्याला एक भावोत्कट पत्र लिहिले वीस पाने लांब. त्यात तिने त्या दुर्दैवी रात्रीपासून तिच्या हृदयात सडत असलेल्या कडवट सत्याविषयी कोणतीही भीड न ठेवता लिहिले. त्याने तिच्या शरीरावर मागे ठेवलेल्या शाश्वत व्रणाविषयी लिहिले. त्याच्या जीभेची तीक्ष्ण चव, त्याच्या आफ्रिकन इद्रियाचा नागराच्या फाळासारखा ताठपणा याविषयी लिहिले. सगळे काही ओकून टाकणाऱ्या या पत्रामुळे आपल्या वेदनेची समाप्ती होईल असे तिला वाटत होते. पण उत्तर आले नाही. त्यानतर तिने जे जे काही लिहिले त्याबाबत तिला काही आठवत नाही ती भानावर नव्हती. आपण कुणाला लिहितो आहोत याचेही भान उरले नाही. पण सतरा वर्षे ती अखंडपणे लिहीतच राहिली.

ऑगस्टमध्ये एके दिवशी तिच्या मैत्रिणीसोबत ती एम्ब्रॉयडरी करीत बसलेली असताना कुणाची तरी चाहूल तिला ऐकू आली. तो कोण आहे हे पाहाण्यासाठी तिला दृष्टी वळवावी लागली नाही. 'तो लठ्ठ झाला होता आणि त्याचे केस गळू लागले होते. जवळच्या वस्तू पाहाण्यासाठी त्याला चष्मा लावावा लागला होता.' तिने मला म्हटले, 'पण तो तोच होता. तोच होता.' ती घाबरली होती. तो तिच्याकडे तिच्यासारखाच त्रयस्थपणे पाहात होता आणि त्याच्या हृदयात तिच्याविषयी काही प्रेम असावे असे तिला वाटले नाही. त्याचे शर्ट घामाने भिजले होते. जत्रेत तिने त्याला पहिल्यादा पाहिले होते तसेच आणि त्याने तोच बेल्ट बांधला होता आणि त्याच कातडी थैल्या त्याने आणल्या होत्या बायार्दो सान रोमानने एक पाऊल पुढे टाकले. भरतकाम करणाऱ्या चकित स्त्रियांकडे त्याने पाहिले नाही. त्याने त्या कातडी थैल्या शिवणयंत्रावर ठेवल्या.

'मी आलोय,' तो म्हणाला

राहण्याच्या उद्देशाने कपडे भरलेली एक सूटकेस त्याने आणली होती आणि दुसरी तिने लिहिलेल्या जवळपास दोन हजार पत्रानी भरलेली. ती तारीखवार लावलेली होती आणि त्याचे व्यवस्थित बंडल बांधून त्यावर रंगीत रिबन बांधलेली होती आणि ती सगळी न उघडलेली होती.

बरीच वर्षे आम्ही दुसऱ्या कुठल्या विषयावर बोलतच नव्हतो. आमची साधी सरळमार्गी आयुष्ये अचानकपणे एका दुःखद प्रश्नाभोवती गरगरा फिरू लागली. आमची सकाळ उगवायची ती तर्कहीनतेचे संभवनीयतेत रूपांतर करणाऱ्या योगायोगांच्या घटनाची साखळी जुळवण्यात आणि अर्थातच आम्ही ते दु.खद रहस्य उलगडण्यासाठी करीत नव्हतो, तर स्थल आणि कार्य याचे अचूक ज्ञान असण्याची जी जबाबदारी देवाने आमच्यावर सोपवलेली होती ती पार पाडल्याखेरीज आमच्यापैकी कुणालाही जगताच आले नसते म्हणून.

पुष्कळाना ते कधी समजलेदेखील नाही. ख्रिस्तो बेदोया, जो पुढे विख्यात सर्जन झाला कधीही स्पष्ट करू शकला नाही की, बिशप येईपर्यंतचे दोन तास आजोबाच्या घरी घालवावे असे त्याला का वाटले आणि तो स्वतःच्या घरी का गेला नाही. तिथे त्याचे आईवडील त्याला सावध करण्यासाठी पहाटेपासून त्याची वाट पाहात होते. ती हत्या ज्याना टाळता आली असती असे जे काही लोक होते त्यांनी स्वतःचे समाधान या प्रकारे केले की, आत्मप्रतिष्ठेचे प्रश्न या अतिशय पवित्र आणि खाजगी गोष्टी असतात आणि ते प्रश्न ज्याचे त्यानेच सोडवायचे असतात.

'प्रतिष्ठा म्हणजे प्रेम', माझी आई म्हणायची. हॉर्टेन्शिया बॉटने दोन रक्ताळलेले सुरे पाहिले केवळ, ज्याना खरे तर अजून रक्त *लागलेलेच नव्हते आणि त्या प्रसगाचा* तिच्या मनावर एवढा आघात झाला की, तिला वेड लागले आणि एके दिवशी ती नग्न होऊन रस्त्यावर धावत सुटली. फ्लोरा मिग्युएल, सातियागो नासरची वाग्दत्त वधू, एका लेफ्टनटबरोबर पळून गेली. त्याने तिला विचादामधल्या रबर कामगारासाठी वेश्याव्यवसाय पत्करायला लावले. ऑरा व्हिलेरॉस, आमच्या गावातल्या तीन पिढ्याना या जगात आणणाऱ्या सुइणोला ती बातमी ऐकताच मूत्राशयाचा विकार जडला आणि मरेपर्यन्त तिला कॅथिटर वापरावे लागले. डॉन रोगेलिओ डि ला फ्लोर, क्लॉटिल्ड आर्मेन्टाचा भला नवरा, शाहाशी वर्षांचा असूनही टुणटुणीत होता, त्याने स्वत:च्या दाराशी तुकडे झालेल्या सातियागो नासरला पाहिले आणि तो आघात त्याला सहन झाला नाही. अगदी शेवटच्या त्या घातकी क्षणी प्लासिडा लिनेरोने ते दार बद केले होते, परतु काळ जसजसा गेला तसतशी ती स्वत:वरील लाच्छनातून मुक्त झाली. 'मी ते बद केले कारण डिव्हायना फ्लोराने माझा मुलगा आत आलेला पाहिल्याचे शपथेवर सागितले म्हणून,' ती मला म्हणाली 'आणि ते खरे नव्हते. *स्वप्नातल्या शुभशकुनी* झाडाकडे तिने लक्ष दिले होते, पण अशुभ पक्ष्याकडे तिने पाहिलेच नाही याबद्दल मात्र तिने स्वत:ला क्षमा केली नाही.'

गुन्हा घडल्यानतर बारा दिवसानी, उघड्या जखमेसारख्या त्या गावात चौकशी अधिकारी पोचला. टाऊन हॉलमधल्या घाणेरड्या लाकडी कचेरीत, बाहेर उन्हाच्या झळा असताना, कॉफीत उसाची दारू टाकून ती पीत, जमावाच्या लोंढ्याला आवरण्यासाठी पोलिसाना आज्ञा देत तो बसलेला असे बोलावलेले नसूनही लोक सारखे येतच होते. त्या साऱ्याना या शोकनाट्यातील आपापली भूमिका दाखवायची असे. चौकशी अधिकारी अलीकडेच पदवीधर झाला होता आणि अजूनही तो आपला लॉ स्कूलमधला काळा सूट आणि पदवीची मुद्रा असलेली सोन्याची अंगठी घालीत असे पण मला त्याचे नाव कळले नाही. खटल्याच्या कागदपत्रातून त्याचे व्यक्तिमत्त्व मात्र कळले. ही कागदपत्रे मी पुढे वीस वर्षांनतर रिओहाचा येथील न्यायालयात पाहिली. तिथे फायलीचे वर्गीकरण केलेले नव्हते. जमिनीवर शभराहून अधिक खटल्यांच्या कागदपत्राचे गठ्ठे ठेवलेले होते. तळमजल्यावर भरतीचे पाणी शिरायचे आणि न बाधलेली कागदपत्रे त्यावर तरगू लागायची. मी स्वत: कित्येकदा पायाचे घोटे बुडतील एवढ्या पाण्यात उभे राहून कागदपत्राचा शोध घेतला आहे आणि पाच वर्षांनी योगायोगानेच पाचशेहून अधिक असलेल्या पानापैकी तीनशेबावीस पाने मिळवू शकलो.

न्यायाधीशाचे नाव कुठेही लिहिलेले नव्हते. पण वाङ्मयाच्या ज्वराने फणफणत असलेला तो माणूस असावा हे स्पष्ट दिसत होते. त्याने स्पॅनिश क्लासिक्स आणि थोडी लॅटिनही वाचली असावी हे नि:सशय आणि तत्कालीन न्यायाधीशामध्ये लोकप्रिय असलेल्या नित्शेशीही त्याचा चागला परिचय असावा. समासातले शेरे, केवळ शाईच्या रगामुळे नव्हे तर खरेच, रक्ताने लिहिल्यासारखे वाटतात. योगायोगाच्या गूढतेने तो इतका चकित झालेला होता की पुष्कळदा तो आपल्या व्यवसायातल्या अलिप्ततेला न जुळणाऱ्या भावुकतेत हरवून गेलेला असे. वाङ्मयाने निषिद्ध मानलेल्या योगायोगाचा जीवनाने एवढा स्वीकार करावा की आधीच स्पष्टपणे जाहीर करण्यात आलेला मृत्यू काहीही अडथळा न येता घडावा, हे त्याला मुळीच पटले नाही, असे दिसते

सातियागो नासर हा त्या दुष्कृत्याला कारण होता असे सुचवणारी एकही गोष्ट, अगदी क्षुल्लक देखील, अत्यत परिश्रमपूर्वक अभ्यास करूनही त्याला आढळली नाही, यामुळे तो अस्वस्थ झाला. तिने तिचे रहस्य आम्हाला सागितले होते, पण कुणाचे नाव उघड केले नव्हते असे अँजेला व्हिकारिओला कानमंत्र देणाऱ्या मैत्रिणी सतत म्हणत राहिल्या. खटल्याच्या कागदपत्रात त्यानी म्हटले होते : 'तिने चमत्काराविषयी सागितले पण तो घडवणाऱ्या साधुपुरुषाविषयी नाही.' अँजेला व्हिकारिओ ठाम होती. चौकशी अधिकाऱ्याने जेव्हा तिला मृत सातियागो नासर कोण होता असे विचारले, तेव्हा तिने कोरडेपणे उत्तर दिले :

'माझ्याशी वाईट वर्तन करणारा तोच होता.'

खटल्याच्या कागदपत्रात तिने असे शपथेवर सागितले आहे, परतु कसे आणि कुठे याविषयी मात्र काहीही निश्चित उत्तर दिलेले नाही. खटल्याचे कामकाज तीन दिवस चालले. त्यावेळी सरकारी वकिलाने या आरोपातील त्रुटीवर बराच भर दिलेला होता. सातियागो नासरच्या विरुद्ध कोणताही पुरावा नसल्यामुळे चौकशी अधिकारी गोंधळून गेला. ४१६ पानावर स्वत:च्या हस्ताक्षरात, औषधविक्रेत्याच्या लाल शाईने त्याने एक टीप लिहिली आहे : एक दुराग्रह मला द्या आणि मी जगाला हादरवून टाकीन. या नैराश्यपूर्ण वचनाखालीच त्याने त्याचे लाल शाईने एक रेखाटन केले आहे, बाणाने छेदलेल्या हृदयाचे चित्र त्याने तेथे काढले आहे. मृत्यूपूर्वीच्या काही तासामधले त्याचे वर्तन हा त्याच्या निष्पापपणाचा पुरावाच होय असे त्यालाही, सातियागो नासरच्या आम्हा मित्राप्रमाणेच वाटत होते.

आपल्यावर आरोपित करण्यात आलेल्या अपमानाची किंमत काय मोजावी लागेल हे त्याला चागले ठाऊक होते, पण आपल्या मृत्यूच्या सकाळी, खरे तर सातियागो नासरला क्षणभरही असा काही सशय आला नाही. त्याला आपल्या जगाच्या लज्जास्पद रचनेची जाणीव होती आणि जुळ्याच्या स्वभावातील साधेपणामुळे अपमान ते कदापि स्वीकारणार नाहीत याचीही त्याला जाणीव असावी. बायार्दो सान रोमानला तसे फारसे कुणी ओळखत नव्हते, पण सातियागो नासरला एवढे निश्चितच कळत होते की, वरवरच्या त्याच्या मोकळ्या वर्तनाखाली, इतरासारखेच पारपरिक पूर्वग्रह दडलेले आहेत. त्यामुळे त्याला आत्महत्याच करावी लागली असती. शेवटच्या क्षणी त्याला जेव्हा कळले की व्हिकारिओ बधू त्याला ठार करण्यासाठी वाट पाहत बसले आहेत, तेव्हा लोक म्हणतात त्याप्रमाणे तो घाबरून गेला नाही, तर तो चकित झाला होता. त्याच्या या प्रक्रियेतून त्याचा निष्पापपणाच व्यक्त होतो.

आपल्या मृत्यूचा अर्थ न समजताच तो मरण पावला असे माझे स्वत:चे मत आहे. माझी बहीण मारगॉट हिला न्याहरीसाठी तो

येणार असल्याचे सांगितल्यावर क्रिस्तो बेदोया त्याला घेऊन बंदरावरून निघाला, त्यावेळी ते दोघेही स्वत:तच गुतलेले होते. त्यामुळे लोकाच्या मनात चुकीच्या कल्पना निर्माण झाल्या. 'ते दोघेही इतके मजेत जात होते,' मेमे लोआीझा मला म्हणाली, 'की मी देवाचे आभारच मानले. मला वाटलं प्रश्न मिटला असावा.' सातियागो नासरवर सगळ्याचेच प्रेम होते असे अर्थातच नाही. विद्युत गृहाचा मालक पोलो कारिल्लो याला वाटत होते, त्याची प्रसन्नता म्हणजे निष्पापपणा नव्हता तर तो उपहास होता. 'त्याच्या जवळच्या पैशामुळे तो गर्विष्ठ झाला होता,' तो म्हणाला. फाऊस्टा लोपेझ, त्याची बायको, म्हणाली, 'सारेच तुर्क तसे असतात.' अिन्डालेशिओ पार्डो नुकताच क्लॉटिल्ड आर्मेन्टाच्या दुकानासमोरून गेला होता तेव्हा जुळ्यानी त्याला सांगितले होते की बिशप गेल्यानंतर तावडतोब ते सातियागो नासरला ठार करणार आहेत. इतरांप्रमाणेच त्यालाही भल्या पहाटे उठवणाऱ्याची, पुरते जागे न झालेल्याची कल्पनाचित्रे वाटली होती. पण क्लॉटिल्ड आर्मेन्टाने त्याला समजावले की ते स्वप्न नसून खरे आहे आणि तिने त्याला सातियागो नासरला गाठून सावध करायला सांगितले.

'त्या फदात पडू नकोस,' पेद्रो व्हिकारिओने त्याला म्हटले, 'काहीही झालं तरी तो आता मेल्यातच जमा आहे.'

हे म्हणजे सरळसरळ आव्हानच होते. इंडालेशिओ पार्डो आणि सातियागो नासर याच्यातले बध जुळ्याना ठाऊक होते आणि आपल्यावर येणारा लज्जास्पद प्रसंग टाळून हा गुन्हा थांबवू शकेल असा तोच एक योग्य माणूस आहे असाच त्यानी विचार केला असावा. पण इन्डालेशिओला सातियागो नासर क्रिस्तो बेदोयाच्या हातात हात घालून बंदरावरून बाहेर पडणाऱ्याच्या घोळक्यात दिसला आणि त्याला सावध करण्याचे धैर्य त्याला झाले नाही. 'मला ते धाडसच झाल नाही,' तो मला म्हणाला. त्याने दोघाच्याही पाठीवर थाप मारली आणि त्याना जाऊ दिले. त्याचे लक्षच नव्हते, कारण ते लग्नाच्या खर्चाच्या हिशोबातच मग्न होते.

लोक विखुरले होते आणि त्याच्यासारखेच चौकाकडे निघाले होते. गर्दी बरीच होती, पण एस्कोलास्टिका सिनेरॉसला वाटले की ते दोन मित्र सहजपणे त्या गर्दीमधल्या एका रिकाम्या वर्तुळातून चालताहेत, कारण लोकाना ठाऊक होते की सातियागो नासर मरणार आहे. ते त्याला स्पर्श करायला घाबरत होते. त्याच्याकडे लागलेली लोकांची चमत्कारिक दृष्टी क्रिस्तो बेदोयालाही आठवत होती. 'आमचे चेहरे रंगवलेले असावेत तसे ते आमच्याकडे पाहत होते,' तो मला म्हणाला. ते समोरून जात असताना सारा नोरिएगा आपले बुटाचे दुकान उघडीत होती तेव्हा सांतियागो नासरचा निस्तेज चेहरा पाहून ती घाबरली होती. पण त्याने तिचे समाधान केले.

'पाहतेच आहेस, साराबाई,' तो जाता-जाता म्हणाला, 'ही सगळी गडबड, गोंधळ !'

सेलेस्ते दार्गांद आपल्या घराच्या दारातच बसला होता बिशपच्या स्वागतासाठी गेलेल्यांची चेष्टा करीत. त्याने सातियागो नासरला कॉफी घ्यायला बोलावले. 'विचार करायला थोडा वेळ मिळावा म्हणून' तो मला म्हणाला. पण सांतियागो नासरने त्याला उत्तर दिले की त्याला माझ्या बहिणीने न्याहरीसाठी बोलावले आणि त्यामुळे तो कपडे बदलण्यासाठी घाईने जात आहे. 'माझा सगळा गोंधळ झाला,' सेलेस्ते दार्गांद मला म्हणाला, 'कारण मला अचानक वाटलं की आपण काय करणार आहोत याची त्याला जर एवढी खात्री आहे तर ते त्याला ठार करू शकणार नाहीत.' यामिल शायम हाच एक असा होता की त्याने ठरवले ते केले. त्याने अफवा ऐकली तसा तो लगेच आपल्या दुकानी गेला आणि सातियागो नासरला सावध करण्यासाठी त्याची वाट पाहात बसला. इब्राहीम नासरबरोबर आलेल्यांपैकी तो शेवटचा अरब होता, तो मरेपर्यंत त्याचा पत्त्याच्या खेळातला जोडीदार होता. आणि अजूनही तो त्या कुटुंबाचा परंपरागत उपदेशक होता. सांतियागो नासरशी बोलण्याच्या बाबतीत त्याच्याइतका अधिकार कुणाचाच नव्हता. तरीदेखील, अफवात काही तथ्य नसेल तर त्याला उगीचच सावध केल्यासारखे होईल, आणि त्याने आधी क्रिस्तो बेदोयाला खरे काय ते विचारावे असे ठरवले. तो जात असलेला पाहून त्याने त्याला बोलावले. क्रिस्तो बेदोयाने सातियागो नासरच्या पाठीवर थाप मारली आणि यामिल शायमकडे पाहिले. 'शनिवारी भेटू या.' तो सातियागोला म्हणाला.

सातियागो नासर त्याच्याशी काही बोलला नाही, पण यामिल शायमशी अरबीत काही बोलला आणि यामिल शायमने अरबीतच हसतहसत काही उत्तर दिले. 'आम्ही तसा गमतीचा शाब्दिक खेळ नेहमीच खेळत असू,' यामिल शायमने मला सांगितले. सातियागो नासरने न थाबता त्या दोघाकडे पाहून निरोपाचा हात हलवला आणि चौकाच्या कोपऱ्यावरून तो वळला. त्या दोघानी त्याला हे शेवटचे पाहिलेले.

क्रिस्तो बेदोयाने यामिल शायमला मिळालेली बातमी ऐकण्यापुरता वेळ घेतला न घेतला, सातियागोला पकडण्यासाठी तो दुकानाबाहेर धावला. त्याने त्याला कोपऱ्याशी वळताना पाहिले होते, परंतु चौकातल्या घोळक्यामध्ये तो त्याला दिसला नाही अनेकाना त्याने विचारले, पण त्या सर्वांनी त्याला एकच उत्तर दिले.

'मी एवढ्यातच त्याला तुझ्याबरोबर पाहिल.'

तो काही क्षणांतच घरी पोचला असेल हे अशक्यच होते, पण समोरचे दार उघडे असलेले पाहून तो त्याच्याविषयी विचारायला आत गेला. जमिनीवर पडलेल्या कागदाकडे त्याचे लक्ष गेले नाही. तो अधुक दिवाणखान्यातून आवाज न होण्याची दक्षता घेत तो पलीकडे गेला, कारण लोकानी भेटीला येण्याची ही वेळ नव्हती. परतु कुत्री उठली आणि त्याला भेटायला समोर आली. आपल्याजवळच्या चाव्याच्या आवाजाने त्याने त्यांच्या मालकाप्रमाणे, त्यांना शांत केले आणि स्वयंपाक घराकडे गेला. कुत्री त्याच्या पाठोपाठ येत होतीच. व्हरांड्यात त्याला डिव्हायना फ्लोर भेटली. ती हातात पाण्याची बादली आणि फडके घेऊन दिवाणखान्याची फरशी पुसायला निघाली होती. सांतियागो परतला नसल्याचे तिने सांगितले. तो स्वयंपाक घरात पोचला तेव्हा व्हिक्टोरिया गुझमानने ससाच्या रश्शाचे भांडे चुलीवर चढवले होते. तिला तावडतोब कळले. 'तो अतिशय घाबरला होता.' ती मला म्हणाली. क्रिस्तो बेदोयाने तिला सांति-

यागो नासर घरी आहे का विचारले आणि तिने तो झोपण्यासाठी अजून परतला नसल्याचे खोटया निष्पापपणे सांगितले.

'अतिशय गंभीर बातमी आहे,' ख्रिस्तो बेदोया तिला म्हणाला. 'ते त्याला ठार करण्यासाठी शोधताहेत.'

व्हिक्टोरिया गुझमान आपला निष्पापपणा विसरून गेली.

'ती बिचारी मुलं कुणालाही ठार करणार नाहीत,' ती म्हणाली.

'ते शनिवारपासून 'पिताहेत,' ख्रिस्तो बेदोया म्हणाला.

'त्यात काय विशेष' ती उत्तरली, 'कोणताही दारूडा स्वतःच शेण खात नसतो.

ख्रिस्तो बेदोयो दिवाणखान्यात परत गेला तिने खिडक्या नुकत्याच उघडल्या होत्या 'अर्थातच पाऊस पडत नव्हता,' ख्रिस्तो बेदोया मला म्हणाला. सात वाजायला आले होते आणि सोनेरी ऊन खिडक्यातून येऊ लागले होते. त्याने डिव्हायना फ्लोरला पुन्हा विचारले की सातियागो नासर दिवाणखान्याच्या दारातून आत आलेला नाही हे नक्की ना. पण आता तिला तेवढी खात्री नव्हती. त्याने प्लासिडा लिनेरोची चौकशी केली आणि त्यावर तिने सांगितले आताच तिने तिच्या उशाजवळच्या टेबलवर कॉफी ठेवली पण तिने तिला उठवले नाही. नेहमीची ही रीत होती: ती सात वाजता उठायची, कॉफी घ्यायची, आणि मग दुपारच्या जेवणासबंधी सुचना द्यायला खाली यायची ख्रिस्तो बेदोयाने घड्याळात पाहिले. सहा छप्पन्न झाले होते. नंतर तो सातियागो नासर आला आहे की नाही याची खात्री करण्यासाठी वरच्या मजल्यावर गेला

बेडरूमचे दार आतून बंद होते, कारण सातियागो नासर त्याच्या आईच्या बेडरूममधून बाहेर गेला होता ख्रिस्तो बेदोयाला त्या घराची चांगली माहिती होती, एवढेच नव्हे तर त्या कुटुंबाशी त्याचा एवढा घरोबा होता की त्याने प्लासिडा लिनेरोच्या बेडरूमचे दार ढकलले आणि तिथून तो बाजूच्या खोलीत गेला. वरच्या खिडकीतून एक किरण आत आला होता आणि ती गालावर हात ठेवून एका कुशीवर झोपलेली सुंदर स्त्री प्रत्यक्षातली नसावी असे वाटत होते. 'एखादं पिशाच्च पहावं तसं वाटत होत,' ख्रिस्तो बेदोया मला म्हणाला. तिच्या सौंदर्याने प्रभावित होऊन त्याने तिच्याकडे क्षणभर पाहिले आणि नतर तो हळूच पलीकडच्या सातियागो नासरच्या बेडरूममध्ये गेला. बिछाना जसाच्या तसा होता, आणि खुर्चीवर इस्त्री केलेले त्याचे घोडेस्वारीचे कपडे होते आणि त्या कपड्यावर त्याची हॉर्समनची हॅट आणि जमिनीवर त्याचे बूट ठेवलेले होते. छोटया टेबलावरील सातियागो नासरच्या घड्याळात सहा अठ्ठावन्न झाले होते.

'अचानक मला वाटलं की तो आला होता आणि शस्त्रसज्ज असा बाहेर पडला,' ख्रिस्तो बेदोया मला म्हणाला. पण त्याला टेबलाच्या खणातच पिस्तूल पडलेले आढळले, 'मी कधी बंदूक चालवली नव्हती,' ख्रिस्तो बेदोया मला म्हणाला, 'पण मी रिव्हाल्वर घेतले आणि ते सातियागोला द्यावे असे ठरवले.' त्याने ते शर्टाखाली पट्ट्यात खुपसले आणि हत्या घडल्यानंतरच ते रिकामे आहे हे त्याला कळले. तो टेबलाचा खण आत सारीत असताना हातात कॉफीचा प्याला घेऊन प्लासिडा लिनेरो दारात उभी होती.

'अरे बापरे!' ती उद्गारली, 'किती मी दचकले!'

ख्रिस्तो बेदोयासुद्धा दचकला होता. भरपूर उजेडात त्याने तिला पाहिले. तिने सोनेरी पक्षी असलेला गाऊन घातला होता, तिचे केस मोकळे होते आणि मघाची आकर्षकता आता उरली नव्हती. आपण सातियागो नासरला शोधतो आहोत हे त्याने जरा गोंधळलेल्या अवस्थेत सांगितले.

'तो विशपच स्वागत करायला गेलाय,' प्लासिडा लिनेरो म्हणाली.

'तो नक्कीच गेला असावा,' तो म्हणाला.

'मला तसं वाटत,' ती म्हणाली, 'तो एका चमत्कारिक आईचा मुलगा आहे.'

ती तिथून गेली नाही कारण त्याक्षणी तिला जाणवले की ख्रिस्तो बेदोयाला आपल्या शरीराचे काय करावे हे कळत नव्हते. 'ईश्वर मला क्षमा करो,' प्लासिडा लिनेरो मला म्हणाली, 'पण तो त्यावेळी इतका गोंधळलेला दिसला की मला वाटलं तो चोरी करायला आला असावा.' काय बिघडले आहे असे तिने त्याला विचारले ख्रिस्तो बेदोयाला आपण संशयास्पद स्थितीत आहोत हे कळत होते, पण खरे काय ते सांगण्याची हिंमत त्याला झाली नाही.

'काही नाही, मला मिनिटभरही झोप मिळाली नाही,' तो तिला म्हणाला.

आणखी काही न बोलता तो तिथून निघाला. 'कधीही,' तो मला म्हणाला, 'आपल्याला लोक लुटताहेत असंच तिला वाटायच.' चौकात त्याला चर्चकडे परत जात असलेले फादर अमादोर भेटले; पण सातियागो नासरच्या आत्म्यासाठी प्रार्थना करण्याखेरीज आपण काही करू शकत नसल्याचे त्यानी सांगितले.

तो परत बंदराच्या दिशेने वळत असताना क्लोटिल्ड आर्मेन्टाच्या दुकानातून त्याला मारलेल्या हाका ऐकू आल्या. पेद्रो व्हिकारिओ दारात उभा होता. तो निस्तेज आणि थकलेला दिसत होता. त्याचे शर्ट छातीवर उघडे होते आणि बाह्या कोपरापर्यंत दुमडलेल्या होत्या आणि त्याच्या हातात नंगा सुरा होता. तो अकारण उद्धटासारखा वागत होता. आणि ही एकच नव्हे तर अशा अनेक उघड दिसणाऱ्या गोष्टीचे प्रदर्शन तो करीत होता. त्यामुळे तरी कोणीतरी त्याला गुन्हा करण्यापासून रोखू शकेल.

'ख्रिस्तोबल' तो ओरडला, 'सातियागो नासरला सांग की आम्ही त्याला ठार करण्यासाठी इथं थांबलो आहोत.'

ख्रिस्तो बेदोया त्याला अडवू शकला असता. 'मला पिस्तूल कसं उडवावं हे ठाऊक असतं तर आज सातियागो नासर जिवंत असता,' तो मला म्हणाला. आर्मर–प्लेटेड बुलेटच्या भयंकर शक्तीविषयीचे बोलणे ऐकल्यानंतरच त्याला हे सुचले होते.

'मी तुला सावध करतोय. इंजिनातून आरपार गोळी जाईल असं पिस्तूल त्याच्याजवळ आहे,' तो ओरडला.

हे खरे नसल्याचे पेद्रो व्हिकारिओला ठाऊक होते. 'स्वारीचे कपडे घातल्याशिवाय एरवी तो शस्त्र जवळ बाळगत नव्हता,' तो मला म्हणाला. तथापि, बहिणीच्या अपमानाचा बदला घेण्याचा विचार करताना त्याने ही शक्यता गृहीत धरली होती.

'मेलेली माणसं गोळ्या झाडत नसतात,' तो ओरडला.

नंतर पाब्लो व्हिकारिओ दारात आला. तो त्याच्या भावासारखाच निस्तेज दिसत

होता. त्याने लग्नाचे जाकिट घातले होते आणि त्याच्याजवळ वर्तमानपत्रात गुडाळलेला सुरा होता. 'हा फरक नसता तर,' क्रिस्तो बेदोया मला म्हणाला, 'त्या दोघामध्ये मला मुळीच फरक करता आला नसता.' मग क्लॉटिल्ड आर्मेन्टा त्याच्यामागे उभी राहिली आणि क्रिस्तो बेदोयाकडे पाहून ओरडून म्हणाली की घाई कर, कारण या लाकडी ठोकळ्याच्या गावात तोच एक माणूस आहे जो ही शोकांतिका थाबवू शकेल.

नतर जे काही घडले ते साऱ्या लोकाच्या समोर घडले. बदराकडून परत येत असलेले लोक आरडाओरडा ऐकून चौकात जमले आणि ती हत्या पाहण्यासाठी जागजागी उभे राहिले. क्रिस्तो बेदोयाने तो ओळखत असलेल्या कित्येकांना सातियागो नासरला पाहिले का म्हणून विचारले, पण कुणीही पाहिलेले नव्हते. सोशल क्लबच्या दारातच त्याची कर्नल लाझारो अपॉन्तीशी भेट झाली आणि त्याने एवढ्यातच क्लॉटिल्ड आर्मेन्टाच्या दुकानासमोर काय घडले ते सागितले.

'हे शक्य नाही,' कर्नल अपॉन्ती म्हणाले, 'कारण मी त्याना घरी झोपायला जा म्हणून सागितले.'

'मी आत्ताच त्याच्याजवळ डुकर कापण्याचे सुरे पाहिले,' क्रिस्तो बेदोया म्हणाला.

'हे शक्य नाही, कारण त्याना घरी जायला सांगण्यापूर्वी मी त्याच्याकडून ते काढून घेतले होते,' मेयर म्हणाले. 'तू त्याना त्यापूर्वी पाहिल असशील.'

'मी त्याना दोन मिनिटापूर्वी पाहिल आणि त्या दोघाजवळही डुकर कापण्याचे सुरे होते.' क्रिस्तो बेदोया म्हणाला.

'च्यायला' मेयर म्हणाले, 'मग ते दुसरे सुरे घेऊन परतले असतील.'

ताबडतोब दखल घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले, पण डॉमिनो खेळाचे त्या रात्रीचे भिडू कोण आहेत हे पाहण्यासाठी ते परत सोशल क्लबमध्ये गेले ते बाहेर आले तेव्हा हत्या घडून गेलेली होती. क्रिस्तो बेदोयाने नतर एकच भयानक चूक केली. सातियागो नासरने ऐनवेळी कपडे बदलण्याआधी आमच्या घरी न्याहरीला जावे असे ठरवले असावे असे त्याला वाटले आणि तो त्याला पाहाण्यासाठी आमच्या घरी गेला. तो नदीच्या काठाने धावतच गेला. वाटेत भेटणाऱ्या प्रत्येकाला त्याने सातियागोला पाहिले का हे विचारले, पण कोणीही पाहिल्याचे सागितले नाही. त्याला आश्चर्य वाटले नाही, कारण आमच्या घराकडे येणारे अनेक रस्ते होते. प्रॉस्पेरा अरागोने त्याला थाबवले आणि आपल्या मरणासन्न बापाला वाचवण्याची विनती केली.

'मी येताना त्याला पाहिल होत,' माझी वहीण मारगॉट म्हणाली, 'त्याच्या चेहऱ्यावर प्रेतकळा पसरली होती.'

त्या आजारी माणसाची प्रकृती पाहण्यासाठी क्रिस्तो बेदोयाला चार मिनिटे घालवावी लागली आणि नतर येईन म्हणून त्याने तिला सागितले, पण त्याला बेडरूममध्ये घेऊन जाण्यासाठी मदत करण्यात त्याची आणखी तीन मिनिटे खर्च झाली. तो बाहेर आला तेव्हा दूरचा ओरडा ऐकून त्याला वाटले की चौकात रॉकेटस् उडवताहेत. त्याने धावण्याचा प्रयत्न केला पण पट्ट्यात खुपसलेल्या रिवाल्वरचा अडथळा होत होता. तो शेवटच्या कोपऱ्यावर वळला तेव्हा धाकट्या मुलाला ओढत चाललेली माझी आई पाठमोरी त्याला दिसली

'लुईसा सातियागा' तो तिला ओरडून म्हणाला, 'तुझा धर्माचा मुलगा कुठं आहे?'

माझी आई कष्टाने वळली, तिचा चेहरा अश्रूनी भिजलेला होता.

'बाळा,' ती म्हणाली, 'त्याला मारलय म्हणतात!'

हे असे होते. क्रिस्तो बेदोया त्याला शोधत होता, तेव्हा सातियागो नासर आपल्या वाग्दत्त वधूच्या, फ्लोरा मिग्युएलच्या घरी गेला होता; जिथे त्याने त्याला शेवटचे पाहिले त्या कोपऱ्यावरून वळून तो तिथे गेला होता 'तो तिथ गेला असेल अस मला मुळी वाटलच नाही,' तो मला म्हणाला, 'कारण ते लोक दुपार होईतो उठत नसत' ते सारे कुटुब जमातीतल्या शहाण्या पुरुषाच्या नाहिर मिग्युएलच्या आज्ञेप्रमाणे बारा वाजेपर्यंत झोपत असे एक मत होते 'त्यामुळेच फ्लोरा मिग्युएल, फारशी तरुण राहिलेली नसताना देखील एखाद्या गुलाबाप्रमाणे टवटवीत दिसत असे,' मर्सिडिज म्हणायची. ते इतर अनेकाप्रमाणे उशिरापर्यंत घराचे दार बद ठेवीत हे खरे होते, परतु ते लवकर उठणारे आणि कष्टाळू लोक होते सातियागो नासर आणि फ्लोरा मिग्युएलच्या पालकानी त्याच्या लग्नाला मान्यता दिली होती. सातियागो नासरने पौगडावस्थेतच वचन दिले होते आणि ते अमलात आणायचे निश्चित केले होते. कदाचित त्याच्या बापाप्रमाणेच त्याचीही विवाहविषयक धारणा उपयुक्ततावादीच होती. ते एकमेकाशी वचनबद्ध झालेले होते परतु औपचारिक भेटीगाठी किंवा हृदयाची अस्वस्थता असला काही प्रकार नव्हता. अनेकदा पुढे ढकललेले लग्न ख्रिसमसनतर व्हायचे निश्चित झाले होते.

त्या सोमवारी फ्लोरा मिग्युएल बिशपच्या बोटीचा आवाज ऐकून जागी झाली, आणि थोड्याच वेळात व्हिकारिओ बधू सातियागो नासरला ठार करण्यासाठी वाट पाहाताहेत हे तिला समजले. तिने माझ्या नन असलेल्या बहिणीला सागितले, त्या दुर्दैवी घटनेनतर ती फक्त तिच्याशीच बोलली, की तिला ते कोणी सागितले तेसुद्धा तिला आठवत नाही. 'सहा वाजता सकाळी प्रत्येकाला ठाऊक होत एवढच मला ठाऊक आहे,' ती तिला म्हणाली सातियागो नासरला ते ठार करणार आहेत ही गोष्ट तिला अचित्य, अकल्पनीय वाटली, पण त्याचवेळी तिला वाटले की गेलेला सन्मान परत मिळवण्यासाठी ते त्याला एजेला व्हिकारिओशी लग्न करायला भाग पाडतील. तिला अपमानित झाल्यासारखे वाटले. अर्धेअधिक गाव बिशपची वाट पाहत होते तेव्हा ती आपल्या बेडरूममध्ये राग अनावर होऊन रडत होती आणि सातियागो नासरने शाळेत असल्यापासून पाठवलेली पत्रे क्रमवार लावीत होती.

फ्लोरा मिग्युएलच्या घराजवळून जाताना केव्हाही, अगदी घरात कुणी नसतानादेखील सातियागो नासर खिडकीच्या काचेवर आपल्या चावीने टकटक करीत असे त्या सोमवारी माडीवर पत्राची पेटी घेऊन ती त्याची वाट पाहत बसली होती. सातियागो नासरला रस्त्यावरून ती दिसली नाही, पण त्याने खिडकीच्या काचेवर चावी ओरखडण्याच्या आधी फ्लोरा मिग्युएलने त्याला घराकडे येताना पाहिले होते.

'आत ये,' ती त्याला म्हणाली

कुणीही, अगदी डॉक्टरनेदेखील सकाळी सहा पचेचाळीसला त्या घरात प्रवेश केला नव्हता. सातियागो नासरने आताच क्रिस्तो बेदोयाला यामिल शायमच्या दुकानाजवळ सोडले होते, आणि चौकातल्या अनेक लोकांचे लक्ष त्याच्याकडे होते, त्यामुळे त्याच्या वाग्दत्त वधूच्या घरात शिरताना त्याला कुणी पाहिले नसावे यावर विश्वास बसणे कठीण होते. त्याला पाहणारा एकतरी माणूस सापडतो का याचा चौकशी अधिकाऱ्याने कसून शोध घेतला आणि मीदेखील, पण तो सापडणे अशक्य होते. तीनशे ब्यायशीव्या पृष्ठावर त्याने लाल शाईत लिहिले आहे : प्रारब्ध आपल्याला अगोचर बनवतं. सातियागो नासर सर्वांच्या समोरून मुख्य दाराने आत गेला आणि कुणी बघू नये अशाप्रकारचे त्याने काही केले नाही. रागाने लाल झालेली फ्लोरा मिग्युएल त्याची वाट पाहत बैठकीत बसली होती आणि तिने समारंभाच्यावेळी घालायचा पोषाख घातला होता आणि तिने त्याच्या हातात पत्राची पेटी ठेवली.

'आलास तू,' ती त्याला म्हणाली, 'आणि मला वाटलं ते तुला मारणार आहेत !'

सातियागो नासर इतका गोंधळून गेला की, त्याच्या हातून पेटी खाली पडली आणि त्याच्या प्रेमशून्य पत्राचा जमिनीवर वर्षाव झाला

त्याने फ्लोरा मिग्युएलला पकडण्याचा प्रयत्न केला पण ती बेडरूममध्ये गेली आणि तिने दार बंद करून घेतले. त्याने कितीतरी वेळ दार ठोठावले आणि इतक्या मोठ्याने हाका मारल्या की, सगळे कुटुंबच तिथे आले. रक्ताने आणि लग्नाने झालेले नातलग, प्रौढ आणि लहान असे सारे मिळून चौदापेक्षा अधिकच होते आणि ते चकित झाले होते. शेवटी आला तो तिचा बाप, नाहिर मिग्युएल. त्याला लाल दाढी होती आणि त्याने त्याच्या मायदेशाहून आणलेले व घरात असताना नेहमी वापरायचा ते बेदूईन कफ्तान घातलेले होते. मी त्याला पुष्कळदा पाहिले आहे आणि तो उंच आणि कृश होता, पण माझ्या मनावर ठसलेली गोष्ट म्हणजे त्याचे अधिकाराचे तेज.

'फ्लोरा,' तो त्याच्या भाषेत म्हणाला, 'दार उघड'

तो आपल्या मुलीच्या बेडरूममध्ये गेला तेव्हा बाकीचे सगळे सातियागो नासरकडे टक लावून पाहात होते. तो गुडघ्यावर बसून पत्रे उचलीत होता आणि पेटीत टाकत होता. 'तो प्रायश्चित्त घेतो आहे असे दिसत होते' ते मला म्हणाले. काही मिनिटानी नाहीर मिग्युएल बेडरूममधून बाहेर आला आणि त्याने हाताने खूण केली तेव्हा सगळी मंडळी आत गेली

तो सातियागो नासरशी अरबीत बोलत होता.

'मी काय म्हणत होतो याची त्याला यत्किंचितही कल्पना नव्हती असे पहिल्याच क्षणी मला समजले,' तो मला म्हणाला. मग त्याने त्याला सरळच विचारले की व्हिकारिओ बंधू त्याला ठार करण्यासाठी शोधताहेत हे त्याला ठाऊक आहे का. 'त्याचा चेहरा पांढराफटक पडला आणि तो थरथरू लागला. ते इतके खरे होते की तो नाटक करतो आहे असा विचार मनात येणे अशक्यच होते,' तो मला म्हणाला. तो घाबरण्यापेक्षा गोंधळून अधिक गेला होता हे त्यालाही मान्य होते.

'त्याच बरोबर आहे की नाही हे तुलाच ठाऊक आहे,' तो त्याला म्हणाला. 'पण आता तुला दोनच गोष्टी केल्या पाहिजेत. एक तर तू इथ या घरात लपून राहिल पाहिजे किंवा माझी रायफल घेऊन बाहेर जा.'

'मला हे काही समजत नाहीय,' सातियागो नासर म्हणाला.

तो फक्त एवढेच बोलू शकला आणि ते तो स्पॅनिशमध्ये म्हणाला. 'तो एखाद्या भिजलेल्या पाखरासारखा दिसत होता,' नाहिर मिग्युएल मला म्हणाला त्याला त्याच्या हातातून पत्राची पेटी घ्यावी लागली, कारण दार उघडण्यासाठी ती कुठे ठेवावी हे त्याला सुचत नव्हते

'एका विरुद्ध दोन आहेत,' तो त्याला म्हणाला.

सातियागो नासर बाहेर गेला. परेडच्या दिवशी बसतात तसे लोक चौकात स्थानापन्न झालेले होते. त्या सगळ्यानी त्याला बाहेर येताना पाहिले त्या सगळ्याना समजले होते की, आता, त्याला ते ठार करणार आहेत हे कळले होते. तो इतका गोंधळलेला होता की आपल्या घरचा रस्ता त्याला सापडत नव्हता. कुणीतरी बाल्कनीतून ओरडले म्हणतात 'त्या रस्त्याने नाही, तुर्का, जुन्या बंदराच्या रस्त्याने.' सातियागो नासरने आवाजाचा शोध घेतला. यामिल शायम दुकानात ये म्हणून ओरडला आणि शिकारीची बंदूक घ्यायला आत गेला; पण काडतुसे कुठे ठेवली आहेत ते त्याला आठवेना. साऱ्या दिशानी लोक ओरडत होते आणि सातियागो पुढे जात होता, मागे येत होता एकाचवेळी येणाऱ्या वेगवेगळ्या हाकानी तो गोंधळून गेला होता. तो स्वयपाकघराच्या दाराच्या दिशेने आपल्या घराकडे चालला होता हे स्पष्ट होते, पण अचानकपणे समोरचे दार उघडे आहे हे त्याला आठवले असावे

'तो बघ, आलाय,' पेद्रो व्हिकारिओ म्हणाला.

त्या दोघानीही त्याला एकाच वेळी पाहिले. पाब्लो व्हिकारिओने आपले जाकिट काढले आणि बाकावर ठेवले आणि हातातला सुरा कट्यारीसारखा धरून त्याच्याभोवती गुंडाळलेले वर्तमानपत्र काढले. दुकानातून बाहेर पडण्यापूर्वी त्या दोघानीही क्रॉसची खूण केली. तेव्हा क्लॉटिल्ड आर्मेन्टाने पेद्रो व्हिकारिओचे शर्ट पकडले आणि सातियागो नासरकडे पाहून ती ओरडली, 'पळ, तुला ते ठार करणार आहेत' इतर सगळे आवाज बुडून जातील इतक्या मोठ्याने ती ओरडली होती. 'तो एकदम दचकला,' क्लॉटिल्ड आर्मेन्टा मला म्हणाली, 'कारण कोण ओरडत आहे आणि कुठून हे त्याला कळत नव्हते.' पण जेव्हा सातियागोने तिला पाहिले तेव्हा पेद्रो व्हिकारिओलाही पाहिले. त्याने तिला जमिनीवर पाडले होते आणि तो आपल्या भावाजवळ पोचला होता. सातियायो नासरचे घर तिथून पन्नास यार्डसुद्धाही आतच होते आणि तो मुख्य दाराकडे धावला.

पाच मिनिटापूर्वी स्वयपाकघरात व्हिक्टोरिया *गुझमानने प्लासिडा लिनेरोला* जे सर्वांना आतापर्यंत कळले होते ते सांगितले प्लासिडा लिनेरो ही अत्यंत दृढ वृत्तीची बाई होती, तिने आपल्या प्रतिक्रियेचे कोणतही चिन्ह दाखवल नाही. आपल्या मुलाला या गोष्टीची कल्पना दिली आहे का असे तिने व्हिक्टोरिया गुझमानला विचारले आणि ती सरळ खोटे बोलली की, तो कॉफी घ्यायला

आला तेव्हा तिला ही गोष्ट ठाऊक नव्हती. त्याचवेळी दिवाणखान्यात अजूनही फरशी पुसत असलेल्या डिव्हायना फ्लोरला सातियागो नासर दारातून येताना आणि वर बेडरूमकडे जाताना दिसला. 'ते दृश्य अगदी स्पष्ट दिसल होते,' डिव्हायना फ्लोर मला म्हणाली, 'त्याने पाढरा सूट घातलेला होता आणि त्याच्या हातात काही तरी होते, ते मला दिसले नाही, पण गुलाबाचा गुच्छ असावा अस वाटल.' त्यामुळे जेव्हा प्लासिडा लिनेरोने त्याची चौकशी केली, डिव्हायना फ्लोरने तो परतल्याचे सागितले.

'एक मिनिटापूर्वीच तो वर गेला,' ती म्हणाली.

प्लासिडा लिनेरोला नतर जमिनीवर पडलेला कागद दिसला, पण तो उचलावा असे तिला वाटले नाही, शोकातिकेच्या गोधळातच नतर कोणी तरी तो तिला दाखवला तेव्हा त्या कागदावर काय लिहिले आहे ते तिला कळले. व्हिकारिओ बधू हातात सुरे घेऊन घराकडेच धावत येताहेत असे तिला उघड्या दारातून दिसले. ती जिथे उभी होती तिथून तिला ते दिसत होते, पण वेगळ्या दिशेने दाराकडे धावत येत असलेला तिचा मुलगा मात्र तिला दिसला नाही. 'मला वाटल त्याना घरात येऊन त्याला ठार करायच आहे,' ती मला म्हणाली, मग ती दाराकडे धावली आणि ते धाडकन बद केले. ती अडणा लावत असताना सातियागो नासरचा आरडाओरडा तिने ऐकला आणि तिला दारावरचे अत्यत जोराने ठोठावणेही ऐकू आले, पण तिला वाटले तो वर आहे आणि बाल्कनीतून तो व्हिकारिओ बंधूना शिव्या देत आहे. ती त्याच्या मदतीसाठी वर गेली.

सातियागो नासर काही सेकदातच आत आला असता तेवढ्यात ते दार बद झाले. त्याने हाताच्या मुठीनी जोरजोराने दार वाजवले आणि तो आपल्या नि:शस्त्र हातानी शत्रूचा प्रतिकार करण्यासाठी तावडतोब वळला. 'त्याने आमच्याकडे चेहरा वळवला तेव्हा मी घाबरून गेलो होतो,' पाब्लो व्हिकारिओ मला म्हणाला, 'कारण तो होता त्याहून दुप्पट मोठा दिसला.' सातियागो नासरने पेद्रो व्हिकारिओचा पहिला वार चुकवण्यासाठी आपला हात वर केला. त्याने सुरा सरळ धरून उजवीकडून हल्ला केला होता.

'कुत्र्यानो !' तो ओरडला.

सुरा त्याच्या उजव्या हाताच्या पज्यातून आरपार गेला आणि मग त्याच्या कुशीत मुठीपर्यंत खोलवर घुसला. प्रत्येकाने त्याची किंकाळी ऐकली

'आई ग !'

पेद्रो व्हिकारिओने आपल्या खाटकाच्या लोखडी मनगटाने सुरा उपसून काढला आणि दुसऱ्यांदा त्याच ठिकाणी जोरात खुपसला. 'आश्चर्य म्हणजे सुरा स्वच्छ होऊन बाहेर येत होता,' पेद्रो व्हिकारिओने चौकशी अधिकाऱ्याला सागितले. 'मी तीनदा तरी सुरा खुपसला पण रक्ताचा एक थेंबही सुऱ्यावर नव्हता.' तिसऱ्यांदा भोसकल्यानतर सातियागो वाकला, त्याचे हात पोटाकडे वळले, तो वासरासारखा हुकारला आणि त्याच्याकडे पाठ वळवण्याचा त्याने प्रयत्न केला. डावीकडे असलेल्या पाब्लो व्हिकारिओने पाठीत सुरा खुपसला तेव्हा रक्ताची चिळकाडी उडाली आणि त्याचे शर्ट भिजले. 'त्याला त्याचाच वास होता,' तो मला म्हणाला.

तीनदा प्राणघातक घाव बसल्यानतर सातियागो नासरने पुन्हा त्याच्याकडे चेहरा वळवला आणि आपली पाठ आईच्या दाराला टेकवली. त्याने अजिबात प्रतिकार केला नाही, जणू काही त्या दोघानी बरोबरीने वार करून त्याला सपवावे यासाठीच. 'तो नतर ओरडला नाही,' पेद्रो व्हिकारिओने चौकशी अधिकाऱ्याला सागितले. 'उलटच घडले. तो हसतोय अस मला वाटलं.' नतर ते दोघेही, भीतीच्या किनाऱ्यापलिकडच्या चमचमत्या पाण्यावर तरगत, दाराला टेकलेल्या त्याच्या शरीरावर आळीपाळीने सुऱ्याचे वार करीत राहिले. स्वत:च्याच अपराधाने भयग्रस्त झालेल्या अख्ख्या गावाचा आरडाओरडा त्याच्या कानात शिरलाच नाही. 'घोडा दौडवीत असताना जस वाटत असत तसच वाटत होत,' पाब्लो व्हिकारिओने सागितले. पण त्या दोघानाही अचानक वास्तवाचे भान आले, कारण ते थकून गेले होते आणि तरीही सातियागो नासर कधीही खाली कोसळणार नाही असेच त्याना वाटत होते. 'शी:' पाब्लो व्हिकारिओ मला म्हणाला, माणसाला ठार करण हे किती कठीण असत याची तू कल्पनाही करू शकणार नाहीस !' त्याला एकदाचे सपवावे म्हणून पेद्रो व्हिकारिओ त्याचे हृदय शोधत होता; पण ते तो काखेत शोधत होता, कारण डुकराचे हृदय तिथे असते. सातियागो नासर खाली कोसळत नव्हता याचे खरे कारण हे होते की ते स्वत.च त्याच्यावर वार करताना त्याला धरून ठेवीत होते. निराश होऊन पाब्लो व्हिकारिओने त्याच्या पोटावर आडवा चिरा मारला आणि त्याची आतडी बाहेर लोंबू लागली. पेद्रो व्हिकारिओही तेच करणार होता; पण भीतीमुळे त्याचा हात हलला आणि त्याने त्याच्या माडीवर जोरदार घाव घातला. सातियागो नासर क्षणभर स्थिर होता, दाराला पाठ टेकून, पण जेव्हा त्याने सूर्यप्रकाशात स्वत:चीच आतडी स्पष्टपणे पाहिली तेव्हा तो गुडघ्यांवर कोसळला.

त्याला बेडरूममध्ये शोधून व हाका मारून दुसरीकडचा आरडाओरडा ऐकून आणि तो कुठून ऐकू येत आहे हे न कळून, प्लासिडा लिनेरो चौकाकडच्या खिडकीशी येला आणि व्हिकारिओ बंधू चर्चच्या दिशेने धावताना तिला दिसले. त्याच्यामागे हातात बदूक घेतलेला यामिल शायम आणि इतर नि:शस्त्र अरब पळताना पाहून सकट टळले आहे. असे प्लासिडा लिनेरोला वाटले. नंतर ती बेडरूमच्या बाल्कनीत गेली आणि दारासमोर पडलेल्या सातियागो नासरला तिने पाहिले. चेहरा खाली वळलेला, स्वत:च्याच रक्तातून वर उठण्याचा प्रयत्न करीत असलेला. एका बाजूला झुकलेल्या अवस्थेत तो उभा झाला आणि लोबणारी आतडी हातानी धरून सभ्रमित अवस्थेत तो चालू लागला.

शभर यार्डाहून अधिक अंतर तो चालला. त्याने घराला पूर्ण वळसा घेतला आणि स्वयपाकघराच्या दाराने आत गेला. त्याला अजून शुद्ध होती, त्यामुळे तो रस्त्यावरून गेला नाही तर बाजूच्या घरातून गेला. पोचो लानाओ, त्याची बायको आणि त्याची पाच मुले यापैकी कुणालाही त्याच्या घरापासून वीस पावलावर काय घडले ते ठाऊक नव्हते. 'आम्ही आरडाओरडा ऐकला,' त्याची बायको मला म्हणाली, 'पण आम्हाला वाटलं की बिशपच्या स्वागताचाच तो भाग आहे.' रक्ताने भिजलेला आणि स्वत:ची आतडी हातात पकडून असलेला, सातियागो नासर आत येत होता तेव्हा ते न्याहारीला बसले होते.


पोचो लानाओ मला म्हणाला. 'घाणीचा भयकर वास मात्र मी कधीही विसरू शकणार नाही.' परतु अर्जेनिदा लानाओ, मोठी मुलगी, म्हणाली की, सातियागो नासर नेहमीसारखा व्यवस्थित पावले टाकत चालत होता आणि त्याचा अरबी चेहरा अधिकच देखणा दिसत होता. टेबलाजवळून जाताना तो त्यांच्याकडे पाहून हसला आणि बेडरूममधून घराच्या मागच्या दाराकडे चालत राहिला. 'आम्ही भयाने गोठून गेलो होतो,' अर्जेनिदा लानाओ मला म्हणाली. माझी काकू, वेनेफ्रिडा मार्केज आपल्या अंगणात माशाचे खवले काढत बसलेली होती तेव्हा जुन्या बंदराच्या पायऱ्या ठामपणे उतरत असताना त्याला तिने पाहिले.

'सातियागो, बाळा,' ती त्याच्याकडे पाहून ओरडली, 'काय झालंय तुला ?'

'मला त्यानी मारलय, वेने मुली,' तो म्हणाला.

तो शेवटच्या पायरीवर अडखळला, पण तो लगेच उठला. 'त्याने आपल्या आतड्याना लागलेली धूळसुद्धा झटकली,' वेने काकू मला म्हणाली. नतर तो मागच्या दाराने आपल्या घरात गेला आणि स्वयपाक घरातल्या फरशीवर पालथा पडला.

# नेता - अभिनेता





राजकारणात त्याचा कसा निभाव लागायचा अशी पूर्वी काळजी वाटायची !
आता तो तिथं छान रुळलेला दिसतोय !!




प्रेक्षकांच्या मनातील तुमच्या प्रतिमेला जपण्याचा तुमचा हा प्रयत्न
मला मुळीच पसंत नाही मिस्टर बच्चन !

# नेता - अभिनेता




राजकीय विषयावर तुम्ही बोलणार हे आपण अगोदर जाहीर केलं
हे जरा चुकलंच !




□

MANOOS ( Marathi Weekly ) ( Licensed to post without prepayment of postage No. 11 ) Regd. No. PNC-W 28


विकसनशील राष्ट्रधर्माची
मांडणी करणारी तीन पुस्तके

लेखक: श्री. ग. माजगावकर

**श्रीग्रामायन**

मूल्य पंचवीस रुपये

**बलसागर**

मूल्य तीस रुपये

**निर्माणपर्व**

मूल्य चाळीस रुपये

दादाभाई नवरोजी ते राजीव गांधी
या सहा पिढ्यांच्या नेतृत्वाची घडण
नि त्यांचं कर्तृत्व यांची कहाणी

**बखर कॉंग्रेसची**

लेखक: शिरीष सहस्रबुध्दे
मूल्य नव्वद रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०